म. गांधी चरित्र

IRBK-0100251

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय चरित्र

दा क्र २५१

IRBK-0100251

दा. क्र. २५९

5 NOV 1997 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

८३

“ लोकमताला सरकारनें मान दिलाच पाहिजे. लोकमताच्या विरुद्ध जाऊन कोणत्याही राजाला राज्य चालवितां यावयाचें नाहीं, ही गोष्ट सिद्ध करून दाखविणें हेंच मी माझ्या जीविताचें प्रधान कार्य मानिलें आहे. ”

खेडा प्रकरण.

IRBK-0100251

# अनुक्रमणिका.

लो. टिळक यांची प्रस्तावना .... .... ७—१६
चरित्र .... .... .... .... १७—९६
विशेष परिचय .... .... .... १—४८

विचारसरणी; कार्याची दिशा; स्वभाववर्णन; संस्मरणीय प्रसंग.

लेख व व्याख्यानें ... ... ... १–१६०

कै. गोखले ३—१३

गुरुवर्य महात्मा गोखले; महात्मा गोखले यांचा जीवन–संदेश.

सत्याग्रह १४—३३

सत्याग्रहाची मीमांसा; सत्याग्रही कोण होऊं शकेल ? तुरुंगांत कोण जाऊं शकेल ? सत्याग्रहाचें रहस्य; भासणारें संकट; आफ्रिकेंतील सत्याग्रहाचें हृद्गत; इतिहास आणि सत्याग्रह.

सुधारणा ३४—५६

आधुनिक सुधारणा.
आगगाड्या; हिंदुमुसलमान; वकील; डॉक्टर; यन्त्रें; खरी सुधारणा.

शिक्षण ५७—८८

शिक्षणाचें वाहन (स्वभाषा); राष्ट्रीय भाषा-तिचीं लक्षणें; शिक्षणाचे विषय; उपेक्षित विषय; स्त्रीशिक्षण; शिक्षणाचा हेतु; शिक्षण आणि उपजीविका; धार्मिक शिक्षण; राजकीय सभा; देशसेवा; बोध; ज्ञानाची किंमत कार्यांत आहे.


सत्याग्रहाश्रम ८९—९६
गुजराथ राजकीय परिषद् ९७-११५
हिंदु यूनिव्हर्सिटी पुढील भाषण ११६-१२४
सामाजिक १२५-१३२

हिंदु-मुसलमान; जातिभेद; अंत्यजांचा प्रश्न.

किरकोळ १३३-१५६

देवमंदिर; हिंदुस्थानांतील भूकंप; आर्थिक उन्नति का नैतिक उन्नति; माझा उपवास; दिल्ली परिषद; आगगाडीच्या उतारूंचे हाल; हिंदी संरक्षक सैन्य.

खेडा प्रकरण (गुजराथी) १५७
हिंदी साहित्य सम्मेलन (हिन्दी) १५८-१६०



# दोन शब्द.

चंपारण्यामध्यें महात्मा गांधी यांचे हाताखालीं स्वयंसेविकेचें काम करीत असतां त्यांचें चरित्र लिहिण्याचा विचार माझ्या मनांत आला. इतक्यांत अलीकडे त्यांच्या भाषणांचीं इंग्रजी पुस्तकें वाचून तो विचार दृढ होऊन त्या उद्योगासहि मी लागलें. हें चरित्र लिहीत असतां थोडासा कां होईना, महात्माजींचा सहवास मला लाभला आणि रामचंद्र प्रभु आणि बुद्ध भगवान् यांनीं पवित्र केलेल्या व महात्माजींच्या सत्याग्रहानें पुनः प्रसिद्धीस आलेल्या बिहारच्या भूमींतच हें कार्य करण्याची संधि मला मिळाली. चरित्र लिहिण्यास सुरवात केली खरी, पण प्रस्तावना कोणाकडून घ्यावी हें गूढ पडलें असतां लो. टिळक यांनीं माझ्या विनंतीचा स्वीकार केला व अत्यंत गडबडींत असतांहि माझी निराशा न व्हावी म्हणून त्यांच्या भाषेंत प्रस्तावनेचे दोन शब्द लिहून दिले याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच.

महात्माजींशीं ज्यांचा मजपेक्षां जास्त परिचय आहे अशा कांहीं मंडळींनीं त्यांचा ‘ विशेष परिचय ’ व त्यांच्या भाषणांचें भाषांतर देण्याचें मनावर घेतल्यामुळें हें पुस्तक इतक्या मूर्त स्वरूपांत बाहेर पडणें शक्य झालें. स्थलसंकोचामुळें त्यांचे किती तरी लेख व व्याख्यानें नाइलाजास्तव छापतां आलीं नाहींत. ज्या व्याख्यानांच्या किंवा लेखांच्याखालीं कोठून घेतलीं याचा उल्लेख केलेला नाहीं तीं ‘ इंडिअन् ओपीनिअन् ’ मधून घेतलेलीं आहेत असें समजावें. असो, हें पुस्तक तयार करण्याचे कामीं ज्या ज्या व्यक्तींची मदत झाली त्यांचे मनःपूर्वक आभार मानून वाचक वर्गास एकच विनंति करतें कीं, त्यांनीं हें पुस्तक वरवर वाचून न सोडतां त्याचें मनन करावें व महात्माजींच्या उपदेशाप्रमाणें वागण्याची शक्य तेवढी खटपट करावी.

आत्माराम मॅनशन
गिरगांव, मुंबई, १ जून १९१८

अवान्तिका गोखले.

# महत्वाच्या चुकांचें शुद्धिपत्र.

## चरित्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३८ | १ | पठाणाला | पठाणावर. |
| ३९ | ११ | जाण्याची | तुरुंगांत जाण्याची. |
| ७२ | १६ | चार | चोर. |
| ८८ | २८ | जो | ० |

## विशेष परिचय.

| | | | |
|---|---|---|---|
| [illegible]२ | १७ | संस्कृतची | संस्कृतीची. |

## लेख व भाषणें.

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | २६ | शकला | शकलों. |
| १७ | २ | असह्य दुःखासाठीं | सह्य दुःखासाठीं. |
| १९ | २ | अजमावण्याला | आज मारणाऱ्याला. |
| २२ | ५ | ज्यांनीं | त्यांनीं. |
| २५ | २२ | चिडून | चिडून जाऊन. |
| २५ | २२ | होणें | करतील हें. |
| ३८ | १७ | वाटतें | वाढतें. |
| ४४ | ४ | आ | आहे. |
| ५६ | १८ | तिचें | तिचे. |
| ६० | १३ | सर्वत्र | सर्वच |
| १२० | २७ | तर | तरी |
| १२१ | २६ | मृतव्रत | मृतवत्. |
| १२२ | २३ | भागता | भोगतो. |



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

# प्रस्तावना.

गेल्या सालीं म्हणजे १९१७ च्या डिसेंबर महिन्यांत कलकत्त्यास कॉंग्रेस सभेस गेलों असतांना तेथें सौ. अवंतिका बाई गोखले ह्यांनीं आपण महात्मा गांधींचें चरित्र लिहीत असल्याचें मला कळविलें व त्यास प्रस्तावना लिहिण्यास मला विनंति केली. ही विनंति अर्थातच मला अमान्य करवेना. पण त्या वेळीं हें पुस्तक इतक्या लवकर तयार होईल अशी मला कल्पना नव्हती. विशेषतः मी विलायतेस जाण्यास निघालों असतां त्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचें काम घाईघाईनें उरकावें लागेल असें तर त्या वेळेस मला मुळींच वाटलें नव्हतें. पण आतां तशी स्थिति आल्यामुळें ही प्रस्तावना कशी बशी तरी पुरी करावी लागत आहे. महात्मा गांधींच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्यास अधिक चांगली वेळ व फुरसत पाहिजे होती. ती मिळाली नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि " अकरणान्मंदकरणं श्रेयः " ह्या न्यायानें मी तें काम करीत आहें. आणि या ग्रंथाचे वाचक वरील हकीकत लक्षांत आणून त्याबद्दल मला माफी करतील अशी आशा आहे.

महात्मा गांधी यांचें नांव हिंदुस्तानांत कोणास माहिती नाहीं असें नाहीं अर्थात् त्यांच्या बद्दल थोडीबहुत माहिती करून घेण्याची इच्छाहि सर्व लोकांस झालेली आहे असें म्हटलें तरी चालेल. परंतु ही इच्छा पूर्ण होण्यास मराठी भाषेंत आजपर्यंत कोणंताच ग्रंथ झालेला नव्हता. ती उणीव सौ. अवंतिकाबाई यांनीं प्रस्तुतचा सोपा ग्रंथ लिहून भरून काढली याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. सौ. अवंतिकाबाई म्हणतात त्या प्रमाणें महात्मा गांधी यांचें चरित्र अद्याप वाढतें आहे. आणि ह्याच विषयावर नवा ग्रंथ लिहिणारास दर वर्षीं नवीन माहिती मिळण्यासारखी

आहे. म्हणून हल्लींच्या ग्रंथानें पुढील लेखकांस कोणत्याहि अडथळा न येतां उलट त्या कार्याची प्रस्तावना करून ह्या कट्ट्या दे. भक्ताच्या चरित्राची महाराष्ट्र वाचकांस ओळख करून देण्याची कामगिरी बजावल्याचें श्रेय मात्र सौ. अवंतिकाबाईस मिळणार आहे. सौ. अवंतिकाबाई ह्या हल्लीं चंपारण्यांत महात्मा गांधी ह्यांस मदत करण्यासाठीं व त्यांच्या हाताखालीं राहून काम करण्यासाठीं गेलेल्या आहेत. तेव्हां केवळ पुस्तकावरूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अवलोकनानेंहि त्यांच्या चरित्र-नायकाचे विचार, आचार, स्वभाव, राहणी, अनेक विषयांवरील त्यांचीं मतें, त्यांच्या कुटुंबांतील माणसांशीं किंवा इतरांशीं त्यांचें वर्तन, यांचा त्यांना पुरा परिचय झालेला आहे. ग्रंथ लिहिण्याच्या कामीं ह्या प्रत्यक्ष अवलोकनाचा पुष्कळ उपयोग झालेला आहे असें वाचकांस सहज दिसून येईल.

महात्मा गांधी यांचें चरित्र बोधप्रद आणि अनुकरणीय कां व्हावें याचीं कारणें शोधून काढण्यास माझ्या मतें फारसे परिश्रम नको आहेत. गांधी हे ज्याप्रमाणें विलायतेहून बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन आलेले आहेत त्याप्रमाणें बॅरिस्टर झालेले पुष्कळ लोक आहेत. त्यांचे वडील दिवाण-गिरीच्या कामावर होते तसेहि पुष्कळांचे असतील. किंवा ह्यांचा स्वभाव जसा साधा व सरळ आहे तसा इतरांचाहि असेल. त्यांत कांहीं विशेष नाहीं. इंग्रजी विद्येचा ह्या देशांत प्रचार झाल्यापासून निष्णात झालेले पुष्कळ लोक हिंदुस्तानांतील विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेले आहेत. जगाचा इतिहास किंवा भूगोल सांगोपांग माहित असणें, अथवा एकाद्या शास्त्रीय विषयावरील माहिती बिनचुक सांगणें, हीं कामें केवळ बुद्धिगम्य असल्यामुळें तीं आमच्यापैकीं पुष्कळ बुद्धिवान लोकांनीं गेल्या शेंदीडशें वर्षांत उत्तम रीतीनें करून दाखविलीं आहेत. तसेंच पाश्चात्य विचार, पाश्चात्य सामाजिक पद्धति, पाश्चात्य समजुती, किंवा समाजरचना इत्यादि गोष्टींबद्दलही बौद्धिक किंवा तार्किक विचार करण्यांत आमच्या

सुशिक्षित वर्गानें आपली बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारें व्यक्त केली आहे. परंतु शील किंवा चारित्र्य—ज्यामुळें या कर्ममय भूमींत मनुष्याची सभोंवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालूं शकते, आणि ज्यामुळें निरनिराळ्या गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नास सिद्धि प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो तें शील व चारित्र्य ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनाला येईल अशीं चरित्रें आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चरित्राचें जें कांहीं वैशिष्ट्य आहे तें हेंच होय. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा इतर मतांपैकीं कांहीं मतें कितीएकांस कदाचित् पसंत होणार नाहींत. विद्वत्तेनें त्यांना मागें टाकणारे दुसरे पुष्कळ गृहस्थ असतील, पण शीलचारित्र्याची जी महती वर सांगितली त्या दृष्टीनें विचार केला असतां महात्मा गांधी यांचें चरित्र खरोखरच सामान्य मनुष्यास आदर्शभूत होण्यासारखें आहे, ह्याबद्दल कांहीं मतभेद असेल किंवा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. आणि म्हणूनच मराठी भाषेंत झालेल्या ह्यांच्या प्रस्तुतच्या चरित्राचा महाराष्ट्रांतील लोकांनीं नीट अभ्यास करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

हिंदुस्तानांतील लोक, मग ते हिंदुस्तानांत रहाणारे असोत किंवा इंग्रजी साम्राज्याच्या इतर भागांत राहणारे असोत, चोहोंकडे विपन्न स्थितींत आहेत या बद्दल कांहीं शंका नाहीं. तसेंच ही विपन्नावस्था कां आली, पूर्वींच्या स्थितींत कोणतें अंतर पडलें, हें अंतर न पडण्यास काय केलें पाहिजे इत्यादि गोष्टींची पुष्कळ चर्चा झाली असल्यामुळें त्याबद्दल या लहानशा प्रस्तावनेंत आम्हीं कांहीं लिहूं इच्छित नाहीं. किंबहुना महात्मा गांधी यांच्या चरित्रापासून जो बोध घ्यावयाचा त्याचा हा महत्त्वाचा भाग नाहीं अशी आमची समजूत आहे. व्यक्तीच्या संसारांत काय, किंवा देशाच्या संसारांत काय, परिस्थिति ही प्रायः पूर्व पिढीच्या किंवा पूर्वकालीन कर्माच्या परिपाकानें निर्माण झालेली असते. ही स्थिति वाईट असल्यास त्याचा दोष त्या स्थितींत राहणाऱ्या मनुष्याकडे देतां येत

नाहीं, हें खरें आहे. पण ती जर वाईट असेल तर तिच्या कारणांचा योग्य उहापोह करून व तीं दूर करण्यास कोणते उपाय केले पाहिजेत, ह्याचा शक्य तितका खोल विचाराअंतीं निर्णय करून तो निर्णय अमलांत आणण्याचें काम म्हणजे अर्थात् ती स्थिति सुधारण्याचें काम, जर सदर स्थितींत सांपडलेला पुरुष—विशेषतः देशांतील कर्ता पुरुष करणार नाहीं तर मात्र तो आपल्या कर्तव्यास जागला नाहीं असें म्हणावें लागेल. कारण परिस्थिति उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलों तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणें हें प्रत्येक मनुष्याचें व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिक दृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्रांचा आणि धर्माचाहि सिद्धांत आहे. ज्या योगानें जगाचें धारण पोषण होतें त्याला धर्म असें म्हणतात आणि जगाचें धारणपोषण म्हटलें म्हणजे त्यांत सद्यः-कालीन परिस्थिति सुधारून ज्या योगें ती परिस्थिति वरच्या वरच्या पायरीला जाऊन अखेर पूर्णावस्थेला पोचेल त्या त्या सर्व गोष्टी करणें, करविणें, स्वतः करणें आणि लोकांकडून करविणें याचा प्राधान्येंकरून समावेश होतो. आपला जन्म कोणत्याहि देशांत झालेला असो, तो केवळ आपण त्या देशांतील अन्न खाऊन आमरणांत आपल्या बायका मुलांसह चैनींत राहण्यासाठीं नाहीं, या पेक्षां कांहीं तरी उच्चतर ध्येय सिद्ध करण्याकरितां आहे, ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार या दोहोंसही पूर्णपणें मान्य आहे. या उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे कीं, मनुष्य या मार्गानें जातां जातां अखेर त्याला ह्या जगाचें पालन पोषण करणाऱ्या परमेश्वराचें तादात्म्य प्राप्त होतें. म्हणजे तो देवपणा पावतो, असें शास्त्रांतून वर्णन आहे. परंतु शास्त्र आणि धर्म या दोहोंच्याहि आज्ञा जरी अशा प्रकारच्या आहेत तरी ह्या ध्येयाकडे आमच्या देशांतील लोकांचें जितकें लक्ष्य लागावें तितकें लागलें नव्हतें असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. एरवीं सध्याची परिस्थितिच उत्पन्न झाली

नसती. पण पूर्वकालीं ह्या गोष्टीकडे देशांतील कर्त्या पुरुषांचें जावें तितकें लक्ष्य गेलें नाहीं म्हणून प्रस्तुत कालीं आम्हींहि तो मार्ग स्वीकारूं नये असें होत नाहीं. देशाच्या उन्नतीसाठीं जे कांहीं प्रयत्न करावयाचे त्याला कालाची कांहीं विशिष्ट मर्यादा असते असें नाहीं. पूर्वीच्यांनीं असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकांनीं करूं नयेत असें नाहीं. आज केले नाहींत तर उद्यां करूं नयेत असें नाहीं. आणि उद्यां केले नाहींत तर परवां करूं नयेत असेंहि होत नाहीं. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि ही कर्तव्यजागृति ज्याच्या ज्याच्या मनांत ज्या ज्या क्षणीं होईल त्या त्या क्षणीं त्यानें हें आपलें कर्तव्य बजावण्यास निरलसपणानें स्वार्थत्याग करून आणि आपणावर किंवा आपल्या कुटुंबावर संकटें येणार किंवा येतील याची पर्वा न करितां परमेश्वरावर भरंवसा ठेवून निष्काम बुद्धीनें लागलें पाहिजे हा ह्यांतील सारभूत सिद्धांत आहे. म. गांधींच्या चरित्रावरून जो कांहीं बोध घ्यावयाचा त्या पैकीं मुख्य बोध हा होय.

अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे कीं हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्यास प्रथमतः हिंदी समाजाची स्थिति सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हां मग पुढें राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हें वाचकांस सहज कळून येणार आहे. देशांतील सर्व कांहीं सुधारणा घडवून आणण्यास "सर्वा-रंभास्तण्डुलाः प्रस्थ-मूलाः" या न्यायानें त्या देशांतील सत्ता पूर्ण नाहीं तरी बऱ्याच अंशानें देशांतील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या हातांत असावी लागते. सत्ते-शिवाय शहाणपण फुकट जातें इतकेंच नव्हे तर कर्तृत्वही निर्माल्यवत् होतें. ह्मणून देशाची स्थिति सुधारण्याचे जे प्रयत्न करावयाचे ते विशेषें-करून प्रथमतः ह्या सर्व सुधारणांना अवश्य लागणाऱ्या मूलभूत बाब-तींतच झाले पाहिजेत. महात्मा गांधींचें असें मत नसतें तर ते राजकीय

सुधारणेंत बिलकुल पडले नसते. आफ्रिकेंतील वसाहतींत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनीं जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिकच होते असें नाहीं, आफ्रिकेंतील राज्यव्यवस्थेशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध होता. किंबहुना अफ्रिकेंतील जुलमी राज्यव्यवस्थेमुळेंच तेथील हिंदी मजुरांवर ह्या प्रसंग ओढवलेला होता असें म्हटलें तरी चालेल. ह्याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतःच असा परिणाम झाला कीं राज्यव्यवस्थेंत सुधारणा झाल्याखेरीज आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति सुधारावयाची नाहीं. इंग्रजी साम्राज्याचे जर आम्ही भागीदार आहों तर ह्या साम्राज्यांत गोऱ्या प्रजेस जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसहि असले पाहिजेत हें न्यायदृष्ट्या अगदीं उघड आहे. पण गोऱ्या लोकांच्या आज ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या वसाहतवाल्यांनीं केवळ आपल्याच फायद्याकरितां केल्या अशी स्वार्थमूलक समजूत असल्यामुळें साम्राज्याच्या इतर भागांतील लोकांस समबुद्धीनें वागवण्यास ते तयार नाहींत. तथापि बाहेरच्या देशांतील लोक त्यांस अगदींच नको आहेत असेंहि नाहीं. कारण वसाहतींत जमीन किंवा खनिज द्रव्यें मुबलक असून ह्या संपत्तीचा पूर्ण उपयोग करण्यास वसाहतवाल्यांजवळ पुरेसें मनुष्यबळ नाहीं. हजार पांचशें किंवा दोन चार हजार गोरे वसाहतवाले दोहोंच्या ऐवजीं चार चार हातांनीं जरी काम करूं लागले किंवा सहस्र बाहूंच्या शक्तींचीं कितीहि यंत्रें त्यांनीं उपयोगांत आणिलीं तरी वसाहतींतल्या मुलुखापासून द्रव्यदृष्ट्या जितका फायदा होणें शक्य होतें किंवा आहे त्याच्या शतांश देखील फायदा ह्या वसाहतवाल्यांस होणार नाहीं. तेव्हां आफ्रिकेंत मागें नीग्रो लोकांस ज्या प्रमाणें ते वागवीत होते त्याच प्रमाणें हिंदुस्तानांतील काळ्या लोकांस मजूर म्हणून तेथें नेऊन केवळ पशूंप्रमाणें त्यास वागविणेची आणि त्यांच्या उद्योगावर आपण समृद्ध होण्याची वसाहत त्यांनीं कल्पना काढली. आणि आमच्या हिंदुस्थानांतील नोकरशाही वसाहतवाल्यांच्या बांधवांचीच असल्यामुळें वसाहतींतील हिंदी मजुरां

शोचनीय स्थितीकडे हिंदुस्थान सरकारचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं. ही शोचनीय स्थिति हिंदुस्तानांतील पुढारी लोकांच्या लक्षांत येऊन गेल्यास पुष्कळ वर्षे झालीं, पण गांधी सारखे पुरुष पुढें येईपर्यंत तिचें अल्प देखील निवारण झालें नाहीं. समजलें होतें पण उमजलें नव्हतें. आणि उमजलें तरी करवत नव्हतें असा प्रकार होता. या कुंचंब्यांतून लोकांना बाहेर काढून गांधींनीं आपल्या उदाहरणानें सुधारणेचा मार्ग दाखविला, असें पुढील चरित्रावरून कोणासहि कळून येईल. आफ्रिकेंतील हिंदी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेंतून सोडविण्यास गांधी यांनीं काय केलें याचेंहि जरा सूक्ष्म रीत्या अवलोकन केलें पाहिजे. एकाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली तर ती सुधारण्याचा प्रयत्न करणें हा कांहीं न्यायदृष्ट्या राजद्रोह होऊं शकत नाहीं. ह्याला राजद्रोह म्हणणें हें राज्यकर्त्यांस न्याय नको, नीति नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत, असें म्हणण्यासारखें आहे. आम्ही असें समजतों कीं प्रजेचें कल्याण हेंच राजसत्तेचें खरें ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धांत एकदां पतकरला म्हणजे मग ज्या ठिकाणीं अन्याय आहे तेथें त्याचा प्रतिकार करून तो दूर करणें म्हणजे एक प्रकारें राज्यसत्तेच्या ध्येयाची अम्मलबजावणी करण्यास मदत करणें होय असा त्या पासून सहजच दुसरा सिद्धांत निघतो. पण पूर्वसंचितामुळें आलेले दुराग्रह अगर स्वार्थबुद्धि यांमुळें प्रजाजनांपैकीं कांहीं विशिष्ट व्यक्ति, जाति किंवा वर्ग कधीं कधीं इतके पछाडले जातात कीं त्यांना हीं न्यायाचीं तत्त्वें दिसेनाशीं होतात अर्थात् अशा वर्गांचा इतर लोकांवर एक प्रकारें जुलूम होऊं लागतो. अशा वेळीं राज्यकर्त्यांनीं त्यांत एकदम हात घालून अन्यायाच्या गोष्टी बंद केल्यास ह्या दुराग्रही व स्वार्थी पण परंपरागत वजनानें प्रतिष्ठित बनलेल्या वर्गांस दुखवावें लागतें. व त्यामुळें शांततेची चालत आलेली घडी विस्कळीत होते. यास्तव अशा प्रकारच्या

स्थितींत ज्यांच्यावर जुलूम होतो त्यांच्याकडून निकराचे प्रयत्न झाल्या-सेरीज राज्यकर्ते प्राय: त्यांत मन घालीत नाहींत. सारांश, चालतें मूल ज्या प्रमाणें कोणीहि कडेवर घेत नाहींत, ठेंच लागून पडेल तर गोष्ट निराळी, अशांतलाच प्रकार राजकीय बाबतींतही घडून येतो. जोंपर्यंत राज्यकारभार चालण्यांत कांहीं अडथळा येत नाहीं तोंपर्यंत राज्याचीं सूत्रें चालवणाऱ्या लोकांनीं तरी तिकडे काय म्हणून लक्ष्य द्यावें.? मनुष्य-स्वभावच असा आहे कीं, चालत्या गोष्टींत विनाकारण कोणीं ढवळा-ढवळ करूं इच्छित नाहीं. त्यापासून दुष्परिणाम होतात असें प्रत्यक्ष अनुभवाला येईल इतकेंच नाहीं तर त्यामुळें अडेल तेव्हांच कोणीहि मुत्सद्दी मनुष्य त्यांत सुधारणा करण्यास प्रवृत होत असतो. एरवीं नाहीं. अर्थात् प्रजेच्या दु:खाची किंवा गाऱ्हाण्यांची किंवा त्यांवर होणाऱ्या जुलमाची स्थिति अशा मजलेपर्यंत आणून ठेवणें आणि शेवटीं राज्यकर्त्यांकडूनच ती सुधारणा घडवून आणणें हें प्रत्येक देशभक्ताचें हरएक प्रसंगीं कर्तव्य आहे आणि हें कर्तव्य गांधी यांनीं उत्तम प्रकारें बजावलें यामुळेंच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झालेले आहेत.

परंतु गांधींच्या ह्या अडवणुकीच्या मार्गाचें खरें रहस्य सांगण्यास आणखीही दोन शब्द सांगितले पाहिजेत. देशांत शांतता राखण्यां-साठीं जे कायदे केलेले असतात त्यांत राज्यकर्त्या अमलदारांशीं दांड-गाई करणें अगर त्यांचा हुकूम तोडून बंड करणें ह्या गोष्टी कितीहि सद्बुद्धीनें केलेल्या असल्या तरी स्वभावत:च बेकायदेशीर मानल्या जातात अशा वेळीं ज्या देशभक्तास आपली इच्छित सुधारणा कायदेशीर रीतीनें अमलांत आणावयाची असेल त्याच्या मार्गांत अनेक अडचणी ... होतात. मन जळत असतें. सुधारणा करण्याची उत्कट इच्छा ... कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन करणें गैरशिस्त होय अशी खात्री ... पण उपाय सुचत नाहीं. गांधी यांनीं स्वीकारलेला नि:शस्त्र प्रतिकार

अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेंत बोलावयाचें तर सत्याग्रहाचा मार्ग अशा प्रकारच्या अडचणींतच त्यांस सुचलेला असून त्यांनीं अनेक अडचणी सोसून त्या मार्गाचा अवलंब केल्यामुळें तो आतां शास्त्रपूत झाला आहे. हा मार्ग सर्व प्रसंगीं, सर्व कालीं अवलंबिण्यासारखा असला तरी तो हरएक प्रसंगीं उपयोगांत आणावाच किंवा नाहीं अगर सर्व प्रसंगीं तितकाच फलद्रूप होईल किंवा नाहीं हें निश्चयानें सांगणें कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे, हें सर्वांस कबूल करावें लागेल. राजानें केलेल्या कायद्याप्रमाणें सर्व प्रजेनें वागावें म्हणूनच प्रत्येक कायद्याच्या मागें तो उल्लंघन करणारांस शासन सांगितलें असतें. हें शासन प्रायः अशा प्रकारचें असतें कीं त्यामुळें मनुष्यमात्राची प्रवृत्ति नीतीनें वागण्याकडे व्हावी. नीतीचा मार्ग सुखाचा, समाधानाचा, आणि शांततेचा असतो. आणि त्या मार्गानें जाण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींत जर स्वार्थामुळें थोडी चलबिचल होण्याचा संभव असला तर हें कायद्याचें शासन ती चल-बिचल काढून टाकून मनुष्याची सन्मार्गाकडे असलेली स्वाभाविक निष्ठा दृढ करण्यास कारणीभूत होतें. पण त्याच्या उलट स्थितींत म्हणजे जेव्हां कायद्यानें ठरविलेली मर्यादा धर्ममूलक अगर न्यायमूलक न-सून केवळ कायद्यांत सांगितलेल्या शासनामुळेंच ती अमलांत यावी असा प्रचलित कायद्यांचा परिणाम होऊं लागतो तेव्हां कायद्यानें दिलेलें शासन भोगून धर्मतत्त्वावरची किंवा न्यायतत्त्वावरची आपली सत्यनिष्ठा कसोटीला लावावी अथवा कृत्रिम कायद्यांतील शास-नाच्या भीतीनें ईश्वरनिर्मित न्यायतत्त्वाचा अव्हेर करण्यास प्रवृत्त
वें असा शहाण्यासुरत्या मनुष्याच्या डोळ्यापुढेंहि एक मह-
त्त्वा प्रश्न उभा राहतो. सत्यनिष्ठ आणि न्यायनिष्ठ माणसें कायद्याचा
म निर्बंध अशा वेळीं पाळणें युक्त नाहीं असें सांगतात. पण हें
गें अमलांत येण्यास सत्यावरील व न्यायावरील निष्ठा इतकी तीव्र

असावी लागते कीं स्वतःच्या किंवा आपल्या नायका मुले
सुखाचा, बलाबलतेचा विचारही मनांत न आणतां मे
कर्तव्य करण्यास झटदिशीं प्रवृत्त होईल. ज्याला मानसिक धैर्य, खरा
सत्यनिष्ठा किंवा सात्त्विक शील आणि इमानत म्हणतात तें हेंच होय. हा
गुण केवळ विद्वत्तेनें येत नाहीं. केवळ चांगल्या कुलांत उत्पन्न झाल्यानें
येत नाहीं. आणि केवळ बुद्धिमत्तेनेंहि येत नाहीं. खरें आत्मबल हेंच
होय. आणि उपनिषदांतील "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न
बहुना श्रुतेन" हें तत्त्व नीट लक्षांत ठेविलें पाहिजे.

पण अशा प्रकारचें आत्मबल नुसत्या विद्वत्तेनें अगर बुद्धिमत्तेनें प्राप्त होण्यासारखें नसून तें नैसर्गिकच पाहिजे हा सिद्धांत जरी खरा असला तरी निश्चयी मनुष्यास हा गुण गीतेंत म्हटल्या प्रमाणें अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगानें क्रमाक्रमानें नेहमींच प्राप्त होण्यासारखा असतो, हेंहि विसरतां कामा नये. थोर व उदार पुरुषांचीं चरित्रें शील-चारित्र्यवर्धनास उपयोगी पडतात यांतील बीज हेंच होय. ज्याचा स्वभाव निसर्गतःच सात्त्विक असतो त्याला आपल्या नैसर्गिक स्वभावाची पूर्ण ओळख पटण्यास, किंवा त्यांची पूर्ण वाढ करण्यास थोर पुरुषांच्या चरित्राचें वाचन हें एक उत्तम साधन होतें इतकेंच नव्हे तर ज्यांचा स्वभाव किंवा प्रकृति जन्मतःच अपरिपक्व असेल त्यांस ही सदर प्रकृति परिपक्व दशेस आणण्यास थोर विभूतींच्या चरित्रांचा चांगला उपयोग होत असतो. म्हणून महात्मा गांधी यांचें चरित्र ह्या व्यापक दृष्टीनें सर्वांनींच वाचावें अशी त्यांस आमची शिफारस आहे.

पुणें शहर
१६ मार्च १९१८

**बाळ गंगाधर टिळक**



गांधींचे राजगुरु ना० गोखले.



राष्ट्रसेवक महात्मा गांधी.



ऐंजिनिअर कॅलनबॅक म. गांधींचे एक अनन्य भक्त आणि स्नेही, जर्मन असूनही निःशस्त्रप्रतिकार मानण्याइतकी यांची सात्विक वृत्ति आहे.



मि. **पोलक** म. गांधींचा उजवा हात. हिंदुस्थानला न्याय मिळवून देणें हीच इंग्लंडची सर्वोत्कृष्ट सेवा होय असें या सत्याग्रही ब्रिटिश नागरीकास वाटतें.

# महात्म्य।

" क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या १४४ कलमाअन्व
परी अमान्य करण्याची जोखीम मी आपल्या शिरावर
साठीं आपली एक संक्षिप्त कैफीयत कोर्टापुढें रुजू करण्याची पर
नम्र समजुतीप्रमाणें ही स्थानिक अधिकाऱ्यांच्या आणि माझ्या
भेदाची एक बाब आहे. भूतदयेच्या व राष्ट्रीय सेवेच्या एकमात्र हेतूनें रेत
या प्रांतांत आलों आहें. येथें येऊन रयतेला मदत करण्याविषयीं अत्यंत आग्रहाचें निमंत्रण आल्यामुळें मी येथें आलों आहें. रयतेचें म्हणणें असें आहे कीं निळीचे मळेवाले त्यांना न्यायानें वागवीत नाहींत. परंतु या प्रश्नाची सारी पुरी माहिती मिळविल्याखेरीज त्यांना कोणत्याहि प्रकारची मदत करणें मला अशक्य आहे. आणि ती माहिती मिळविण्यासाटीं मी येथें आलों आहे. व मिळाल्यास सरकार तसेंच मळेवाले यांचीहि मदत शक्य तर घेऊन ही माहिती मिळवावी असा माझा इरादा होता. याशिवाय इकडे येण्यांत माझा दुसरा कोणताहि हेतु नसून माझ्या-इकडे येण्यानें सार्वजनिक शांततेचा भंग किंवा प्राणहानि होईल, असें मला मुळींच वाटत नाहीं. असल्या गोष्टीचा मला बराच अनुभव आहे, असें मी सांगूं शकतों परंतु स्थानिक सरकारास तसें वाटत नाहीं; त्यांच्या अडचणी मी पूर्णपणें समजूं शकतों व त्यांना जी माहिती मिळते त्यावरूनच जें काय करावयाचें तें त्यांना ठरवावें लागतें हेंही मला कबूल आहे. कायद्याला योग्य मान देणाऱ्या कोणत्याहि नागरिकाप्रमाणें मलाहि प्रथमक्षणीं या हुकुमाला मान द्यावा असें वाटणें सहाजिक होतें आणि तसें मला वाटलेंही. पण ज्यांच्याकरितां मी इकडे आलों त्यांच्या-विषयीं माझी जी कर्तव्यबुद्धि आहे, तिचा घात केल्याशिवाय तसें करणें मला शक्य नव्हतें. मला वाटतें यावेळीं या लोकांमध्यें राहूनच त्यांची सेवा करणें

…ा स्थानीं असलेल्या मनुष्यानें
… ्दारी घेतली पाहिजे या गोष्टीची मला
(गुंतागुंतीच्या) राजशासन पद्धतीच्या अमलाखालीं
मजवर आलेल्या या प्रसंगासारख्या प्रसंगीं कोण-
सुरक्षित आणि अब्रूचा असा एकच मार्ग म्हटला
… आहे तोच—अर्थात् हुकूम अमान्य केल्याबद्दलची
…र्ण सोसणें हाच—होय. ही जी कैफीयत मी कोर्टापुढें रुजू
…श मला होणारी शिक्षा सौम्य किंवा कमी व्हावी असा नसून
…ाराविषयीं मला आदर नाहीं म्हणून नव्हे तर त्यापेक्षां उच्चतर अशा सदसद्विवेक बुद्धीच्या आज्ञेचें पालन करण्यासाठींच मी हें केलें आहे एवढेंच मला दाखवावयाचें आहे."

वरील उद्गार ज्या व्यक्तीच्या मुखांतून बाहेर पडले ती व्यक्ति कोण असावी बरें? कारण असे उद्गार फारच थोड्या व्यक्तींच्या तोंडून बाहेर पडतांना ऐकूं येतात. तसे उद्गार काढण्यास असाधारण मानसिक धैर्य लागतें. असाधारण धैर्य, दैवी मानसशक्ति, परदुःखनिवारण करण्याची उत्कट इच्छा, जबर आत्मविश्वास इतक्या गुणांनीं सुशोभित झालेली व्यक्ति महात्मा गांधींशिवाय दुसरी कोण असणार? एवढ्या थोर महात्म्याचें चरित्र लिहिण्याचें काम मजसारख्या अल्पमति स्त्रीनें पत्करणें म्हणजे लहान तोंडीं मोठा घांस घेणेंच होय. पण ज्याप्रमाणें प्रभुगुण गाण्यास व प्रभुभक्ति करण्यास सर्वांस सारखाच हक्क पोहोंचतो त्याप्रमाणेंच अशा महात्म्याचे गुणानुवाद गाणें हा … … व्यक्तीचा हक्क … प्रेरित होऊन मी हें बिकट काम हातीं घेतलें. दुसरें कारण मराठी वाचकवर्गात अशा असाधारण व्यक्तीच्या चरित्राचा शक्य तितका फैलाव व्हावा असें माझ्या मनाला फार वाटत असल्यामुळें माझ्या अल्पमतीला … लिहितां येईल तितकें लिहिण्याचा मी विचार केला. महात्मा गांधींचें चरित्र … ण्यास, लेखकाला दरवर्षी नवीन सामग्री मिळूं शकण्यासारखी आहे. म्हणून … ही मोठी कामगिरी आहे तथापि ती हातीं घेण्याचें धाडस करितें.

मोहनदास करमचंद गांधींचा जन्म सन १८६९ सालीं आक्टोबरच्या दुसऱ्या तारखेस ह्मणजे भाद्रपद वद्य १२ शके १७९० रोजीं काठेवाड प्रांतांत पोरबंदर शहरीं एका वैश्यकुलांत झाला. जन्म जरी वैश्यकुलांत झाला तरी पूर्वी ब्राह्मणाच्या अंगीं जी दैविक शक्ति वसत असे ती त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत आहे, व क्षत्रियामध्यें वसत असलेलें धैर्यही त्यांच्या अंगीं पूर्णपणें बिंबलेलें आहे. राजकारणामध्यें गढून जाणें हें त्या कुटुंबाच्या अगदीं अंगवळणीं पडून गेलें होतें, ह्यांच्या पूर्वजांनीं दिवाणगिरीसारखीं मोठीं व जोखमीचीं कामें पतकरिलीं होतीं. ह्यांचे वडिलांनीं सुमारें तेवीस वर्षें दिवाणगिरीचें काम काठेवाडांत केलें होतें. त्यांची कामगिरी इतकी चांगली झाली होती कीं सर्व लोक त्यांच्यावर फार प्रेम करीत असत. व ज्यांच्याशीं त्यांचा निकट संबंध येई त्यांचें त्यांच्यावर फारच प्रेम बसत असे. त्यांचा स्वभाव इतका प्रामाणिक व करारी होता कीं वेळ पडल्यास पोरबंदरचा राजा अथवा पोलिटीकल एजंट ह्यांच्याशीं सामना करण्यास ते मागें पुढें पहात नसत. आणि मुख्यत्वेंकरून त्यांच्या धाकट्या मुलामध्यें ह्याच गुणाचा पूर्णपणें विकास झालेला दिसून येत आहे.

आतां आमच्या चरित्रनायकाच्या मातेविषयीं थोडेसें लिहिलें पाहिजे. कारण मुलाचें भावी आयुष्य बरेंचसें मातेच्या पूर्व शिक्षणावर अवलंबून असतें. आमच्या चरित्रनायकाची माता ही एक जुन्या धार्मिक मताची स्त्री होती. त्या आपलीं धर्ममतें फारच कडक तऱ्हेनें पाळीत असत. त्या पतिव्रताधर्माच्या पालनामध्यें व आपल्या मुलांना शिक्षण देण्यामध्यें अतिशय दक्ष असत. त्यांची इच्छा आपलीं मुलें प्रामाणिक व सद्वर्तनी निघावीं अशी असे; व ह्मणून त्या त्यांच्यावर फार कडक नजर ठेवीत असत. त्यांची रहाणी फार साधी असे. बाहेरचा भपकेदार देखावा त्यांना मुळींच आवडत नसे. त्या आपला पोषाक फार साधा राखीत असत, व अंगावर फारच थोडे दागिने घालीत असत. आपल्या पतीच्या हुद्यानुसार त्यांना मोठमोठ्या राण्यांच्याबरोबर रहावें लागत असे, तरी देखील त्यांनीं आपली रहाणी इतक्या साध्या तऱ्हेची ठेविली होती, हें त्यांना फार भूषणावह होय. अशा गुणी माउलीच्या पोटीं जन्म घेणारा प्राणी धन्य होय ! ज्याप्रमाणें पित्याचे, त्याच प्रमाणें मातेचे ही उत्तम गुण, आमच्या चरित्रनायकाचे अंगांत पूर्णपणें बिंबलेले दिसतात. ज्याचें लहानपणचें शिक्षण अशा उत्तम शिक्षकाचे नजरेखालीं झालें, तो मुलगा जगाला वंद्य झाला तर नवल काय ?

आमच्या चरित्रनायकाचें प्राथमिक शिक्षण पोरबंदरला झालें. पुढें त्यांच्या वडिलांची नोकरी तेथून सुटल्यामुळें ते राजकोटला रहावयास आले व तेथें मोहनदासांचें पहिल्या परीक्षेपर्यंत शिक्षण झालें. त्यांची पहिली परीक्षा सतरावे वर्षी उतरली. मोहनदास सतरा वर्षांचे होईपर्यंत लिहिण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांचा झालेला विवाह ही होय. त्या वेळच्या रीतीला अनुसरून त्यांचें लग्न बारावे वर्षी झालें. वधू पोरबंदरचीच होती. जरी त्या वेळेला लग्नापूर्वी मुलगी सासरीं दाखवावयास आणीत नसत तरी सुदैवानें मोहनदासांची पत्नी लग्नापूर्वी कांहीं महिने आपल्या सासरीं येऊन राहिली होती. व तेथें असतांनां दोघांचेंही वय लहान असल्यामुळें एके ठिकाणीं खेळण्याचा प्रसंग पुष्कळ वेळां आला होता. व अशा तऱ्हेनें लग्नापूर्वी त्यांची आपसांत मैत्री जमली होती. लग्नसमारंभ मोठ्या थाटमाटानें व धामधुमीनें पोरबंदर मुक्कामीं झाला. त्या लग्नाबरोबर कुटुंबांतील दुसरीं दोन लग्नें झालीं असल्यामुळें वऱ्हाड खूब जमलें होतें. मोहनदासला व ह्यांच्या पत्नीला, दोघांचेंही बालवय असल्यामुळें लग्नसोहळ्यापासून फारच गंमत वाटली व अशा तऱ्हेनें हा लग्नसोहळा पार पडला. मोहनदासांचा विवाह जरी बालपणीं झाला होता व त्याच्यापासून त्यांना फारच सुख झालें आहे, तरी त्यांचे सध्यांचे विचार बालविवाहाच्या अगदीं विरुद्ध आहेत. त्यांचे मतें आमच्या राष्ट्राच्या निर्बलतेचें मुख्य कारण आमच्यांतील बालविवाह हें होय. असें जरी आहे तरी बालविवाहापासून देखील बरेचसे फायदे मिळूं शकतात असें त्यांचें मत आहे. व हें मत त्यांच्या कुटुंबाकडे पाहिल्यास सार्थ आहेसें वाटतें. येथें मोहनदासांच्या पत्नीसंबंधीं थोडेसें लिहिणें जरूर आहे असें वाटतें.

त्यांच्या पत्नीचें नांव कस्तुरबाई हें होय. कस्तुरबाईचा स्वभाव फारच मनमिळाऊ व प्रेमळ आहे. खऱ्या प्रतिव्रता धर्माप्रमाणें ह्या निरंतर पतिसेवेंत निमग्न असतात. पतिआज्ञेचें उल्लंघन चुकून देखील त्यांच्याकडून घडत नाहीं. सर्वदा आनंदी वृत्तींत रहाणें, आसपासच्या मंडळींत मिसळून रहाणें, आजारी मनुष्याची शुश्रूषा करणें हेंच त्या आपलें कर्तव्य समजतात. अशा तऱ्हेच्या सुस्वभावी पत्नीचे सहवासामुळें मोहनदासांच्या पुढच्या आयुष्यक्रमामध्यें सुलभता मिळाली असली पाहिजे. नाहीं तर पति-पत्नींच्या भिन्न विचारांमुळें एकाद्या व्यक्तीचें आयुष्य कसें कंटाळवाणें होतें ह्याचीं उदाहरणें पुष्कळ पहावयास मिळतात.

दुसरी नमुद करण्यासारखी गोष्ट म्हणजे मोहनदासांच्या पित्याचा मृत्यु ही होय. मोहनदासांच्या विवाहाच्या वेळीं त्यांच्या वडिलांना लवकर रजा मिळाली नाहीं, व म्हणून ते घाईघाईनें जात असतांना त्यांची गाडी उलथून पडली व त्यांना थोडीशी इजा झाली होती, त्या इजेपासून ते नेहमीं आजारी असत. ह्या आजारांत त्यांची सेवा मोहनदास फारच काळजीनें करीत असत. ह्याच आजारांत त्यांचा मृत्यु झाला. परीक्षा पास होण्याचे पूर्वीची नमूद करण्याची एकच गोष्ट राहिली आहे व ती म्हणजे मोहनदासांच्या धर्मकल्पनेमध्यें घडून आलेली क्रांति ही होय. लहानपणापासून धार्मिक मातापित्यांच्या उपदेशाप्रमाणें वागणाऱ्या मुलाच्या धार्मिक वृत्तीमध्यें एकाएकीं मोठाच फरक घडून आला. जे मोहनदास पूर्वी देवाची पूजा करून पोथीचा पाठ करीत असत, त्यांनाच हीं कृत्यें करण्यामध्यें कांहीं तथ्यांश नाहीं असें वाटूं लागलें व ते आपल्या मातेला ह्यासंबंधीं बरेच प्रश्न विचारूं लागले. ही क्रांति घडून येण्याचें कारण एक तर इंग्रजी शिक्षण व दुसरी त्यांना लागलेली संगत हीं होत. धार्मिक बाबतींमध्यें त्यांचीं मतें अगदीं पाखंडी बनलीं, व मांस खाल्ल्याशिवाय अंगामध्यें चांगला जोम येणार नाहीं असें त्यांचें ठाम मत झालें. मांस खाण्याकरितां तयार करण्याचें काम एका मुसलमान मित्रानें पत्करिलें. व संध्याकाळीं नदीच्या किनाऱ्यावर जाऊन खाना बनविण्याचें ठरलें; कारण हें काम घरच्या मंडळीना चोरून करावयाचें होतें. काम चोरून करावयाचें असल्यामुळें मोहनदासांला पुष्कळ वेळां खोटें बोलावें लागत असे, व त्यामुळें त्यांच्या जिवाला फार दुःख होत असे, कारण त्यांना लहानपणापासून खरें बोलण्याविषयीं फार सक्तीचें शिक्षण दिलें गेलें होतें. एके दिवशीं संध्याकाळीं ह्या मांसाहारी मंडळीचा अड्डा नदी किनाऱ्यावर गेला व तेथें त्यांनीं व त्यांच्या मित्रांनीं, बनविलेले मांसाचे पदार्थ खाल्ले! पहिल्यावेळां खाण्यास हे चांगले लागले नाहींत. पण कांहीं दिवसानंतर हे खाण्यांतच आनंद वाटूं लागला. मोहनदासांला व त्यांचे भावाला घरीं जेवणाचे वेळीं 'आम्हांला भूक नाहीं' असें खोटें बोलावें अशा रीतीनें खोटें बोलण्यापासून त्यांना जें दुःख झालें तें अवर्णनीयच! करीतन त्यांनीं नदीकिनाऱ्यावर खावयास जाण्याचें सोडून दिलें व त्या वाईट व सोडून दिली. ह्या प्रसंग सोडून माहेनदासांला पुढें आपल्या मातेशीं पंडीत अव्याचा प्रसंग आला नाहीं.

मोहनदासांची पहिली परीक्षा उतरल्यावर त्यांच्याच कुटुंबांतील एका मित्रानें मोहनदासांला बॅरिस्टर होण्याकरितां विलायतेस पाठविण्याची सल्ला दिली. प्रथम ह्या विचारास त्यांचे मातेचें अनुमोदन मिळण्यास फार कठीण गेलें, कारण त्या माउलीनें विलायतेला जाऊन कित्येक विद्यार्थी विघडल्याचें ऐकिलें होतें, व म्हणून अशा खराब ठिकाणीं आपल्या प्रिय पुत्राला पाठविण्याविषयीं तिचें मन धजेना, ह्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नव्हतें. पुढें मंडळींनीं पुष्कळ समजूत घातल्यानंतर त्यांच्या मातेनें एका अटीवर आपली संमति देण्याचें कबूल केलें. ती अट म्हणजे तिनें आपल्या पुत्राकडून तीन गोष्टी न करण्याबद्दल एका जैन साधूकडून शपथ घेवविली. त्या तीन गोष्टी येणेंप्रमाणें:—मद्य न पिणें, मांस न खाणें व परस्त्रीला मातेसमान मानणें. अशा तऱ्हेची शपथ घेतल्यावर मोहनदासांला विलायतेला जाण्यास त्यांच्या मातेनें आनंदानें निरोप दिला. त्यांच्या बंधूनींही पैशासंबंधीं काळजी न करण्याविषयीं बजाऊन सांगितलें. व अशा तऱ्हेनें मोहनदासांनीं आपल्या विलायतच्या प्रवासाला सुरवात केली.

लंडनला पोहोंचेपर्यंत नमुद करण्यासारखें कांहीं घडून आलें नाहीं. मोहनदास व त्यांच्या बरोबर असलेले दोघे हिंदी विद्यार्थी असे तिघे मिळून लंडन डॉक्समध्यें उतरले. हा दिवस मोहनदासांच्या स्मरणामधून कधींही गेला नाहीं, कारण एवढ्या अफाट शहरामध्यें आपल्या मित्रांना कशा तऱ्हेनें धुंडून काढावें हें त्यांना कळेना आणि म्हणून एखाद्या हॉटेलमध्यें उतरण्याचा त्यांनीं निश्चय केला. रस्त्यावरून जातांना लोक त्यांच्याकडे निरखून पाहूं लागले, कारण ह्यांचा पोषाख जरी इंग्रजी तऱ्हेचा होता, तरी तो हिंदुस्थानामध्यें बनविलेला असल्यामुळें जरा विचित्र दिसत होता; असो, हॉटेलमध्यें गेल्यावर देखील मोहनदासांला चैन पडेना. त्यांना एकलकोंडें वाटूं लागलें; इतक्यांत एका मित्राला उलट जबाबी तार केली असल्यामुळें ते येऊन पोहोंचले व अशा तऱ्हेनें त्यांचें औदासीन्य नाहीसें झालें. हे आलेले मित्र प्रौढ असून लंडन शहरामध्यें बरेच दिवस राहिलेले होते. त्यांना मोहनदासांचा साधेपणा पाहून फारच हसूं आलें व [illegible] इंग्लीशमन बनविण्याच्या तयारीला हे नवे मित्र लागले. प्रथम भता मि[illegible] मित्रांनीं मोहनदासांचें बिऱ्हाड रिचमंडमध्यें एक खोली घेऊन [illegible] व्यक्तीचें तेथें कशा तऱ्हेनें वागावें ह्याविषयीं मोहनदासांला धडे देण्याचें [illegible] मिळतात.

मित्र स्वतः खाण्यापिण्यांत अगदीं तरबेज झालेले होते व तसें करणें म्हणजे एक सभ्यतेचें लक्षण होय असा त्यांचा समज झालेला होता. त्या समजुतीप्रमा त्यांनीं मोहनदासांना दीक्षा देण्यास सुरवात केली. पण मातेची शपथ व ती पाळ ण्याचा दृढ निश्चय या दोन्हीं गोष्टींमुळें त्यांचें वर्तन हिंदुस्थानांत येईपर्यंत शुद्ध राहि इतकें जरी होतें तरी प्रथम मोहनदास थोडेसे आपल्या मित्राच्या जाळ्यां सांपडले, व त्यामुळें त्यांचे पैसे व वेळ कांहीं महिनेपर्यंत फुकट गेला अशा तऱ्हेनें नुकसान होण्याचें थांबण्यास एक कारण झालें. एके दिवशीं मोहनदासांना एक मोठ्या मेजवानीमध्यें जेवणाचें निमंत्रण आलें होतें. तेथें सर्व मंडळी जेवावयास बसली असतांना सूप ( रसा ) वाढण्यास आला. तेव्हां मोहनदासांनीं वाढप्या सूपमध्यें मांस आहे किंवा काय असा प्रश्न विचारला. हें विचारीत असतांना एक मित्राची नजर त्यांच्याकडे गेली. व त्यानें काय विचारलें म्हणून वाढप्याला प्रश्न केला. खरी हाकिगत कळतांच ती मंडळी थट्टेनें हंसली व मोहनदासांचें वर्तन एटीकेट्च्या ( शिष्टाचाराच्या ) विरुद्ध झालें असें त्यांनी ठरविलें. असें झाल्याव मोहनदास जेवणांतून उठून गेले, व तेव्हांपासून मोहनदासांनीं ह्या सर्व मित्रमंड ळीची संगत सोडिली. एक लहानशी खोली भाड्यानें घेऊन स्वतः हातानें स्वयं पाक करून राहूं लागले. आपला महिन्याचा खर्च त्यांनीं चार पौंडावर आणून ठेविला.

अशा तऱ्हेनें फ्याशनची व एटिकेटची रजा घेतल्यावर, मोहनदासांला बराच रिकामा वेळ मिळूं लागला व त्या वेळेचा उपयोग जास्त शिक्षण घेण्यामध्यें त्यांनी करून घेतला. अशा तऱ्हेनें दिवस जात असतां, धर्मविचारामध्यें झालेली जागृति फिरून जोराऊं लागली. घरीं असतानां स्वतंत्र विचार प्रगट करण्यास अडचण होती ती पण येथें नाहींशी झाली होती. परंतु आतां त्यांना असें वाटूं लागलें आपण हिंदु धर्माचा बरोबर अभ्यास केला नाहीं; तर मग त्याच्यामध्यें क अर्थ नाहीं असें ह्मणण्याचा आपल्याला काय अधिकार पोंचतो !

हे विचार चालले असतांना त्यांची व डॉक्टर gosiha aldpild ह्यांची धार्मि बाबतींत ओळख झाली व धार्मिकबाबतींत ह्यांच्याशीं व इतर मंडळींशीं वादविवाद करीत असतांना स्वतःच्या धर्माविषयीं असलेल्या अपूर्ण ज्ञानाविषयीं त्यांना वर वाईट वाटूं लागलें, कारण दुसऱ्या मंडळीला वाटे कीं हे आपल्या धर्मामध्यें पंडीत आहेत. कधीं कधीं डॉक्टर gosiah त्यांना म्हणत कीं आपण ख्रिश्च

ोत नाहीं ? ह्याच्यावर मोहनदास म्हणत कीं माझ्या स्वतःच्या धर्माचें शिक्षण पुरें ल्याशिवाय इतर धर्मासंबंधीं मी विचार करूं इच्छीत नाहीं.

मोहनदासांचें हें म्हणणें डॉक्टरला देखील खरें वाटलें, तरी पण त्यांनीं मोहनदासांला hrist ( येशु ख्रिस्त ) च्या विषयीं बरीच माहिती देण्यास सुरवात केली.

लंडनमध्यें असतांना त्यांनी थिऑसफीचा देखील अभ्यास केला होता पण त्याच्यामध्यें देखील त्यांची मनीषा तृप्त होण्यासारखें कांहीं आढळून आलें नाहीं, रंतु हा अभ्यास करीत असतांनां त्यांची दोघां थिऑसफिस्ट इसमांशीं मैत्री जमली. त्यांनीं आम्हीं तुमच्याबरोबर गीता वाचतों म्हणून मोहनदासांना नंति केली. त्यांनीं ही विनंति मान्य केली, व अशा तऱ्हेनें गीतावाचन सुरू ाले. गीता वाचीत असतांना त्याचा अर्थ पूर्णपणें समजावून सांगण्यास मोहन-दासांना फार कठीण पडूं लागलें तेव्हां त्यांनीं स्वतः गीतेचा अभ्यास फार जारीनें करण्यास सुरवात केली, व जसजसा अभ्यास जास्त होत गेला तसतशी त्यांची तृष्णा शांत होऊन मनाला एकप्रकारचें दैविक सुख मिळूं लागलें अशा नें मोहनदासांचीं तीन वर्षें पुरीं झालीं व ते बॅरिस्टरीची परीक्षा पास झाले; व च हिंदुस्थानांत यावयास निघाले.

एक इंग्रज गृहस्थानें तुम्हांला विलायत कशी काय आवडली असें मोहनदासांला चारलें असतां ' हिंदुस्तान सोडून दुसऱ्या एखाद्या देशाशीं तुलना करितां मला लायत जास्त आवडते ' असें त्यांनीं उत्तर दिलें. हिंदुस्तानांत येऊन पोहोंचतां-णींच मोहनदासांना एक अति दुःखाची बातमी ऐकण्याचा प्रसंग आला. ती बातमी हणजे आपल्या प्रिय मातेचा मृत्यु ही होय. ही दुःखाची बातमी त्यांच्या ावानें विलायतेंत त्यांना मुद्दाम कळविली नव्हती, कारण परदेशांत मोहनदास कटे असतांनां ही दुःखद बातमी ऐकून त्यांना फार शोक होईल व त्यांच्या नाला एकदम धक्का बसेल.

असो, दुःखदायक बातमी कितीही अप्रिय असली तरी प्रत्येक मनुष्याला ती कावी लागतेच. व मोहनदासांलाही ती ऐकावी लागली. अर्थातच ह्या दुःखद वार्ते-नें त्यांच्या कोमल मनाला फार दुःख झालें, व बराच उत्साहभंग झाला. मातृ-चें दुःख फारच कठीण होय. असो, मोहनदासांच्या बंधूंनीं त्यांना नाशिकाला तेस गेल्याबद्दल प्रायश्चित्त देवविलें. पुढें राजकोटला व पोरबंद-

रला एकदां जाऊन आल्यावर मोहनदासांनीं मुंबईला सनद घेऊन बॅरिस्टरचा धंदा सुरू केला.

सुमारें एक वर्ष धंदा चालविल्यावर कर्मधर्मसंयोगानें त्यांना एका मुकदम्या आफ्रिकेंत जाण्याचा प्रसंग आला. हा मुकद्दमा सुमारें एक वर्षपर्यंत चालणार होता डर्बानला पोंहोचल्याबरोबरच आफ्रिकेंतल्या स्थितीसंबंधीं थोडी कल्पना त्यांना आली विलायतेंतल्या स्वतंत्र वातावरणामध्यें शिक्षण संपादन केलेल्या मोहनदासांना आफ्रिकेमध्यें एखाद्या रानटी व भिकारी मनुष्याप्रमाणें वागविण्यांत आलें. ह्या राजनीतिला काय म्हणावें समजत नाहीं.

प्रथम मोहनदासांनीं तेथील वरिष्ठ कोर्टांत एडव्होकेट होण्याकरितां अर्ज केला पण हे जातीनें नेटिव्ह असल्यामुळें त्यांना त्या ठिकाणीं धंदा करण्यास मनाई आहे अशा सबबीवर तो फेंटाळला गेला. सुदैवानें हा अनादर तेथील कायदेपंडितांच्या सभेकडून झाला होता व तेथील वरिष्ठ कोर्टानें ह्याच्या अगदीं विरुद्ध निकाल देऊन मोहनदासांला वरिष्ठ कोर्टांत प्रॅक्टीस करण्याची परवानगी मिळाली. सनद काढण्यासच फक्त त्रास झाला असें नव्हे तर एके वेळीं ते कामाकरितां प्रिटोरीयाला रात्रीच्या गाडीनें निघाले; त्यांच्याजवळ पहिल्या क्लासाचें तिकीट होतें तरी ...
करण्यांत आली. मोहनदासांनीं ह्या हुकम...
ह्यांना जबरीनें डब्याचे बाहेर काढलें व त्य...
डब्याचे बाहेर फेंकण्यांत आलें ! लगेच ग...
दासांना रात्रभर थंडींत कुडकुडत वेटींग रू...

दुसरे दिवशीं जेव्हां ते ट्रान्सवालला येत...
मान सहन करावा लागला. मोहनदास घे...
शेजारीं बसले होते व गाडी चालूं लाग...
डच् साहेब बहादुरास त्या जागेवर ब...
दासांला त्या जागेवरून उठून खालीं ...
सौम्यतेनें मी जाग्यावरून उठण...
खपून त्यांनीं लगेच मोहनदास...
मोहनदासांनीं आपली जागा सोड...

सा आला व ह्यामुळें बिचारे मोहनदास कोलमडून खालीं पडले. इतकें झाल्या-
र गाडींतले दुसरे उतारू ह्या भांडणांत पडले.

थोडक्याच वेळांत भांडणारे साहेब बहादुर उतरून गेले व मोहनदासांचा
ुढला प्रवास भांडणतंटे न होतां पूर्ण झाला. जोहान्सबर्गला ते गेले असतां एका
ॉटेलमध्यें उतारावयास गेले. तेथें देखील ते काळे असल्यामुळें त्यांना उतरावयास
जागा मिळाली नाहीं अफ्रिकेंत पाय ठेविल्याबरोबर चहूं बाजूंनीं अशा तऱ्हेचा
अनुभव आल्यामुळें, मोहनदासांला देखील आपण येथें उगीच आलों असें वाटा-
याम लागलें,- ही गोष्ट विचार करण्यासारखी होय. त्यांच्या ठिकाणीं दुसरा
नुष्य जर असता तर तो खात्रीनें सर्व पैशाची व इतर गोष्टींची पर्वा न करतां
कदम हिन्दुस्तानांत निघून आला असता; परंतु मोहनदास आफ्रिकेंतील शिक्ष-
ाचा पहिला धडा शिकले.

खरोखरच ह्या विभूतींमध्यें असाधारण आत्मविश्वास असला पाहिजे. नाहीं तर
च्या स्थितींतल्या मनुष्याला एवढी मानहानि सहन करणें अशक्य होतें. दिवसें-
दिवस अशा तऱ्हेचे अपमान सहन करणें त्यांच्या अंगवळणीं पडलें; म्हणजे त्यांना
दुःख होत नव्हतें असें नाहीं. परन्तु त्यांनीं आपलें मन इतकें शांत व
गोष्टींचा त्यांच्यावर फारच थोडा परिणाम होई त्
होतों अगर आपण मोठे बॅरिस्टर आहोंत
देशाकरितां, व आपल्या बांधवांकरितां
यारी झाली.

ांनीं बायबलचा बराच अभ्यास केला.
जेव्हां मोहनदास डरबानला आले
देण्यांत आली. तेथें सरकार हिंदी
बिल आणणार आहे असें त्यांना
नजरेस ही गोष्ट आणून दिली व त्यासं-
असें सांगितलें. हें ऐकून तेथील मंडळी
ाय करावें हें त्यांना कळेना. तेव्हां मोहन-
क अर्ज तयार करण्यास सल्ला दिली. हा

उपाय मंडळीला पसंत पडला व त्यांनीं ह्या कामास लगेच सुरवात केली. अशा तऱ्हेनीं आफ्रिकेंतील काळ्यागोऱ्या लोकांच्या मधील सत्याग्रहाच्या लढयाला सुरवात झाली.

हिंदी लोकांमध्यें एकदम झालेली जागृति पाहून इंग्रज सरकारला देखील मोठें आश्चर्य वाटलें. त्या हिंदीलोकांच्या प्रयत्नाला जरी यश आलें नाहीं तरी वसाहतींतील युरोपियन लोकांची खात्री झाली कीं हिंदी लोक अगदींच कुचकामाचे आहेत असें नव्हे, तर त्यांच्यामध्यें देखील नवजीवन उत्पन्न झालें आहे, व अशा तऱ्हेचे उद्‌गार तेथील वर्तमानपत्रांत येऊं लागलेले पाहून आमच्या चरित्रनायकाला फार आनंद झाला; काळ्या कुट्ट अंधारामध्यें प्रकाशाचे थोडेसेही किरण आलेले पाहून कोणाला आनंद होणार नाहीं ?

त्यावेळीं आफ्रिकेमध्यें असणाऱ्या मजूरवर्गाच्या स्थितीचें थोडेंसें वर्णन करणें जरूर आहे असें मला वाटतें. हिंदुस्थानांतून मुदतबंदीनें पाठविलेल्या मजूर लोकांचो स्थिति तेथें गुलामांप्रमाणेंच होत असे. वसाहतीनीं कितीही जुलमी कायदे केले तरी मुळींच कुरकुर न करितां मुकाट्यानें सर्व कांहीं सहन करून घेणें व सर्व आयुष्य गुलामगिरींतच काढणें यासाठींच आपला जन्म आहे, असें तेथील लोकांस वाटत असलेलें पाहून तर मोहनदासांनां त्यांची फारच कींव आली. ह्या लोकांच्या अंगामध्ये किती कर्तृत्व आहे ह्याची त्यांना पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यांची ती स्थिति पाहून मनाला फार वाईट वाटलें, व ती स्थिति शक्य तेवढी सुधारण्याचा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. अशा तऱ्हेनें आफ्रिकेंतील हिंदी लोकांना जिवाचा आधार, व अब्रूचें रक्षण करणारा योग्य नेता भेटला; नुसता भेटलाच नव्हे तर त्यानें तेथें कायम रहाण्याचा निश्चय केला. हें पाहून तेथील लोकांमध्यें एक प्रकारचें चैतन्य उत्पन्न झालें. १८९४ मध्यें नाताळांतील मंडळीच्या विनंतीवरून ते तेथें गेले, व तेथील कांहीं पुढाऱ्यांच्या सल्ल्यानें नाताळ [illegible]रल्या नें कॉंग्रेस ही संस्था स्थापन केली व स्वतः तिचे सेक्रेटरी झाले. त्या संस्थेतर्फे आणि तरी अर्ज्या त्यांनीं ( ज्या अर्जामध्यें तेथील परीस्थितीचें चांगल्या तऱ्हेनें स[illegible]न केलें आहे) सरकारास केल्या. परंतु म्हणण्यासारखा कांहींच फायदा झाला नाहीं. [illegible]ल सरकारकडून एशियाटिक लोकांना आपल्या देशांत न येऊं देण्याकरितां केलेला

कायदा उलथून पाडण्याकरितां जो मोठ्या प्रमाणावर यशस्वी प्रयत्न केला गेला होता त्यांत त्यांनीं पुढारीपणा अंगिकारिला होता.

तसेंच हिंदी लोकांना मत देण्याचा अधिकार न मिळण्याविषयीं जो कायदा झाला तो रद्द व्हावा म्हणूनहि त्यांनीं पुष्कळच प्रयत्न केला. पण त्याचा परिणाम केवळ हा कायदा फक्त हिंदी लोकांपुरताच लागू करूं नये येवढाच झाला. पुढें १८९५ सालचे अखेरीस हिंदी लोकांपुढें ट्रान्सवालमधील स्थिति खुलासेवार मांडण्याकरितां मोहनदास हिंदुस्थानांत आले. नटाल सोडण्याचे पूर्वी त्यांनीं एक जाहीर पत्र प्रसिद्ध केलें. त्यामध्यें त्यांनीं हिंदी समाजाच्या हालअपेष्टांचें फार निर्भीडपणें व जोरदार भाषेंत वर्णन केलें होतें. त्याच पत्राचें विवेचन हिंदुस्थानांत आल्यानंतर विस्तृत रीतीनें करून आपल्या भाषणांचा हाच मुख्य विषय त्यांनीं केला होता. ते हिंदुस्थानांत येतांच त्यांचे स्वागताची व त्यांच्या कार्याबद्दलच्या सहानुभूतीची एक मोठी लाट उसळली होती. मुंबई, पुणें, मद्रास अशा मोठमोठ्या गांवीं त्यांचीं भाषणें झालीं व त्या भाषणांचा परिणाम लोकांवर फारच चांगला झाला. तीं भाषणें छापूनहीं त्यांचा बराच प्रसार करण्यांत आला. आपल्या भाईबंदांच्या हालअपेष्टांचें वर्णन ऐकून व वाचून लोक हळहळूं लागले व आपण त्यांच्याकरितां कांहींना कांहीं केलें पाहिजे ही भावना लोकांत उत्पन्न झाली. ह्या सर्व गोष्टींची हकिगत रूटरनीं आपल्या पदराचें तिखटमीठ लावून विलायतेंत पाठविली. त्याच्या तारेचा मसुदा येणेंप्रमाणें:— "हिंदुस्थानमध्यें एक जाहिरपत्रक खालीं लिहिलेल्या अर्थाचें प्रसिद्ध झालें आहे. नटालमध्यें हिंदी लोकांना लुटून घेत आहेत व त्यांना एकाद्या रानटी पशूप्रमाणें मारीत आहेत; अशा स्थितींत त्यांचा कोणीही वाली नाहीं."

टाइम्स ऑफ इंडियानें या पत्राची चौकशी व्हावी म्हणून प्रतिपादन केलें होतें. ह्या सर्व गोष्टी नटालमध्यें कळतांच तेथें केवढा अनर्थ! जागोजागीं गोऱ्या लोकांच्या मोठमोठाल्या सभा भरल्या व बिचाऱ्या गांधींवर शिव्याश[illegible] व हिल्या गेल्या. हा सर्व प्रकार पाहून गांधींच्या मित्रमंडळींनीं त्यांना ल[illegible] येण्याविषयीं तार केली. कारण पार्लमेंट त्याच सुमाराला भरणार होतें. [illegible] मिळतांच मोहनदास मुंबईला निघून आले व एस् एस् कुरलंड नांवाच्या [illegible] सहकुटुंब आफ्रिकेमध्यें जाण्यास निघाले. त्यांची स्टीमर व त्यांच्या अगोदर [illegible]

दिवस निघालेली स्टीमर एकदमच दरबानला पोहोंचल्या. दुसऱ्या स्टीमरवर सहाशें हिंदी लोक होते. ह्या दोन्ही स्टीमर्सनां क्वारन्टाईनमध्यें अडकविण्यांत आलें. हें सर्व होत असतांनां दरबानमध्यें एक मोठी चळवळ सुरू झाली होती. ती चळवळ म्हणजे हिंदी लोकांना तेथें उतरूं न देण्याविषयीं होय. त्यांना आले तसे माघारे घालवून देण्याविषयीं वसाहतवाले आटोकाट प्रयत्न करीत होते. कांहीं कांहीं व्यक्तींचे विचार तर इतक्या थराला जाऊन पोहोंचले होते कीं उघड उघड त्या स्टीमर्सनां पाण्यांत बुडवून द्यावें असें ते म्हणूं लागले ! अशा समयीं मोहनदासांना किनाऱ्यावर न येऊं देण्याविषयीं सांगण्यांत आलें. व जर त्यांच्या मित्रांनीं त्यांना किनाऱ्यावर आणलें तर त्यांची जोखीम त्यांच्यावर राहील असें बजाऊन सांगण्यांत आलें. पण ह्या धमकीचा आमच्या हिंदी मंडळीवर कांहींच परिणाम झाला नाहीं. ज्या दिवशीं नवीन येणारे हिंदी लोक तेथें येऊन पोहोंचणार असें कळलें होतें त्यादिवशीं किनाऱ्यावर गोऱ्या लोकांची गर्दी अतोनात उसळली होती. व ह्या गर्दीच्या निंदास्पद व तिरस्करणीय आरोळ्या सारख्या सुरू होत्या.

सरते शेवटीं अटरनी जनरलनीं ह्या रागिष्ट जनसमूहाला बजावून सांगितलें कीं " जर तुह्मी आतां गर्दी मोडाल तर तुमच्या म्हणण्याचा विचार पार्लमेंटमध्यें फार लवकर केला जाईल " असें सांगतांक्षणींच गर्दी मोडली. गर्दी नाहींशी झाल्यावर हिंदी उतारू किनाऱ्यावर आले. ते उतारू उतरून गेल्यावर मोहनदास किनाऱ्यावर आले. लगेच गोऱ्या लोकांनीं त्यांना ओळखिलें व एकच ओरड सुरू झाली. त्यांच्या मित्रांनीं एक रिक्षा (मनुष्यांनीं ओढली जाणारी गाडी) ठरविण्याचा प्रयत्न केला पण लोकांच्या अतोनात गर्दीमुळें रिक्षा येऊं शकली नाहीं, नंतर मोहनदास एका युरोपियन मित्राबरोबर पायींच चालूं लागले. एका रस्त्यांत शिरतांच गर्दी अतोनात झाल्यामुळें त्यांची व त्यांच्या मित्राची चुकामुक झाली. असें झाल्याबरोबर मोहनदासांवर चहूंकडून बुक्क्यांचा मार सुरू झाला. तो पोलीस येईपर्यंत सुरू होता. पोलीस सुपरिंटेंडंटनें येऊन त्यांना सोडविलें व एका [illegible]रख्या घरीं पोहोंचतें केलें. तेथें देखील लोकांनीं त्यांचा पाठलाग केला व त्या आघ्रिया घराभोंवती गराडा दिला. हें पाहून सुपरिंटेंडंटसाहेबांनीं मोह-[illegible]सांनां शिपायाचा वेष घेऊन त्या घरांतून आपली सुटका करून घेण्यास सांगि-[illegible], व तसें न केल्यास हे लोक वेडाच्या भरांत ह्या घराला आगसुद्धां लावण्याला

कमी करणार नाहींत असें बजाविलें. तेव्हां आपल्याकरितां आपल्या मित्राला अशा संकटांत पाडणें चांगलें नाहीं असें मनाला वाटून मोहनदासांनीं पोलीसचा वेष धारण केला. व अशा तऱ्हेनें मित्राच्या घराची व मालमत्तेची होऊं घातलेली नासधूस टाळली व स्वतः रात्रभर पोलीस ठाण्याचा आश्रय केला.

[लोकांच्या अंगामध्यें आलेलें हें वारें थोडे दिवसांनीं ओसरलें. वाचकवर्गहो, मोहनदासांचें वसाहतवाल्यांकडून अशा तऱ्हेचें स्वागत झालें, याचें कारण मोहनदासांची हिंदुस्थानांतील कामगिरी होय. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हाल अपेष्टांचें वर्णन करून हिंदी लोकांमध्यें चैतन्य उत्पन्न करण्याबद्दलचें त्यांना मिळालेलें हें बक्षीस होय.]

अशा तऱ्हेनें लोकनायक होणाराला पदोपदीं हालअपेष्टा सहन कराव्या लागतात; तेव्हांच देवप्रश्न येतें. बरें झालें, ह्या प्रसंगीं मोहनदासांनीं आपल्या कुटुंबाला पूर्वींच एका मित्राचे घरीं सुरक्षित पोंचविण्याची तजवीज केली होती. नाहींतर त्यांच्या हालअपेष्टांना सीमाच राहिली नसती. [ह्या प्रसंगापासून मोहनदासांच्या चारित्राला एक नवेंच वळण लागलें.] ह्या प्रकरणामध्यें एक गोष्ट नमुद करावयाची राहिली. ती ही कीं ज्या वेळेस मोहनदासांला सर्व लोकांनीं घेरलें तेव्हां पोलिससुपरिंटेंडंटसाहेबांची बायको रस्त्यांतून जात होती तिनें हा प्रकार पाहिल्याबरोबर ती एकदम धांऊन आली व अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तिनें मोहनदासांचें संरक्षण केलें असो.

[१८९९ मध्यें इंग्रज व बोअर लोकांमध्यें युद्ध सुरू झालें. ह्या वेळीं खऱ्या राष्ट्रीय भक्ताचें काम मोहनदासांनीं केलें. तें काम म्हणजे आपल्या भाईबंदांना (हिंदी लोकांना) सरकारला पाहिजे त्या तऱ्हेची मदत करण्यास सांगणें हें होय. ह्या त्यांच्या उपदेशाप्रमाणें शेंकडों लोक काम करण्यास तयार झाले व तसें वरिष्ठ अधिकाऱ्यांस कळविण्यांत आलें. परंतु अधिकारी वर्गानें नकारार्थी उत्तर देऊन त्यांचा उत्साहभंग केला.]

लोकांच्या

कांहीं दिवसांनीं आम्हीं व्हॉलंटीयर्स होतों म्हणून फिरून विनवणी [illegible] आली. पण तिला देखील पूर्वींप्रमाणेंच उत्तर मिळालें.

अखेर जेव्हां इंग्रजांनां हार खावी लागली तेव्हां सरकारास असें दिसून [illegible] कीं ज्याला लढाईवर जातां येईल त्यानें त्या वेळीं जरूर गेलें पाहिजे. [illegible]चांत मात्र सरकारला मोहनदास आठवले, त्यांची मागणी स्वीकारण्यांत आली


व त्यांना जखमी झालेल्या शिपायांना उचलून नेण्याची कामगिरी सांगण्यांत आली. ह्या मंडळीच्या कामगिरीबद्दल आफ्रिकेंतील लोकांनीं देखील प्रशंसापर उद्गार काढले होते. एक प्रसंगीं ह्या फलटणीला गोळी बाराच्या माऱ्यांतून जखमी लोकांना नेण्याची कामगिरी करावी लागली होती आणि ती देखील आमच्या हिंदी वहादरांनीं मोठ्या धैर्यानें केली. ह्या वेळीं ह्या लोकांना सुमारें वीस जखमी लोकांना उचलून न्यावें लागलें होतें. एकदां लढाई अगदीं जोरांत आली असतां मेजर बापटननीं गांधींना आपल्या सहगड्यांसुद्धां जेथें गोळीबार सारखा सुरू आहे अशा ठिकाणीं जाऊन जखमी लोकांना उचलून नेण्यास सांगितलें. हें काम देखील ह्या मंडळीनीं मोठ्या उत्साहानें केलें. दुर्दैवानें ह्या वेळीं ह्या मंडळीपैकीं बरेच हिंदी लोक धारातीर्थीं पडले. असो.

थोडे दिवसांनीं लढाई संपली व ट्रान्सवाल युरोपीयन लोकांचे ताब्यांत आलें. आफ्रिकेमध्यें तेथें धारातीर्थीं देह ठेविलेल्या आमच्या वीरांचें एक सुंदर स्मारक केलें आहे. नवलाची गोष्ट ही कीं ह्या सुंदर स्मारकापुढें देखील हिंदी लोकांचा छळ कमी होत नाहीं; ह्याला कोणती राजनीति म्हणावें कळत नाहीं, असो. लढाई संपल्यावर मोहनदासांला वाटलें कीं आतां आम्हांला सुखांत रहातां येईल. कारण लढाई होण्याच्या कारणांपैकीं ब्रिटिश इंडीयनानां चांगल्या तऱ्हेनें वागवीत नाहींत हें एक कारण सांगण्यांत येत होतें. म्हणून होणाऱ्या नवीन राज्यव्यवस्थेंत ह्या गोष्टीचा समुळ नाश होईल असा समज असणें गैरवाजवी होणार नाहीं. ह्या मनाचा समज असल्यामुळें मोहनदास लवकरच हिंदुस्थानांत परत आले.

हिंदुस्थानांत येऊन थोडे दिवस झाले नाहींत तोंच आपला समज अगदीं चुकीचा होता हें त्यांना कळून आलें. बिचारे बोअर लोक हिंदी लोकांना केवळ चावकांनींच मारीत होते. पण नवीन ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनीं त्यांना विंचवाच्या इंगळ्याच लाविल्या! एशिआटिक लोकांची व्यवस्था करण्याकरितां नवेंच एक खातें निर्माण करण्यांत आलें. एशियाटिक लोकांना वसाहतींतून दूर ठेवण्याचा जारीनें प्रयत्न करण्यांत आला. अशा सर्व गोष्टी आफ्रिकेंत चालल्या असतानां मोहनदास सारख्या देशभक्ताला हिंदुस्तानांत राहून कसें बरें चालेल? अर्थात् परत लवकरच आफ्रिकेंत गेले, व तेथील अधिकाऱ्यांना जाऊन भेटले. पण त्यांना उलट जबाब सा मिळाला कीं तुम्हांला ह्या गोष्टींत पडण्याची जरूर नाहीं. आह्मीं सर्व हून घेऊं!

ह्या वेळेस जोसेफ चेंबरलेन आफ्रिकेमध्यें होते. व म्हणून मोहनदासजी मंडळी मिळून एक डेप्युटेशन त्यांच्याकडे पाठविण्यांत आलें. ही गोष्ट नटा घडून आली, तीच गोष्ट प्रिटोरियामध्यें. जर मोहनदास डेप्युटेशनचा पुढाकार घे... तर त्या डेप्युटेशनची मुलाखत आम्हां घेणार नाहीं, असा जबाब देण्यांत आला. दिवसेंदिवस सरकारला गांधींच्या नांवाची देखील चीड येऊं लागली. परंतु इकडे गांधींनीं तर या गोष्टीचा शेवट लावण्याचा दृढ निश्चय केला. व कायद्यानें भांडून ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां प्रिटोरियाच्या हायकोर्टामध्यें काम करण्याची सनद घेतली. हें सर्व होत असतांना आफ्रिकेंतील हिन्दी लोकांना त्यांच्या हक्कासंबंधीं व इतर गोष्टींसंबंधीं ज्ञान होण्याकरितां एकादी संस्था असावी असें वाटूं लागलें. ह्या विचाराला अनुसरून इंडियन ओपीनियन नावांचे एक वर्तमानपत्र मोहनदासांनीं काढलें. तें चार भाषांत छापलें जात असे. इंग्रजी, गुजराथी, तामील व हिन्दी. प्रथम वर्तमानपत्र मुळींच चालेना, व म्हणून मोहनदासांना एका वर्षांत दोन हजार पौंड नुकसान भरावें लागलें ! पुढें पुढें इतकें नुकसान येईनासें झालें. तरी पण वर्तमानपत्राची सांपत्तिक स्थिति किफायतशीर होऊं शकली नाहीं. मात्र, त्याचा उपयोग दिवसेंदिवस येणाऱ्या आपत्तींमध्यें फारच झाला. १९०४ सालीं जोहनस्-बर्ग मध्यें प्लेगची जोराची सांथ उद्भवली. त्या आपत्तीमध्यें म्युनिसिपालिटीनें घ्यावी तितकी मेहनत घेतली नाहीं; परंतु मोहनदास त्या ठिकाणीं लगेच आले व जर ह्या रोगाची लवकर काळजी घेतली न हीं तर एकदम सांथ भडकण्याची भीती आहे असें त्यांनीं अधिकाऱ्यांना, कळविलें. परंतु सरकारचा कांहींच जबाब आला नाहीं.

एके दिवशीं प्लेग इतका जोरावला कीं त्यानें एकवीस बळी एका दिवसांत घेतले. ही स्थिति जेव्हां मोहनदासांच्या नजरेस आली तेव्हां त्यांनीं आपल्या चार पांच मित्रांना घेऊन एक सामान ठेवण्याची मोठी वखार रिकामी केली, व ह्या मोकळ्या जागेंत प्लेगच्या रोग्यांना आणून ठेवून तेथें त्यांच्या शुश्रूषेला आरंभ केला. दुसरे दिवसापासून म्युनिसिपल अधिकाऱ्यांनीं आरंभ केला, इतके प्रयत्न होत असतां देखील एक महिन्यामध्यें शंभरांवर मनुष्यें मरण पावलीं. हा आंकडा आपल्या डील लोकांनां फार क्षुल्लक वाटेल. पण सुरवातीला जर ह्या रोगाचें मूळ खणू काढण्यांत मोहनदासांनीं जिवापाड मेहनत केली नसती तर हा रोग खाणींमधू



रशियन महर्षि टॉलस्टॉय्.



खिस्त शिष्य कनवाळू मि० डोक हिंदी लोकांचे विश्वास पात्र सल्लागार व गांधींचे आद्य चरित्रकार.



“ हो मृत्यु आर्जीच, घडो युगान्तीं ।
सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥ ”
— [illegible] व्या वर्षीं कारागृहांतच मृत्युमुखीं
पडलेले **हरबतसिंह.**



मळ्याच्या व्यवस्थापकानें बेदम मारल्यामुळें
मजूर मरण पावलेला.

ाडा चालला होता तो मुख्यत्वें करून काळ्या गोऱ्यांच्या भेदासंबंधीं होता ा कायदा दक्षिण आफ्रिकेंतील इतर वसाहतींत देखील हळु हळु अमलांत आणू हिंदी वसाहतवाल्यांचा अगदीं वींमोड करून टाकण्याचा सरकारचा झोंक दिसून आल्यामुळें तेथील हिंदी वसाहतवाले अगदीं खवळून गेले. हें चालू असतांना माहात्मा गांधी व त्यांचे साहाय्यक कांहीं रिकामे बसले नव्हते. ते ह्या कायदा करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे गेले. व त्यांनां त्यांनीं पुष्कळ समजावून सांगितलें पण त्याचा कांहींच फायदा झाला नाहीं. फक्त हा कायदा स्त्रियांना तेवढा लागु करण्यांत येणार नाहीं असें सांगण्यांत आलें. कारण त्यांचीं खात्री होती कीं हिंदी स्त्रिया पुरुषांशिवाय परदेशांत वसाहत करण्यास जातील ही गोष्ट अगदीं असंभवनीय होय, असो. लेजिस्लेटिव्ह काउन्सिल मध्यें वादविवादाचा फार्स होऊन हा नवीन कायदा लागू करण्याला सरकारनें मागें पाहिलें नाहीं. ज्यावेळीं काउन्सिलमध्यें हा वादविवाद चालला होता त्याच वेळीं त्याच शहरामध्यें सर्व जातींच्या हजारों हिन्दी लोकांची जंगी सभा भरविण्यांत आली होती. ह्या जमलेल्या जनसमूहामध्यें अपूर्व उत्साह दिसून येत होता. हा कायदा हाणून पाडण्याबद्दल त्या सभेंत कळकळीचीं व जोराचीं भाषणें झालीं व सरते शेवटीं सर्व मंडळीनीं उठून उभें राहून एका सुरांत, एक विचारानें, परमेश्वराला साक्षी ठेवून, सत्याग्रहाची शपथ घेतली. हा सर्व कशाचा प्रभाव वरें ? केवळ एका व्यक्तीच्या आटोकाट प्रयत्नामुळेंच सर्वत्र जागृति उत्पन्न झाली. वर्षानुवर्षे गु.ामगिरीमध्यें खितपत रहाणाऱ्या शेंकडों हिंदी लोकांना नवजीवन मिळालें. ए. सर्वगुणसंपन्न मार्गदर्शक भेटला व त्यानें सत्याग्रहाचा अजब मार्ग ह्या हजारों लोकांना दाखवून दिला, व तो केवळ मोठमोठालीं भाषणें देऊन नव्हे, तर जेव्हां जेव्हां वेळ आली तेव्हां तेव्हां आपत्तीला तोंड देण्यास स्वतः एका पायावर तयार होऊन व आपल्या दृढनिश्चयानें वाटेल त्या बिकट प्रसंगांतून पार होऊन दाखवून. हा पुढारी म्हणजे हात्मा गांधीच होत.) ह्या हिन्दी मंडळीचा रोष नवीन बिलासंबंधीं नव्हता, ा पास झालेल्या कायद्या संबंधीं होता. ह्या पुढें आपल्या नशिबाचे जबाबदार ट्रूस अगर बोथा हे नसून आपणच आहोंत असा त्यांनीं निश्चय केला. हा ग मोठा आणीबाणीचा होता. पण आमचे चरित्रनायक मुळींच डगमगले नाहींत, व अढळ निश्चयानें ह्या गोष्टीचा कांहीं निकाल लावण्याच्या मार्गाला लागले.

येथील मंडळींनीं महात्मा गांधी व मिस्टर अली या दोघांना विलायतेला पाठ- त्यांच्याकडून ह्या नवीन कायद्याला राजेसाहेबांची संमत्ती न मिळावी म्हणून खट-पट करण्यास त्यांना सांगितलें. राजेसाहेबांनीं आपली संम्मत्ती Constitutional Government (सनदशीर राज्यव्यवस्था) स्थापन होईपर्यंत न देण्याचें अभिवचन दिलें. त्या मंडळीच्या प्रयत्नानें लंडनमध्यें एक कमिटी स्थापन झाली. ह्या कमिटीचें काम साउथ आफ्रिकेमधील हिंदी लोकांच्या हिताहिताकडे लक्ष ठेवण्याचें होतें. ह्या कमीटींतील मंडळीचीं नांवें, लॉर्ड ऑफडील प्रेसिडेंट, सर मंचरजी भावनगरी–कार्यकारी अध्यक्ष, आणि मिस्टर रिच हे सेक्रेटरी. अशा तऱ्हेच्या व्यवस्थेपासून तात्पुरता फायदा झाला. [कारण थोडेच दिवसांत आफ्रिकेमध्यें नवीन रीतसर राज्यव्यवस्था सुरू झाली. त्यांनीं राजेसाहेबांची ह्या नवीन कायद्याला संमत्ती मिळविली व हा कायदा मोठ्या झपाट्यानें पास करण्यांत आला. व हिंदी लोकांना सत्याग्रह त्वकरच सुरू करण्याची पाळी आली. व आतां नांव नमूद ( रजिस्टर ) करावें किंवा नाहीं या प्रश्नाची चर्चा सुरू झाली. नमूद केल्यास मानहानि होऊन स्वाभिमान नष्ट होतो, न केल्यास स्वतःवर आपत्तीचा केवळ समुद्रच ओढवून घ्यावा लागतो. अशा बिकट परिस्थितींत हिंदी लोक अस-तांना महात्मा गांधींचा त्यांना मिळालेला उपदेश म्हणजे केवळ ईश्वरी देणगीच होय. त्यांनीं ह्या लोकांना समजावून सांगितलें कीं 'ह्या वेळीं जर मागें घ्याल तर आपल्या देशाला कलंक लाविल्याचें पातक आपल्या माथीं येऊन आपली संतती आपल्याला या नामर्दपणाच्या कृत्याबद्दल सदोदित दोष देत राहील. ह्मणून ह्या पुढें तरी आम-च्यावर वाटेल तसे जुलमी, मानहानिकारक कायदे लादल्यास आह्मीं त्यांचें प्रतिपालन करूंच असें सांगू शकत नाहीं व जेव्हां जेव्हां आह्मी हे कायदे उल्लंघन करूं तेव्हां तेव्हां आह्माला मिळालेली शिक्षा आह्मीं मोठ्या आनंदानें सहन करूं. कारण ही शिक्षा आह्मी स्वतःकरितां भोगणार नसून आमच्या हिंददेवीची अब्रू रक्षण करण्याक-रितां व तिच्या हजारों दुःखित बालकांची मानहानि टाळण्याकरितां भोगणार आहोंत. आह्मीं ह्यावेळीं आपलें आत्मबल सत्याग्रहाच्या द्वारें दाखविण्यास म पायावर तयार आहोंत असें आपल्या कृतीनें वसाहतसरकारास कळवि आज कचरूं नका !]

लोकांनीही महात्मा गांधींच्या ह्या अमोल उपदेशाप्रमाणें वर्तन

वचन दिलें. झालें, ऑफिसरलोक जागोजागीं जाऊन लोकांना रजिस्टर करण्याकरितां प्रयत्न करूं लागले. पण त्याचा फारसा उपयोग झालेला दिसून आला नाहीं. कारण शेंकडा पांच लोकांनीं फक्त रजिस्टर करून घेतलें. बाकीचे आपल्या शपथेला विसरले नाहींत. ह्याचा परिणाम असा झाला कीं, कित्येक लोकांवर खटले झाले व त्यांना कडक शिक्षा देण्यांत आल्या. बंदीखाने त्या सत्याग्रही लोकांनीं अगदीं गच्च भरून गेले. ह्या मंडळीमध्यें लाखोपती लोक व अगदीं गरीब लोक एकच ध्येय पुढें ठेवून मोठ्या आनंदानें तुरुंगामध्यें एकीनें राहूं लागले. शिक्षा होऊन तुरुंगांत जाणें ह्मणजे ह्या लोकांना लग्नमंडपांत जाण्यासारखें वाटूं लागलें. ह्याच वेळीं आमच्या चरित्रनायकाला दोन महिन्यांची साधी कैद भोगण्याचा प्रसंग आला. कोर्टामध्यें खटला चालत असतांनां, हिंदी लोकांच्या अशा तऱ्हेच्या वागणुकीबद्दल मी जबाबदार आहें, असें निर्भयपणानें सांगून, मला ह्या अपराधाबद्दल जितकी कडक शिक्षा देण्यांत येईल तितकी मी भोगण्यास तयार आहें असें त्यांनीं कोर्टास कळविलें.) हें सर्व पाहून अधिकारीदेखील प्रथम थक्क झाले. व त्यांनीं हा कायदा तीन महिन्यांकरितां थांबवून धरला व ह्या अवधींत स्वतःच्या मर्जीप्रमाणें रजिस्टर होण्यास मोकळीक ठेविली, ह्या तीन महिन्यांनंतर हा कायदा रद्द करून टाकण्याचें ठरलें. अशा रीतीनें रजिस्टर करणें ही खुषीची गोष्ट झाल्यामुळें महात्मा गांधी हे प्रथम उदाहरण घालून देण्यासाठीं स्वतः जाऊन रजिस्टर करून आले. पण पुढाऱ्यांच्या प्रत्येक कृत्यावर सर्व लोकांची तीक्ष्ण नजर असते असें म्हणतात, तें खोटें नाहीं. महात्मा गांधींनीं स्वतःला रजिस्टर केलेलें पाहून गैरसमजामुळें एका पठाणाला मोठा राग आला. त्याला असें वाटलें कीं महात्मा गांधींनीं भिऊन हें कृत्य केलें; हा पठाण सत्याग्रहाचा पूर्ण अभिमानी होता. अशा गैरसमजामुळें त्याच्या हातून एक मोठा अपराध घडला. महात्मा गांधी रजिस्टर करण्याला जात असतांना त्या पठाणानें त्यांना फार बेदम मार दिला. ह्या वेळीं जर मिस्टर डोकची पत्नी जवळ नसती तर ह्या माराचा फार भयंकर परिणाम झाला असता. ह्या दयाळू स्त्रीनें यांची फार प्रेमानें सेवा केली, व त्यांना जीवदान दिलें. कारण ह्या दुखापतीमुळें महात्मा गांधी बरेच दिवस फार आजारी होते. व त्यांना केवळ यमाच्या दाढेंतूनच ओढून काढावें लागलें. असो. हिंदुस्थानच्या सुदैवानें थोडेच दिवसांत ते चांगले बरे झाले.

तेव्हां त्यांच्या पुष्कळशा मित्रांनीं या पठाणाला त्याच्या ह्या कृत्याबद्दल कोर्टांत फिर्याद करण्याचा त्यांना आग्रह केला. पण त्यांनीं एकच जबाब दिला कीं त्याच्या बुद्धीला ही गोष्ट करणें रास्त वाटलें म्हणून त्यानें केली. त्याच्यामध्यें त्याचा कांहीं दोष नाहीं, व म्हणून मी त्याला कोणताही दंड करूं इच्छित नाहीं; असो. मध्येंच ही गोष्ट घडून आल्यामुळें रजिस्टर होण्याचें काम थांबलें होतें. पण थोडेच दिवसांत तें जोरानें सुरू झालें. आतां अधिकाऱ्यांना कायदा रद्द करण्याचें आपलें वचन पूर्ण करण्याकरितां आव्हान करण्यांत आलें. परंतु त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं तसें करण्याचें नाकारलें. व त्यांच्या ह्या विश्वासघातकी वर्तनानें लोक अगदीं चिडून गेले. व पुन्हा सत्याग्रहाच्या चळवळीला उग्र स्वरूप प्राप्त झालें.

ही सर्व चळवळ सुरू असतांना महात्मा गांधींना त्यांचे परममित्र पोलक साहेब यांची फार मदत होत होती. हे गृहस्थ देखील बॅरीस्टर होते. ज्या वेळीं महात्मा गांधी जेलमध्यें होते त्या वेळीं त्यांचीं सर्व जबाबदारीचीं कामें हेच पहात असत. कारण ब्रिटिश इंडीया असोसिएशननें त्यांना असिस्टंट सेक्रेटरी नेमिलें होतें. हे स्वतः कायदेकानूमध्यें फार हुषार असल्यामुळें सत्याग्रहवाल्यांना ह्यांची अतिशय मदत होत असे. हे गृहस्थ महात्मा गांधींच्या निस्सीम अनुयायांपैकीं ( ह्यांना अग्रगण्यदेखील म्हणतां येईल असे ) एक होते. त्यांचा स्वभाव करारी, पण प्रेमळ असा आहे. ह्यांच्या चेहेऱ्याकडे पहातांच हा कोणी सच्चा मनुष्य असावा असें वाटतें. जातीनें युरोपियन पण त्यांची वर्तणूक एकाद्या अगदीं हिंदी साधुपुरुषाला शोभण्यासारखी आहे. हे केवळ शाकाहार करितात व सदोदित हिंदी लोकांच्या हिताकडे दृष्टि देऊन काम करीत रहातात. हिंदी लोकांकरितां जो मनुष्य कैदेंत जाणें पत्करून हाल अपेष्टा भोगण्यास तयार झाला त्याची योग्यता काय वर्णन करावी ? सध्यां ते विलायतेला गेले आहेत तरी हिंदुस्थानाविषयीं त्यांची सहानुभूति अगदीं प्रज्वलित आहे व तेथें राहूनदेखील त्यांच्याच्यानें होईल तितकें हिंदुस्थानचें काम ते नेटानें करीत राहतील अशी माझी पक्की खात्री आहे. असो, सरकार आपल्या कर्तव्याला जागलें नसल्यामुळें हिंदीलोकांनीं फिरून तुरुंगांत जाण्याची जारीनें तयारी केली. एखाद्या यात्रेला जातात त्याप्रमाणें लोक तुरुंगामध्यें मोठ्या आनंदानें जाऊं लागले. त्या लोकांमध्यें पुष्कळ लोक नोकऱ्या करणारे

प्रमुख पुरुषांच्या तुरुंगांत जाण्यानें त्यांच्या सर्व कुटुंबाची उपासमार होऊं-
ली. [श्रीमंतलोक स्वखुषीनें तुरुंगाचा पाहुणचार घेण्यास मोठ्या उत्सुकतेनें जात होते. त्यांच्या गैरहजेरीनें त्यांच्या धंद्यावर देखील फार वाईट परिणाम झाला. यावेळीं जिकडे तिकडे दुःखाचें व दारिद्र्याचें साम्राज्य दिसून येत होतें. ह्या सर्व दुःखाच्या कल्लोळामध्यें आमच्या हिंदी स्त्रीवर्गानें फार धैर्य दाखविलें. कित्येक पुरुषांना त्यांच्या स्त्रियांनीं तुरुंगांत जाण्यास भाग पडलें. व स्त्री जातीला साजेलसें वर्तन करून आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या चळवळींत आपलें नांव अजरामर करून ठेविलें. पुढें तर ह्या स्त्रीवर्गानें स्वतः तुरुंगांत जाऊन आपल्या हक्काचें रक्षण केलें. त्याचें वर्णन योग्य ठिकाणीं येईलच. असो.]

सत्याग्रहाच्या चळवळींत ह्या वेळीं सुमारें तीन हजार लोक सामील झाले होते. ह्यांच्यापैकीं पुष्कळ लोकांना फिरून फिरून जाण्याची पाळी आली होती. अर्थात् महात्मा गांधींना ह्या वेळीं दोन वर्षांची सक्त कैद झाली होती. ही सजा देतांना जज्जसाहेबांच्या तोंडून खालील प्रमाणें उद्गार निघाले:—" ह्या कोर्टामध्यें एका मोठ्या हुद्यावर काम करणाऱ्याला शिक्षा सांगण्याचें माझ्या जिवावर आलें आहे, पण त्यांना स्वतःला ही शिक्षा मी मातृभूमीकरितां भोगणार आहें म्हणून मोठा आनंद वाटत असेल. ह्या वेळींदेखील महात्मा गांधींनीं कोर्टापुढें एक छोटेंसें भाषण केलें. त्याचा सारांश खालीं दिला आहे:—

'मी स्वतःचें रजिस्टर सर्टीफिकेट व आंगठ्याचा ठसा देण्याचें कारण हें होय कीं, माझ्याच्यानें होतां होई तों हा कायदा रद्द होण्याची खटपट केली, परन्तु सरकारानें एकदां वचन देऊन देखील त्या संबंधांत कांहींच केलें नाहीं. अशा स्थितींत सत्याग्रहाशिवाय दुसरा कोणताच उपाय आम्हां हिंदी लोकांच्या हातांत न राहिल्यामुळें मी हा मार्ग स्वतः स्वीकारून माझ्या इतर बांधवांनांही स्वीकारावयास लावला. ह्या गुन्ह्याबद्दल मला जी शिक्षा भोगावयास लागेल ती मी भोगण्यास तयार आहें.' अशा तऱ्हेचे उद्गार काढून आमचे चरित्रनायक फिरून तुरुंगवासी बनावयास मोठ्या आनंदानें तयार झाले. ह्या वेळीं त्यांना तुरुंगांत फारच त्रास भोगावा लागला. पहिले दिवशीं हे व ह्यांचे साहाय्यक, कुदळी घेऊन जमीन खोदावयास गेले. कोणालाच त्या कठीण कामाची संवय नसल्यामुळें, वरून कडक उन्हाचा मारा होत असल्यामुळें एक गृहस्थ घेरी येऊन पडले. स्वतः महात्मा गांधींच्या हातालादेखील मोठमोठाले फोड

येऊन त्यांतून सारखें पाणी वाहूं लागलें. आपल्या मित्राच्या तोंडावर पाणी शिंपीत सावध करीत असतांनां वार्डर लवकर कामाला लागण्या विषयीं गांधींना त्या लावूं लागला. अशा स्थितींत एकादा साधारण मनुष्य गांगरून जाता. पण गांधींना, मोहनदास असाधारण धैर्याचे, म्हणून अशा आणीबाणीच्या वेळीं आपली शांतता बिलकूल ढळूं न देतां उलट जास्त उत्साहानें स्वतः कामाला लागून इतर मंडळीसहि तसें करण्याबद्दल प्रोत्साहन देऊं लागले. खरोखरच अशा व्यक्ति महात्मे म्हणवून घेण्यास योग्य होत. तेथील कैदीलोकांच्या अन्नामध्यें चरबी घालण्याची रीत असे. ही सत्याग्रही मंडळी त्या अन्नाला शिवतदेखील नसत. उलट उपवास करून दिवस काढीत होते. एके वेळीं स्वतः महात्मा गांधींना अधिकारी लोक तूप देऊं लागले पण तें घेण्याचें त्यांनीं नाकारलें. कारण तूप त्यांच्या मंत्रगड्यांना देण्यांत येत नव्हतें. एके वेळीं तुरुंगांतले शेतखाने साफ करण्यास महात्मा गांधींना त्यांच्या मित्रास सांगण्याकरितां फरमाविण्यांत आलें. पण तें काम मीं स्वतःच करावयास येतों म्हणून सांगून लगेच जाऊन सर्व शेतखाने ते साफ करून आले ! एके वेळीं हे शौचाला गेले असतांनां एक काफीर मनुष्य तेथें आला व त्यानें ह्यांनां उचलून एका बाजूला फेंकून दिलें. सुदैवानें ह्यावेळीं त्यांना इजा झाली नाहीं. असो. अशा प्रकारें नाना प्रकारचें दुःख ह्या मंडळीला देण्यांत आलें. ह्या तुरुंगवासांतून परत आल्यानंतर महात्मा गांधींनीं दोन ठिकाणीं डेप्युटेशनें पाठविलीं. एक हिंदुस्थानांत व दुसरें विलायतेंत. दोन्ही डेप्युटेशनचें काम साऊथ आफ्रिकेंतील लोकांवर होत असलेल्या जुलमा विषयीं तेथील लोकमत जागृत करणें हें होतें. ह्या डेप्युटेशनमध्यें जाणाऱ्या कित्येक मंडळींनां अटकाव करून तुरुंगांत टाकण्यांत आलें; पण महात्मा गांधी व त्यांचे कांहीं मित्र निर्विघ्नपणें विलायतेला गेले. व त्यांनीं तेथील लोकांत थोडी बहुत जागृति केली. ट्रान्सवालमधील प्रधानमंडळ ह्या वेळीं विलायतेंत होतें. म्हणून तेथील सरकारनें ह्या बिकट प्रश्नाविषयीं वरीलचशी वाटाघाट करून त्याचा निकाल लावण्याचा प्रयत्न केला. परंतु जनरल स्मटसनें ( Smuts ) कांहींच करण्याचें नाकारलें. अशा तऱ्हेनें हा प्रश्न फिरून जागच्याजागींच राहिला. सरतेशेवटीं महात्मा गांधींनीं तेथें कांहीं व्हॉलंटियर्स ( स्वयंसेवक ) जमवून वर्गणी गोळा केली, तेथील लोकमत जागृत केलें व ही मंडळी आफ्रिकेमध्यें परत आली.

होते. कीं हिंदुस्थानांत मिस्टर पोलक पाठविले गेले. हिंदुस्थानांत पोलक पोहोंचण्याचे लागव येथील लोकमत आफ्रिकेंतील हिंदी बंधूंच्या स्थितीचें वर्णन ऐकून अगदीं जीर्ण होऊन संतप्त झालें होतें व त्यामध्येंच मिस्टर पोलकसारखे गृहस्थ मिस्टर गोखल्यानां घेऊन सर्व हिंदुस्थानांत गांवोगांवीं जाऊन आफ्रिकेसंबंधीं माहिती सांगूं लागले. वर्तमानपत्रांत वाचणें व एकाद्या मनुष्यानें येऊन सांगणें ह्यांच्यांत जमीन अस्मानाचा फेर होतो. हिंदुस्थानांतील लोकांनीं जेव्हां मिस्टर पोलकच्या तोंडून खरी हकीगत ऐकली, तेव्हां लोकमत इतकें क्षुब्ध झालें कीं ह्या गोष्टी संबंधीं कांहीं तरी निश्चित झाल्याशिवाय आपण उगीच बसणार नाहीं अशी येथील पुढाऱ्यांनीं प्रतिज्ञा केली. ह्याचा परिणाम असा झाला कीं मिस्टर गोखल्यांनीं ह्या मानहानिकारक कायद्याचें निर्मूलन करून टाकण्याविषयीं व्हॉइसरायच्या काउन्सिलमध्यें एक बिल मोठ्या दक्षतेनें आणलें व त्याच्यावर फार जोराचें व कळकळीचें भाषण केलें. ह्या वेळीं हिंदुस्थान सरकारला देखील बहुजन समाजाच्या मताला मान द्यावा लागला आणि अशा तऱ्हेनें सत्याग्रही लोकांनां आपल्या चळवळीमध्यें प्रथम जय मिळाला.

ह्या गोष्टीचा आफ्रिकेमध्यें देखील बराच परिणाम झाला व ( Hoskin Committee)सर विलीयम हास्किन यांच्या प्रमुखत्वाखालीं एक कमिटी स्थापन करण्यांत आली. व तिनें आपलें काम फारच उत्तम केलें. तथापि अधिकाऱ्यांनीं आपल्या नेहमींच्या अंधपरंपरेला अनुसरून हिंदी लोकांना त्रास देण्याची युक्ति काढिली. ती युक्ति ह्मणजे या सत्याग्रही लोकांना नटालच्या पलीकडे हद्दपार करून टाकणें. प्रथम ह्या लोकांनीं मुख्य पुढाऱ्यांना हद्दपार केलें पण हे लोक फिरून परत आले. पुढें ह्या अधिकाऱ्यांनीं सुमारें साठ लोकांना हिंदुस्थानांत पाठवून दिलें ते देखील परत आफ्रिकेंत गेले. पण त्या लोकांना तेथील अधिकाऱ्यांनीं किनाऱ्यावर उतरूं न देण्याचा आटोकाट प्रयत्न केला व त्या लोकांच्या मागें एका बंदरावरून दुसऱ्या बंदरावर एकाद्या जंगली लांडग्यासारखे ते लागले होते.

ह्या धरपकडींत नारायण स्वामी नांवाचे गृहस्थ पोर्चुगीज हद्दीमध्यें मरण पावले. ह्यांच्या मृत्यूनें सत्याग्रही लोक अगदीं चिडून गेले. ह्या गोष्टीचा परिणाम हिंदुस्तानांत फारच झाला. येथील सरकारनें विलायत सरकारला ह्या गोष्टी बंद करण्याविषयीं सांगितलें व त्यांनींही आफ्रिकेंतील सत्ताधिकाऱ्यांस ही हद्दपारी बंद

करण्यास सांगितलें व त्यांनींही ह्या वेळीं तसें केलें. ज्या वेळीं साउथ अफ्रिकेमध्ये निरनिराळ्या प्रांतांचें साउथ-आफ्रिकन-यूनियन ह्या सदराखालीं एकीकरण झालें, त्या वेळीं विलायतेंतील सरकारनें फिरून एक वेळ हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष देण्यास त्यास सांगितलें व ज्या कायद्यापासून हिंदी लोकांत इतकी अस्वस्थता उत्पन्न झाली आहे तो कायदा रद्द करून टाकण्याविषयीं एक खलिता पाठविला त्याच्यामध्यें असें लिहिलें होतें कीं रजिस्ट्रेशनचा कायदा ठेवूं नये. ह्याचा परिणाम असा होईल कीं मजूरवर्ग येण्याचा थांबेल व कांहीं सुशिक्षित लोकांना यावयास मोकळीक राहील.

पुढें असेंही लिहिलें होतें कीं पूर्वी येऊन राहिलेल्या मजूर वर्गावर ह्या कायद्याची अंमलबजावणी होऊं नये. त्या वेळीं युनियन सरकारनें ह्या खलित्याचा विचार करून लवकरच रजिस्ट्रेशनचा कायदा बंद करण्याचें ठरविलें. व एक नवीन कायदा निर्माण केला. पण त्यामध्येंहि विलायत सरकारच्या दोन्ही सूचनांचा कांहींच विचार केला नाहीं. ह्या दोन सूचनांपैकीं एक जाति तत्त्वावर रजिस्ट्रेशन बंद करणें. व दुसरी पूर्वीपासून वसाहत केलेल्या लोकांवर ह्या कायद्याची अंमलबजावणी न करणें; या सूचनापैकीं एकहि मान्य न करतां उलटपक्षीं युनियन सरकारनें किनाऱ्यावर रहाणाऱ्या प्रांतांतील लोकांचे बरेच हक्क हिरावून घेतले. व अशा तऱ्हेनें फिरून एकवार हिंदी लोकांना असंतुष्ट करण्याचें श्रेय संपादिलें. पण विलायत सरकारचें म्हणणें कबूल न केल्यामुळें हा कायदा पास होऊं शकला नाहीं. अखेरीस बरीच रदबदली करून सत्याग्रही लोकांस नवीन कायदा अमलांत येईपर्यंत आपली चळवळ थांबवून धरण्यास वरिष्ठ सरकारनें सांगितलें. पण ह्या गोष्टी अमलांत येईपर्यंत जणूं काय कायदा पास झाला अशा तऱ्हेचें यूनियन सरकारचें वर्तन चालू होतें. असो १९१२ मध्यें नवीन कायदा अमलांत आला पण त्याच्यामध्यें कांहीच सुधारणा नव्हत्या. फक्त रजिस्ट्रेशनच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचें काम एका वर्षावर ढकललें गेलें.

अशा तऱ्हेच्या गोष्टी घडत असल्यामुळें महात्मा गांधींनीं रा. गोखल्यांना ह्यावेळीं तेथें बोलाविलें: कारण ते तेथें जाऊन वस्तुस्थितीचें अवलोकन करून हिंदी लोकांना त्यांच्या हाल अपेष्टांतून सोडवितील अशी त्यांची पूर्ण खात्री होती. रा. गोखले देखील त्या देशभक्तांच्या बोलावण्याला मान देऊन व हिंदुस्थान सरकार व विलायत सरकारची संमत्ती घेऊन आफ्रिकेमध्यें रवाना झाले. व चावीस आक्टो-

बरला केप टाऊनला जाऊन पोंहोचले; त्यांचा एकाद्या राजाप्रमाणें युनिअन गव्हर्मेंटनें सन्मान केला. त्यांच्या देशबांधवांनीं तर केलाच. मिस्टर गोखले यांनीं आफ्रिकेमध्यें सुमारें तीन आठवडे राहून सर्व मोठमोठालीं गांवें पाहून त्यांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें. जिकडे तिकडे त्यांचा उत्तम सन्मान करण्यांत आला व त्यांनीं देखील युनियन गव्हर्मेंटवर चांगली छाप बसविली. मिस्टर गोखल्यांनीं तेथील प्रधान मंडळाची मुलाखत घेतली व त्यांच्याकडून तीन पौंडांची डोईपट्टी, रद्द करण्याचें व पहिल्या कायद्यांत बराच फेरफार करण्याचें अभिवचन घेतलें. ( तीन पाऊंडांची डोईपट्टी मुदतबंदी मजुराला त्याची मुदतबंदी संपल्यावर दरवर्षी द्यावी लागत असे. ) ह्या कायद्यांत स्त्रिया, सोळा वर्षांचा मुलगा व तेरा वर्षांची मुलगी या सर्वांना हा वार्षिक कर भरावा लागत असे. असो. अशा तऱ्हेची उत्तम कामगिरी रा. गोखल्यांनीं केल्यामुळें थोडा वेळ तरी आफ्रिकेमध्यें शांतता झाली. असो. गोखले व गांधी यांमध्यें किती प्रेमभाव होता हें येथें सांगितल्यास अस्थानीं होणार नाहीं असें वाटल्यावरून मीं ह्या संबंधी थोडेसें लिहित्यें.

ह्या दोघांमध्यें गुरुशिष्यांचें नातें होतें. गोखल्यांच्या असाधारण बुद्धिमत्तेविषयीं गांधींना नेहमी आदर वाटत असे, त्यांच्या देशभक्तीविषयीं फार अभिमान वाटत असे व त्यांच्या अलौकिक वक्तृत्वाविषयीं कौतुक वाटत असे, गांधी गोखल्यांना इतका मान देत असत कीं स्वतःच्या मताविरुद्ध कांहीं कांहीं गोष्टी वेळ पडल्यास ते त्यांच्यासाठीं करीत असत. उदाहरणार्थ गोखले विलायतला आजारी आहेत असें कळतांच स्वतःची तब्येत बरी नसतांना देखील हे विलायतेला चालते झाले. वाटेंत उघड्या पायांनीं सदोदित फिरत असल्यामुळें त्यांना भयंकर सरदी झाली. खाण्यापिण्याच्या अव्यवस्थेमुळें त्यांची प्रकृति फार बिघडली होती. तरी पायांत गरम मोजे बुट घालण्याविषयीं व दूध व इतर पौष्टिक पदार्थ खाण्याविषयीं डॉक्टरनें कितीही कळकळीनें सांगितलें तरी हे ऐकत नसत. पण तेच गांधी विलायतमध्यें गोखल्यांना भेटावयास जाण्याचे वेळीं मात्र बुट मोजे घालून जात असत. ह्याचें कारण मिस्टर गोखल्यांनीं सांगितलें होतें कीं जर तुम्हीं गरम कपडे व बूट मोजे घालून न याल तर मीं तुह्मांला भेटणार नाहीं.

अर्थात् गोखल्यांनीं गांधींच्या बऱ्याकरितांच असें सांगितलें होतें. पण तें गांधी ऐकत होते हीच नवलाची गोष्ट होय. ज्या सत्याग्रह्यानें कोणापुढें कधींही आपलीं मनें कितीही अडचणी आल्या असतां व कितीही संकटें भोगावीं लागलीं असतां

सोडलीं नाहींत तोच आपल्या गुरुप्रेमाला वश होऊन थोड्या वेळाकरितां आ मतें बाजूस ठेवीत असे. ह्यावरून मिस्टर गोखल्यांवर त्यांचें किती निःस्सीम होतें हें दिसून येतें. देवाच्या मनांत ह्या दोघांनीं हिंदुस्थानांत एके ठिकाणीं रहावें असें नव्हतें. असो.

[ युनियन सरकारनें आपल्या कायदेकौन्सिलांत एक नवीनच कायदा आणला. या कायद्याचें स्वरूप इतकें घाणेरडें व अपमानकारक होतें कीं त्यामुळें हिंदी स्त्रियांनाहि सत्याग्रही बनावें लागलें. हा कायदा ह्मणजे हिंदु किंवा मुसलमानी पद्धतीनें झालेले विवाह बेकायदेशीर समजणें हा होय. या कायद्याच्या योगानें हिंदी लोकांच्या स्त्रियांनां राखेल्या ठरवून त्यांच्या संततीला वारसाचे स्वाभाविक हक्क न देतां, सर्व मालमत्ता स्वतःच गिळंकृत करण्याची अपूर्व सोय सरकारनें केली होती.]

[ हा कायदा पास न होण्याबद्दल पूर्वीप्रमाणेंच विलायतेला डेप्युटेशन पाठवून व इतर अनेक तऱ्हेचे उपाय केले गेले. परंतु नेहमींप्रमाणें यश मुळींच न येतां थोडासा फेरफार करून तोच कायदा पास झाला व आमच्या पुढाऱ्यांना फिरून आपल्या सत्याग्रह धेनूची कास मोठ्या धाडसानें धरावी लागली. त्या वेळीं ह्या मंडळींनां तीन गोष्टींकरितां भांडावयाचें होतें. एक तीन पाऊंड कर उठविणें, दुसरी रजिस्ट्रेशनचा कायदा रद्द करणें व तिसरी ह्या लग्नासंबंधींच्या कायद्यामध्यें दुरुस्ती करणें ही होय. हिंदी राष्ट्राच्या पावित्र्यावरच घाला आल्यामुळें ह्या वेळीं सर्व स्त्रिया आपलें पातिव्रत्य रक्षण करण्याकरितां व आपली व आपल्या कुलाची अब्रु रक्षण करण्याकरितां सत्याग्रहरूपी अग्नीमध्यें पटापट उड्या टाकण्यास तयार झाल्या होत्या. बरें झालें कीं ह्या वेळीं महात्मा गांधीसारखा चाणाक्ष व सच्छील पुढारी आफ्रिकेंतील लोकांचा मार्गदर्शक होता. त्यांनीं ह्या सत्याग्रहाच्या उपदेशानें सर्व हिंदी लोकांना शांत ठेविलें. नाहीं तर ह्या वेळीं खात्रीनें जबर अनर्थ ओढवला असता; कारण हिंदी लोकांच्या पूर्व इतिहासामध्यें स्त्रियांच्या पातिव्रत्याकरितां मोठमोठालीं रणें माजल्याचीं उदाहरणें आहेत, व जरी सध्यां आमचा पुरुष वर्ग निर्बल व निःसत्त्व झाला आहे, तरी प्रसंग पडल्यास अजून देखील मोठ्या बलाढ्य मनुष्याशीं स्वतःच्या स्त्रीची अब्रू रक्षण करण्याकरितां दोन हात करण्यास मागें पुढें पहाणार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे.]

सत्याग्रहानें केवळ स्वतःलाच त्रास भोगावा लागत असल्यामुळें आह्मां हिंदी

लोकांना सध्यांच्या स्थितींत हाच मार्ग योग्य होय व म्हणून हा मार्ग शोधून काढणाराला हिंदी प्रजेनें नेहमीं दुवा दिला पाहिजे. असो; इतके दिवस पुरुषवर्गाला प्रोत्साहन देण्याचेंच काम स्त्रीवर्गाला करावें लागत होतें; पण आतां तर स्वतःलाच तुरुंगांत जाण्याची पाळी आली होती. हें तुरुंगांत जाण्याचें काम आमच्या स्त्रीवर्गानें त्यांच्या नांवाला शोभेसेंच केलें. कित्येक स्त्रियांनीं गरोदर असतांना देखील तुरुंगांत जाण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. कित्येक आपलीं लहान बालकें घरीं टाकून चालत्या झाल्या. अशा तऱ्हेनें हा स्त्रीवर्ग बंदींत जाण्याकरितां मुद्दाम ट्रान्सवालमध्यें गेला; कारण ह्या ठिकाणीं कोणाहि काळ्या मनुष्याला जाण्याचा मज्जाव होता.

अशा तऱ्हेनें आमच्या असाधारण धैर्यशाली शेंकडों स्त्रिया स्वतःच्या अब्रूचें रक्षण करण्याकरितां मोठ्या आनंदानें तुरुंगांत गेल्या. अर्थात् ह्या स्त्रीसमाजांत मिसेस गांधी प्रमुखपणानें चमकत होत्या. ह्या स्त्रीवर्गाला देखील फार वाईट तऱ्हेनें वागविण्यांत आलें होतें. खाण्यापिण्यांत त्यांचे फार हाल झाले. बऱ्याच स्त्रियांना तीन महिन्यांवर देखील कैद भोगावी लागली होती.

ह्या स्त्रियांच्या चळवळींत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही होय कीं तुरुंगांत जाणारा स्त्री वर्ग कांही मोठा राजकारणांत पडणारा नव्हता, अगर फार शिक्षितही नव्हता. पण स्वाभिमानाच्या दिव्य तेजानें झळकणारा होता. ह्या अतुल तेजानें पुरुषवर्ग विशेष उत्साहित झाला व युनियन गव्हर्मेंटच्या मंडळींनीं तर तोंडांत बोटेंच घातलीं. कारण पाश्चात्य लोकांची हिंदी स्त्रियांबद्दलची कल्पना अगदींच कोती असते. त्यांना वाटतें हिंदी स्त्रिया म्हणजे एखाद्या सुंदर कोंडलेल्या पक्षाप्रमाणें आहेत. त्यांना स्वतःचें बुद्धिसामर्थ्य मुळींच नसतें. कारण त्यांनीं कॉलेजांत जाऊन मोठमोठ्या परीक्षा दिलेल्या नसतात ! पण ह्या साउथ आफ्रिकेंतलि साधारण स्त्रीवर्गानें आपल्या अंगच्या अलौकिक धैर्यानें ह्या लोकांना आपलें खरें पाणी दाखवून दिलें. ह्या स्त्री वर्गानें आणखी एक मोठी कामगिरी केली. ती अशी कीं ट्रान्सवालामध्यें जातांना वाटेंत लागणाऱ्या मजुरांच्या खाणींमध्यें जाऊन त्यांना सत्याग्रहाच्या चळवळींमध्यें सामील होण्यास प्रोत्साहन दिलें. व अशा तऱ्हेनें आपली व आपल्या देशाची अब्रू राखण्यास बजाविलें. खरोखर ही कामगिरी अलौकिक होय.

ह्या स्त्रिया आपला तीन महिन्यांचा सक्तमजुरांचा बंदिवास पुरा करून जेव्हां बाहेर आल्या तेव्हां त्यांची प्रकृति एकाद्या क्षयरोग्या प्रमाणें झालेली दिसत होती. कारण कित्येकजणींनीं चरबी खावयाची नाहीं म्हणून खाणेंच वर्ज केलें होतें. एक स्त्री तर तुरुंगांतून आल्याबरोबर मृत्युमुखीं पडली व दुसरी देखील त्याच मार्गाला लागलेली होती. मृत झालेल्या स्त्रीचें वय केवळ अठरा वीस वर्षांचें होतें. बिचारीच्या आत्म्यास ईश्वर शांति देवो ! ज्यांनीं आपल्या प्रियकन्येचा राष्ट्राच्या अब्रु रक्षणार्थ बळी दिला, तीं मातापितरेंही धन्य होत. असेच लोक आमच्या हिंदुस्थानांत जास्त निपजोत. [हिंदुस्थाना ! तुझ्याजवळ अभिमान बाळगण्यासारख्या पुष्कळ वस्तु आहेत, पण ह्या आफ्रिकेंतील स्त्रियांच्या अलौकिक धाडसी कृतीला तुला खात्रीनें अग्रस्थान द्यावें लागेल. असो.]

आतां पुढाऱ्यांनीं एक मोठी मोहीम ट्रान्सवालमध्यें नेण्याचें ठरविलें. हें काम एक जुटीनें करावयाचें होतें. स्त्रीवर्गानें खाणींतून जाऊन बरीच तयारी करून ठेविलीच होती, पुढाऱ्यांची इच्छा काय आहे हें कळतांच सत्याग्रहाची चळवळ एखाद्या वणव्याप्रमाणें पेटली व एकामागून एक खाणी व इतर कारखाने बंद पडले व अशा तऱ्हेनें प्रसिद्ध ट्रान्सवाल मोहीमेच्या पूर्वतयारीला जारीनें सुरवात झाली.

{ तीन पाऊंडांची डोईपट्टी बंद करण्याबद्दल जेव्हां अतोनात प्रयत्न झाले तेव्हां फक्त कांहीं स्त्रीवर्गापासून ही डोईपट्टी न घेण्यासंबंधी एक ठराव करण्यांत आला. व ही डोईपट्टी कोणत्या स्त्रियांकडून घ्यावी व कोणत्यांकडून न घ्यावी हें ठरविण्याचें काम मॅजिस्ट्रेटकडे सोपविलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं कांहीं कांहीं न्यायाधीश हा कायदा अमलांत आणीत व कांहीं कांहीं न आणीत एवंच ही सुधारणा असून नसून सारखीच होती. }

ह्या कायद्याच्या भयंकर स्वरूपाविषयीं मिस्टर पोलकनीं आपल्या हिंदुस्थानांतील मोहिमेंमध्यें व विलायतेंतील प्रवासामध्यें, जनतेचीं मतें जागृत करण्याचें काम केलें होतें. आणि मिस्टर गोखले आफ्रिकेंत गेले होते, त्यावेळीं त्यांनीं देखील हा कायदा रद्द करण्याविषयीं आफ्रिकेंतील प्रधान मंडळापासून वचन घेतलें होतें व हा कायदा बंद झाल्याशिवाय स्वतःच्या जिवाला शांतता वाटणार

नाहीं असें स्पष्टपणानें सांगितलें होतें. व ह्मणूनच आफ्रिकेंत असतांना जागोजागीं आपल्या भाषणांत हा कायदा बंद होईल ह्मणून तेथील लोकांना ते आश्वासन देत होते. व हाच मार्ग महात्मा गांधींनीं गोखले गेल्यावर सुरू ठेवला होता. ह्मणून फक्त स्त्रियांवर ह्या कायद्याची अम्मलबजावणी होणार नाहीं असें ऐकनांच आफ्रिकेंतील पुढाऱ्यांनीं मिस्टर गोखल्यांना हिंदुस्तानांत तार करून विचारिलें कीं हा कायदा फक्त स्त्रियांपुरताच रद्द व्हावयाचा होता कीं काय? तेव्हां त्यांनीं जबाब दिला कीं हा कायदा आजिबात रद्द करण्याचें अभिवचन प्रधान मंडळीनीं दिलें आहे. व असें वचन आम्हीं दिलें नाहीं असें प्रधान मंडळीनें देखील प्रसिद्ध केलें नाहीं. परंतु इकडे आपल्या करणीला वरीक चुकले नाहींत. असो, पुढें ज्या वेळीं पार्लमेंटची नवीन सभा भरली, त्या वेळीं हा कायदा रद्द व्हावा म्हणून मिस्टर गांधींनीं प्रधान मंडळाशीं बोलाचाली सुरू केली. व ह्याच वेळीं मिस्टर पोलक यांनीं देखील विलायतेंत जाऊन पुष्कळ खटपट केली व सरते शेवटीं इतकें- देखील सांगितलें कीं आफ्रिकेंतील प्रधान मंडळाची ह्या कामांत मोठी नामुष्की झाली आहे कारण त्यांनीं विश्वासघात केल्याचा आरोप येत आहे. ह्या विषयावर लॉर्ड ऑफ यील यांनीं देखील लॉर्डांच्या सभेंत सणसणीत भाषण केलें. परंतु यूनिअन सरकारनें ह्या गोष्टीकडे लक्ष देण्याचें नाकारलें. व म्हणून मिस्टर गोखले यांची तब्येत नीट नसतांनां देखील ते एकदम विलायतेला चालते झाले.

इकडे मिस्टर गांधींनीं यूनियन गव्हर्मेंटला एक पत्र लिहिलें त्यांतील मजकूर येणें प्रमाणें:—

मी जो कांहीं उपदेश सध्यां लोकांनां करणार आहें, त्याबद्दलची केवढी जबाबदारी मजवर आहे हें मी पूर्णपणें जाणून आहें. परंतु सध्यां जी लोकांची हीन स्थिति माझ्या नजरेस येत आहे त्यावर मी जो उपदेश करणार आहें त्याशिवाय दुसरा कोणताही उपाय मला सुचत नाहीं. तीन पौंडाच्या डोई पट्टी विषयीं मीं लोकांनां असें सांगणार आहें कीं ही डोईपट्टी देण्याचें आपण नाकारावें व ह्या ह्याबद्दल जी कांहीं शिक्षा होईल ती आनंदानें भोगण्यास तयार व्हावें व जे मुद- ंदी मजूर सध्यां कामावर आहेत त्यांनां खुशाल संप करावा. कारण ह्या शिवाय यां दुसरा कोणताही इलाज उरलेला नाहीं. पण फिरून मीं आणखी एकवार जनरल स्मट्स (General Smuts) ना हा कायदा मागें घेण्यास विनवितों कारण तसें

केल्यानें पुष्कळच अनर्थ टळेल.असो, मिस्टर स्मटसनीं (Smuts) ह्या पत्राकडे काना डोळा केला. व कारखान्याच्या मालकानां देखील ही गोष्ट कळविली नाहीं. रूटर एजन्सीनें देखील जर तीन पौंडाची डोईपट्टी एकदम बंद केली तर मजूर लोक संप करणार नाहींत, अशा तारा पाठविल्या. यावरून असें स्पष्ट होतें कीं पुढाऱ्यांनीं संपाविषयीं परिपूर्ण माहिती दिली होती. आतां इकडे जो स्त्रीवर्ग एकदा लग्नाच्यौं कायद्याबद्दल जेलमध्यें जाऊन आला होता तो फिरून सत्याग्रहाच्या चळवळींत सामिल झाला परंतु ह्या वेळीं त्यांना खुशाल जाऊं देण्यांत येत असल्यामुळें त्यांनीं आपलें मुख्य ठाणें न्युकॅासला ठेवून मिस्टर C. K. Y. Naidoo या गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं जागोजागीं खाणींमध्यें जाऊन तेथील मजूर वर्गाला तीन पौंडाची डोईपट्टी उठेपर्यंत काम बंद पाडण्याविषयीं कळकळीचा उपदेश केला व ह्या उपदेशाचा परिणामही फार उत्तम झाला. एका मागून एक खाणी बंद पडूं लागल्या व एकच हलकल्लोळ झाला. प्रथम खाणींचे मालक मजूर लोक कामावर नसतांहि त्यांना शिधा देऊं लागले. हेतु हाच कीं अशानें तरी हे लोक कामावर येतील. परंतु तसें कांहीं न होतां संपाचें काम जोरांत सुरू राहिलें. अखेर खाणीच्या मालकांनीं एक सभा भरविली व ह्या सभेस महात्मा गांधींनां बोलाविण्यांत आलें. त्यांनीं वस्तुस्थिति समजावून सांगितली, व म्हणून खाणीच्या मालकांनीं जनरल स्मट्स आणि जनरल बोथा (General Smuts and General Botha) ह्यांना रा. गोखल्यांना तुम्हीं ह्या कर उठविण्याविषयीं वचन दिलें होतें किंवा काय हें तारेनें विचारलें.

आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांनीं आम्हीं असें वचन मुळींच दिलें नाहीं असें उलट तारेनें कळविलें. ही गोष्ट मिस्टर गोखल्यांना कळविल्यावर त्यांनीं उलट जबाबानें असें कळविलें कीं मला ह्या लोकांनीं निःसंशय वचन दिलें होतें. असो.

ह्या वेळीं संपांतील लोकांना पुढाऱ्यांनीं खाणींच्या पासून दूर नेलें. कारण तेथें असतांना खाणींचे मालक त्यांना लालूच दाखविण्याचा प्रयत्न करीत होते चें इकडे महात्मा गांधींनीं Mr. Albert Christophek and M नीं Kallanbach ह्या गृहस्थांच्या मदतीनें सर्व सत्याग्रही लोकांचा पुढारीपण स्वीकारिला. व आपलें मुख्य ठाणें न्युकॅासला ठेविलें. ह्या ठिकाणीं रोज शें

लोक खाणींतून येऊं लागले. [न्यूकॅसल म्हणजे एक गर्दीचें ठिकाण झालें. हे शेंकडों लोक थंडीवाऱ्याकडे न पहातां, खाण्यापिण्याकडे लक्ष न देतां उघड्या मैदानावर खुशाल आपल्या पुढाऱ्याच्या आज्ञेची वाट पहात आनंदानें पडले होते. खरोखर हा एक हृदयद्रावक देखावा दिसत होता. ह्या सर्व लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था मिस्टर Kallenbach (कॅलनबॅक) जिवापाड श्रम करून करीत होते. इकडे मिस्टर गांधी त्यांच्या बरोबरच रहात असून मोठ्या प्रेमानें व कळकळीनें आजारी लोकांची सेवाचाकरी करीत होते. व ह्या त्यांच्या आत्मभोगामुळें सर्व लोक आपलें सुखदुःख एकीकडे ठेवून आनंदानें रहात असत.]

[खरोखर ह्या लोकांना खावयास चणे चुरमुरे, निजावयास धरित्री माता व पांघरूण निळें आकाश अशा तऱ्हेची सोय करण्यांत आली होती. ह्या लोकांचा उत्साह कायम रहाण्यास दुसरी एक गोष्ट कारणीभूत झाली. ती म्हणजे ज्या स्त्रियांनीं आपल्या मधुर वाणीनें काम बंद करण्यास लोकांना प्रोत्साहन दिलें होतें त्या स्त्रिया सध्यां सक्तमजुरीची कैद भोगीत होत्या; व म्हणून आपल्याला कितीही हालअपेष्टा भोगाव्या लागल्या तरी बेहेत्तर आहे, असें ह्या लोकांना वाटूं लागलें. ह्या सर्व हालअपेष्टा भोगण्यांत कित्येक स्त्रिया व मुलेंही होतीं. कारण खाणींतील मजुरांनी सहकुटुंब संप केला होता. एका स्त्रीचें लहान मुल कडक थंडीमुळें न्यूकॅसलला येत असतांना मृत्युमुखीं पडलें. पण त्या स्त्रीनें आपला शोक आवरून असे उद्गार काढले कीं 'मेलेल्याकरितां शोक करण्याची ही वेळ नव्हे; आपल्याला जिवंत लोकांकरितां काम केलें पाहिजे.' अहाहा! कितीतरी सुंदर उपदेशाचे हे शब्द होते. अशा प्रसंगीं दुसरी एकादी स्त्री आपल्या पतीला ह्या संपामध्यें पडल्याबद्दल सारखी शिव्याशाप देत राहिली असती. परंतु आफ्रिकेंतील महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं वातावरणच बदलून गेलें होतें. नाहींतर असे हे तेजस्वी बोल एकाद्या अशिक्षित स्त्रीच्या तोंडून निघणें जवळ जवळ अशक्यच होतें. अशा तऱ्हेनें ही मंडळी रोज सारखी कूच करीत होती.]

आतां डोईपट्टी उठविण्याकरितां ह्या सर्व मंडळीसह ट्रान्सवालमध्यें चालून जावें म्हणजे सहजच युनियन सरकार सर्व जणांनां पकडून कैदेंत टाकील, असें पुढाऱ्यांना वाटल्यावरून सुप्रसिद्ध 'लॅांगमार्चची' जारीनें तयारी झाली.

एवढ्या अवधींत कांहीं मजुरांवर खटले होऊन त्यांना तुरुंगांत जावें लागलें,

परंतु रोज येणाऱ्या मजुरांनीं त्यांची संख्या सहज भरून निघाली. एवढ्या अवधींत सुमारें तीन हजार लोक जमले. स्त्रियांनां व मुलांना मागें Charles Town ( चार्लस् टाउन ) ला ठेवून ह्या लाँगमार्चला सुरवात झाली.

स्त्रियांची व्यवस्था मिस् स्लेशीन व मिस्टर कॅलनबॅक ( Schlesin and Kallenbach) ह्यांच्यावर सोंपविण्यांत आली होती. व ह्या दोघांनीं स्त्रियांना व मुलांना सुखांत ठेवण्यासाठीं जिवापाड मेहनत केली !

ह्या वेळीं आफ्रिकेंतील हिंदी व्यापारीवर्गानें व हिंदुस्थानांतील लोकांनीं या सत्याग्रही वहादुरांना अतिशय द्रव्य-साहाय्य केलें. हिंदुस्तानांत द्रव्यनिधि गोळा करण्याकरितां प्रसिद्ध सत्याग्रही व महात्मा गांधींचा उजवा हात मिस्टर पोलक पुन्हां एकदां इकडे आले. हा लाँगमार्च सुरु होण्यापूर्वी फिरून एकदां महात्मा गांधींनीं युनियन गव्हर्मेंटला पत्र लिहिलें होतें. परंतु त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. ह्यावरून महात्मा गांधींचा शांत स्वभाव व त्यांचा खोल विचारीपणा यांची पूर्ण साक्षी पटते.

मजल दरमजल करीत ही मंडळी आपल्या ठिकाणावर येऊन पोंहोंचण्याचा प्रयत्न करीत होती. दररोज सुमारें पंचवीस मैल चालणें होत असे; कांहीं ठिकाणीं महात्मा गांधीनां उतरण्याकरितां उत्तम व्यवस्था केलेली असे. परंतु कर्मवीर गांधींनीं तिचा कधींच स्वीकार केला नाहीं. उलट आपल्या संवगड्यांपेक्षां आपण स्वतः जास्त त्रास सोसण्याकडे त्यांची नेहेमीं प्रवृत्ति असे. 'टाकीचे घाव खाल्ल्याशिवाय देवपण येत नाहीं' ही गोष्ट अगदीं खरी आहे. प्रत्येक मुक्कामाच्या जागा कोठें ठरविल्या आहेत याची वर्दी युनियन सरकारला देण्यांत येत असे. हेतु एवढाच कीं, ह्या लोकांना अटकाव करावयाचा असल्यास त्यांनीं खुशाल करावा.

हें सर्व चालत असतांना इकडे युनियन सरकार कांहीं गप वसलें नव्हतें. त्यानें ह्या लोकांचे पुढारी महात्मा गांधी ह्यांना अटकाव करण्याचें ठरविलें. त्यांचा असा समज होता कीं असें केलें म्हणजे ही सर्व चळवळ विस्कळित होईल. हा समज किती चुकीचा होता हें त्या सरकारला लवकरच कळून आलें. महात्मा गांधींवर वारंट बजाविण्यांत आलें. व महात्मा गांधीं यांना त्यांच्याच अनुयायांपैकीं कांहीं

जणांचीं नांवें देण्यास सांगण्यांत आलें, कीं जे लोक त्यांच्या विरुद्ध साक्ष देतील. महात्मा गांधींनीं कांहीं मंडळीकडे बोट दाखविलें.

हें सर्व करण्याचें कारण मॅजिस्ट्रेटला ह्यांच्यावर जबर खटला कारितां यावा. गांधींनीं ह्या वेळीं जामीनकीवर सोडावें ह्मणून सरकारास अर्ज केला. इकडे संपवाल्या मंडळीनें, आपल्या पुढाऱ्याला नेला तरी न डगमगतां आपलें चालण्याचें काम जारीनें सुरू ठेविलें. व महात्मा गांधींनीं फिरून युनियन गव्हर्मेंटला एक पत्र लिहिलें.

"आपण अशा आणीवाणीच्या वेळीं मला कैद करण्यांत केवढी चुक करीत अहांत हें आपल्या नजरेस आणून देण्याकरितां मी हें पत्र लिहीत आहें. ज्यावेळीं आपण मला पकडलें तेव्हां मी आपल्या लोकांनां कळविलें नाहीं. जर मी त्यांच्यामध्यें ह्यावेळीं नसलों तर ते काय करतील हें माझ्याच्यानें सांगवत नाहीं व ह्यांच्यामध्यें जर कांहीं बंडाळी माजली तर काय अनर्थ होईल ह्याची कल्पना आपल्याला झाली नसावी असें वाटतें; नाहीं तर आपण ही कारवाई केली नसती."

हें पत्र सरकारला मिळाल्याबरोबर शहाणपणानें ह्या वेळीं महात्मा गांधीनां सोडण्यांत आलें. व ते आपल्या मंडळीनां जाऊन मिळाले. पुढें एक दोन दिवसांत ह्या महात्म्याबरोबर ज्या कांहीं स्त्रिया होत्या त्यांना त्यांचे पाय अगदीं सोडून गेल्यामुळें एके गांवीं ठेवण्यांत आलें व पुरुष मंडळी पुढें चालूं लागली. Standerton ला पोहोंचल्यावर संपापैकीं बऱ्याच मंडळींनां त्यांच्या मालकांकडून पकडण्यांत आलें व नाताळला गाडींत घालून पाठविण्यांत आलें व ह्याच ठिकाणीं महात्मा गांधींना पहिल्याप्रमाणें पुन्हां पकडण्यांत आलें. त्यांनीं फिरून जामिनावर सोडण्याची अर्जी केली. ह्या वेळीं संपवाल्या लोकांनींहि निक्षून सांगितलें कीं, जर तुम्हीं आमच्या पुढाऱ्याला ह्या वेळीं सोडणार नाहीं तर आम्हीं कोर्ट सोडून जाणार नाहीं!

ह्या मंडळीचा जोराचा निश्चय पाहून ह्या वेळींहि कोर्टानें महात्मा गांधींनां जामिनावर सोडून दिलें. आणि ही फौज पुढें चालूं लागली.

"हिंदुस्थानांत जाण्याचे पूर्वी मी आपणास भेटावयास येतों" म्हणून मिस्टर पोलकची तार महात्मा गांधींना आली. सांडस्टन पासून थोड्याच लांबीवर लोकांच्या

एका मोठ्या लोंढयापुढें, जाडेभरडे कपडे घातलेली, श्रमानें व दगदगीनें व्याकुळ झालेली, वांकलेली, शांत पण दृढनिश्चयी अशी महात्मा गांधींची मूर्ति पाहून मिस्टर पोलॅकच्या डोळ्यांत अश्रुबिंदु चमकूं लागले, ह्यांत नवल नाहीं.

दोघां मित्रांची भेट होऊन कांहीं बोलणें होत आहे, इतक्यांत एका गाडींतून कांहीं पोलीस लोक तेथें येऊन पोहोंचले व त्यांतील मुख्य अधिकाऱ्यांनीं महात्मा गांधींनां फिरून गिरफदार केलें ! व त्यांना गाडींत घालून चालते झाले. इकडे मिस्टर पोलकच्या नेतृत्वाखालीं संपवाले लोक पुढें कूच करूं लागले. व बालफर गांवीं पोहोंचण्याबरोबर समोर तीन रिकाम्या आगगाड्या सज्ज असलेल्या पाहून ह्याच ठिकाणीं ही सुप्रसिद्ध मोहीम संपणार असें सर्वांना वाटलें. व हेंच अनुमान खरें ठरलें. कारण लवकरच एक ऑफिसर मिस्टर पोलकजवळ जाऊन ' ह्या लोकांनां येथेंच अटकाव करण्यांत तुम्हीं आम्हांला मदत करा; कारण ह्या लोकांना नाताळमध्यें नेऊन त्यांच्यावर आम्हांला खटले करावयाचे आहेत ' असें ह्मणाला. अर्थात् ह्या मोहिमेचा मुख्य हेतु तुरुंगांत जाण्याचाच असल्यामुळें मि. पोलकनीं ह्या ऑफिसरला मदत करण्याचें कबूल केलें. व मला स्वतःला देखील तुरुंगांत पाठवीत असल्यास मीं राजी आहें म्हणून सांगितलें ! दुसरी गोष्ट हीं सांगितली कीं, मीं आपल्यास मदत करण्यास तयार आहें; पण हे संपवाले लोक माझें ऐकतील किंवा नाहीं हें मी सांगूं शकत नाहीं. कारण ह्या मंडळींनीं मला कधीं पाहिलेलें देखील नाहीं. तेव्हां अशा स्थितींत महात्मा गांधी येथें असणें अगदीं जरूरीचें आहे. नाहीं तर एखादा अनर्थ घडून येण्याचा संभव आहे. त्याच वेळेला महात्मा गांधींकडून लोकांनीं निमुटपणें ह्या वेळीं स्वाधीन व्हावें म्हणून निरोप आला. ह्या लोकांना लवकरच खाणें वगैरे| दिल्यावर गाडीमध्यें बसण्याचा हुकुम देण्यांत आला. त्यावेळीं लोकांत बरीच अस्वस्थता दिसून आली. कित्येकांना वाटत होतें कीं, आपल्याला ट्रान्सवालमध्यें जावयाचें होतें; आम्हीं येथेंच ऑफिसर लोकांच्या स्वाधीन होण्यास तयार नाहीं.

ह्या लोकांचा अशा तऱ्हेचा रंग पाहून मि. पोलक एकदम पुढें सरसावले व त्यांनीं लोकांना त्यांच्या उद्देशाविषयीं जाणीव करून दिली. ते म्हणाले, 'तुमचा म्हणजे सत्याग्रहाचा मुख्य हेतु कायदा मोडून तुरुंगांत जाणें हा होता. व तो येथेंहि साधत असल्यामुळें ट्रान्सवालपर्यंत जाण्याची मुळींच जरूर नाहीं.' हे

शब्द ऐकिल्याबरोबर संपवाले लोक कांहींएक न बोलतां मुकाट्यानें पोलीसच्या स्वाधीन झाले. ही वेळ केवढी आणीबाणीची होती बरें? जर संपवाल्यांनी दंगा करण्याचें मनांत आणलें असतें तर ते ही गोष्ट अगदीं सहज करूं शकले असते. दोन तीन हजार लोकांपुढें वीस पंचवीस शिपुर्डे काय करणार? ह्या लोकांनीं केव्हांच त्यांचा चुराडा उडवून दिला असता; पण म. गांधींच्या शिकवणीमुळेंच ह्या वेळेस लोक शान्त राहूं शकले.

[मिस्टर पोलक पहिल्या गाडीच्या बरोबर गेले. पहिल्याच मुक्कामावर त्यांना पण गिरफ्दार करण्यांत आलें. असो. ह्या लोकांची गाडी स्टेशनवर अगदींच थोडा वेळ उभी करण्यांत येत असे व प्रत्येक स्टेशनावर हत्यारबंद पहारेवाले ठेविण्यांत आले होते. एवढा सर्व बंदोबस्त होता तरी जेथें जेथें ह्या संपवाल्यांच्या स्त्रियांच्या नजरेस ही गाडी पडे, तेथें तेथें त्या शूर स्त्रिया आपल्याविषयीं कांहीं काळजी न करतां स्वतःचा उद्योग जोरांत सुरू ठेवण्याविषयीं पुरुषवर्गाला प्रोत्साहन देत होत्या! ह्यालाच म्हणावें राष्ट्रभक्ति. नाहींतर पुरुषांला त्यांच्या राष्ट्रीय कामांमध्यें सदोदित नडणाऱ्या स्त्रिया पुष्कळ दिसून येतात. असो, स्त्रियांकडून येणारे हे प्रोत्साहनाचे शब्द म्हणजे संपवाल्या लोकांना महाजिकच अमृतवर्षावाप्रमाणें वाटले व ते पुढें येणाऱ्या दुःखांस व संकटांस मोठ्या उत्साहानें, आनंदानें आणि बेफिक्रिपणानें तयार झाले. अशा तऱ्हेनें सत्याग्रहाचा विजय झाला. असो.]

इकडे महात्मा गांधींना तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली व त्यांना वॉल्करस्ट Volksrust च्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें. त्या ठिकाणीं आपल्या बऱ्याच मित्रांना पाहून त्यांना आनंद झाला. जेलमध्यें पुरेशी जागा नसल्यामुळें ह्या मंडळींना तंबूंत निजवीत असत. व म्हणूनच महात्मा गांधींना हा देखावा एखाद्या कारागृहाचा नसून छावणीचा असावा असें वाटे. ह्याठिकाणीं सगळी सत्याग्रही मंडळी मिळून सुमारें पाऊणशें होती. त्या सर्वांना स्वतः स्वयंपाक करून जेवावें लागत असे. सडकेवर खडी फोडण्याचें व ती उचलून नेण्याचें काम ह्या मंडळींना करावें लागे. ह्या कामावर महात्मा गांधींनाही पाठविण्यांत आलें होतें. पण तीन दिवसांनंतर ह्यांना तुरुंगाच्या बाहेर न नेण्याचा हुकुम आला. हा हुकुम ऐकतांच महात्मा गांधींना फार वाईट वाटलें. कारण बाहेर कामाला जाण्याचे

निमित्तानें तरी स्वच्छ हवा व शरीराला कसरत मिळत असे. व प्रकृति चांगली रहात असे.

ह्यापुढें महात्मा गांधीनां भंग्याचें काम देण्यांत आलें. पण तें ह्या कर्मवीराला फारच आवडलें ! असो. पुढें यांना एके दिवशीं पावसांत स्वतःचें गांठोडें डोक्यावर घेऊन स्टेशनावर चालत नेण्यांत आलें. व एका थर्डक्लासच्या डब्यामध्यें बसवून प्रीटोरीयाला नेण्यांत आलें. त्यावेळीं आपल्या बरोबरच्या मित्रमंडळीला सोडून जाण्याचें महात्मा गांधींच्या अगदीं जीवावर आलें. पण सध्यां ते स्वतःचे मालक नव्हते. व म्हणूनच ह्या ठिकाणीं महात्मा गांधींच्या तोंडून खालील उद्गार निघाले.

But if everything happened as we wished we should not be called human beings. ( सर्व गोष्टी जर आपल्याच मर्जीप्रमाणें घडून येत असत्या तर आपल्याला कोणीं मनुष्यें म्हटलें नसतें. )

हा विचार मनांत येतां क्षणींच ते अगदीं शांतपणें वॉर्डरबरोबर चालत गेले. प्रीटोरीया जेल हा नुकताच बांधलेला असल्यामुळें बराच स्वच्छ होता. हे तेथें पोंहोचल्याबरोबर त्यांना पॉरीज ( मक्याच्या कण्या शिजवून ) खावयास देण्यांत आलें. परंतु त्या वेळीं खाण्याची इच्छा नसल्यामुळें त्यांनीं तें खाल्लें नाहीं. नंतर एक वॉर्डरानें येऊन त्यांना आपली टोपी काढण्याविषयीं फरमाविलें. व एका कोठडींत नेऊन कोंडून ठेविलें. ' मीं खोलींत इकडे तिकडे येरझारा घालीत होतों इतक्यांत वॉर्डर साहेबांनीं तसें न करण्यास फरमाविलें. 'कारण,' त्यांच्या मतें, 'अशा करण्यानें तेथील जमीन खराब होते!' मीं शांत चित्तानें एका कोंपऱ्यांत उभा राहिलों. मजजवळ वाचावयास कांहींच नव्हतें. यामुळें पुढें काय करावें हें कळेना. नंतर मला डॉक्टरकडे नेण्यांत आलें. त्यांनीं फक्त तुला कांहीं स्पर्शजन्य रोग आहे किंवा काय ह्मणून विचारलें. नकारार्थी उत्तर मिळाल्यावर मला तेथून जाण्यास सांगण्यांत आलें. माझी खोली दहा फूट लांब व सात फूट रुंद असून तिला, भल्या भक्कम गजांची एक लहानशी खिडकीहि होती. आंत एक मिणमिण करीत असलेला विजेचा दिवा ठेवीत असत. त्याचा उपयोग कैदी आंतमध्यें सुरक्षित आहेत किंवा नाहींत एवढें पहाण्यापुरताच होता. त्याच्या प्रकाशांत वाचतां येणें अगदीं अशक्य होतें. सुमारें अकरा वाजतां डेप्युटी गव्हर्नर मजकडे आले. त्या

वेळीं मीं त्यांना तीन गोष्टींची परवानगी देण्याविषयीं विनंति केली. एक माझीं पुस्तकें मला वाचावयास मिळावीं, दुसरें घरीं बायकोला पत्र लिहिण्यास ( कारण ती त्या वेळीं फारच आजारी होती. ) हरकत पडूं नये, व तिसरें मला बसण्यास लहानसें स्टुल असावें. पहिल्या मागणीविषयीं विचार करीन असें उत्तर आलें. दुसरीविषयीं कदाचित् परवानगी दिली ज़ाईल असें सांगण्यांत आलें व तिसरीविषयीं अगदीं नकारार्थी उत्तर देण्यांत आलें. मीं गुजराथींत एक पत्र बायकोला लिहून वॉर्डरजवळ दिलें. त्यांनीं हें इंग्रजी नसल्यामुळें टाकण्याचें नाकारिलें. व मींहि माझ्या बायकोला इंग्रजी येत नसल्यामुळें इंग्रजींत लिहिण्याचें नाकारलें. (महात्मा गांधींचें असें मत आहे कीं, हिंदी मनुष्यांनीं एकमेकांनां आपल्या मूळ भाषेंत किंवा हिंदी भाषेंतच पत्रें लिहावीं. मग स्वतःचे कुटुंबास लिहावयाचें पत्र ते परक्या भाषेंत कसे लिहितील बरें ? ) ह्या गोष्टीपासून आम्हां हिंदी लोकांना पुष्कळच शिकण्यासारखें आहे. कारण आमच्या इकडे सध्यां आपल्या मुलांना लहानपणापासून उत्तम इंग्रजी शिकविण्याची फॅशन होऊं पहात आहे. कित्येक श्रीमंत कुटुंबांत तर मुलांना लहानपणापासून इंग्रजी भाषा शिकविण्यास गव्हर्नेस ठेविण्याचाहि प्रचार पडत आहे. मग त्यांना स्वतःची मातृभाषा धड न आली तरी कांहीं हरकत नाहीं. स्वतःच्या भाषेविषयीं हा केवढा अनादर ! माझ्या ह्या उद्गारांवरून मी इंग्रजी भाषा शिकण्याच्या विरुद्ध आहें असें कोणीं समजूं नये. माझें एवढेंच म्हणणें आहे कीं, प्रथम आपल्या मातृभाषेचा पूर्ण अभ्यास करून मग खुशाल इंग्रजी शिका व त्या भाषेमध्यें असलेलें ज्ञान-भांडार लुटा. असो.

महात्मा गांधींनीं फिरून कधीं घरीं पत्र लिहिलें नाहीं. त्यांच्या दुसऱ्या मागणीचा स्वीकार करण्यांत आला. त्यांना संध्याकाळीं कांहीं पुस्तकें मिळालीं. " मला माझें खाणें खोलींतच उभें राहून खावें लागत असे. मी स्नानाची परवानगी मागितली. वार्डरनें सांगितलें कीं तुम्हांला आपले सर्व कपडे येथें ठेवून मग स्नानास जावें लागेल. स्नानाची खोली माझ्या खोलीपासून फारच लांब असल्यामुळें मला तसें जाण्याचा संकोच वाटूं लागला. सरते शेवटीं मला स्नानगृहापर्यंत कपडे घालून जाण्याची परवानगी मिळाली. परसाकडे बसलों असतानां वॉर्डरची मजवर सारखी नजर असे. दोन तीन मिनिटें झाल्यावरोबर लवकर उठून येण्याविषयीं सारखा तगादा सुरू असे.

दुसरे दिवशीं मला जमीन साफ करण्याचें काम करण्यास लाविलें. व दारें देखील साफ करावीं लागत. खाण्यापिण्यासंबंधीं, मांस व चरबी खात नसल्यामुळें मीं ह्या जिनसांच्याबद्दल तूप मागितलें पण तें फक्त तुम्हांलाच देण्यांत येईल, इतर हिंदी लोकांना मिळणार नाहीं असें सांगितल्यामुळें मीं तूप घेण्याचें नाकारिलें. असो.

पुढें दीड महिन्यानंतर सर्व हिंदी लोकांना चरबीच्या बद्दल तूप देण्यांत येऊं लागलें. प्रथम मीं एक वेळच खात असें, पण माझी तब्येत जेव्हां खालाऊं लागली तेव्हां मीं दुसऱ्यांदा खावयास लागलों. कारण तब्बेत बिघडून जेलच्या बाहेर जाण्याची माझी इच्छा नव्हती. माझा पहिला वॉर्डर मला फार त्रास देत असे. पण तो जाऊन दुसरा जो आला तो फारच भला मनुष्य होता. मी कोणी गुन्हेगार नसून फक्त माझ्या भाईबंदांकरितां जेलमध्यें आलों आहें हें कळतांच त्याला फार आनंद झाला. कारण स्वतःच्या देशाबद्दल त्याला फार अभिमान होता. व तसाच दुसऱ्यांत पाहून त्याला फार आनंद वाटला व म्हणून तो माझ्याशीं फार प्रेमानें वागत असे."

अशा तऱ्हेनें तुरुंगांत रहात असतां महात्मा गांधींना मिसेस पीले यांच्या खटल्यांत साक्षी देण्यास जावें लागलें तेव्हां रस्त्यावरून त्यांनां हातकड्या घालून नेण्यात आलें. जणुं काय हे एक मोठे दरवडेखोर असावे! खरें पाहूं जातां सत्याग्रही लोकांना अशा तऱ्हेनें वागविण्याची कांहीं गरज नव्हती. कारण त्यांनीं जो मार्ग स्वीकारिला होता तो विनवणीचे सर्व मार्ग खुंटल्यावर स्वीकारला होता. या चळवळींत सामील झालेले लोक घरचे श्रीमान्, मोठे विद्वान् अशा पेशाचे असल्यामुळें अधिकाऱ्यांनीं ह्या लोकांना एकाद्या दरवडेखोर अगर भयंकर चोराप्रमाणें वागवावयाचें नव्हतें. पण त्या लोकांना कुठली दयामाया असावयाची! हिंदी लोक म्हणजे कोणी तरी जंगली प्राणी आहेत असा यांचा ग्रह झालेला असल्यामुळें ह्या लोकांनीं त्यांच्याच्यानें होईल तितक्या निर्दयतेनें वागवून घेतलें. ह्या तीन महिन्यांच्या बंदीवासांत महात्मा गांधींनीं सुमारें तीस पुस्तकें वाचून काढलीं. त्यांपैकीं मुख्य म्हणजे टॉलस्टॉय, इमर्सन, कार्लाईल वगैरेंचे ग्रंथ होत. गांधी आपल्या जेलच्या अनुभवांत पुढें म्हणतात कीं 'जेलमध्यें मनुष्य राहून आला म्हणजे खरी देशभक्ति त्याच्यांत उत्पन्न होते. व तो जबर सत्याग्रही बनतो. व अशा तऱ्हेनें थोडासा स्वतःला त्रास भोगावा

लागला तरी त्याच्याबद्दल बराच मोबदला मिळत असल्यामुळें मला हा बंदीवास एका तऱ्हेनें सुखकरच वाटला.' साधु पुरुषाला कोठेंही राहिलें तरी सुखावहच वाटावयाचें! अशा देशभक्ताच्या वास्तव्यानें तुरुंग देखील नंदनवन बनल्यास नवल काय? असो.

इकडे सत्याग्रहाच्या चळवळीचा जय दिसूं लागला. तीन पाउंडांचा कर उठून मुदतबंदीशिवाय येणाऱ्या लोकांना देखील नाताळमध्यें राहण्याची मोकळीक मिळाली. हा जय मिळण्यास अँड्र्यूज व पियरसन यांनीं देखील पुष्कळ मेहेनत घेतली. पण मुख्यत्वेंकरून हा जय मिळण्यास सत्याग्रहाचे द्रष्टे व उपदेष्टे महात्मा गांधी हेच कारणीभूत झाले, असें प्रत्येकाच्या तोंडून निघत होतें. अर्थात् लोकांची एकी व आपल्या पुढाऱ्यांवर असलेला पूर्ण भरंवसा देखील बहुत अंशीं कारणीभूत झाला. मिस्टर गोखल्यांचे प्रयत्न देखील प्रशंसनीय होत. मिस्टर गांधींना ज्या वेळीं संपवाल्यांमधून पकडून नेण्यांत आलें, त्या वेळीं त्यांनीं कोर्टांत जें एक भाषण केलें त्यांत ते ह्मणाले:—"लोकांना संप करण्याचा उपदेश करण्यापूर्वी जेवढे ह्मणून कायदेशीर प्रयत्न होते तेवढे मीं करून पाहिले. पण युनियन सरकार जेव्हां मुळींच लक्ष देईना तेव्हां मला सत्याग्रहाशिवाय दुसरा निर्दोष मार्ग सुचेना. व ह्मणूनच, शेवटचा मार्ग ह्मणून मी आपल्या लोकांना हा उपदेश केला. ह्या चळवळीशीं तीन पाउंडाच्या डोईपट्टीशिवाय दुसरा कसलाही संबंध नव्हता. हा अन्याय केवळ मजूर लोकांवरच होत असल्यामुळें ते बहुतेक ह्या सत्याग्रहाच्या चळवळींत सामील झाले. हा वणवा केवळ कोळशांच्या खाणींतच पेटून राहिला नाहीं, तर तो नाताळमध्यें साखरेच्या शेतावरील मजूर लोकांत पसरला. त्या मजूर लोकांच्या मालकांनीं ह्या त्यांच्या अपराधाबद्दल कांहीं जणांना गोळ्या घालून ठार देखील मारलें, मीं माझ्या बांधवांनां त्यांच्यावर होत असलेला जुलूम नाहींसा करण्याचा सुलभ उपाय दाखवून दिला आणि हा गुन्हा केल्याबद्दल शिक्षेस पात्र झालों आहें! आपल्याला जी शिक्षा द्यावयाची असेल ती मी मोठ्या आनंदानें भोगण्यास तयार आहें." अशा तऱ्हेचें भाषण करून महात्मा गांधी शांत चित्तानें व गंभीर चेहेऱ्यानें आपल्या वार्डरबरोबर चालते झाले.

साऊथ आफ्रिकेमधील हिंदी लोकांना या सत्याग्रहाच्या चळवळीपासून कितीतरी शिक्षण मिळालें. त्यांच्यामध्यें एकी उत्पन्न झाली, त्यांची वृत्ति 'वसुधैव कुटुम्बकम्' झाली, कोणत्याही देशकार्यांत ते सामील होण्यास तयार झाले. जनहितापुढें स्वार्थाचें

वारें केव्हांच नाहींसें झालें. तुरुंगवास भोगून आल्यामुळें वाटेल तितके कष्ट सहन करण्याची पात्रता अंगांत आली. व आपण जनावरें नसून मनुष्यप्राणी आहोंत ही जाणीव भासूं लागली. अशा तऱ्हेनें हजारों लोकांना सद्गुणी आणि कार्यक्षम बनविण्याला समर्थ अशा व्यक्ति जर हिंदुस्थानांत थोड्याशाहि निर्माण होतील तरच आपल्या उन्नतीची कांहीं आशा आहे.]

[आफ्रिकेंतील हिन्दी लोकांनीं आपल्या करितांच केवळ स्वार्थत्याग केला नाहीं, परंतु पुढें होणाऱ्या भावी संततीला एक उत्तम उदाहरण घालून दिलें. व अशा तऱ्हेनें आपल्या कीर्तीच्या धवल पताका सर्व हिंदुस्थानांत–हिंदुस्थानांतच नव्हे, परंतु इतर देशांतही फडकावल्या. आपल्या देशबांधवांची लाज राखण्याकरितां किंवा त्यांची मनुष्यांत गणना करून घेण्याकरितां एक व्यक्ति देखील काय करूं शकते हें महात्मा गांधींच्या एका उदाहरणावरून सिद्ध होतें.]

ह्या सत्याग्रहाच्या चळवळींत आपल्या सर्वस्वाचा होम करणाऱ्यांपैकीं एका स्त्रीविषयीं व आणखी तीन व्यक्तींविषयीं थोडेसें लिहिलें पाहिजे. बिचारी वालिआमा केवळ एक अठरा वर्षांची मुलगी होती. ती बंदींत गेली तेव्हां तिला आपण मोठा स्वार्थत्याग करीत आहों, त्याची मुळींच जाणीव नव्हती. व पुढें हिंदी स्त्रियांना आपण एक आदर्शभूत रत्न होऊं हेंहि तिला ठाऊक नव्हतें. तरी इतर स्त्रियांबरोबर, स्वभाव म्हणूनच तीं जेलमध्यें गेली. तेथील हालअपेष्टा आनंदानें सोसून शेवटीं हें पापी जग सोडून चालती झाली! जर मृत्यूनंतर पुण्यात्म्यांना स्वर्ग मिळत असेल तर तो आमच्या वालिआमाला व आमच्या दुसऱ्या दोघां वीरबंधूंना मिळालाच पाहिजे. या वीरांपैकीं एकाचें नांव नागापन. हा तुरुंगांतून सुटून आल्याबरोबर थोडेच दिवसांत मृत्युमुखीं पडला. दुसरे एक बंधु मजूर वर्गापैकीं होते. ह्यांचें वय ७५ वर्षांचें होतें. महात्मा गांधींनीं यांना 'तुम्हीं आपल्या वृद्धावस्थेंत तुरुंगांत येण्याचें कां धाडस केलें' असा प्रश्न एकदां विचारला. प्रश्न ऐकतांच ह्या म्हाताऱ्याला मोठा अचंबा वाटला. तो म्हणाला, आपल्याला तीन पाऊंडांची डोईपट्टी द्यावी लागत नसूनही जर आपण आपल्या बांधवांकरितां इतके श्रम करून हालअपेष्टा भोगतां तर माझ्यासारख्या मनुष्यानें घरांत आराम करीत पडणें हें केवळ मूर्खपणाचें होय. माझें शरीर आतां केव्हां तरी पडणारच; मग तें माझ्या देशबांधवांच्या करितां श्रम करीत असतांना कामीं आल्यास मी मला

मोठा भाग्यवानच समजेन. स्वतःच्या इच्छेनुसार हे गृहस्थ डरवानच्या तुरुंगांतच परलोकवासी झाले ! अशा तऱ्हेनें मृत्यु येण्यास देखील पूर्वसंचित लागतें. असे ह्या सर्व हालअपेष्टांचा शेवट गोड लागल्यामुळें सर्वच गोड झालें.

[ह्या जंगी चळवळीमुळें मुख्य तीन फायदे झाले. एक तीन पाउंडांची डोईपट्टी उठणें, लग्नासंबंधीं कायदा रद्द होणें व आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांना जाण्याची मुभा मिळणें. ह्या तीन गोष्टी मिळाल्यामुळें प्रत्येक हिंदी मनुष्य सत्याग्रहाच्या चळवळीला दुवा देऊं लागला.] व ती उत्पन्न करण्याबद्दल तिच्या उत्पादकाला शतशः आशीर्वाद देऊं लागला. सर्व हिंदी लोक अशा तऱ्हेनें आनंदसागरांत गढून गेले असतानां त्यांचा पुढारी, मार्गदर्शक, सुखदुःखांत त्यांच्याबरोबर सारखा भाग घेणारा व सदोदित त्यांना सुरक्षित किनाऱ्यावर पोहोंचविण्याचा प्रयत्न करणारा, किंवा केवळ त्यांचा आत्माच, असे महात्मा गांधी स्वतःच्या मातृभूमींत कायमचे रहाण्यासाठीं येण्यास निघण्याचे तयारीस लागले. ही बातमी ऐकून आफ्रिकेमध्यें बहुतेक सर्व लोक दुःखी व उदास झाले. महात्मा गांधी हिंदुस्थानांत कायमचे रहाण्यास येण्याचें कारण त्यांचें आफ्रिकेंत आतां काम राहिलें नव्हतें असें नसून हिंदुस्थानांत त्यांच्या कामाची अधिक जरूरी होती हें होय, असें म्हटल्यास चालेल. कारण आफ्रिकेमधील लोकांचीं अजून किती तरी गाऱ्हाणीं होतीं व तीं सर्व युनियन गव्हर्मेंटला ऐकावयास लाविण्यास वर्षानुवर्षांची अवधी लागली असती. पण आपलीं दुःखें सरकारकडून निवारण करून घेण्याला सत्याग्रहरूपी रामबाण उपाय आफ्रिकेंतील बांधवांस त्यांनीं सप्रयोग दाखवून दिला असल्यामुळें आतां त्यांना स्वदेशीं परत येण्यास कोणतीच हरकत नव्हती. महात्मा गांधींनीं आपल्या आयुष्याचा उत्तम भाग, तन मन व धनासहित द. आफ्रिकेंतील हिंदी बांधवांस अर्पण केला होता. व अशा तऱ्हेनें आफ्रिकेंतलि लोकांच्या ऋणांतून ते मुक्त झाले होते. आतां मातृभूमीच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां हिंदुस्थानांत येण्याची जरूर होती.]

निघण्याची तयारी होत असतांना मि. गोखले विलायतला फार आजारी आहेत असें कळल्यावरून त्यांनीं एकदम तेथें जाण्याचा विचार केला. अर्थात जातांना किती तरी ठिकाणीं ह्या दंपतीला मेजवान्या देण्यांत आल्या व प्रत्येक ठिकाणीं त्यांनीं आपल्या देशबांधवांना हमेश सत्याला स्मरून राहण्याविषयीं कळ-

कळीचा उपदेश केला. विलायतेकडे प्रयाण करण्याचे पूर्वी फिनीक्स सेटलमेंटमधील आपली सर्व मालमत्ता त्यांनीं तेथील हिंदी बांधवांस अर्पण केली होती व सत्याग्रहाची चळवळ सुरू झाल्यापासून स्वतःच्या कुटुंबासहित अगदीं गरीबीनें रहाण्याचा नियम केला होता. असो.

हीं उभयतां विलायतेस सुखरूप पोंचलीं. तेथें गेल्यावर मि. गोखल्यांची तब्बेत बरी असल्याचें पाहून ह्यांना फार समाधान झालें. त्यावेळीं हल्लींचें महायुद्ध सुरू झालेलें असल्यामुळें म. गांधी यांनीं इंग्रज सरकारला मदत करण्याच्या इरादानें एक अँब्युलन्स कोर स्थापन केलें. व त्यांत स्वतःचें व आपल्या पत्नीचें नांव दाखल केलें. पण ह्या वेळीं ही कामगिरी त्यांच्या हातून पार पडावयाची नव्हती ! कारण वर्षा दोन वर्षांपासून सारखे परिश्रम करीत असल्यामुळें त्यांच्या शरीरानें अशा तऱ्हेनें सक्तीनें विसावा घेण्याचें ठरविलें. त्यांची प्रकृति एकाएकीं बिघडली. व तेथील डॉक्टरांनीं त्यांना एकदम हिंदुस्थानांत जाण्याची सल्ला दिली; यामुळें प्रकृतीला थोडेंसें बरें वाटतांच ते हिंदुस्थांत निघून आले. मुंबईस पोहोंचतांच येथील लोकांनीं त्यांचें प्रेमानें स्वागत केलें. हिंदु मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, जहाल मवाळ, सुधारक आणि पुराणप्रिय, सरकारी अधिकारी आणि प्रजापक्षीय पुढारी, सर्वांनीं त्यांचा यथोचित सन्मान केला. खुद्द हिंदुस्थान सरकारनेंहि त्यांना 'कैसर-इ-हिंद' सुवर्णपदक अर्पण करून त्यांच्या गुणांचा गौरव केला, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. कारण अलीकडे गुणी माणसाची पारख फारच थोडी होत असलेली आढळून येते. या सुमारास एक गोष्ट मात्र फार दुःखाची घडली. ती ही कीं म. गांधी यांचे गुरु व प्रसिद्ध 'भारत सेवक' ना. गोखले हे निर्घृण कालाच्या भक्ष्यस्थानीं पडले ! ज्यांच्या प्रेमळ आशीर्वादावर, मधुर प्रोत्साहनावर आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गदर्शनावर गांधींची सर्व भिस्त तेच गोपाळराव नाहींसे झाल्यानें त्यांचें मन खिन्न आणि कांहींसें निराश झालें यांत नवल नाहीं. ना. गोखले यांच्या मनांत गांधी यांनीं आपल्या 'समाजांत' दाखल व्हावें, व आपल्या आध्यात्मिक तेजाचा संचार समाजांतील इतर मंडळींत करावा असें फार होतें, व गांधी यांनाहि गोखले यांच्या निरंतर सान्निध्यांत राहून गुरुसेवा व देशसेवा अखंड करून कृतार्थ व्हावें अशी उत्कट इच्छा होती, पण गोखले यांचे पाठीमागें ती गोष्ट शक्य झाली नाहीं. फक्त एकच इषारा कै. गोखले यांनीं म. गांधी यांस खास दिला होताः—

महात्मा गांधी यांनीं आफ्रिकेंत असतांना 'हिंद स्वराज्य' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें. त्यांतील विचारसरणी फारच सणसणीत व कडक असून कित्येक ठिकाणीं चुकीची व अपरिपक्कहि आहे असें मिस्टर गोखले यांना वाटल्या-मुळें त्यांनीं महात्मा गांधींना निदान एक वर्षपर्यंत सार्वजनिक चळवळींत प्रत्यक्ष भाग न घेतां हिंदुस्थानच्या स्थितीचें बारकाईनें अवलोकन करण्यांत, निरनिराळ्या पुढाऱ्यांशीं परिचय करून घेण्यांत व त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यांत घालवि-ण्याची सल्ला दिली होती. आपल्या गुरूचा हा अखेरचा उपदेश म. गांधी यांनीं अनन्यभावानें पाळला, व तसें केल्यानें आपल्याला फारच लाभ झाला असें त्यांचें मत आहे. असो.

पहिले तीन चार महिने हिंदुस्थानांतील प्रसिद्ध स्थळें पाहिल्यानंतर व कित्येक पुढारी आणि मित्रवर्गाच्या भेटी घेतल्यानंतर कायमचें राहण्यासाठीं त्यांनीं अमदाबाद शहर पसंत केलें व तेथें सत्याग्रह नांवाचा एक आश्रम त्यांनीं स्थापन केला.

ह्या आश्रमाचा मुख्य हेतु देशसेवा हा होय. दुसरा सत्यानें नेहमीं वागणें. मग त्याच्यामध्यें जरी मातापित्यांची आज्ञा मोडण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर. ह्याला प्रल्हादाचें उदाहरण देण्यांत आलें आहे. देशकल्याणाकरितां देखील खोटें बोलण्याचें पाप करितां कामा नये. तिसरा नियम अहिंसा म्हणजे प्राणिमात्राला न मारणें हा होय. पण ह्याशिवाय दुसरा आणखीं अर्थ घेतला आहे. तो असा कीं एकादा मनुष्य जरी अन्यायानें वर्तन करीत असला तरी त्याला शिक्षा न करणें व त्याच्यावर न रागावतां उलट प्रेम करणें व अशा तऱ्हेनें मातापित्यांपासून अगर राजापासून होत असलेला त्रास निमुटपणें सहन करण्यास शिकणें. ह्या नियमाचें पालन करणारानें आपला छळ करणारांना प्रेमानें जिंकिलें पाहिजे. याचा अर्थ असा होत नाहीं कीं सदोदित छळ करणाऱ्याच्या लहरीप्रमाणें वागलें पाहिजे. जर त्याच्या मर्जीविरुद्ध जाण्याचा प्रसंग आला तर स्वतःला मरणापर्यंत दुःख भोगावें लागलें तरी तें भोगण्यास तयार व्हावें. व अशा तऱ्हेनें आपला छळ करणारावर जय मिळवावा.

चौथा नियम ब्रह्मचर्य. हें इतक्या कडक तऱ्हेनें पाळिलें पाहिजे कीं लग्न झालेल्या आश्रमवासी यानें आपल्या स्त्रीशीं एकाद्या मित्राप्रमाणें वर्तन ठेविलें

पाहिजे. कारण कडक ब्रह्मचर्याशिवाय कोणतीहि विकट गोष्ट करणें दुर्घट होईल. पांचवा नियम आश्रमवासी यांनीं हळुहळु जिभेची रुचि सोडून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचे शरीररक्षणार्थ जेवढें खाणें जरूर आहे तेवढेंच खाऊन रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व तामसी वृत्ति बनविणारे पदार्थ अगदीं वर्ज करून टाकले पाहिजेत. सहावा नियम चोरी न करणें म्हणजे दुसऱ्याची वस्तु न चोरणें हेंच नसून आपल्या जरूरीच्या वस्तूशिवाय अधिक वस्तू वापरणें ही देखील एक प्रकारची चोरी होय. सातवा नियम जरूर तेवढ्या वस्तूशिवाय जास्त वस्तूंचा संग्रह न करणें. असो, अशा प्रकारचीं अनेक बंधनें आश्रमवासीयांला घातलेलीं आहेत.

आश्रमाची स्थापना केल्यानंतर बरेच दिवसपर्यंत महात्माजी सामान्य लोकांच्या दृष्टीनें जवळ जवळ अज्ञातवासांतच होते. गुरुवर्य गोखले यांच्या स्मारक फंडासाठीं काठेवाडांत व इतर कित्येक जागीं फिरणें, इ. स. १९०७ पासून राष्ट्रीय सभेंत पडलेली फूट नाहींशी करण्यासाठीं खटपट करणें, अमदावाद येथील, कामापेक्षां नांवानेंच जीवंत असलेल्या ' गुजराथ सभेच्या ' च्या अध्यक्ष-पदाचा स्वीकार करणें, निरनिराळ्या ठिकाणांहून आग्रहपूर्वक आलेल्या आमंत्रणांचा स्वीकार करून, त्या त्या ठिकाणीं जाऊन आपल्या पवित्र व सात्त्विक उपदेशानें तेथील लहान थोरांचीं मनें भारून टाकणें, नाना पंथांच्या व मतांच्या, राष्ट्रीय व स्थानिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक परिषदांना व सभांना हजर रहाणें, क्वचित् एखाद्या मासिक पुस्तकांत ' मुदतबंदी मजुरी, ' ' अहिंसा, ' ' शिक्षण ' अशा एखाद्या विषयावर लहानसा लेख लिहिणें वगैरे किरकोळ कामें करून ते आपलें अस्तित्व जनतेला जाणवीत असत हें खरें. पण त्यांचें दर्शन हें जनतेला विजेच्या चमकेप्रमाणें क्षणमात्रच होई. बाकी आश्रम हेंच त्यांचें त्या वेळचें खरें कार्यक्षेत्र होतें. आश्रम स्थापितांना होतां होई तों पाठीमागें–कोपऱ्यांत–दडी मारून बसण्याचीच त्यांची इच्छा होती. आश्रमाची नियमावलि त्यांनीं छापिली होती खरी, पण तीहि मित्रवर्गाच्या टीका मागविण्याच्या हेतूनें व आश्रमांत राहूं इच्छिणाऱ्या विद्या-र्थ्यांच्या स्थूल माहितीसाठींच ' खासगी ' म्हणून छापिली होती. पुढें कित्येक वर्तमानपत्रकर्त्यांनीं व मासिक पुस्तककर्त्यांनीं चुकीनें किंवा लोकांना माहिती

व्हावी या सद्धेतूनेंच पण परवानगी न विचारितांच, ती छापून काढिली. बाकी गांधी यांचे मनांतून तिचा गाजावाजा होऊं नये असेंच होतें. असो. आश्रम स्थापन केला तरी गांधी हे कांहीं 'महंत' होऊन बसले नाहींत. आणि चेल्यांना त्यांनीं आपली 'पादसेवन भक्ति' करावयास लाविलें नाहीं; किंवा आसन घालून प्राणायाम करीत बसले नाहींत. सकाळीं चार वाजतांच सर्वांबरोबर किंवा थोडें अगोदरच उठून तास दीड तास पर्यंत आश्रमाच्या उपयोगासाठीं लागणारें पीठ इतर विद्यार्थ्यांच्या बरोबर दळून तयार करावें, उजाडण्याच्या अगोदर नियमानें थंड पाण्याचें स्नान करून, ईशप्रार्थना वगैरे आटोपून सर्व मुलांस खावयास द्यावें, दूरच्या विहिरीवरून पाणी आणण्यास लागावें, शाळेंत कोमल अर्भकांशीं खेळत खेळत त्यांना संस्कृत, अंकगणित, वगैरे विषयांची गोडी लावून द्यावी, स्वयंपाकघरांत कधीं अडचण असल्यास तेथें धावून जाऊन भाजी चिरीत किंवा भाकऱ्या भाजीत व त्याच बरोबर स्वतःची छातीहि भाजीत उभें रहावें. ( आश्रमांतील चुली उभ्या–युरोपियन पद्धतीच्या असत. ) दहा वाजले कीं सर्व छोट्या वड्या मंडळींना स्वतः जातीनें वाढावें, व मग स्वतः खावें, टपालांतून आलेल्या पत्रांना कशींवशीं उत्तरें लिहून टाकावीं, वर्तमानपत्रांतील एकादा खास लेख कोणीं नजरेस आणिलाच तर त्याच्यावर नजर फिरवावी, हात मागावर बसून टूवाल विणावे, सकाळ सायंकाळ प्रार्थनेचे वेळीं कधीं जैन साधु राजचंद्र यांचें 'तत्त्वज्ञान' तर कधीं तुळशीदासजींचें रामायण, कधीं रामदासांचे मनाचे श्लोक तर कधीं "Imitation of Christ" यांतील थोडासा भाग घेऊन प्रवचन करावें, फार क्वचित् स्वयंस्फूर्तीनेंच स्वतःच्या प्रवासांतील एकाद्या बोधपर प्रसंगाचें वर्णन करावें, आश्रमांतील मंडळींच्या वर्तनांत किंवा कार्यांत कांहीं चूक आढळल्यास तिच्याबद्दल त्यांची कानउघाडणी करून त्यांना नाजुक इषारा द्यावा, व ही दैनिक कार्यपरंपरा आटोपल्यावर बालगोपालांस बरोबर घेऊन मैल दीड मैलपर्यंत बोलत बोलत व हंसत खेळत फिरावयास जावें. आश्रमांत कोणी पाहुणा वगैरे आला तर, किंवा मुद्दाम भेटण्यासाठीं कोणी आला असेल तर, त्याचे बरोबर व तोहि बहुधा आश्रमाच्या नियमांविषयीं वादविवाद करावा व शेवटीं दहांचे सुमारास थकलें भागलेलें तें शरीर, उघड्या पडवींत पसरलेल्या पथारीवर आणि त्या लाकडी उशीवर टाकून द्यावें, हा त्यांचा कार्यक्रम होता; ही त्यांची तपश्चर्या होती, पुढें करावयाच्या

देशसेवेच्या व्यापाराचें हें भांडवल होतें. ज्याला खरी देशसेवा करणें असेल, उन्नत होणें असेल त्यानें आपली वृत्ति किती नम्र, किती लीन, किती सेवातत्पर बनविली पाहिजे याचें त्यांनीं आपल्या घरच्या (आश्रमाच्या) मंडळीला दिलेलें हें शिक्षण होतें. कॉलेजांतील कांहीं विद्यार्थ्यांच्या व शहरांतील इतर कांहीं गृहस्थांच्या विनंतीवरून दर रविवारीं एकादा इंग्रजी ग्रंथ आधारभूत ठेवून ते आपलीं तत्त्वें त्यांस समजावून सांगत असत. अशा प्रकारें प्रसिद्ध अमेरिकन ग्रंथकार थॉरो यांचीं " Duty of Civil Disobedience " व " Life without Principle " हीं दोन छोटींच पण अति महत्त्वाचीं पुस्तकें त्यांनीं वाचून दाखविलीं. त्यांच्या या पडद्या पाठीमागच्या तयारीचें रहस्य ज्यांना समजलें नाहीं अशा कित्येक अहंमन्य उतावळ्यांनीं ' शिशुशिक्षणाचें दळण ' म्हणून त्यांच्या ह्या कार्याचा उपहासहि करण्यास सुरुवात केली ! या टीकाकारांनाहि दोष देतां येत नाहीं. कारण विचाऱ्यांनीं गांधींचें आफ्रिकेंतील अपूर्व कार्य ऐकून त्यांच्याविषयीं कांहीं विचित्र कल्पना करून ठेविल्या होत्या. हिंदुस्थानांत पाऊल ठेविल्याबरोबर हे आपलें रणशिंग फुंकूं लागतील अशी त्यांना उमेद होती. तिच्या विपरीत भासणारें हें त्यांचें आचरण पाहून त्यांची नाउमेद झाली. पुष्कळांनीं तर आपल्याशीं असें ठरवून टाकिलें कीं यांचें आफ्रिकेंत चाललें म्हणून येथें थोडेंच चालणार आहे ! तेथील सरकार वेगळें, तेथील हिंदी लोक थोडेसे, भोळे व अशिक्षित. व पुढारीहि हे एकटेच; उलट येथील सरकार ' सुधारलेलें ', येथील समाजांत बुद्धिमान् व सुशिक्षित लोकांचाहि भरणा बराच, आणि पुढारीहि येथें एकापेक्षां एक पडलेले आहेत; तेव्हां अशा ठिकाणीं गांधींची डाळ शिजणें फार कठीण आहे, असें कित्येक लोकांना वाटत असे. कित्येकांची तर अशीहि खात्री झाली कीं, पश्चिमेकडील देशांत असतांना 'देशभक्त' म्हणून गाजलेले बरेच हिंदी लोक जसे हिंदुस्थानांत आले म्हणजे विधवांचा विवाह, गटारांची सफाई, किंवा अंत्यजचा उद्धार यांतच आपल्या देशसेवेची परिसमाप्ति करून राजा व प्रजा या दोघांनाहि प्रिय होतात त्यांपैकींच गांधी हेहि एक होणार ! पण लोकांच्या गैरसमजाचे व अज्ञानाचे हे मेघ किती दिवस टिकणार ? असो.

वर सांगितलेल्या अज्ञातवासाच्या या काळांतहि म. गांधी यांनीं कित्येक स्फूर्तिदायक व ज्ञानवर्धक व्याख्यानें दिलीं पण ज्या व्याख्यानामुळें सर्व हिंदुस्थानचें

लक्ष त्यांनीं वेधून घेतलें, तें व्याख्यान म्हणजे बनारस येथील ' हिंदु युनिव्ह-सिटी ' च्या कोणशिला समारंभाचे वेळीं झालेलें होय. जनसमूह, बेझंट सारखे पुढारी लोक, राजेमहाराजे, विद्यार्थी, पोलीस व सरकारी अधिकारी वगैरे तेथें हजर असलेल्या सवांच्या चुका त्यांच्या पदरांत घालून गांधी यांनीं एक वर्षपर्यंत निर्भयता सत्य व स्पष्टवक्तेपणा यांचा जो सर्वत्र उपदेश केला होता, ते गुण स्वतःत असल्याचा प्रत्यय त्यांनीं या व्याख्यानानें आणून दिला. ह्या भाषणाचा रोंख न समजल्यामुळें कित्येक लोक हें भाषण राजद्रोही आहे असें समजून भाषण चाललें असतांना उठून गेले! त्यांचें हें करणें किती अदूर-दर्शित्वाचें होतें हें पुढें भाषणाविषयीं खुलासा झाला तेव्हां कळून आलें. समजा, हें भाषण राजद्रोही होतें तर त्याची व्यवस्था करण्यास आमचें सरकार सदैव डोळ्यांत तेल घालून तत्पर असतें, हें महशूरच आहे. मग ह्या लोकांनीं अशा तऱ्हेचें वर्तन करून आपल्या एका पुढाऱ्याचा अपमान करण्याचें पातक उगाच कां बरें घेतलें? महात्मा गांधींनीं अजूनपर्यंत कोणतेंच राजद्रोहाचें कृत्य केलें नाहीं व पुढेंही त्यांच्यासारख्या व्यक्तीच्या हातून असलें कृत्य घडून येणें शक्य नाहीं, हें कोणीही समंजस मनुष्य कबुल करील.

महात्माजींची हिंदुस्थानांतील दुसरी प्रसिद्ध अशी कामगिरी म्हणजे हिंदुस्था-नभर आज महशूर झालेले कर्टिससाहेब यांनीं खासगी म्हणून लिहिलेलें एक पत्र उघडकीस आणणें ही होय. हें पत्र कर्टिस यांनीं आपल्या ' राउंडटेबल ' संस्थेच्या सर्व सभासदांस सेक्रेटरी या नात्यानें लिहिलेलें होतें. दैवयोगानें तें महात्माजीं-सारख्या निधड्या छातीच्या पुढाऱ्याच्या हातीं येऊन पडल्यामुळेंच तें प्रसिद्ध झालें. या पत्रामधील मुख्य मुद्दा म्हणजे हिंदुस्थानच्या राज्यकारभारामध्यें इंग्लंडबरोबरच वसाहतवाल्यांचीहि हुकमत चालली पाहिजे हें ठसविण्याचा होता. हा मुद्दा हिंदी लोकांना किती जाचक झाला असता हें वर्णन करणें कठीण होय. कारण हिंदुस्थान वसाहतवाल्यांच्याच बरोबरीचे हक्क मागण्याच्या तयारींत अस-तांना कांहीं बड्या इंग्रज ' साम्राज्याभिमानी ' म्हणविणाऱ्या गृहस्थांनीं त्याला वसाहतवाल्यांचाहि गुलाम बनविण्याचीं खलबतें चालविलीं आहेत हें जाणून को-णहि न्यायी मनुष्यास चीड आल्यावांचून रहाणें अशक्य होय. आणि हें पत्र

जगजाहीर करण्याचा मान लखनौच्या राष्ट्रीय सभेसारखी सुसंधि साधून पोलाक सारख्या एका कट्या इंग्रजानेंच पटकावला !

कर्टिससाहेबांचें हें ' खासगी ' पत्र वाचून, तपासून व सुधारून द्यावयाला हिंदुस्थानचें वाटोळें करण्यास हात धुवून लागलेले ' वाटोळ्या टेबला'चे, चिरोल-सारखे सभासद होते हें पाहून अर्थातच कोणाला नवल वाटलें नाहीं; पण आपल्याच प्रान्ताचे गव्हरनर मि. मेस्टन व इन्स्पेक्टर जनरल मि. मॉरिस हेहि या कटांत सामील असलेले पाहून हिंदी पुढारी आश्चर्यचकितच झाले, व राष्ट्रीय सभेमधील स्वराज्याच्या ठरावाला सहाजिकच दुप्पट जोर आला. कर्टिस साहेबांची ओळख हिंदुस्थानच्या लोकांना त्यांच्या ह्या गुप्त खलित्यानेंच प्रथम करून दिली होती अशांतला प्रकार नाहीं. त्यांनीं त्यापूर्वीच एकदोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं असून त्यांत त्यांनीं हिंदी लोकांना अज्ञानी मुलांच्या अर्थात् स्वराज्याच्या अधिकारास अयोग्य अशा लोकांच्या पंक्तीस बसविलें आहे. " हिंदी लोकांच्या चालीरीति, त्यांची पूर्वपरंपरा, त्यांचें ध्येय हीं सर्व त्यांना स्वातंत्र्योपभोग अपात्र ठरविणारीं आहेत; त्या सर्वांवरून नांगर फिरेल, व पाश्चात्य चालीरीति व ध्येयें हीं त्यांचे अंगीं ठसतील तेव्हांच त्यांनीं स्वराज्याचे अधिकार मागावे तोंपर्यंत स्वातंत्र्यसुख भोगणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांच्या पायरीस पाय लावण्याचें धाडस त्यांनीं करूं नये. हिंदुस्थानास प्रतिनिधिक संस्था आज देणें म्हणजे अराजकता निर्माण करण्यासारखें आहे " वगैरे सिद्धान्त त्यांनीं प्रतिपादन केले होते. व अशा तऱ्हेनें ते लेखनद्वारा हिंदी लोकांच्या परिचयाचे झाले होते. परंतु म. गांधी यांच्याशीं किंवा मिस्टर पोलाक यांच्याशीं तर यांचा संबंध विशेष निकट होता. कारण ज्या आशियाटिक कायद्याच्या बाबतींत आफ्रिकेमध्यें गांधी यांना दीर्घ कालपर्यंत झुंजावें लागलें त्याचे जनक हेच कर्टिस साहेब होत. आफ्रिकेंतील त्यांच्या प्रतिपक्षाची ही जोडी कर्टिस साहेबांच्या दुर्दैवानें येथेंहि दत्त म्हणून उभी राहिल्यामुळें हिंदुस्थानच्या ' घराखालीं सुरुंग ' लावण्याचे हे त्यांचे बेत मुळांतच ढांसळल्यासारखे झाले. आणि आतां कर्टिस साहेब हे बरेच शहाणे झाले आहेत असें त्यांनीं मागाहून हिंदुस्थानांतील लोकांना लिहिलेल्या खुल्या पत्रावरून तरी वाटतें. अलीकडे अलीकडे तर ते हिंदी लोकांच्या आकांक्षांना इतके अनुकूल झाले आहेत कीं, हिंदी पुढाऱ्यांनीं

तयार केलेला स्वराज्याचा मसुदाहि त्यांना अपुरासा वाटूं लागला आहे. आणि आपली स्वतंत्र अशी एक स्वराज्याची योजना त्यांनीं पुढें मांडिली आहे. ती अशी कीं, " प्रांतिक सरकारच्या हातचीं शेतकी, प्राथमिक शिक्षण, रस्तेदुरुस्ती असलीं कांहीं विनभानगडीचीं खातीं पूर्णपणें लोकनियुक्त कौन्सिलकडे प्रथमारंभीं सोंपवावीं आणि पांच सात वर्षांच्या अनुभवावरून तीं त्यांना झेंपतात असें दिसतांच त्याहून महत्त्वाचीं खातीं त्यांच्या हवालीं करावींत. अशा क्रमाक्रमानें तीन चार हप्त्यांनीं अखेरचीं पोलीस, तुरुंग, कोर्टें हीं खातींहि कायदेकौन्सिलाच्या अंकित झालीं म्हणजे प्रान्तिक स्वराज्य पूर्ण झालें. अशाच परंपरेनें बहुतेक सर्व प्रांतांतून स्वराज्य अंकित झालें म्हणजे शेवटचा गोड घांस म्हणून वरिष्ठ सरकारच्या हातची संपूर्ण सत्ता लोकनियुक्त कायदेमंडळाच्या हातीं येईल आणि स्वराज्यमंदिरावर कळस चढेल. " कर्टिस साहेबांसारखे लोक खरोखर सद्धेतूनेंच आमच्या बऱ्यासाठीं खटपट करूं लागले असले तरी हिंदी लोकांनीं अवश्य तेथें त्यांच्या मदतीचा आभारपूर्वक स्वीकार करून " जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला" या समर्थांच्या उपदेशाप्रमाणेंच वागावें हें बरें.

कर्टिस साहेबांच्या पत्रामुळें झालेली खळबळ कांहींशी शांत होत आहे तोंच हिंदुस्थानांत फिजी बेटांतील मुदतबंदी मजुरांविषयींचा प्रश्न उपस्थित झाला.

## फिजी प्रकरण.

१९०८ च्या एमिग्रेशनच्या कायद्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांच्या कपाळीं सवाई गुलामगिरी आली. पूर्वी पश्चिमेकडील देशांत जी गुलामगिरी होती व जिचा नायनाट केल्याबद्दल आमचे इंग्रज बंधु शेखी मिरवीत असतात ती आजच्या तिच्या सुधारलेल्या आवृत्तीपेक्षां पुष्कळ बरी होती; कारण पूर्वीच्या पद्धतींत गुलाम म्हणजे धन्याची मालमत्ता होत असे. यामुळें धनी आपल्या घोड्याची ज्याप्रमाणें निगा राखतो, त्याप्रमाणें गुलामाची राखी; त्याच्याशीं प्रेमानें वागे, त्यानें काम चांगलें व अधिक करावें किंवा विकल्यास त्याला पुष्कळ किंमत यावी म्हणून गुलामाच्या अवश्य सुखांकडे तो लक्ष देई व म्हातारपणीं तरी गुलामाला

कांहींसा आराम धन्याच्या घरांतच राहून मिळत असे. त्या पद्धतींतील दोप हा होता कीं मनुष्याला पशूप्रमाणें वागवीत. पण हल्लींचा मुदतबंदी गुलाम ह्या कांहीं काळ कर्जाऊ घेतल्यासारखा ! पुढें त्याचें काय होईल याची धन्याला परवा नसते. तो त्याला पांच वर्षांच्या मुदतींत जितका पिळून काढवेल तितका काढतो, व शेवटीं निस्सत्व होऊन तो तेथेंच मरून जातो. परत बहुधा कोणी येत नाहीं. मनुष्य १८ वर्षांचा झाल्याशिवाय तो वयांत आला नाहीं असें आमचें सरकार समजतें. पण मुदतबंदीच्या करारावर सही किंवा ठसा करून मग न जाणारा १६ वर्षांचा मुलगाहि गुन्हेगार ठरतो. त्या बाबतींत १६ वर्षांचें वय पुरे होतें! मजुरांना लिहितां वाचतां येत नसतें, त्यांनां वाटेल तशा थापा देऊन मळेवाल्यांचे एजंट फसवून नेतात. तेथें नाना तऱ्हेनें त्यांजवर जुलूम करतात. मजुर म्हणून अशा तऱ्हेनें गेलेल्या लोकांतील प्रमाण सरासरी तीन पुरुषांस एक स्त्री असें पडतें. पण कांहीं लोक सहकुटुंब गेलेले असतात व कांहीं तेथें लग्नें करितात यामुळें अविवाहित स्त्रीपुरुषांचें प्रमाण पांच पुरुषांस एक स्त्री असें पडतें. येथून पळवून नेलेल्या विवाहित स्त्रियांसहि तेथें अविवाहितांच्याच सदरांत घालतात. कोणत्याही विवाहित हिंदी स्त्रीस परदेशांत फुसलावून नेऊन तिला तेथें अविवाहित स्त्रीच्या दर्जांत दाखल करणारीं माणसें केवळ नरपशुच होत. व ह्या ठिकाणीं ह्या स्त्रियांची स्थिति केवळ हृदयद्रावकच होय. एकेकाळीं ज्या हिंदुस्तानांत सावित्री सीतेसारख्या महान् पतिव्रता स्त्रिया उत्पन्न झाल्या होत्या, त्याच हिंदुस्थानांतील स्त्रियांची ही शोचनीय स्थिति पाहून हिंदुस्थानांत एखादा प्रळयाग्नि भडकून तें सर्व जळून खाक झालेलें पुरवलें. ज्या देशांतील लोकांना वीतभर पोटाची खळगी भरण्याकरितां परदेशांत गुलाम म्हणून जावें लागतें व आपल्या स्त्रियांच्या अब्रूची होळी करावी लागते, त्या दशावर राज्य करणाऱ्याला देखील ती गोष्ट विशेप भूपणप्रद आहे असें नाहीं. अशा परिस्थितींत रहाणाऱ्या लोकांत स्वाभाविकपणेंच किती अनाचार वाढेल याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. त्यांतहि गोरे मळेवाले व त्यांचे नोकर हे आमच्या स्त्रियांवर कावळ्यांप्रमाणें टपून बसलेले असतातच. अशा अवस्थेंत त्या ठिकाणीं हिंदुस्थानपेक्षां आत्महत्येचें प्रमाण वीसपट व खुनांचें प्रमाण ऐशींपट जास्त असलें तर त्यांत नवल काय ?

ही स्थिति आमच्या सरकारला माहीत नव्हती असें नाहीं, नसल्यास आमच्या लोकनियुक्त सभासदांनीं ती सरकारच्या नजरेस आणली नव्हती असेंहि नाहीं. गोखले, मालवीय वगैरे देशभक्तांनीं ह्या प्रश्नाचा पिच्छा पुरविला होता. ही पद्धति अनीतीला फूस देणारी आहे हेंहि लॉर्ड हार्डंज ह्यांस कबुल होतें. पण तिचें उच्चाटन करण्यासाठीं त्यांनीं ' थोडी ' मुदत मागितली होती. या गोष्टीस एक वर्ष होऊन गेलें तरी ती निर्मूल होण्याचा कांहीं रंग दिसेना. उलट ती अद्यापहि पांच वर्षांपर्यंत चालू राहील अशी खटपट फिजी येथील मळेवाले उघड उघड करीत आहेत आणि हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरी साहेबांचें त्यांस पाठबळ आहे अशी बातमी फिजी येथें प्रत्यक्ष जाऊन आलेल्या अँड्र्यूज साहेबांस कळली. त्यांनीं हिंदी राष्ट्रास वेळींच जागृत केलें, आणि महत्संकटाचा पुढील इषारा दिला. सुदैवानें त्यावेळीं, मुदतबंदी मजुरीचा नायनाट करण्यासाठींच जणु अवतार घेतलेले म० गांधी आणि त्यांचे तानाजी पोलकसाहेब, हे दोघेहि हिंदुस्थानांतच होते. म० गांधी यांनीं पाहिलें कीं गुरुवर्य गोखले यांनीं दिलेली एक वर्षाची मुदत केव्हांच संपून गेली आहे, आणि या वेळीं जर स्वस्थ बसलों किंवा दीर्घसूत्रीपणा केला तर देशघाताच्या पातकाचा भागी होईन. अनेक वर्षांच्या कष्टांचा यत्किंचित् परिहार करण्यासाठीं आणि पुढील कार्याची दिशा शांत चित्तानें आंखण्यासाठीं साबरमती तीरावरील आपल्या आश्रमगुंफेंत पडून राहिलेला हा सिंह खडबडून उठला आणि किंचित्काल धारण केलेलें मौन विसरून गर्जना करीत मैदानांत उतरला. गांधींच्या भाषेंत बोलावयाचें ह्मणजे ते नोकरीवर रुजू झाले.

गांधी, अँड्र्यूज आणि पोलाक यांच्या अश्रांत परिश्रमानें सर्व हिंदुस्थानचें लोकमत या प्रश्नासंबंधानें जागृत झालें. ठिकठिकाणीं सभा भरून सरकारच्या ह्या धोरणाचा सर्वच लोक निषेध करूं लागले. नेहमीं सरकारचीच साथ करणारीं अँग्लो इंडिअन पत्रें व मिशनरी लोक हेहि या वेळीं सरकारवर उलटले. तरी आमचे खंबीर व्हाइसरॉय चेम्सफोर्ड डगमगले नाहींत ! त्यांनीं कौन्सिलांत सांगितलें कीं " ही पद्धति बंद करावयास पाहिजे हें खरें, पण ती कलमाच्या फटकाऱ्यासरशीं आह्मास बंद करतां येणार नाहीं. आम्हांला वसाहतींचाहि थोडासा विचार केला पाहिजे.

मुदतबंदीच्या ऐवजीं दुसरी कोणती पद्धति सुरू करावयाची हेंहि अगोदर ठरवावें लागेल, नाहीं तर वसाहतींची गैरसोय होईल. " जणु काय हिंदी लोक वसाहतवाल्यांची गुलामगिरी करण्याकारितांच जन्मास आले आहेत. आधीं लॉ० हार्डिंज यांनीं सांगितल्याप्रमाणें ' वसाहतींना मजूर पुरविण्यास हिंदुस्थान बांधलेलें नाहीं. व आजच मजूर जाण्याचें बंद झालें तरी आज गेलेले मजूर पांच वर्षे पर्यंत तेथें काम करणारच आहेत. पांच वर्षांत वसाहतवाल्यांस मजुरांची गरज असेल तर त्यांनीं हिंदी लोकांस मान्य होईल अशी पद्धति स्वतः शोधून काढावी, लॉ० चेम्सफोर्ड यांच्या विधानास अशीं समर्पक उत्तरें असलीं तरी सर्वांत मुख्य गोष्ट ही आहे कीं, हा प्रश्न राजकारणाचा, पैशाचा किंवा सोयीचा नसून आमच्या राष्ट्राच्या मानापमानाचा, अब्रूचा , नीतीचा आणि मुलाबाळांच्या हीनदीन स्थितीचा होता. भारतभूमीच्या भालावरील हें दास्यलांछन आम्हाला पुसून टाकावयाचें होतें. आमच्या स्त्रियांच्या पावित्र्याची चाललेली ही कायदेशीर होळी आम्हाला विझवावयाची होती.

आणि आमचे चतुर राज्यकर्ते काय हें जाणत नव्हते ? सरळ विचार करावयाचा म्हटला तर " याच्या पेक्षां कमी वादग्रस्त आणि अधिक सौम्य मागणीच मागणें शक्य नव्हतें. यांत सरकारच्या इभ्रतीला धक्का बसण्याचा संभव नव्हता, यांत राज्यसत्तेला धोका नव्हता, यांत हिंदुस्थानच्या बचावाला कमीपणा येण्यासारखा नव्हता, यांत सरकारला खर्च नव्हता, यांत अधिकारीवर्गाचें नुकसान नव्हतें, यांत जनतेला अधिकारदान नव्हतें, यांत राज्यतंत्राची उलटापालट नव्हती, यांत घातकीपणाची क्रांति नव्हती, यांत कोणाचा वचनभंग नव्हता, यांत धोरणाची पिछेहाट नव्हती, यांत कोणाचा उपमर्दहि नव्हता " आणि हा प्रश्न मूठभर सुशिक्षितांचाही नव्हता; तर अशिक्षित, मूक जनतेचा होता. या सर्व गोष्टी समजत असूनही " पण मग गोऱ्या लोकांच्या उकिरड्यांचे मळे बनवून ते कोण पिकवील ? " या मोहानें ग्रस्त झाल्यामुळें आमच्या सरकारास त्या समजूत असूनहि उमजत नव्हत्या.

अशा कठीण प्रसंगीं सामोपचाराचे युक्तिवाद कधींच फारसे उपयोगी पडत नसतात. निजेचें ढोंग करणाऱ्या सरकारला जागें करण्याला लोकमताच्या हांकाही

पुरेशा होत नाहींत, तर सत्याचा–ज्याला तडजोड ठाऊक नाहीं अशा ( Uncompromising ) सत्याचा–आग्रह धरावा लागतो. " ३१ मेच्या आंत हीनीच मजुरबंदी बंद झालीच पाहिजे " हा निर्वाणींचा संदेश अखेर मुंबई येथिल स्त्रीपुरुषांच्या मुखानें राष्ट्रानें विद्युच्छक्तीनें सरकारला कळविला. या ठरावाच्या पाठीमागें म. गांधींचीच शक्ति होती हें चाणाक्ष वाचकांना सांगावयास नकोच. महात्माजींच्या या ब्रह्मास्त्राचा प्रयोग सिद्ध झाला आणि हिंद संरक्षक कायद्याच्या विचित्र बलानें ही पद्धत सरकारनें ताबडतोब तात्पुरती तरी बंद करून टाकिली.

जातां जातां येथें हेंहि सांगणें अवश्य आहे कीं, आपल्या पातिव्रत्यास कलंक लावणाऱ्या ह्या पद्धतीचें उच्चाटन करण्याचे कामीं हिंदी महिलांनीं आटोकाट प्रयत्न केले, आणि घरांत कोंडून रहाणाऱ्या ह्या अबलांनींहि वेळ येतांच खुद्द व्हाइसरॉयपर्यंत आपल्या डेप्युटेशनच्या द्वारें धांव ठोकली. अशा प्रकारचें हिंदुस्थानांत हें पहिलेंच उदाहरण होय. व हें उदाहरण घडून येण्यास मुळाशीं महात्मा गांधीच होते हें सांगणें न लगे.

असो, आतां महात्माजींच्या सत्याग्रहाला हिंदुस्थानांत ज्या ठिकाणीं खरी खरी सुरवात झाली त्या चंपारण्यासंबंधीं हकिकत देण्यास मी सुरवात करीत आहें.

चंपारण्यामधील महात्माजींची कोर्टांतील जबानी ह्या पुस्तकाचे अगदीं सुरुवातीस देण्याचें कारण महात्माजी हिंदी लोकांच्या पुढें एकाद्या दिव्य ताऱ्याप्रमाणें चंपारण्यांतील जबानीमुळेंच चमकूं लागले, ती जबानी प्रत्येक हिंदी म्हणविणाऱ्या व्यक्तीच्या नजरेसमोर सदोदित चमकत राहून त्यांना अडचणीच्या वेळीं मार्गदर्शक व्हावी हेंच होय. लखनौला १९१६ सालीं कॉंग्रेस झाली. त्या वेळीं चंपारण्यांतील कांहीं मंडळी तेथें गेली होती. व त्यांनीं श्री. गांधी यांस चंपारण्यांत होत असलेल्या जुलमाविषयीं कॉंग्रेसमध्यें तुम्हीं बोला अशी विनंति केली. परंतु मीं स्वतः तेथील स्थितीचें निरीक्षण केल्याशिवाय त्या संबंधांत कांहीं बोलूं शकणार नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. तेव्हां त्या मंडळींनीं महात्माजींना चंपारण्यांत येण्याविषयीं निमंत्रण केलें. व १९१७ एप्रील महिन्यामध्यें प्रथम ते मुझफरपूरला उतरले. तेथें त्यांचें एक भाषण झालें. दोन चार दिवस तेथें राहून मग चंपारण्यामध्यें येण्याचा त्यांचा विचार होता, पण राहून एक

दोन दिवस झाले नाहीं तोंच महात्मा गांधींना चंपारण्यामध्यें येण्याविषयीं मज्जाव करण्यांत येणार आहे अशी बातमी त्यांचे कानावर आली. जर ही गोष्ट खरी ठरली तर चंपारण्यांतील स्थिति आपल्याला पहावयास मिळणें दुर्लभ होईल असा मनांत विचार येतांच त्यांना एक युक्ति सुचली. स्टेशनावर जाऊन प्रथम जी गाडी मोतिहारीला जाईल त्या गाडीनें एकदम मोतीहारीला निघून जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. मोतीहारी हें चंपारण्यामधील एक मुख्य गांव आहे. महात्माजी एकदम मोतिहारीला निघून आले व एका प्रसिद्ध वकिलाच्या घरीं उतरले. एकदम चंपारण्यांत निघून येण्याचें कारण येथील रयतेमध्यें एकदम येऊन पडावयाचें. ( महात्माजींना उंटावरून शेळ्या हांकता येत नाहींत. ) मग सरकारला पाहिजे असल्यास त्यानें खुशाल धरून न्यावें.

महात्माजी मोतीहारीला येऊन पोंचल्याबरोबर स्वतःच्या खाण्यापिण्याकडे मुळींच लक्ष न देतां कोठी कोठीच्या मजुरांत एकदम फिरावयास लागले. इकडे सरकार देखील आपली कामगिरी करण्यास चुकलें नाहींच. मोतीहारीमध्यें आल्याबरोबर तो प्रदेश तावडतोब सोडून जाण्याविषयीं त्यांच्यावर नोटीस बजाविली. असें करण्यांत सरकारी अधिकाऱ्यांनीं खरोखरच घाई केली. व ह्या चुकीचा परिणामहि पुढें त्यांना भोगावा लागलाच. महात्मा गांधी कांहीं चोर अगर दरवडेखोर नव्हते, कीं ज्यांच्या उपदेशानें चंपारण्यामधील रयत एकदम विथरून जाऊन दंगेधोपे करावयास लागेल ! महात्मा गांधींच्या आफ्रिकेंतील कामगिरीकडे ज्यांनीं बारकाईनें पहाण्याचा प्रयत्न केला आहे त्यांना त्यांच्या हातून लोकांना अशी फुस मिळणें असंभवित आहे अशी खात्री झालीच पाहिजे. आफ्रिकेमध्यें लोकांना सत्याग्रह करावयास सांगण्याचे पूर्वी सरकारला आळविण्याचे जेवढे म्हणून प्रयत्न शक्य होते तेवढे करूनहि ज्यावेळीं कांहींच फळ आलें नाहीं व लोकांवर दिवसेंदिवस एकेक जुलमी कायदे नवीन बसूं लागले तेव्हांच शेवटचा निर्वाणींचा उपाय म्हणून त्यांनीं सत्याग्रह करावयास उपदेश केला. अशा खोल व दूरदर्शी गृहस्थाचे हातून चंपारण्यामधील प्रजेला फितविण्याचें काम होणें अशक्य होय.

चंपारण्यांत येतांच नोटीस मिळाली पण त्या नोटीशीप्रमाणें चालण्याचें महात्माजींच्या जिवावर आलें. कारण इकडे दीन दुबळ्या व जुलुमाखालीं वर्षानुवर्षें

दबून गेलेल्या हजारों दुःखी लोकांनीं असह्य यातनांपासून सोडविण्याविषयीं हताश होऊन मारलेली हांक, व तिकडे सरकारी हुकूम अशा विकट पेंचांत ते पडले असतांना महात्माजींच्या नांवाला व शीलाला शोभेल अशीच कामगिरी त्यांचे हातून झाली. शरण आलेल्या अनाथांचें रक्षण करणें हें हिंदी मनुष्याचें ब्रीद होय. मग हें ब्रीद रक्षण करण्याला स्वतःचा जीव देखील द्यावयास हिंदी लोक मागें पुढें पहात नाहींत. अशा कित्येक गोष्टी पुराणांतरीं आढळून येतात. ह्या गोष्टीचा खरेपणा महात्माजींनीं आपल्या वर्तनानें पुन्हा एकवार सिद्ध करून दाखविला. सरकारी हुकूम न पाळण्याचा त्यांनीं निश्चय केला. व ह्या अपराधाबद्दल होणारी शिक्षा भोगण्याची तयारी केली. ही तयारी स्वतः एकट्यानें करूनच न थांवतां आपल्याला पकडल्यास चंपारणमधील चवकशीचें काम सुरू राहिलेंच पाहिजे असा निश्चय करून एकाला पकडल्यास दुसरा त्याची जागा घेण्यास तयार असला पाहिजे म्हणून बिहारमधील मोठमोठे नामांकित वकील, बॅरिस्टर व इतर सुखवस्तु लोक तयार करून ठेवले होते. एवढ्या थोड्या वेळांत इतक्या उत्तम तऱ्हेची तयारी केवळ महात्माजीच करूं जाणे. येथील वकील लोक ज्यांनीं स्वप्नामध्यें देखील सत्याग्रहाविषयीं विचार केला नसेल ते देखील महात्माजींच्याकरितां स्वतःचा बली द्यावयास तयार झाले.

अशा तऱ्हेची कडेकोट तयारी झाल्यावर महात्माजी नेमलेल्या वेळीं कोर्टांत हजर झाले. ह्यापूर्वीं सरकारनी व्हॉइसरायकडून हुकूम येइतोंपर्यंत रयतेमध्यें जाण्याचें बंद ठेवण्याविषयीं त्यांना फरमाविलें होतें. व तो हुकूम महात्माजींनीं बरोबर पाळला होता. असो, नेमलेल्या दिवशीं महात्माजी कोर्टांत जाऊन हजर झाले. बरोबर बिहारी वकीलमंडळ असून बाहेर हजारों लोकांची गर्दी झाली होती.

महात्माजी ज्या वेळीं कोर्टांत हजर झाले व त्यांनीं आपलें भाषण न्यायाधीशांना वाचून दाखविलें त्या वेळीं न्यायाधिशाची मुद्रा देखील आश्चर्यचकित झालेली दिसली. कदाचित् त्याला वाटलें असेल कीं, महात्माजी स्वतः निरपराधी असल्याबद्दल वकीली करतील. कारण जगामध्यें असेच फार लोक आढळून येतात. असो, सरकारनें पूर्वींच ठरविल्याप्रमाणें महात्माजींवरचा चंपारण्यांत फिरण्याविषयींचा मनाई-हुकूम काढून घेतला.

महात्माजींना मोकळीक मिळाल्याबरोबर ते फार बारकाईनें ह्या लोकांच्या स्थितीचें निरीक्षण करूं लागले. हजारों लोकांचीं गाऱ्हाणीं त्यांनीं ऐकून घेतलीं. अशा तऱ्हेनें महात्माजींनां ह्या लोकांत फिरण्याची परवानगी होती. तरी सी. आय्. डी. चें शेंपूट ह्यांच्याबरोबर सदा रहात असे. असो, या चौकशींत किती तरी हृदयद्रावक गोष्टी त्यांच्या कानावर आल्या.

दहा अकरा वर्षांचीं मोफत काम करणारीं मुलें व गुमास्त्यांकडून बळजबरीनें कामावर नेल्या जाणाऱ्या स्त्रियांना सकाळच्या सात पासून संध्याकाळीं सातांपर्यंत सारखें काम करावें लागे. मध्यें खाण्यासाठीं एक तास सुटी. मळेवाल्यांना सारा देणें अशक्य झाल्यामुळें पुष्कळ लोकांना आपला जमीनजुमला सोडून द्यावा लागला; हे लोक घरें दारें सोडून नेपाळांत जाऊन राहिले. शेतें व गुरें विकूनहि मळेवाल्यांची मागणी ज्यांना पुरी करतां येईना अशा लोकांना प्रॉमिसरी नोटा लिहून द्याव्या लागत. पुष्कळांना बिघ्यामागें १००–१२५ रुपये द्यावे लागत. मळेवाले रयतेकडून दोन आणे शेरानें तूप घेत व दहीं दुधाची तर किंमतहि देत नसत. ठेकेदारास कुळांना वार्षिक एक रुपया शिवाय द्यावा लागे. अशा किती तरी गोष्टी गांधींना समजल्या. त्यांपैकीं कित्येक प्रसिद्धहि करितां येण्याजोग्या नाहींत.

मळेवाले रयतेकडून निळीच्या लागवडीसाठीं नवीन नवीन जमिनी घेत. या जमिनींत रयतेला कोणतेंहि पीक काढतां येत नसे. मळेवाले बिघ्यामागें १४–२० रुपये देत; त्यांतीलहि रयतेच्या हातांत कांहीं पडत नसे. कारण कीं तें साऱ्यांत वळतें करून घेत. आणि मळेवाले मात्र बिघ्यामागें ३०० रुपये कमावीत. या सर्व गोष्टी लोकांनीं जशा गांधींजवळ सांगितल्या तशाच त्या पुढें कोर्टांतहि सांगितल्या. निळीच्या लागवडींत प्रत्येक बिघ्यामागें रयतेस १२०–१३५ रुपये नुकसानी सोसावी लागते असें एका इभ्रतदार माणसानें गांधींस सांगितलें. नीळवाल्यांच्या कचाट्यांतून सोडविल्यास ते युद्धाकरितां आपलें सर्वस्वहि वेंचण्यास तयार होते, पण बिचाऱ्यांचा मुळींच उपाय चालेना. लोकस्थितीचें निरीक्षण करीत करीत अनवाणी कोसच्या कोस चालण्यानें गांधींचे पाय ठणकत होते.

एका गांवांत गांधी गेले असतां त्यांजकडे एक विधवा आपलीं चार मुलें घेऊन आली. सर्व मुलें दहा वर्षांच्या आंतलीं होतीं. तिनें आपले केंस गांधींना दाख-

विले आणि रडत रडत म्हणाली, कांहीं दिवसांपूर्वी मळ्यांतील ठेकेदारानें मला केस धरून ओढीत नेलें, त्यावेळीं खेड्यांतील लोकांना मदतीस येण्याबद्दल मी पुष्कळ विनंति केली पण कोणी आलें नाहीं. ठेकेदारानें मला ओढीत नेऊन मला व माझ्या दहा वर्षांच्या मुलाला मळ्यावर जबरीनें कामाला लाविलें. यापूर्वी मला मळ्यांतील कामाचा मुळींच अनुभव नव्हता.

बेलवान नांवाचे गांवीं पंडित राजकुमार शुक्ल यांचे रब्बीचें सर्व पीक तेथील मॅनेजरनें गुरांना चारलें. व मोहोरील भाताचें पीक अदावतीनें लुटविलें. साहेबाच्या चिथवणीवरून हे प्रकार ज्यांनीं केले त्यांनींच ह्या सर्व गोष्टी गांधी यांस सांगितल्या. या गांवच्या छळाचें साद्यंत वर्णन दिल्यास कोणच्याहि अंगावर रोमांच उभे रहातील. लोक या सर्व साक्षी देत असतांना गांधी यांचेजवळ एक पोलीस इन्स्पेक्टरहि असे, ही गोष्ट लक्षांत ठेविण्यासारखी आहे.

गांधी यांजकडे साक्षी द्यावयास लोकांच्या झुंडीच्या झुंडी नेहमीं येत. साक्षी टिपून घेणाऱ्या लोकांना सायंकाळीं सात वाजेपर्यंत क्षणाचीहि फुरसत नसे. अशा तऱ्हेनें एक महिनाभर अविश्रांत श्रम करून गांधींनीं ७००० पेक्षां अधिक लोकांच्या साक्षी घेतल्या. व त्या संबंधाचा एक रिपोर्ट सरकारकडे पाठविला.

इकडे ह्यावेळीं चंपारण्यांत–विशेषतः बिहारमध्यें–गरीब व कंगाल झालेल्या लोकांनीं पोटाची खळगी भरण्याकरितां कांही कांहीं ठिकाणीं लुटालुट केली होती. व कांहीं ठिकाणीं हिंदुमुसलमानांमध्यें दंगे झाले होते. ह्या सर्व गडबडीचें कारण महात्माजीच होत अशी येथील मळेवाल्यांनीं सारखी हूल उठविली होती. व कांहीं मळेवाल्यांच्या मालमत्तेला आग लागली होती ती देखील ह्यांच्याच चिथवणीनें लागली असेंही येथील मळेवाले म्हणावयास चुकले नाहींत ! व त्यांची री ओढणारीं वर्तमानपत्रेंही त्यांच्या सहायार्थ सज्ज होतींच ! ! अशा प्रसंगीं जर गांधींना चंपारण्यामध्यें येण्याची मोकळीक दिली तर येथें खात्रीनें दंगा होण्याचा संभव आहे असें देखील कित्येक लोक म्हणूं लागले ! ! !

## आयर्विन यांचें पायोनिअरमधील पत्र.

यांत या उन्मत्त व चवताळलेल्या, मळेवाल्यांच्या म्होरक्यानें वाटेल तसे दुष्ट आरोप गांधींसारख्या सच्छील पुढाऱ्यावरहि केले आहेत. ‘ गांधींची चळवळ दुष्टपणाची आणि अनर्थकारक आहे. चंपारण्य जिल्हाच चौकशीसाठीं

घेण्याचें कारण येथें युरोपिअन लोक बरेच आहेत, त्यांच्याविषयीं द्वेषाग्नि भडकवितां यावा हें होय. गांधी खरोखर दुष्ट नाहीं; पण विक्षिप्त आणि भोळा आहे. आफ्रिकेंत मिळविलेल्या थोड्याशा यशानें त्याचें डोकें फिरलें असून जगांतील सर्व दुःखें हरण करण्याचा मक्ता परमेश्वरानें आपणाकडेच सोंपविला आहे अशी त्याची ठाम समजूत झाली आहे. युरोपिअन मळेवाल्यांच्या आपल्या रयतेशीं असलेल्या चांगुलपणानें, स्वार्थी वकील आणि दुष्ट सावकार यांचे खिसे भरण्याचें बंद झाल्यामुळें ते गांधींस चिथवतात. होमरूलवालेहि त्यांच्या नाकांत वेसण घालून त्यांनां वाटेल तसे फिरवितात. हा त्यांचा कावा आहे.' आयर्व्हिनूचें हें पत्र प्रसिद्ध करतांना पायोनिअरनें स्वतःची पुष्पांजलिहि अर्पण केली आहे. 'बनारस येथें गांधींची जी फजिती उडाली तीवरून त्यांचें तारतम्य ज्ञान लोकांना कळलेंच आहे. अशा मनुष्याला सरकार निरंकुशपणें वागूं देतें हें बरें नाहीं!' युरोपिअन ॲसोसिएशनच्या सभेनेंहि गांधींना एकदम हद्दपार करण्याची सूचना सरकारास केली. 'तारीख १३ मे रोजीं गांधींनीं आपल्या खासगी चौकशीसंबंधानें सरकारास एक अर्ज केलेलाच आहे. तेव्हां त्यांनीं आतां येथें रहाण्याची गरज नाहीं. गांधी हे काठेवाडचे. त्यांना बहारची उठाठेव कशाला पाहिजे? बहारमधले मळेवाले व बहारमधलीं कुळें आपले तंटे मिटवितील. परदेशांत शिरलेल्या गांधींस हुसकून लावलेंच पाहिजे,' असें या असोशिएशनचें म्हणणें होतें.

खरोखरच सरकार ह्यावेळीं मोठ्या पेचांत पडलें असावें. मळेवाल्यांच्या म्हणण्यावर भरंवसा ठेवावा तर चंपारण्यांतील लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे दुर्लक्ष केल्याचें पाप माथीं येतें व खऱ्या प्रजापालन करणाऱ्या राजाला असें दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं हें आमचें सरकार पूर्णपणें जाणून आहे. व म्हणूनच ह्यावेळीं अधिकाऱ्यांनीं स्वजातीयांच्या प्रेमाकडे दुर्लक्ष करण्याचें ठरविलें. पण पायोनिअर आयर्व्हिन कंपनीच्या या मागणीस न जुमानतां सरकारनें मळेवाल्यांच्या रयतेशीं असलेल्या संबंधाची चौकशी करण्यासाठीं सहा गृहस्थांची कमिटी नेमली व त्यांत प्रजेच्या तर्फे गांधींची निवडणूक केली! खरोखर महात्माजींवर सरकारचा पूर्ण भरंवसा असला पाहिजे. नाहीं तर मळेवाल्यांनीं उभारलेलें काहूर शान्त झालें नसतें. सरकारचें ह्या वेळचें वर्तन खरोखर पूर्ण दूरदर्शीत्वाचें होतें, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर होय.

कमिटी नेमण्यासंबंधाच्या सरकारी ठरावांत **या प्रश्नाचा जो इतिहास** दिला आहे व कमिटी नेमण्यासंबंधीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांत मात्र गांधीं-च्या चौकशीचा उल्लेख नाहीं हें आश्चर्य आहे! ही कमिटी नेमिल्यावर गांधींपुढें आपण साक्षीदार म्हणून उभें रहाणें मळेवाल्यांस असह्य झालें. त्यांपैकीं एकानें पायो-निअरमध्यें गांधींचा कावा युरोपिअन मळेवाल्यांना घालवून देण्याचा—अधिकाऱ्यां-ना घालवणें तर अशक्यच—असल्याचेंहि लिहिलें! या लेखकाला विशेष चीड गांधींच्या पोषाखाची आली. अडाणी लोकांवर छाप वसविण्यासाठीं रंगभूमीवरच्या नटासारखा पोषाख हे करतात. येशु ख्रिस्तासारखी रहाणी ठेवतात. व स्वतः हातानें स्वयंपाक करतात! हें पाहून याच्या पायाची तिडिक मस्तकास गेली. पण निरुपाय!

ही चवकशी करण्यामध्यें बिहारमधील मोठमोठी नामांकित मंडळी गांधींना मदत देण्याकरितां आपला धंदा सोडून महिनेच्या महिने येऊन राहिली होती. व त्यांपैकीं अजून देखील वरीच वकील मंडळी त्यांच्यावरोबर स्वयंसेवक म्हणून काम करीत आहे. त्या मंडळीच्या मदतीनें महात्माजींनीं कमिशनमध्यें आपलें काम फारच उत्तम केलें व त्याचा प्रभाव इतर युरोपियन मंडळीवर देखील फार पडला. युरोपियन मंडळीला प्रथम वाटलें होतें कीं, कमिशनमध्यें नेहमीं गांधींशीं आपल्याला भांडावें लागेल. परंतु त्यांची अगदीं निराशा झाली. कारण रिपोर्ट, सर्वांचीं मतें एक होऊन बाहेर पडला. व सरकारनेंहि तो मंजुर करून आपला ठराव प्रसिद्ध केला आहे. व आतां तर त्या ठरावाला कायद्याचेंहि स्वरुप आलें आहे.

कमिशननें मुख्यतः पुढील तीन उपाय सुचविले होते; (१) तीन कठिया पद्धति बंद करून नीळ पिकविणें रयतेच्या मर्जीवर सोंपवावें; आणि ज्यांच्या खंडचिठ्ठींत ही अट दाखल असेल ती बदलावी व त्याऐवजीं नवा करार करावा. (२) कोर्ट ऑफ वार्ड्सच्या ताब्यांत असलेल्या इस्टेटींतील जमीन अल्पकालीन मुदतीनें खंडानें देण्याची पद्धति चालू ठेवावी आणि 'अबवाब' व त्यासारखे इतर गैरकायदा कर घेण्याची बंदी करावी. (३) हल्लींच्या पद्धतींत इतर जे कांहीं किरकोळ दोष असतील ते दूर करावे.

'कमिशनच्या या सूचनांवर सरकारनें असा ठराव प्रसिद्ध केला कीं, 'ज्याअर्थी जमिनीच्या इतक्या भागांत नीळ पिकविलीच पाहिजे' असा करार न करितांहि संयुक्त प्रांतांत, बहार प्रांतांत व खुद्द चंपारण्याच्या इतर भागांतहि रयत लोक

आपखुपीनेंच निळीची लागवड करितात त्याअर्थीं यापुढें ही अट रयतेवर लादणें अयोग्य आहे व ती एकदम बंद झाली पाहिजे. अतःपर रयतेनें आपल्या इच्छेस येईल त्या भागांत व मर्जीस वाटेल तेवढी नीळ पिकवावी. नीळीच्या पिकाची विक्री वजनावरून व बाजारभावानें व्हावी आणि बहारच्या मळेवाल्यांच्या संस्थेनें निळीचा किमान दर ठरवून टाकावा.

ज्याअर्थी नीळ पिकविण्याची अट लादणें गैरकायदा आहे त्याअर्थीं या अटीं-तून सुटका होण्याकरितां अल्प मुदतीच्या रयतांनीं देऊं केलेला ' तवान ' नांवाचा दंड अगर कायम मुदतीच्या रयतांनीं देऊं केलेला ' साराबेशी ' नांवाचा जादा सारा हे दोनहि बेकायदेशीर ठरतात; यास्तव ' तवान ' दंड परत करण्यांत यावा व साराबेशी ' च्या रकमेंत शेंकडा २६ टक्के सूट टाकून कायमचा सारा ठरवावा. ' तवान ' दंड परत न करणाऱ्या ठेकेदारांस यापुढें जमिनी देण्यांत येऊं नयेत. याखेरीज नीळ न पिकविणाऱ्या रयतांकडून ' अबवाब ' नांवाचा एक कर विगर-हक्कानें बेटिया व रामनगर या इस्टेटींत वसूल केला जात असे तो बंद व्हावा व यापुढें कोणीहि कोठेंहि तो कर वसूल करूं नये. जर कोणी असा कर घेत अल-ल्याची कागाळी कानीं येईल तर कलेक्टरला त्यासंबंधांत पूर्ण चौकशी करण्याचा व शिक्षा देण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

हल्लीं प्रचलित असलेल्या ठेकेदारी पद्धतीमुळें हे मधले जुलमाचे प्रकार अस्तित्वांत येतात असा कित्येकांचा आक्षेप होता. परंतु कमिशनचा असा अभिप्राय पडला कीं, ठिकेदारी पद्धति मोडून टाकल्यानें रयतेचें कल्याण होईल असें सिद्ध झाल्यावांचून आहे ही पद्धति बंद करूं नये. तथापि ठिकेदाराशीं यापुढें जे नवीन करार होतील त्यांत ' मी अबवासारखे बेकायदेशीर कर वसूल करणार नाहीं, ' अमुकच पीक पिकवा अशी जबरदस्ती करणार नाहीं, इत्यादि अटी घातल्या जाव्या. कमिशनची ही सूचना सरकारास मान्य आहे.

बेटिया व रामनगर या जहागिरींत रयताचें गुरूं मेल्यावर त्याच्या कातड्याची मालकी जमीनदाराकडे जाते ही वहिवाटहि गैराशिस्त असून बेटिया जहागिरींत ती बंद करण्यांत आली आहे. रामनगरच्या जहागिरींत या बाबीचें उत्पन्न बरेंच असल्यामुळें त्याची चौकशी केल्याखेरीज त्यासंबंधानें आजच हुकूम सोडतां येत नाहीं.

याखेरीज जमिनीवरील झाडांची तोड व त्यांची मालकी, गुरचरण रानें, या संबंधांत कोर्ट ऑफ वार्ड्स आणि जिल्हाधिकारी यांना स्थानिक स्थानिक चौकशी करून हे प्रश्न सोडविण्याचे अधिकार देण्यांत येतील. कोंडवाड्याची व्यवस्था जमीनदाराकडे न सोंपवितां डिस्ट्रिक्ट बोर्डाकडे सोंपविण्यांत येईल. याशिवाय ज्या कांहीं स्थानिक वहिवाटी व हक्कबाबी असतील त्यांची चौकशी करून ' रेकॉर्ड ऑफ राइट्स ' मध्यें नोंद करण्यांत येईल.

एकंदरींत या कमिशननें जी कामगिरी बजावली तिजबद्दल सरकार आभारी आहे. त्यांतून विशेषतः रयतांच्या तर्फे मि. गांधी यांनीं आणि मळेवाल्यांच्या तर्फे मेसर्स हिल, आयर्विन व नॉर्मन यांयीं जो नेमस्तपणा व जी तडतोड करण्याची तयारी दर्शविली त्याबद्दल सरकार त्यांचें आभारी आहे. कमिशनचा हा निकाल सर्व रयतांस सर्वत्र जाहीर व्हावा याकरितां देशभाषांतून त्याच्या प्रती छापवून त्या ठिकठिकाणीं प्रसिद्ध केल्या जातील.

असो हिंदुस्थानांत लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकावयास सरकार कमिशनें बसवितें व तीं कमिशनें एक दोन वर्षे चवकशी करण्यांत घालवितात. मग एक दोन वर्षांनीं त्यांचा रिपोर्ट बाहेर पडतो. व ह्या रिपोर्टांत सुचविलेल्या सुधारणा घडून येण्यास कित्येक वर्षांची अवधि लागते. पण चंपारण्य कमिशनची सर्व गोष्ट ह्या परंपरेला धरून झाली नाहीं, हें आश्चर्य होय. अथवा आश्चर्य कसचें ? ज्या ज्या गोष्टींशी महात्माजींचा संबंध आला आहे त्या त्या गोष्टींचा निर्णय फारच थोडया अवधींत लागला आहे हें त्यांच्या आफ्रिकेंतील कृतीवरून दिसून येईल. अर्थात् चंपारण्यांतील कमिशननें सुचविलेल्या सुधारणांची अंमलबजावणी इतक्या तावडतोबीनें केल्याबद्दल सरकारचे देखील आभार मानिले पाहिजेत.

बहार मधील मळ्यांसंबंधीं जी चौकशी खासगी रीतीनें गांधींकडून व नंतर सरकारकडून केली गेली ती चंपारण जिल्ह्यापुरतीच होती; कारण ह्याच जिल्ह्यांत निळीची लागवड फार मोठ्या प्रमाणांत होते. ह्या जिल्ह्यांत मळेवाल्यांकडून रयतेवर जो जुलूम होतो त्याची कांहीं उदाहरणें पूर्वी दिलीं आहेत परंतु तो ज्यापद्धतीमुळें करतां येतो, तिचें दिग्दर्शन व्हावें ह्याकरितां पुढील माहिती देणें भाग आहे.

ह्या जिल्ह्यांत रयतवारी पद्धत नसून जमीनदारी पद्धत चालू आहे. यामुळें रयतेचा प्रत्यक्ष सरकारशीं कधीं संबंध येत नाहीं. जमीनदार आपल्या

जमिनी कुळाकडे निरंतरच्या कौलानें देतात. गेल्या ५० वर्षांत मळेवाल्यांनीं कित्येक खेड्यांच्या जमिनी मोक्करी पद्धतीनें लागवडीकरितां घेतल्या. ह्या जमिनीमध्यें निळीच्या लागवडीची " **तीन कठिया** " पद्धत त्यांनीं अमलांत आणली आहे. प्रत्येक बिघ्यामागें ३ कठ जमिनींत नीळ पेरावयाची हा ह्या पद्धतीचा अर्थ होय. वीस कठांचा एक बिघा होतो. जमिनीची मशागत, तीमध्यें बीं पेरणें ही कामें रयतेकडूनच केलीं जातात. बीं मात्र मळेवाल्याकडून पुरविलें जातें. निळीच्या रोपाची जोपासना करून हंगामाची काढणी करून माल गाडींत भरून देणें एवढींच कामें रयतेस सांगण्यांत येतात. यापुढील काम मळेवाल्यांच्या तर्फेच होतें.

निळीच्या लागवडीकरितां रयतेस सरासरी एकरीं खर्च ४० रुपये येतो. कुळांना मळेवाल्याकडून बिघ्यामागें २० रुपये मिळतात. जेव्हां पीक चांगलें येत नाहीं तेव्हां अर्धेच पैसे मिळतात व केव्हां केव्हांतर कांहींच मिळत नाहीं! कुळाला देण्यांत येणारी रक्कम साऱ्यांत जमा करून घेण्यांत येते. मिळून त्यांना कांहींच मिळत नाहीं.

मळेवाले रयतेवर कित्येक जुलमी कर बसवितात त्यांस तिकडे **अबवाब** म्हणतात.

( १ ) एकादा खातेदार मयत झाला म्हणजे त्याच्या जागीं वारसाचें नांव घालण्याकरितां ५ रु. **बापकीफुती** किंवा नोंदणीचा कर घेण्यांत येतो.

( २ ) फाल्गुन महिन्यांत सणाबद्दल कुळाकडून १ रु. घेण्यांत येतो! त्यास **फागुही** म्हणतात.

( ३ ) मळेवाल्यास हत्ती विकत घ्यावयाचा असला म्हणजे **हताई** कर वसूल करण्यांत येतो.

( ४ ) घोडे खरेदी करणें झाल्यास **घोडाई** नांवाचा कर बसविण्यांत येतो.

यां शिवाय मोटारकर, कारखानाकर, आमकर वगैरे अनेक प्रकारचे कर देतां देतां रयतेच्या नाकीं नऊ येतात. केव्हां केव्हां ही करांची रक्कम साऱ्याचे रकमेहूनहि अधिक होते!

इतकें करूनहि रयतेस स्वस्थता नसतेच. मळेवाल्याच्या जिरात जमिनी असतात त्यांवर रयतेस बिगारीनें खपावें लागतें रोजचा दर २॥, ३ आणे असतो तरी



कायद्याची अटक पार करून चालले !



गोळीनें मेलेल्या एका सत्याग्रह्याची अनाथ
पत्नी व अर्भक.

हातावर १ आणा पडतो. नांगर पुरविण्याबद्दलचा किमान दर ८ पासून १२ आणे असतो पण प्रत्यक्ष २, ४ आणेच मिळतात. याशिवाय **आमला** ( कारखान्यातील नोकर ) खेड्यांतील रयतेस अतिशय छळतात आणि त्यांच्यापासून मजुरीच्या पैशांतीलही पैसे बळजबरीनें घेतात. इतकें असूनही मळेवाले डौल मिरवितच असतात कीं, आपण येथें राहिल्यामुळें रयतेचें कोटकल्याण झालें आहे. आमच्या राहाण्यानें जिल्ह्याचें आरोग्य वाढलें; रयतेचे तंटे तडजोडीनें मिटूं लागले; हलक्या व्याजावर कर्जाउ पैसे मिळूं लागले; वगैरे वगैरे गप्पा हे लोक सांगत असतात; मोकरी पद्धत ज्या खेड्यांत चालू आहे त्यांतील रयतेस आपल्या जमिनींत निळीची लागवड करणें आवडत नसल्यास त्यांनीं बिघ्यामागें १॥ रु. सारा अधिक द्यावा ! अशी मळेवाल्यांनीं एक शक्कल काढली आहे. पण त्यांत एक खुबी लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, हा सारा ज्या जमिनींत निळीची लागवड होते तेवढ्या जमिनींपुरताच वाढविण्यांत येणार आहे. या पद्धतीस इकडे **साराबेशी** म्हणतात. मुदतबंदी साऱ्यानें घेतलेल्या खेडयांच्या ज्या जमिनींत निळीची लागवड होत असेल त्या जमिनीबद्दल बिघ्यामागें १०० रु. घेण्याचा आपला हक्क सोडावयाचा ही दुसरी तोड होय. यास इकडे **तवान** असें म्हणतात. या पद्धति अमलांत येत चालल्यापासून मळेवाल्यांची अप्रियता फारच वाढली.

निळीची लागवड न करणारे असेही पुष्कळ मळेवाले आहेत तेही निळीशिवाय बाकीचे वर सांगितलेले सर्व कर वसूल करून **पाइनखर**चा म्हणजे कालव्याच्या पाण्यावरील कर रयतेपासून वसूल करतात. मग कालव्यांत पाणी वाटेल तितकें कमी असो किंवा मुळींच नसो. सरकारकडून बसविण्यांत आलेली पाणीपट्टी भरूनही हा भूर्दंड भरावा लागतो. ह्या कालव्याकरितां मळेवाल्यांची एक पैही खर्च झालेली नसली तरी रयतेनें हा कर दिलाच पाहिजे. केव्हां केव्हां मळेवाल्यांनीं खर्च केलेल्या रकमेहून कितीतरी अधिक पैसे वसूल होतात. ते बिघ्यामागें ३ पासून ३॥ रु. पर्यंत कर घेतात. रयतेकडून पैसे उकळण्याकरितां **आमल** लोक हवा तसा जुलूम करतात. आज काय विहिरीचें पाणीच बंद कर, उद्यां गुरेंच कोंडवाडयांत अडकीव, परवां खोटे खटलेच, कर असे अनेक उपाय योजून ते लोकांकडून पैसे उकळतात. समाधानाची गोष्ट एवढीच कीं बायकांना ( कांहीं थोडे अपवाद खेरीज करून ) कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष उपसर्ग पोंचत नाहीं. **तवानची**

पद्धति प्रजेला सुखकारक होत नाहीं अशी साक्ष खुद्द सेटलमेंट कमिशनरनीं दिली. ज्या कुळांना **तवान**साठीं एकदम पैसे देण्याची सवड नसते, त्यांच्याकडून कर्जरोखे करून घेतात. पण त्यांत रक्कम कशाबद्दल द्यावयाची याचा उल्लेख नसतो ! गुरांच्या कातड्यांवरही मळेवाले हक्क प्रस्थापित करितात. व त्यांवर कर घेतात. झाडासंबंधींही मळेवाले हक्क सांगतात. वास्तवीक तो त्यांचा हक्क नसून रयतेचा व संस्थानचा आहे. कोंडवाड्यांची मालकीही मळेवाले बळकावून बसले आहेत.

एप्रीलच्या १६ तारखेस चंपारण जिल्ह्यांतून निघून जाण्याबद्दल तेथील डि. मॅजिस्ट्रेटचा हुकूम झाला व तो गांधींनीं न मानतां तेथेंच राहण्याचें ठरविलें अशी एकाएकीं बातमी येईपर्यंत हे तेथें कशासाठीं गेले होते, त्यांना बंदी कां झाली, तिकडील निळीचा प्रश्न कोणत्या स्वरूपाचा आहे, याची इकडे कोणास कांहीं कल्पना नव्हती. परंतु बरोबर सात महिन्यांनीं म्हणजे आक्टोबरच्या १६ तारखेस सरकारनें या बाबतींत ठराव करून तेथील रयतेचा होणारा त्रास बंद करण्याच्या हेतूनें उपाय योजण्याचें जाहीर केलें. वस्तुतः कित्येक पिढ्यांपर्यंत बहारमधील शेतकरी युरोपियन मळेवाल्यांच्या गुलामगिरींत खितपत पडले आहेत. खुद्द बहार मध्येंही यासंबंधानें जागृति नव्हती. मधून मधून हा प्रश्न निघाला तरी तो समाधानकारक रीतीनें सुटेल आणि गोरे मळेवाले समजुतीच्या गोष्टी ऐकतील अशी कोणासही आशा नव्हती. अशा स्थितींत गांधींनीं, या प्रश्नासंबंधानें सर्वत्र अज्ञान व उदासीनता दिसून येत असतां केवळ सात महिन्याच्या अवधींत शेतकऱ्यांचे हक्क त्यांना परत मिळवून द्यावेत, आणि तडजोडीनें हें प्रकरण मिटविल्याबद्दल वर सरकारकडूनहि धन्यवाद मिळवावेत, ही गोष्ट हिंदुस्थानच्या सनदशीर चळवळीच्या इतिहासांत तरी केवळ अपूर्व होय यांत शंका नाहीं. आपल्या नेत्यांच्या आत्मिक बलाचा देशकार्यांत किती उपयोग होतो याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे असें म्हटलें पाहिजे.

शेतकऱ्यांवरील नीळ पिकविण्याची सक्ती कायद्यानें काढून टाकल्यास त्याबद्दल मळेवाल्यांना मोबदला काय द्यावा हा प्रश्न उत्पन्न होतो. या मोबदल्याचे दोन प्रकार असूं शकतील. एक कुळांकडे निरंतरच्या कौलानें जमीन दिली असेल तर त्यांजकडून घ्यावयाच्या साऱ्यांत कायमचा वाढावा करणें, व दुसरा जेथें नियमित मुदतीचा करार असेल तेथें नीळ मिळविण्याची माफी केल्याबद्दल कुळांकडून

ती रक्कम घेणें. जेव्हां निळीला मागणी फार होती व त्यापासून किफायतही फार होती तेव्हां मळेवाले कुळांकडून बळजबरीनें नीळ पिकवीत व तशी शर्त ते आपल्या करारांत घालीत. परंतु पुढें खप कमी झाल्यामुळें निळीचें पीक जेव्हां कमी करणें भाग पडलें तेव्हां कुळांना सवलत देण्याच्या मिषानें, परंतु वस्तुतः स्वार्थ साधण्यासाठींच मळेवाल्यांनीं आपल्या रयतेला नीळ पिकविण्याच्या शर्तींतून मोकळें केलें व त्याबद्दल ते सालोसाल जादा सारा घेऊं लागल. त्यामुळें अलीकडे सात आठ वर्षे ही **सारावेशी** ( वाढविलेला सारा ) अथवा **तवान** ( एक वट रक्कम ) घेण्याची पद्धत चंपारण्यांत बरीच प्रचारांत आलेली होती. ही मोबदला घेण्याची पद्धत जरी सकृद्दर्शनीं उभयपक्षांना हितावह होती तरी खरोखरी तिजपासून मळेवाल्यांचाच फायदा होता. आणि कुळांचें त्यांत नुकसान होतें. कारण कुळांकडून **तवान**च्या रूपानें अवाच्या सवा रकमा घशांत टाकल्या व **सारावेशीच्या** रूपानें सारा अतोनात वाढविला. मळेवाल्यांनीं रयतेवरील सारा जितका वाढविला असेल त्याचा शेंकडा २६ इतका अंश त्यांनीं कमी करावा आणि **तवान**च्या रूपानें त्यांनीं आतांपर्यंत जितकी रक्कम कुळांकडून उकळली असेल त्याचाही ¼ त्यांनीं कुळांना परत करावा आणि सात वर्षेपर्यंत तरी साऱ्याची रक्कम न वाढविण्याचें कबूल करावें. अशी कमिटीनें शिफारस केली आहे व ती बहार सरकारनें मान्य केली आहे. या **सारावेशी** व **तवान** नांवाच्या दोनही रकमा चतुर्थांशानें कमी करण्याचें बहार सरकारनें ठरविलें परंतु हे मोबदल्याचे दोनही प्रकार कितपत कायदेशीर आहेत याबद्दल जबरदस्त शंका आहे, व त्यासंबंधीं कज्जे कोर्टांत सुरू आहेत. परंतु कायदा जरी रयतेच्या बाजूस असला तरी जेथें गरीब व अडाणी लोकांना गोऱ्या मळेवाल्यांशीं झगडावयाचें आहे, तेथें कायदा पुस्तकांत राहातो आणि दुर्बळांना आपल्या प्रतिस्पर्ध्यांचें म्हणणें निमूटपणें कबूल करावें लागतें. तेव्हां **सारावेशीच्या** कायदेशीरपणाचा प्रश्न उपस्थित करून रयतेला कोर्टाचा आश्रय करण्यास सांगण्यानें कांहीं कार्यभाग झाला नसता. गांधींनीं रयतेचें म्हणणें कमिटीपुढें सप्रमाण मांडून त्यांनीं द्यावयाच्या साऱ्याच्या रकमेंत कायमची सूट घालून घेतली व हेंच रयतेच्या दृष्टीनें हितावह होय यांत शंका नाहीं. या सवलतीनें रयतेचा एकूण नफा किती होईल याचा अंदाज करणें कठीण आहे; परंतु एकट्या मोतीहारींतील

मळ्यांचीच गोष्ट घेतली तर आयर्विन साहेबांचें साऱ्याचें उत्पन्न त्यामुळें दरसाल १३००० रु. नीं कमी होईल.

संस्थानिकांकडून मळेवाले खंडानें जमिनी घेतात आणि आपल्या पोटांत कुळें ठेवतात. तेव्हां जर जमिनीचा सारा वाढविला तर तो निदान जमिनीचे जे खरे मालक—संस्थानिक—त्यांनां तरी पोंचला पाहिजे. परंतु तसें न होतां मधले मळेवाले तो गट्ट करितात असें करण्याचा त्यांना अधिकार काय ? आयर्विनसाहेब **सारावेशीं**त दरसाल १३००० रु. सूट घालतील, परंतु त्यांनीं **तवान**च्या रूपानें आतांपर्यंत घेतलेल्या तीन लाखांवर रकमेपैकीं ८०००० रु. त्यांना रयतेला परत देण्यास सांगितल्यास त्यांची मनःस्थिति कशी होईल याची कल्पना करतां येईल. वस्तुतः पहातां **तवान**पैकीं सगळीच्या सगळी रक्कम रयतेला पोंचली पाहिजे. निदान **सारावेशी** ·२६ कमी केल्यास तवान निम्मे तरी परत करण्याबद्दल शिफारस करणें न्यायाचें झालें असतें. हें सर्व खरें, परंतु पूर्वी गिळंकृत करून पचवून सोडलेल्या रकमा मळेवाल्यांकडून ओकविणें किती कठीण आहे, याची ज्यांना थोडीशी कल्पना असेल, त्यांना गांधींनीं मळेवाल्यांकडून **तवान**चा चवथा हिसा तरी काढला याबद्दल कौतुकच वाटेल. मळेवाल्यांपैकीं कित्येक बहादुरांनीं तर असें केलें कीं रयतेकडून नीळ पिकविण्याबद्दल नांवाला करार करून घेतले आणि १।२ वर्षानींच त्यांना त्यांतून मोकळे करून त्यांकडून तवानच्या रूपानें भलभलत्या रकमा वसूल करून घेतल्या. या सर्व रकमा रयतेस जशाच्या तशा परत कराव्या. तसें न झाल्यास मळेवाल्यांना कोणाकडून कौलनामा घेण्याची परवानगी असूं नये, असा बहार सरकारचा आतां सक्त हुकूम सुटला आहे. या सरकारच्या हुकुमानें मळेवाले फारच खवळून गेलेले दिसतात. त्यांचे म्होरके आयर्विनसाहेब ह्यांनीं धमकावणी दिलीच आहे कीं ‘ सरकारी अमलदारांनीं तवानला आतांपर्यंत केव्हांही कांहींही हरकत घेतली नाहीं एवढेंच नव्हे तर आपल्या रुकारानें त्यांनीं उलट प्रोत्साहनच दिलें; अशा स्थितींत आतांच त्यांनीं मळेवाल्यांवर कां उलटावें ? **तवान**चा कांहीं हिस्सा जर आम्हांकडून उकळण्यांत येणार असेल तर कायमच्या साऱ्याच्या वाटींत सूट घालण्याचें जें आपण कबूल केलें आहे तेंहि या उपर कबूल करणार नाहीं आणि गांधींशीं किंवा सरकारशीं देखील लागेल तितका खर्च करून शेवटपर्यंत झगण्यास कमी करणार नाहीं. ’ बहार सरकारनें ही आयर्वी-

नच्या या पत्रास उत्तर म्हणून एक प्रेस नोट प्रसिद्ध करून " आमचा हुकूम कायम आहे " असें जाहीर केलें आहे. सरकार मळेवाल्यांचा पक्ष सोडून एकाएकीं रयतेच्या पक्षास येऊन मिळालें व त्यांची कड घेऊन तें गोऱ्या मळेवाल्यांशींच भांडूं लागलें आहे हा कशाचा प्रभाव ? अर्थात महात्मा गांधींच्या नैतिक बलाचा. चंपारण्यांतून डि. मॅजिस्ट्रेट ज्यांना चौवीस तासांच्या आंत हुसकून देण्यास तयार झाला होता त्यांचेच लेफ्टनंट गव्हर्नरांनीं आतां तडजोडीची बुद्धी दाखविल्यावद्दल जाहीर रीतीनें आभार मानावे हें एरवीं कसें शक्य आहे ?

कमिशननें सुचविलेल्या सुधारणांच्या हिंदीमध्यें नकला करून गांवोगांवच्या खेडवळ लोकांत वाटण्यांत आल्या आहेत. महात्माजींना येथें आणखी सहा महिने राहून मळेवाल्यांमध्यें व रयतेमध्यें होणारा बेबनाव नाहींसा करण्याविषयीं सरकारनीं इच्छा प्रदर्शित केली. व महात्माजींना येथील रयत अगदीं देवासारखी मानूं लागली आहे. हजारों लोक दहा दहा कोसांची मजल करून देखील महात्माजींच्या दर्शनाकरितां रोज येत असतात. खरोखर त्यांना तरी असें कां वाटूं नये ? ज्या महात्म्यानें त्यांच्याकरितां घरदार आप्त इष्ट सोडून शेवटीं तुरुंगांत जाण्याची देखील तयारी केली, त्या महात्म्याला लोकांकडून येवढा मान मिळणें साहजिकच आहे. सरकारच्या इच्छेनुसार महात्माजींनीहि चंपारण्यांत सहा महिने राहून तेथील लोकांना शिक्षित करण्याचें ठरविलें व ह्या कामाकरितां आलेल्या गुजराथी व महाराष्ट्रीय स्वयंसेवकांच्या साहाय्यानें चंपारण्यांत त्यांनीं तीन मुलांच्या व एक मुलींची अशा चार शाळा उघडल्या. ह्या चार शाळांपैकीं एक फारच भरभराटींत चालत आहे. सुमारें दीडशें मुलें दररोज ह्या शाळेंत शिकावयास येतात. कांहीं कांहीं मुलें तर दोन दोन कोसांवरून येतात, व मुलें वयानें देखील फार लहान आहेत तथपि शिक्षणाकरितां लांबवर धांवून येतात. त्या ठिकाणीं महात्माजीनीं मुलांना इंग्रजी शिकविण्यांत येणार नाहीं असें जाहीर केल्यामुळें पुष्कळ मुलें निराशेनें परत जातात. जर इंग्रजी शिकविण्याची सोय केली असती तर त्या शाळेंत सुमारें पांचशें मुलें शिकावयास आलीं असतीं. महात्माजीनीं जेवढ्या शाळा उघडल्या आहेत तेवढ्यांत मुलींच फी घेण्यांत येत नाहीं. दुसरी गोष्ट महात्माजी व त्यांचे स्वयंसेवक गांवो-

गांवीं जाऊन लोकांना स्वच्छता ठेवण्याविषयीं उपदेश करितात. इकडे विहिरी घाणेरड्या असतात. त्यांत सांचलेली घाण हे स्वयंसेवक स्वतः हातानें काढूं लागतात. व अशा तऱ्हेनें कित्येक कामें स्वतः करून दाखवून त्या लोकांना स्वतःचे कृतीनें धडा घालून देतात.

महात्माजींना मुलींसाठीं शाळा काढण्यास मात्र फारच प्रयास पडले. स्त्रीशिक्षणाविषयीं इकडील लोकांत भलत्याच वेडगळ कल्पना असल्यामुळें प्रथम त्या काढून टाकण्यास फारच परिश्रम करावे लागले. पण ह्या परिश्रमांचें चीज फारच चांगलें झालें. ह्या मंडळीच्या पाठशाळेंत सुमारें तीस मुली रोज नियमित वेळीं शिकावयास येत असतात.

महात्मा गांधींचें चंपारण्यांतील तिसरें काम म्हणजे रोग्यांना फुकट औषधोपचार करणें. त्या प्रांतांत हिंवतापाची सांथ फारच भयंकर असते. जेथें महात्माजींनीं शाळा उघडली आहे त्या ठिकाणीं सांथ अतिशय जोरांत चालू होती. कित्येक मनुष्यें कांहींच इलाज न झाल्यामुळें दोन चार दिवसांत मरून जात असत. ह्या ठिकाणीं महात्माजींनीं एका डॉक्टर स्वयंसेवकाची योजना करून ह्या गरीब लोकांना मलेरियाच्या तापापासून सोडविलें. ह्या डॉक्टरनीं सुमारें एक महिन्यांत आठशें रोग्यांना औषधोपचार केला व खेडोखेडीं जाऊन लोकांना औषधें दिलीं. अशा तऱ्हेनें लोकांना हर तऱ्हेनीं मदत देण्याचें जणु कांहीं सत्रच म० गांधींनीं उघडलें आहे. लोकांना वकीलीची सल्ला द्यावयास विहारी वकील व्हॉलंटियर्स मुख्य स्थानावर सदोदित हजर असतात. सध्यां चंपारण्यांतील लोकांना कोणतीही अडचण पडल्यास लोक झट्दिशीं महात्माजींच्या डेऱ्यावर जातात.

महात्माजी येथें इतकें उत्तम कार्य करीत असतानां देखील येथील मळेवाले लोक त्यांच्या नांवानें वर्तमानपत्रांत सारखे खडे फोडीत असतात. केवळ महात्माजींवरच टीका करून ते गप्प बसत नाहींत. त्यांच्या धर्मपत्नींवर देखील टीका करावयास लागले आहेत. ह्या लोकांच्या टीकेंत सत्याचा भाग मुळींच नसतो. एकदां ह्यांनीं महात्मा गांधीजींच्या व त्यांच्या बिहारी व्हॉलंटियर्सच्या पोषाखावरच टीका केली होती. महात्माजी लोकांना आपण कोणी देव आहों

असें भासविण्याकरितां म्हणे अगदीं साधा पोषाख करितात! व जोडे देखील घालीत नाहींत!! ज्यांनीं महात्माजींना इतर ठिकाणीं पाहिलें असेल त्यांना ही गोष्ट अगदीं खोटी आहे अशी खात्री होईल. कारण महात्माजी व्हॉइसरायनां भेटावयास जावयाचें असलें तरी देखील अगदीं त्याच साध्या पोषाखांत जातात. व पायांत जोडे ते आज कित्येक वर्षांपासून घालीत नाहींत. असो इतकें उत्तम काम चंपारण्यांत करीत असतांना देखील मळेवाले उगीच कांहीं तरी खोटें नाटें लिहून आपल्या भाईबंदांचीं मतें देवासारख्या व्यक्तीबद्दल कलुषित करण्याचें पातक करतात हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें.

चंपारण्यांत शिक्षणाचें काम सुरू करण्याचे पूर्वी कित्येक मळेवाल्यांनीं महात्माजींनां अपुऱ्या यत्तेला ( बालवर्गाला ) सुशिक्षित करण्यास साहाय्य करण्याचें कबूल केलें होतें. पण त्यांच्या नेहमींच्या वृत्तीला अनुसरून त्यांनीं महात्माजींना कोणतेंही साहाय्य केलें नाहीं. उलट टीकेचा मात्र भडिमार सारखा सुरू ठेविला आहे. चंपारण्यांतील प्रजा मात्र सध्या पूर्ण आनंदसागरांत पोहत आहे. बिचाऱ्यांना किती तरी छळ सोसावा लागत होता. ह्या छळाची थोडी बहुत कल्पना चंपारण्यांतील कमिशनचा रिपोर्ट वाचून होईल. पण खरी कल्पना स्वतः ह्या ठिकाणीं येऊन लोकसमुदायांत मिसळल्याशिवाय होणें कठीण. चंपारण्यांत महात्माजींच्या विरुद्ध थट्टेमध्यें देखील बोलतां येणें अशक्य झालें आहे. लोक त्यांना आपला केवळ आत्माच समजतात. कां बरें समजणार नाहींत? हजारों लोकांच्या विश्वासाला व प्रेमाला पात्र होण्यासारखाच स्वार्थत्याग करण्याचें महात्माजींनीं योजिलें होतें. सुदैवानें बड्या लाट साहेबांनीं आपलें वजन वेळेवरच खर्च केलें ह्मणून सर्व गोष्टी सुरळीत झाल्या ही गोष्ट वेगळी!

एक नमुनेदार कमिशन बसून त्याची कामगीरीही इतकी नमुनेदार झाल्याचें हिंदुस्थानांतील इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण होय. आणि कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडल्यावर महात्माजींचें सहा महिने येथें राहणें व उत्तम समाजसेवेचें काम करून येथील रयतेमध्यें शिक्षणाची अभिरुचि उत्पन्न करणें ह्मणजे हिऱ्याला कोंदण बसविण्याप्रमाणेंच होय. असो, अशा तऱ्हेनें येथें काम करीत असतानां देखील स्वयंसेवक लोकांवर सरकारची किती तरी करडी नजर आहे.

येथील लोकांचा महात्माजींवर इतका दृढ विश्वास बसला आहे कीं कोणतेंही घरगुती काम असो, निकालाकरितां महात्माजींकडे येतें ! कधीं कधीं तर नवरा बायकोमध्यें झालेलें भांडण देखील महात्माजींकडे घेऊन येतात ! ! येथील लहानशा गांवातून पंच नेमून गांवकऱ्यांचे तंटे त्यांचे मार्फत तोडण्याचा विचार केला होता. पण गांवकरी लोकांचा ह्या पंचावर तरी कोठें भरंवसा आहे ? त्यांचा समज असा आहे कीं, पंच लोकांना थोडीशी लालुच दाखवून आपलेसें करून घेतां येतें. जोंपर्यंत आमचे लोक अज्ञानावस्थेंत रहातील तों पर्यंत त्यांचा पैसा व वेळ असाच भांडणांत फुकट जावयाचा.

चंपारण्यामध्यें महात्माजींना ओळखीत नांहीं असा मनुष्य विरळा सांपडेल. नुकतेच ते छपरा जिल्ह्यामध्यें गेले होते. बहुतेक सर्व मोठमोठ्या स्टेशनांवर हजारों लोक जमून ह्यांचें स्वागत करीत होते. व मुख्य ज्या गांवीं जावयाचें होतें तेथें तर सुमारें तीस हजार लोकांचा जमाव महात्माजींचें स्वागत करावयास उत्सुक होऊन स्टेशनावर जमला होता. ह्यावरून लोकांचें प्रेम त्यांच्यावर किती जडलें आहे हें दिसून येईल. तात्पर्य, चंपारण्यांतील महात्माजींची कामगिरी जगाला एक उत्तम उदाहरण घालून देण्यासारखी झाली आहे. व म्हणून सर्व हिंदुस्थानानें त्यांचें कौतुक केलें पाहिजे.

चंपारण्यांतील कामामध्यें महात्माजी गढून गेलेले असतांनां देखील देशांतील इतर चळवळींकडे त्यांचें लक्ष कमी होतें असें नाहीं. ही गोष्ट गेल्या वर्षी सरकारी दडपशाहीच्या वावटळींत स्वराज्या विषयीं अविश्रांत प्रयत्न करीत असलेल्या बेझंटबाईंना मद्राससरकारनें अटक केली असतां त्यांची सुटका करण्या करितां सत्याग्रहाच्या चळवळीला सर्व देशभर जें प्रोत्साहन मिळालें होतें, त्यावरून सिद्ध होते. राजकीय बाबतींत नेहमीं मागें रहाणाऱ्या गुजराथ प्रान्तांत देखील जें विलक्षण चैतन्य उत्पन्न झालें होतें त्याच्या मुळाशीं महात्माजीच कारण होत. सत्याग्रहाची चळवळ सरकारपाशीं जरी प्रत्यक्ष सुरू करण्याचा प्रसंग या वेळीं आला नाहीं तरी प्रजेला इष्ट वाटणाऱ्या स्वराज्याचा पुरस्कार करीत असलेल्या बेझंटबाईस नजर कैद केल्यामुळें लोकांजवळ देतां येण्याजोगा मोठ्यांत मोठा म्हणजे राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा जो मान होता तो त्यांनीं बेझंटबाईसच एक मतानें देऊन एक प्रकारें स्वराज्याचाच गौरव जो केला. बेझंट बाईशीं अनेक

मतभेद असलेल्या अनेक प्रतिष्ठित गृहस्थांनींही ते सर्व मतभेद विसरून जाऊन स्वराज्यासंघाच्या सभासदांत आपलीं नांवें घातलीं. या सर्व प्रकारावरून लोकमत कोणत्या दिशेनें वहात आहे व तें किती प्रबळ आहे हें आमच्या शहाण्या सरकारनें लवकरच ताडून बेझंट बाईच्या मिषानें हिंदी स्वराज्यास घातलेली अटक काढून टाकली.

ह्या वाढीस लागलेल्या स्वराज्याच्या चळवळीचा परिणाम फक्त हिंदुस्थानांतच होऊन राहिला नाहीं. तर तो इंग्लंडांतही झाला, व त्यामुळें हिंदी लोकांचें म्हणणें काय आहे हें ऐकून घेण्यासाठीं स्टेटसेक्रेटरी साहेब मि. मॉंटेग्यु यांस इकडे येणें भाग पडलें. हिंदुस्थानांत तरी हा एक अपूर्वच प्रसंग म्हटला पाहिजे. कारण हिंदुस्थानचे पुढारी पूर्वी आपल्या मागण्या मागण्याकरितां विलायतेंत जात असत. तरी त्यांच्या म्हणण्याकडे कोणी लक्षही देत नसे. परंतु यावेळीं अगदीं अकल्पित गोष्ट घडून आली. असो, मॉंटेग्युसाहेब इकडे येणार हें कळल्यावर, लोकांच्या आकांक्षा काय आहेत हें त्यांना कळावें म्हणून एक अर्ज हजारों सह्यांनिशीं त्यांजकडे पाठवावा अशा हेतूनें महात्माजींनीं तो तयार केला. व गुजराथ सभेचे अध्यक्ष या नात्यानें अनेक लोकांच्या सह्या त्यावर घेण्याचें काम सभेच्या द्वारें त्यांनीं सुरू केलें. ह्या अर्जाचा मुख्य हेतु स्टेट सेक्रेटरी साहेब यांजपाशीं कांहीं विनंति करण्याचा किंवा एकादा हक्क मागण्याचा नसून लोकमत काय आहे हें त्यांस स्पष्टपणें कळविण्याचा होता. ही अर्जाची कल्पना देशांतील सर्वच पुढाऱ्यांना व संस्थांना इतकी पटली कीं, त्याच नमुन्याचे अर्ज आपापल्या प्रांतामध्यें तयार करून त्यांवर सह्या घेण्याचें काम जिकडे तिकडे धडाक्यानें सुरू झालें. हा अर्ज कॉंग्रेस लीगच्या योजनेलाच अनुसरून असल्यामुळें मतभेदाला जागा उरली नव्हती. सह्या घेण्याच्या या चळवळीपासून दुसरा अत्यंत महत्वाचा फायदा हा होता कीं, त्या योगानें जनतेला खरें शिक्षण देतां येण्याजोगें होतें. हा उद्देश पार पडावा म्हणूनच सह्या घेणाऱ्या स्वयंसेवकांनीं कोणाचीहि सही घेण्यापूर्वी तो अर्ज त्या इसमाला पूर्णपणें समजला आहे अशी खात्री झाल्यानंतरच त्याजकडून सही घ्यावी, पूर्वी घेऊं नये असा सक्त नियम त्यांनीं घातला होता. हा अर्ज जर मांटेग्यु साहेबांकडे गेला नसता तर मांटेग्यु साहेब कांहीं थोडया पुढाऱ्यांच्याच भेटी घेऊं शकले असते व त्यावरून ही सर्व चळवळ म्हणजे मुठभर लोकांचीच चळवळ आहे असें त्यांना

वाटण्याचाहि संभव होता. तो लाखों लोकांच्या सह्या प्रत्यक्ष पाहिल्यानें सहा जिकच टळला असला पाहिजे. आतां मांटेग्यु साहेब विलायतेंत आम्हाला काय, द्यावयाचें हें ठरवितीलच, आणि येथल्या अधिकाऱ्यांशीं खलबतें करून थोडेसें ठरविलेंहि असेल. पण महात्माजींनीं त्या अर्जांतच स्पष्ट सांगून टाकिलें आहे कीं, ' आतां स्वराज्य मिळाल्यावांचून हिंदुस्थानांत शान्ति नांदणें अशक्य आहे. '

चंपारण्यांतील कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्याबरोबर गुजराथेंतील शिक्षण परिषद् व राजकीय परिषद् यांच्या बैठकीसाठीं म. गांधी हे गुजराथेंत आले. दोन्ही परिषदांमध्यें अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं केलेलीं भाषणें अध्यक्षांच्या नेहमींच्या भाषणांपेक्षां फारच निराळ्या तऱ्हेचीं झालीं. राजकीय परिषदेच्या कामांत तर त्यांनीं पुष्कळच नवीन गोष्टी अमलांत आणिल्या. इंग्रजी भाषेंतील एक शब्दहि तेथें ऐकूं आला नाहीं. नेहमीं इंग्रजींत बोलणारे ना. झिना व महाराष्ट्रेतर प्रांतांत नेहमीं इंग्रजींत बोलणारे लो० टिळक यांचीं भाषणेंहि गुजराथी व मराठी भाषेंत झालीं ! परिषदेचें काम वर्षभर चालू रहावें म्हणून कार्यकारी मंडळ स्थापन केलें, विषय–नियामक–मंडळांत येण्याचा अधिकार परिषदेंत हजर असलेल्या कोणत्याहि स्त्रीला व कोणत्याहि मुसलमान बंधूला दिला, व त्यांपैकीं ज्यांची येण्याची इच्छा असेल त्यांना सर्वांनीं निवडून द्यावें अशीहि विनंति केली; विषय नियामक मंडळास हजर रहाण्याची सर्वांना मोकळीक दिली वगैरे बऱ्याच इष्ट गोष्टी त्यांनीं तेथें घडवून आणिल्या.

काठेवाडांतून गुजराथेंत आगगाडीनें येणाऱ्या प्रवाशांना विरमगांव स्टेशनवर कस्टम खात्याच्या जकातीमुळें अतोनात जुलूम होत होता. गुजरात काठेवाडच्या पाठीमागचा हा त्रास चुकावा म्हणून कित्येक वर्षांपासून लोकांनीं अर्ज विनंत्या, कायदेकौन्सिलांतील प्रश्न वगैरे साधनानीं प्रयत्न चालविले होते. पण त्यांचा कांहींच उपयोग होईना. महात्माजी हे हिंदुस्थानांत आले त्यावेळीं गुजराथी लोकांनीं त्यांचें लक्ष या गोष्टीकडे वळविलें होतें व या बाबतींत सत्याग्रह करण्याची पाळी आली असती तर महात्माजींच्या निशाणाखालीं हजारों गुर्जर बंधु गोळा झाले असते यांत मुळींच शंका नाहीं. पण तितकी वेळ आली नाहीं. गेल्या जानेवारीपासून सरकारनें ही जकात अखेरीस उठविली.

या बाबतींत सरकारचें मन वळविण्याचें बहुतेक श्रेय महात्मा गांधी यांनाच आहे असें म्हणतात.

गेल्या फेब्रुवारी महिन्यांत अमदाबाद येथील गिरण्यांचे मालक व मजूर यांमध्यें उत्पन्न झालेला बेबनाव मिटविण्यामध्यें जिवापाड मेहेनत करून खरा सत्याग्रही हा फक्त सरकारशींच सत्याग्रह करितो असें नसून आपल्या जात-भाईशींहि तो करितो आणि त्याला करावाहि लागतो ही गोष्ट महात्माजींनीं लोकांचे नजरेस उत्तम रीतीनें आणून दिली. या लढ्यांत गांधी यांची स्थिति फार नाजुक झाली होती. कारण एका बाजूला मुख्य मुख्य गिरण्यांचे मालक त्यांचे स्नेही होते आणि दुसऱ्या बाजूला ज्यांच्या हक्कांचें संरक्षण करण्याचें कंकण त्यांनीं आजन्म हातीं बांधिलें आहे असे गरीब मजूर होते. म्हणून हें भांडण मिटविण्याचे कामीं त्यांना आपल्या देहाचेंहि बलिदान करण्याची तयारी करावी लागली होती. गिरण्यांचे मालक व मजूर यांच्यामध्यें जगांत आजपर्यंत पुष्कळदां युद्धें जुंपलेलीं आहेत. पण अमदाबाद येथील युद्ध जसें चिकाटीनें शांततेनें व प्रेमानें चाललें व त्याचा शेवटहि जसा गोड झाला, तसा तो कोठेंहि झाल्याचें ऐकिवांत नाहीं. ही चळवळ इतक्या शांततेनें पार पडण्याचें कारण म्हणजे रिकाम्या राहिलेल्या मजूर वर्गाला रोज गांधीं यांजकडून व अहर्निश मजुरांच्या हितासाठीं तनमनधनानें झटणाऱ्या श्रीमान् व विद्वान् श्रीमती अनुसूयाबाई यांजकडून मिळणारा उपदेश हेंच होय. रोज भरणाऱ्या मजूरवर्गाच्या प्रचंड सभांतून त्यांना सत्याग्रहाचीं मुख्य तत्वें तर समजावून देण्यांत येतच असत. परन्तु त्याबरोबरच नौकरी नसतांना काटकसरीनें कसें रहावें, घरासभोंवतालची जागा कशी स्वच्छ ठेवावी, वेळ कसा घालवावा, कुटुंबांतील मंडळींशीं कसें वागावें, पुस्तकें कोणतीं वाचावीं वगैरे अनेक गोष्टी त्यांच्या मनांत बिंबवून दिल्या जात असत. जमलेल्या मजुरवर्गाचींहि भाषणें त्या ठिकाणीं होत असत व कवनेंहि गायिलीं जात. तीं ज्यांनीं ऐकिलीं त्यांनीं त्या 'अशिक्षित' बंधूंची बुद्धिमत्ता पाहून तोंडांत बोटेंच घातलीं ! या लढयाची विशेष हकिगत महात्माजींनीं वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध केलेली होती. ती पुढील प्रकरणांत दिलेलीच आहे, सबब येथें द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

अमदावाद येथील गिरण्यांच्या प्रकरणांत गढून गेल्यामुळें ते चंपारण्यांत बरेच दिवसपर्यंत जाऊं शकले नव्हते; यामुळें सहाजीकच त्यांचें मन तिकडे लागलेलें होतें. तरी पण खेडा प्रकरणांत त्यांना पडावेंच लागलें. 'सत्याग्रही काम शोधीत फिरत नसतो; कामच त्याच्या पुढें येऊन उभें राहतें.' आणि असें झालें म्हणजे तें सोडून त्याला जातां येत नाहीं. चंपारण्यांतील लोकांना महात्माजींच्या सहवासाचा आणि प्रत्यक्ष नेतृत्वाचा लाभ मिळावयाचा नव्हता, असेंच म्हटलें पाहिजे. कारण सहा महिने पर्यंत चंपारण्यांत संथपणें शिक्षणाचें कार्य केल्याशिवाय इतर चळवळींत पडूं नये अशी महात्माजींची इच्छा होती. असें असतांहि चंपारण्यांत न येतां गिरण्याच्या प्रकरणांतील भीषण उपवासाचें पारणें केल्यावरोवर ते खेडया कडेच धांवले. दोन तीन वर्षांपासून गुजराथेंत रहात असूनहि सत्याग्रहाची मोहीम त्यांनीं चंपारण्यामध्येंच प्रथम सुरू केली या गोष्टीबद्दल गुजराथेला चंपारण्याचा हेवा वाटूं लागला असावा असें दिसतें.

गेल्या सालीं अतिवृष्टीमुळें वरेच ठिकाणचीं पिकें बुडालीं. त्याचप्रमाणें तीं खेडा जिल्ह्यांत बुडालीं होतीं. पण खेडा जिल्ह्यांत कर्तृत्ववान् पुढारी असल्यामुळें या बाबतींत त्यांनीं चळवळ सुरू केली. चार आण्यांपेक्षां कमी पीक झालें असेल तर सरकार साऱ्याची सूट मिळते असा सरकारचाच कायदा आहे. पण सरकारच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आणावारीचा गडबडगुंडा होऊन ६०० गांवांपैकीं ५९९ गांवांत जवळ जवळ आवादी आबाद पुकारली जाऊं लागली. वसुलीचा तगादा, चौथाईचा दंड, मालमत्तेची जप्ति हे प्रकार झपाझप सुरू झाले. आणि पुष्कळशी रकम सरकारनें आपल्या तिजोरींत भरूनहि टाकली. अगोदरच पिकें बुडालेलीं आणि त्यांतहि प्लेगचा भयंकर कहर, यांमुळें प्रजा अगदीं जेरीस आली होती. ती सरकारचा सारा कोठून देणार ? तिनें ना. पारेख व पटेल यांसारख्या सरकारांत प्रतिष्ठा असलेल्या सद्गृहस्थांस आपल्या मदतीस बोलाविलें. त्यांनीं जिल्ह्यांतील खऱ्या स्थितीची पहाणी करून सरकारपाशीं रदबदलीहि केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं, पुढें सरकारशीं 'शक्य तितकें सहकार्य' करणारे दोघे तिघे भारतसेवकहि आपल्या परी प्रयत्न करूं लागले, तरी त्यांची

सल्लाहि सरकारला पटली नाहीं. इतकें होईपर्यंत महात्मा गांधी हे या कामांत फारसे पडले नव्हते. कारण आपली सर्व शक्ति ते चंपारण्याच्या प्रकरणांतच खर्च करीत होते. तरी त्यांनीं ज्यांचें पीक चार आण्यांपेक्षां कमी आलें असेल त्यांनीं सारा भरण्याचें कारण नाहीं अशा अर्थाची नोटीस गुजराथ सभेकडून काढवून खेडा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस धीर दिला होता. ही नोटीस निघाल्या-बरोबर अधिकारीवर्ग चिडून गेला. वास्तविक या नोटिशींत गैरकायदेशीर असा एक शब्दहि नव्हता. पण सरकारनें ही सर्व चळवळ गुजराथ सभा व होम-रूलवाले यांनींच केली असून हिला आम्ही मुळींच जुमानणार नाहीं अशी धमकी दिली. आणि यामुळेंच हें प्रकरण पेटलें. प्रथमच जर सरकारी अधिकाऱ्यांनीं लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे योग्य लक्ष पुरविलें असतें तर व लोकपक्षाच्या पुढाऱ्यांशीं मगरुरीनें न वागतां थोडी नम्रता किंवा सौजन्य धारण केलें असतें तर या प्रकरणांत महात्माजीं सारख्या अतिरथ्याला पडावें लागलें नसतें. महात्माजी या प्रकरणांत पडल्यावर ज्या ज्या हकिगती घडल्या त्या इतक्या ताज्या आहेत कीं त्या पुस्तकांत लिहिण्याची वेळ अजून आलेली नाहीं.

खेडा जिल्हा हा अत्यंत खुनशी म्हणून नांवाजलेला असतांनाहि तेथील लो-कांच्या अंगीं, सरकारी अम्मलदारांकडून लहानसहान बाबतींतहि पदोपदीं होणारा त्रास मुकाट्यानें, इतकेंच नव्हे तर प्रसन्नतेनें सहन करण्याची शक्ति महात्माजींनीं आणून दिली.

खेडा येथील हा लढा अगदीं जोरांत चालला असतांना दिल्ली येथें व्हाइसराय साहेबांनीं, ते भरविणार असलेल्या युद्धपरिषदेंत गांधी यांना निमंत्रण केलें. मुंबई प्रांतांतील इतर मोठमोठ्या पुढारी लोकांना निमंत्रण नसतांहि महात्माजींची आपल्या कार्याला संमति आहे हें जगाला दर्शविण्याची व्हॉइसराय साहेबांस अवश्यकता भासली. बोलावण्याप्रमाणें ते दिल्लीला तर गेलेच. पण पहिले दिव-शींच्या सभेमध्यें त्यांच्या निस्पृह बाण्याला अनुसरून ‘ज्या सभेमध्यें बेझंट, टिळक, महम्मद अल्ली व शौकत अल्ली सारख्यांना निमंत्रणें नाहींत अशा सभेला मी हिंदी राष्ट्राची सभा म्हणत नाहीं’ असें सांगून ते तेथून उठून गेले. पुढें दुसरे दिवशीं व्हाइसरॉयांची व त्यांची खास मुलाखत होऊन ते सभेंत हजर झाले होते. व तेथें हिंदुस्थानामध्यें पूर्वीं कधींहि न घडलेली अशी गोष्ट

त्यांनीं केली. ती गोष्ट म्हणजे त्यांनीं व्हाइसरॉय यांचे सभेंत केलेलें हिन्दी भाषण होय.

हिन्दी ही राष्ट्रीय भाषा झाली पाहिजे. निरनिराळ्या प्रान्ताच्या लोकांनीं परस्परांशीं व्यवहार करतांना तिचाच उपयोग केला पाहिजे एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानची दरबारी भाषाहि इंग्रजी न रहातां हिन्दी झाली पाहिजे, कौन्सिलांतील कामहि हिन्दींतच चाललें पाहिजे असें म. गांधी हे नेहमीं प्रतिपादन करीत असतात. यामुळें लोकांच्या रुचीकडे किंवा खुषीकडे लक्ष न देतांहि ते प्रजापक्षाच्या चळवळींत ज्याप्रमाणें शक्य तितका हिन्दींतच व्यवहार करितात, त्याचप्रमाणें संधि मिळतांच आपल्या ह्या मतावरील आपला दृढ विश्वास व्हाइसरॉय यांच्याहि सभेंत शिष्टाचाराच्या बागुलबुवाला न भितां हिन्दींत भाषण करून त्यांनीं सिद्ध केला.

महात्माजींच्या ह्या व इतर अनेक कार्यांवरून इतर पुढाऱ्यांमध्यें व ह्यांच्यामध्यें लोकांना बराच भेद दिसून येईल. हे केवळ भाषणें करणारे पुढारी नसून ह्यांच्या भाषणाच्या मागें कृतीची जोड नेहमीं असावयाचीच. ह्यांचें आयुष्य लोकांना आपल्या कृतीनें धडा घालून देण्याकरितांच होय. ह्यांच्या आयुष्यांतील दुसरी उत्तम गोष्ट म्हटली ह्मणजे सत्य राखण्याकरितां हे आपला जीव देण्यास देखील तयार होतील. व म्हणूनच ह्यांच्या शब्दावर मोठमोठ्या सरकारी अम्मलदारांचा देखील पूर्ण भरंवसा असतो. जगामध्यें बहुजनसमाजाकडून आपला बहुमान व्हावा हें देखील यांना पसंत नाहीं. सत्याचे हे इतके चहाते आहेत कीं, जेव्हां कोर्टामध्यें हे वकीली करीत असत, तेव्हां एकादे वेळीं आपल्या कुळानें आपल्याला फसविलें आहे असें ह्यांच्या नजरेस भर कोर्टांत आल्यास एकदम ती केस सोडून कोर्टाबाहेर जात असत. व ह्या कुळाकडून घेतलेलें द्रव्य देखील त्याला परत करण्यास चुकत नसत. ह्यांची देशप्रीति इतकी जाज्वल्य आहे कीं, देशापुढें घरदार बायकामुलें सर्व यांना तुच्छ वाटतात. एकदा ह्यांचा मुलगा अतिशय आजारी असल्यामुळें ह्यांना तावडतोब घरीं बोलाविलें होतें; पण ह्या बहाद्दरानें घरीं न जातां उलट निरोप पाठविला कीं, माझ्या पुत्राचे रक्षणाची कामगिरी मीं ईश्वरावर सोंपविली आहे. मला माझें देशकार्य सोडून सध्यां येतां येत नाहीं. दुसऱ्यांदा जेव्हां यांना तुरुंगाची शिक्षा झाली होती तेव्हां मिसेस् गांधी अति-

शय आजारी असल्याबद्दल तार आली व ह्यावेळीं मॅजिस्ट्रेटनीं देखील दंड भरून तुम्हीं जाऊं शकाल असें त्यांना सांगितलें. तरी पण शिक्षा झाली असतां दंड देऊन मोकळे होण्याच्या रीतीच्या हे विरुद्ध असल्यामुळें स्वतःच्या स्त्रीची जबाबदारी (वरें होण्याची) ईश्वरावर सोंपवून हे शांततेनें तुरुंगांत राहिले. केवढें तरी हें मनोधैर्य ? संसारांत असून संसाराच्या मायापाशांत न गुंतणारे हे एक योगीच होत. स्त्रीपुत्रांविषयीं त्यांची इतकी उदासीनता दिसून येते तरी त्यांचें आपल्या कुटुंबावर अगाढ प्रेम आहे हें त्यांच्या सहवासांत रहाणाराला सहज कळून येतें. फक्त देश-कार्याविषयीं मात्र सर्वांनीं सदा तत्पर रहावें अशी यांची उत्कट इच्छा असते. आफ्रिकेमध्यें मिसेस गांधी अतिशय आजारी असतांना व स्वतः आपण व वडील मुलगा बंदींत असतांनाहि दुसऱ्या दोघां मुलांना बंदीवासाचा रस्ता धरावयास उपदेश करणारा पिता खरोखर विरळा ! असो अशा तऱ्हेची जाज्वल्य देशभक्ति फारच थोड्या लोकांत दिसून येते. त्यांचे कुटुंबांत सध्यां त्यांचे चार मुलगे, पत्नी व स्वतः, इतकींच माणसें आहेत. फक्त वडील चिरंजीवांचा विवाह झालेला आहे. व ते आपल्या कुटुंबासहित कलकत्यास रहातात. त्यांना एका गिरणीमध्यें नोकरी आहे. दोघे मुलगे आफ्रिकेमध्यें 'इंडीयन ओपिनीयन' प्रेसमध्यें काम करितात आणि सर्वांत धाकटा मुलगा बहुत करून महात्मा गांधींच्या बरोबर असतो, सध्यां तो चंपारण्यामध्यें शिक्षणाचें उत्तम कार्य करीत आहे. एकंदरीनें महात्माजींना शोभे-सेंच त्यांचें कुटुंब आहे. ह्यांची पत्नी व छोटे पुत्र अगदीं ह्यांच्या वचनांत वाग-तांना दिसून येतात. येथें मिसेस गांधी संबंधी थोडेसें लिहिल्यास गैर होणार नाहीं. ह्या खरोखरच एक साध्वी स्त्री आहेत स्वभावानें प्रेमळ, रहाणी साधी, लोकसेवे विषयीं सदां तत्पर, कोणतेंही परिश्रमाचें काम करण्यास मागें पुढें न पहाणाऱ्या, सदां आनंदी वृत्ती ठेवणाऱ्या, पतिसेवेंत सदा तत्पर रहाणाऱ्या व सदोदित पतिआज्ञेंत वागणाऱ्या अशा आहेत. ह्या त्यांच्या सद्गुणांबद्दल महात्मा-जींना देखील अभिमान वाटत असला पाहिजे. कारण त्यांच्या बहुतेक देश-कार्यांत ह्या सद्गुणी स्त्रीची केवढी तरी मदत होत असली पाहिजे. असो. मीं आतां महात्माजींच्या आजपर्यंत झालेल्या मुख्य कामगिरीबद्दल मला लिहावयाचें होतें तेवढें लिहून चुकलें. महात्माजी अशा तऱ्हेचीं अनेक कामें हिंदुस्थानांत करितील व करोत, अशी इच्छा प्रदर्शित करून मीं हें लिहिणें

संपविते. महात्माजींचें जीवनचरित्र मी इतक्या अडचणींत असतांना लिहावयास घेतलें कीं तें पूर्ण करावयास महिनेच्या महिने लागतील असें मला वाटलें होतें. ह्याचें कारण मीं सध्यां चंपारण्यामध्यें स्वयंसेविकेचें काम करीत आहें. यामुळें मला लिहावयास फारच थोडा वेळ मिळत होता. व थोडासा काढतां आला तोहि गडबडींतच, कारण आम्हीं शाळेंतच रहात आहोंत. ह्यामुळें लिहितांना जी एक प्रकारची शांतता लागते ती मला हें चरित्र लिहितांना मुळींच मिळाली नसल्यानें व मी कसलेली लेखिका तर मुळींच नसल्यानें, ह्या चरित्रांत फारच दोष राहिले आहेत याची मला पूर्ण जाणीव आहे. पण ज्याप्रमाणें उत्तम हिऱ्याला कोंदण बसविणारा सोनार फारसा कुशल नसला तरी चालतो, कारण कशाहि रीतीनें बसविला तरी हिरा आपल्या स्वतःच्या तेजानें प्रकाशतोच तद्वतच महात्माजींच्या उज्वल चरित्राची गोष्ट होय. एकाद्या उत्तम लेखकाकडून हें काम फारच बहारीचें झालें असतें. व पुढें देखील कोणी लिहावयाचें मनावर घेतल्यास महात्माजींच्या चरित्रांत दर वर्षी नवीन भर पडतच रहाणार. व म्हणून हें चरित्र लिहिण्याची संधि वाटेल त्याला मिळेल. असो, माझ्याच्यानें झालें तें मीं करून टाकिलें आहे. ह्या लेखामध्यें ज्या कांहीं उणीवा भासतील त्यांबद्दल सदय अंतःकरणानें क्षमा करून माझ्या गुणग्राही बंधु भगिनी ह्या माझ्या प्रथमच लिहिलेल्या कृतीचें कौतुक करतील अशी आशा आहे.



तुरुंग यात्रा केलेल्या उत्तर हिंदुस्थानी स्त्रिया.



गांधींच्या सहधर्मचारिणी.

# विशेष परिचय.

# विशेष परिचय.

## १

## गांधींची विचारसरणी.

गेल्या पांच पंचवीस वर्षांतील वर्तमानपत्रें ज्यांनीं वाचलीं असतील किंवा हिंदुस्थानांतील सार्वजनिक चळवळीची सामान्य माहिती ज्यांना असेल त्यांना मागील प्रकरणांत येऊन गेलेल्या गोष्टी माहीत असणें अशक्य नाहीं; किंबहुना अशल्या माहितीवरूनच सामान्य जनसमूह गांधींची कदर करतो आणि त्यांना 'महात्मा' हें पद देतो आणि तें योग्यच आहे. पण महात्मा गांधींचें माहात्म्य येथेंच संपत नाहीं. त्यांनीं आजवर केलेल्या कामगिरींत दिसून येणारी न्यायाची आवड, परोपकाराविषयींची तत्परता आणि कशाही बिकट प्रसंगीं धर्मबुद्धीस न सोडण्याची खबरदारी हे गुण पाहून आपले मनांत त्यांचेविषयीं आदर उत्पन्न होतो. तसेंच सार्वजनिक हितासाठीं झुंजत असतां प्रतिपक्षानें कितीही डाव पेंच लढवले तरी स्वतःचें शील न सोडतां प्रतिपक्षाच्या प्रत्येक पेंचास तोड काढून डाव न हरण्याची त्यांची हातोटी अथवा मुत्सद्देगिरी पाहून आपणास कौतुक वाटतें आणि ज्या लोकांचा ते कैवार घेतील त्यांना न्याय मिळवून देत असतां त्यांच्या अंतःकरणांतही न्यायबुद्धि उत्पन्न करून त्यांचीं हृदयें अधिक पवित्र, उदार आणि खंबीर ते कशीं करून सोडतात याचें निरीक्षण केल्यानें हे कोणी सत्पुरुष आहेत अशी श्रद्धा उत्पन्न होऊन त्यांचेविषयीं पूज्यभाव वाटूं लागतो. आणि स्वाभाविकपणें हें त्यांचें निर्दोष वर्तन आणि ही त्यांची कर्तबगारी यांची गुरुकिल्ली कशांत आहे हें जाणण्याची इच्छा उत्पन्न होते. या दृष्टीनें आजपर्यंतचा त्यांचा आयुष्यक्रम पाहतां आपणांस असें दिसून येईल कीं, प्रथमपासून जें रास्त असेल तेंच करावयाचें. सरळ रस्ता, मग तो कितीही अडचणीचा असो, सोडावयाचा नाहीं, नुकसान सोसावें लागलें तरी आपल्या शीलास जागावयाचें, आपला मतलब बुडाला तरी हरकत नाहीं, पण सत्व जाऊं द्यावयाचें नाहीं, अशी धार्मिकबुद्धि प्रथमपासून त्यांच्यांत दिसून येते. श्रीसमर्थांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

**दयावेगळें कांहीं नाहीं । ऐसेंचि बोलती सर्वही ।**
**परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ॥**

सामान्य लोक नेहमीं म्हणतात, 'धर्मानें चालणाऱ्याचा नाश कधींही होत नाहीं. थोडेंसें धर्माचरणही मोटमोठ्या संकटांतून आपणांस वांचवितें.' परंतु प्रसंग आला असतां हा त्यांचा विश्वास टिकत नाहीं. कसोटीच्या वेळीं वरील वचनें 'पुराणांतील वांग्या'सारखीं वाटूं लागतात आणि तात्पुरत्या लाभासाठीं मनुष्य धर्माचा रस्ता झुगारून देतो. मनुष्य आपल्या क्षुद्र स्वार्थासाठीं इतकें करितो. मग जर कां परोपकारासाठीं, जातीच्या हितासाठीं अथवा देशकार्यासाठीं झटत असतां धर्मानुसार वागावें किंवा नाहीं असा प्रश्न उभा राहिला तर मग पापपुण्याची कल्पनाही शुद्ध न राहून असल्या थोर कार्यासाठीं जरा वांकडा मार्ग स्वीकारण्यांत दोष नाहीं अशी मनाला भुरळ पडते. आणि मनुष्य बिनदिक्कत वाटेल त्या लटपटी करावयास लागतो. अशा रीतीनें त्याला कदाचित तात्पुरतें यशही केव्हां केव्हां मिळतें. परंतु त्याच्या योगानें आत्मतेजाला केवढा क्षय लागतो याची त्या बिचाऱ्याला कल्पना नसते व त्यामुळें तो स्वतःच आपली, आपल्या विचारांची, वचनांची व निश्चयाची किंमत कमी लेखूं लागतो. गांधींनीं प्रथमपासूनच हा मार्ग टाळलेला दिसतो. धर्मराज युधिष्ठिरांनीं लहानपणीं शाळेंत विद्यारंभ केला असतां पहिल्याच दिवशीं 'सत्यं वद' एवढेंच एक वाक्य तयार करून आणलें. सबंध दिवसांत राजपुत्रानें एकच वाक्य तयार केलें हें पाहून पंतोजीला आश्चर्य वाटलें व रागही आला. परंतु 'सत्यं वद' हें वाक्य तयार करून येणें याचा धर्मराज जो अर्थ समजत असत तो त्या बिचाऱ्या पंतोजीच्या स्वप्नींही नव्हता. त्याचप्रमाणें अनेक ग्रंथांतून आणि हरिदास पुराणिकांच्या तोंडून धर्माचा उहापोह ऐकत असतां 'आत्मा आहे व तो परमात्म्याचाच अंश किंवा स्वरूप आहे' हा सिद्धांत हजारों वेळां ऐकूनही व तो खरा आहे असें मानूनही आपल्या नेहमींच्या वागण्यावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. जो सिद्धांत आपल्या मनाला पटला त्याप्रमाणें वागण्यासाठीं कितीही खटपट करण्याची व वाटेल तीं संकटें सोसण्याची लोकोत्तर पुरुषांची नेहमीं तयारी असते व म्हणूनच असे लोकोत्तर पुरुष लोकमान्य होतात. 'आत्मा आहे आणि त्याला ओळखून ज्या परमात्म्याचें तो रूप आहे त्याच्याकडे आपणास

परत जावयाचें आहे ' अशी गांधींची दृढ भावना आहे. आज जर त्यांना कोणी विचारलें कीं तुम्हीं राजकारणांत कां पडतां ? स्वदेशीचा उपदेश कां करितां ? हात–मागावरच विणलेलें कापड कां वापरतां ? गोरक्षणाची खटपट कां करितां ? आहारांत दुधाचा त्याग कां करितां ? लढाईत मुडदेफरासाचें काम करण्यास कां तयार असतां ? तर ह्या सर्व प्रश्नांस ते एकच उत्तर देतील. ' आत्मप्राप्ती व्हावी, मोक्ष मिळावा म्हणून. '

अशा रीतीनें आयुष्याचा हेतु निश्चित, स्पष्ट आणि एक असला म्हणजे जीवन-क्रम देखील सुरळीत, साधा व सोपा होतो. आपला मुक्काम व रस्ता ठरला म्हणजे प्रत्येक वेळीं कसें वागावें याची विवेचना करण्याची पाळी येत नाहीं. गांधींच्या जीवनांतील हें सूत्र जोंपर्यंत आपले हातीं लागलें नाहीं, तोंपर्यंत निरनिराळ्या प्रसंगीं त्यांनीं स्वीकारलेलें निरनिराळें धोरण आपल्याला कसेंसेंच आणि विसंगत वाटत असतें. सूत्राच्या अभावीं कार्याचे मणि विस्कळित वाटतील यांत नवल नाहीं. पण गांधींच्या बावतींत हें सूत्र उमगलें तरी निरनिराळे मणि त्यांत कसे ओंवले गेले आहेत, हें समजणें सोपें नाहीं. त्यांच्या प्रत्येक कार्यांत आत्मसाधनाचा प्रयत्न ओळखणें कठीण आहे. कारण आपण आत्मप्राप्तीसाठीं आजवर कांहींच साधना केली नाहीं. आत्मप्राप्ति करून घ्यावयाची म्हणजे काय व ती करून घेण्यास आपल्या आयुष्यक्रमांत काय काय फेर केला पाहिजे, याचा जेव्हां आपण प्रयत्नपूर्वक विचार करूं, तेव्हांच एका कृत्याचा दुसऱ्या कृत्यावर, इतकेंच नव्हे तर सर्व जीवनावर कायमचा परिणाम कसा होतो हें कळूं शकेल.

ग्रंथान्तरीं मोक्षप्राप्तीच्या साधनांचें वर्णन यथेच्छ सांपडतें. पण तें येथें उप-योगीं पडत नाहीं. जुन्या साधुसंतांनीं संसार ही एक मोठी व्याद आहे. तींतून शक्य तितक्या लौकर पळ काढला पाहिजे आणि संसारांत राहावेंच लागलें तर उदासीन–सुतक्यासारखें–रहावें, असाच उपदेश बहुशः केला आहे. आज ती कल्पना बदलली आहे, आज " जनसेवा ती ईश्वरसेवा " हा भाव विशेष प्रबळ झाला आहे. गांधींच्या आयुष्यांत या दोन्ही मतांचा मेळ दिसून येतो. त्यांनां या संसारांत येणें–जन्म घेणें–हेंच एक पापाचें फळ वाटतें. परंतु एकदा त्यांत आल्या-वर येथील सर्व कर्तव्यें नीट बजावून जीवनाचा पूर्ण अनुभव घेऊनच यांतून पार पडणें—मोक्ष मिळविणें–शक्य व इष्ट आहे असें त्यांना वाटतें. मात्र संसाराचा

अनुभव घेणें याचा अर्थ कांहीं आधुनिक लोक करतात त्याप्रमाणें येथील भोग भोगणें असा गांधी करीत नाहींत. सर्व बाबतींत जागरूकपणानें इन्द्रियनिग्रह करून संयम पाळून भूतमात्राविषयींचें आपलें कर्तव्य पार पाडणें हीच त्यांना आत्मप्राप्तीची ' साधना ' वाटते. " सर्व प्रकारचीं पापें शक्य तितकीं टाळणें, सत्कर्में करीत राहणें आणि मनोनिग्रह करणें " ही बुद्धानें दाखविलेली दिशाच गांधींनीं स्वीकारलेली आहे. रात्रंदिवस ते याच प्रयत्नांत असतात. या प्रयत्नांत अजून योग्य अशा आध्यात्मिक गुरूची जोड आपणास लाधलेली नाहीं असें ते वारंवार ह्मणतात. मात्र गुरु मिळेतोंपर्यंत स्वस्थ न बसतां प्रयत्नवान् होऊन स्वतः-च स्वतःचा गुरु होऊन मुमुक्षूनें शक्य ती उन्नति करून घ्यावी असें त्यांचें मत व वर्तन आहे.

या सर्व वर्तनाचा मूळ पाया सत्य आणि अहिंसा या दोन व्रतांवर आहे, असें ते मानतात. कोणच्या परिस्थितींत खोटें बोललें असतां पाप लागत नाहीं, याच्या शोधांत न पडतां ' सत्यापरता—निर्भेळ सत्यापरता—नाहीं धर्म ' हाच सिद्धांत धरून ते चालतात. आणि याचाच उपसिद्धांत म्हणून ते असें मानतात कीं, सत्याचा प्रचार किंवा बचाव सत्यानेंच केला पाहिजे. अन्य उपायांचें अवलंबन करणें म्हणजे सत्याला कमीपणा आणण्यासारखें आहे. आपली बाजू खरी कर-ण्यासाठीं बळजबरीचा उपयोग करणें अथवा हिंसा करणें म्हणजे आपली बाजू खोटी किंवा लंगडी आहे, निदान तिच्यावरील आपली निष्ठा तरी खास कमी आहे, असें आपल्याच कृतीनें कबूल करण्यासारखें आहे. हा विचार सुटल्या-मुळेंच आजवर अनेक धर्मयुद्धें झालीं आहेत. आणि अत्यंत शुद्ध बुद्धीच्या मनुष्यांकडूनही मानवजातीची पिछेहाट झाली आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह हीं व्रतें सर्वकाळीं सर्व स्थळीं सर्वांनीं पाळावयाचीं आहेत-तीं सार्वभौम आहेत—त्यांना अपवादच नाहीं. फक्त आपली शक्ति ज्या मानानें कमी अथवा अधिक त्या मानानें आपण त्यांचें कमीअधिक पालन करूं शकतों. परंतु तेवढ्या-साठीं ध्येयाला खालीं खेंचतां कामा नये. गांधींना वरील व्रतें म्हणजे हिंदुधर्माचें सार वाटतें व हीं व्रतें आणि ह्या व्रतांच्या मुळाशीं असलेली वृत्ति हल्लींच्या लोकांनीं बरीच सोडलेली पाहून त्यांना अतोनात दुःख होतें. यूरोपमधील आधु-निक संस्कृतीचें त्यांनीं काळजीपूर्वक परीक्षण केलें आहे. आणि तिचा प्रवाह

आत्मोन्नतीला कसा विघातक आहे हें त्यांना पूर्णपणें कळून चुकलें आहे. अर्थात् तिचा वारा आपल्या देशास लागूं नये असें त्यांना मनापासून वाटतें. बहकलेल्या जगाला रस्त्यावर आणण्याचें सामर्थ्य हिंदुधर्मांत आहे असा त्यांचा दृढविश्वास असल्यामुळें हिन्दू जातीनें स्वधर्म सोडून आधुनिक प्रवाहांत वाहत जाणें म्हणजे सर्व जगाचें नुकसान करण्यासारखें आहे. गुरुच जर च्युत झाले तर त्यांना मार्गा-वर कोण आणणार ? गांधींना आंतून असें वाटतें कीं आज जरी हिन्दुस्थान आपलेपणा विसरून परक्याच्या वैभवाला दिपून गेलें असलें तरी तें आपला मूळ स्वभाव कायमचा सोडून देणार नाहीं. देवाची इच्छाच अशी आहे कीं हिन्दु-स्थानानें सर्व जगाला शान्तीचा आणि समाधानाचा मार्ग दाखवावा. आणि या आंतील दृढ विश्वासामुळेंच गांधींचें हिन्दुथानावर एवढें अतोनात प्रेम आहे. इंग्रजांच्या राज्यांत आपण राजनिष्ठ कां आहों हें सांगतांनां ज्याप्रमाणें ते एकदां म्हणाले कीं ' ब्रिटिश राज्यकारभारांत कितीही अंधेर असो, त्यांच्या राज्यकार-भाराच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें ( Constitution ) अत्यंत उदात्त आहेत. तीं तत्त्वें आज इंग्लंडनें सोडून दिलीं तर त्याच क्षणीं माझी राजनिष्ठाहि लयास जाईल.' त्याचप्रमाणें कदाचित् ते असेंही म्हणतील कीं, जोंपर्यंत हिंदुस्थान वरील हिन्दु ध्येयांना चिकटून राहील, अर्थात् आत्मप्राप्तीसाठीं प्रयत्न करीत राहील तोंपर्यंतच मला त्याच्याविषयीं अभिमान आणि भक्ति वाटेल.

याच साठीं त्यांच्या सर्व चळवळींचा एकमात्र हेतु, हिंदुस्थानांत तें प्राचीन तेज, ती साधी राहणी, ती मोक्षाची तळमळ, जीवमात्रावरील तें प्रेम फिरून जागृत व्हावें हा आहे.

राजकारणाची त्यांना गोडी नाहीं. राजकारणावर त्यांचा विश्वास नाहीं. त्यांचें ध्येय राजकीय नाहीं. पण आज हिंदुस्थानांत कोणतीही सुधारणा करावयाची ह्मणजे तिला राजकारणाचें रूप आल्याशिवाय अगर दिल्याशिवाय चालावयाचें नाहीं, हें ते जाणतात. व ह्मणूनच **राजकारण अथवा देशसेवा हाच आजचा युगधर्म** आहे, देश सेवेवांचून धर्माचरण परिपूर्ण होणेंच आजच्या स्थितींत अशक्य आहे, असें ते वारंवार ह्मणतात. मात्र कसेही डांवपेच लढवून आपल्या पक्षाची सरशी करावी व प्रतिपक्षाला हाणून पाडावा यालाच जर राज-कारण म्हणावयाचें असेल तर त्याचा मात्र ते विटाळ मानतात खरे. असल्या

'राजकारणांत ते एक लहान बाळक आहेत,' ही गोष्ट अगदीं अक्षरशः खरी आहे. मात्र असलें राजकारणही त्यांनां समजत नाहीं असें नव्हे. तर लहान मुलासारख्या त्यांच्या निष्कपट आणि सरल हृदयाला असलें राजकारण 'खेळण्याची' कल्पनाच कधीं शिवावयाची नाहीं. त्यांना प्रत्येक व्यक्ति अधिक पवित्र, अधिक तेजस्वी, आणि अधिक धर्मनिष्ठ झालेली पहावयाची आहे. व याचमुळें त्यांचीं राजकीय मतें, राजकारणांत वागण्याची त्यांची पद्धत, प्रजेमध्यें जागृति करण्याचे त्यांचे प्रयत्न वगैरे सर्व 'कुछ और' आहेत, हें समजण्याइतकेंही त्यांच्या विचारांचें आकलन ज्यांनीं केलेलें नाहीं त्यांनां गांधींचें वागणें 'चमत्कारिक' 'हेकेखोर' 'तारतम्यशून्य' किंवा 'विक्षिप्तपणा'चें वाटतें, यांत आश्चर्य कसचें ?

गांधींचें ध्येय राजकीय नसल्या कारणानें यंत्रें न वापरणें, आगगाडया मोटारी वगैरे जलद प्रवास करण्याचीं साधनें त्याज्य समजणें वगैरे त्यांचीं इतर मतें त्यांनां राजकारणा इतकींच महत्त्वाचीं वाटतात. हिन्दी पार्लमेंट मिळून स्वतःचे कायदे स्वतः बनविण्याचे हक्क आपणास मिळाले ह्मणजे खरें स्वातंत्र्य आपणास मिळालें असें होत नाहीं. कोणत्याही रीतीनें आपण परावलंबी असतां कामा नये. समाजांत श्रमविभागाचा अतिरेक केल्यानें प्रत्येक मनुष्य परावलंबी होतो. आणि प्रत्येकालानेंच तेंच काम सतत करीत राहावें लागल्या कारणानें कोणाचें ही शिक्षण अष्टपैलू होत नाहीं. श्रमविभागांत अनुभव एकांगी मिळत असल्याकारणानें आत्म्याचा सर्वांगी विकास होत नाहीं. आणि ह्मणून दरएक माणूस समाज-रचनेचा ह्मणजे एक प्रकारच्या यंत्राचा, दास होऊन जातो. मग स्वातंत्र्य कोठें राहिलें ? श्रमविभागाचे कित्येक पक्षपाती ह्मणतात कीं, श्रमविभागानेंच समाजामध्यें सामर्थ्य ( Efficiency ) येते; परंतु हें सामर्थ्य ह्मणजे जबरदस्तानें किंवा धूर्तानें गरीबांवर सत्ता गाजवून मिळविलेलें सामर्थ्य होय. स्वतंत्रता देवीच्या खऱ्या उपासकाला दुसऱ्यानें आपल्यावर केलेल्या जुलमाची जितकी चीड असते तितकीच आपल्या हातून कळत किंवा नकळत कोणावर ही जुलूम न व्हावा अशी कडकडीत धर्मबुद्धिही असते. जगाला स्वतंत्र करण्याची पहिली पायरी,-स्वतःला स्वतंत्र करण्याचा बीजमंत्र म्हणजे जुलमी प्रतिपक्षाचा विरोध करणें हा नसून, स्वतःच आपल्या हातून कोणावरही जुलूम न होईल, अयोग्य दाब न पडेल, अशी खबरदारी घेणें हा होय. या मंत्राची जसजशी सिद्धि होत जाईल, तसतसा साधक स्वातंत्र्य व सामर्थ्य

यांची प्रत्यक्ष मूर्तिच वनून जातो. या साठीं कोणावरही अवलंबून न राहतां स्वतः-च्या गरजा स्वतःच्याच मेहनतीनें भागविण्याची आवश्यकता लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न गांधी हे करीत असतात. आपलें प्रत्येक काम स्वतःच केल्यानें आपल्याला सर्व प्रकारचे अनुभव येतात, बुद्धि तरतरीत होते, प्रसंगावधान जागृत राहतें, शरीर चपळ व जोमदार बनतें, आणि स्वतःचें संभाळून दुसऱ्यास मदत करितां येते.

कित्येकांना वाटतें कीं श्रमविभाग न केल्यास राष्ट्रांत अर्थोत्पादक शक्ति उत्पन्न होणार नाहीं, व आजच्या युगांत पैसा हीच शक्ति होय! पैशाच्या जोरावर लढाया लढतां येतात, लोकमत तयार करितां येतें, प्रजेचें सुखसमाधान वाढवितां येतें; पैसा असला म्हणजे सर्व कांहीं करितां येतें. एका अमेरिकन पुस्तकांत एक विशिष्ट जातीची सर्व बाजूंनीं उन्नति कशी होत आहे, हें दाखवितांना, लोकांची नैतिक आणि धार्मिक उन्नति झपाट्यानें होत आहे, असें सिद्ध करण्यासाटीं त्यांच्या चर्चचें ( देवस्थानांचें ) उत्पन्न झपाट्यानें वाढत आहे, असें दर्शविणारे आंकडे दिले आहेत! गांधी हे ह्या मतास जोरानें विरोध करितात. देशांत पैसा वाढल्यानें लोकांतील सद्गुण वाढतात हें म्हणणें तर त्यांना कबूल नाहींच, पण उलट ते असें म्हणतात कीं, गरजेहून संपत्ति वाढली तर ती शील भ्रष्ट करण्यासच कारणीभूत होते ते मानवजात आजपर्यंत ज्या ज्या विभूतींना ईश्वराचा पुत्र, पैगंबर किंवा अवतार मानीत आली आहे, त्या सर्वांनीं—नानक, कबीर, शंकराचार्य, रामकृष्ण, दयानंद, तुकाराम, चैतन्यप्रभु वगैरे सर्वांनीं—कंठरवानें " **अर्थमनर्थं भावय नित्यम्** " असेंच सांगितलें आहे. आपण या सर्वांची पूजा करितों, त्यांचें वचन वेदवाक्य मानतों. परंतु व्यवहाराचा प्रश्न आला कीं त्यांचा एवढाच उपदेश अचुक विसरतों; कारण तो गैरसोयीचा! आपल्या खासगी प्रपंचाचा विचार करीत असतां जे लोक धर्म-बुद्धि जागृत ठेवून समाधानाला, श्रेष्ठ सद्गुण मानतात ते लोकही राष्ट्रप्रपंचाची विवंचना करूं लागले म्हणजे याच तत्त्वावर उलटून पडतात. जणुं काय जो धर्म व्यक्तीला मोक्ष मिळवून देण्यास समर्थ व इहपरलोकीं कल्याणप्रद होतो तोच धर्म राष्ट्रानें पाळला असतां त्याला रसातळासच नेईल! गांधींची निष्ठा याहून निराळ्या प्रकारची आहे. औद्योगिक प्रगतीच्या नादीं लागण्यास ते तयार नाहींत. औद्योगिक चढाओढीच्या शर्यतींत घुसून

आघाडी मारण्यासाठीं धावपळ करीत सुटण्यांत आपलें कल्याण नसून या शर्यतींत न शिरतां अलग राहण्यानेंच आपण स्वतःचा आणि जगाचा उद्धार करूं शकूं. प्रत्येक मनुष्याला पोटापुरतें काम मिळालें आणि समाजाच्या खऱ्याखुऱ्या आणि सामान्य गरजा भागल्या म्हणजे बस झालें. कांहीं लोकांनीं ऐद्यासारखें स्वस्थ बसावें आणि रिकामा वेळ विलासांमध्यें किंवा राक्षसी महत्त्वाकांक्षा तृप्त करण्या-मध्यें घालवावा आणि बाकीच्या लाखों लोकांनीं अर्धपोटीं राहून रात्रीचा दिवस करून अखंड राबावें, याला ते राष्ट्रोन्नति मानीत नाहींत.

सामर्थ्य पैशांत नसून लोकांचे हृदयांतील चैतन्यामध्यें आहे. या चैतन्याचा घात करून लाखों लोकांना शरीरानें आणि मनानें गुलाम करून मिळविलेलें आर्थिक सामर्थ्य कांहीं कामाचें नाहीं. हें तत्त्व गांधींना पूर्णपणें पटलें असल्या-मुळें त्यांची स्वदेशी इतरांचे स्वदेशीपेक्षां कांहीं निराळ्याच प्रकारची आहे. त्यांच्या स्वदेशींत यंत्रांस वाव नाहीं; कुटुंबव्यवस्थेचा नाश करणाऱ्या अवाढव्य कारखा-न्यांना वाव नाहीं; सर्व जगांतील तेल, चांदी, तांबें, राकेल वगैरे आपल्या मुठींत आणणाऱ्या ट्रस्टना वाव नाहीं; परदेशांतील बाजार काबीज करूं पाहणाऱ्या स्वदेशी (?) ला ही वाव नाहीं. परकीयांचें स्वदेशी व्रत बुडविल्यानें आपलें स्वदेशी व्रत टिकणार नाहीं, ही गोष्ट आध्यात्मिक सिद्धांत शोधणारास सहज समजेल. अवाढव्य संघ उभारल्यानें कौटुम्बिक पावित्र्य, परस्परांविषयीं प्रेम, न्यायबुद्धि आणि धर्मबुद्धि कायम टिकणें दुर्घट असतें. जंगी प्रमाणावर श्रम-विभाग झाल्यास कोठें कसा अन्याय होतो आणि अत्यंत दूरच्या जुलमाचे आपण कसे वांटेकरी होतों, हें सामान्य बुद्धीस समजत नाही. आणि धर्मबुद्धि एकदां बोथट झाली म्हणजे अन्यायाची चीड म्हणून उरत नाहीं. साखरेचे स्वादिष्ट पदार्थ खातांना आपण फिजी आणि मॉरिशस मधील अनाथ मजुरांवर होत असलेल्या अनन्वित जुलमाचे आणि अत्याचाराचे आपण भागीदार होतों याची जाणीव कितीजणांस असेल बरें! याचसाठीं जेथला माल तेथेंच निर्माण व्हावा, उद्योग-धंद्यांतील सर्व व्यवहार राजरोस आणि उघड्यावर चालावे अशा प्रकारची त्यांची स्वदेशीची कल्पना आहे.

याच तत्वावर हिंदु समाजांतील जातिभेदाचें तत्त्व गांधींनां मान्य आहे. जातिभेदानें आपलें नुकसान झालें नसून समाजांत स्थिरता आणि प्रेम उत्पन्न

करण्याचें श्रेय जातिभेदालाच दिलें पाहिजे. जातिभेदावर असा आक्षेप घेण्यांत येतो कीं, तो व्यक्तीला आपल्या बंधनांनीं जखडून टाकतो. 'वसुधैव कुटुंबकम्' अशी वृत्ति झालेल्या महात्म्यालाही त्याच्या तडाक्यांतून सुटण्याचा मार्ग नाहीं. यावर गांधींचें असें म्हणणें आहे कीं, जातिबंधनें मनुष्याचें स्वातंत्र्य केव्हांच हिरावून घेत नाहींत. जो मनुष्य जातींत खपत नाहीं त्याचा ती त्याग करते परंतु तत्त्वासाठीं सद्‌बुद्धीनें जातीविरुद्ध बंड करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस नवीन जात निर्माण करण्याचा हक्क असतोच. ज्यांना आपली गोष्ट पटली नाहीं त्यांनीं आपला त्याग केला, आपल्याशीं कांहीं व्यवहार ठेवला नाहीं तर त्याबद्दल आपण तक्रार कां करावी ? जो हक्क आपण जातीविरुद्ध मागतों तोच हक्क आपण जातीलाही दिला पाहिजे.

याच तत्वाचा अंगीकार करून गांधींनीं अंत्यजोद्धाराचा प्रश्न हातीं घेतला आहे. कोणाही मानवी प्राण्यास अस्पृश्य मानणें हें एक धार्मिक पाप आहे असें ते समजतात. मूळ हिंदू धर्मांत अस्पृश्य भाव नसून हा डाग हिंदू धर्माला मध्यंतरींच कोणी तरी लाविला आहे, अशी त्यांची समजूत आहे. व म्हणून, धेड भंग्यानां बिनदिक्कत शिवून दुसऱ्यांना तसेंच करावयास उत्तेजन देऊन आणि असें वागल्याबद्दल जात जी शिक्षा देईल, ती निमूटपणें व प्रसन्नतेनें सोसण्यास तयार राहून गांधींनीं आपला सत्याग्रह चालविला आहे. यामुळें धर्मासारख्या नाजूक बाबतींत पुराणप्रिय हिंदु समाजाचा विरोध करूनही ते सर्वांच्या आदरास पात्र झाले आहेत. अंत्यजांना शिवणें, व्यवहारांत त्यांना इतरांप्रमाणेंच वागविणें, हें सोयीसाठीं, अथवा एका बंधनांतून सुटून जाण्यासाठीं ते करीत नसून अंत्यजवर्गासंबंधानें आजवर आपण जो अन्याय केला आहे, त्याचें पाप धुऊन काढण्यासाठीं करित असतात.

तात्पर्य, समाजांत कोणतीहि सुधारणा करावयाची, ती स्वच्छंदानें वागतां यावें म्हणून केलेली असूं नये. उलट ज्या मानानें आपण अधिक संयम पाळूं त्या मानानें आपली उन्नति अधिक होईल या तत्त्वाचे ते पुरस्कर्ते आहेत. आणि म्हणूनच सहभोजनासारखे प्रकार त्यांना अनिष्ट वाटतात.

# २

# गांधी यांची कार्याची दिशा.

गांधींच्या विचारसरणीचा एथवर जो ऊहापोह केला त्यावरून आपणांला असें दिसून आलें कीं 'समाज म्हणजे काय? त्याची रचना कशी असली पाहिजे? समाजाचें अंतिम ध्येय म्हणजे काय आणि तें कसें साध्य करावयाचें? समाजाचें आज चुकतें कोठें आणि तें कसें सुधारावयाचें? कोणत्या गोष्टी आज केल्याच पाहिजेत आणि कोणत्या गोष्टी टाळल्याच पाहिजेत,' वगैरे सर्व प्रश्नांचा गांधींनीं एका विशिष्ट दिशेनें सांगोपांग विचार करून आपलीं मतें निश्चित ठरविलेलीं आहेत. त्यामुळें त्यांच्या कार्याची दिशाही जवळ जवळ नक्की ठरून गेल्यासारखी आहे.

समाजाची उन्नति होण्यास त्यांतील प्रत्येक व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. हें स्वातंत्र्य जसें राजकीय बाबतींत मिळविलें पाहिजे, तसेंच तें धार्मिक बाबतींतही मिळविलें पाहिजे; जसें समाजाकडून मिळविलें पाहिजे तसें निसर्गाकडूनही मिळविलें पाहिजे. जगांत मनुष्य जन्मास येतो तो शरीराचें बंधन बरोबर घेऊनच येतो. हें शरीर जर नीट संभाळलें तर तें आपल्या सर्व कार्याचें—धर्मसाधनाचें आद्य कारण होतें. पण जर का आपण आरोग्याचे नियम पाळले नाहींत, जिव्हालौल्य व इतर विषय-वासना यांना बळी पडलों तर तेंच शरीर अनेक आधिव्याधींचें माहेरघर बनून जातें, सर्व मनोरथ मनच्या मनांतच जिरून जातात, अहोरात्र औषधाची बाटली उशाशीं ठेवावी लागते व दवाखान्याचे उंबरठे झिजवावे लागतात. इतकें करूनही सुख व शक्ति हीं लाभावयाचीं नाहींत तीं नाहींतच. निसर्गाचे नियम तोडल्याबद्दलची शिक्षा ही कांही कोर्टांतील शिक्षेसारखी नव्हे. दंड भरून कोर्टाची शिक्षा चुकवितां येईल. पण डाक्टरची फी भरून शरीराचें दुःख टाळतां यावयाचें नाहीं. आज काल आपली रहाणी अगदींच अशास्त्रीय झाली आहे. पूर्वीचा आपला साधा आणि ताजा आहार आपण सोडून दिला आहे. जिभेचे चोचले पुरविण्यासाठीं आपण बिचाऱ्या पोटावर अनन्वित जुलूम करतों आणि पोट काम करीनासें झालें म्हणजे त्याला झोडपण्यासाठीं पाचक चूर्णें आणि टॉनिकें यांचा मारा सुरू करतों आणि तींहि स्वादिष्ट असलीं पाहिजेत हा आमचा आग्रह!!

खाण्याच्या बाबतींत आपण जसे अगदींच बेताल झालों आहोंत त्याचप्रमाणें इतर इंद्रियांचे कोड पुरविण्याच्या बाबतींतही आपण सर्व मर्यादांना अगदीं फांटाच दिला आहे. ' मुलामुलींचीं लग्नें केव्हां करावींत, घरांत मुलांचें संगोपन कसें करावें, तरुण मुलांमुलींच्या दृष्टीसमोर कोणत्या गोष्टी येऊं द्याव्यात व कोणत्या येऊं न द्याव्यात, कोणत्या गोष्टी कुटुंबाच्या आरोग्यास व नीतिमत्तेस विघातक आहेत आणि कोणत्या पोषक आहेत ' या विषयीं आपण कांहींच विचार करीत नाहींसे झालों आहोंत. शुद्ध सात्त्विक-आध्यात्मिक-प्रेम अगदीं लहानपणापासून वाढावें या सबबीवर बालविवाह करणारे लोक त्याच लग्नांत वारविलासिनींचें नृत्य करवितात. उलट पक्षीं नव्या विचारांनीं भारल्यामुळें पंचवीस वर्षांपर्यंत मुलांचीं लग्नें न करणारे आईबाप त्यांना शृंगारिक नाटकें, आणि अश्लील चलच्चित्रें ( सिनेमा ) पाहण्यास पाठविण्यास किंवा नेण्यास मुळींच कचरत नाहींत ! इतका समाज निष्काळजी व बेफिकीर बनला आहे. कोंवळ्या अर्भकांचीं लग्नें करावींत, सर्व प्रकारच्या विलासांना त्यांना उत्तेजन द्यावें, आणि तींच मुलें अकालीं हा लोक सोडून गेलीं म्हणजे हळहळत रहावें आणि त्यांच्या बालविधवांना ' पांढऱ्या पायांच्या ' म्हणून छळीत रहावें हा प्रकार एकीकडे; तर ब्रम्हचर्य, पावित्र्य, साधेपणा यांची मुलांदेखत टवाळी करून हव्यातसल्या शृंगारिक कादंबऱ्या मुलांना वाचूं देऊन पुन्हां त्यांना २५।३० वर्षें पर्यंत अविवाहित रहावयास सांगावें, आणि मग तीं मुलें अयोग्य मार्गाला लागून ऐन तारुण्यांत क्षयासारख्या रोगांनीं बळीं पडलीं म्हणजे ' आज तरुण पिढी अल्पायुषी कां आहे ' याची मूळ मुद्दा सोडून अन्य कारणांनीं उपपत्ति लावीत बसावें, आणि तरुण विधवांना ' फिरून यत्न करून पहा ' म्हणून सल्ला द्यावा, हा प्रकार दुसरीकडे. अशा स्थितींत गांधींनीं या सामाजिक दुर्गतीची खरीखुरी मीमांसा करून यांतून सुटण्याचा मार्ग स्पष्ट शब्दांनीं सुचविला आहे. आहार अगदीं साधा करा, मसाले आणि इतर उत्तेजक पदार्थ यांचा त्याग करा, चहा, कॉफी, सोडा, लेमन वगैरे ब्रह्मचर्यविघातक वस्तु वर्ज करा, शुद्ध व उघड्या हवेंत रहा, यथेच्छ व्यायाम करून, मन पवित्र ठेवा म्हणजे आपोआप प्रकृति निकोप राहील, ब्रह्मचर्य पाळणें सोपें जाईल, कार्य करण्याचा उत्साह वाटेल व आयुष्य वृद्धिंगत होईल. मन पवित्र राहिल्यानें आरोग्य चांगलें टिकतें हें तत्त्व आतां बहुतेक सर्वमान्य झालें आहे. परंतु विशिष्ट

राहणीनें राहिलें असतां मन पवित्र राखण्यास पुष्कळच मदत होते हें तत्त्व मात्र फार थोडयांच्या लक्षांत आहे. व याच साठीं गांधींनीं आपल्या उपदेशांत आणि आश्रमाच्या नियमांत त्यावर फार जोर दिला आहे. हा आरोग्याचा प्रश्न गांधींना फारच गंभीर आणि राष्ट्रीय महत्त्वाचा वाटतो. देशांतील कार्यकर्ते पुढारी व सर्व स्वार्थाला तुच्छ लेखणारे राष्ट्रसेवक जरा कोठें कामास लागले न लागले, तोंच मृत्युमुखीं पडतात ! राष्ट्राची होत असलेली ही भयंकर हानि पाहून गांधींचें अंतःकरण तिळतिळ तुटतें.

जी गोष्ट घराच्या आंत, तीच घराच्या बाहेर. खेडे गावांतील रस्ते घ्या किंवा शहरांतील गटारें घ्या, सर्व प्रकारची घाण तेथें सांचलेली असावयाचीच. पवित्र तीर्थें म्हणून ज्यांना आपण पुजतों, ज्यांच्या नांवापुढें ‘ माता ’ हा आदरसूचक शब्द आपण लावतों, त्या लहान मोठ्या नद्यांचें पाणी आणि आसपासचा कांठ आपण ज्या प्रकारें वापरतों, तो प्रकार पहातां या तीर्थ-क्षेत्रांना दुरून नमस्कार करण्यांतच अधिक पुण्य आहे असेंच कोणाहि खऱ्या धार्मिकाला वाटेल. मरणोत्तर नरकवास टाळण्यासाठीं या तीर्थक्षेत्रांत स्नान करणें म्हणजे खरोखर पुढील शिक्षा आजच भोगून सुटण्यासारखें आहे !

असल्या परिस्थितींत सर्व प्रकारचे सांथीचे रोग हिंदुस्थानांत आपला मिरास करून बसले म्हणजे मग सरकारनें कमिशनें बसवावींत. आणि क्विनाइन्, देवीची लस, प्लेगची लस वगैरे औषधें टोंच टोंचून शरीरांतील रक्त निर्जीव करण्याचे उपाय योजावेत; शुद्ध सात्त्विक आहार आणि शुद्ध हवा पाणी यांचे योगानें प्रकृति निरोगी राखण्याचें सोडून रोगोत्पादक आहार आणि गलिच्छ हवा पोटांत घ्यावी आणि ती रोग रूपानें बाहेर पडूं नये म्हणून सडलेलें मांस, रोग जंतूंचीं प्रेतें शरीरांत टोंचून घ्यावीं, या आत्मघातकीपणाचा गांधींनीं विरोध न करावा तर काय करावें ? त्यांच्या मतें समाजानें आपलीं घरें दारें, आपले शौचकूप आणि रस्ते, तलाव, नदी, बाजार, मंदिरें वगैरे सार्वजनिक उपयोगाच्या जागा, अत्यंत स्वच्छ ठेवण्याची काळजी बाळगली पाहिजे. हा प्रश्न त्यांना राजकारणाइतकाच किंबहुना त्याहूनही अधिक महत्वाचा वाटतो. कारण राष्ट्राचें अस्तित्व, शील आणि सामर्थ्य यांवरच अवलंबून आहे.

आपल्या कित्येक सामाजिक रूढीही गांधींच्या नवीन शास्त्राप्रमाणें बदलल्या पाहिजेत. स्त्रियांना समाजांत योग्य स्थान आणि योग्य शिक्षण मिळून त्या सर्व कार्यांत पुरुषांच्या भागीदार झाल्या पाहिजेत. पण प्रथम त्यांना स्वातंत्र्य दिलें पाहिजे. तरच त्यांना समाजांतील आपला दर्जा पेलतां येईल. जी स्थिति घरांत स्त्रियांची, तीच स्थिति समाजांत अंत्यजांची आहे. त्यांची राहणी घाणेरडी आहे. या सबबीवर महारोग्यांप्रमाणें त्यांना दूर ठेवण्याऐवजीं त्यांना देखील समाजांतील इतर व्यक्तींप्रमाणें वागवून त्या अधिकाराला अनुरूप अशी राहणी ठेवण्यास आपण त्यांस शिकविलें पाहिजे. नैतिक, धार्मिक व राजकीय दृष्ट्या हा प्रश्न त्यांना अत्यंत अगत्याचा वाटतो.

सामाजिक व्यवहारांत जसा हा अन्याय चालू आहे त्याच प्रमाणें संपत्तीच्या वांटणींतही दिवसें दिवस अधिकाधिक अन्याय होत चालला आहे. वाढत्या महागाईचा भार गरीबांना सोसावा लागत आहे आणि परिस्थितीचे पत्ते खेळणारे हातचलाख लोक बिचाऱ्यांच्या **मेहनती पासून फायदा लुटीत** आहेत. समाजाची हल्लींची बसलेली घडी शक्य तोंवर न बिघडवितां, परंपरागत हितसंबंध शक्य तोंवर न बुडवितां मजुरांवर आलेलें हें जीवावरील संकट टाळण्यासाठीं गांधी जीवापाड मेहनत करीत आहेत.

पण गांधींच्या तत्वाप्रमाणें कारखानदार आणि मजूर, मळेवाले आणि रयत असे भिन्न वर्गच पडूं नयेत. मनुष्याला अत्यंत आवश्यक अशा वस्तु ह्मणजे खायाला अन्न, पांघरावयाला वस्त्र आणि रहावयास घर; या तिन्ही बाबतींत मनुष्यानें परावलंबी होऊं नये, त्या कशा तयार कराव्यात याचें ज्ञान प्रत्येकास असलें पाहिजे. जेथला माल तेथेंच विशेष प्रयासावांचून तयार करतां यावा आणि तेथेंच तो खपावा हें योग्य आहे हिंदुस्थानांत हातमागांचा जीर्णोद्धार करणें हें राष्ट्रोद्धाराचें महान् व प्रधान अंग होय अशी त्यांची समजूत आहे. असें झाल्यानें प्रत्येक व्यक्तीचें जीवन सर्वांगपरिपूर्ण आणि विविध प्रसंगांनीं भरलेलें असें होईल. परस्पर संबंध जेथें अत्यंत निकट असेल आणि जेथें परस्पर प्रेमभाव असेल तेथेंच सहकारिता इष्ट आणि कल्याणकारक आहे. प्रेमाचे अभावीं श्रमविभागाच्या जोरावर मोठे मोठे संघ चालविल्यानें राक्षसी सामर्थ्य निर्माण होईल; आणि राक्षसी सामर्थ्याचा स्वभावच हा कीं प्रथम दुसऱ्याचा नाश करून शेवटीं

भस्मासुराप्रमाणें स्वतःचाहि नाश करून घ्यावयाचा! मोठ मोठ्या गिरण्या उभारून सगळ्या देशाला वस्त्राचा पुरवठा करण्याची हांव बाळगल्यानें कौटुंबिक प्रेम, जातिव्यवस्था, संपत्तीच्या वाटणींतील न्याय, हीं सर्व लयाला जातात. म्हणूनच अवजड व घोटाळ्याच्या यंत्रांवांचून चालवितां येणारे हातमाग घरांतल्या घरांत चालविण्याची पद्धत गांधी पसंत करितात.

शेती करावयाची म्हणजे ज्याप्रमाणें तंबाखू, भांग, अफू वगैरे घातुक पदार्थ पैदा करून व्यसनें वाढवावयाचीं असें नव्हे, त्याचप्रमाणें हातमागांचा जीर्णोद्धार करावयाचा म्हणजे कांहीं असंख्य जीवांना एका क्षणांत वाफेनें मारून काढलेल्या रेशमाचे मऊ मऊ ऐटबाज कपडे तयार करावयाचे असा अर्थ नाहीं. आपला जुना, साधा, सहज धुतां येईल, सहज वापरतां येईल, मोकळी हवा खेळण्यास अनुकूल असेल आणि आपल्या बालबोध रहाणीस शोभेल असा पोषाख सोडून देऊन आणि पाश्चात्य फॅशनच्या--ढंगांच्या--मागें लागून आपण आरोग्याच्या दृष्टीनें, सोईच्या दृष्टीनें, कलेच्या दृष्टीनें आणि राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें आपलें नुकसानच करून घेतलें आहे. देशांतील लाखों विणकऱ्यांच्या पोटावर पाय आणणारी आणि आपणांस परावलंबी करणारी हीं फॅशनच खऱ्या स्वदेशीची शत्रु आहे. स्त्रियांनीं आपला राष्ट्रीय पोषाख सोडला नाहीं म्हणूनच आज हजारों कोष्टी जीव धरून तरी राहिले आहत आणि आपल्या रहाणींत हिंदुपणा कायम राहिला आहे. गुजराथ किंवा बंगालच्या मानानें महाराष्ट्रांत स्त्रियांनीं आपलेपणा अधिक राखला आहे आणि आपली पिढीजाद अभिरुचि बिघडूं दिली नाहीं ही गोष्ट अभिनंदनीय आहे. कारण खरें पाहूं गेलें असतां आपली विशिष्ट अभिरुचि, आपली आवड-निवड, आपला कौटुंबिक आणि सामाजिक आदर्श, आपली पापपुण्याची कल्पना आणि चतुर्विध पुरुषार्थाचें आपलें ध्येय या किंवा असल्या गोष्टींतच आपलें राष्ट्रीयत्व भरलेलें आहे.

ह्या राष्ट्रीय तत्त्वाची जोपासना करणें, परकीयांच्या भावना व परकीयांचे आदर्श यांच्या आक्रमणापासून त्याला वांचविणें हेंच आज अत्यंत महत्त्वाचें आणि आद्य कर्तव्य आहे. हें कर्तव्य जो करील तोच देशाचा खरा पुढारी. त्यांतून इतर जगाशीं आमचा संबंध आल्यामुळें इतर राष्ट्रांच्या आदर्शाहून भारतीय आदर्श किती श्रेष्ठ आहे, हें आम्हांस कळून आलें आहे. यास्तव कसेंही करून सर्व

बाजूंनीं—आपल्या रहाणींत, आपल्या विचारांत, आपल्या रिवाजांत आणि आपल्या राजकारणांत—आपण आपलेपणा सोडतां कामा नये. आपलें न सोडण्यांत थोडासा हटवादीपणा झाला तरी हरकत नाहीं; पण स्वधर्म सोडतां कामा नये. याच भावनेनें प्रेरित होऊन गांधींनीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला आहे. कारण आजच्या सर्व चळवळींत जोम येण्यास व त्यांची परंपरा चालू राहण्यास राष्ट्रीय शिक्षणावांचून दुसरा उपायच नाहीं. देशावर आज एकादा कहर गुदरला असेल तर तो पाश्चात्य शिक्षणाचा होय. एकाद्या मायावी राक्षसाप्रमाणें अत्यंत मोहक स्वरूप घेऊन तो आपल्यापुढें उभा आहे. आपण त्याला मित्र म्हणून कवटाळतों. अनेक वेळां देशाभिमानाचें रूप घेऊन तो आपल्यापुढें येतो व त्याचा अम्मल आपल्यावर इतका चढला आहे कीं त्याच्यापासून राष्ट्राला वेळींच सावध करणारा मनुष्य वऱ्याचशा देशबांधवांना देशबुडवासा वाटतो. 'पाश्चात्य सुधारणा तुम्हांला नको, गिरण्या नकोत, रेलवे नकोत, त्यांच्या सुटसुटीत आणि डौलदार पोषाखाचा तुम्ही तिटकारा करतां, चहाला व्यसन गणतां, असले तुम्ही रानटी लोक देशाची खात्रीनें तीन चार शतकें पीछेहाट करणार ' अशी ते एकच ओरड करितात. या करितां हिंदुस्थानचा खरा आदर्श काय आहे, हिंदु रहाणी कशी असली पाहिजे, याची लोकांना यथार्थ कल्पना देणारें शिक्षण आज पाहिजे आहे. हिंदुस्थानांत आज अन्नवस्त्राचा प्रश्न फार विकट झाला आहे हें सर्वजण कबूल करितात; पण तो प्रश्न सोडविण्यास अत्यंत अवश्य असलेलें जें शेती आणि विणकामाचें ज्ञान त्याचा राष्ट्रीय शिक्षणांत समावेश करण्याचें कोणीच मनावर घेत नाहीं. गांधी यांचे योजनेंत या दोन धंद्यांचें सामान्य पण अनुभविक ज्ञान अवश्य गणिलें आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, जें शिक्षण आज आपण तरुण पिढीस देतों, त्याचा प्रसार पाण्यावरील तेलाच्या थेंबाप्रमाणें सर्व समाजांत होईल तरच त्याला " राष्ट्रीय शिक्षण " हें नांव शोभेल. आणि सर्व शिक्षण मातृभाषेंतून दिल्यावांचून ही गोष्ट साधावयाची नाहीं. अशी गांधींची वालंबाल खात्री आहे. म्हणूनच त्यांच्या शाळेंत सर्व शिक्षण गुजराथींतून दिलें जातें.

सर्व हिंदुस्थानांत ऐक्य उत्पन्न करण्यासाठीं राष्ट्रीय भाषेची आवश्यकता आहे हें सर्वांस कबूल आहे, पण आपल्या राष्ट्रीयत्वास अनुकूल आणि बहुजनसमाजास

समजण्यास सोपी अशी भाषा काय ती हिंदीच आहे, हा निश्चय करून गांधींनीं तो आपल्या शाळेंत अमलांत आणलेला आहे. युरोपांत आपापल्या देशांतील शिक्षण सर्वांगपरिपूर्ण व्हावें म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यास मातृभाषेशिवाय अन्य एक दोन भाषा शिकविण्याची सोय केलेली असते. हिंदुस्थानांत त्याच हेतूनें हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, तेलगू, तामिल यांतील एक दोन भाषा शिकणें शक्य आहे व इष्टही आहे. याचीही व्यवस्था गांधींनीं केली आहे. पाश्चात्य शिक्षणांत आपणास अत्यंत मोहून टाकणारे विषय म्हणजे त्यांचें अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र, राजकारण आणि इतिहास, विज्ञान आणि यंत्रशास्त्र हे होत. गांधींचें म्हणणें कीं, हीं सर्व शास्त्रें धर्मशास्त्राचीं अंकित करून ठेविलीं तरच त्यांचा उपयोग. स्वैर वागूं दिल्यास आपल्या संस्कृतीचा तीं हां हां म्हणतां नायनाट करून टाकतील. या सर्व गोष्टींचा विचार करून राष्ट्रीय शिक्षणाची पद्धति ठरविली पाहिजे. आणि असें राष्ट्रीय शिक्षण सच्छील माणसांनीं शहरोशहरीं आणि खेडो-खेडीं राहून, पाहिजे त्याला फुकट दिलें पाहिजे असें गांधींचें म्हणणें आहे. धर्माच्या आणि राजतंत्राच्या अनंत बंधनांनीं आधींच जखडून गेलेल्या समाजावर शिक्षणासारख्या हितकर आणि पथ्यकर औषधाची कां असेना, सक्ति करणें गांधींनां अयोग्य वाटतें, इतके ते स्वातंत्र्याचे उपासक आहेत.

राष्ट्रीय शिक्षणाप्रमाणेंच त्यांनीं हातीं घेतलेला आणखी एक महत्त्वाचा प्रश्न गोरक्षण हा होय. या प्रश्नासंबंधीं त्यांचे विचार सामान्य धर्माभिमानी हिंदूंच्या विचारांहून फारच भिन्न आहेत. गोमातांचें रक्षण करण्यासाठीं आपल्या मुसलमान किंवा इतर बंधूंशीं मारामारी करणें किंवा त्याचा वध करणें हें गांधींना अर्थातच मान्य नाहीं. त्यांना असें करणें हें अत्यंत पापमूलक व अधर्म्य वाटतें. एकाद्या गाईची हत्या कसेंहि करून टाळलीच पाहिजे, अशी तीव्र भावना ज्याच्या कोमल अंतःकरणांत उत्पन्न होईल त्यानें हत्या करणाराला शक्य तों पर्यंत विनवावें आणि असेंही करून त्याचें मन न वळवितां आल्यास स्वतःचा प्राण खर्ची घालावा, परंतु दुसऱ्यास कोणत्याहि प्रकारची इजा करूं नये. बकरी ईदच्या दिवशीं आपल्या धार्मिक समजुतीप्रमाणें देवाला बळी देण्यासाठीं मुसलमान लोक गाईचा वध करतात. पण आपण हिंदुलोक नित्य प्रतिदिन तात्पुरत्या स्वार्थासाठीं गाई बैलांना परोपरीनें छळून खातों हें कांहीं अहिंसेचें लक्षण नव्हे ! देशांतील शेतीचा

आधार गाईबैलांवर आहे, व आहाराच्या बाबतींत बहुतांशीं सर्व प्रजेचा आधार दूध दुभत्यावरच आहे, हीं दोन कारणेंच मुसलमान बंधूंना गोहत्येपासून परावृत्त करण्यास पुरेशीं आहेत. मुसलमानांच्या धार्मिक आचाराच्या विरुद्ध जाण्याची आपली इच्छा नाहीं, आणि गोहत्येपासून आमचीं मनें कितीही दुखविलीं गेलीं तरी मुसलमान बंधूंस मारण्यास आह्मी कधीं ही उद्युक्त होणार नाहीं एवढी गोष्ट आपण त्यांना प्रेमानें पटवून दिली तर गोहत्या करण्याविषयींचा आग्रह मुसलमान बंधु खास सोडतील आणि हिंदु मुसलमानांत सलोखा घडवून आणण्याचे मार्गांतील ही प्रचंड धोंड नाहींशी होईल.

सामान्य जनसमूहांतील परस्पर प्रेमभाव आणि माणूसपणा नष्ट करणारा आणि स्वाभिमानवृद्धीस कीड लावणारा एकादा प्रसंग असल्यास तो रेल्वे-प्रवास होय. या प्रवासांतील खऱ्या अडचणी आणि दुःखें काय आहेत हें प्रत्यक्ष अनुभवून पाहण्यासाठीं हिंदुस्थानांत पाय ठेवतांक्षणींच या बॅरिस्टर फकीरानें तिसऱ्या वर्गांतूनच प्रवास करण्याचा संकल्प केला आणि या तीन साडे तीन वर्षांतील जवळ जवळ चौथा भाग त्यांनीं आगगाडींत कंठला आहे. या प्रवासांतील अनुभवाचें सार त्यांनीं आपल्या एक दोन भाषणांतून आणि जाहीर पत्रांतून दिलें आहे.

आजच्या परिस्थितींत चळवळ कोणत्या प्रकारें केली पाहिजे, राष्ट्रोद्धारार्थ कोणतीं कामें हातीं घेतलीं पाहिजेत, या विषयींची गांधींची दिशा आपण आतांपर्यंत पाहिली. ही त्यांची योजना वाचून विचारी वाचकांच्या हें लक्षांत आलेंच असेल कीं, अमुक कायदा घडवून आणावा, अधिकारविभागणी अमुक तत्त्वांवर व्हावी, अमुकाच्या हातीं सत्ता असावी, वगैरे बाह्य घडामोडींवर त्यांची मुळींच भिस्त नाहीं. आज असलेल्या कायद्यांचा दुरुपयोग होतो, तसाच नवीन कायद्यांचा व्हावयाचा. आज एक वर्ग जुलूम करितो, उद्यां दुसरा करील; आज एकाची गैरसोय होते, उद्यां दुसऱ्याची होईल; एवंच, समाजाची स्थिति आहे तशीच रहावयाची. गांधींनां याहून अधिक स्थायी कार्य करावयाचें आहे, जेणेंकरून समाजांतील शील, धर्म, बुद्धि आणि आत्मिक सामर्थ्य वाढेल असे उपाय योजावयाचे आहेत. आणि हें सर्व त्यांना लोकांचीं मनें वळवूनच करावयाचें आहे.

# ३

# स्वभाववर्णन.

गांधी यांचें नुसतें नांव ऐकून जे गृहस्थ त्यांस भेटावयास येतात, त्यांनीं जर त्यांचा फोटो पूर्वी पाहिला नसेल तर दर्शन होतांच त्यांची बहुधा निराशाच होते. कारण परदेशांत गेलेल्या हजारों हिंदुमुसलमानांवर आपल्या तेजाची छाप पाडणारी मूर्ति, पोटार्थी माणसांना स्वार्थत्यागच काय, अलौकिक आत्मयज्ञ करण्यासही तयार करणारी व्यक्ति, जनरल स्मट्स् सारख्या कसलेल्या मुत्सद्यास पुरून उरणारी ही शक्ति आणि आत्मतेजानें झळकणारी ही विभूति एका तेजःपुंज भव्य आणि धिप्पाड शरीरांत वास करीत असली पाहिजे अशीच स्वाभाविक कोणाचीहि कल्पना असते. परंतु प्रत्यक्ष दर्शन होतांच गुजराथी लोकांच्या साधारण बांध्याच्या मानानेंहि लहान, ठेंगू, सडपातळ सौम्य आणि स्वतःला शक्य तोंवर पुढें न आणणारी अशी एक मूर्ति पाहून आपला अंदाज चुकल्याबद्दल थोडासा विरस, आणि इतक्या किरकोळ शरीर-यष्टींत इतके थोर गुण कसे राहतात याबद्दलचा विस्मय हीं दोन्हीं एकदम उत्पन्न होतात. त्यांच्या रहात्या जागीं त्यांना भेटावयास गेलें म्हणजे बहुत करून ते उघडे किंवा एक सदरा घातलेले दृष्टीस पडावयाचे. हिंवाळ्यांत त्यांची आवडती, जरा जर्जरित सफेत काठियावाडी घोंगडी त्यांच्या अंगावर असलेली दिसावयाची. डोक्यावरचे केस बारिक कापलेले, दाढी साफ केलेली, आणि लहानशा शेंडीस कशी बशी गांठ दिलेली; डोक्यावरील तुरळक रुपेरी केस, आणि पुढचे एकदोन पडलेले दांत पाहून वयाच्या मानानें या शरीरानें अत्यंत कष्ट सोसले आहेत असें कोणीहि ताडील. तरी परंतु कष्ट सोसल्यामुळें चेहऱ्यावर येणारा राकट कठोरपणा त्यांच्या चेहऱ्यांत कधींहि मुळींच दिसून येत नाहीं. तोंडवळ्याचे मानानें जरा आधिक पसरट असलेले आणि वांकलेले कान जरी विशेष प्रामुख्यानें दिसतात तरी त्यांचे अत्यंत प्रेमळ आणि आध्यात्मिक शांति दर्शविणारे डोळेच प्रथम लक्ष्य खेंचतात. सामान्यपणें अगदीं शांत आणि सभोंवतालच्या गोष्टींकडे थोडेंसें दुर्लक्ष दर्शविणारी त्यांची दृष्टि प्रसंगानुसार किती विविध भाव व्यक्त करूं शकते, हें त्यांच्या विशेष सहवासांत आल्यानेंच कळूं शकतें. सर्व काळ बंद असलेले त्यांचे ओंठ त्यांच्या मनोवृत्ति, त्यांची आवडनावड दाबून टाकण्याचा प्रयत्न बरीच वर्षे झालीं असल्याची साक्ष देतात; पण जो भाव

चेहऱ्यावर उमटत नाहीं, तो विजेच्या चमकेप्रमाणें क्षणांत डोळ्यांमध्यें येऊन गेलला दिसतो. यामुळें जरी त्यांनीं बोलून कोणाचीहि हिंसा केली नाहीं, अथवा आपली नापसंती दर्शवून कोणाचें मन खट्टू केलें नाहीं, तरी डोळ्यांतील चमक सहवासांतील मनुष्यास भिववून सोडल्याखेरीज रहात नाहीं. त्यांच्या दृष्टींतून सामान्यपणें जरी प्रेमाचे किरण वाहत असतात तरी या जगाहून अलिप्त व संसारांत नसलेली अशी एकादी गूढ वस्तु शोधण्यांत गढलेली अशी त्यांची मुद्रा असते. त्यांच्या त्या सरळ आणि पातळ नाकावरून कुलीनपणाची आणि मानी वृत्तीची ओळख कोणासही पटेल. ते बोलूं लागले म्हणजे त्यांचा प्रत्येक शब्द विचारपूर्वक आणि तोलून पडलेला दिसतो. सरोवराचें शांत पाणी, वाऱ्याचे झुळके-बरोबर जसें तरल होतें तसें गांधी बोलूं लागतांच त्यांचा चेहरा प्रफुल्ल होतो. प्रथमदर्शनीं त्यांचें शरीर जितकें रोड वाटतें तितकें रोड तें नाहीं. त्यांची छाती चांगली भरलेली, आणि त्यांच्या पायांच्या पोटऱ्या चांगल्या पिळदार आहेत. चालतांना एक पाय जरा दूर टाकून चालण्याची त्यांची संवय असल्यामुळें त्यांच्या चालण्यांत कोठें तरी चुकतें असें पाहणारास वाटतें.

त्यांच्या एकंदर वागण्यांत आणि हालचालींत सौम्यपणा, दुसऱ्याच्या सुख-समाधानाची आणि सोयीची काळजी आणि एक प्रकारचा पिढीजाद मोठेपणा दिसून येतो. त्यांची बोलण्याची पद्धतिहि लक्षांत भरण्यासारखी आहे. अगदीं मोठीं मोठीं तत्त्वें, व्यापक सिद्धांत, आणि गूढ अनुभव ते इतक्या सोप्या भाषेंत बोलतात कीं सामान्य मनुष्यास आपण एकाद्या जाडया विद्वानाबरोबर बोलत आहोंत अशी शंका देखील यावयाची नाहीं. अगदीं सामान्य जनतेची भाषा ते बोलतात. त्यामुळें कोणालाही त्यांच्याशीं अगदीं मोकळेपणा वाटतो. अर्थात् त्यांच्या भाषेंतील गूढ रहस्य जो तो आपल्या अधिकाराप्रमाणें कमी अधिक ग्रहण करतो. संभाषणामध्यें समोरच्या मनुष्याचे विचार ते केव्हांहि दाबून टाकीत नाहींत. प्रत्येकाला आपलीं मतें व आपले विचार खुलेपणानें व्यक्त कर-ण्याला ते उत्तेजन देतात. आणि दुसऱ्याचा मुद्दा थोडक्यांत बिनचूक समजून घेऊन आदरपूर्वक त्याचें विवेचन करितात. त्याच्या विचारांत किंवा भाषेंत अस्पष्टपणा किंवा घोटाळा असल्यास त्याच्याच दृष्टीनें तो कसा सुधारावा याचें सहज सूचन करून विवेचन सुलभ आणि अधिक बोधप्रद करतात. इतकी पूर्व

तयारी केल्यावर आपलें उत्तर इतकें थोडक्यांत व निश्चयात्मक सांगतात कीं, त्या प्रश्नाचा तेव्हांच निकाल लागतो.

त्यांच्या बोलण्यांत अतिशय सुंदर विनोद भरलेला असतो. कोणाशींही बोलतांना त्याला समजेल आणि रुचेल अशा प्रकारचा त्यांचा विनोद असतो. अत्यंत निर्दोष आणि अंतःकरणास केव्हांही न झोंबणारा असा असूनही तो पुष्कळदां साभिप्राय असतो. एकाद्यास कांहीं विशेष सांगावयाचें असलें तरी बहुधा सहजासहजीं विनोदांत ते सांगून जातात. त्या वेळच्या त्यांच्या बोलण्यांतील गांभीर्य एकाद्याला समजलें नाहीं तरी थोडा विचार केल्यानें त्यांचा भाव समजून येतो. आणि एकाद्याच्या ध्यानांत नच आल्यास पुन्हां तसाच प्रसंग आला म्हणजे गांधी पूर्वीच्या प्रसंगाची आठवण देतात. गांधींचें गांभीर्य, त्यांची सत्य-निष्ठा त्यांचें अहिंसाव्रत आणि त्यांची प्रखर कर्तव्यजागृति हीं पाहतां त्यांच्या स्वभावांत इतका विनोद कोठून राहिला आहे याचें आश्चर्य वाटतें; पण विनोद हें त्यांच्या स्वभावांतील एक प्रधान अंग आहे, यांत संशय नाहीं. गांधींच्या बरोबर काम करीत असतांना कितीहि श्रम करावे लागले तरी त्यांच्या प्रेमळ विनोदाच्या वर्षावामुळें बरोबरच्या लोकांचें मन प्रसन्न राहतें आणि कष्टाचें कांहीं वाटेनासें होतें.

संस्कृतची अत्यंत वरची पायरी म्हणजे साधेपणा होय, असें जें म्हणतात, तें त्यांच्या बाबतींत दिसून येतें. पोषाख, आहार, राहणी, भाषण, सर्वच बाबतींत त्यांचा साधेपणा अगदीं घेण्याजोगा आहे. त्यांची भाषा अगदीं साधी असते, अगदीं सामान्य लोकांस समजेल इतकी साधी आणि अत्यंत सुसंस्कृत मनुष्याचे कानांस आनंद देईल इतकी ती अभियुक्त असते. अत्यंत साधें वाक्य पण जों जों त्याचा विचार करावा तों तों अत्यंत खोल आणि व्यापक अर्थ त्यांत भरलेला आढळतो. आणि वाटूं लागतें कीं, हें वाक्य ते सहज बोलून गेले आहेत, तरी अनेक वर्षांच्या चिंतनाचें आणि अनुभवाचें सार त्यांनीं त्यांत ओतलें आहे. त्यांच्या भाषेंतील साधेपणांत इंग्रेजी जाणणाराला बायबलांतील भाषेची छटा दिसून येते. मग ती बायबलाच्या सूक्ष्म अध्ययनामुळें आली असो, किंवा मनुष्यजन्मावर खूप खोल विचार केल्यामुळें आली असो. कारण आध्यात्मिक दृष्टीनें मनुष्यजन्माचा विचार करणारे आमचे साधुसंतहि अशीच साधी व परिणाम-

कारक भाषा बोलतात, पण बायबलचा आणि श्रेष्ठ इंग्रजी वाङ्मयाचा गांधींच्या भाषेंत कांहींच अंश नाहीं, असें म्हणतां येत नाहीं. कारण त्या दिशेनें त्यांचें अध्ययन चांगलेंच असून त्यांची इंग्रजी इंग्रजांनाहि मोहित करणारी आहे. अर्थातच तिचा त्यांच्या गुजराथी भाषेवर परिणाम होणें अनिवार्य आहे.

त्यांचा आहारहि अगदींच साधा असतो. आयुष्यांत उपरति होण्यापूर्वी ते कांहीं सामान्य रसज्ञ व भोक्ते नव्हते. खाण्याचे बहुतेक सर्व प्रकार स्वतः करून किंवा करवून खाण्यांत आणि नवीन नवीन प्रकार शोधून काढण्यांत गांधींनीं ( व त्यांचे जर्मन मित्र मि. कॅलनूबॅक् ) यांनीं कमी कौशल्य संपादन केलें नाहीं. परंतु सर्व प्रकार हातानें करण्याच्या ज्या संवयीनें त्यांना एका काळीं एवढे भोक्ते बनविलें होतें, त्याच स्वावलंबनानें त्यांस आज स्वतःचा आहार अत्यंत साधा करण्यासही शिकविलें आहे. आज त्यांच्या आहारांत दूधदुभतें, मीठ मिरची, मसाला वगैरे कांहीं एक नसतें. फोडणीतळणीची खटपट नसते. फक्त पांचच पदार्थ शिजवून किंवा शेकून ठेविले म्हणजे झालें.

त्यांच्या रहाणींतही तोच साधेपणा दिसून येतो. एक जाडेंभरडें धोतर, सदरा व टोपी हा त्यांचा सामान्य पोषाख झाला. यांतील टोपी देखील आश्रमांतच बनलेली, वाटेल तेव्हां धुतां येण्याजोगी असते. विशेष प्रसंगीं हे काठेवाडी अंगरखा, काठेवाडी फेटा, व उपरणें वापरतात. आणि बहुतकरून सफेत घोंगडीही जवळ असावयाचीच. राहत्या जागींही टेबलखुर्च्या किंवा गादीतक्के, यांची भानगड त्यांनीं ठेविलेली नाहीं. खाण्यापिण्याचीं त्यांचीं भांडीं देखील अगदीं मोजकीं–लाकडाचीं दोन पाळीं, एक चमचा, आणि जस्ताचे एक दोन लहानसे डबे, यांत सर्व कांहीं आलें.

हा सर्व साधेपणा म्हणजे त्यांची साधारण आवड किंवा स्वभाव आहे एवढेंच नाहीं तर विचारा अंतीं ठरविलेलें त्यांचें तें एक महान् तत्त्व आहे. त्यांचा समाजरचनेचा आदर्शही त्याच तत्त्वावर ठरविला गेला आहे. सामाजिक संबंध गुंतागुंतीचे असतां कामा नयेत. गिरणींतील चक्रें ज्याप्रमाणें त्यांना नकोत त्याचप्रमाणें समाजरचनेंतही चक्रांत चक्रें अडकलेलीं त्यांस नको आहेत. हें आर्य संस्कृतीचें त्यांना वैशिष्ट्य वाटतें. आत्म्याच्या उन्नतीच्या मार्गांत उपाधि शक्य तितकी कमी असावी. जों जों व्याप अधिक तों तों तो अधिक संतापाला कारणीभूत होतो,

हें ते जाणून आहेत. म्हणून उपाधि कमी करून, निष्कारण व्यापाची छाटाछाट करून, जो वेळ आणि शक्ति वांचेल ती आत्मोन्नतीच्या कामीं लावावयाची, असा त्यांचा सिद्धांत आहे; आणि तो त्यांच्या स्वभावांत परिपूर्ण उतरला आहे.

त्यांच्या या साधेपणांत तितक्याच जोराच्या स्वदेशी बाण्याची भर पडली आहे, कोणतीहि आवश्यक वस्तु हातानें करतां येत असल्यास विकत घ्यावयाची नाहीं; मग घरीं तयार करतांना ती महाग कां पडेना. जवळपासच्या व्यापाऱ्याकडे एकादा जिन्नस मिळत असला तर तो दुरून मागवावयाचा नाहीं. शिष्टाचारांत हिंदी रिवाजच पाळावयाचे, संभाषणांत मातृभाषा किंवा राष्ट्रभाषा ( हिंदी ) बोलावयाची. पोषाखांत काठेवाडी पद्धतिच आदरावयाची. पत्रव्यवहारांत इंग्रजी तारीख न लिहितां हिंदु मितिच लिहावयाची, अशा एक का दोन, हरएक बाबतींत स्वदेशी त्यांच्या हाडीं माशीं खिळून गेली आहे. यामुळें खरा खरा हिंदु सद्गृहस्थ कसा असतो किंवा असावा हें त्यांच्या रहाणीवरून पाहून घ्यावें. अतिथींचा सत्कार कसा करावा हें गांधींजींकडूनच शिकून घ्यावें. त्याला प्रसन्न राखण्याची उत्कंठा, त्याच्या बारिक सारिक गरजांकडे लक्ष पुरविण्याची दक्षता आणि हें सर्व कोणत्याही प्रकारचें अवडंबर न माजवितां करण्याची त्यांची खुबी, हीं खरोखरच अनुकरणीय आहेत. विश्वजित् यज्ञ करून सर्वस्व दान करणाऱ्या एकाद्या राजाप्रमाणें जरी आज ते निर्धन झाले आहेत आणि अस्तेय अपरिग्रहादि कडक व्रतें घेऊन जरी ते संन्यासी बनले आहेत तरी आदरातिथ्य करितांना त्यांचें खानदानी वागणें झांकलें जात नाहीं. गांधींना सर्व गोष्टींत मदत करणाऱ्या आणि अनुरूप अशा पत्नी लाभल्या आहेत आणि आदरातिथ्य व शुश्रूषा या बाबतींत तर या दंपतीमध्यें जणूं काय स्पर्धाच चाललेली असते. गांधी हे स्वतः साक्रेटीस, तुकाराम व टॉलस्टाय यांच्या कोटींतले असूनही पूज्य सौभाग्यवती कस्तुरबाईच्या बाबतींत जुना ऐतिहासिक क्रम चुकलेला दिसतो. त्यांना झँटिपी किंवा जिजाईच्या पंक्तीस न बसवितां दमयंती आणि सीता यांच्या पंक्तीस बसवाव्या लागतील. जी गोष्ट आदरातिथ्याची, तीच आजाऱ्यांच्या शुश्रुषेची. अनेक वर्षांच्या अनुभवानें आणि स्वाभाविक कळवळ्यानें गांधी हे शुश्रूषेच्या कामीं तरबेज झाले आहेत. लहानपणीं त्यांना आपल्या वडिलांची शुश्रूषा करण्याचें भाग्य प्राप्त झालें होतें. घरीं मुलाबाळांचीं दुखणीं काढण्याचा अनुभव बहुतेक आईबापांना येतोच. या

खेरीज जोहान्सबर्गमध्यें जेव्हां प्लेग सुरू झाला, व म्युनिसीपालटी लोकांना कांहींच मदत करीना तेव्हां गांधींनीं स्वतःचें इस्पितळ उघडून प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषा आरंभिली आणि ही सेवा त्यांनीं इतकी एकनिष्ठपणें केली कीं म्युनसीपालिटीला आपल्या हलगर्जीपणाची लाज वाटून तिनेंही शहरसफाईचें काम हातीं घेतलें आणि अशा चिकाटीच्या प्रयत्नांनीं प्लेगोबांना आपला गाशा त्याच वर्षी कायमचा गुंडाळावा लागला. रुग्णपरिचर्येच्या शास्त्रांतील यापुढचे धडे गांधींनीं बोअर युद्धांत व झूलू बंडांत घायाळ शिपायांची मलमपट्टी करतां करतां घेतले. रोग, आरोग्य, आहार, यांवरील बरेंचसें वाङ्मय त्यांनीं वाचलें. निर्भयपणें अनेक प्रयोगहि करून पाहिले. हें सर्व ज्ञान हल्लींच्या युद्धांत विलायतेंतील हिंदी विद्यार्थ्यांची अँब्यूलन्स कोर तयार करतांना त्यानां उपयोगी पडलें. मनुष्यमात्राविषयींच्या त्यांच्या स्वाभाविक कळकळीला इतक्या अनुभवाची जोड असल्यावर त्यांच्या शुश्रूषेविषयीं अधिक तें काय लिहावें ?

एकादा आजारी मनुष्य गांधींच्या तडाक्यांत सांपडला कीं त्यांच्या प्रेमाच्या जाळ्यांत तो पकडला गेलाच ! मग त्यांतून त्याला सुटणें अशक्य होतें. मग तो जन्माचा त्यांचाच झाला असें समजावें. मनुष्याला नडल्या वेळीं मदत करून, प्रत्येकाच्या यथार्थ गुणाचें चीज करून, केव्हां दोषांवर पांघरूण घालून, तर केव्हां स्पष्टवक्तेपणानें प्रेमळ शब्दांत एकाद्याचे दोष दाखवून देऊन, माणसांना ते आपलेसे करतात. आणि एकदा त्यांनीं मनुष्य आपलासा केला म्हणजे परोपरीनें त्याला त्याचे दोष सोडावयाला लावून उन्नतीच्या मार्गास लावतात. ज्याला आपला म्हटला त्याच्या सर्व कृत्यांची जबाबदारी आनंदानें आपल्या माथीं घेऊन आणि अनेक महत्त्वाचीं कार्यें निःशंकपणें त्याच्यावर सोंपवून त्याचें मन ते भारून टाकतात. आणि या वशीकरण विद्येनें मनुष्य एकदां आपलासा झाला म्हणजे ज्या कर्तव्यबुद्धीनें हे तपस्वी स्वतःवर दोषाविष्करणाचे कोरडे निर्दयपणें उडवून घेतात त्याच कर्तव्यबुद्धीला जागून स्वकीयांचे बारिकसारिक दोषही कांहीं संकोच न बाळगतां उघडे करितात. किंबहुना गांधींकडून अशा प्रकारचे कोरडे बसूं लागले म्हणजे समजावें कीं त्यांनीं आपला परिपूर्ण अंगीकार केला आहे.

दोष उघडे करण्यांत त्यांची अशी एक खुबी आहे कीं, ज्याचे दोष दाखवा-वयाचे असतील तो हजर असतांनाच, मग तो एकटा असो अगर चारचौघांत असो, जें कांहीं बोलावयाचें तें बोलून घेतील. अगदीं स्पष्ट शब्दांत, हृदयाची कालवाकालव होईल इतक्या निर्भीडपणानें बोलतील पण कोणासहि गांधींच्या तोंडून चार चौघांत आपले दोष ऐकण्याची पाळी आली तरी त्याबद्दल विषाद वाटलेला नाहीं; कारण सत्यवादी गांधी अहिंसाव्रतहि पाळीत असतात. प्रति-पक्षाचे विचारसरणीचा धुव्वा उडवतांना देखील त्याच्या गुणांचें, सद्धेतूचें कौतुक करण्यास ते विसरत नाहीं. एकाद्याच्या परोक्ष त्याजविषयीं गांधींच्या तोंडून स्तुतीखेरीज कांहींच यावयाचें नाहीं. मिशनऱ्यांचा दोष दाखवावयाचा असला तर मद्रासेस जाऊन मिशनऱ्यांच्या परिषदेपुढें एकाद्या मर्दाप्रमाणें "बाबानों तुम्ही हिंदुस्तानांत बाटविण्याचें काम सोडून द्याल तर तुमचीं परोपकाराचीं हजारों कामें फलद्रूप होतील आणि ख्रिस्ताचे तुम्हीं खरे अनुयायी व्हाल" असें ते सांगतील. आर्य समाजावर टीका करावयाची असेल तर ती गुरुकुलांत करतील. राजे-रजवाड्यांची कानउघाडणी करणें असेल तेव्हां हिंदु विश्वविद्यालयाच्या स्थापने-साठीं सर्व सामंतमंडळ एकत्र झालें असतां ती संधि साधतील. राष्ट्रीय पक्षास एकादी प्रेमाची सूचना देणें असेल तेव्हां ती बेळगांवच्या प्रांतिक परिषदेंतच देतील. समाजसुधारकांना त्यांचें कोठें चुकतें, हें त्यांच्याच अध्यक्षांच्या भाषणावर त्यांच्याचसमोर टीका करून दाखवून देतील. 'मनांत राजद्रोह असेल तर तो निर्भयपणें बोलून दाखवा आणि शिक्षा सहन करा, लपून छपून बाँब फेकूं नका,' असें सरकारी अधिकाऱ्यांसमोर बंगाली विद्यार्थ्यांना कळवितील. पतपेढ्यांच्या चळवळींत आत्म्याची आवश्यकता आहे असें तज्ञ मंडळी जमली असतां स्पष्ट शब्दांत त्यांना सांगतील. आणि काँग्रेसनें मागितलेलें स्वराज्य न मिळाल्यास अतःपर हिंदुस्थानांत शान्ति नांदणें शक्य नाहीं असें माँटेग्यू साहेबांनां सांगतील. अशा रीतीनें हरएक व्यक्तीस किंवा पक्षास आपले विचार प्रत्यक्ष सांगितल्यानें गैरसमज होण्याचा संभव राहत नाहीं आणि अप्रिय पण पथ्य बोलूनहि सर्वांशीं त्यांचा आपलेपणा वाढतो. दोष दाखवितांनां ते आपलेपणाच्या वृत्तींत येऊन मित्रभावानेंच बोलत असतात.

गांधींची कर्तव्यनिष्ठा अलौकिक आहे. ज्या समाजांत आपण रहातों त्यांतील प्रत्येक दोषाचे आपण भागीदार आहोंत आणि जों पर्यंत ते दोष दूर करण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न आपण केले नाहींत तों पर्यंत त्या सर्व दोषांचें पाप आपल्या माथीं आहेच. ज्या ठिकाणीं इतर लोक " जाऊंद्या कीं, आपल्याला काय करावयाचें आहे ? आपण आपल्या पुरतें करावयाचें तें केलें म्हणजे झालें " असें म्हणून डोळेझांक करितात, तेथें गांधी स्वतःच्या सुख सोयीकडे न पाहतां, वाईटपणा पदरीं आल्याची क्षिति न बाळगतां, आपल्या कार्याचा परिणाम " कुशल " झाल्या शिवाय राहणार नाहीं अशी अचल श्रद्धा बाळगून, कसल्याहि बिकट कामांत हटकून पडावयाचे आणि एकाद्या कामांत पडलें म्हणजे " अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत् " अशा निर्धारानें झटावयाचें, हें त्यांचें ब्रीदच आहे. कोणतेंहि काम करितांना " सत्यमेव जयते नाऽनृतं " या विश्वासानें ते कार्य करीत असतात. आपल्या बाजूला द्रव्यबळ, मनुष्यबळ किंवा काळाची अनुकूलता आहे किंवा नाहीं या विचारा पेक्षां आपला सत्पक्ष आहे किंवा नाहीं हेंच ते पहात असतात. पहात असतात म्हणण्यापेक्षां अंतःप्रेरणेनें ते ठरवीत असतात असें म्हणणेंच अधिक खरें होईल. कारण मनुष्य जातीच्या सद्बुद्धीवर त्यांचा इतका विश्वास आहे कीं, कोणाही प्रतिपक्ष्याचा ते भलेपणा धरून चालतात. एकाद्याचा अपराध शाबीत होईपर्यंत तो निरपराधी सज्जन आहे हें जसें आंधळी न्यायदेवता गृहीत धरून चालते, त्याच प्रमाणें गांधींनाही वाटत असतें. मग साधक बाधक सर्व प्रमाणें त्यांच्या समोर कोठून येणार ! पण जी गोष्ट तर्कानें किंवा अनुमानानें होत नाहीं ती त्यांच्या अंतःप्रेरणेनें घडून येते. सहज स्फूर्तीनें त्यांना परिस्थितीचें आकलन आणि माणसाची पारख बिनचूक होते. अंतःकरणाचा निर्णय ठरल्यावर मग त्यांची कुशाग्र बुद्धि साधक बाधक प्रमाणें गोळा करतेसें दिसतें. ही स्थिति चित्तशुद्धि आणि आत्म्यावर दृढ विश्वास असल्या शिवाय प्राप्त होत नाहीं. ही साधनसंपत्ति जेथें असेल तेथें अंतःप्रेरणेंत चूक होण्याचा संभव नसतो. याच संपत्तीच्या जोरावर स्वतःवर किंवा दुसऱ्यावर हवे तसले नवीन प्रयोग करण्याचें धैर्य गांधींना आलें आहे. त्याच्याच जोरावर प्रत्येक वेळीं प्रतिपक्षानें कितीही लटपटी केल्या तरी आपण न्यायाचा मार्ग सोडावयाचा नाहीं, प्रतिपक्षास शक्य तितक्या सवलती द्यावयाच्या, त्याच्या दृष्टीनेंही विचार करा-

वयाचा, तो इतर अडचणींत सांपडला असतां दिलदारपणानें आपला सामना तहकूब ठेवावयाचा, इतकेंच नव्हे तर त्या अडचणींतून बाहेर पडण्यास त्याला हातभार लावावयाचा, अशा प्रकारचें धर्मयुद्ध त्यांना करतां आलें आहे. आणि अशा प्रकारें ते धर्माचें रक्षण करीत असल्यामुळें धर्म नेहमीं त्यांचें रक्षण करीत असतो. ही आध्यात्मिक वृत्ति हेंच गांधींचें जीवनसर्वस्व आहे. यामुळेंच त्यांना "आर्यसंस्कृतीचें उत्कृष्ट प्रतिनिधि" हें गौरवयुक्त नांव शोभतें. त्या आध्यात्मिक वृत्तीला त्या आर्य हृदयाला--पाश्चात्य शिक्षणाची अनुभवाची आणि अनुवंशिक राजकारणपटुतेची जोड मिळाल्यामुळें दुधांत साखर आणि केशर पडल्यासारखें झालें आहे.

गांधी यांची कडक आणि तापसी वृत्ति पाहून सामान्य लोकांना असें वाटतें कीं, ते अगदींच रूक्ष असावेत. महत्त्वाच्या कार्यामध्यें नेहमीं व्यग्र असल्यामुळें आणि वेळेचा जास्तींत जास्त उपयोग करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळें त्यांच्या रहाणींत जो गबाळेपणा दिसून येतो त्यामुळें तर ही समजूत अधिकच दृढ होते. पण विशेप परिचयांतील माणसांना त्यांच्या संभापणांतील चातुर्य, पत्रें लिहिण्याची त्यांची शैली, एकाद्या प्रसंगाचें वर्णन करितां दिसून येणारी रसिकता, संगीताची आवड, मुलांशीं चालणारा त्यांचा विनोद, बारिक सारिक गोष्टीही अगदीं यथायोग्य करण्याचा त्यांचा आग्रह हीं नेहमीं दिसून येत असल्यामुळें त्यांच्या हृदयांतील काव्य आणि त्यांचीं सौंदर्योपासना यांची साक्ष पटते.

सौंदर्योपासना म्हणजे कांहीं विलासिता नाहीं. शृंगारिक कादंबऱ्या वाचून मिटक्या मारणें, ऐषआरामाचे फॅन्सी पदार्थ विकत घेणें, नाजुकपणें बोलणें आणि लैली मजनूनच्या कविता गाणें ही कांहीं सौंदर्योपासना नव्हे. सौंदर्योपासकाला साधेपणा नेहमीं प्रिय असतो. प्रसंगीं वज्राहूनही कठीण होण्यांत ही त्याला आनंद वाटतो. विविध प्रसंगांनीं भरलेल्या गांधींच्या चरित्रांत सर्व रंग खुललेले दिसतात. धर्मनिष्ठेच्या सफेत रंगावर परोपकार बुद्धीचा लाल रंग उठावदार दिसतो. त्यांतच यथास्थळीं ऐश्वर्याचा हिरवा रंग आणि राजकारणाची नीलिमा चमकतांना दृष्टीस पडते. लहानपणांतील धर्माविषयींच्या साशंक वृत्तीनें काळया रंगाची उणीव भरून काढली आहे. आणि या सर्व चित्राच्या मागें कुलीनपणा आणि मानी वृत्ति यांची सुवर्णछटा सर्वत्र भरलेली दिसते आणि विशेष हा कीं, हें चित्र ऋतुक्रमाप्रमाणें बदलत गेलें आहे! आणि हे फेरफार कितीहि चित्रविचित्र असले तरी 'चारुदर्शन

यंत्रां'तील पैलुदार खडे कसेहि पडले तरी जसें चित्र सुबकच उमटतें तसेंच गांधी यांच्या जीवनांतील कोणताहि प्रसंग रमणीयच आहे.

इंद्रधनुष्यांत ज्याप्रमाणें सातहि रंगांचा बेमालूम मिलाफ झालेला असतो, तसाच गांधींच्या जीवनांत भावनांचा आणि विचारांचा, मेंदूचा आणि हृदयाचा योग्य प्रमाणांत मिलाफ झाला आहे. आणि बुद्धि व अंतःकरण यांना जुळेल अशीच त्यांची कार्यशक्तिहि आहे. असा हा अपूर्व संयोग क्वचितच पाहव-यास मिळतो.

गांधींच्या प्रत्यक्ष सहवासांत आल्याशिवाय त्यांच्या जीवनांतील या सूक्ष्म गोष्टी नजरेस यावयाच्या नाहींत; कारण त्यांनीं केलेल्या अनेक कार्यांतील सर्वच कार्यें बाहेर आलेलीं नाहींत. त्यांचीं अनेक कार्यें आणि त्यांचे हेतु आजवर अज्ञातच राहिले आहेत. व कदाचित् ते तसेच राहतील. आजच्या आत्मश्लाघेच्या मन्वंतरीहि गांधीजींना मूकसेवाच आवडते. घरबसल्या सिनेमामधून देशदेशांतरींचे देखावे पाहिल्याप्रमाणें गांधींचें चरित्र सहजासहजीं समजण्याजोगें नाहीं. वर्षांचीं वर्षें पायीं चालून, श्रद्धेनें तीर्थ-यात्रा करणाऱ्या यात्रेकरूप्रमाणें त्यांच्या जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यानेंच त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी समजतील. ज्यांना त्यांचा प्रत्यक्ष परिचय करून घेतां येणें शक्य नाहीं त्यांच्या माहिती साठीं, आणि त्यांच्या दर्शनाचा लाभ ज्यांना मिळूं शकेल अशा वाचकांना त्यांच्या सत्संगापासून विशेष फायदा करून घेतां यावा यासाठीं, त्यांचीं भाषणें व लेख महाराष्ट्र वाचकांना देत आहोंत. या भाषणांतील प्रत्येक वाक्यांत, खोल विचार करून ठरविलेले सिद्धांत आणि अनेक प्रसंगीं मिळविलेले अमोल अनुभव गांधींनीं ग्रथित केले असल्यामुळें त्यांचें लक्षपूर्वक वाचन केलें पाहिजे. त्यांची कार्याची दिशा जशी अलौकिक आहे, तशीच त्यांची भाषाहि अलौकिक आणि त्यांच्या विशिष्ट वृत्तीची द्योतक आहे. कित्येक वाक्यें आणि शब्दसमूह त्यांनीं नवीनच निर्माण केले आहेत. आपल्या विचारांची सूक्ष्मता दाखविण्यासाठीं कांहीं शब्द त्यांना नवीन अर्थी वापरावे लागले आहेत आणि सत्य बोलूनही कोणाचें मन न दुखविण्याचे त्यांचे प्रयत्नांत कित्येक विचार त्यांनीं फारच अपूर्व आणि मनोरंजक रीतीनें मांडले आहेत. वरवर वाचणारांसहि त्यांच्या लेखनशैलीवर संस्कृत आणि विशेषतः इंग्रेजी भाषेची कशी आणि किती छाप पडली आहे हें सहज दिसून येईल. मात्र ते

लेखन-कला-निपुण असल्यामुळें ती छाप बेडौल दिसत नाहीं. त्यांच्या या भाषाशैलीची मराठी वाचकांना कल्पना यावी म्हणून भाषांतरांत सफाईकडे थोडें दुर्लक्ष करून ही त्यांची विशिष्ट शब्दरचना आणि लेखनशैली कायम राखण्याचा प्रयत्न केलेला वाचकांना दिसून येईल. आतां वाचकांना विनंति एवढीच कीं, त्यांनी ध्यानपूर्वक सर्व प्रकारचे पूर्वग्रह सोडून गांधींचा उपदेश श्रवण करावा. त्याचें विचारपूर्वक मनन करावें आणि ज्या गोष्टी त्यांना पटतील, त्या एकदम अंमलांत आणण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा. म्हणजे लवकरच त्यांच्या नजरेस येईल कीं त्यांचीं मुख्य तत्त्वें मान्य केल्यावर त्यांचा जवळ जवळ सगळाच उपदेश मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. गांधींचे सर्व विचार एकाच तत्त्वांत गोंवलेले असल्याकारणानें त्यांत एकरूपता आहे. आणि तें तत्व धर्मनिष्ठा हें असल्याकारणानें आज नाहीं उद्यां तें सर्व हिंदूंना आणि हिंदु वृत्तीच्या सर्व हिंदवासीयांना कालान्तरानें तरी अवश्य ग्राह्य होईल अशी आमची श्रद्धा आहे.

## ४

# म० गांधी यांचे कित्येक संस्मरणीय प्रसंग.

( दक्षिणआफ्रिकेमध्यें महात्माजींच्या सहवासांत राहिलेल्या कांहीं सद्गृहस्थांनीं विशेषतः गुजराथी मासिकपुस्तकांतून वर्णिलेले )

( १ ) सत्याग्रहाच्या चळवळीच्या शेवटीं शेवटीं जुलमी यूनिअन सरकारनें निर्दोष मुदतबंदी मजुरांवर गोळीबार केल्यामुळें कित्येक निर्दोष जीव भूमिमातेच्या मांडीवर कायमची निद्रा घेऊं लागले होते. ही गोष्ट घडली त्यावेळीं हा साधु पुरुष कारागृहांत होता. त्यांच्या प्रेमपूर्ण हृदयाला ही बातमी ऐकतांच केवढा धक्का बसला, याची कल्पना त्यांना प्रत्यक्ष पहाणाऱ्यांशिवाय इतरांना होणेंच शक्य नाहीं. आज कित्येक वर्षांपासून ते फलाहारावरच रहात असत. कारागृहांतून मुक्त झाल्याबरोबर आपल्या निर्दोष बंधूचे–कीं ज्यांची गणना ते तेहतीस कोटी देवतांत करितात–खून झाल्याचें ऐकून ते शोकसागरांत बुडून गेले. दोन वेळां फलाहार करीत होते त्याच्या ऐवजीं एक वेळ करूनच राहूं लागले. पायांतील साध्या जोड्यांनाहि रजा दिली, एक अर्धेसें धोतर आणि जाड्या खादीचा सद्रा परिधान करूं लागले, आणि हातांत एक दंड धारण केला. त्यांच्या ह्या अतिदिव्य संन्यासवृत्तीनें प्रत्येक जण आश्चर्यचकित होऊन जाई. त्यांच्या देहदमनानें शत्रूंच्या हृदयाचेंहि पाणी पाणी होऊन जाई. दक्षिण आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत–मातृभूमीकडे प्रयाण करण्याची तयारी करूं लागतांच पौर्वात्य ‘ जंगली ’ प्रजेच्या या वीरनायकाचें दर्शन करण्यासाठीं गौरांग प्रजेचे हजारों लोक आपलीं मस्तकें नमवूं लागले. व तेथील इंग्रजी पत्रांनीं या साधु पुरुषासंबंधानें इतके प्रशंसात्मक लेख लिहिले कीं, ते कधींहि स्मरणांतून जाणें शक्य नाहीं.

सत्याग्रहाच्या चळवळींत ता. २२–१२–१९१३ हा दिवस अत्यंत महत्वाचा होता. डरबन शहरांत पारशी रस्तुमजी ( हिंदी लोकांचे ‘ काका ’ व एक वृद्ध सत्याग्रही ) यांचें घर हिंदी लोकांनीं भरून गेलें होतें, घराच्या शेजारील लहा-

नशा झोंपडींत शेंकडों सत्याग्रही आपल्या वायकामुलांना घेऊन वसले होते. गोळीवारानें घायाळ झालेले लोकही त्यांत होते. मृत्युवश झालेल्या वीरांच्या विधवा स्त्रिया आपल्या अर्भकांना मांडीवर घेऊन वसल्या होत्या. सायंकाळीं सुमारें चार वाजतां महात्मा गांधी तेथें आले. त्यांना तुरुंगातून सुटल्याला दोनच दिवस झाले होते. तेथें येऊन मजुरांच्या मंडळींत ते शिरले. झोंपड्यांतील एका कोंप-ऱ्यांत—जेथें परलोकवासी सुझाई आणि सेल्वनी ( मारले गेलेले मुदतबंदी मजूर ) यांच्या विधवा वसल्या होत्या त्यांच्यापाशीं ते गेले. या साधु पुरुषाला पाहून त्या विधवांच्या मनाला उल्हास वाटला. आणि त्यांनीं ,आपलीं मस्तकें त्यांच्या पायांवर ठेविलीं. महात्माजींनीं मोठ्या मेहेनतीनें त्यांना उठविलें. समोर उभ्या राहिलेल्या एका विधवेच्या खांद्यावर हात ठेवून तिच्याकडे टक लावून पाहूं लागले. विधवेच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत होत्या. या दीन आणि दुःखी विधवांच्या रुदनांत सर्व हिंदी राष्ट्राची अति दीन अवस्था या महापुरुषाला दिसत होती. तें दृश्य पाहून असें वाटे कीं, अति कंगाल अवस्थेंत प्रत्यक्ष हिंददेवीच उभी असून आपल्या गरीव पुत्राकडे पाहून हृदयभेदक रुदनच करीत असावी. 'अखिल जगतांतील जुलमाला पायांखालीं तुडवून टाकीन' अशी भीष्म-प्रतिज्ञाच घेतली असावी असा भास महात्माजींच्या नेत्रांकडे पाहून होत होता. विधवा देवीच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनीं एका तामील गृहस्थाला दुभाष्याचें काम करण्यासाठीं वोलाविलें. त्यांच्या तोंडांतून मोठ्या धैर्याचे पण जड आणि परिणाम-कारक शब्द अगदींच सहजगत्या बाहेर पडूं लागले. दुभाष्या तामीलमध्यें सम-जावून सांगत होता.


"माते उगी रहा, तूं रडूं नकोस, माझ्यानें रहावत नाहीं; तुझा पति जुलम-गारांच्या हातून मारला गेला, तो आज ईश्वराच्या मांडीवर जाऊन वसला आहे. त्यानें आपला देह देशासाठीं अर्पण केला आहे. त्याचें नांव अमर झालें आहे. एकाद्या रोगानें पीडित होऊन जर त्याचा मृत्यु झाला असता तर मी आज तुझ्या-पुढें अशा रीतीनें उभा राहिलों नसतों. जगाला त्याच्या मृत्यूची वार्ताहि समजली नसती. तशा रीतीनें मरण्यापेक्षां या सत्कार्यांत त्याला मरण आलें, हें त्याच्या भाग्याचेंच लक्षण आहे. म्हणून तूं आतां उगी रहा. तुझ्याप्रमाणेंच माझ्या हजारों माता भगिनी व कन्या विधवा बनतील त्याचवेळीं हिंदमातेचें कल्याण होईल;



शेख मेहताब.



स्वतःच्या मुलीला बरोबर घेऊन तीन महिने कारागृहवास भोगलेली वृद्ध मुसलमान स्त्री.




जनरल स्मट्स् यांनी टाकलेला डाव अखेर गांधींनीच "जेल रेझोल्यूशन"चें मोहरें सरकावून डाव जिंकला

एरव्हीं नाहीं. माझें शिर मी हिंद-भूला अर्पण केलेलें आहे. जुलमी सत्ताधीशांनीं तें धडापासून वेगळें केलें आणि तुझ्याचप्रमाणें माझी स्त्रीहि एक निराश्रित विधवा झाली तर माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली असें मी समजेन.- तरच माझ्या अंतरात्म्याला शांति मिळेल. म्हणून माते, तूं कष्टी होऊं नकोस. माझें शिर मी तुझ्या पदरांत घालतों. तुझ्या वैधव्यदशेला कारणहि मीच आहें. मला क्षमा कर आणि शांत हो.'

इतकें बोलून आणि फिरून एकदां त्या विधवेला नमस्कार करून महात्माजी तेथून निघून गेले. आसपासची मंडळी हा देखावा आणि अद्भुत शब्द पाहून आणि ऐकून रडूं लागली. कित्येकांच्यानें हें पहाववलें नाहीं, ते तेथून निघून गेले. भारतवर्षांतील पुढाऱ्यांत जोंपर्यंत ह्या विशुद्ध स्नेहाचा संचार झाला नाहीं तोंपर्यंत शुद्ध देशसेवा होणेंच शक्य नाहीं.

---

## प्रसंग दुसरा.

हा या साधूच्या निर्भयपणाविषयीं आहे. खऱ्या कसोटीच्या प्रसंगीं यांनीं जें अलोट धैर्य दाखविलें आहे ते पाहून शत्रूंनीं ही (कोणी त्यांना शत्रु मानणारे असतील तर ) आश्चर्यचकित व्हावें. आंगठ्याचे ठसे देण्याबद्दल १९०७ सालीं त्यांजवर कित्येक पठाण बंधूंनीं हल्ला केला व त्यांना मरेमरेतोंपर्यंत मारलें. ( या वेळीं अत्यवस्थ असतांनां त्यांनीं लिहिलेलें पत्र 'हिंदु मुसलमान' या प्रकरणांत दिलेलें आहे ) या प्रसंगीं रेव्ह. डोक व त्यांच्या पत्नी यांनीं फारच कळकळीनें त्यांची शुश्रूषा केली; यामुळें त्यांचा पुनर्जन्मच झाला असें म्हटलें तरी चालेल. या नंतरहि कित्येक मूर्ख लोक त्यांनां पुन्हां मारण्यासाठीं टपून बसले होते. ही गोष्ट गांधी यांच्या सहवासांतील कित्येक मंडळीस माहीत होती. आणि सावध राहण्याविषयी ते लोक म. गांधी यांस वारंवार इषाराहि देत असत.

असली कुणकुण त्यांच्या कानावर रोज पडे. आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें जरासें डोकें हालवून व किंचित् हंसून ते एवढेंच म्हणत," तसें कां होईना त्यांचाही या शरीरावर हक्क आहेच ना ? माझ्या देशबंधूंसमोर जातांना जर मला भय वाटूं लागलें तर पुढारीपणा मला या क्षणींच सोडून दिला पाहिजे. ज्या

लोकांची सेवा करण्याची मी वढाई मिरवितों, त्याच लोकांपासून जर मी भीतीनें दूर राहूं लागलों, तर माझ्यासारखा भागुबाई कोणीच नाहीं. स्वदेशबांधवांच्या हातचा मार ज्याच्या नशिवीं लिहिला असेल तो खरा पुण्यशाली होय; शिवाय माझ्या देशसेवेंत कांहीं चूक होत आहे अशा समजुतीनेंच ते मला शिक्षा करूं पाहतात. यांत त्यांचा हेतु पवित्रच आहे. त्यांना मी कसा बरें दोष देऊं ?" असें उत्तर देऊन ते ती गोष्ट टाळीत. तिचें चिंतन करणें हेंच त्यांना नामर्दपणाचें आणि नास्तिकपणाचें वाटे.

मिस्टर कॅलनबॅक म्हणून त्यांचे एक मित्र आहेत. जन्मानें ते जर्मन असून दक्षिण आफ्रिकेंतील एक प्रख्यात एंजिनिअर होते; ( हल्लीं इंग्लंडांत नजर कैदेंत आहेत. ) महात्माजींच्या संगतीनें ते ' जोगी ' बनले होते. आयुष्यांतील सुखांचा आणि चैनींचा त्यांनीं त्याग केला होता, आणि फकीरी वृत्तीनें जिज्ञासु म्हणून त्यांच्यापाशींच ते रहात होते. त्यांच्या कानावर जेव्हां वरील दुष्ट वार्ता पडली, तेव्हां त्यांना ती असह्य झाली आणि खासगी रीतीनें ते सावधगिरी ठेवूं लागले. गांधीजी घरांतून बाहेर पडले कीं कॅलनबॅक सांवलीप्रमाणें त्यांच्या बरोबर रहात. पुष्कळ दिवसांनीं गांधींना शंका वाटूं लागली व अनुमानानें सर्व त्यांच्या ध्यानांत आलें. एके दिवशीं दोघे बाहेरून आले. आपापले कोट त्यांनीं खुंटीला अडकविले. गांधींनीं कॅलनबॅक यांचे खिशांत हात घातला आणि एक रिव्हॉल्व्हर काढला ! " महात्मा टॉलस्टॉय यांचे शिष्यहि असलीं शस्त्रें बाळगतात म्हणायचे ! " गंभीरपणें गांधींनीं विचारिलें. " जरूरच भासली म्हणजे बाळगावीं लागतात." हळूच उत्तर आलें. " हा रिव्हॉल्व्हर बाळगण्याची हल्लीं तुम्हाला काय जरूर भासली ? विशेषच गंभीरपणें गांधींनीं विचारिलें."

" मला अशी बातमी समजली कीं आपल्यावर दुसऱ्यानें हल्ला होणार आहे. यासाठीं मी तो बाळगला आहे " मि. कॅलनबक यांनीं कांहींसा घोंटाळून जबाब दिला.

" ठीक, मग आपण माझ्या रक्षकाचें काम अंगावर घेतलेलें दिसतें ! पण या बंदुकीनें माझें रक्षण कराल ? " मि० कॅलनबक स्तब्ध राहिले. " आणि या बंदुकीनेंच माझें संरक्षण होत असेल तर मी आतां तीच घेऊन माझ्या शरीराची

छकलें करतों. मग तुह्मी काय कराल ? माझ्या मित्रा ! तूं जर माझा खरा स्नेही असशील तर या शरीरावर तुला इतका मोह असणेंच असंभवनीय आहे. स्नेह फक्त शरीराचेंच रक्षण करीत नाहीं; तो आत्म्याचेंहि रक्षण करतो. शरीर हें आज नाहीं उद्यां जाणारच. स्नेह्यांनीं असल्या क्षणभंगुर वस्तूवर आसक्ति ठेवितां कामा नये. त्यांनीं अमरत्वाची इच्छा ठेविली पाहिजे. तूं जर माझा खरा मित्र असशील तर या बंदुकीनें माझें रक्षण करण्याचें सोडून दे, ती फेंकून दे."

असें सांगतात कीं ही गोष्ट घडल्यानंतर मि. कॅलन्बक यांनीं पुन्हां बंदूक हातीं धरिली नाहीं.

सत्याग्रहाच्या शेवटच्या खेपेला यूनिअन पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल करवून घेतल्यानंतर म. गांधी हे केपटाउनवरून जोहान्स बर्गला गेल्यास वाटेंत त्यांचा खून करण्याचा बेत दोन चार अज्ञान माणसांनीं केला होता ही बातमी बाहेर फुटली. एका सत्याग्रह्यानें ही गोष्ट म. गांधी यांस सांगितली. आणि विनंति केली कीं "आपण परत फिरतांना जोहान्सबर्गवरून न जातां परस्पर नाताळला जावें अशी आम्हां सर्वांची इच्छा आहे."

यावर म. गांधी यांनीं सांगितलें कीं, "मरणाच्या भीतीनें जर मी जोहान्स-बर्गवरून गेलों नाहीं तर खचित मी जिवंत रहाण्यास योग्य नाहीं, मी तेथें गेलों आणि त्यांचा बेत सिद्धीस गेला तर मला समाधान वाटेल. माझें कर्तव्य मीं केलें आहे. ईश्वराची अशीच इच्छा असेल कीं माझें कार्य मीं पुरें केलें आहे, यासाठीं मला बोलावून घ्यावा."

मि. कॅलन्बॅक हे या प्रसंगीं जोहान्सबर्ग येथें होते. त्यांना या अमंगल कटाची गोष्ट समजली तेव्हां ते ही गोष्ट सांगणाऱ्या इसमास म्हणाले, "आपल्या-पेक्षां गांधी हे स्वतःचें रक्षण करण्यास अधिक समर्थ आहेत, आणि ईश्वर त्याहू-नहि अधिक समर्थ आहे."

शेवटीं गांधी जोहान्सबर्ग वरूनच गेले. तेथील लोकांनीं फार आनंदानें त्यांचें स्वागत केलें. विरुद्ध पक्षाचे लोकहि या कार्यांत मिसळले. यावेळीं एक आश्चर्याची गोष्ट गोष्ट घडली. ती अशी कीं १९०७ सालीं ज्या चार पठाणांनीं गांधींवर हल्ला केला होता त्यांच्यापैकीं एका मीर नांवाच्या पठाणाला या घाणेरड्या संकेताची

बातमी लागली व सात वर्षांपूर्वी म. गांधींचा जीव घेण्यास तयार झालेल्या ह्या गड्यानें त्यांच्या प्राणांचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा या वेळीं केली! जोहानिसबर्गला पोहोंचतांच त्यानें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें!........महात्म्याचें आत्मबल आणि निर्भयता हीं काय करूं शकत नाहींत? ईश्वरा ही शक्ति आम्हां हिंदवासियांस दे म्हणजे 'हिंदस्वराज्य' आम्हीं आमच्या मुठींत घेऊन फिरूं.

---

## प्रसंग तिसरा.

एक वेळ एक गोष्ट खरी आहे असें वाटलें आणि त्यांतच देशाचें हित आहे अशी खात्री झाली म्हणजे मग त्या विचाराप्रमाणें वागण्याच्या आड प्रत्यक्ष ब्रम्हदेव आला तरी त्याची सूचनाही अमान्य होत असते आणि आपला विचार खोटा आहे असें एकाद्या बालकानेंही दाखवून दिलें तरी त्याचें ह्मणणें ऐकण्याइतकें आपलें मन सत्यप्रेमी आहे, ही गोष्ट महात्मा गांधींनीं अनेक वेळां सिद्ध करून दाखविली आहे. या संबंधीं एकच उदाहरण येथें देणें बस होईल. सत्याग्रहांतील शेवटच्या लढ्यांत हजारों करारी मजूर, इतर हिंदी लोक, स्त्रिया आणि मुलें तुरुंगांत गेलीं आणि सर्व जगभर खळबळ उडाली. हिंदुस्थानचे प्रजावत्सल व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनीं सत्याग्रहाच्या चळवळीला ( उत्तेजन ) दुजोरा दिला. विलायत सरकारनेंही हिंदी लोकांची चळवळ कायदेशीर आहे असें जाहीर केलें. अशा स्थितींत दक्षिण आफ्रिकेंतील सरकारला अधिक कांहीं करणें अशक्य होतें. विलायतसरकार व हिंदुस्थानसरकार यांच्या आग्रहावरून हिंदीलोकांवर होणाऱ्या जुलुमाची चौकशी करण्यासाठीं यूनियन सरकारनें एक कमिशन नेमलें. त्यांतील दोन्ही समासद मि. वायली, व मि. एसलिन हिंदी लोकांच्या विरुद्ध पक्षाचे होते. त्यांच्यापासून न्यायाची आशा बाळगणें व्यर्थ आहे, हें हिंदी लोक जाणून होते. शिवाय, याच सुमारास तेथील गोऱ्या लोकांनीं जेव्हां रेल्वेवरील संप केला तेव्हां त्यांच्या दुःखांची चौकशी करण्यासाठींही तेथील सरकारानें एक कमिशन नेमलें होतें. आणि त्यांत संपवाल्यांच्या खास प्रतिनिधींचीही नेमणूक झाली होती. गोऱ्या संपवाल्यांनीं तर, मारा-

माऱ्या केल्या होत्या. सार्वजनिक शांततेचा भंग करून जवळ जवळ बंडच उभारलें होतें. आणि हिंदी लोक शांतपणें, कायद्याच्या मर्यादेंत राहून, स्वतः दुःखें सहन करून, केवळ आपलें कर्तव्य बजावीत होते. असें असतांही त्यांच्या कमिशनमध्यें त्यांच्या विरुद्ध असलेल्या लोकांची नेमणूक झाली, हें लोकांना कसें सहन व्हावें ? हिंदी पुढाऱ्यांची सुटका झाल्याबरोबर, चार हजार माणसांची एक जंगी सभा डरबन शहरीं भरली आणि त्यांत, कमिशनपुढें एकाही हिंदी मनुष्यानें साक्षी देण्यास जाऊं नये असा ठराव पास झाला. या गोष्टीचा इषारा सरकारला अगोदरच देण्यांत आला होता. शेवटीं हिंदी लोकांनीं अशीही मागणी सरकारजवळ केली होती कीं, नेमलेले गृहस्थ कमिटींत खुशाल राहोत. पण निदान हिंदी लोक ज्याचें नांव सुचवतील अशा एका युरोपिअन गृहस्थाचीच योजना अधिक व्हावी. या न्याय्य मागणीचाही सरकारनें तिरस्कार केला. तेव्हांच अखेरीस कमिशनपुढें साक्ष न देण्याची प्रतिज्ञा हिंदी लोकांना करावी लागली. ही प्रतिज्ञा जेव्हां प्रसिद्ध झाली तेव्हां सगळीकडे हाहाःकार उडाला. अत्यंत परिश्रमानें कमिशन मिळालें ! आणि त्याच्यापुढें हिंदी लोक साक्ष देण्याचें नाकारतात ! असें वाटून हिंदुस्थान व विलायत येथील सगळे लोक स्तंभितच झाले ! पण हिंदी लोकांची खात्री होती कीं आपण स्वतःच्याच शक्तीच्या जोरावर लढत आहोंत. आणि स्वाभिमानाचें रक्षण करण्यासाठींच या लढ्याला आपण सुरुवात केलेली आहे. हिंदी लोकांच्या प्रतिज्ञेची बातमी लॉर्ड हार्डिंज यांस मिळतांच त्यांनीं, " असा दुराग्रह न धरतां साक्ष द्यावी " अशी सूचना पाठविली. दुसरीकडून गांधी यांचे प्रत्यक्ष राजगुरु गोखले यांच्याकडूनही तशीच सल्ला मिळाली. विलायतेहूनही लॉर्ड अँम्प्ट्हिल सारख्या हितेच्छूकडूनही तोच उपदेश होऊं लागला. याप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं हीच सल्ला व हाच आग्रह होऊं लागला. वेळ अशी होती कीं असल्या सद्गृहस्थाचें म्हणणें अमान्य केल्यानें हिंदी लोकांना बाहेरून मिळणारी सहानुभूतिही नष्ट झाली असती. अशा आणीबाणीच्या वेळीं या महान् वीरपुरुषानें जें धैर्य, जो दृढ निश्चय आणि प्रतिज्ञापालन करण्याचा जो आग्रह दाखविला तो खरोखरीच अद्भुत होय. त्यांनीं विनयपूर्वक पण स्पष्टपणें सर्वांस कळविलें कीं, कमिशनविरुद्ध असलेली आमची तक्रार अगदीं वास्तविक आहे. सर्व लोकांनीं एक होऊन विचारपूर्वक सत्य म्हणूनच जी प्रतिज्ञा केली,

तिच्यावर पाणी सोडणें म्हणजे हिंदी राष्ट्राचें हंसें करून घेण्यासारखें आहे. यामुळें आम्हाला मिळत असलेली सहानुभूति नष्ट झाली तरीही ती गोष्ट मोठ्या दुःखानें आम्हीं सहन करूं; पण केलेल्या प्रतिज्ञेचा भंग होऊं देणार नाहीं. शेवटीं कोणींही कमिशनपुढें जबानी दिली नाहींच ! या वेळी अँड्र्यूज साहेबही तेथें होते. लोकांचा दृढ निश्चय व शुद्ध भावना हीं प्रत्यक्ष पाहून त्यांना आनंद झाला व विस्मयही वाटला धीर पुरुषाची कसोटी अशा आणीबाणीच्या वेळींच होत असते. महात्मा गांधी त्या कसोटींस पूर्णपणें उतरले. आणि म्हणूनच हिंदी राष्ट्राचा स्वाभिमान त्यांनीं दक्षिणआफ्रिकेंत उज्ज्वल केला.

---

## प्रसंग चौथा

महात्मा गांधींच्या खासगी रहाणींतही ते पूर्ण सत्याग्रही आहेत. त्यांनीं मीठ खाण्याचें सोडलें तो प्रसंग फार गमतीचा असल्यामुळें येथें देत आहोंत. त्यांच्या पत्नी सौ. कस्तुरबाई यांची प्रकृति कांहीं कारणामुळें नेहमीं थोडी नादुरुस्त रहात होती. " मिठानें रक्त सुधारत नाहीं, उलट त्याचें पाणी होतें; त्याच्यांत पोषक किंवा पाचक गुणही फारसा नाहीं, पाहिजे तेवढा क्षार फळांतून ईश्वरानें ठेविलेलाच आहे. यामुळें मुद्दाम मीठ खाण्याची जरूर नाहीं " अशी समजूत अनेक पुस्तकांच्या वाचनानें श्री० गांधी यांची झाली होती. त्यांनीं एके दिवशीं मातुःश्री कस्तुरबाईस सांगितलें कीं " तुझी प्रकृति बरी रहात नाहीं, तूं जर मीठ खाण्याचें सोडशील तर ती ताबडतोब सुधारेल. " तेव्हां कस्तुरबाई म्हणाल्या " मिठाशिवाय कसें चालेल ? मिठाशिवाय खाववेल तरी कसें ? " गांधींनीं ताबडतोब सांगितलें " हो, न खातां यायला काय झालें ?" श्रीमती कस्तुरबाईंनीं ताबडतोब सांगितलें " मग आपणच एकदां सोडून पहावें, म्हणजे समजेल. " हें वाक्य ऐकतांच त्यांनीं कबूल केलें कीं " तुझ्याबरोबर मीहि आजच मीठ सोडतों. " तेव्हां मीठ सोडलें तें त्यांनीं कायमचेंच सोडिलें आहे.

---

## प्रसंग पांचवा.

त्यांचें उदाहरण पाहून त्याच्या बरोबर रहाणारी कित्येक मंडळीहि मीठ कायमचें किंवा कांहीं दिवस सोडण्याचें व्रत घेतात. त्यांना बरेच वेळां तसें करण्यास गांधी उत्तेजनही देतात. पण मुलांनीं एकदां व्रत घेतल्यावर तें पाळलें गेलेंच पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. या संबंधाची एक गोष्ट येथें देणें गैर होणार नाहीं. त्यांचा सर्वांत धाकटा मुलगा देवीदास यानें त्यांना एकदा विनंति केली कीं "आठ दिवसपर्यंत मला अळणी खावयाचें आहे." गांधींनीं त्याला रुकार दिला. पुढें दोन तीन दिवसांनीं श्री० गांधी हे आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें सर्वांना वाढीत होते. मीठ घालून बनविलेल्या सुंदर भाज्या पाहून त्या कोंवळ्या मुलाच्या तोंडाला पाणी सुटलें, आणि तो त्यांतील भाजी मागूं लागला. अर्थात् ती त्याला मिळाली नाहीं. अळणी वस्तु मिळत होत्या त्या न घेतां मुलगा रडत राहिला. महात्मा गांधी खोटें प्रेम थोडेंच दाखविणार! त्यांनींहि प्रतिज्ञा केली कीं "बाबा तुम्हीं जेवा आणि मी जेवतों." असें देवीदास येऊन सांगेल तेव्हांच मीहि खाणार. एकीकडे बालकाचा हट्ट आणि दुसरीकडे तपस्व्याची प्रतिज्ञा! मुलगा आपला हट्ट सोडीना. बरोबरच्या सोबत्यांनीं पुष्कळ समजूत घालून पाहिली तरी ऐकेना. पण शेवटीं संध्याकाळीं नम्र बनून तो पित्यापाशीं गेला आणि ह्मणाला "बाबा, मी अळणीच खातों, आणि तुम्हीहि खा." त्यावेळीं पिता पुत्र बरोबर बसून जेवले. आश्रमांतील सर्व मंडळीस शिक्षण मिळालें कीं, एकवेळ घेतलेलें व्रत वाटेल त्या अडचणींस किंवा मोहांस न जुमानतां पाळणें हा धर्म आहे—कर्तव्य आहे.

---

## प्रसंग सहावा.

विद्यार्थ्यांना कधींहि शिक्षा करतां कामा नये असें गांधींचें मत आहे. शारी-रिक बलाचा उपयोग करणें हें सत्याग्रही मनुष्याचें काम नव्हे. एकदां कांहीं गोष्ट न करण्याचें महात्माजींनीं सर्वांना सांगितलें होतें. तथापि ती गोष्ट कांहींनीं केलीच.

शेवटीं गोष्ट फुटली. तरी ती भीतीनें कोणी कवुल करीना. हें पाहून म. गांधी यांना फारच दुःख वाटलें. आणि विद्यार्थ्यांच्या देखतच त्यांनीं खूब जोरानें आपल्याच दोन तीन तोंडांत मारून घेतल्या आणि म्हटलें कीं, " माझ्यांतच कांहीं दोष असेल म्हणूनच खरी गोष्ट सांगतांना तुम्ही भितां ! " याचा परिणाम असा झाला कीं, खरी गोष्ट लागलीच बाहेर आली.

---

## प्रसंग सातवा.

जे सत्याग्रही लोक कारागृहांतून सुटल्यानंतर टॉलस्टॉय फार्ममध्यें रहात होते, त्यांत हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, गुजराथी, मद्रासी, मुंबईकर आणि कलकत्तेकर, लहान मोठे, स्त्रीपुरुष सर्व एका कुटुंबांतील माणसांप्रमाणें रहात असत. एकच कुटुंबांत दिसून येणारी समानता आणि औदार्य हीं तेथें उत्तम रीतीनें दिसून येत होतीं. या कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीचें आचरण दुसऱ्याशीं भेदबुद्धीचें दिसलें तर त्यांना फार वाईट वाटे. व त्यासंबंधानें ते फार नापसंती दाखवीत. एक वेळ असें झालें कीं, त्यांचे वडील चिरंजीव हरिलालभाई आणि ' इंडियन ओपीनियन ' पत्राचे सत्याग्रही संपादक प्रागजीभाई देसाई वगैरे मित्र बागेंतून काम करून आल्यावर चहा प्याले. त्या ठिकाणीं चहा पिण्याची सामान्यतः मनाई होती. फक्त मद्रासी स्त्रियांनाच तो पिण्याची परवानगी होती. ही गोष्ट महात्माजींच्या कानावर आली. त्यांनीं सर्वांचा खरपूस समाचार घेतला. हरिलाल आणि प्रागजी यांची पाळी येतांच गांधी म्हणाले:—

" प्रागजी, हें तूं काय केलेंस ? तूं चहा प्यावास ? महात्मा टॉलस्टॉयचीं पुस्तकें काय वाचतोस ! सत्याग्रहासंबंधीं लांबलचक निबंध काय लिहितोस ! चुरचुरित वक्तृत्वपूर्ण भाषणें काय करतोस ! गीतेचे श्लोक काय म्हणतोस ! निरनिराळीं व्रतें काय घेतोस ! त्या सर्वांवर आज पाणी फिरविलेंसना ! ! आणि हरिलाल, तुला चहा पिण्याची इच्छा झाली तेव्हां तुम्ही तिघेच जण रे कसे प्यालेत ? मि. नायडूचे व इतर मुलगे होते त्या सर्वांना कसे विसरलेत ? मी

पहात असतों .कीं, तुम्हां तिघांत चौथ्याला तुम्ही कधीं घेत नाहीं. हा भेदभाव तुमच्या मनांत कसा राहिला आहे ? अशा फटकून रहाण्यानें हिंदभूची सेवा कधीं हि होऊं शकणार नाहीं. सत्याग्रही म्हणून लोकांत मिरवणें, वारंवार तुरुंगांत जाणें, तेथें गेल्यानंतरही अन्यायी कायद्याशीं झुंजण्यासाठीं दिवसांचे दिवस उपवास करणें आणि अंमलदारांचा नक्षा उतरून विजय मिळविणें हें सर्व तूं केलेंस, पण माझ्या मतानें तें गौण आहे. आपणच जर असलें वर्तन घरांत चालवूं लागलों तर शुद्ध वर्तनाची आशा राखावी तरी कोणापासून ?

---

## प्रसंग आठवा.

फिनिक्समधील आश्रमांत रहात असतां एके दिवशीं असा प्रसंग घडला कीं सकाळीं नऊ वाजतां आलेल्या टपालांतून एक तार आली होती. टपाल रावजीभाई नांवाच्या एका गृहस्थांच्या हातांत होतें. आणि तें महात्माजींच्या जवळ देण्यास भाई जात होते. वाटेंत गांधींचा दुसरा मुलगा मणिलाल यानें येऊन ती तार त्याच्या पासून घेतली. आंत काय आहे हें पहाण्यास तो उत्सुक झाला होता. त्याची उत्सुकता वाढण्याचें कारण हें होतें कीं, महात्माजींचे वडील बंधु फारच आजारी असल्याचें वर्तमान, पूर्वीच्या पत्रांतून आलेलें होतें. त्यांच्याविषयींच कांहीं वरावाईट मजकूर तर या तारेंत नाहींना, असें मनांत येऊन त्यानें मोठ्या खुबीनें ती तार उघडली आणि वाचून बंद केली. तारेंत ' काका ' वारल्याचेंच लिहिलें होतें. पण आतां ही गोष्ट सांगावी कशी ? सर्वजण गप्प राहिले. सर्व टपाल महात्माजींपाशीं गेलें. सर्वांना वाटलें होतें कीं तार वाचून ते शाळेंतील खोलींतून निघून बाहेर येतील. पण तसें कांहींच झालें नाहीं. रामायणांत आपण वाचतों कीं " एके दिवशीं संध्याकाळीं श्रीरामचंद्रांना आपल्याला उद्यां राज्याभिषेक होणार असें वर्तमान समजलें; तेव्हां त्यांची मुखचर्या गंभीर होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेव्हां त्यांना वनवासाला जाण्याचा हुकूम मिळाला, तेव्हांही त्यांच्या चेहेऱ्यावर तेंच गांभीर्य दिसत होतें. " हें सर्व आपण वाचतों खरें ! पण याचा अनुभव आपल्याला कोठें आलेला असतो ? तो फिनिक्समध्यें आज सर्वांना

मिळाला. सर्व दिवसभर रोजचा कार्यक्रम शांतपणानें आणि निर्विघ्नपणानें पार पडला. संध्याकाळीं प्रार्थना पुरी झाल्यावर महत्माजींचा चेहेरा बराच शोकग्रस्त दिसूं लागला. आणि दीर्घ निश्वास टाकून ती दुःखद वातमी त्यांनीं सर्वांना सांगितली आणि म्हणाले, "रोजच्या कार्यभागांत व्यत्यय येऊं नये म्हणून हृदयांतील दुःखावेग दाबून ठेवून मी सर्व काम सुरळीतपणें चालूं दिलें. चालू कार्यक्रमांत ढवळा ढवळ करण्याचा मला काय हक्क आहे ? असा विचार करून मी मनांत निश्चय केला कीं कोणाला यत्किंचितही शंका येणार नाहीं अशा प्रकारची मनाची स्थिरता राखावयाची" केवढें हें आत्मसंयमन ? असले आत्मसंयमी पुरुषच राष्ट्राचे खरे पुढारी व्हावयास योग्य होत.

---

## प्रसंग नववा.

१९१० सालीं ट्रन्सवॉल मधून कित्येक सत्याग्रही लोकांना हद्दपार करून तेथील सरकारानें त्यांना हिंदुस्थानांत आणून सोडलें होतें. हे सर्व हद्दपार झालेले लोक आफ्रिकेंतच जन्मलेले होते. यामुळें हिंदुस्थानांत खास त्यांचें असें कोणीच नव्हतें. हिंदभूला ते नांवानेंच ओळखीत होते. आपल्या आईबापांची पवित्र मातृभूमि हिंदुस्थान आहे एवढेंच त्यांना माहीत होते. हिंदभूचें पवित्र रक्त त्यांच्या नसांतून खेळत होतें. एवढ्याचमुळें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारकडून हिंद मातेचा होणारा अपमान सहन न होऊन ते सत्याग्रहाच्या चळवळींत शिरले होते. हद्दपार झालेल्या लोकांच्या एकंदर तीन तुकड्या इकडे पाठविण्यांत आल्या होत्या. पहिली १०४ जणांची, दुसरी ६० जणांची व तिसरी १२६ जणांची; शेवटची तुकडी मुंबईस उतरली आणि पहिल्या दोन मद्रासला उतरल्या. या मद्रासच्या तुकड्यांची व्यवस्था 'इंडिअन रिव्ह्यू'चे संपादक नटेशन यांनीं ठेविली होती. हे सर्व हद्दपार लोक इकडे आले पण त्यांच्या बायकामुलांचें काय झालें असेल ! त्यांचे अश्रु पुसून वात्सल्यभावानें त्यांना भेटणारा तेथें कोण होता ? मि. कॅलनबॅक् नांवाच्या जर्मन सत्याग्रह्यानें दिलेल्या 'टॉलस्टॉय फार्म'मध्यें हीं सर्व बायकामुलें रहात होतीं. या ठिकाणीं महात्माजी त्यांच्या सर्व गरजा भागवीत असत; त्यांची

सेवा करीत असत; सकाळीं उठून विद्यार्थ्यांना शिकवून झालें कीं नंतर **स्त्रियांचे शौचकूप जातीनें साफ करीत असत**! वाचकहो, ही गोष्ट वाचून तुमच्या हृदयांत काय होत असेल बरें! तुमच्या आमच्या मनांत हजारों विचार-तरंग आले तरी तें कार्य करणें, आणि तेंहि पूज्यबुद्धीनें, सेवाधर्म म्हणून करणें, हें महात्माजींना खऱ्या देशभक्तीचें चिन्ह वाटत होतें. शौचकूप साफ केल्यानंतर, स्त्रियांच्या खोल्यांशीं जाऊन ते विचारीत "बाई, कांहीं धुणीं विणीं आहेत काय?" इतर सर्वांपासून घाणेरडे कपडे घेऊन मला मेहेरबानी करून धुवायला द्याल का? त्यांच्या मागणीवरून असे सर्व घाणेरडे कपडे त्यांना देण्यांत येत असत. आणि महात्माजी ते सर्व घेऊन जवळच्या ओढ्यावर जाऊन धुऊन आणीत, व वाळवून संध्याकाळीं ज्याच्या त्याच्या हवालीं करीत! या बायकामुलांना हिंदुस्थानांत नेऊन सोडलेल्या पुरुषवर्गाची आठवण सुद्धां होत नसे! जे हद्दपार झाले त्यांना ही खात्री होती कीं आपल्या बायकामुलांची काळजी घेणारा आपणांपेक्षांही सुयोग्य मनुष्य तेथें आहे. मद्रासेंत त्यांना कोणीसें विचारलें कीं 'यूनियन सरकारनें तुम्हांला येथें आणून सोडलें; आतां तुमच्या बायकापोरांचें काय होईल?' तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, आम्हांला त्याची मुळींच काळजी नाहीं! त्यांचा पालक पोषक, मायबाप,—ईश्वरच तेथेंच आहे. महात्मा गांधी तेथें आहेत तोंपर्यंत आम्ही अगदीं बेफिकीर आहोंत गांधी यांच्या आफ्रिकेंतील सेवेनेंच हद्दपार केलेल्या लोकांच्या अंतःकरणांत हा विश्वास उत्पन्न झाला नसेल ना? !!!

---

## प्रसंग दहावा.

थोर पुरुषांच्या जीवनांतील कित्येक गोष्टी इतक्या गंभीर असतात कीं सामान्य मनुष्यांना त्यांतील रहस्य समजणें कठीण जातें. आणि त्यामुळें साधारण मनुष्यांना असल्या पुरुषांचें जीवन 'विचित्र' वाटतें. आत्म्याच्या अजित शक्तीवर महात्मा गांधी यांची इतकी श्रद्धा आहे कीं त्यांच्या अगदीं साधारण कार्यांतूनही ती दिसून येते. यासंबंधाचें एक उदाहरण येथें देत आहों. आपल्याजवळ रहाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं कोणी कांहीं चूक केली,—हेतुपुरःसर अपराध केला तर त्याच्याबद्दल

महात्माजींना अत्यंत दुःख होतें. मनुष्य स्वतः सच्चा असेल तर त्याच्यापाशीं वाटेल तसें खोटें बोलणारा माणूसही खोटी गोष्ट सांगूं शकत नाहीं; तसें करण्याची त्याला हिंमतच होत नाहीं. विशुद्ध हृदयाच्या माणसाशी पापी मनुष्यें टिकूंच शकत नाहींत. त्यांची पापभावना तावडतोब नष्ट होते. हें तत्त्व त्यांच्या हृदयांत इतकें ठसून गेलें आहे कीं, त्यांच्याबरोबर रहाणाऱ्या एखाद्या मनुष्यानें कांहीं गुन्हा केला असला तर तो आपला स्वतःचाच गुन्हा आहे असें गांधी मानितात. आणि स्पष्टपणें सांगतात कीं, "माझ्यांत इतकें असत्य भरलेलें आहे कीं ज्यांना मी माझे समजतों आणि ज्यांच्यावर माझा विश्वास आहे, ते सुद्धां मला फसवून असत्याचरण करूं शकतात." एखादा विद्यार्थी खोटें बोलला किंवा त्यानें समजून उमजून कांहीं गुन्हा केला तर अशावेळीं महात्मा गांधींनीं ( आपल्या स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं ) उपवास केल्याचीं अनेक उदाहरणें सांगतां येतील.

एकदां असें घडलें कीं एका मुलाकडून असाच कांहीं गुन्हा घडला. गुन्हा घडला होता एवढेंच नव्हे तर हेतुपुरःसर त्यानें तो केला होता. यामुळें महात्मा गांधी यांनीं **पंधरा दिवस उपवास** करण्याचा निश्चय केला. भीष्मप्रतिज्ञेविषयीं आपण भारतांत वाचतों. परंतु महात्मा गांधी यांचें प्रत्यक्ष उदाहरण डोळ्यांपुढें असल्यामुळें त्याचा परिणाम भीष्मपितामहांच्या गोष्टीपेक्षांही, आपल्या मनावर अधिक होतो. याप्रसंगीं सौ. कस्तूरबाई गांधी या फार आजारी होत्या. ही प्रतिज्ञा ऐकून, आणि कस्तूरबाईंची स्थिति डोळ्यांपुढें उभी राहून, तेथील सर्व मंडळीला अतिशय भीति वाटली. महात्मा गांधी यांचें पिंजरवत् अशक्त शरीर मृत्युमुखीं पडेल अशीहि धास्ती कित्येकांच्या मनांत डोकाऊं लागली. आणि महात्माजींनीं उपवास केला म्हणजे त्यांच्या पत्नीची काय स्थिति होईल, त्या कसें अन्न खाणार ? अशा तऱ्हेचें भय महात्मा गांधी यांना सुद्धां वाटलेंच ! सर्व फीनिक्सवर त्या दिवशीं उदासीनतेची छाया पसरली होती. सायंकाळीं प्रार्थनेच्या वेळीं सर्वजण एकत्र जमून आपापलें हृदय उघडें करूं लागले. त्यावेळीं झालेली हकीगत एका स्मरणवहींतून खालीं उतरून घेतली आहे:—

पूज्यश्री बाबांनीं (आश्रमांतील सर्व मंडळी गांधीं यांस 'बापू' म्हणजे बाबा या गोड नांवानेंच संबोधितात.) आपली प्रतिज्ञा पाळण्याचा निश्चय केला आहे. मी

म्हटलें " बावा ! आजच उपवास न करितां थोड्या दिवसांनंतर केला तर नाहींका चालणार ? असेंच करावें अशी माझी विनंति आहे. "

" तूं म्हणतोस तें खरें आहे. **तिची** प्रकृति हल्लीं बरी नाहीं. तिचें अंतःकरण फार कोंवळें आहे. मी पंधरा दिवसपर्यंत उपवास करणार हें ऐकून तिला इतकें दुःख होईल कीं कदाचित् त्यामुळें तिचा अंतही होईल हेंही मला ठाऊक आहे. पण त्याला मीं कां भ्यावें ? तिनें जगावें हा मोहही मला काय म्हणून असावा ? ईश्वराची इच्छा असल्यास तसें होईल. तिचें त्यांत कल्याण आहे आणि इतर गोष्टींसंबंधानेंही विचार करण्याचें काम माझें नाहीं. मोहासक्ति सोडून आपला धर्म पाळणें हें माझें काम आहे. शिवाय या शरीराचा काय भरंवसा ? दोन दिवसांनंतर तें मृत्युवश झालें तर केलेली प्रतिज्ञा फुकटच जाणार ना ? प्रतिज्ञापालन करीत असतांना मरणें हा धर्म आहे. केलेली प्रतिज्ञा पालन न होतांच मरण आलें तर जीवाची अधोगतिच होईल. म्हणून केलेली प्रतिज्ञा या क्षणींच पाळली पाहिजे. इतकें समजत असूनही थोडे दिवसपर्यंत उपवास करण्याचें जर तहकूब केलें तर तितकी माझी निर्बलता म्हणावयाची. तिची समजूत पटवतां आली तर ठीकच."

वरीलप्रमाणें उत्तर मिळतांच सर्वजण स्तब्ध राहिले. महात्माजी पुढें बोलूं लागले. " मी माझी प्रतिज्ञा पाळावी आणि तरीही माझी शक्ति कायम रहावी अशी तुम्हां सर्वांची इच्छा असली पाहिजे आणि तसें होण्याला एकच मार्ग आहे. मी प्रतिज्ञा सोडून द्यावी असा हट्ट तुम्हीं धराल तर त्यामुळें माझा जोर कमी होणार. माझ्या प्रतिज्ञेचा भंग तर मी करणार नाहींच. पण तुमचा दुराग्रह पाहून माझ्या अंतःकरणाला असह्य वेदना होतील. माझ्याप्रमाणेंच तुम्हींही उपवास करूं लागाल तर तुमचा उपवास निरर्थक होईल–तामसी होईल. त्याचा माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं, आणि तुम्हांलाही त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं. उलट अकल्याणच होईल. कारण कीं, छापखान्याचें, शाळेचें व शेतकीचें काम बंद पडून उलटा अधर्म उभा राहील. यासाठीं मला सांभाळून घेण्याचा एकच मार्ग आहे. तो हा कीं, मोठ्या आनंदांत राहून, उत्साहानें आपापलीं कार्यें चालू ठेवा. त्यांत बिलकुल व्यत्यय येऊं देऊं नका. तरच मलाही आनंद होईल. माझे उपवास मला जाणवणार नाहींत. तुमचीं हास्यमुखें

पाहून व तुमचा उत्साह पाहून माझे पंधरा दिवस पंधरा पळांप्रमाणें हां हां म्हणतां निघून जातील. ”

शांत चित्तानें सर्वांनीं हे शब्द ऐकले, व आपापल्या जागीं गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळपासून महात्माजींच्या उपवासास सुरुवात झाली. जसें काय कांहींच घडलें नाहीं, अशा रीतीनें प्रत्येक जण आपापलीं कामें करूं लागला. स्नेहाची सार्थकता गुरुजनाच्या इच्छेप्रमाणें आचरण करण्यांतच आहे. ही गोष्ट आश्रमवासियांच्या हृदयांतच होती. पंधरा दिवस सर्वांनीं उत्साहपूर्ण मनानें काढले. सोळाव्या दिवशीं दुपारीं अकरा वाजतां महात्माजींनीं अन्न ग्रहण केलें. एका नारिंगाचा रस आणि पोपयाच्या रसांत थोडें लिंबू पिळून त्याचे एक दोन चमचे एवढेंच गांधींनीं घेतलें. खाऊं लागण्यापूर्वी एका मुलाला साधुकवि नरसिंह मेहेत्याचें आपल्याला अत्यंत प्रिय असलेलें खालील पद त्यांनीं गाण्याला सांगितलें:—

( **चाल**:–पंचतुंड नर० )

वैष्णव जन तो तेने कहिये जे पीड पराई जाणे रे
परदुःखे उपकार करे तोए मन अभिमान न आणे रे ॥ ध्रु० ॥

सकळ लोकमां सौने वंदे निंदा न करे केनी रे
वाच, काछे, मन, निश्चळ राखे; धन धन जननी तेनी रे ॥ १ ॥

समदृष्टी ने तृष्णात्यागी परस्त्री जेने मात रे
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे ॥ २ ॥

मोह माया व्यापे नहीं जेने दृढ वैराग्य जेना मनमां रे ॥
रामनाम सूं ताळी लागी, सकल तीरथ तेना तनमां रे ॥ ३ ॥

वणलोभीने कपटरहित छे कामक्रोध निवाऱ्या रे
भणे नरसैंयो तेनुं दर्शन करतां कुळ एकोतेर तार्‍या रे ॥ ४ ॥

---

१ कासोटा अर्थात् ब्रह्मचर्य. २ धरीत नाहीं.

या प्रसंगा नंतरच्या महात्माजींच्या स्थितीचें चित्र खालील उताऱ्यावरून दिसून येण्यासारखें आहे.

वैशाख व. १४ शनिवार.
संवत् १९७०.

आज बाबांनीं उपवास सोडल्याला सात दिवस झाले. त्यांना अतिशय वेदना झाल्या. त्यांची स्थिति मरणप्राय झाली होती. या उपवासांत त्यांनीं पुष्कळ विचार केला. आपल्या मार्गांत आणि चालू रहाणींत अतिशय दृढ झा... आतां त्यांना देहाचे चोचले नरकसमान वाटतात. भव्य देखावे ... भोगविलासांची सामग्री पहातांच त्यांना ओकारी येते. हें ... वर्तनावरून दिसून आलें. परवांचे दिवशीं पूज्य...... कीं त्यांची जीभ त्यांच्या स्वाधीन नाहींशी झाल... खर्चाचा झाला आहे ही आणि इतरही गोष्टी त्यां... वर पुष्कळ रागावले. कालसंध्याकाळीं प्रार्थनेच्य... माझ्यावर प्रहारावर प्रहार होत आहेत. गेल्... गोष्टी घडल्या कीं त्यामुळें माझें हृदय कष्टी होऊन... मनाचा संताप झालेला आहे. कोणीही बोललेल... आहे. काल रात्रीं...ना मी फार बोललों. इतकें ... लहान मुलाप्रमाणें रडले. मी त्यांना सांगितलें कीं, ... असेल तर माझ्यापासून दूर रहा. माझ्याशीं असलेला ... चैनीची रहाणी मला सहन होणार नाहीं. माझ्याजवळ रहाणे... धारेवर चालण्याप्रमाणें आहे.

आज सकाळीं...लाही माझ्यापाशीं रडावें लागलें. या सर्व गो... स्पष्टपणें समजेल कीं मी फार कडक बनलों आहें. आणि तो तुम... फिनिक्समध्यें आयुष्य कंठणें आतां फार कठीण आहे. म्हणून लहा... सर्वांना मी सांगतों कीं, तुम्ही सर्व या गोष्टी समजून, ध्यानांत ठेवून येथें र... मि. गोखले, अँड्रूज, पिअर्सन वगैरे मोठमोठ्या लोकांनीं आश्रमाविषयीं फार स्तुति केली आहे. त्याचें कारणही येथील शिक्षण आहे. तुम्हीं गीतेचे श्लोक पाठ केलेत एवढ्यानें माझें समाधान होणार नाहीं. तुम्ही इतिहास शिकतां किंवा

नाहीं, आंकडे मोडतां किंवा नाहीं, संस्कृतचें अध्ययन करतां कीं नाहीं, त्याची मला मुळींच पर्वा नाहीं. पण तुम्हीं संयम-वृत्ति धारण करणें फार आवश्यक आहे. ती मला पाहिजे आहे. **मी माणसाचा गुलाम होण्याचें एक वेळ कबूल करीन. पण माझ्या मनाचा गुलाम कधींही होणार नाहीं.** मनाचा गुलाम होण्यासारखें महत्पाप दुसरें नाहीं. म्हणून या सर्व गोष्टी तुम्हीं ध्यानांत ठेवा आणि मनोनिग्रह करण्यास शिका. तरच तुम्हीं माझ्यापाशीं राहूं शकाल. नाहींतर मला कुणाचीहि गरज नाहीं. तुम्हांला शिकविण्याचा डौल मिरवीत नाहीं. माझ्यापाशीं एक शिष्य आहे, त्याला एकट्यालाच शिकविणें ...र्ग आहे. त्याला शिक्षण दिल्यानें मला तुमचें, हिंदुस्थानचें आणि ...रतां येईल. हा शिष्य म्हणजे मी स्वतःच होय. याच- ... आपणच शिष्य बनतील किंवा बनविण्यासाठीं ... तर तेच येथें रहाण्याला लायक होतील. असली ... येथें न रहावें हें बरें. त्यांतच त्याचें हित आहे. ...जतां, निर्जीव यंत्राप्रमाणें, आयुष्याचा काळ ...जतों. व असें पाप तुमच्या हातून घडावें अशी



वालिआमा स्मारक उघडण्याचा समारंभ ( हिंदुस्थान हा प्रसंग कसा विसरेल ? )



हिंदुस्थानच्या इभ्रतीसाठीं 'खुनी कायद्यास' न जुमानणारें गांधींचे ५००० सत्यग्रह्यांचे लष्करास ट्रॅन्स्वालच्या सरहद्दीवर अटक झाली आहे.

# लेख व भाषणें.

# गुरुवर्य महात्मा गोखले.

(नुकत्याच साजऱ्या झालेल्या कै. गोखले यांच्या पुण्यतिथिनिमित्त त्यांच्या भाषणांचें व लेखांचें एक पुस्तक गुजराथी भाषेंत प्रसिद्ध झालें आहे. खालील लेख त्या पुस्तकाला प्रस्तावना म्हणून म. गांधी यांनी लिहिला आहे.)

गोखले यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं त्या स्वर्गस्थ महात्म्याच्या भाषणांचें भाषांतर गुजराथींत प्रसिद्ध करण्याचा विचार प्रथम मला सुचला असल्यामुळें त्या पुस्तकाच्या पहिल्या भागाची प्रस्तावना मींच लिहावी हें कित्येक अंशीं योग्य होय. गोखले यांची पुण्यतिथि दरवर्षी साजरी करावी असा आमचा संकल्प आहे. प्रत्येक वेळीं भजन कीर्तन करावें, व्याख्यानें द्यावींत, आणि सभेचें विसर्जन व्हावें अशानें पुष्कळ वेळां कालक्षेप होतो. कोणीहि त्याचा खरा फायदा करून घेत नाहींत. भाषणांच्या महिम्यापेक्षां कार्याचा महिमा वाढावा आणि जनसमाजानें अशा प्रकारच्या पुण्यतिथीपासून कांहींतरी खरा लाभ करून घ्यावा म्हणून पुण्यतिथीच्या व्यवस्थापकांनीं गेल्या वर्षी असा ठराव केला कीं, या निमित्तानें एखादें उपयोगी पुस्तक मातृभाषेंत प्रसिद्ध करावें. कोणतें पुस्तक याचाहि निश्चय तावडतोड झाला. आणि साहजिकपणेंच पहिली पसंती स्वर्गस्थ गोखले यांच्या स्वतःच्या भाषणांचीच झाली.........

इतका भाग म्हणजे खरोखर प्रस्तावनेची प्रस्तावना आहे. खरी प्रस्तावना म्हणजे कै. गोखले यांच्या विषयीं कांहीं लिहिणें ही होय. पण शिष्यानें गुरु-विषयीं काय लिहावें ? कसें लिहावें ? शिष्याचें लिहिणें म्हणजे एक प्रकारें धीटा-ईच होय. खरा शिष्य तोच कीं जो गुरूंतच विलीन होतो; म्हणजे तो टीकाकार असूंच शकत नाहीं. दोष पहाणारी ती खरी भक्तिच नव्हे. आणि गुणदोषांचें पृथ-क्करण न करूं शकणाऱ्या लेखकापासून लोकांनीं (गुरु-) स्तुतीचा अंगिकार मुळींच न केला तरी त्या गोष्टींबद्दल कुरकुरण्याला ( लेखकाला ) वावच राहणार नाहीं.

शिष्याचें आचरण हीच त्याची गुरुवरील टीका होय. राजकीय बाबतींत गोखले हे माझे गुरु होते ही गोष्ट मीं अनेकवार सांगितली आहे. तेव्हां त्यांच्या विषयीं लिहिण्यास मी स्वतःला असमर्थ समजतों. जितकें लिहावें तितकें कमी असेंच मला वाटणार. मला वाटतें, गुरु व शिष्य यांच्यामधील संबंध हा केवळ आध्यात्मिक असतो. तो आंकडे शास्त्राला अनुसरून जडत नाहीं. एका क्षणांत, कळतो न कळतो अशा रीतीनें जडतो, आणि एकदा जडला म्हणजे तो कधींहि सुटत नाहीं.

इ. स. १८९६ मध्यें आम्हां दोघांमध्यें हा संबंध जडला. त्या वेळीं मला त्याचें बिलकुल भान नव्हतें व त्यांनाही नव्हतें. त्याच वेळीं गुरुजींच्याहि गुरुजींना, लोकमान्य टिळकांना, सर फेरोजशहा मेहतांना, न्या. बद्रुदिन तैयबजींना, डा. भांडारकरांना, आणि बंगाल, मद्रास प्रांतांतील पुढाऱ्यांनाहि प्रणिपात करण्याचा सुप्रसंग मला मिळाला होता. मी त्या वेळीं अगदीं तरुण होतों. सर्वांनींच माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला. सर्वांच्या भेटीचा हा प्रसंग कधींही विसरतां येणार नाहीं असा होता. पण जी शीतलता मला गोखले यांच्या भेटींत लाभली ती इतरांपासून मी मिळवूं शकलों नाहीं. गोखल्यांनीं म्हणजे माझ्यावर प्रेमाचा वर्षाव अधिक केला होता असें मला स्मरत नाहीं. प्रेमाचा हिशेबच करावयाचा झाला तर मला असें सांगतां येईल कीं, डा. भांडारकर यांनीं माझ्या संबंधानें जितकी आस्था दाखविली तितकी दुसऱ्या कोणीच दाखविली नाहीं. त्यांनीं मला सांगितलें कीं, " मी सध्यां सार्वजनिक कामांत भाग घेत नाहीं; तरी पण तुमच्याच साठीं तुमच्या प्रश्नाच्या संबंधानें भरणाऱ्या सभेंत अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें मीं कबूल केलें आहे. " असें असूनही केवळ गोखले यांनीच मला प्रेमपाशांत जखडून टाकिलें. या गोष्टीचा प्रत्यक्ष परिणाम त्या वेळीं कांहींच दिसून आला नाहीं. पण १९०२ सालीं कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेंत मी हजर होतों, त्या वेळीं माझ्या शिष्य–दशेची पूर्ण जाणीव मला झाली. वर सांगितलेल्या बहुतेक सर्व पुढाऱ्यांच्या दर्शनाचा लाभ या वेळीं मला फिरून घडला. मी पाहिलें कीं, गोखले हे मला विसरले नव्हते, इतकेंच नाहीं तर त्यांनीं माझा एकदम हातच धरला.

मला आपल्या घरीं खेंचून नेलें. विषय विचारिणी सभेंत ( सबजेक्ट कमिटींत ) मला भीति पडली कीं माझी दाद कोणी घेत नाहीं. ठरावांची चर्चा चालली

असतांना माझ्याहि खिशांत दक्षिण आफ्रिकेविषयीं एक प्रश्न आहे हें सांगण्याची हिम्मत मला शेवटपर्यंत झाली नाहीं. माझ्यासाठीं रात्रीं कोणी थोडाच बसणार होता ? पुढारी लोक काम लवकर उरकण्यास अधीर झाले. आतां उठून जातील अशा भीतीनें मी कांपत होतों. गोखले यांस आठवण देण्याचाहि धीर मला झाला नाहीं. इतक्यांत तेच म्हणाले, " रा. गांधी यांजपाशीं दक्षिण आफ्रिकेंतील हिन्दी लोकांच्या स्थितीसंबंधीं एक ठराव आहे त्याचा विचार केलाच पाहिजे." माझ्या आनंदाला पार राहिला नाहीं. राष्ट्रीय सभेचा हा माझा पहिलाच अनु-भव असल्यामुळें, तेथें पास होणाऱ्या ठरावांची किंमत मला फार वाटत होती.

त्यानंतरचेहि पुष्कळ प्रसंग आहेत व ते सर्व पवित्र आहेत. पण सध्यां त्यांचा जो महामंत्र मीं मानिला आहे त्याचें वर्णन करून ही प्रस्तावना संपविणें बरें.

या कठिण कलिकालांत स्वच्छ धर्मवृत्ति एकाद्याच ठिकाणीं आढळते. ऋषि, मुनि, साधु इत्यादि नांवें धारण करून भटकत फिरणाऱ्या लोकांत ही वृत्ति क्वचितच दिसून येते. ते सध्यां धर्माचे रक्षक राहिले नाहींत हें सर्वांनाच दिसतें. एकाच सुंदर वाक्यांत धर्म कोठें असूं शकतो हें भक्तशिरोमणि कवि नरसिंह महता यानें दाखविलें आहे:—

" ज्यां लगी आतमातत्व चीन्यो नहि त्यां लगी साधना सर्व जूठी " जोंपर्यंत आत्मतत्त्वांची ओळख झाली नाहीं तोंपर्यंत सर्व साधनें व्यर्थ होत. हें त्याच्या अनुभवसागराच्या मंथनानें निघालेलें त्याचें वचन आहे. ह्यावरून असें दिसतें कीं महातपस्वी व योगी जनांतहि धर्मबुद्धि असतेच असें नाहीं. गोखले यांनीं आत्मतत्व उत्तम रीतीनें जाणलें होतें याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. धर्माचें अवडंबर त्यांनीं कधीं केलें नाहीं, तरी त्यांचें सर्व आयुष्य धर्ममय होतें. निरनिराळ्या युगांत मोक्षमार्गाकडे नेणारी प्रधान प्रवृत्ति निरनिराळी अस-ल्याचें दिसून येतें. जेव्हां जेव्हां धर्मबंधनें शिथिल होतात तेव्हां तेव्हां धर्मजागृति होण्यास एकादी विशिष्ट प्रवृत्ति विशेष उपयोगीं पडते. ही विशिष्ट प्रवृत्ति त्या त्या वेळेच्या परिस्थितीप्रमाणें निरनिराळी असते. हल्लींच्या काळीं आपली अवनति राजकीय बाबतींत दिसते. अर्धवट विचार केल्यामुळें आपल्याला असें वाटतें कीं, राजकीय स्थिति सुधारली म्हणजे सर्व बाबतींत तेव्हांच उन्नति होईल.

हें वाक्य एक प्रकारेंच खरें आहे. राजकीय स्थिति सुधारणार नाहीं तोंपर्यंत ऊन्नति होणार नाहीं. पण राजकीय स्थितींत वाटेल त्या प्रकारें परिवर्तन झालें तरी उन्नतिच होईल असें नाहीं. हें परिवर्तन करणारीं साधनें जर घाणेरडीं असतील तर होणारें परिवर्तन उन्नति नव्हे तर अवनतिच असण्याचा फार संभव आहे. स्वच्छ, शुद्ध साधनांनीं घडणारें परिवर्तनच आपल्याला उच्च मार्गाला नेईल. हें तत्त्व गोखले यांनीं सार्वजनिक कामांत पडतांनाच ओळखलें होतें. आणि त्यांनीं तें कृतींतहि आणिलें. लोकजागृति फक्त राजकीय प्रवृत्तिच्या द्वारेंच होऊं शकते हें तर सर्वांनींच पाहिलें होतें. जर ह्या **राजकीय प्रवृत्तीला धर्माचें स्वरूप** दिलें तर ती मोक्षमार्ग दाखविणारी होईल, हा भव्य विचार त्यांनीं आपल्या 'भारत सेवक समाजा' पुढें व एकंदर लोकांपुढें मांडला. त्यांनीं स्पष्ट सांगिलें कीं, आपल्या राजकारणास धर्मवृत्तीचें बळ मिळत नाहीं तोंपर्यंत तें शुष्कच राहणार. 'टाइम्स ऑफ इंडियां'तील लेखकानें त्यांच्या मृत्युलेखांत या गोष्टीचा खास उल्लेख केला होता, आणि राजकीय संन्यासी उत्पन्न करण्याचा हा त्यांचा प्रयत्न सफल होईल किंवा नाहीं या बद्दल शंका प्रदर्शित करून त्यांनीं आपल्यामागें ठेविलेल्या 'हिंद-सेवक-समाजास' जागें केलें होतें. या कालांत राजकीय संन्यासीच संन्यासाला शोभविणार आहेत, इतर बहुधा भगव्या वस्त्रांना लाजविणारेच असतील. शुद्ध धर्ममार्गानें चालणारा कोणीही भारतवासी राजकीय कामांत भाग घेतल्यावांचून राहील असें होणें कठीण. दुसऱ्या रीतीनें म्हणावयाचें म्हणजे शुद्धधर्ममार्गी मनुष्य लोकसेवेचा अंगिकार केल्यावांचून राहूंच शकत नाहीं. आणि राज्यव्यवस्थेच्या जाळ्यांत आपण इतके अडकून पडलों आहोंत कीं राजकारणांत पडल्याशिवाय लोकसेवा करणेंच अशक्य झालें आहे. पूर्वी जे शेतकरी लोक राज्याधिकारी कोण आहे याचें ज्ञान नसतांनाही आपला जीवनक्रम निर्भयपणें चालवूं शकत असत, त्यांची असली वेगळी स्थिति आतां राहिली नाहीं. अशा स्थितींत त्यांचें धर्माचरण राजकीय परिस्थितीला अनुसरून झालें पाहिजे. या महत्तत्वाचा स्वीकार आपले साधू, ऋषि, मुनी, मौलवी, पादरी करतील तर ठिकठिकाणीं "भारत सेवक समाज" दिसूं लागेल, आणि धर्मवृत्तीला हिंदुस्थानांत असें व्यापक स्वरूप येईल कीं त्याच्या योगानें राजकारण जें आज लोकांना अरुचिकर वाटतें तें शुद्ध आणि प्रिय वाटूं लागेल; हिंदुस्थान धार्मिक साम्राज्याचा उपभोग पूर्वीप्रमाणें

पुन्हां घेऊं लागेल. हिंदुस्थानचीं बंधनें एका क्षणांत तुटतील आणि एका प्राचीन द्रष्ट्यानें आपल्या अमर वाणीनें वर्णिलेली स्थिति उत्पन्न होईल. "लोखंडाचा उपयोग तरवार बनविण्याकडे न होतां नांगर बनविण्याकडे होईल आणि सिंह आणि मेंढरें गुण्या गोविंदानें राहतील." अशी स्थिति उत्पन्न करणारी प्रवृत्ति हा गुरुवर्य गोखले यांचा जीवनमंत्र होता, हाच त्यांचा संदेश आहे, आणि मला वाटतें, सरळ मनानें वाचणाराला, त्यांच्या भाषणांच्या प्रत्येक शब्दांत हा मंत्र आढळेल.

---

## महात्मा गोखले यांचा जीवनसंदेश.

( मुंबई शहरांत स्त्रीजातीच्या उन्नतीसाठीं झटणारी 'भगिनीसमाज' नांवाची एक संस्था असून ती स्त्रियोपयोगी पत्रकें प्रसिद्ध करीत असते. म. गांधी यांनीं त्यांतील एक पत्रक लिहिलें होतें तें हें होय. )

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय ! तत्कुरुष्व मदर्पणम् ॥**

जे शब्द श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितले होते तेच जणूं हिंद देवीनें महात्मा गोखले यांना सांगितले असावेत आणि ते त्यांनीं पाळले असावेत, असें त्यांचें आचरण होतें. त्यांनीं जें जें केलें, त्यांनीं ज्याचा उपभोग घेतला, ज्याचें बलिदान केलें, जें तप आचरिलें, तें तें सर्व त्यांनीं हिंदमातेला अर्पण केलें होतें ही सर्वमान्य गोष्ट आहे.

अशा तऱ्हेनें देशासाठींच जगलेल्या या महात्म्याचा आपल्या देशबांधवांना संदेश तरी काय होता ? त्यांच्या मृत्युसमयीं हिंद सेवक समाजाचे जे सेवक हजर होते त्यांना बोलावून त्यांनीं असे शब्द सांगितले:—

"माझें जीवनचारित्र लिहीत बसूं नका. माझे पुतळे उभारण्यांत वेळ घालवूं नका. तुम्हीं हिंदुस्थानचे खरे सेवक असाल तर आपल्या उद्देशाप्रमाणें वागण्यांत म्हणजे हिंदुस्थानची सेवा करण्यांतच सर्व आयुष्य वेंचा."

या सेवेविषयीं त्यांच्या मनांतील उद्गार आपल्या मनाजवळ आहेत. राष्ट्रीय सभेचें काम चालविणें हें आहेच. भाषणें व लेख यांच्या द्वारें जन-समाजाला देशाची खरी स्थिति समजावून देणें हेंही आहेच. प्रत्येक हिंदवासीयाला शिक्षण देण्याचा प्रयत्न करणें हेंहि खरेंच. पण हें सर्व कशाकारितां? आणि कशा रीतीनें? याचें उत्तर देतांना त्यांची दृष्टि काय आहे हें समजून येतें. आपल्या संस्थेचे नियम बनवीत असतां त्यांनीं लिहिलें आहे कीं 'सेवकांचें कर्तव्य हिंदुस्थानचें राजकीय जीवन धार्मिक बनविणें हें आहे.' यांत सर्व गोष्टींचा समावेश होतो. त्यांचें जीवन धार्मिक होतें. त्यांनीं जें जें केलें त्याच्या मुळाशीं त्यांची धार्मिक बुद्धि होती अशी साक्ष माझा आत्मा मला देत आहे. वीस वर्षांपूर्वी या महात्म्याचे उद्गार कधीं कधीं नास्तिकासारखे भासत असत " जी श्रद्धा रानडे यांच्या अंगीं होती ती माझ्या अंगीं असती तर किती बरें झालें असतें " असें ते एकदा म्हणाले होते. पण या वेळींही त्यांच्या कार्याच्या मुळाशीं त्यांची धर्मबुद्धि होती असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. ज्या पुरुषाचें आचरण एकाद्या साधूसारखें आहे, ज्याच्या वृत्ति निर्मळ आहेत, जो सत्याची मूर्ति आहे, जो नम्र आहे, ज्यानें अहंभावाचा सर्वस्वी त्याग केला आहे तो पुरुष धर्मात्माच होय. मग त्याला ह्या गोष्टीची जाणीव असो किंवा नसो. गोखले हे अशा प्रकारचे महात्मे होते असें मी त्यांच्या बरोबरच्या जवळ जवळ वीस वर्षांच्या सहवासानें सांगूं शकतों.

सन १८९६ सालीं नाताळांतील मुदतबंदी मजुरीच्या प्रश्नासंबंधानें मीं हिंदुस्थानांत चर्चा चालविली होती. त्या वेळीं कलकत्ता, मुंबई, पुणें, मद्रास वगैरे ठिकाणच्या पुढाऱ्यांशीं माझा पहिल्यानेंच संबंध आला. म. गोखले, रानडे यांचे शिष्य म्हणून त्या वेळेस ओळखले जात असत. फर्ग्यूसन कॉलेजला त्यांनीं आपलें आयुष्य अर्पण केलेलेंच होतें. आणि मी केवळ बिनअनुभवी तरुण होतों. आमची पहिली भेट जेव्हां पुण्यास झाली, त्याच वेळीं आमच्यामध्यें जो निकट संबंध जडला तो दुसऱ्या कोणाहि पुढाऱ्याशीं जडला नाहीं. महात्मा गोखले यांच्याविषयीं ज्या गोष्टी मीं ऐकल्या होत्या, त्यांचा अनुभव तर मला प्रत्यक्ष आलाच. त्यांची ती प्रेमळ व सुहास्य मूर्ति मी कधींहि विसरणार नाहीं. ते प्रत्यक्ष धर्ममूर्तिच आहेत असें मला त्या वेळीं वाटलें. रानडे यांचेंहि दर्शन त्या वेळेस मला झालें होतें. परंतु त्यांच्या अंतरात्म्यांत मी प्रवेश करूं शकलों

नाहीं. त्यांना मी फक्त गोखल्यांचे गुरु म्हणूनच ओळखीत होतों. ते माझ्यापेक्षां वयानें व अनुभवानें फारच मोठे असल्या कारणानें असो किंवा इतर कांहीं कारणामुळें असो, मी गोखल्यांना जसा ओळखूं शकलों तसा रानड्यांना ओळखूं शकलों नाहीं.

वर वर्णन केलेल्या १८९६ तील प्रसंगापासून म. गोखले यांचें राजकीय जीवन मला आदर्शरूप झालेलें होतें. त्याच वेळीं त्यांनीं राजकीय गुरु या नात्यानें माझ्या हृदयांत निवास केला. त्यांनीं सार्वजनिक सभेचें त्रैमासिक लिहिलें, त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत शिक्षणाचें कार्य करून कॉलेज ऊर्जित दशेस आणिलें, त्यांनीं वेल्बी कमिशनमध्यें जबानी देऊन आपली खरी योग्यता सिद्ध केली; त्यांच्या हुषारीची छाप लॉर्ड कर्झन यांजवर इतकी उत्तम पडली होती कीं, कोणालाहि न जुमानणारे हे साहेब म. गोखले यांस भिऊनच असत.

महत्कार्यें करून हिंदभूमीची कीर्ति त्यांनीं उज्वल केली. पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें आपल्या जीवाकडे न पहातां त्यांनीं काम केलें. त्यांनीं केलेल्या या व इतर कार्यांचा वृत्तांत दुसऱ्या लोकांनीं अधिक चांगल्या रीतीनें सांगितला आहे. शिवाय, मला जो त्यांचा खास संदेश वाटतो, तो वरील कार्यांत अगदीं स्पष्टपणें दिसतो असें म्हणवत नाहीं. म्हणून या लेखांत मी स्वतः जो अनुभव घेतला आहे तो देणार आहें. त्यांत त्यांच्या संदेशाचें प्रमाणहि आढळून येण्यासारखें आहे.

सत्याग्रहाच्या लढ्याचा ( निःशस्त्र प्रतीकाराच्या चळवळीचा ) परिणाम त्यांच्या मनावर इतका खोल झाला कीं त्यांची प्रकृति अगदीं नादुरुस्त असतांहि दक्षिण आफ्रिकेचा प्रवास करण्याचा त्यांनीं निश्चय केला. सन १९१२ मध्यें ते तेथें येऊन पोहोंचले. तेथील हिंदी लोकांनीं, एकाद्या बादशहाला शोभेल अशा प्रकारें त्यांचें स्वागत केलें. केप टाऊनमध्यें ते उतरले त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तेथील टाउन हॉलमध्यें सभा झाली. तेथील मेयर अध्यक्ष होते. गोखलेजींची प्रकृति खरें पहातां सभेंत जाऊन भाषण करण्यासारखी मुळींच नव्हती, तरीहि त्यांच्यासाठीं अत्यंत परिश्रमानें निश्चित केलेल्या कार्यक्रमांतील असंख्य गोष्टींपैकीं एकहि न वगळण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्या निश्चयाला अनुसरून त्या टाउन हॉलमधील

सभेस ते हजर झाले. पहिल्याच अनुभवात कपटाउनमधील गोऱ्यांचीं मनें त्यांनीं हरण करून घेतलीं. सर्वांना असेंच वाटलें कीं कोणी पवित्र आत्मा इकडे आला आहे. मि. मेरिमन् नांवाचे दक्षिण आफ्रिकेंतील नांवाजलेले व उदार चरित पुढारी गोखले यांना म्हणाले "साहेब, आपल्यासारखे पुरुष आमच्या भूमींत येतात तेव्हां आमचें येथील वातावरण पवित्र बनतें."

जसजसे म. गोखले अधिक अधिक प्रदेश हिंडूं लागले तसतसा हाच अनुभव दृढतर होत चालला. प्रत्येक ठिकाणीं क्षणभर गोरे व गहूं वर्णाचे ( काळे ) लोक यांच्यामधील भेद नष्ट झाला. प्रत्येक ठिकाणीं केपटाउन सारख्या सभा भरत असत आणि तेथें गोरे व हिंदी लोक एकाच रांगेंत बसत व महात्मा गोखले यांस एकसारखाच मान देऊन स्वतः मान पावत. जोहानिसवर्गमध्यें त्यांना एक मेजवानी देण्यांत आली होती. तिला जवळ जवळ ३०० नामांकित गोरे हजर राहिले होते. तेथील मेयर अध्यक्ष होते. जोहानिसवर्गचे गोरे कोणाच्याहि तेजानें दिपून जाणारे नाहींत. त्यांतील कित्येक कोट्याधिपति आहेत तसेच माणसांना ओळखणारे आहेत. म. गोखले यांशीं हस्तांदोलन करण्याचे कामीं त्यांच्यांत चढओढच लागली होती. याचें कारण एकच होतें. म. गोखले यांच्या भाषणांत श्रोतृगण त्यांची अलोट देशभक्ति व तिच्यावरोबर त्यांची न्यायदृष्टि हीं पाहूं शकत होता. स्वदेशाची संपूर्ण प्रतिष्ठा त्यांनीं इच्छिली; पण अन्य देशांचा अपमान इच्छिला नाहीं. आपल्या देशाचे सर्व हक्क रक्षण करण्याची जितकी तत्परता त्यांच्यांत होती तितकीच तसें करतांना दुसऱ्याचे हक्क बुडूं नयेत अशी त्यांची आकांक्षा होती. यामुळें त्यांच्या वचनांत सर्वांना स्वाभाविक माधुर्य वाटत असे.

म. गोखले यांनीं दक्षिण आफ्रिकेंत जीं भाषणें केलीं त्यांपैकीं उत्तमोत्तम जोहानिसबर्गचें होय असें त्यांचें स्वतःचें मत होतें. तें भाषण पाऊण तासाच्यावर चाललें तरी एकहि श्रोता कंटाळला आहे, असा आभास मला झाला नाहीं. हें भाषण त्यांनीं कशा प्रकारें केलें ? त्याची तयारी पूर्वी सहा दिवसांपासून ते करीत होते. त्यासाठीं पाहिजे होता तो इतिहास त्यांनीं समजून घेतला, आंकडे पाठ करून ठेविले. नंतर आधींच्या दिवशीं रात्रीं जागून आपली भाषा ठीक ठाक केली. परिणाम वर सांगितलाच कीं त्यांनीं स्वकीय व परकीय दोघांनाहि संतुष्ट केलें.

जनरल बोथा व जनरल स्मटस् यांना जेव्हां ते दक्षिण आफ्रिकेची राजधानी प्रिटोरिया येथें भेटले तेव्हां त्या भेटीला तयार होण्यासाठीं त्यांनीं काळजीपूर्वक जे परिश्रम केले ते मरेपर्यंतहि मी विसरणार नाहीं. भेटीच्या आदल्या दिवशीं मि. कॅलनबॅक् (म. गांधी यांचे एक मित्र. द. आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत कायमचें घर करण्यासाठीं येत असतां वाटेंत दोघेहि इंग्लंडमध्यें होते. त्यांचा मुकाम तेथें असतांनाच हल्लींचें राक्षसी युद्ध सुरु झालें. व लागलीच मि. कॅलनबॅक जर्मन आई बापांच्या पोटीं जन्म घेतल्याच्या अपराधास्तव राजकीय कैदी झाले. हल्लींही ते तेथेंच आहेत) यांची व माझी परीक्षा घेतली. स्वतः पहांटेस तीन वाजतां उठले. आह्मां दोघांनाहि उठविलें. त्यांनां दिलेलें सर्व साहित्य त्यांनीं वाचून ठेविलेंच होतें. आतां माझी उलट तपासणी करून त्यावरून स्वतःची तयारी पूर्ण झाली आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें होतें. मीं त्यांना विनयपूर्वक सांगितलें कीं " इतके परिश्रम करण्याची जरूर नाहीं. सध्यां आम्हांला कांहींहि मिळालें नाहीं तरी आम्ही झुंजूं, पण आमच्या सोयी साठीं आपला बळी द्यावयाची आमची इच्छा नाहीं. " पण ज्या पुरुषानें आपला सर्व आत्मा कार्यांत ओतण्याची संवय करून घेतलेली, तो माझ्या बोलण्याकडे कसा लक्ष देणार ? त्यांच्या उलट तपासणीचें मी काय वर्णन करूं ? त्या कामांत घेतलेल्या काळजीची किती प्रशंसा करूं ? एवढ्या मेहेनतीचा परिणाम एकच असणार. प्रधानमंडळानें वचन दिलें कीं, सत्याग्रही लोकांची मागणी सरकारास कबूल आहे, अशा प्रकारचा कायदा येत्या बैठकींत पास करूं आणि तीन पौंडांचा जो कर मजुरांवर आहे तो काढून टाकूं.

पण हें वचन पाळलें गेलें नाहीं. मग म० गोखले काय गप्प बसले ? क्षणभरहि नाहीं. माझी खात्री आहे कीं, १९१३ सालीं हें वचन पाळविण्यासाठीं त्यांनीं जे अखंड परिश्रम केले त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतील निदान दहा वर्षें कमी झालीं असलीं पाहिजेत. त्यांच्या डॉक्टरांचेंहि मत असेंच आहे. या वर्षीं हिंदुस्थानला जागृत करण्यासाठीं, पैसे जमविण्यासाठीं त्यांनीं जी दगदग सोसली तिची कल्पना करून देणें कठीण आहे. दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नानें हिंदुस्थान हादरून गेलें होतें हा म. गोखले यांचा प्रताप होय. लॉ. हार्डिंज यांनीं मद्रास येथें इतिहासांत संस्मरणीय असें भाषण केलें हा प्रतापहि त्यांचाच. त्यांच्या निकट परिचयांतील लोक सांगतात कीं दक्षिण आफ्रिकेंतील प्रश्नाच्या चिंतेनें ते अंथरुणाला

खिळले. तथापि शेवटपर्यंत विश्रांति घेण्याचें त्यांनीं नाकारिलें. दक्षिण आफ्रिकेहून पत्रासारख्या लांबलचक, मध्यरात्रीं येणाऱ्या तारा त्याच क्षणीं वाचाव्या, जवाब त्याच क्षणीं तयार करावा, तावडतोब लॉर्ड हार्डिजनां तारा कराव्या, वर्तमानपत्रांत पाठविण्याच्या मजकुराचा मसुदा करावा, आणि या सर्व कामांच्या गर्दीत खाण्याचेंहि राहून जावें, निजण्याचें बाजूस रहावें. रात्रीचे दिवस करावेत ! असली अनन्य निःस्वार्थ भक्ति जो धर्मात्मा असेल तोच करूं शकेल.

' हिंदु व मुसलमान ' या प्रश्नांतहि त्यांची केवळ धार्मिक दृष्टि होती. एकदां एक वेषधारी हिंदु म्हणवणारा साधु त्यांच्यापाशीं आला. ' मुसलमान हे नीच आहेत व हिंदु हे श्रेष्ठ आहेत ' असें तो म्हणूं लागला. महात्मा गोखले आपल्या जाळ्यांत सांपडत नाहींत, हें पाहून " तुम्हास हिंदुत्वाचा अभिमानच नाहीं " असा त्यानें त्यांच्यावर आरोप केला. महात्मा गोखले यांनीं भिवया चढवून हृदयभेदक आवाजानें उत्तर दिलें, " तुम्ही म्हणतां तसें करण्यांतच जर हिंदुपणा असेल तर मी हिंदु नाहीं; तुम्ही माझ्यापासून चालते व्हा. "

महात्मा गोखले यांच्या अंगीं निर्भयता हा गुण फार होता. धर्मनिष्ठेमध्यें या गुणास जवळ जवळ पहिलें स्थान आहे. ले. रॅण्ड साहेब यांच्या खुनानंतर पुण्यांत नुसता कहर उसळला होता. त्यावेळीं महात्मा गोखले हे विलायतेंत होते. पुण्याचे तर्फे त्यांनीं तेथें केलेलें भाषण जगजाहीर आहे. त्यांत सांगितलेली कांहीं हकिगत पाठीमागून शाबित होऊं शकेल असें नव्हतें. थोड्याच दिवसांनीं ते इकडे आले. भाषणांत ज्या इंग्रज शिपायांवर आक्षेप केला होता त्यांची त्यांनीं माफी मागितली. त्या माफीनें हिंदुस्थानांतील कित्येक लोक नाराजही झाले. महात्माजींना कित्येकांनीं सार्वजनिक काम सोडून देण्याची सल्ला दिली. कित्येक अज्ञानी लोकांनीं त्यांच्यावर भित्रेपणाचा आरोप करण्यालाहि मागें पुढें पाहिलें नाहीं. या सर्वांना त्यांनीं एकच जवाब फार गंभीर व मधुर भाषेंत दिला कीं, " देशसेवेचें कार्य मीं कोणाच्या हुकुमानें हातीं घेतलें नाहीं आणि कोणाच्या हुकुमानें मला तें सोडूनही देतां येणार नाहीं. मी माझें कर्तव्य बजावीत असतां लोकपक्ष माझ्या बाजूस राखूं शकला तर मला बरें वाटेल; पण तितकें माझें सुदैव नसेल तरी ठीकच आहे. " कृति करणें हा त्यांनीं आपला धर्म मानला. ती करीत असतां लोकसमूहावर त्याचा काय काय परिणाम होईल याचा विचार

त्यांनीं स्वार्थदृष्टीनें कधीं केला आहे असा अनुभव मला आलेला नाहीं. जर देशासाठीं सुळावर चढावें लागलें तर तें कार्यही न डगमगतां हंसतमुखानें करण्याची शक्ति त्यांच्यांत होती अशी माझी समजूत आहे. मला माहित आहे कीं पुष्कळ वेळां सुळावर चढणें हें, ज्या दशेंतून त्यांना निघावें लागलें त्या स्थितींत रहाण्यापेक्षां फार सोपें होतें. असली बिकट परिस्थिति त्यांची अनेक वेळां झाली पण त्यांनीं पाय मागें घेतलाच नाहीं.

या सर्व गोष्टींतून तात्पर्य हें निघतेंसें वाटतें कीं, या महान् देशभक्ताच्या चरित्रापासून जर कांहीं आपणास घेण्यासारखें असेल तर तें त्याच्या धार्मिक वृत्तीचें अनुकरण करणें हें होय. आपणां सर्वांना व्हाइसरायांच्या कायदेकौन्सिलमध्यें शिरतां येणार नाहीं; त्यांत शिरल्यानें देशसेवा होतेच असेंहि आपण पाहिलें नाहीं. आपणां सर्वांना पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें बसतां येणार नाहीं; बसणारे सगळे देशभक्तच असतात असें नाहीं. आपणां सर्वांना त्यांच्या सारखें विद्वान् होतां येणार नाहीं; आणि विद्वान् तेवढे देशसेवक असतात असाहि अनुभव नाहीं. पण अभय, सत्य, धैर्य, नम्रता, न्यायबुद्धि, सरळपणा, चिकाटी वगैरे गुणांचा विकास करून ते देशाला अर्पण करणें हें काम सर्वांना करतां येण्यासारखें आहे. धार्मिक वृत्ति ती हीच. राजकीय जीवन धर्ममय करणें या महावाक्याचा अर्थ हाच आहे. या वाक्याप्रमाणें वर्तन करणारास आपला मार्ग नेहमीं सुचेल. म. गोखले यांच्या मिळकतीचा तो वारस होईल. अशा प्रकारें निष्ठेनें काम करणाऱ्याला ज्या इतर विभूतींची जरूर पडेल त्या प्राप्त होतील, असें ईश्वराचें वचन आहे आणि महात्मा गोखले यांचें चरित्र हा त्याचा मोठा पुरावा आहे.

# सत्याग्रहाची मीमांसा.

## ( म. गांधींचें एक पत्र. )

तुम्ही सत्याग्रहाविषयीं माझे विचार जाणूं इच्छितां, ते थोडक्यांत खालीं लिहीत आहें:—

इंग्रजींतील Passive Resistance हा शब्द, मला ज्या शक्तीविषयीं लिहावयाचें आहे तिचा सूचक नाहीं. पण 'सत्याग्रह' हा शब्द बरोबर लागू पडतो. सत्याग्रह हें आत्म्याचें बल आहे; आणि तें शस्त्रबलाचें, जड शक्तीचें विरोधी आहे. सत्याग्रह हें धार्मिक साधन आहे. म्हणून धार्मिक वृत्तीचीं माणसेंच त्याचा ज्ञानपूर्वक उपक्रम करूं शकतील. प्रल्हादजी, मिराबाई इत्यादि माणसें सत्याग्रही होतीं. मोरोक्कोच्या लढाईच्या वेळीं तेथील अरब लोकांवर फ्रेंच तोफांचा मारा चालला होता. अरबी लोक स्वतःच्या समजुतीप्रमाणें केवळ धर्मासाठीं लढत होते. त्यांनीं जिवावर उदार होऊन 'या अल्ला' ची गर्जना केली आणि ते तोफांच्या तोंडीं घुसले. ह्या वेळीं मारण्याइतका अवकाशच नव्हता. या अरबांवर तोफा चालविण्याचें फ्रेंच गोलंदाजांनीं नाकारलें व हर्षनाद करून आपल्या टोप्या हवेंत उडवून या वीर अरबांना ते बंधुभावानें भेटले. सत्याग्रहाचें व त्यांच्या विजयाचें हें उदाहरण आहे.

अरब ज्ञानपूर्वक सत्याग्रही नव्हते. ते आपल्या आवेशांत मृत्यूला भेटण्यास तयार झाले होते, पण त्यांच्यामध्यें प्रेमभाव नव्हता. सत्याग्रही द्वेष करीत नसतो. तो रोषानें मरणाला वश होत नाहीं. पण स्वतःच्या सहनशक्तीनें आपल्या प्रतिपक्ष्याच्या किंवा अत्याचार करणाऱ्याच्या पुढें मान वाकवीत नाहीं. अर्थात् सत्याग्रही मनुष्याच्या अंगीं वीरता, क्षमा आणि दया हे गुण असले पाहिजेत.

इमाम हुसेन आणि त्याच्या सोबत्यांस अन्यायाची वाटत असलेली कांहीं गोष्ट करण्याचें फर्मावण्यांत आलें होतें. तेव्हां त्यांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. आपल्यापुढें मरणच उभें आहे, हें त्यावेळीं त्यांना पूर्णपणें ठाऊक होतें. तरी पण आपण अन्यायाला वश झालों तर आपल्या पुरुषार्थाला बट्टा लागेल, आपण धर्मभ्रष्ट होऊं, या पवित्र विचारानें त्यांनीं मरणाला आलिंगन दिलें. इमाम हुसेननें स्वतःसाठीं आणि आपल्या मुलां पुतण्यांसाठीं मरण स्वीकारलें, पण ते अन्यायी हुकुमाला वश झाले नाहींत.

माझी अशी समजूत आहे कीं, मुसलमानी धर्माची उन्नति मुसलमानांच्या तरवारीनें झाली नसून इस्लामी फकीरांच्या आहुतीमुळेंच झाली. तरवारीचे **प्रहार सहन करण्यांतच खरी मर्दुमकी आहे; तरवार मारण्यांत कांहींच नाहीं.** मारणाराची जर चूक असेल तर 'आपण खुनाचें पाप केलें' या जाणिवेनें त्याचें मन त्याला खात राहील. पण मरणाऱ्यानें चुकीनें मरण ओढवून घेतलें असलें, तरी त्याचा विजयच आहे. **सत्याग्रह हा अहिंसाधर्म असल्यामुळें तो सदासर्वदा सर्वत्र धन्य आहे, इष्ट आहे.** शस्त्रबळ हें हिंसात्मक असल्यानें सर्व धर्मांत निंद्य समजलें गेलें आहे. **शस्त्रबळवादीहि तें बळ वापरण्याच्या बाबतींत बऱ्याच मर्यादा घालतात. सत्याग्रहाला अशी कोणतीच मर्यादा नाहीं.** असलीच तर सत्याग्रही पुरुषाच्या तपश्चर्येची, अर्थात् दुःख सहन करण्याच्या शक्तीची.

स्पष्टच आहे कीं, सत्याग्रह **कायदेशीर आहे किंवा नाहीं** या प्रश्नाचें उत्तर तिऱ्हाइताला देतां यावयाचें नाहीं. सत्याग्रहीच त्याचें उत्तर देऊं शकेल.

तटस्थ माणसें सत्याग्रहास सुरवात झाल्यावरच त्याची परीक्षा करूं शकतील. **सत्याग्रही व्यक्तीला जगाची अप्रसन्नता अडवूं शकत नाहीं. सत्याग्रहाची सुरवात गणिताच्या नियमांवर अवलंबून नसते.** यशापयशाचे फांसे टाकून यशाचा डाव पडला तरच सत्याग्रह करावा, असें म्हणणारा राजनीतिकुशल असेल, धोरणी असेल, पण सत्याग्रही खास नव्हे. सत्याग्रही स्वाभाविकपणें ( सहज ) काम करीत असतो.

सत्याग्रह आणि शस्त्रयोग दोन्ही ( उपाय ) अनादि आहेत. प्रचलित धर्मशास्त्रांत दोहोंचीहि प्रशंसा केली आहे. दैवी आणि आसुरी संपत्तीचींच हीं रूपें आहेत. भारतवर्षांत दैवी संपत्तीचें प्राधान्य होतें. अजूनहि आपला आदर्श तोच आहे. आसुरी संपत्तीच्या प्राधान्याचा उत्कृष्ट मासला युरोप दाखवीत आहे.

दुर्बळतेपेक्षां—जिला आपण भागुबाईपणा या तिरस्कारदर्शक परंतु परिणामकारक शब्दानें ओळखतों, त्या दुर्बळतेपेक्षां—वरील दोन्ही शक्ति इष्ट आहेत. या दोहोंपैकीं एकादा मार्ग अंगिकारल्यावांचून स्वराज्यप्राप्ति किंवा शुद्ध लोकजागृतीचा संभव नाहीं. कर्तबगारीवांचून मिळालेलें स्वराज्य स्वराज्यच नव्हे. असल्या स्वराज्याचा लोकांवर कांहींच परिणाम व्हावयाचा नाहीं. स्वतांचें बळ

अजमावल्यावांचून लोकजागृति होणें नाहीं. पुढारी हवें तें म्हणोत, सरकार वाटेल तितक्या खटपटी करो, तथापि सरकार व आपण सर्व, **सत्याग्रहाला प्रधानपद देणार नाहीं. तोंपर्यंत शस्त्रयोगाचा जोर आपोआप वाढणारच.** शस्त्रप्रयोग हा गवतासारखा आहे. तें काय हव्या तसल्या जमिनींत साहजिकपणें उगवतें. सत्याग्रहरूपी पिकाला प्रयत्न, साहसरूपी खताची आवश्यकता आहे. आणि गवत वेणून काढिलें नाहीं तर ज्याप्रमाणें पेरलेलें धान्य त्याखालीं दबून जातें, त्याचप्रमाणें शस्त्रप्रयोगरूपी गवताला, तपश्चर्योद्वारा भूमि साफ राखून आपण उगवूं देणार नाहीं व उगवलेलें गवत दयेनें कापून टाकणार नाहीं, तोंपर्यंत तें उगवतच राहणार.

जे तरुण, त्यांना वाटणाऱ्या सरकारच्या जुलमामुळें उतावळे झाले आहेत व चिडून गेले आहेत, त्यांना आपण सत्याग्रहानें समजावूं शकूं; आणि त्यांच्या वीरतेचा, त्यांच्या धाडसाचा आणि त्यांच्या सहनशक्तीचा उपयोग दैवी संपत्ति वाढविण्यांत करूं शकूं.

यासाठीं सत्याग्रहाचा प्रचार जितका जितका लौकर होईल तितका इष्ट आहे. त्यायोगें राजा व प्रजा उभयतांस सुख आहे. सत्याग्रही, सरकारला किंवा इतर कोणासहि हैराण करूं इच्छीत नाहीं. सत्याग्रही, अविचारानें कोणतेंहि काम करीत नाहीं. सत्याग्रही उर्मटपणा करीत नाहीं. म्हणून तो बहिष्कारापासून दूर असतो. पण स्वदेशीव्रत धर्म समजून निर्भयपणें सत्याग्रही निरंतर पाळतो. केवळ ईश्वराचें भय बाळगतो. यामुळें दुसरी कोणतीहि सत्ता त्याला भिववूं शकत नाहीं. राजभयामुळें तो कर्तव्य सोडीत नाहीं.

विदुषी ॲनी बेझंटबाईंना व त्यांच्या सहाय्यकांना सोडविण्यासाठीं सत्याग्रह करणें, हें आपलें कर्तव्य आहे. त्यांचीं सर्व किंवा कांहीं कार्यें सर्वांना पसंत असतील किंवा नसतील. तो प्रश्न अलाहिदा आहे. मला स्वतःला त्यांच्या कित्येक गोष्टी पसंत नाहींत. तरी मला हें सांगितलें पाहिजे कीं, त्यांना ' दफन ' करण्यांत सरकारनें मोठी चूक केली आहे. तो मोठा अन्याय झाला आहे. सरकारला ती चूक वाटत नाहीं हें मला ठाऊक आहे. प्रजा त्यांना सोडवण्याची इच्छा करण्यांत कदाचित् चूकहि करीत असेल. सरकारला वाटलें तें सरकारनें केलें आहे. प्रजेनें

आपल्या अंतःकरणाला पडलेला पीळ कसा व्यक्त करावा? अर्ज वगैरे इलाज सामान्य, असह्य दुःखांसाठीं आहेत. असह्य दुःखाचा इलाज सत्याग्रह हाच होय. हें दुःख असह्य होईल तेव्हांच आणि ज्यांना असह्य होईल तेच, आपलें तनमनधन ॲनी बेझंटबाईंना सोडवण्यांत खर्च करतील. असें करणें हें लोकांना होत असलेल्या वेदनांचें द्योतक आहे. **अशा महात्यागापुढें चक्रवर्तीचीहि शक्ति, नमेल, अशी माझी अढळ श्रद्धा आहे.** मॉंटेग्यु साहेब येत आहेत म्हणून लोक कदाचित् आपणास लागलेली कळ सोसतील. कळ सोसून राहणें हें आपली न्यायबुद्धीवरील श्रद्धा प्रगट करण्याचें चिन्ह आहे. पण ते येण्याच्यापूर्वी त्या सुटल्या नाहींत तर अद्भुत शक्तीचा विचार स्वीकारणें हें आपलें कर्तव्यच आहे. आणि तो विचार सुचविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. आणि हीच शक्ति वापरून आपल्याला होणाऱ्या वेदनांची यथार्थ कल्पना सरकारास आणून देतां येईल. आपला उद्देश सरकारास चिडवण्याचा नाहीं. त्यांना त्रास द्यावयाचा नाहीं. मला वाटतें सत्याग्रहाच्या प्रयोगांत सरकारची सेवाच होत आहे.

---

## सत्याग्रही कोण होऊं शकेल ?

( हा आणि ह्याच्या पुढील दोन लेख म० गांधी यांनीं दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रहाची चळवळ चाललेली असतां आपल्या ' इंडिअन ओपीनिअन ' पत्रांत लिहिलें होतें. )

' सत्याग्रह ' या शब्दाचा अर्थ पाहिल्यास पहिली शर्त ध्यानांत येईल ती ही कीं, लढवय्यापाशीं सत्याचा आग्रह, सत्याचें बळ असलें पाहिजे. ह्मणजे त्या माणसानें फक्त सत्याचाच आश्रय केला पाहिजे; दोहों दगडींवर हात ठेवतां कामा नयेत. तसें करणारा मनुष्य मध्येंच चिरडून जावयाचा. सत्याग्रह ही कांहीं गाजराची पुंगी नाहीं कीं ती वाजली तर वाजावावी, नाहीं तर खाऊन टाकावी. शरीरबळ नाहीं म्हणून, किंवा आज त्याचा उपयोग होत नाहीं ह्मणून, सत्याग्रही व्हावयाचें, ही समजूत सपशेल खोटी आहे. Passive Resistance ( निःशस्त्र प्रतिकार) या इंग्रजी शब्दामुळें हा गैर समज होतो. वास्तविक पहातां सत्याग्रही बनणारांचे अंगीं रणांगणावर लढणाऱ्या शिपायांहूनहि अधिक शौर्य असलें पाहिजे. कारण

शस्त्रवीराचें शौर्य तत्कालिक स्फुरणानें उत्पन्न होतें. पण सत्याग्रही वीराला सतत दुःख सहन करण्याची तयारी ठेवावी लागते. त्याला रात्रंदिवस युद्ध करावें लागतें. आणि तेंहि फक्त बाह्य जगाशींच करावयाचें नसून अंतस्थ शत्रूंशींहि करावयाचें असतें. सत्याग्रह हा शरीरबलापेक्षां अधिक तेजस्वी आहे, त्याच्यापुढें शरीरबळ हें गवताच्या काडीसारखें आहे. शरीरबळांत मुख्य गोष्ट ही आहे कीं, आपल्या देहाची परवा न करितां रणांत झुंजावयाचें; जो लढूं लागतो त्याच्यांत भीति नसते हें खरें. पण सत्याग्रही, शरीर म्हणजे कांहींच नाहीं असें समजतो; त्याच्यांत भीतीचा प्रवेशच होऊं शकत नाहीं. यामुळेंच तो बाह्य शस्त्र धारण करीत नाहीं, आणि मरणाची धास्ती न वाळगतां अखेरपर्यंत लढतो. ह्मणजे सत्याग्रह्यांत शरीरबळाच्या जोरावर लढणाऱ्यापेक्षां अधिक हिम्मत असली पाहिजे. अशा रीतीनें सत्याग्रह्यानें सत्याचेंच सेवन केलें पाहिजे आणि **सत्यावर** त्याची **निष्ठा** असली पाहिजे.

पैशांसंबंधीं तो बेफिकिर असला पाहिजे. संपत्ति आणि सत्य यांचा नेहमीं बेबनाव असतो. आणि पुढेंहि तो रहाणार. जो संपत्तीला कवटाळतो तो सत्य टिकवूं शकत नाहीं हा अनुभव आपल्याला ट्रान्सवाल मध्येंहि आलेला आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, सत्याग्रह्यापाशीं पैसा असणारच नाहीं; पण पैसा हाच त्याचा परमेश्वर असणार नाहीं. सत्याचरण करीत असतां पैसा राहिला तर ठीकच, नाहीं तर तो हातचा मळ समजून त्याला लाथ मारण्यास बिलकुल कांकूं करतां कामा नये. हा मनाचा निश्चय ज्यानें केला नसेल त्याला सत्याग्रह करतां येणार नाहीं. शिवाय ज्या राजाशीं सत्याग्रह करण्याचा प्रसंग येतो त्याच्या देशांत सत्याग्रही मनुष्यापाशीं संपत्तीच रहाणें फार कठीण असतें. राजाचें बळ माणसावर चालत नाहीं. त्याच्या मालमत्तेवर अथवा त्याच्या भीतीवर चालतें. त्याला लुटण्याच्या धाकानें अथवा त्याला शारीरिक दुःख देण्याच्या धमकीनें राजा लोकांपासून जें करवावयाचें असेल तें करवितो. यास्तव जुलमी राजाच्या राज्यांत बहुतकरून त्याच्या जुलमाला मदत करणाऱ्या मनुष्याजवळच पैसा असूं शकेल. जुलमाला मदत करणें हें सत्याग्रह्याच्या हातून घडावयाचें नाहीं. अशा स्थितींत सत्याग्रह्यानें **गरिबींतच श्रीमंती मानून घेणें** योग्य आहे.

ह्या संबंधानें आणखीहि एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे, कीं शरीरबळ अजमावण्यालाहि अशाप्रकारें बऱ्याच गोष्टींचा त्याग करावा लागतोच. भूक तहान ऊन थंडी, हीं सहन करावीं लागतात. कुटुंबाची माया सोडून द्यावी लागते. पैशावर पाणी सोडावें लागतें. बोअर लोकांनीं युद्धाचे वेळीं हें सर्व केलें. त्यांच्या शरीर-बलाच्या जोरावर चाललेल्या आग्रहांत व आपल्या निःशस्त्र आग्रहांत—सत्याग्रहांत—फरक एवढाच कीं त्यांचा जय म्हणजे फाशांचा (सोंगट्यांतील फांशांसारखा अनिश्चित ) विजय होता. शिवाय शरीर बळाच्या योगानें ते गर्विष्ठ बनले होते. त्यांना अर्धवट विजय मिळाला तोंच त्यांची दिशाभूल होऊं लागली. जुलमी शत्रूबरोबर जुलमी शस्त्रांनीं ते लढूं लागले व म्हणूनच आतां स्वतःच्या लोकांवरहि जुलुम करूं लागले आहेत. सत्याग्रह्याला विजय मिळाला म्हणजे दोन्हीं पक्षांचें त्यांत हित होतें. सत्याग्रह्याला सत्य हें कधींहि सोडावयाचें नसतें; यामुळें त्याला जुलुम करतांच येत नाहीं.

सत्याग्रह्याला **कुटुंबाची माया** सोडावी लागते. ही गोष्ट फार कठीण आहे हें खरें; पण सत्याग्रह हा नांवाप्रमाणेंच तरवारीची धार आहे. बाकी शेवटीं त्यांत कुटुंबाचें कल्याणच आहे. कारण कीं एकदा कुटुंबीयांना सत्याग्रहाचें " वेड " लागलें म्हणजे दुसऱ्या गोष्टींची त्यांना इच्छाच नाहींशी होते. दुःखें सहन करीत असतां सत्याग्रह्याच्या मनांत कुटुंबाचें काय होईल ही शंका किंवा भीति उत्पन्न होतां कामा नये. ज्यानें दांत दिले तो खाणें ही देईलच. सर्प, विंचु, वाघ, लांडगे वगैरे भयंकर प्राण्यांना ही जो खावयास देतो तो मनुष्य जातीला विसरणार नाहीं. आपण जे हापापलेले असतों, ते शेरभर बाजरीसाठीं किंवा मूठभर धान्यासाठीं नव्हे. तर आंबट गोड अशा नानाप्रकारच्या स्वादांसाठीं; थंडीचें निवारण करण्यासाठीं जाडयाभरडया वस्त्रांसाठीं नव्हे, तर रेशमी आणि किनखापाच्या वस्त्रांसाठीं. जर हे चाळे सोडून दिले तर कुटुंबाची चिंता फार थोडी करावी लागेल.

अशा रीतीनें सत्याग्रही कोणाला होतां येईल याचें उत्तर असें मिळतें कीं धर्मावर ज्याची खरी निष्ठा असेल त्यालाच सत्याग्रही होतां येईल. " **मुखमें राम, बगलमें छूरी** " याचें नांव निष्ठा नव्हे. धर्माचें नांव घेऊन उलटीं कामें करणें हा धर्म नव्हे. जो खरोखरच धर्माचें पालन करणारा असेल, तोच सत्याग्रही होऊं

शकेल. ज्याचा आधार फक्त ईश्वरावरच आहे त्याला जगांत पराभव हा माहीतच नाहीं. लोकांनीं तो हरला असें म्हटलें तरी तो हरत नाहीं व लोकांनीं विजयी म्हटलें म्हणून तो विजयी होत नाहीं. त्याच्या विजयपराजयाचें रहस्य एकाद्यालाच समजतें.

सत्याग्रहाचें खरें स्वरूप हें असें आहे. दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांनां तें थोडेंसें समजलें. व जितकें समजलें त्यांतील थोडेसें त्यांनीं पाळलें आहे. तेवढ्यानेंही त्याचा अमूल्य रस आपणाला चाखावयास मिळाला. ज्यानें सत्याग्रहासाठीं सर्वस्वाचा त्याग केला, त्यानें सर्व मिळविलें. कारण कीं त्याच्याजवळ संतोष आहे. संतोष हेंच सुख होय. बाकी सुख कोणी ऐकलें आहे ? इतर सुखें हीं मृगजलाप्रमाणें आहेत. जों जों त्यांच्यापाशीं जावें तों तों तीं अधिकच दूर पळूं लागतात. असा विचार करून प्रत्येक हिंदी मनुष्यानें सत्याग्रही बनावें, अशी आमची इच्छा आहे. हें शस्त्र एकदां हातीं आलें तर सर्व प्रकारचे अन्याय व दुःखें दूर करण्याला त्याचा उपयोग होईल. तें येथेंच नव्हे तर देशांत ( हिंदुस्थानांत ) अधिक उपयोगी पडेल. फक्त त्याचें खरें स्वरूप समजलें पाहिजे. तें समजणें सोपें आहे व कठीणही आहे. शस्त्र-वीर थोडेच होतात, मग सत्यवीर तर त्याहूनही कमी असणारच.

---

## तुरुंगांत कोण जाऊं शकेल ?

सत्याग्रही कोण होऊं शकेल याचा आपण थोडक्यांत विचार केला. पण तुरुंगांत गेलें म्हणजे सत्याग्रह आटोपला असें होत नाहीं. सत्याग्रह्यांना सुळावर चढावें लागलें आहे, तप्त लोहाच्या खांबांना मिठ्या माराव्या लागल्या आहेत. पर्वतावरून कोसळावें लागलें आहे, उकळत्या तेलाच्या कढईंत पोंहावें लागलें आहे, जळत्या अरण्यांतून चालावें लागलें आहे, राज्याचा त्याग करून ' डोंबाघरीं पाणी ' वहावें लागलें आहे व सिंहाच्या गुहेंत रहावें लागलें आहे. अशा प्रकारानें सत्याग्रही वीरांची कसोटी, जगाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या तऱ्हेनें झाली आहे.

त्याप्रमाणें दक्षिणआफ्रिकेंतील सत्याग्रह्यांची कसोटी आज तुरुंगात जाण्यानें होत आहे. यासाठीं तुरुंगांत कोण जाऊं शकेल हा प्रश्न उपयोगी आहे. कित्येक

हिंदी लोक तुरुंगांत जाण्यास कबुल होते. असें असतांहि कांहीं कारणामुळें गेले नाहींत–जाऊं शकले नाहींत. असलीं काय कारणें असतील, या प्रश्नाचें उत्तर 'तुरुंगांत कोण जाऊं शकेल' हा प्रश्न विचारल्यानें व त्याचें उत्तर घेतल्यानें मिळण्यासारखें आहे. वर सत्याग्रही बनण्यासाठीं जे गुण पाहिजेत असें म्हटलें, ते सर्व कमीअधिक प्रमाणांत तुरुंगांत जाणाऱ्याच्या आंगींही असले पाहिजेत. पण आणखीही खालील शक्तींची जरूरी आहे.

१ व्यसनांपासून दूर रहाणें.
२ शरीर सुदृढ व कसलेलें असणें.
३ निजण्या बसण्याच्या बाबतींत चोंचले नसणें, नाजुकपणा नसणें.
४ खाण्यांत अत्यंत साधेपणा असणें.
५ खोटा अभिमान खिशांत राखणें.
६ धीर धरणें, दमानें घेणें.

तुरुंगांत जाणाऱ्यापाशीं इतके सहा गुण असले पाहिजेत. ( याला आपण तुरुंगाची षड्संपत्ति म्हणूं ) असा अनुभव आला आहे कीं विडी, दारु, सुपारी अथवा चहाचेंही व्यसन असल्यामुळें तुरुंगांत गेलेले लोक कंटाळून गेले आहेत; आणि मग त्यांना तुरुंगांत चोरी करावी लागली आहे, सत्याचा त्याग करावा लागला आहे, व फिरून तुरुंगांत जाण्याचें नांवही सोडून द्यावें लागलें आहे. यास्तव सर्व व्यसनांपासून मुक्त राहिलें पाहिजे. एकाच व्यसनाची सूट आहे व तें ईश्वराच्या नांवाचें रटण. ( विद्या व्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनं )

नामर्द कधीं सत्याग्रही होऊं शकत नाहीं त्याच प्रमाणें लेच्यापेच्या शरीराच्या माणसालाही तुरुंगाची रहाणी बहुधा सहन होत नाहीं. मनोबळाच्या जोरावर, शरीरांत त्राण नसतांही, संकटें सहन करणारे असाधारण वीर क्वचितच आढळतात. या असाधारण व्यक्ति सोडून दिल्या असतां साधारण नियम असाच सांगतां येईल कीं, शरीराचा बांधा निरोगी व काटक असला पाहिजे. तसा नसल्यामुळें पुष्कळजण जेरीस आले आहेत. सत्याग्रही असें समजतो कीं, हें शरीर आपल्याला भाड्यानें मिळालें आहे. त्याला स्वच्छ व तेजःपुंज राखून आपल्याला उत्तम भाडोत्री म्हणवून घेतलें पाहिजे. ज्याला स्प्रिंगच्या पलंगावर मऊ बिछाने घालून

लोळण्याची संवय लागली आहे त्याला एकाएकीं जमिनीवर निजतां येणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां हा नाजुकपणाहि सोडला पाहिजे. खाण्याचा प्रश्न हा फारच मोठा होऊन बसला आहे, पण त्यांत आश्चर्य कांहींच नाहीं. **खाण्याच्या व बोलण्याच्या बाबतींत जिभेच्या चवचालपणाला ज्यांनीं आळा घातला आहे ज्यांनीं सर्व जिंकलें असेंच समजण्यास हरकत नाहीं** स्वादिष्ट पदार्थ खाण्याची ज्यांना इच्छा नाहीं अशीं मनुष्यें फारच थोडीं. गरीब सिद्दी लोकही खाण्यासाठीं जीव देतात. हा प्रश्न लहान सहान नाहीं. तथापि ज्यांना परमार्थासाठीं तुरुंगांत जाण्याची इच्छा आहे, त्यांनीं जिभेला आपल्या ताब्यांत आणलीच पाहिजे. जें कांहीं मिळेल त्या बद्दल ईश्वराचें उतराई झालें पाहिजे. प्रत्येक हिंदी माणसानें विचार केला पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील आपल्या वीस कोटी बांधवांना एकच वेळ खायाला मिळतें, व तेंही मीठभाकरी शिवाय कांहीं नाहीं. मग तुरुंगांत तीन तीन वेळ आलटून पालटून मिळणाऱ्या खाण्यानें गुजारा करणें ही कांहीं मोठी कठीण गोष्ट नाहीं. सणसणून भूक लागली म्हणजे कोंडाही गोड लागतो. पहिल्यानें थोडे दिवस जरा कठीण वाटेल हें खरें, पण मागाहून तुरुंगांतील खाणें आवडूं लागतें. ज्या हिंदी लोकांना सत्याग्रही व्हावयाचें असेल त्यांनीं साधें अन्न खाऊन रहाण्याची संवय लावून घेतली पाहिजे.

खोटाच अभिमान बाळगणारा मनुष्य तुरुंगांत राहूं शकत नाहीं. तेथें शिपायाची मर्जी संभाळावी लागते. हलकीं समजलीं जाणारीं कामें करावीं लागतात. आजपर्यंत आपण अशीं कामें केलेलीं नाहींत, तीं करण्यानें आपली मानहानि होते, असें समजून तीं करण्याचें नाकारल्यानें परिणाम वाईट होतात. **स्वतंत्रता किंवा गुलामगिरि हे मनाचे खेळ आहेत. ज्याचें मन स्वतंत्र आहे, तो शौचकूपांतील टोपल्या उचलून नेत असला तरी राजा आहे.** तो या ठिकाणीं तें काम करण्यांत गुलामगिरी न समजतां मोठा मान समजतो. शेवटचा गुण म्हणजे धीर धरणें. तुरुंगांत जातांच सगळे जण दिवस मोजूं लागतात. असें केल्यानें ते पुरे होतच नाहींत. बाहेर असतांना वर्षें निघून गेलीं तीं आपल्या लक्षांतही आलीं नाहींत व तुरुंगांतील तीन दिवस हे तीन वर्षांसारखे वाटतात. असें कां ? याचें उत्तर इतकेंच कीं, तुरुंगांत जाणें आवडत नाहीं.

वास्तविक पाहिलें तर तुरुंगांत जाण्यांत. सुख मानलें पाहिजे. आई ज्या प्रमाणें मुलासाठीं खस्ता खाऊन सुख मानते त्याच प्रमाणें आपण देशासाठीं, सत्यासाठीं, दुःख भोगण्यांत सुख मानलें पाहिजे. जे दिवस तुरुंगांत गेले तसे बाहेर गेले नसतील, असा विचार करून धीर धरून तुरुंगांत कंठण्याच्या काळाचा सदुपयोग करावा. ईश्वरभजनांत, सद्विचारांत, आपले दोष शोधण्यांत, त्यांचा व्यय करावा म्हणजे "एक पंथ दो काज" केल्याप्रमाणें होईल. हे सहा गुण तुरुंगांत जाणाऱ्या वीराचे अंगीं असले पाहिजेत. या शिवाय दुसरे (गुण) त्यावेळीं आपोआपच सुचतील.

---

## सत्याग्रहाचें रहस्य

इतकें लिहिल्यानंतर सत्याग्रहाचें रहस्यही सांगितलें पाहिजे. हें रहस्य समजल्यावर सत्याग्रहाच्या विजयाविषयीं कांहीं घोंटाळा मनांत रहाणार नाहीं. दुसऱ्या माणसांना जी स्वतंत्रता मिळवितां येणार नाहीं ती सत्याग्रह्याला मिळूं शकते. कारण कीं, सत्याग्रही हा खरा मर्द बनलेला असतो. त्याच्या मनांतून भीति ही नाहींशी झाल्यामुळें तो कोणाची गुलामगिरी करीत नाहीं. अशा स्थितीला पोंचल्यानंतर तो कोणत्याही अन्यायी व जुलमी हुकुमापुढें मान वांकवणार नाहीं. असला सत्याग्रह हा फक्त सरकाराशींच नव्हे तर स्वजातीशीं, देशबांधवांशींही करतां येतो व केला पाहिजे. सरकार ज्याप्रमाणें वांकड्या मार्गानें जातें त्याच-प्रमाणें समाजही पुष्कळदां भलत्याच मार्गानें जातो. त्यावेळीं जातीविरुद्ध सत्याग्रह करणें हें कर्तव्य आहे. 'कायद्याचा भंग करण्याचें कर्तव्य' Duty of civi. Disobedience या पुस्तकाचा लेखक थॉरो हा ह्याप्रमाणें स्वजातीच्याही विरुद्ध वागला होता. त्याला वाटलें कीं आपले लोक गुलामांचा व्यापार करतात हें अन्यायाचें आहे. यासाठीं त्या बाबतींत तो जातीच्या विरुद्ध वागला. मार्टिन् लूथर हा एकटा असतांनांही आपल्या जातीच्या विरुद्ध उभा रहाण्यास डगमगला नाहीं. त्याच्या ह्या सत्याग्रहामुळेंच जर्मनी आज स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहे. ग्यालीलिओ स्वजातीच्या विरुद्ध वागला. त्याला मारण्याकरतां त्याचे जातभाई तयार झाले, त्या वेळींही त्यानें छातीठोकपणें सांगितलें कीं "मला मारा किंवा

न मारा, पण पृथ्वी ही फिरतेच फिरते." आज आपण त्याची गोष्ट वेदवाक्याप्रमाणें मानीत आहों. कोलंबसाला आपल्या बरोबरच्या खलाशांशीं सत्याग्रह करावा लागला; खलाशी अगदींच कंटाळून गेले व त्याला सांगूं लागले कीं आतां अमेरिका मिळत नाहीं; परत फिरा. नाहीं तर ठार करतों. धैर्यशाली कोलंबसानें उत्तर केलें, "कांहीं हरकत नाहीं; मला भीति वाटत नाहीं. अजूनही थोडे दिवस पर्यंत आपण प्रवास केला पाहिजे." शेवटीं अमेरिकेचा शोध लागला व कोलंबस अमर झाला !

अशी अजब वल्ली सत्याग्रह ही आहे. आपण भीतीनें म्हणतों कीं, सरकारनें अमुक केलें नाहीं तर ? हा आपल्यांतील सत्याग्रहाचा कमीपणा आहे. ( जसें काय आतां हें त्रिभुवनविजयी शस्त्र आपल्या हातांतून नाहींसेंच झालें ! ) व म्हणून आपण अशा भागुबाईच्या गोष्टी बोलत असतों. खरोखर सत्याग्रह आपल्याला स्वतंत्र बनवीत असतो व स्वतंत्र माणसाला भीति ती कसली !

जगांत असा एक नियम दिसून येतो कीं ज्या उपायानें एकादी वस्तु संपादन करितां येते याच उपायानें तीं राखतांही येते. बळजबरीनें घेतलेली वस्तु बळजबरीनेंच राखतां येते. वाघ एकाद्या प्राण्याला बळजबरीनेंच आपल्या ताब्यांत ठेवतो. जे बळजबरीनें कैद होतात ते बळजबरीनेंच कैदेंत राहतात. जुलमानें घेतलेल्या मुलुखाचें रक्षण बादशाहा जुलमानेंच करूं शकतात. त्याचप्रमाणें प्रेमानें मिळविलेली वस्तु प्रेमानेंच राखतां येते. आई अतिशय प्रेमानें बालकाला आपल्या पोटांत राखते. जन्मल्यावर प्रेमानेंच त्याला लहानाचें मोठें करते. लहानपणीं कधीं कधीं मार देते तोही प्रेमानेंच; आणि कांहीं कारणानें जर ती त्या मुलावरचें प्रेम सोडील तर मूल तिच्या हातचें जातें. त्याचप्रमाणें जी वस्तु सत्याग्रहानें मिळविली असेल ती सत्याग्रहाच्या जोरावरच टिकूं शकते. सत्याग्रह गेला कीं ती वस्तुही गेलीच असें खास समजावें. सत्याग्रहानें मिळविलेली वस्तु शरीरबलानें राखतां येणें असंभवित आहे. कल्पना करा कीं सत्याग्रहानें हिंदी लोकांनीं जो विजय संपादन केला आहे त्यामुळें मिळालेलें फळ हिंदी लोक शरीरबलानें राखूं इच्छीत आहेत. एका मुलालाही समजण्यासारखी गोष्ट आहे कीं, हिंदी लोक अशा प्रकारें दांडगाई करूं लागले तर एका क्षणांत चिरडले जातील. त्याचप्रमाणें

सत्याग्रहाची कांस सोडून स्वस्थ वसलें तर मिळविलेलें गमावून बसावें लागेल. असल्या दिव्य सत्याग्रहाची ओळख आपणांला पटली नाहीं म्हणूनच हिंदुस्थानांत आपण लाचार व निर्वीर्य वनून गेलों आहों आणि ही निर्वीर्यता फक्त राजकीय बावतींतच आहे असें नाहीं; सर्वच वावतींत ती दिसून येते. देशांतील कित्येक रुढी उघड उघड नुकसानकारक आहेत हें समजत असतांही त्या आपण राहूं देतों, याचें मुख्य कारण सत्याग्रहाचा अभाव हेंच होय. आपल्याला माहीत असतें कीं अमुक गोष्ट वाईट आहे. पण भीतीनें, आळसानें, किंवा खोट्याच शरमेनें आपण ती सोडीत नाहीं.

या गोष्टींवरून समजावयाचें तें हेंच कीं, सत्याग्रह ही मनाची स्थिति आहे. ती ज्याला प्राप्त झाली तो सर्वदा, सर्वत्र व सर्वस्थितींत विजयीच आहे; मग त्याच्या विरुद्ध उभा राहिलेला राजा असो कीं प्रजा असो, अनोळखी मनुष्य असो कीं ओळखीचा असो, आणि परकी असो कीं नातलग असो.

---

## भासणारें संकट.

ज्या राष्ट्रांत अनेक जातींचे आणि कमी अधिक संस्कृतींचे लोक राहतात त्या राष्ट्रांत एकादा प्रामाणिक मनुष्य कायद्याला विरोध करावा म्हणून उपदेश करूं लागला म्हणजे कोणते अनर्थ ओढवण्याचा संभव आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. पण कायदे करणारांच्या हातून कधीं चूक होणारच नाहीं असें मला मुळींच वाटत नाहीं. व ज्या देशांतील प्रजापक्षाचे प्रतिनिधि न्याय सभेंत नसतात, ( Unrepresented classes ) त्यांच्याशीं वागतांना ते नेहमीं उदार बुद्धीनें किंवा निदान न्यायबुद्धीनें तरी वागतात अशीहि माझी समजूत नाहीं. अशा स्थितींत कायदे करणारांच्या हातून अधिकाराच्या धुंदींत होणाऱ्या चुकांमुळें लोक चिडून मारामाऱ्या, खून आणि रक्तपात होणें अशक्य नसतें. या सत्याग्रहाचें तत्त्व सर्वांनीं ग्रहण केल्यास ही महा आपत्ति कायमची टळेल अशी माझी दृढ श्रद्धा आहे. ........... आपल्यावर लादलेले कायदे आंधळेपणानें पाळणें हें नागरिकाच्या कर्तव्यांत मुळींच येत नाहीं. जर माझ्या देशबंधूंचा ईश्वराच्या व आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास असेल तर त्यानां ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे कीं

आपलीं शरीरें हीं राज्यकर्त्यांची आहेत. तीं शरीरें त्यांनीं तुरुंगांत ठेवावीं, हद्दपार करावीं किंवा फांसावर चढवावीं. हें करण्याचा त्यांना हक्क आहे. पण राष्ट्रांतील लोकांचीं मनें, त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं अंतःकरणें, आणि त्यांचे आत्मे सदासर्वकाळ गगनविहारी पक्षांप्रमाणें स्वतंत्र आहेत. तीक्ष्ण बाणांच्या पल्ल्याच्याही पलीकडे आहेत.

---

## आफ्रिकेंतील सत्याग्रहाचें हृद्गत.

( सत्याग्रहाश्रम पहिल्या ठिकाणीं म्हणजे अमदाबाद जवळच्या कोचरब गांवीं असतां सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं महात्माजींस भेटण्याकरितां कित्येक मंडळी येत असे. अशाच प्रकारचा एक प्रसंग १९१६ सालच्या जुलै महिन्याच्या २७ व्या तारखेस घडला होता. तो दिवस रविवारचा होता. कॉलेजांतील कित्येक विद्यार्थ्यांच्या व इतर मंडळीच्याही विनंतीवरून महात्माजी एखादें पुस्तक जमलेल्या सर्व मंडळींना दर रविवारीं वाचून दाखवीत असत. आज प्रसिद्ध ग्रंथकार थॉरो यानें लिहिलेल्या Life without Principle नांवाचे पुस्तकाचा कित्येक भाग वाचून पुरा झाला होता. त्यानंतर एका विद्यार्थ्यानें प्रश्न केला कीं मागील भाषणाच्या वेळीं आपण असें म्हणालां होतां. कीं दक्षिणआफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या चळवळीचें रहस्य हिंदुस्थानांत दहा माणसांनाही समजलेलें नसेल तर तें रहस्य काय ? याला उत्तर म्हणून गांधी पुढीलप्रमाणें म्हणालेः—)

थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर सत्यग्रहाचें रहस्य " जीवनांतील तत्त्वाचें शोधन करणें " हें होतें. हें करण्यासाठीं आम्ही लढत आहोंत, असें आम्हीं कोणाला सांगितलें नव्हतें. आणि तसें सांगितलें असतें तर येथील लोकांनीं आमचें हंसेंच केलें असतें. पण आम्हीं चळवळीचा गौण हेतुच जाहीर केला होता. तो असा कीं, तेथील सरकार आपल्या लोकांना कःपदार्थ लेखून आम्हांला हाणून पाडण्यासाठीं कायदेकानू करीत आहे !

त्या कायद्यांना न जुमानतां आपलें शौर्य दाखविलें पाहिजे. उदाहरणार्थ, सरकारनें कायदा केला कीं, काळ्या लोकांनीं पिंवळी टोपी घातली पाहिजे. एक वेळ रोममध्यें यहुदी लोकांसाठीं असला कायदा होता. तसा तेथील सरकार

आपणासंबंधीं करूं लागलें आणि त्या कायद्याचा हेतु आपणांला नीच समजून आपला उपमर्द करण्याचा असेल, तर सरकारला स्पष्टपणें दाखविलें पाहिजे कीं तुमचा कायदा आम्हांला मान्य नाहीं. एखादें मूल आपल्या बापाला पागोटें उलटें घालायला सांगूं लागलें तर बाप समजेल कीं मुलगा गंमतीसाठीं असें करायला सांगत आहे. आणि म्हणून तो आनंदानें उलटी पगडी घालून दाखवील; ही गोष्ट निराळी. परंतु दुसरा कोणी आपणांला दुष्ट हेतूनें तसेंच सांगूं लागला तर त्याला आपण असें स्पष्ट सांगूं कीं 'बावा या धडावर शिर आहे तोंपर्यंत तर माझ्या डोक्यावर तूं उलटी पगडी ठेवूं शकणारच नाहींस. म्हणून हें डोकें कापून पहिल्यानें आपल्या कपाटांत ठेव आणि मग खुशाल त्याच्यावर उलटी पगडी ठेव.' त्याचप्रमाणें तेथील सरकारचा हेतु हिंदी लोकांना नीच समजून त्यांना गुलामाप्रमाणें ठेवावेत आणि शक्य तितके कमी हिंदी लोक आफ्रिकेंत यावेत, असा होता. आणि तो हेतु पार पाडण्याकरितांच एकेक कायदे तें सरकार करूं लागलें. उदाहरणार्थ–हिंदीलोकांची निराळी नोंद ठेवणें, चोरांप्रमाणें किंवा दरवडेखोरांप्रमाणें हिंदी लोकांच्या सर्व बोटांचे ठसे घेणें; इकडे अत्यंज लोक जसे गांवाच्या बाहेर रहातात, त्याप्रमाणें संस्थानच्या अमुकच भागांत हिंदी लोकांना रहाण्यास लावणें; त्या हद्दीच्या बाहेर जाण्याचा प्रतिबंध करणें, अमुकच रस्त्यानें गेलें पाहिजे, अकमुच प्रकारच्या गाडींत बसलें पाहिजे, अशा प्रकारचे जुलमी निर्बंध घालणें; लग्नांचें सर्टिफिकेट नसल्यास त्यांच्या स्त्रियांना कायद्यानें रखेली समजणें; दरमाणशीं दरसाल तीन पौंड डोईपट्टी लादणें वगैरे प्रकारचे जुलमी कायदे तें सरकार करूं लागले. शरीरांत ज्याप्रमाणें रोग एकच असतो परंतु तो शरीरावर निरनिराळ्या अनेक रूपांनीं फुटून आलेला दिसतो, त्याप्रमाणें मुख्य रोग म्हणजे वर सांगितलेला सरकारचा नीच हेतु होय. आणि हे सर्व कायदे म्हणजे त्या रोगाचीं निरनिराळीं स्वरूपें होत. याकरितां त्या सर्व कायद्यांशीं झुंजण्यास आम्हीं तयार झालों.

कोणत्याही अन्यायाचा प्रतिकार करण्याचे दोन प्रकार आहेत. एक–अन्याय करणारांचीं डोकीं फोडणें आणि तसें करीत असतां आपलींही डोकीं फोडून घेणें; जगांत जिकडे तिकडे, हाच मार्ग लोक ग्रहण करतात. प्रत्येक ठिकाणीं लढाया

होतात. लाखों, कोट्यावधि माणसांची कत्तल होते. आणि परिणामीं राष्ट्राची उन्नति तर होत नाहींच, पण अवनति मात्र होते. विजय मिळवून परत आलेले शिपाई इतके बेभान होतात कीं, समाजाला त्यांच्या पासून उपद्रव होऊं लागतो. याचीं उदाहरणें मुद्दाम शोधायला जाण्याची जरूर नाहीं वोअर युद्धाचे वेळीं इंग्रज सरकारला मेफेकिंगमध्यें जय मिळाला तेव्हां सर्व इंग्लंड, विशेषतः लंडन शहर, हर्षानें इतकें बेहोष होऊन गेलें कीं रात्रंदिवस सर्व लोक-लहान थोर, स्त्रीपुरुष, नाचवेल तितकें नाचले; वाटेल तितकी दंगामस्ती केली; आणि गुत्त्यांतून दारूचा एक थेंबही शिल्लक राहिला नाहीं! या दिवसाचें वर्णन करीत असतां टाइम्सनें लिहिलें आहे कीं, हा दिवस लोकांनीं ज्या रीतीनें घालविला त्याचें वर्णन शब्दांनीं देतां येण्याजोगें नसल्यामुळें " The English Nation went a Mafeking. " असेंच त्याचें वर्णन करतां येईल. विजयी राष्ट्र गर्वानें चढून जातें, ऐष आरामांत लोळूं लागतें, थोडा काळपर्यंत देशांत शांतता नांदत आहेशी दिसते, पण नंतर आढळून येतें कीं युद्धाचे अंकुर नष्ट होण्याऐवजीं हजारों पटीनें वाढले आहेत. लढाई करून विजय मिळविल्यानें अखेरीस कोणताही देश सुखी झालेला नाहीं, आणि सुखी होणारही नाहीं. तो देश चढला नाहीं, तर पडला! वस्तुतः तें राष्ट्र जिंकलें नाहीं, तर हरलें! शिवाय आपला हेतु जर चुकीचा असेल तर लढाई केल्यामुळें आपल्या पक्षाचें व प्रतिपक्षाचेंहीं भयंकर नुकसान केल्यासारखें होतें.

पण अन्यायाच्या-विरुद्ध लढण्याची जी दुसरी रीत आहे त्यांत जरी आपल्याहातून चुकी होत असली तरी नुकसान आपलें एकट्याचेंच होतें, दुसऱ्या पक्षाचें कधींहि होत नाहीं. ही दुसरी रीत म्हणजे सत्याग्रह होय. या उपायाचें अवलंबन करणाराला, कोणाचीं डोकीं फोडावयाचीं नसतात, फक्त आपलेंच डोकें फोडूं द्यावयाचें असतें. स्वतःच सर्व कष्ट सोसून मरण्यास तयार व्हावयाचें असतें; आम्ही दक्षिण आफ्रिकेंतील सरकारच्या जुलमी कायद्यांशीं सामना करण्यासाठीं हाच उपाय स्वीकारला होता. आम्हीं सरकारला सांगितलें " कीं आम्हीं कधींहीं तुमच्या जुलमी कायद्या खालीं मान वांकवणार नाहीं. ज्याप्रमाणें दोन हातांशिवाय टाळी वाजत नाहीं, दोन माणसांशिवाय भांडण होऊं शकत नाहीं, त्या प्रमाणें दोन पक्षांशिवाय राज्य संभवत नाहीं जों पर्यंत आम्हीं प्रजा या नात्यानें रहात आहोंत तोंपर्यंतच तुम्हांला आमचा राजा म्हणून राहतां येईल. पण आतां या बाबतींत आम्ही तुमच्याशीं प्रजा या

नात्यानें रहायला तयार नाहीं. आणि मग या बाबतींत तुम्हीं आमच्यावर राज्य करूं शकणार नाहीं. आम्हीं प्रजा नाहीं तर तुम्ही राजेही नाहीं. जेथपर्यंत तुम्ही आम्हांला न्यायानें आणि प्रेमानें बांधून घ्याल तेथपर्यंतच आम्हीं तुम्हांला बांधूं देऊं. पण तुम्हीं आमच्याशीं दगलबाजी करून जर आम्हांला चिरडून टाकूं पहाल तर तें अशक्य आहे. इतर बाबतींत तुम्हांला वाटेल तें करा. पण आमच्यासाठीं जे कायदे कराल त्यांत आमचें मत घ्यावेंच लागेल आणि आम्हांला विचारल्या वांचून आम्हांला दडपून टाकण्यासाठीं जे जे कायदे कराल ते तुमच्या पुस्तकांतच रहाणार आहेत. आम्हीं ते कधींही पाळणार नाहीं. त्याबद्दल जी शिक्षा तुम्हीं कराल ती सोसायला आम्ही तयारच आहोंत. तुरुंगांत पाठवाल तर तेथें स्वर्ग समजून राहूं! फांशीं चढवाल तर हंसतमुखानें फांसावर चढूं! आमच्यावर जितक्या दुःखांचा वर्षाव कराल तितकीं सर्व दुःखें शांतपणें सहन करूं. पण तुमच्या केंसालाही धक्का लावणार नाहीं. आम्ही आनंदानें मरूं; तुम्हांला हातही लावणार नाहीं. पण या कुडींत प्राण असे पर्यंत तुमच्या जोहुकुमी कायद्याची अंमलबजावणी आमच्यावर करतां येणार नाहीं," याप्रमाणें आम्हीं तेथील सरकारला सांगून पाठविलें. सुरवात अशी झाली कीं एका रविवारीं जोहान्सबर्ग मध्यें माझ्या समोरील टेंकडीवर मी आणि हेमचंद्र नांवाचे दुसरे एक गृहस्थ संध्याकाळच्या वेळीं बसलों होतों. हा दिवस जसा काय कालच गेला इतकी मला त्याची आठवण आहे. माझ्यापाशीं सरकारी गॅझेट आलेलें होतें. त्यांत वर सांगितलेले कित्येक कायदे हिंदी लोकांसंबंधीं झाल्याचें लिहिलें होतें. ते वाचतांच माझें सर्व शरीर संतापानें कांपू लागलें. आणि वाटलें कीं सरकार आपल्या मनांत काय समजतें आहे? मी एकदम त्याचें भाषांतर करून खालीं लिहिलें कीं 'आम्ही ह्या कायद्यांना कधींही वश होणार नाहीं.' तो लेख लागलाच फिनिक्समध्यें 'इंडिअन ओपीनिअन' पत्रांत छापण्यासाठीं पाठविला. यावेळीं मला स्वप्नांतही वाटलें नव्हतें कीं एकादाही हिन्दी मनुष्य या बाबतींत अपूर्व शौर्य दाखवील, किंवा सत्याग्रहाची एवढी जोराची चळवळ होईल. मी लागलीच ही हकिगत माझ्या हिंदी बंधूंना सांगितली त्यावरून पुष्कळ लोक सत्याग्रह करण्यास तयार झाले, पहिल्या खेपेच्या लढयांत लोक सामील झाले ते अशा समजुतीनें कीं थोडा काळ दुःख सहन केल्यानें आपला कार्यभाग होऊन जाईल. पुन्हा दुसऱ्यावेळीं जेव्हां झगडा सुरू झाला तेव्हां सुरवातीला थोडींच माणसें होतीं, पण

मागाहून पुष्कळ येऊन मिळालीं. आणि जेव्हां ना. गोखले आफ्रिकेंत आले तेव्हां सरकारनें तड जोड करण्याचें वचन दिल्यामुळें झगडा बंद पडला. पण पुढें सरकारनें दगलबाजी केली व स्वतःचें वचन पाळलें नाहीं तेव्हां पुन्हा तिसऱ्या वेळीं उचल करावी लागली. त्यावेळीं गोखले साहेबानीं मला विचारिलें होतें कीं चळवळींत किती माणसें येतील? मीं सांगितलें कीं तीस पासून साठपर्यंत येतील. पण तितकींही माणसें न येतां आम्ही सोळा इसमांनींच सामन्यास सुरवात केली. आम्हीं तर दृढ निश्चयच केला होता कीं, जोंपर्यंत सरकार आपले जुलमी कायदे रद्द करणार नाहीं किंवा कांहीं समाधानकारक निकाल होणार नाहीं तों पर्यंत मिळेल ती शिक्षा सहन करायाची, पण नमतें घ्यावयाचें नाहीं. अधिक माणसें आम्हांला मिळतील अशी आशा मुळींच नव्हती. परंतु एकादा मनुष्य निःस्वार्थ-पणें, सत्याखातर, देशहितासाठीं, आत्मार्पण करण्यास तयार होतो तेव्हां त्याच्या कार्याचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं! पहातां पहातां एकदम वीस हजार मनुष्यें चळवळीस मिळालीं, तुरुंगही पुरेनासे झाले, आणि सर्व हिंदुस्थानचें रक्त उसळ्या मारूं लागलें. पुष्कळ जण म्हणतात कीं लॉर्ड हार्डिंज मध्यें न पडते तर तडजोड होऊं शकली नसती. पण असें म्हणणारे एवढा विचार करण्यास विसरतात कीं, लॉर्ड हार्डिंज यांनीं मध्यस्थी कां केली? कानडामधील हिंदी लोकांइतकीं दुःखें दक्षिण आफ्रिकेंत नव्हतीं, मग कानड्याच्या बाबतींत मध्यस्थी कां केली नाहीं आणि दक्षिण आफ्रिकेसंबंधांतच कां केली? ज्या ठिकाणीं हजारों माणसांचें आत्मबल एकत्र होतें, ज्या ठिकाणीं असंख्य स्त्री-पुरुष प्राण देण्याला तयार होतात, तेथें काय अशक्य आहे? मध्यें पडल्या शिवाय लॉर्ड हार्डिंजना चालण्यासारखें नव्हतें आणि तसें करून त्यांनीं आपलें शहाणपण सिद्ध केलें. शेवटीं आफ्रिकेच्या सरकारला तडजोड करावी लागली हें आपणाला माहीतच आहे. यावरून आपल्याला दिसून येईल कीं, कोणाचींहि डोकीं फोडल्याशिवाय केवळ आत्मबलानें—सत्याग्रहानें आपणाला पाहिजे तें मिळवितां येईल. शस्त्रानें लढणाराला शस्त्रांची आणि इतरांच्या मदतीची वाट पहावी लागते, आडवाटा शोधाव्या लागतात. पण सत्याग्रहानें झुंजणाऱ्याचा मार्ग सरळ आहे, त्याला कोणाचीहि वाट पहावी लागत नाहीं. तो एकटा असला तरी लढूं शकतो, इतरांची मदत नसेल तर फळ उशिरां मिळेल एवढेंच. आफ्रिकेंतील चळवळींत

आह्मी थोडींच माणसें असतों तर फरक एवढाच पडला असता कीं, आज मी आपल्या मध्यें बसलेला आढळलों नसतों. कदाचित् माझें सर्व आयुष्यहि तेथें झगडण्यांतच खर्च झालें असतें. पण ह्मणून काय झालें? जें फळ मिळालें तेंच थोडें उशिरां मिळालें असतें. सत्याग्रहाच्या युद्धांत फक्त आपलीच तयारी पाहिजे. संयम वृत्ति बाणलेली असली पाहिजे. ही तयारी करण्यासाठीं गिरिकंदरीं रहावें लागलें तर तेथें रहावें.

---

आफ्रिकेंतील सत्याग्रह यशस्वी होण्यास वेळ लागला याचें कारण हें होतें कीं, तेथील सत्याग्रह अत्यंत शुद्ध स्वरूपाचा नव्हता. त्या चळवळींत पडलेल्या सगळ्याच लोकांना सत्याग्रहाची खरी किंमत माहीत नसते. मारामाऱ्या आणि अत्याचार सोडणारे लोक नेहमीं तो अनिष्ट आहे अशी मनाची खात्री झाल्यामुळेंच सोडतात असें नाहीं. हे लोक म्हणजे नांवाचेच सत्याग्रही, कित्येक लोक या चळवळींत मिश्र हेतूंनीं व कधीं कधीं तर अशुद्ध हेतूनें सामील झाले होते. सक्त देखरेख राखण्याचें काम घडलें नसतें तर कित्येकांनीं अत्याचार करण्यासहि मागें पुढें पाहिलें नसतें. ज्याच्या आत्म्याचा विकास पूर्णपणें झाला आहे तोच मनुष्य अस्सल सत्याग्रह करण्यास खरोखर लायक आहे. तो एका क्षणांत इष्ट वस्तु साध्य करूं शकेल.

सत्यग्रहानें 'एक पंथ दो काज' होतात. त्यानें आत्मोन्नतिहि होते. आणि विश्वाची सेवाहि घडते. अशा दृष्टीनें पाहिलें असतां सत्याग्रह हें खरें शिक्षण होय. सामान्य शिक्षण संपल्यावर हें शिक्षण द्यावयाचें नसून त्याच्या आधीं दिलें पाहिजे. द्वेषाला प्रेमानें, असत्याला सत्यानें आणि जुलमाला सहनशीलतेनें जिंकतां येतें ही गोष्ट अक्षरें लिहितां वाचतां येण्यापूर्वींच मुलाला समजूं लागली पाहिजे. ह्या गोष्टीची सत्यता मला जोरानें भासूं लागल्यामुळेंच आफ्रिकेंतील चळवळ चालू असतांना मी तेथें एक आश्रम स्थापन केला होता...... **माझ्या येथें येण्याचेंहि हें एक** सबळ **कारण** आहे कीं सत्याग्रही या नात्यानें माझ्यांत जी पुष्कळच अपूर्णता आहे ती नाहींशी करण्याची खटपट करावी. आणि ही गोष्ट जितकी हिंदुस्थानांत साध्य होण्यासारखी आहे तितकी दुसऱ्या कोठेंहि होण्यासारखी नाहीं.

---

# इतिहास आणि सत्याग्रह.

प्र०:—तुम्ही सत्याग्रह किंवा आत्मबळ म्हणतां त्याला कांहीं इतिहासाचा आधार आहे काय ? आजपर्यंत एकही राष्ट्र आत्मबळाच्या किंवा सत्याग्रहाच्या जोरावर उदयास आलेलें दिसत नाहीं.

उ०:—कवि तुळसीदासजींनीं म्हटलें आहे कीं,

दया धर्मका मूल है पाप मूल अभिमान ।
तुलसी दया न छाँडिये जबलग घटमें प्रान ।।

मला तर हें वाक्य शास्त्रवचनासारखेंच वाटतें. जसे दोन आणि दोन चारच होतात तितका विश्वास माझा या वाक्यावर आहे. दयाबल म्हणजेच आत्मबळ किंवा सत्याग्रह. आणि या बळाचे पुरावे पावलों पावलीं दिसून येतात. हें बळ नसतें तर पृथ्वी केव्हांच रसातळास गेली असती.

पण तुम्हाला तर ऐतिहासिक पुरावे पाहिजे आहेत. यासाठीं प्रथम आपण इतिहास कशाला ह्मणतों तें पाहिलें पाहिजे. इतिहास या शब्दाचा अर्थ 'असें घडलें' असा आहे. हाच अर्थ घेतला तर सत्याग्रहाचे दाखले पुष्कळ दाखवितां येतील. इंग्रजींत हिस्टरी शब्दाचा अर्थ बादशहांचा इतिहास असा होतो. तो अर्थ घेतला तर यांत मात्र सत्याग्रहाचे दृष्टांत मुळींच आढळणें शक्य नाहीं. कथिलाच्या खाणींत रूपें कोठून मिळणार ? हिस्टरींत जगाच्या कोलाहलाची कहाणीच मिळणार. यामुळें गोऱ्या लोकांत म्हण आहे कीं ज्या राष्ट्राला History हिस्टरी ( कोलाहल ) नाहीं तें राष्ट्र सुखी होय. राजे लोक कसे डाव खेळत, ते कसे खून करीत, ते कसें शत्रुत्व राखीत वगैरे गोष्टी हिस्टरींत आढळतात. हाच जर इतिहास असता, जर इतकेंच कायतें घडत असतें, तर जग केव्हांच नष्ट झालें असतें. जर जगाची कथा लढाईपासूनच सुरू होत असती तर आज एकही माणूस जिवंत राहिला नसता. जें राष्ट्र लढाईलाच बळी पडलें त्या राष्ट्राची हीच दशा झालेली आहे. आस्ट्रेलियांतील हबशी लोकांचें निकंदन झालें आहे. त्यांच्यापैकीं एकाद्यालाच आस्ट्रेलियांतील गोऱ्या लोकांनीं जिवंत राहूं दिला असेल. ज्यांचीं पाळें मुळेंहि नाहींशीं झालीं ते सत्याग्रही नव्हते. जे जगतील ते पहातील कीं या गोऱ्या लोकांचीही तीच दशा होणार ! जे तलवार चालवितात त्यांचा मृत्युही तरवारीनेंच होतो. 'पोहणाराचें मरण पाण्यांत' अशी म्हण आहे.

जगांत इतकीं माणसें अद्यापि आहेत यावरून असें दिसतें कीं, जगाचा आधार शस्त्रबलावर नसून सत्य, दया अथवा आत्मबलावर आहे. तेव्हां मुख्य पुरावा हा आहे कीं, असंख्य लढाया झाल्या असतांहि जग अजूनपर्यंत टिकलें आहे. अर्थात् युद्धबलाखेरीज दुसरा सबळ आधार त्याला आहे. हजारों किंबहुना लाखों मनुष्यें प्रेमवश होऊन आपलें आयुष्य सुखानें घालवितात. कोटयावधि कुटुंबांतील क्लेश, त्यांतील प्रेमाच्या समुद्रांत लय पावतात. शेंकडों राष्ट्रें गुण्यागोविंदानें नांदलीं आहेत या गोष्टीचा उल्लेख "हिस्टरी" करीत नाहीं. करूंहि शकणार नाहीं. जेव्हां या दयेचा, प्रेमाचा किंवा सत्याचा ओघ थांबतो, त्याचा भंग होतो तेव्हांच त्या स्थितीचा उल्लेख इतिहासांत येतो. एका कुटुंबांतील दोन भाऊ भांडले, त्यांतील एकानें दुसऱ्यावर सत्याग्रहाचा प्रयोग केला, दोघेही पुन्हां एक झाले. याची नोंद कोण करतो ? जर दोघां भावांमध्यें वकिलांच्या मदतीनें किंवा अशाच इतर कारणांनीं, वैरभाव वाढला आणि ते शस्त्रांनीं किंवा कोर्टांत (कोर्ट हेंहि एक शस्त्रच–शरीरबळच आहे) गेले तर त्यांचीं नांवें वर्तमानपत्रांत येणार! शेजाऱ्या पाजाऱ्यांना समजणार आणि कदाचित् इतिहासांतहि छापणार! जसें कुटुंबांत, समुदायांत तसेंच राष्ट्रांतही. कुटुंबांत एक प्रकारचा न्याय आणि राष्ट्रांत वेगळाच, असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं. हिस्टरी ही अस्वाभाविक गोष्टींचा उल्लेख करिते. सत्याग्रह हा स्वाभाविक असल्यामुळें त्याचा उल्लेख तिच्यांत ( हिस्टरींत ) होणें शक्य नाहीं.

---

# आधुनिक सुधारणा ती ही !

प्रश्नः—तुमच्या मतें हल्लींची सुधारणा म्हणजे कुधारणाच ठरली म्हणावयाची !

उत्तरः—माझ्या मतेंच नव्हे, तर पाश्चात्य देशांतील अनेक विचारी लेखकांच्या मतेंही ही सुधारणा म्हणजे कुधारणाच आहे. या विषयावर पुष्कळ पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत. या सुधारणेचा विध्वंस करण्यासाठीं निरनिराळ्या मंडळ्याही स्थापन केल्या जात आहेत. एका लेखकानें 'सुधारणा, तिचें कारण व तीवर उपाय' ( Civilization, its Cause and Cure. by Edward Carpenter ) या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे; त्यांत त्यानें सुधारणा म्हणजे एक प्रकारचा रोग आहे असें सिद्ध केलें आहे.

प्रश्नः—मग या गोष्टी आपणाला कशा समजत नाहींत ?

उत्तरः—त्याचें कारण स्पष्टच आहे. कोणीही मनुष्य झाला म्हणून, स्वतःच्याच विरुद्ध अशी गोष्ट कसा बोलेल ? सुधारणेच्या नादीं लागलेले लोक तिच्या विरुद्ध लिहिणार नाहींत. तर तिलाच पुष्टि मिळेल, अशा तऱ्हेच्या गोष्टी शोधून काढतील. ही गोष्ट ते समजून करतात असें ही नाहीं. ते जें कांहीं लिहितात तसेंच त्यांना वाटत असतें. निजलेला माणूस स्वप्न पहातो तें त्याला खरेंच वाटत असतें. जेव्हां तो झोपेंतून जागा होतो तेव्हांच त्याला स्वप्न हें खोटें होतें अशी जाणीव होते. सुधारणेला वश झालेल्या माणसाची अवस्थाही अशाच प्रकारची असते. आपणाला सुधारणेच्या पुरस्कर्त्यांचेच लेख वाचावयास मिळतात. त्यांच्यांत फार सज्जन आणि हुषार माणसें पडलेलीं आहेत. त्यांचे लेख वाचून आपण दिपून जातों. अशा रीतीनें एकामागून एक माणसें फशीं पडूं लागतात.

प्रश्नः—ही गोष्ट तुम्हीं बरोबर सांगितलीत. आतां तुम्ही जें वाचलें आहे व विचार केला आहे तो सांगा ?

उत्तरः—प्रथम सुधारणा हें नांव कोणत्या स्थितीला देण्यांत येतें याचा विचार करूं. या सुधारणेचें खरें चिन्ह हें आहे कीं, मनुष्यें बाहेरच्या शोधांत व शरीराच्या सुखांत सार्थक आणि पुरुषार्थ मानतात. याचीं उदाहरणें पाहूं. शंभर वर्षांपूर्वी ज्या प्रकारच्या घरांत युरोपांतील लोक रहात असत, त्याच्यापेक्षां अधिक चांगल्या घरांत आज रहातात; हें सुधारणेचें चिन्ह समजलें जातें. ही शरीरसुखाची गोष्ट आहे. पूर्वीं माणसें कातड्याचीं वस्त्रें घालीत असत आणि भाले वापरीत. आतां तीं मोठ्या विजारी घालतात, शरीर भूषविण्याकरतां नाना तऱ्हेचे कपडे तयार करतात व भाल्यांच्या ऐवजीं एकामागून एक पांच बार करूं शकेल अशी चक्री बंदूक वापरतात. हें सुधारणेचें चिन्ह आहे. एकाद्या देशांतील माणसें जोडे वगैरे घालीत नसलीं व पुढें तीं युरोपांतल्या लोकांसारखे कपडे वापरायाला शिकलीं तर जंगली अवस्थेंतून तीं सुधारलीं असें समजलें जातें. पूर्वीं युरोपांत माणसें साधारण नांगरानें आपल्यापुरती जमीन स्वतः नांगरीत असत. त्याच्या ऐवजीं आज वाफेच्या यंत्रानें नांगर चालवून एक मनुष्य पुष्कळ जमीन नांगरूं शकतो व पुष्कळ पैसा जमवूं शकतो. हें सुधारणेचें चिन्ह समजलें जातें. पूर्वीं एकादाच ग्रंथ लिहिला जात असे व तो अमूल्य समजला जाई. आज ज्याला जें वाटेल तें तो लिहितो, छापून काढतो आणि लोकांचीं मनें भ्रमवितो. हें सुधारणेचें चिन्ह होय. पूर्वीं माणसें पायरस्त्यानें दिवशीं बारा कोसांची मजल करीत. आज आगगाडींत बसून चारशें कोस जाऊं शकतात. ही तर सुधारणेची कमालच समजली जाते. अझूनही प्रगति होत जाईल तसतसें—असें समजण्यांत येतें कीं, माणसें विमानांत बसून प्रवास करतील व थोड्या तासांत जगाच्या पाहिजे त्या भागांत जाऊन पोंहोंचतील. —माणसांना हातपाय हालविण्याची जरूर पडणार नाहीं. त्यांनीं एक बटन दाबलें कीं त्यांना वापरण्यासाठीं पोषाख येऊन पडेल. दुसरें बटन दाबलें कीं त्यांच्यापुढें वर्तमानपत्रें येऊन पडतील. तिसरें बटन दाबलें कीं त्यांची गाडी जुंपून तयार होईल. नित्य नवीं पक्वान्नें

मिळतील. हातापायांची जरूरच पडणार नाहीं. सर्व काम यंत्रेंच करूं लागतील. पूर्वीं लढावयाचें असलें म्हणजे योद्धे एकमेकांचें शरीर अजमावीत. आतां तोफेच्या एका गोळ्यानें हजारों माणसांचा संहार करतां येतो. हें ही सुधारणेचेंच लक्षण. पूर्वीं लोक मोकळ्या हवेंत झेंपेल तितकें काम स्वतंत्रपणें करीत असत. आतां हजारों मजूर पोटासाठीं एकत्र होऊन मोठमोठ्या कारखान्यांतून आणि खाणींतून काम करीत असतात. त्यांचे हाल कुत्राही खात नाहीं. शिसें वगैरेच्या कारखान्यांतून जिवाकडेही न पहातां त्यांना काम करावें लागतें व या सर्वांचा फायदा धनिक लोकांना मिळतो. पूर्वीं माणसांना मारहाण करून गुलाम बनवीत असत. आज पैशाची आणि उपभोगाची लालूच दाखवून गुलाम बनवितात. पूर्वीं ज्यांचीं नांवेंही ऐकूं येत नव्हतीं असले नवेनवे रोग उत्पन्न झाले आहेत; त्यांच्यावर कोणते उपाय योजावे, याचा शोध डॉक्टर लोक करूं लागले आहेत. असें करतां करतां दवाखान्यांची संख्याही वाढली आहे. हें ही सुधारणेचें चिन्ह समजलें जातें! पूर्वीं पत्र पाठवावयाचें असलें म्हणजे खास स्वार जात असत व फार खर्चानेंच तसें करतां येत होतें. आज मला कोणाला शिव्या हांसडण्यासाठीं पत्र लिहावयाचें असलें तर एका पैशांत मी शिवी पाठवूं शकतों. कोणाला शाबासकी द्यावयाची असली तरीही ती एका पैशांत पोहोंचूं शकते. हें सुधारणेचें चिन्ह आहे. पूर्वीं मनुष्यें दोन किंवा तीन वेळां खात असत आणि तोहि स्वतः भाजलेला भाकरीचा तुकडा व थोडी भाजी असेल तर ती. आतां दोन दोन तासांनीं खायला मिळालें पाहिजे तें इथपर्यंत कीं खाण्यांतून लोक मोकळेच होत नाहींत. आतां किती सांगूं? हें सर्व तुम्हांला वाटेल त्या पुस्तकांत आढळेल. सुधारणेचीं हीं सर्व खरीं चिन्हें आहेत आणि कोणताही मनुष्य जर याच्या विरुद्ध गोष्टी समजावूं लागला तर तो भोळा आहे असें खात्रीनें समजावें. सुधारणा तर मीं सांगितली तीच होय. त्यांत नीति किंवा धर्म यांचा संबंधच नाहीं. सुधारणेचे पुरस्कर्ते स्पष्टपणें सांगतात कीं, आमचें

काम लोकांना धर्म शिकवण्याचें नाहीं. धर्म म्हणजे एक ढोंग असें मानतात. कित्येक जण धर्माचें अवडंबर माजवतातहि खरें. कित्येक जण नीतीच्याहि गप्पा मारीत असतात. तथापि मी तुम्हांला वीस वर्षांच्या अनुभवानंतर सांगतों कीं, हे लोक नीतीच्या नांवावर अनीतिच शिकवतात. वर सांगितलेल्या लक्षणांत नीति असणें अशक्य आहे, ही गोष्ट एकादें पोरही सांगेल. शरीरसुख कसें मिळवावें याचाच शोध सुधारणा करीत असते तेंच देण्याची तिची खटपट असते इतकें असूनही तें सुख मिळूं शकत नाहीं.

ही सुधारणा म्हणजे अधर्म होय व युरोपांत तिचा प्रसार इतका झाला आहे कीं, तेथील माणसें अर्धीं वेडीं झालेलीं दिसतात. त्यांच्यांत खरी कुवत नाहीं. आपलें बळ तीं निशेच्या जोरावर टिकवितात. एकांतांत तीं बसूंच शकत नाहींत. स्त्री ही खरोखर घरांतील महाराणी असली पाहिजे. तिला गल्ल्यांतून भटकावें लागतें. इंग्लंडांतच चाळीस लक्ष अनाथ अबलांना पोटासाठीं गाढवां-प्रमाणें राबावें लागतें. आणि आज यामुळें सफ्रेजेटची चळवळ चालली आहे. ही सुधारणा अशा प्रकारची आहे कीं जर आपण 'स्वस्थ बसलों तर सुधारणेच्या झपाट्यांत सांपडलेले लोक स्वतःच पेटव-लेल्या अग्नींत जळून मरतील. पैगंबर महंमद याच्या सांगण्या-प्रमाणें हें सैतानाचें राज्य होय. हिंदुधर्म याला धडधडीत कलिकाल म्हणतो. या सुधारणेचें हुबेहुब चित्र मी तुम्हांला दाखवूं शकणार नाहीं. माझ्या शक्तीच्या बाहेरची ही गोष्ट आहे; पण तुमच्या ध्यानांत येईल कीं, या सुधारणेमुळें युरोपिअन राष्ट्रांत घाण पसरली आहे. ही सुधारणा विनाशकारक आहे. तिच्यापासून दूर राहिलें पाहिजे. हिंदुस्थानाला रेलवेनीं, वकीलांनीं व डॉक्टरांनीं कंगाल केलें आहे. या गोष्टी अशा आहेत कीं, वेळेवर आपण सावध न झालों तर त्या आपणांला चारी बाजूंनीं घेरून टाकतील.

प्रश्नः—आपली चर्चा शेवटपर्यंत धडपणें चालेल असें दिसत नाहीं. तुम्हीं तर जे जें उत्तम दिसतें, व समजलें जातें त्यावरच ( सरसहा ) हल्ला सुरू केला आहे. मग बाकी काय राहिलें ?

उत्तर:--थोडा दम धरा. सुधारणा म्हणजे कुधारणा होय ही गोष्ट ध्यानांत येण्याला प्रयास पडतील. डॉक्टर लोक तुम्हांला सांगतील कीं रक्तपितीच्या रोगानें पिडलेला रोगी मरण्याच्या दिवसा पर्यंतही जगण्याची आशा करीत असतो. तो रोग बाहेरून ध्यानांत येईल अशी इजा करीत नाहीं. शिवाय त्याच्या योगानें मनुष्याच्या शरीरावर खोटीच लाली दिसूं लागते. त्यामुळें रोगी विश्वासावर राहतो व शेवटीं बुडतो. त्याचप्रमाणें सुधारणेचेंहि समजावें. तो अदृश्य रोग आहे. त्या पासून सावध रहा.

---

## आगगाड्या.

प्रश्नः—ठीक आहे तर. आतां रेलवे-पुराण सुरू करा.

उत्तरः—तुम्हांला सहज समजण्यासारखें आहे कीं रेलवेमुळें प्लेगचा प्रसार झाला, आगगाड्या नसल्या तर माणसें थोडींच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातील. असें झाल्यानें सांसर्गिक रोग सर्व देशभर फैलावणार नाहींत. सुतक (Segregation) आपण पूर्वी सहजच पाळीत असूं. रेलवेमुळें दुष्काळ वाढले आहेत. कारण कीं, आगगाडीच्या सोयीमुळें लोक आपलें धान्य विकून टाकतात. जेथें महागाई असेल तेथें धान्य वाहून जातें, लोक निष्काळजी बनतात. यामुळें दुष्काळाचें दुःख वाटतें. आगगाड्यांमुळें दुष्टपणाही वाढतो. हलकट माणसांना आपला हलकटपणा फार जलद पसरतां येतो. हिंदुस्थानांतील पवित्र तीर्थक्षेत्रें अपवित्र बनून गेलीं आहेत. पूर्वी लोकांना अशा जागीं जाण्यास अत्यंत श्रम पडत असत. यामुळें खरे श्रद्धावान् लोकच तेथें जात व शुद्ध भावानें परमेश्वराचें चिंतन करीत असत. आतां केवळ लुच्चे लोकांच्या टोळ्या लोकांना लुटण्या करतां तेथें जात असतात.

प्रश्नः—हें तुमचें म्हणणें एकतर्फी झालें. आगगाडीनें ज्या प्रमाणें दुर्जन जाऊं शकतात त्याचप्रमाणें सज्जनही जाऊं शकतात. त्यांनीं आगगाड्यांपासून पूर्ण फायदा कां करून घेऊं नये ?

उत्तरः—चांगली गोष्ट ही गोगलगाईच्या पायांनीं चालत असते. तिचें आगगाडीशीं जमणें कधींही शक्य नाहीं. चांगलें काम करणाराला स्वार्थ नसतो. तो घाई कधीं करीत नाहीं. त्याला माहित असतें कीं सद्भावनांची छाप मनुष्यांच्या मनावर पाडण्याला युगेंच्या युगें पाहिजेत. वाईट गोष्टीच नाचत आणि उडत जाऊं शकतात. घर बांधणें हें काम कठीण आहे. तें जमीनदोस्त करणें हें फार सोपें आहे. यामुळें आगगाडीच्या योगानें दुष्टतेचाच प्रसार होतो, ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. आगगाडीमुळें दुष्काळाचें भय वाढेल किंवा नाहीं या संबंधानें एकादा पंडित माझ्या मनांत शंका उत्पन्न करूं शकेल; पण आगगाड्यांमुळें दुष्टता वाढते ही गोष्ट माझ्या अंतःकरणांत पक्की लिहून ठेवली गेली आहे, ती नाहींशी होणें शक्य नाहीं.

प्रश्नः—पण आगगाड्यांपासून एक फायदा इतका मोठा झाला आहे कीं त्याच्यापुढें, इतर बाजूंनीं झालेलें सर्व नुकसान कांहींच नव्हेसें वाटतें. आगगाड्या आहेत म्हणून हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची भावना आहे. तेव्हां मला वाटतें कीं आगगाड्या आल्या हें बरें झालें.

उत्तरः—हा तुमचा समज चुकीचा आहे. तुम्हीं एकराष्ट्र नव्हतां आणि एक-राष्ट्र व्हावयास शेंकडों वर्षें लागतील, असें तुम्हाला इंग्रजांनीं शिक-विलें. ह्या म्हणण्याला कांहीं आधार नाहीं. जेव्हां इंग्रजलोक हिंदु-स्थानांत नव्हते तेव्हां आपल्यांत एकराष्ट्रीयत्व होतें, आपले विचार एक होते, आपली रहाणी एक ( सारखी ) होती. म्हणून तर इंग्रजांना एक राज्य स्थापन करतां आलें.

प्रश्नः—ही गोष्ट विशेष समजून घेतली पाहिजे.

उत्तर—मी जें सांगत आहें तें विचार केल्याशिवाय सांगत नाहीं. आपणांत एकराष्ट्रीयत्व होतें याचा अर्थ असा नव्हे कीं आपणांमध्यें अंतर नव्हतें. पण आपले पुढारी पायांनीं किंवा गाड्यांत बसून सर्व हिंदु-स्थानभर फिरत असत, परस्परांच्या भाषा शिकत असत, त्यांच्या-

मध्यें भेद नव्हता. ज्या दूरदर्शी पुरुषांनीं द्वारका, विंदु रामेश्वर, जगन्नाथ व हरिद्वारच्या यात्रा ठरविल्या त्यांचा हेतु काय असेल असें तुम्हांला वाटतें ? ते मूर्ख नव्हते हें तरी तुम्हीं कबूल कराल. त्यांना माहीत होतें कीं ईश्वरभजन हें घरीं बसून सुद्धां करतां येतें. ज्याचें " मन चंगा त्याला घरीं बसल्या गंगा " आहे. पण त्यांनीं विचार केला कीं सृष्टीनेंच हिंदुस्थानला एकराष्ट्र बनवलें आहे. तर त्यांतील लोकांनीं एक राहिलें पाहिजे. त्यासाठीं त्यांनीं भिन्न भिन्न स्थानें निश्चित करून लोकांना ऐक्याची कल्पना अशा रीतीनें शिकविली कीं, तसें जगांत दुसऱ्या कोठेंही पहावयास मिळत नाहीं. दोन इंग्रज एक नाहींत, तितके आपण हिंदी एक होतों व आहों. फक्त तुम्हीं आम्ही जे " सुधारलों " त्यांनांच वाटतें कीं आपण निरनिराळे आहों. रेलवेमुळेंच आपण हा भेद मानूं लागलों आणि रेलवेमुळेंच आपण एकराष्ट्रीयत्वही शिकलों असें तुम्ही म्हणाल तर माझी हरकत नाहीं. अफूचें व्यसन ज्याला लागलें आहे तो म्हणूं शकेल कीं, अफूपासून नुकसान आहे हें अफू खाल्यापासूनच समजलें; म्हणून अफू ही चांगली वस्तू आहे. मी म्हणतों या सगळ्याचा तुम्ही विचार करा. तुम्हांला अजूनही पुष्कळ शंका येतील. पण त्या सर्वांचें समाधान विशेष विचारानें तुमचें तुम्हांला करून घेतां येईल.

प्रश्नः—तुम्हीं म्हणतां या सगळ्या गोष्टींचा मी विचार करीन. पण एक शंका मला आतांच आली आहे. मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले त्याच्या पूर्वीची गोष्ट तुम्हीं सांगितलीत. पण आतां मुसलमान, पार्शी व ख्रिस्ती यांची संख्याहि हिंदुस्थानांत बरीच मोठी आहे. एकराष्ट्र ही भावना त्यांच्यांत असणें शक्य नाहीं. हिंदु मुसलमान यांच्यामध्यें तर हाडवैर आहे. हिंदूचें तोंड पूर्वेला तर मुसलमानाचें पश्चिमेला. मुसलमान हिंदूला मूर्तिपूजक म्हणून त्याचा तिरस्कार करतो. हिंदु गाईला पूज्य समजतो, मुसलमान तिला मारतो. हिंदु अहिंसक, मुसलमान हिंसक. असा पावलोपावलीं दृष्टीस पडणारा विरोध कोठून मिटणार ? आणि हिंदुस्थान कोठून एक होणार ?

# हिंदु मुसलमान.

उत्तरः—तुमचा शेवटचा प्रश्न फार गंभीर दिसतो; पण विचार केला असतां तो सोपा आहे असें आढळून येईल. हा प्रश्न उत्पन्न झाला याचें कारण ही आगगाडी, वकील व डॉक्टर हेच आहेत. वकील व डॉक्टर या संबंधांचा विचार अजून आपल्याला करावयाचा आहे. रेलवेचा होऊन गेला. एवढें विशेष सांगतों कीं मनुष्याला (ईश्वरानें) अशा तऱ्हेनें बनविला आहे कीं त्यानें आपल्या हातापायानें होईल तेवढेंच येणेंजाणें ठेवावें. जर आपण रेलवे वगैरे साधनांनीं धांवपळ करावयाचें सोडलें तर फार गुंतागुंतीचे प्रश्न आपल्यापुढें उत्पन्न होणारच नाहींत. ही धांपवळ केल्यामुळेंच आपण दुःखें ओढवून घेतों. माणसाच्या कार्याची हद्द परमेश्वरानें त्याच्या शरीररचनेवरूनच ठरविली, तर माणसानें ही आकाराची हद्द उल्लंघन करण्याचे उपाय शोधून काढले. माणसाला अक्कल एवढ्यासाठीं दिली गेली कीं त्यानें परमेश्वराची ओळख करून घ्यावी. पण मनुष्यानें आपल्या अकलेचा उपयोग ईश्वराला विसरण्यांत केला. स्वाभाविकपणें मला माझ्या आसपासच्या लोकांची सेवा करतां येईल, तर अहंपणानें फुगून जाऊन मी विचार केला कीं माझ्या शरीरानें मी सर्व जगाची सेवा करणार! असें करीत असतां पुष्कळ प्रकारच्या व पुष्कळ धर्मांच्या माणसांशीं संबध येणार. हा सर्व बोजा मनुष्यजात उचलूं शकणारच नाहीं आणि मग अस्वस्थता उत्पन्न होणार. यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं आगगाड्या या अनर्थकारक आहेत. त्यांचा उपयोग करून मनुष्य ईश्वराला विसरला.

प्रश्नः—पण आतां मी माझ्या प्रश्नाचें उत्तर ऐकण्याला अधीर बनलों आहें. मुसलमान हिंदुस्थानांत आल्यामुळें हिंदुस्थान एकराष्ट्र झालें, कीं असलेलें मोडलें?

उत्तर—हिंदुस्थानांत वाटेल त्या धर्मांच्या माणसाला राहतां येईल. त्यामुळें कांहीं एकराष्ट्रीयत्व नाहींसें होत नाहीं. नवीन माणसें आलीं म्हणून

कांहीं राष्ट्रीयत्वाचा भंग होऊं शकत नाहीं. तीं राष्ट्रांत मिसळून जातात; व असें होतें तेव्हांच त्या देशाला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होते. त्या देशांत इतर माणसांचा समावेश करून घेण्याचा गुण असला पाहिजे. तो हिंदुस्थानांत होता व आहे. बाकी खरें पाहूं जातां जितकीं मनुष्यें तितके धर्म आहेत असें म्हणतां येईल. एकराष्ट्र बनून राहणारीं मनुष्यें एकमेकांच्या धर्मांत ढवळाढवळ करीतच नाहींत आणि जर करूं लागलीं तर खात्रीनें समजावें कीं तो देश एकराष्ट्र होण्याला लायकच नाहीं. हिंदु जर असें समजेल कीं सर्व हिंदुस्थान हिंदूंनींच भरलेलें असावें तर तें त्याचें स्वप्न आहे. मुसलमान असें म्हणेल कीं त्यांत सर्व मुसलमानच असावे, तर तेंही स्वप्नच होय. तथापि हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, ज्यांनीं ज्यांनीं या देशाला मायदेश बनविला आहे, ते सर्व देशबंधुच आहेत. आणि त्यांनीं परस्परांच्या स्वार्थाकरितां एकीनें राहिलें पाहिजे. जगांतील कोणत्याहि देशांत ‘ एकराष्ट्र ’ याचा अर्थ एक धर्म असा झालेला नाहीं. हिंदुस्थानांतही तो तसा नव्हता.

प्रश्नः—पण हाडवैराचें काय ?

उत्तरः—‘ हाडवैर ’ हा दोघांच्याही हितशत्रूंनीं शोधून काढलेला शब्द आहे. जेव्हां हिंदुमुसलमान लढत होते तेव्हां तशा गोष्टी बोलत होते. लढण्याचें तर त्यांनीं केव्हांच बंद केलें; तर हाडवैर कसलें ? शिवाय, हेंही ध्यानांत ठेवा कीं, इंग्रज आल्यानंतरच आपण लढण्याचें सोडलें आहे असें नाहीं. हिंदु, मुसलमानी राज्यांत, आणि मुसलमान, हिंदुराजांच्या राज्यांत, राहत आले आहेत. दोघांनाही समजून आलें कीं लढाई करण्यानें कोणाचाही फायदा नाहीं. लढण्यानें कांहीं कोणी आपला धर्म सोडीत नाहीं आणि आपला हट्टही सोडणार नाहीं यामुळें दोघांनींही एकीनें राहण्याचें ठरविलें. भांडणें तर इंग्रजी राज्यानंतर पुन्हा लागलीं. हिंदु पूर्वेकडे तोंड करून ( परमेश्वराची ) स्तुति करतो व मुसलमान पश्चिमेकडे तोंड करून करतो. असल्या यःकश्चित् समजुती निरर्थक व नुकसानकारक आहेत. त्यांच्या भरांत आपण

हेंही लक्षांत ठेवीत नाहीं कीं, पुष्कळशा हिंदुमुसलमानांचे पूर्वज एक होते. आपल्यांत एकच रक्त खेळत आहे. काय धर्म बदलला म्हणून शत्रु बनावयाचें ? दोहोंचा ईश्वर निरनिराळा आहे ? निरनिराळे धर्म हे एकाच ठिकाणीं पोंहोंचण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. आपण निर-निराळे मार्ग स्वीकारले म्हणून काय झालें ? त्यांत काय हरकत आहे ?

असल्या म्हणी शैव आणि वैष्णव यांच्या मध्येंही आहेत. त्याच प्रमाणें त्यांच्यांत निरनिराळे पुष्कळ पंथही आहेत. जसजसा ज्ञानाचा प्रसार अधिक होईल तसतसें आपल्याला समजूं लागेल कीं आपल्याला न आवडणारा धर्म दुसरा मनुष्य पाळीत असला तरी त्याच्याशीं आपण वैर-भाव राखणें हें योग्य नाहीं, त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा जुलूम आपण करतां कामा नये.

माझें असें म्हणणें नाहीं कीं हिंदु–मुसलमान कधीं लढणारच नाहींत. दोघे भाऊ एके ठिकाणीं राहिले म्हणजे तक्रार होणारच, पण सर्व माणसें सारख्याच अकलेचीं असूं शकत नाहींत. दोघेही आवेशांत आले म्हणजे पुष्कळ वेळां कांहीं साहस करून जातात. त्याचे परि-णाम आपण सहन केले पाहिजेत. पण असल्या तक्रारी ही आपल्या वकीलीच्या जोरावर इंग्रजाच्या कोर्टांत आपण घेऊन जातां कामा नये. दोघांनीं मारामारी केली, त्यांत दोघांचीं किंवा एकाचें डोकें फुटलें. मग तिसरा माणूस त्याचा न्याय तो काय करणार ? जे लढतील ते जखमी ही होतील. शरीरावर शरीर आदळलें म्हणजे त्याची खूण ही राहणारच. त्याचा आणखी न्याय तो कसला असायचा आहे !

# वकील.

प्रश्नः—तुमचें तर असें म्हणणें दिसतें, कीं दोघांचें भांडण झालें तरी त्यांनीं न्यायही करूं नये ! ही तर तुम्ही अजब गोष्ट सांगत आहां.

उत्तरः—अजब म्हणा किंवा दुसरें कांहीं विशेषण द्या. ती गोष्ट खरी आ आणि तुमच्या ह्या शंकेमुळें वकील आणि डॉक्टर ह्यांचा प्रश्न सहाजिकपणेंच पुन्हां उत्पन्न होत आहे. माझें असें मत आहे, कीं वकीलांनींच हिंदुस्थानाला गुलामगिरी दिली आहे. आणि कोर्टांत तंटे वाढले आहेत.

प्रश्नः—असले आरोप करणें सोपें आहे, पण ते सिद्ध करतांनां कठीण पडेल. वकीलांशिवाय स्वतंत्रतेचा मार्ग आपणास कोण दाखविणार होतें ? त्यांच्या शिवाय गरीबांचा ( निरपराध्यांचा ) बचाव कोण करणार होतें ? त्यांच्या शिवाय दाद कोणी दिली असती ? पहा, कै. मनमोहन घोष यांनीं किती तरी लोकांचा बचाव केला. स्वतः साठीं एक पै ही त्यांनीं घेतली नाहीं. राष्ट्रीय सभाही वकीलांच्या जोरावरच चालली आहे. आणि त्यांच्याच खटपटीनें तिच्यांतील सर्व काम होतें. या वर्गाची तुम्ही नालस्ती करतां हा न्याय म्हणावयाचा कीं अन्याय ?

उत्तरः—तुमच्याप्रमाणेंच एक वेळ माझीही समजूत होती. वकील लोकांनीं कधीं कांहीं चांगलें काम केलेंच नाहीं, असें मी म्हणत नाहीं. श्रीयुत मनमोहन घोष ह्यांच्याविषयीं माझ्या मनात आदरबुद्धि आहे. त्यांनीं गरिबांना पुष्कळ मदत केली हेंही खरें आहे. राष्ट्रीय सभेत वकीललोकांनीं थोडेंसें काम केलें हेंही खोटें नव्हे. वकील हीं माणसेंच आहेत आणि मनुष्यमात्रांत थोडाबहुत चांगुलपणा हा आहेच. वकीलांच्या भलेपणाच्या ज्या गोष्टी पाहण्यांत येतात, त्यांतील बहुतेक गोष्टी, ‘ आपण वकील आहोंत ’ ही गोष्ट जेव्हां ते विसरलेले असतात, तेव्हांच घडलेल्या असतात. मी तुम्हाला येवढेंच सांगतों, कीं त्यांचा धंदा त्यांना अनीति शिकवणारा आहे. चुकीनें ते लालचींत सांपड-

तात. त्यांतून मुक्त राहणारे थोडेच आहेत. हिंदु आणि मुसलमान भांडले तर त्यांना तिऱ्हाईत माणूस सांगेल कीं "आतां झालें गेलें विसरून जा. दोघांचाही दोष असेल. आतां परस्पर गुण्यागोविंदानें रहा." पण समजा कीं ते वकीलापाशीं गेले. वकीलाचें तर कामच आहे कीं आपल्या अशीलाचा पक्ष खेंचून धरावा. आणि खुद्द अशीलाच्या कल्पनेंतही येऊं शकणार नाहींत असले त्याच्या बाजूचे मुद्दे शोधून काढावेत. हें जर तो करणार नाहीं तर त्यानें आपल्या धंद्याला बट्टा लावल्यासारखें होईल. तेव्हां वकील बहुधा भांडणें वाढविण्याचीच सल्ला देणार. आणखी, माणसें वकील होतात तीं कांहीं परलोक मिळविण्यासाठीं नाहीं, तर पैसे कमावण्यासाठीं. कमाईचा तो एक रस्ता आहे. अर्थात् भांडणें वाढविण्यांत वकीलांचा स्वार्थ आहे. माझ्या अनुभवाची गोष्ट आहे कीं भांडणें झालीं कीं वकीलांना मनांतून संतोष होतो. मुख्त्यार--सॉलिसिटर–हेही वकीलांचेच भाऊ. नसतील तेथून भांडणें उपस्थित करावयाचे. त्यांचे दलाल ठेवलेले असतात. ते जळवांप्रमाणें गरिबांना चिकटतात. आणि त्यांचें रक्त शोषून घेतात. हा धंदाच असल्या प्रकारचा आहे, कीं त्यांत माणसांना भांडणाची फूस मिळावी. वकील हे रिकाम्या न्हाव्यासारखे आहेत. आळशी माणसें ऐषआराम करण्यासाठीं वकील बनतात. खरी गोष्ट ही आहे. दुसरीं प्रमाणें कोणीं दिली तर त्या नसत्या सबबी आहेत "वकीलीचा धंदा हा फार अब्रूदार," हें तत्त्वही वकीलांनींच शोधून काढलें आहे कायदे करणारेही तेच, त्यांची स्तुति करणारे ही तेच, लोकांपासून पैसे किती घ्यावे हें ठरविणारेही तेच आणि इतर लोकांवर आपला दरारा बसविण्याकरितां अवडंबर असें करितात, कीं जसें काय हे आकाशांतून देवदूतच खालीं आले आहेत! मजुरांपेक्षां हे जास्त मजूरी काय म्हणून मागतात? यांच्या गरजा मजूरांहून कां ज्यास्त असाव्यात? मजूरांपेक्षां यांनीं देशाचें काय अधिक कल्याण केलें? कल्याण करणाऱ्याला अधिक पैसे घेण्याचा हक्क आहे का? जर पैशासाठीं त्यांनीं कल्याण केलें असेल, तर तें कल्याण कसें म्हणतां

येईल ? हें सर्व, त्या धंद्यांतील गूढ कोणतें आहे, हें सांगण्यासाठींच फक्त मी बोललों. वकीलांच्यामुळेंच हिंदुमुसलमानांतील कित्येक तंटे वाढले आहेत, हा ज्यांनीं अनुभव घेतला असेल त्यांना ठाऊक असेल. त्यांच्यापायीं कित्येक कुटुंबाची वाताहात झाली आहे. भावां-भावांमध्यें द्वेषाचें विष उत्पन्न झालें आहे, कित्येक संस्थानिक वकी-लांच्या जाळ्यांत सांपडून कर्जबाजारी बनले आहेत, कित्येक इनाम-दारांना वकीलांनीं लुटून खाल्लें. अशा प्रकारच्या गोष्टी कितीतरी सांगतां येतील.

---

## डॉक्टर.

जे विचार मी तुमच्यापुढें ह्या वेळीं मांडीत आहें, ते ह्या वेळीं तर माझे स्वतःचे आहेत. पण ते फक्त माझेच डोक्यांत आले आहेत असें नाहीं. पाश्चिमात्य सुधारकांनीं माझ्यापेक्षां फार कडक शब्दांनीं ह्या गोष्टी लिहिल्या आहेत. वकील डॉक्टरांची निंदा त्यांनीं फार केली आहे. त्यांच्यांतील एका लेखकानें एक झाड बनविलें आहे. त्याच्या फांद्या डॉक्टर, वकील वगैरे निरुपयोगी धंदेवाल्यांच्या केल्या आहेत. त्या झाडाच्या बुंध्यावर नीति-धर्मरूपी कुऱ्हाड उगारली आहे. अनीति हें ह्या सर्व धंद्यांचें मूळ आहे असें दाखविलें आहे. यावरून तुमच्या ध्यानात येईल, कीं ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगत आहें, त्या मीं माझ्या खिशां-तून नव्या काढून सांगत नाहीं. पण इतरांचा व त्याचेच बरोबर माझा अनुभव तुमच्या पुढें मांडीत आहें. आज जसे आपण सर्व डॉक्टर लोकांवर मोहित आहों तसाच मी ही एक वेळ मोहित होतों. एक काळ असा होता कीं, मी स्वतःच डॉक्टर बनणार होतों. आणि डॉक्टरीच्या साधनानें देशसेवा करण्याचा माझा विचार होता. पण आतां तो मोह गेला आहे. आपल्यांत वैद्याचा धंदा हा चांगला मानलेला नाहीं, त्याचें कारण मला समजलें आहे आणि त्या विचाराची किंमत मी ( आतां ) समजूं शकतों.

डॉक्टर लोकांनीं आपणाला अगदीं भंडावून सोडिलें आहे. डॉक्टर लोकांपेक्षां नाकाडोळ्याचे वैदू बरे, असें ह्मणण्याची पाळी आली आहे. आपण विचार करूं या

डॉक्टर लोकांचें काम फक्त शरीर संभाळण्याचें आहे. येवढें ही नाहीं—त्यांचें काम शरीरांत होणारे रोग दूर करण्याचें आहे. रोग कां होतात? आपल्याच गफलतीनें. मीं फार खाल्लें, मला अजीर्ण झालें, मी डॉक्टरपाशीं गेलों, त्यानें मला गोळी दिली, मी बरा झालों. पुन्हा खूप खाऊं लागलों आणि बरा होऊं लागलों. यांत खरोखर झालें आहे येवढेंच. जर मीं गोळी घेतली नसती, तर अजीर्णाची शिक्षा भोगीत राहिलों असतों आणि पुन्हां आधाशीपणा केला नसता. त्याच्या आड डॉक्टर आले. त्यांनीं अधाशीपणा करण्यास मदत केली. त्यांच्या मदतीमुळें माझ्या शरीराला आराम तर वाटला, पण माझें मन दुबळें झालें. असेंच चालू राहिलें म्हणजे माझ्या मनावर मी मुळींच ताबा ठेवूं शकणार नाहीं अशी स्थिति येणार.

मी भलत्याच छंदाला लागलों. आजारी पडलों. डॉक्टरांनीं औषध दिलें. बरा झालों. म्हणून मी पुनः हलकटपणा करणार नाहीं? करणारच. जर डॉक्टर लोक मध्यें आले नसते तर निसर्गानें आपलें काम केलें असतें, माझें मन दृढ झालें असतें आणि शेवटीं निर्व्यसनी बनून मी सुखी झालों असतों.

दवाखाने म्हणजे पापाचें मूळ आहे. त्यामुळें माणसें आपल्या शरीराची जतन करीत नाहींशीं होतात आणि अनीति वाढवितात.

युरोपांतील डॉक्टर लोक तर कमालच करून सोडतात. शरीराची खोटीच जतन करण्याकरितां दर वर्षीं लाखों प्राण्यांचा संहार करितात. जीवंत प्राण्यांची प्रयोगाच्या निमित्तानें चीरफाड ( Vivisection ) करीत असतात. असें करणें कोणत्याही धर्माला कबूल नाहीं. हिंदु, मुसलमान, खिस्ती, पारशी सर्व धर्म हेंच सांगतात कीं माणसाच्या शरीरासाठीं इतक्या जीवांना मारण्याची जरूरी नाहीं.

डॉक्टर लोक आपल्याला धर्मभ्रष्ट करितात. त्यांच्या बहुतेक औषधांतून चरबी किंवा दारु असतेच. त्यांतून एकही वस्तु हिंदु किंवा मुसलमानास चालण्यासारखी नाहीं. सुधारणेची फुशारकी मिरवून, पूर्वींच्या सगळ्या कल्पनांना मूर्खपणाच्या ठरवून, स्वच्छंदानें वाटेल तें करावयाचें असेल तर गोष्ट वेगळी; पण डॉक्टर लोक वरील गोष्टी करितात हें अगदीं खरें आहे.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, आपण कमकुवत आणि नामर्द बनत चाललों आहोंत. अशा स्थितींत लोकसेवा करण्याची लायकी आपल्या अंगांत

राहत नाहीं. आपण शरीरानें क्षीण, आणि बुद्धिनें हीन होत चाललों आहों. युरोपियन डॉक्टरी शिकणें हें आपली अधोगति करणारें आहे.

आपण डॉक्टर कां बनतों याचा आपण विचार केला पाहिजे. खरें कारण म्हणजे अब्रूचा आणि ( ज्यांत ) पुष्कळ पैसे मिळतील असा धंदा करावयाचा असतो. परोपकाराचा त्यांत कांहीं संबंध नाहीं. त्या धंद्यांत परोपकार नाहीं हें मी दाखविलेंच. त्यापासून लोकांचें नुकसान मात्र होतें. डॉक्टर लोक फक्त अवडंबर करून लोकांपासून खूब फी उकळतात आणि ज्या औषधाची खरी किंमत एक आणा असते तिचा रुपया घेतात ! अशा प्रकारें विश्वासावर आणि बरें होण्याच्या आशेवर लोक फसतात. अशा स्थितींत भलेपणाचा तोरा मिरविणारापेक्षां बोलून-चालून नाकडोळ्याचे वैदू बरे.

---

## यन्त्रें.

प्रश्नः—पाश्चिमात्य सुधारणेलाच हाकून लावण्याच्या तुमच्या ह्या गोष्टी चालल्या आहेत. तेव्हां तुह्मी असेंही ह्मणणार कीं, यन्त्रांची आपणाला जरूरी नाहीं.

उत्तरः—तुह्मी हा प्रश्न करून माझ्या मनाला जी जखम झाली होती, ती पुनः ताजी केली आहे. श्रीयुत रमेशचन्द्र दत्त यांनीं लिहिलेला ' हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास ' वाचला तेव्हां माझे मनांत जे विचार आले होते, त्यांची आठवण करायला लागलों कीं माझे हृदयाला पीळ पडतो. यंत्रांचा सपाटा लागला त्यावेळीं हिंदुस्थानची वाताहात झाली. मँचेस्टरनें आपलें जें नुकसान केलें आहे त्याला सीमा नाहीं. हिंदुस्थानांतून कारागिरीचा जवळ जवळ लोप झाला त्याचें कारण हें मँचेस्टरच.

पण मी चुकत आहें. मँचेस्टरला दोष कसा देतां येईल ? आपण त्यांचे कपडे वापरूं लागलों म्हणून ते लोक विणूं लागले. बंगाली लोकांच्या मर्दुमकीची गोष्ट ऐकली ( स्वदेशी चळवळीच्या वेळची )

त्यावेळीं मला हर्ष झाला. बंगाल्यांत कापडाच्या गिरण्या नाहींत. यामुळें त्या लोकांनीं आपला मूळचा धंदा पुनः सुरू केला. बंगाली लोक मुंबईच्या गिरण्यांना उत्तेजन देतात हें ठीकच आहे, पण त्यांनीं यन्त्रांवरच वहिष्कार घातला असता तर फारच चांगलें झालें असतें. यन्त्रें युरोपला उजाड करून टाकूं लागलीं आहेत. आणि त्याच वायूचे झटके हिंदुस्थानला वसूं लागले आहेत. यन्त्रें हें आधुनिक सुधारणांचें मुख्य चिन्ह आहे आणि तें महापाप आहे हें मला स्पष्ट दिसतें.

मुंबईच्या गिरण्यांतून जे मजूर काम करितात ते गुलाम बनलेले आहेत. ज्या बायका तेथें काम करतात त्यांची दशा पाहून कोणाला भडभडून येणार नाहीं ? गिरण्यांची सांथ सुरू झाली नव्हती त्या वेळीं कांहीं या बायका उपाशीं मरत होत्या असें नाहीं. जर ही सांथ वाढूं लागली तर हिंदुस्थानची फार दैना होणार आहे. माझ्या म्हणण्यांत कडकपणा आणि अतिशयोक्ति वाटेल. पण मला सांगितलें पाहिजे कीं आपण हिंदुस्थानांत गिरण्या वाढविण्यापेक्षां मँचेस्टरला पैसे पाठवून तेथील कुजकें कापड वापरणें हें अधिक बरें ! कारण कीं त्यांचें कापड वापरल्यानें आपला पैसाच जाईल. आपण हिंदुस्थानांत मँचेस्टर स्थापन केल्यानें आपला पैसा हिंदुस्थानांत राहील खरा परंतु तो पैसा आपलें रक्त घेईल ! कारण आपण नीतिभ्रष्ट होऊं. गिरण्यांतून काम करणाऱ्या माणसांची नीति कशी आहे हें त्यांनाच विचारून पहावें. गिरण्यांच्याच योगानें जे कोट्याधिश बनले त्यांची नीति इतरांपेक्षां चांगली असण्याचा संभव नाहीं. अमेरिकेंतील रॉकफेलर पेक्षां हिंदुस्थानांतील रॉकफेलराचा नंबर खालीं लागेल असें मानणें म्हणजे मूर्खपणाच होय. गरीब हिंदुस्थानाला मुक्तीची कांहीं आशा तरी आहे, पण अनीतीनें भरलेल्या श्रीमान् हिंदुस्थानाला मुक्त होण्याची आशा नको. पैसा माणसाला रंक वनवितो. असली दुसरी वस्तु ह्या जगांत विषयासक्ति ही आहे. पैसा आणि विषयासक्ति यांचा दंश सर्पदंशापेक्षांही भयंकर आहे. सर्पाचा दंश

देहाचा बळी घेऊनच शांत होतो. पैसा किंवा विषयासक्ति ह्यांचा दंश झाला म्हणजे देह, जीव, मन, सगळें गेलें तरी आपली सुटका होऊं शकत नाहीं. यासाठीं देशांत गिरण्यांची संख्या वाढली म्हणून आनंद मानण्याचें कांहीं कारण नाहीं.

प्रश्नः—तर काय असलेल्या गिरण्या आतां काढून टाकाव्यात ?

उत्तरः—ही गोष्ट कठीण आहे. स्थायी झालेल्या वस्तूला काढून लावणें हें कठीण आहे. या साठींच कार्याचा अनारंभ हें शहाणपणाचें पहिलें लक्षण गणलें आहे. गिरण्यांच्या मालकांकडे आपण तिरस्कार दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. त्यांची आपण कींव केली पाहिजे. एकाएकीं ते गिरण्या बंद करतील, हें शक्य नाहीं. पण आपण त्यांना त्यांचें साहस विशेष न वाढविण्याची विनंति करूं शकूं. त्यांनीं जर आपलें काम हळू हळू कमी करण्याचें योजिलें, तर त्यांची भलाई ! त्यांना स्वतः-नांच आपले जुने प्रौढ पवित्र ‘ रहाट ’ ( सूत काढण्याचे ) घरोघर स्थापन करतां येतील. लोकांनीं विणलेलें कापड घेऊन विकतां येईल. त्यांनीं असें केलें नाहीं तरी इतर लोकांनाहीं यन्त्रावर बनलेल्या वस्तु वापरणें बंद करतां येईल.

प्रश्नः—ही एक कापडाची गोष्ट झाली. पण यन्त्रानें बनणाऱ्या असंख्य वस्तु आहेत. त्या एक तर परदेशच्या घ्याव्या, किंवा आपल्या देशांत तसलीं यन्त्रें ठेवावींत.

उत्तरः—खरोखर आपल्या देवांच्या मूर्ति जर्मनींतील यन्त्रांतून बनून येत असवात. मग आगकाडी आणि टांचणीपासून कांचेच्या झुंबरापर्यं-तच्या हजारों वस्तूंची काय गोष्ट बोलावी ? माझें उत्तर एकच आहे. जेव्हां या सर्व वस्तु यन्त्रावर निघूं लागल्या नव्हत्या तेव्हां हिंदुस्थान काय करीत होतें ? तेंच आजही करील. जोंपर्यंत हातानें टांचणी बनवतां येणार नाहीं, तोंपर्यंत टांचणीशिवाय चालवूं. हंड्या झुंबरांना रजा देऊं. पणतींत तेल ओतून, आपल्या देशांत पिकलेल्या कापसाच्या वाती वळूं. असें केल्यानें डोळ्यांचा आणि पैशांचा बचाव होईल. आपण स्वदेशी राहूं-होऊं-; आणि स्वराज्याचा जयघोष करूं.

ही गोष्ट सर्व माणसें एकदम करूं लागतील अथवा एकाच वेळीं कित्येक माणसें सगळ्या यान्त्रिक वस्तु सोडून देतील हें अशक्य आहे. पण हा विचार जर खरा असेल तर आपण नेहमीं शोधांत राहूं. थोड्या थोडया वस्तु सोडून देऊं लागूं. तें पाहून इतर लोकही करूं लागतील. प्रथम हा विचार दृढमूल होण्याची जरूरी आहे.नंतर त्याप्रमाणें कार्य होऊं लागेल.* प्रथम एकच मनुष्य करील, नंतर दहा, नंतर शंभर, याप्रमाणें त्यांची संख्या वाढत जाईल. मोठे लोक जें करितात तें लहान करितात आणि करतील. पटली तर गोष्ट फार सोपी आणि लहानशी आहे; दुसरा करील तोंपर्यंत वाट पाहण्याची जरूरी नाहीं. आपल्याला बरोबर वाटली म्हणजे लागलीच करूं लागावें. समजून उमजून ही न करणारा दंभी समजला जातो.

प्रश्न—ट्रामगाडी आणि विजेचे दिवे यांचें काय ?

उत्तरः—हा प्रश्न तुह्मी फार उशीरां विचारला. त्यांत आतां कांहीं अर्थ राहिला नाहीं. आगगाडीनें जर आपलें नुकसान केलें आहे, तर ट्रामगाडी काय नाहीं करीत ? यंत्र म्हणजे सापाच्या विवरासारखें आहे. त्यांतून जसा एक सर्प बाहेर आला कीं आंतून दुसरा डोकावूं लागतो, त्याचप्रमाणें यन्त्र हें एकामागून दुसरें लागलेलेंच असतें. जेथें यन्त्रें तेथें मोठीं शहरें, जेथें मोठी शहरें तेथें ट्रामवे व आगगाडी. त्याच ठिकाणीं विजेच्या दिव्यांची जरूरी पडणार. इंग्लंडांतील खेड्यांतून-

* पाश्चात्य सुधारणेच्या या वेडगळ धांवपळींतच रहात असल्यामुळें कदाचित् सर्वच कलंकांपासून आपणाला मुक्त होतां येणार नाहीं. मी जेव्हां जेव्हां आगगाडींत किंवा मोटार मध्यें बसतों तेव्हां तेव्हां जो मार्ग मला सत्य वाटतो त्या मार्गापासून मी चळत आहें हा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. माझ्या विचारांपासून जे सामाजिक सिद्धांत निघतील त्यांना मी भीत नाहीं. उदाहरणार्थ इंग्लंडला जाणें हें वाईट आहे, आणि साउथ आफ्रिका व हिंदुस्तान यांच्याशीं आगबोटीनें दळण वळण ठेवणें हेंहि वाईटच आहे वगैरे. तुम्हांआम्हांला नाइलाजास्तव कदाचित् या गोष्टी कराव्याहि लागतील पण चांगलें कोणतें हें आपल्या मनांत निश्चित झालेलें असलें पाहिजे.

ही ट्रामगाडी व विजेचे दिवे नाहींत ही गोष्ट तुम्हाला ठाऊकच असेल. प्रामाणिक वैद्य आणि डॉक्टर तुम्हाला सांगतील कीं, जेथें आगगाडी आणि ट्रामगाडी वगैरे साधनें वाढलीं त्या ठिकाणीं लोकांच्या आरोग्याला क्षय लागलेला आहे. मला स्मरण आहे. कीं, एका शहरांत जेव्हां पैशाची चणचण पडली, तेव्हां ट्रामची, वकीलांची डॉक्टरांची, प्राप्ति कमी झाली आणि शहरांतील आरोग्य वाढलें !

यन्त्राचा गुण असा, मला एकही ठाऊक नाहीं; अवगुणांवर एक पुस्तक लिहूं शकेन

प्रश्नः—तुम्हा हें जें सर्व लिहिलें तें यन्त्रांच्या मदतीनेंच छापलें जाईल. आणि लोक वाचतील. हा गुण कीं अवगुण !

उत्तरः—विषानें विषाचा नाश झाल्याचें हें उदाहरण आहे. तो कांहीं यन्त्राचा गुण नव्हे. यन्त्र मरतां मरतां सांगून जातें कीं संभाळा, माझेपासून सावध रहा, माझेपासून तुम्हाला कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. इतकें जें सत्कार्य यन्त्रानें केलें असें म्हणतां येईल, तेंहीं जे यन्त्रांच्या जाळ्यांत सांपडले आहेत त्यांच्या पुरतेंच. ( छापलेलें वाचण्याची ज्यांना संवय आहे तेवढ्यांपुरतेंच. ) पण मुद्याची गोष्ट विसरूं नका. यन्त्र ही वस्तु वाईट आहे हा विचार मनांत दृढ ठसूंद्या. नंतर हळूहळू आपण त्याचें निर्मूलन करूं. असा सरळ रस्ता सृष्टीनें निर्माणच केला नाहीं, कीं ज्या वस्तूची अभिलाषा आपणाला उत्पन्न होईल, ती वस्तु तावडतोब प्राप्त व्हावी. यन्त्रावर जे आपण मधुर दृष्टीनें पाहतों तेच जरा कटु दृष्टीनें पाहूं लागलों म्हणजे त्यांचा नाश होणारच.

# खरी सुधारणा.

प्रश्नः—तुम्ही आगगाडी रद्द केलीत, वकीलांना नांवें ठेवलींत, डॉक्टरांनां गचांडी दिलीत, यन्त्रें येथून तेथून नुकसानकारक असें तुम्ही ठरविलेंत; मग आतां सुधारणा ती कशाला म्हणावयाची ?

उत्तरः—या प्रश्नाचें उत्तर कठीण नाहीं. माझी समजूत अशी आहे कीं हिंदुस्थाननें ज्या सुधारणेला जन्म दिला त्याच्या तोडीचें जगांत कांहींही नाहीं. जें बीज आपल्या वाडवडिलांनीं पेरिलें आहे त्याची बरोबरी करील अशी जगांत कोणतीही वस्तु नाहीं. रोमची धुळधाण उडाली, ग्रीस नामशेष झालें, फिरॉनची बादशाही रसातळास गेली, जपान पश्चिमेच्या पंज्यांत सांपडलें, चीनचें कांहीं सांगतां येणार नाहीं. तरी हिंदुस्थान मात्र पडलें झडलें असलें तरी तळाशीं मजबूत आहे.

जीं रोम आणि ग्रीस पतन पावलीं त्यांच्या पुस्तकांतून युरोपचे लोक शिकतात. त्यांच्या चुका आपण करणार नाहीं, अशी त्यांना घमेंड आहे. अशी त्यांची कंगाल स्थिति आहे. पण हिंदभूमि अचलित आहे. हेंच भूषण आहे. हिंदुस्थानवर असा आरोप आहे कीं तें इतकें जंगली आणि अज्ञान आहे कीं त्याच्या पासून कांहीं फेरफार करवून घेतांच येत नाहींत. पण हा आपला गुण आहे, दोष नाहीं. अनुभवानें जें आपणास खरें वाटलें तें आपण काय म्हणवून फिरवूं ? अक्कल देणारे पुष्कळ येतात जातात. तरी हिंदभूमि अजून स्थिर आहे. हीच तिची खुबी आहे. हेंच आमच्या नावेचें सुकाणूं आहे. सुधारणा म्हणजे ज्याच्यामुळें मनुष्य आपलें कर्तव्य बजावीत राहतो, तें आचरण. कर्तव्य बजावणें म्हणजे नीतीचें पालन करणें होय. नीतीचें पालन करणें म्हणजे आपल्या मनाला आणि इंद्रियांना वश राखणें होय. असें केल्यानें आपण आपल्याला ओळखूं शकतों. हीच सु म्हणजे चांगली धारणा म्हणजे स्थिति होय. त्याच्या विरुद्ध ती कुधारणा.

पुष्कळ इंग्रजी लेखकांनीं लिहिलें आहे कीं वरील व्याख्येप्रमाणें हिंदुस्थानला पाश्चात्य देशांपासून शिकण्यासारखें असें कांहींच नाहीं. हें म्हणणें बरोबर आहे. आपण पाहतों कीं मनुष्याच्या वृत्ति चंचल आहेत. त्याचें मन नेहमीं भटकणारें आहे. त्याच्या शरीराला जितकें अधिक द्यावें तितकें अधिक तें मागूं लागतें. अधिक दिलें तरी त्याला सुख वाटत नाहीं. भोग भोगल्यानें त्याची इच्छा उलटी वाढतच जाते. यामुळें पूर्वजांनीं मर्यादा घातल्या आहेत. पुष्कळ विचार करून ( त्यांनीं ) ठरविलें कीं सुखदुःख या मनाच्या कल्पना आहेत. श्रीमान् मनुष्य श्रीमंतीमुळें सुखी नाहीं व गरीब, गरिबीमुळें दुःखी नाहीं. श्रीमान् लोक दुःखी आढळतात, गरीब लोक सुखानें राहतानां आढळतात. कोट्यावधि माणसें तर गरीबच राहणार हें पाहून त्यांनीं भोगाची वासनाच सोडविली. हजारों वर्षांपूर्वी जो नांगर होता त्याचेवरच आपण निभवीत आलों. हजारों वर्षांपूर्वी जशा आपल्या झोंपड्या होत्या तशा आपण कायम राखल्या. हजारों वर्षांपासून जी आपली शिक्षणपद्धति होती तीच आपण कायम राखली. आपण नाशकारक चढाओढीच्या भरीस पडलों नाहीं. सगळे आपआपला धंदा करीत राहिले. त्यांत ते रीतीप्रमाणें पैसे घेत होते. आपल्याला यंत्रांचा वगैरे शोध करतां येत नव्हता असें कांहीं नाहीं. पण आपल्या पूर्वजांनीं पाहिलें कीं यन्त्र वगैरेच्या फंदांत माणसें पडलीं तर गुलामच बनतील आणि नीतीचा त्याग करतील. त्यांनीं विचारपूर्वक सांगितलें कीं आपल्या हातांपायांनीं होईल तेवढेंच करावें, हातांपायांचा उपयोग करण्यांतच खरें सुख आहे, आरोग्यही पण आहे.

त्यांनीं विचार केला कीं मोठमोठीं शहरें स्थापन करणें म्हणजे व्यर्थ भानगड आहे. त्यानें लोक सुखी होणार नाहींत. त्यांत 'सोनेरी टोळ्या' आणि 'सफेत गल्ल्या' उत्पन्न होतील. गरीब लोक लुटले जातील. यासाठीं लहान गावांतच त्यांनीं संतोष मानला.

त्यांनीं पाहिलें कीं राजे लोक आणि त्यांच्या तरवारी, यांपेक्षां नीतीचें बळ अधिक आहे. यासाठीं त्यांनीं राजांना नीतिमान् पुरुष, ऋषि किंवा फकीर यांच्यापेक्षां उरतत्या पायरीचे ठरविले. अशी ज्या राष्ट्रांतील समाजव्यवस्था आहे तें राष्ट्र इतरांना शिकवण्याला लायक आहे, इतरांपासून शिकण्याच्या लायकीचें नाहीं.

ह्या-आमच्या राष्ट्रांत अदालती होत्या, वकील होते, वैद्य होते. पण ते सर्व रीतीचे,—मर्यादित होते. सर्वांना माहीत होतें कीं हे धंदे कांहीं श्रेष्ठ धंदे नव्हत. शिवाय, वकील वैद्य वगैरे लोक समाजामध्यें लूट चालवीत नव्हते. ते लोकांचे आश्रित होते. लोकांना डोईजड होत नव्हते. न्यायही चांगला होत होता. अदालतींत जायचें नाहीं असा लोकांचा नियम होता. त्यांचा बुद्धिभेद करणारीं स्वार्थी माणसें नव्हतीं. इतकी घाण ही फक्त राजे--रजवाड्यांच्या आसपासच होती. जनसमाज त्या पासून निराळा राहून शेती करीत असे. त्याच्या जवळ खरें स्वराज्य होतें.

आणि जेथें चांडाळ सुधारणा पोहोंचलेली नाहीं तेथें हिंदुस्थान अझूनही तसेंच आहे. तुमचीं हीं नवीं ढोंगें त्यांना सांगूं लागलां तर ते हंसतील. त्यांच्यावर कोणी परकी लोक राज्य करीत नाहींत. कोणी करूं शकणार नाहींत.

ज्या लोकांच्या वतीनें (राष्ट्रीय सभा वगैरे ठिकाणीं) आपण बोलतों ते आपल्याला ओळखीत नाहींत. आपण त्यांना ओळखीत नाहीं. तुम्हाला, आणि ज्यांना देशाची कळकळ आहे त्या सर्वांना, माझी सल्ला आहे कीं ज्या ठिकाणीं रेल्वेचा कहर उसळला नाहीं, अशा भागांत रहावें आणि नंतर देशाची कळकळ शिकावी. आणि नंतर स्वराज्याच्या गोष्टी बोलाव्यात.

आतां तुमच्या लक्षांत आलें असेल कीं मी खरी सुधारणा कशाला म्हणतों. मीं ज्या स्थितीचें चित्र रेखाटलें तशी स्थिति हिंदुस्थानांत

ज्या ठिकाणीं असेल त्या ठिकाणीं फेरफार करूं पाहणाऱ्या मनुष्याला शत्रु समजा. तो मनुष्य पापी आहे.

प्रश्नः—तुम्ही म्हणतां तसेंच जर हिंदुस्थान असेल तर ठीकच आहे. पण ज्या देशांत हजारों बालविधवा आहेत, ज्या देशांत दोन वर्षांच्या मुलींचीं लग्नें होत आहेत, ज्या देशांतील मुलें बाराव्या वर्षींच घरसंसार करूं लागत आहेत, ज्या देशांत स्त्री एकाहून अधिक पति करीत आहे, ज्या देशांत नियोगाची चाल आहे, ज्या देशांत धर्माच्या नांवावर कुमारिका वेश्या बनत आहेत, आणि ज्या देशांत देवाच्या नांवावर रेड्यां बकऱ्यांचा वध होत आहे, तो देश हिंदुस्थानच. तरीहि तुम्ही म्हणतां तें सुधारणेचेंच लक्षण काय ?

उत्तरः—तुम्ही चुकत आहां. तुम्ही जे दोष दाखविले ते दोष आहेत. त्यांना कोणी सुधारणा म्हणत नाहीं. सुधारणा असतांना सुद्धां इतके दोष राहून गेले आहेत. ते दूर करण्याचे प्रयत्न नेहमीं झाले आहेत, होत राहतील. आपणांत जो नवीन जोम आला आहे, त्याचा उपयोग ते दोष दूर करण्याकडे आपण करूं शकूं.

मी तुम्हांला आधुनिक सुधारणेचीं जीं चिन्हें सांगितलीं, तीं त्या सुधारणेचे पक्षपातीहि स्वतः सांगतात. मीं हिंदुस्थानच्या ज्या सुधारणेचें—संस्कृतीचें—जसें वर्णन केलें तसेंच तिचें कैवारी वर्णन करतात. कोणत्याही देशांत कोणत्याही सुधारणेच्या अमलाखालीं सर्व माणसें संपूर्णता पावलीं नाहींत. हिंदी सुधारणेचा कल नीति दृढ करण्याकडे आहे, पश्चिमेकडील सुधारणेचें वळण अनीति दृढ करण्याकडे आहे. यामुळें तिला कुधारणा म्हटलें.

पश्चिमेकडील सुधारणा निरीश्वरी आहे, हिंदी सुधारणा सेश्वरी आहे.

हें ओळखून भारतभूमीच्या हितेच्छूंनीं बालक ज्याप्रमाणें आपल्या आईला बिलगून रहातें त्याप्रमाणें हिंदी सुधारणेला बिलगून राहिलें पाहिजे.

---

# शिक्षण.

( भडोच येथें ता. २१ व २२ आक्टोबर १९१७ रोजीं भरलेल्या गुजराथ शिक्षण परिषदेंत अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण. )

प्रिय बंधु भगिनींनो,

या परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन मला आपण सर्वांनीं उपकृत केलें आहे. हें स्थान शोभविण्याला लागणारी विद्वत्ता माझ्यांत नाहीं, हें मला ठाऊक आहे. देश-सेवेच्या इतर कार्यांत मी थोडासा भाग घेतों यामुळें कांहीं या स्थानीं बसण्याची योग्यता मला प्राप्त होत नाहीं, या गोष्टीची जाणिव मला आहे. माझी पात्रता एकाच गोष्टींत असूं शकेल; गुजराथी भाषेवरील प्रेमाच्या चढाओढींत पहिला नंबर मिळविल्यावांचून मला संतोष होणारच नाहीं, अशी माझा आत्मा मला साक्ष देत आहे. आणि या समजुतीनेंच मीं या जबाबदारीच्या स्थानाचा स्वीकार केला आहे. ज्या औदार्यानें आपण हें स्थान मला दिलें, त्याच औदार्यानें माझे दोषां-कडे आपण पाहूं नये, आणि आपल्या व माझ्या या कार्यांत पुरी मदत करावी अशी माझी विनंति आहे............

## शिक्षणाचें वाहन.

शिक्षणाच्या वाहनाचा विचार व निश्चय करणें हें आपलें पहिलें काम आहे. त्या वांचून इतर सर्व प्रयत्न जवळजवळ व्यर्थ होण्याचा संभव आहे. शिक्षणाच्या वाहनाचा निश्चय केल्यावांचून शिक्षण देत रहाणें हें पायाशिवाय इमारत उभारूं पहाण्यासारखें शेवटीं होईल.

या बाबतींत दोन भिन्न भिन्न मतें असल्याचें दिसून येतें. एक पक्ष म्हणतो कीं, शिक्षण मातृभाषेच्या द्वारें दिलें पाहिजे; दुसरा पक्ष म्हणतो कीं तें इंग्रजींतून दिलें पाहिजे. उभय पक्षांचे हेतु पवित्र आहेत. दोघेहि देशाचे हितचिंतक आहेत. पण फक्त पवित्र हेतुच कार्यसिद्धीला पुरेसे नाहींत. पवित्र हेतु अपवित्र स्थानीं पुष्कळ वेळां घेऊन जातात, असा जगाचा अनुभव आहे. यासाठीं आपण दोन्ही पक्षांतील गुणदोष तपासून पाहून शक्य तर एक पक्षाचा स्वीकार करून या महाप्रश्नाचा निर्णय केला पाहिजे. प्रश्न जर मोठा आहे तर त्याचा जितका विचार होईल तितका कमीच आहे.

---

१ ज्या भाषेंतून शिक्षण द्यावयाचें, ती भाषा.

हा प्रश्न सर्व भारतवर्षाचा आहे. पण प्रत्येक इलाखा अगर प्रांत स्वतःसाठींहि निश्चय करूं शकेल. हिंदुस्थानांतील सर्व भागांचें एक मन होईल तोंपर्यंत एकट्या गुजराथेला पुढें पाऊल टाकतां येणार नाहीं असें कांहीं नाहीं.

तथापि इतर प्रान्तांत कोणते प्रयत्न झाले आहेत, हें पाहिल्यानें आपल्याला कित्येक भानगडींचा उलगडा करितां येण्यासारखा आहे. बंगालची विभागणी झाली, त्यावेळीं स्वदेशीची लाट उसळली होती; तेव्हां तेथें बंगालींतून शिक्षण देण्याचा प्रयत्न झाला. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळाही स्थापन झाल्या. पैशांचा पाऊस पडला. पण हा प्रयोग निष्फळ झाला आहे. माझी नम्र समजूत आहे कीं व्यवस्थापकांची आपल्या प्रयोगावर श्रद्धा नव्हती. तशीच दयाजनक स्थिति शिक्षकांचीही होती. बंगाल्यांतील सुशिक्षित वर्गाला इंग्रजीचा फार मोह आहे. बंगाली साहित्याचा विकास झाला त्याचें कारण त्यांचें इंग्रजीवरील प्रभुत्व होय असेंही म्हणण्यांत येतें. वस्तुस्थिति हें म्हणणें खोटें ठरविते. सर रवींद्रनाथ टागोर यांचें चमत्कृतिजनक बंगाली त्यांच्या इंग्रजी ज्ञानामुळें तयार झालेलें नाहीं. त्यांच्या भाषेंतील चमत्कृति त्यांच्या स्वभाषाभिमानामुळें आलेली आहे. ‘गीतांजलि’ प्रथम बंगाली भाषेंतच लिहिली गेली. हा महाकवि बंगाल प्रांतात बंगाली भाषेचाच उपयोग करतो. थोड्या दिवसांपूर्वी हिंदुस्थानच्या सद्यःस्थिति संबंधीं कलकत्ता येथें त्यांनीं एक भाषण केलें होतें तें बंगाली भाषेंतच. हें भाषण ऐकावयास बंगाल्यांतील प्रमुख स्त्रीपुरुष गेले होते. श्रोत्यांनीं मला सांगितलें कीं दीड तास पर्यंत लावण्याच्या धारेनें त्यांनीं श्रोतृवर्गाला गार करून टाकलें, त्यांनीं आपले विचार इंग्रजी साहित्यांतून घेतले नाहींत. ते म्हणतात कीं, हे विचार मी या देशांतील वातावरणांतून घेतले. उपनिषदांचें दोहन करून काढिले. हिंदुस्थानच्या आकाशांतून त्यांच्यावर विचारवृष्टि झाली आहे. हीच स्थिति इतर बंगाली लेखकांचीही आहे अशी माझी समजूत आहे.

हिमालयाप्रमाणें प्रौढ दिसणारे महात्मा मुनशीरामजी हे हिंदींत भाषण करूं लागले म्हणजे मुलें, स्त्रिया सर्व, त्यांचें रसिक भाषण ऐकतात व समजूं शकतात. आपलें इंग्रजी, ते आपल्या इंग्रज मित्रांसाठीं राखून ठेवितात. इंग्रजी शब्दांचें भाषांतर करून बोलत नाहींत.

गृहस्थाश्रमी असूनहि ज्यांनीं देशाला स्वार्पण केलें आहे त्या माननीय मदन-मोहन मालवीयांचें इंग्रजी रुप्याप्रमाणें झळकतें असें म्हणतात. ते जें बोलतात त्याचा व्हाइसराय साहेबांस विचार करावा लागतो. त्यांच्या इंग्रजीची चमक जर चांदीसारखी आहे तर त्यांचा हिंदी स्रोत गंगेच्या प्रवाहाप्रमाणें आहे. आणि मानससरोवरांतून उगम पावणारी गंगा जशी सूर्याच्या किरणांमुळें सोन्यासारखी चकाकते तसा त्यांच्या हिंदी व्याख्यानाचा प्रवाह शुद्ध कांचनाप्रमाणें प्रकाशतो.

या तीन वक्त्यांची शक्ति त्यांच्या इंग्रजी ज्ञानानें आलेली नाहीं, पण स्वभाषेवरील त्यांच्या प्रेमामुळें उत्पन्न झाली आहे. स्वामी दयानंदांनीं हिन्दी भाषेची सेवा केली ती कांहीं इंग्रजी ज्ञानामुळें नव्हे. तुकाराम आणि रामदास यांनीं मराठी भाषा शोभविली त्यांत इंग्रजी भाषेचा वांटा मुळींच नाहीं. प्रेमानंद व शामळ यांनीं आणि अगदीं अलीकडे दलपतराम यांनीं गुजराथी साहित्याचा विकास केला त्याचें श्रेय इंग्रजी भाषेला मिळूं शकणार नाहीं.

वरील दृष्टांतावरून असें दिसून येतें कीं मातृभाषेचा विकास होण्यास इंग्रजी भाषेच्या ज्ञानापेक्षां मातृभाषेवरील प्रेमाची–श्रद्धेची–आवश्यकता आहे.

भाषेची वाढ कशी होते याचा विचार केल्यासहि हाच सिद्धांत निघतो. भाषा म्हणजे लोकांच्या स्वभावाचें प्रतिबिंब होय. दक्षिणआफ्रिकेंतील सिद्दी लोकांच्या भाषेचें ज्ञान ज्याला आहे त्याला त्यांच्या चालीरीतींचेंहि ज्ञान होऊं शकेल. गुण-कर्माप्रमाणें भाषा उत्पन्न होते. ज्या भाषेंत शौर्य, सत्य, दया इत्यादि गुण आढळणार नाहींत ती भाषा बोलणारांतहि वीर, दयावंत, सत्यवादी पुरुष होऊं शकणार नाहींत असें आपल्याला बिनधोकपणें म्हणतां येईल. अशा भाषेंत इतर भाषेंतून वीररसाचे किंवा दयेचे शब्द मारूनमुटकून आणिल्यानें त्या भाषेचा विस्तार होणार नाहीं; ती भाषा बोलणारे वीर बनणार नाहींत. पाणी दिल्यानें चढत नसतें, तर मूळचें अंगीं असतांहि त्यावर गंज चढला असेल तर तेवढा निघाला म्हणजे चमकूं लागतें.

आपण किती तरी दिवस गुलामगिरींतच काढिले असल्यामुळें फाजील विनय-सूचक शब्दांचा समूह आपल्या (गुजराथी) भाषेंत फार आढळतो. इंग्रजी भाषेंत नौके संबंधाचे जितके शब्द आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही भाषेंत आढळणें कठीण.

कोणा साहसी गुजराथ्यानें तसल्या पुस्तकांचें भाषांतर केलें म्हणून त्यानें आपल्या भाषेची वाढहि होणार नाहीं आणि आपण नौकेसंबंधाचें ज्ञानहि मिळवूं शकणार नाहीं. पण आपण जर गलबतें बनवूं लागलों आणि नौकासैन्येंहि उभारूं लागलों तर नौकापरिभाषा आपोआप उत्पन्न होईल. रेव्हरंड टेलर यांनीं हीच गोष्ट आपल्या व्याकरणांत लिहिली आहे. ते म्हणतातः—

" गुजराथी भाषा पूर्ण कीं अपूर्ण, हा वाद कधीं कधीं ऐकूं येतो. म्हण आहे कीं ' यथा राजा तथा प्रजा ' ' यथा गुरुः शिष्यः ' त्याच प्रमाणें असेंहि म्हणतां येईल कीं ' यथा भाषकस्तथा भाषा ' जसा बोलणारा तशी बोली ( भाषा ). सामळभटादि कवि आपले विविध विचार प्रकट करतांना गुजराथी अपूर्ण म्हणून कोठेंहि अडखळलेले दिसत नाहींत. पण नीट विचार करून नव्या जुन्या शब्दांची त्यांनीं अशा रीतीनें योजना केली कीं त्यांचें म्हणणें भाषेंत खपलें.

एका विषयांत मात्र सर्वच भाषा अपूर्ण आहेत. मनुष्याच्या मर्यादित बुद्धीला न समजणाऱ्या ईश्वराविषयींच्या गोष्टी बोलावयाच्या म्हटल्या म्हणजे सर्वत्र भाषा अपुर्ण आहेत. लोकांच्या मनांत विचार असतील त्याप्रमाणें ते भाषेंत उतरणार, हा सामान्य नियम आहे. जर लोक विवेकी तर त्यांची भाषाहि विवेकपूर्ण असावयाची; जर ते मूर्ख तर त्यांची भाषाहि त्यांच्याच सारखी. नाचतां न येणारा अंगण वांकडें ह्मणूं लागतो. भाषेचा दोष काढणारेहि कधीं कधीं यापैकींच असतात. ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा व इंग्रजी विद्या यांचें ज्ञान आहे त्यांना गुजराथी भाषा अपूर्ण वाटत असेल. कारण इंग्रजींतून भाषांतर करणें कठीण आहे. यांत दोष भाषेचा नाहीं, लोकांचा आहे. नवा शब्द, नवा विषय, भाषेचें कांहींसें नवें वळण लोकांपुढें आलें तर तें विचार करून समजून घेण्याचा अभ्यास लोकांना नाहीं. यासाठीं भाषणकर्ता अडखळतो. कारण वहिऱ्यापुढें गाण्याची छाती कशी व्हावी बरें ? आणि जोंपर्यंत लोक बरें वाईट, नवें जुनें ओळखून त्याची किंमत करीत नाहींत तोंपर्यंत लेखकाची विचारशक्ति कशी प्रफुल्लित व्हावी ?

इंग्रजी भाषेंतून भाषांतर करणारांपैकीं कित्येक जण असें समजतातसें दिसतें कीं, आम्ही मातेच्या दुधाबरोबरच गुजराथी भाषेचें ज्ञान मिळविलें आणि इंग्रजीहि शिकलों तेव्हां साक्षात् दुभाष्ये बनलों. गुजराथीचा अभ्यास कशाला करावयाचा !

पण परभाषा संपादन करण्याच्या श्रमापेक्षां स्वभाषेंत प्रावीण्य मिळविण्यास अधिक अभ्यास लागतो. शामळादि गुजराथी कवींच्या ग्रंथांत पहा, प्रत्येक ओळींत अभ्यासाचीं प्रमाणें दिसून येतात. प्रयत्न करण्यापूर्वी गुजराथी अपूर्ण भासेल, पण नंतर खरी पूर्ण वाटूं लागेल. प्रयत्न करणारा अपूर्ण असेल तर त्याची भाषाहि अपूर्ण; पण वापरणाराचे प्रयत्न संपूर्ण असतील तर भाषाहि संपूर्ण— नव्हे, अलंकारिकहि होईल. गुजराथी, आर्यकुलांतील कन्या, अनेक उत्कृष्ट भाषांची भगिनी, तिला कोण कधीं अधम म्हणेल ? ईश्वरा, तुझा अशीर्वाद तिला दे, युगान्तापर्यंत तिच्या वाणींतून सद्विद्या, सत्ज्ञान, व सद्धर्मांचा सुबोध निघो, आणि सृष्टीचा पिता, माता जो परमेश्वर त्याची स्तुति ऐकावयास मिळो.

असो. बंगाल्यांत बंगाली भाषेंतून सर्व शिक्षण देण्याचा प्रयत्न व्यर्थ झाला, त्याचें कारण भाषेची न्यूनता किंवा प्रयत्नाची अयोग्यता हें नव्हे; प्रयत्न करणारांची अयोग्यता किंवा अश्रद्धा म्हणतां येईल.

उत्तरेकडे हिंदी भाषेची वाढ होत आहे. तरी पण हिंदी भाषेला शिक्षणाचें वाहन करण्याचा सतत प्रयत्न मात्र फक्त आर्यसमाजीयांनींच केलेला आढळतो. गुरुकुलांत तो चालू आहे.

मद्रासेकडे देशी भाषांचे द्वारें शिक्षण देण्याची चळवळ चालू झाल्याला थोडींच वर्षें झालीं. तामीलपेक्षां तेलगु लोकांत जागृति विशेष आहे. तामील शिक्षितवर्गांवर इंग्रजीचा पगडा इतका बसला आहे कीं तामील भाषेंतच आपलें सर्व काम साधण्याइतका उत्साह त्यांचे अंगीं राहिला नाहीं. तेलगु भागांत इंग्रजीचा शिरकाव इतका झालेला नाहीं. यामुळें लोक मातृभाषेंत अधिक व्यवहार करितात. तेथें तेलगुमधून शिक्षण देण्याचीच केवळ नव्हे तर भाषावार प्रान्तरचना करण्याचीहि चळवळ सुरू झाली आहे. आणि त्यांचा प्रयासहि इतका दांडगा आहे कीं थोड्याच काळांत त्याचा अमल झालेला आपल्याला दिसेल. त्यांच्या कार्यप्रवाहांत खडक पुष्कळ आहेत, पण त्यांचा चुराडा उडविण्याची शक्ति तेथील पुढाऱ्यांचे अंगीं आहे, अशी माझ्यावर त्यांनीं छाप बसविली आहे.

महाराष्ट्रांतहि मराठींतून शिक्षण देण्याचा प्रयास चालू आहे. साधुचरित अध्यापक कर्वे हे या प्रयत्नाचे पुरस्कर्ते आहेत. भाई नाईक यांचेंहि तेंच साध्य

आहे. खासगी संस्थांनीं हें काम चालविलें आहे. अध्यापक विजापूरकर यांनीं महाप्रयत्नानें समर्थ विद्यालय काढिलें, कित्येक पाठ्य पुस्तकें लिहिण्याचें योजिलें. कित्येक पुस्तकें आतां छापलींहि आहेत. कित्येक लिहून तयार आहेत. त्या शाळेंतील शिक्षकांनीं अश्रद्धा तर कधीं दाखविलीच नाहीं. जर हें विद्यालय दुर्दैवानें बंद झालें नसतें तर आज मराठींतून शिक्षण देतां येईल किंवा नाहीं हा प्रश्नच राहिला नसता.

गुजराथेंतही मातृभाषेंतून शिक्षण देण्याची चळवळ झालेली आहे. रा. ब. हरगोविंददास कांटावाला यांनीं तिचें वर्णन केलें आहे. अध्यापक गज्जर आणि कै. दिवाणबहादूर मणिभाई जसभाई हे त्या विचाराचे पुरस्कर्ते ह्मटलें तरी चालेल. त्यांनीं पेरलेल्या बीजाचें पोषण आपण करावें किंवा नाहीं हा विचार आपणास करावयाचा आहे. मला तर वाटतें कीं त्यांत जितका विलंब होत आहे तितकें आपलें नुकसानच आहे.

इंग्रजी भाषेंतून शिक्षण घेण्यास कमींत कमी सोळा वर्षें लागतात. तेच विषय मातृभाषेंतून शिकविल्यास फार तर दहा वर्षें लागतील असा अभिप्राय पुष्कळ प्रौढ शिक्षकांनीं दिला आहे. हजारों विद्यार्थ्यांचीं सहा वर्षें वांचलीं ह्मणजे तितकीं हजार वर्षें देशाला मिळाल्यासारखें होईल.

परकीय भाषेंतून शिक्षण देण्यानें बुद्धीला बसणारा ताण असह्य आहे. हा ताण आपलींच मुलें सहन करूं शकतात. पण त्याचे दुष्परिणामहि त्यांना भोगावेच लागतात. व इतर कोणतेंहि बौद्धिक कार्य करण्यास ते असमर्थ होतात. यामुळें आपले ग्रॅज्युएट निःसत्व, निर्बल, निरुत्साही, रोगी व केवळ नकली ( अंध अनुकरण करणारे ) बनतात. शोधकशक्ति, विचारशक्ति, साहस, धैर्य, शौर्य, अभय वगैरे गुण क्षीण होतात. यामुळें नवीन योजना आपणास तयार करतां येत नाहींत, तयार केल्या तर त्या अमलांत आणतां येत नाहींत. वरील गुण ज्यांच्यांत आढळतात ते अकालीं मृत्युमुखीं पडतात. एका इंग्रजानें म्हटलें आहे कीं टिपकागद जशी लिहिण्यांत फाजिल पडलेली शाई किंवा डाग तेवढाच शोषून घेतो त्याचप्रमाणें युरोपखंडांतील लोकांचे आचरणांतील अतिशयता किंवा दोष तेवढाच युरोपाच्या बाहेरील लोक उचलून घेतात. ह्या म्हणण्यांत जेवढें सत्य

असेल तें कांहीं आशियाखंडाच्या स्वाभाविक अयोग्यतेमुळें उत्पन्न झालेलें नाहीं. याचें खरें कारण शिक्षणाचे वाहनाची अयोग्यता हेंच होय. दक्षिण आफ्रिकेंतील सिद्दी लोक साहसी, शरीरानें धिप्पाड व सच्छील आहेत. बालविवाहादि आपल्यां-तील दोष त्यांच्यांत नाहींत. तथापि जी स्थिति आपली, तीच त्यांचीहि आहे. त्यांना शिक्षण डच भाषेंतून दिलें जातें. तेहि आपल्याप्रमाणेंच त्या भाषेंत उत्तम प्रकारचें प्राविण्य मिळवितात. आणि शिक्षण पुरें झालें कीं, आपल्याप्रमाणेंच शक्तिहीन बनतात, आणि बहुधा नकलीहि बनतात. मूळ शक्तीचा त्यांच्यांतूनहि लोपच झालेला असतो. आपण इंग्रजी शिकलेलेच असल्यामुळें या नुकसानीची खरी कल्पना आपल्यास करितां येत नाहीं, पण जनसमूहावर आपण किती कमी परिणाम करूं शकलों आहोंत हें पाहिलें असतां कांहींशी कल्पना होण्यासारखी आहे. आपल्या शिक्षणाविषयीं आपले आईबाप कित्येक वेळां जे उद्गार काढतात ते खरोखर विचार करण्यासाखे असतात. आपण बोस आणि रॉय यांच्यावर अगदीं फिदा होऊन जात असतों. माझी खात्री आहे कीं आपण ५० वर्षेंपर्यंत जें शिक्षण मिळविलें तें जर मातृभाषेंतून मिळविलें असतें तर आपल्यांत इतके बोस व रॉय झाले असते कीं त्यांच्या अस्तित्वाचें आपल्याला आश्चर्य वाटलें नसतें. जपानचा उत्साह ज्या दिशेनें वाहत आहे ती दिशा योग्य आहे किंवा नाहीं हा विचार बाजूस ठेविला तर जपानचें साहस पाहून कोणीही तोंडांत बोटें घालील. त्यांनीं लोकजागृति आपल्या भाषेच्या द्वारेंच केली. यामुळें त्यांच्या प्रत्येक कार्यांत कांहीं नाविन्य दिसून येतें. ते शिक्षकांनाच शिकवूं लागले आहेत. टिप-कागदाची वर सांगितलेली उपमा खोटी असल्याचें त्यांनीं सिद्ध केलें. जनतेचें जीवन शिक्षणाच्या योगानें उसळ्या मारीत आहे आणि सारें जग जपानच्या पराक्रमाकडे विस्मयानें पहात आहे. परभाषें-तून शिक्षण घेण्याच्या पद्धतीपासून अपरंपार नुकसान झालें आहे. परभाषेमधून शिक्षण घेण्यानें मातेच्या दुधाबरोबर जे संस्कार आणि जे मधुर शब्द मिळालेले असतात त्यांच्यांत, आणि शाळेंतील शिक्षणांत जें अनुसंधान राहिलें पाहिजे तें राहूं शकत नाहीं. तें तोडणाऱ्याचा हेतु पवित्र असला तरी तो जनतेचा शत्रु होय. आणि अशा प्रकारचें शिक्षण घेणारे आपण, मातृ-द्रोह करित आहोंत. परभाषेंतून शिक्षण घेण्यानें होणारें नुकसान येथेंच थांबत नाहीं. शिक्षित वर्ग आणि सामान्य

लोक यांच्यामध्यें अंतर पडलें आहे. सामान्य लोकांना आपण ओळखीत नाहीं आणि सामान्य वर्ग आपल्याला ओळखीत नाहींसा झाला आहे. आपल्याला तर ते साहेब लोक समजतात. आपल्याला भितात, आपल्यावर विश्वास ठेवीत नाहींत; ही स्थिति जर अशीच चालेल तर 'सुशिक्षित वर्ग प्रजेचा प्रतिनिधि नाहीं,' हा लॉर्ड कर्झन यांनीं आपल्यावर केलेला आरोप खरा ठरण्याची वेळ येईल.

सुदैवानें सुशिक्षित लोक मूर्च्छेंतून जागे होतांना दिसत आहेत आणि सामान्य लोकांत मिसळतांना वरील दोषांचा साक्षात् अनुभव घेत आहेत. "आपल्यांत जो जोम आलेला आहे तो जनतेला कसा द्यावयाचा ? इंग्रजींत तर देतां येणार नाहीं. मातृभाषेंत देण्याची शक्ति फार कमी आहे, किंवा मुळींच नाहीं. आपले विचार स्वभाषेंत बोलावयाचे म्हणजे महासंकट पडतें" असे उद्गार माझ्या ऐकण्यांत नेहमीं येतात. हें अंतर पडल्यामुळें एकंदर राष्ट्राचें पाऊल पुढें पडूं शकत नाहीं. इंग्रजी शिक्षण देण्यांत मेकालेसाहेबांचा हेतु शुद्ध होता. आपल्या साहित्यासंबंधानें त्यांच्या मनांत तिरस्कार होता. या तिरस्काराची सांथ आपल्यालाहि बाधली आणि आपल्याला भान राहिलें नाहीं. 'गुरूपेक्षां चेला सवाई' अशीच आपली स्थिति झाली. पाश्चात्य संस्कृतीचा प्रचार आम्ही करावा अशी मेकॉले यांची इच्छा होती. त्यांची कल्पना अशी होती कीं आम्हांपैकीं कांहीं जण इंग्रजी शिकून आपलें चारित्र्य सुधारून जनसमूहाला नवीन वळण लावतील ( असें करणें योग्य होतें किंवा नाहीं हा विचार येथें अस्थानीं होय. आपण शिक्षणाच्या वाहनाचाच विचार येथें करीत आहोंत. ) आम्हीं तर इंग्रजीं शिक्षणानें धन-प्राप्ति होते हें पाहिलें तेव्हां तिलाच प्राधान्य दिलें. कित्येकांनीं देशाभिमानाचा परिपोष केला. अशा प्रकारें मेकॉले साहेबांचा मूळ विचार मागेंच राहून इंग्रजी भाषेचा प्रसार मात्र मेकॉले साहेबांच्या कल्पनेपेक्षांहि भलतीकडेच वाढला. आणि आपलें मात्र नुकसान झालें.

आपल्या हातांत सत्ता असती तर आपणाला तो दोष ताबडतोब आढळला असता. आपण स्वभाषेचा त्याग कधीं करूं शकलों नसतों. अधिकारी वर्गानेंहि केलेला नाहीं. पुष्कळांना कदाचित् ठाऊकही नसेल कीं कचेरीची भाषा गुजराथी ( देशी भाषा ) समजली जाते. सरकार कायदे देशी भाषांतूनहि तयार करतें. दर-

वारांमध्यें होणाऱ्या भाषणांचें भाषांतर त्याचवेळीं वाचण्यांत येतें. चलनी नोटांवर इंग्रजी बरोबरच देशी भाषांचेहि आंकडे असलेले दिसतात. मापणीदारांना शिकावें लागणारें गणित वगैरे फार कठीण असतें, पण तें काम इंग्रजींतून होत असतें तर महसूल खात्याचें काम भयंकर खर्चाचें झालें असतें, यासाठीं मापणीदारांसाठीं परिभाषा उत्पन्न केली आहे. त्यांत घेतलेले शब्द पाहिल्यास सानंदाश्चर्य वाटेल. आपल्या अंगीं भाषेविषयीं खरें प्रेम असेल तर आज तयार असणाऱ्या साधनांचा तरी उपयोग आज आपण करूं लागूं. वकील लोक जर आपलें काम देशी भाषेंत करूं लागले, तर अशीलांचा पुष्कळ पैसा वांचेल, त्यांना कायद्याचें जरूरी पुरतें ज्ञान मिळेल, आणि त्यांना आपल्या हक्काची जाणीव उत्पन्न होईल, दुभाष्याचा खर्च वांचेल. भाषेंत कायद्याचे शब्द प्रचलित होतील. असें करण्यांत वकील लोकांना थोडेसे श्रम करावे लागतील हें खरें. अशीलांना त्याच्यापासून कांहीं एक हानि होणार नाहीं अशी माझी खात्री आहे. देशी भाषेंत केलेल्या प्रतिपादनाचा परिणाम कमी होईल हें भय राखण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांना देशी भाषांचें ज्ञान अवश्य मानलेलें आहे. पण आपल्याला इंग्रजी संबंधानें जो मिथ्या मोह आहे त्यामुळेंच आपण त्यांना असलेलें देशी भाषेचें ज्ञान गंजूं देतों.

अशी एक शंका उपस्थित करण्यांत आली आहे कीं धनप्राप्तीसाठीं किंवा देशसेवेसाठीं इंग्रजीचा जो उपयोग झाला त्यांत कांहीं दोष नव्हता. ही शंका शिक्षणाच्या वाहनाचा विचार केला असतां खरी दिसत नाहीं. धनप्राप्तीसाठीं कांहीं लोक इंग्रजी शिकले, किंवा देशसेवा करण्यासाठीं शिकले तर त्यांना आपण वंदूं, पण म्हणून कांहीं इंग्रजी भाषेला शिक्षणाचें वाहन बनविणार नाहीं. वरील दोन मिषांनीं इंग्रजी भाषेनें वाहनाचें स्थान बळकावलें. कोणी म्हणतात ‘ इंग्रजी समजणारेच स्वदेशभक्त झाले आहेत. ’ थोडया कालापासून आपण कांहीं निराळेंच पहात आहोंत. तथापि इंग्रजीच्या बाजूचें हें प्रमाण कबूल केलें असतांही एवढें म्हणतां येईल कीं, देशी भाषांना संधिच मिळाली नाहीं. इंग्रेजी जाणणाऱ्यांचा स्वदेशाभिमान एकाद्या सांथीप्रमाणें सांसर्गिक ठरला नाहीं. खरा स्वदेशाभिमान व्यापक असला पाहिजे. असा एक आक्षेप घेण्यांत आला आहे कीं “ वरील प्रमाणें वाटेल तितकीं खरीं असलीं तरी आज अव्यवहार्य आहेत. इंग्रजीसाठीं इतर विषयांचे संबंधांत थोडेंही नुकसान होणें दुःखदायक आहे. इंग्रजी भाषेंत

प्राविण्य संपादन करण्यांतच पुष्कळसें मानसिक वल खर्च व्हावें हें फार अनिष्ट आहे. पण इंग्रजीच्या बाबतींतली आपली स्थिति लक्षांत घेतली असतां हा अनिष्ट परिणाम सहन करूनच मार्ग काढल्यावांचून गत्यंतर नाहीं." हे उद्गार एकाद्या साधारण लेखकाचे नाहींत. इंग्रजी भाषेच्या पुरस्कर्त्यांनें म्हणणें त्यानें फारच मधुर भाषेंत पुढें मांडिलें आहे. त्याला आपण मान दिला पाहिजे...........
सुदैवानें प्रस्तुत लेखकानें इंग्रजी व मातृभाषा या दोहोंमधूनही शिक्षण देण्याचे निरनिराळे प्रयत्न फक्त प्रयोगरूपानेंच पाहिले आहेत. दोहोंतील एका संबंधानेंहि कांहीं निश्चित अभिप्राय दिलेला नाहीं. यामुळें त्याच्या विचाराविरुद्ध बोलण्यांत मला संकोच वाटला तरी तो कांहींसा कमी वाटतो.

इंग्रजीच्या बाबतींतील आपल्या स्थिती संबंधानें आपण फाजिल बाऊ करीत असतों. ह्या विषयासंबंधाची चर्चा या परिषदेंत मोकळेपणें होऊं शकणार नाहीं माझ्या लक्ष्यांत आहे. राजकारणांत जे पडत नाहींत त्यांनाहि इतका विचा करितां येईल आणि तो बोलून दाखविणेंहि अयोग्य होणार नाहीं. तो हा की इंग्रजी संबंध हा केवळ हिंदुस्थानच्या हितासाठीं आहे. दुसऱ्या कोणंत्याहि कल्पनेनें त्याचें समर्थन करितां येण्यासारखें नाहीं. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर स्वामित्व गाजवावें हा विचार दोघांनाहि असह्य आहे, अनिष्ट आहे आणि उभयतांस हानिकारक आहे असें इंग्रजी राज्याधिकाऱ्यांनीं कबूल केलें आहे. जेथें परोपकाराच्या दृष्टीनेंच चर्चा चालली असेल तेथें ही गोष्ट सिद्धान्तवत् मानिली जाते, असें असल्यामुळें राजकर्ते व प्रजा यांच्या जर असें नजरेस आलें कीं इंग्रजींतून शिक्षण दिल्यानें समाजाच्या मानसिक बलाचा घात होतो तर क्षणभरहि न थांबतां शिक्षणाचें वाहन बदललें पाहिजे. असें करण्याच्या मार्गांत जीं जीं विघ्नें आडवीं येतील तीं तीं दूर करण्यांत आपला पुरुषार्थ आहे.

मातृभाषेंतून शिक्षण दिल्यानें इंग्रजीच्या ज्ञानाला विघ्न उत्पन्न होईल कीं काय याचा विचार करण्याची गरज आहे असें मला वाटत नाहीं. इंग्रजी भाषेंत सर्व सुशिक्षित हिंदी लोकांनीं पारंगत होण्याची जरूर नाहीं. इतकेंच नव्हे तर ही पारंगतता मिळविण्याची रुचि उत्पन्न करण्याचीहि कांहीं गरज नाहीं अशी माझी नम्र समजूत आहे. कित्येक हिंदी लोकांना इंग्रजी अवश्य शिकावें लागेल खरें. ( १ ) ज्यांच्या अंगीं भाषा शिकण्याची शक्ति आहे, तसें करण्यास पुरेसा वेळ

आहे आणि इंग्रजी भाषेंतून शिक्षण देण्याची इच्छा आहे, अथवा राज्यकर्त्यांबरोबर व्यवहार करितांना ज्यांना इंग्रजीची गरजच पडते असे देशाभिमानी लोक व ( २ ) ज्यांना इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचा उपयोग धनसंपादनार्थ करावयाचा असेल ते. ह्या दोन्ही प्रकारच्या इसमांना, इंग्रजी भाषेचें उत्तमोत्तम ज्ञान देण्यास मुळींच हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर तशी व्यवस्था केलीच पाहिजे. मात्र तो ऐच्छिक विषय म्हणून राखावा. या क्रमांत शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें जाईल. जर इंग्रजींतूनच शिक्षण न घेतां दुय्यम भाषा म्हणूनच तिचा अभ्यास होऊं लागला तर आज जी अवस्था संस्कृत, पार्शी वगैरे भाषांची आहे तीच इंग्रजीची होईल, असें भय कित्येकांस वाटतें. मला नम्रपणें सांगितलें पाहिजे कीं या म्हणण्यांत थोडा दोष आहे. पुष्कळ इंग्रज लोकांनीं आपली मातृभाषा जी इंग्रजी तिच्यांतूनच सर्व शिक्षण संपादन केलें असतांहि फ्रेंच वगैरे इतर भाषांमध्यें प्राविण्य संपादन केलेलें आहे. आणि आपल्या कार्यांत या भाषांचा ते उत्तम उपयोगही करूं शकतात. हिंदुस्थानांत असेहि हिंदी लोक आहेत कीं त्यांनीं शिक्षण इंग्रजींतून घेतलें असतांहि फ्रेंच वगैरे भाषांवरील त्यांचें प्रभुत्व सामान्य नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं इंग्रजी आपल्या योग्य स्थानीं गेली आणि मातृभाषांना त्यांची स्वाभाविक पदवी प्राप्त झाली म्हणजे आपलीं मनें जीं आज कोंडल्यासारखीं झालीं आहेत तीं कैदखान्यांतून मुक्त होतील. आणि सुशिक्षित, सुसंस्कृत असूनही तरतरीत राहिलेल्या डोक्याला इंग्रजी भाषेचें ज्ञान मिळविण्याचे श्रम फार वाटणार नाहींत. आणि माझी समजूत तर अशी आहे कीं त्या वेळेस शिकलेलें इंग्रजी, आजच्या इंग्रजीपेक्षां अधिक सुंदर असेल. आणि बुद्धीची तीव्रता कायम राहिलेली असल्यामुळें त्या भाषेचा उपयोगही जास्त करितां येईल. लाभालाभाच्या दृष्टीनें हा मार्ग सर्वार्थसाधक आहे असें दिसून येईल.

मातृभाषांतून आपण शिक्षण घेऊं लागलों म्हणजे आपल्या घरच्या माणसांशीं आपला संबंध कांहीं निराळ्याच प्रकारचा राहील. आज आपल्या स्त्रियांना आपण आपल्या खऱ्या भागिदारिणी बनवूं शकत नाहीं. त्यांना आपण काय चळवळी करीत आहोंत याची दाद नसते. आपल्या आईबापांना आपण काय शिकतों याचा पत्ता नसतो. आपण जर मातृभाषेंतून शिक्षण घेत असलों तर आपले धोबी, न्हावी, भंगी या सर्वांना सहजासहजीं शिक्षण देऊं शकूं. विलायतेंत न्हाव्या-

जवळून हजामत करवून घेत असतांना आपण राजकारणांतील गोष्टी बोलत असतों. येथें आपल्या कुटुंबांतहि तसें करतां येत नाहीं. याचें कारण आपल्या कुटुंबांतील मंडळी किंवा आपले न्हावी वगैरे अज्ञानी असतात हें नव्हे. ते इंग्रज-न्हाव्यां इतके तरी ज्ञानवान् असतातच. त्यांच्यापाशीं आपण महाभारत, रामायण, तीर्थक्षेत्रें वगैरे संबंधाच्या गोष्टी बोलतों. कारण समाजाचें शिक्षण त्या दिशेनें झालेलें आहे. पण शाळेंत शिकलेल्या गोष्टी घरीं पोहोंचूं शकत नाहींत. कारण इंग्रजींतून शिकलेलें, आपल्या कुटुंबांतील माणसांना आपण सांगूं शकत नाहीं.

आपल्या कायदे कौन्सिलांतील सर्व व्यवहार इंग्रजींत चालतो. पुष्कळ सभा व संस्था यांचीहि तीच स्थिति आहे. यामुळें कंजुष माणसांप्रमाणें विद्याधन पुरून टाकिल्यासारखें झालें आहे. कचेऱ्यांचीहि तीच अवस्था. न्यायाधीश नेहमीं उप-देशाचे शब्द सांगतात. तेथें आलेले लोक तो उपदेश ऐकण्यास तत्पर असतात. पण न्यायाधीशाच्या शेवटच्या शुष्क हुकुमाशिवाय त्यांना कांहीहि ज्ञान प्राप्त होत नाहीं. आपल्या वकीलांचें भाषणहि त्या विचाऱ्यांना समजत नाहीं. इंग्रजी शाळेंतून निघालेल्या डॉक्टर लोकांचीहि हीच दशा असते. रोग्यांना अवश्य असलेलें ज्ञान ते देऊं शकत नाहींत. शरीराच्या अवयवांचीं ( स्वभाषेंतील ) नांवेंहि विचाऱ्यांना माहीत नसतात. तेव्हां बहुधा औषध-चिठी लिहून देण्या-शिवाय रोग्यांशीं त्यांचा अधिक संबंधच नसतो. असें म्हणतात कीं " हिंदुस्थानांत पावसाळ्याचे दिवसांत शिखरांवरून पाण्याचे प्रचंड स्रोत पडतात ते अविचारानें आपण व्यर्थ घालवितों, सोन्यासारखें खत कीं ज्या पासून लाखों रुपयांचें उत्पन्न व्हावें त्यापासून अनंत रोग उत्पन्न करितों. त्याचप्रमाणें इंग्रजी शिकण्याच्या भारानें चिरडून गेल्यामुळें, व दीर्घ दृष्टीचा लोप झाल्यामुळें, समाजाला जें दिलें पाहिजे तें आपण देऊं शकत नाहीं. " ह्या वाक्यांत अतिशयोक्ति नाहीं. माझ्या तीव्र मनोभावनेचें तें दर्शक आहे. मातृभाषेचा जो अनादर आपण चालविला आहे त्याचें घोर प्रायश्चित्त आपणास घ्यावें लागेल. त्यामुळें समाजाचें आपण भयंकर नुकसान केलें आहे. आतां त्यांतून त्याला मुक्त करणें हें सुशिक्षित वर्गाचें पहिलें कर्तव्य आहे असें मला वाटतें. ............आपण मातृभाषेंतून शिक्षणहि घेणार नाहीं तर आपण काय दिवे लावूं तें दिसतेंच आहे. या प्रश्नाचा विचार करावा लागतो हीच खेदाची गोष्ट आहे................मातृभाषेंतून शिक्षण

देणें इष्ट असेल तर ती गोष्ट अमलांत आणण्यासाठीं कोणते उपाय योजावेत याचा विचार केला पाहिजे. मला सुचणारे उपाय जसेच्या तसेच लिहून टाकितों:—

( १ ) ज्यांना इंग्रजी येत असेल त्यांनीं परस्पर व्यवहारांत चुकूनहि इंग्रजी बोलूं नये.

( २ ) ज्यांना इंग्रजी व स्वभाषा या दोहोंचेंहि उत्तम ज्ञान असेल त्यांनीं इंग्रजींतील उत्तम पुस्तकें व विचार स्वभाषेंतून लोकांस द्यावेत.

( ३ ) शिक्षण संस्थांनीं निरानिराळ्या विषयांचीं पुस्तकें देशी भाषांतून तयार करावीं.

( ४ ) श्रीमान् लोकांनीं स्वभाषेंतून शिक्षण देणाऱ्या शाळा ठिकठिकाणीं स्थापन कराव्या.

( ५ ) वरील सर्व उपायांबरोबरच परिषदांनीं व शिक्षणसंस्थांनीं सरकारकडे अर्ज करावे कीं सर्व शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें पाहिजे. कचेरींत व कायदे-कौन्सिलांत सर्व व्यवहार देशी भाषांतूनच झाला पाहिजे. व प्रजेचें सर्व काम त्याच भाषेंत झालें पाहिजे. इंग्रजी जाणणारालाच आज चांगली नोकरी मिळते हा क्रम बंद होऊन नोकरांच्या लायकीप्रमाणें भाषाभेद न राखतां त्यांना पसंत केले पाहिजेत. स्वभाषेंतूनच त्यांना अवश्य लागणारें शिक्षण मिळेल अशा संस्था काढण्याविषयींहि अर्ज सरकारकडे गेले पाहिजेत.

वरील योजनेंत एक अडचण दिसेल. ती ही कीं कायदे कौन्सिलांत मराठी, सिंधी, गुजराथी कानडी वगैरे अनेक भाषा बोलणारे सभासद असतात. अडचण मोठी आहे खरी. तरी ती टाळतां येण्यासारखी आहे. तेलगू लोकांनीं हा प्रश्न हातीं घेतला आहे. आणि केव्हां तरी भाषावार प्रान्त–रचना व्हावी लागेल यांत शंका नाहीं. पण तसें होईपर्यंत सर्वांनीं एक तर हिंदी भाषेंत किंवा स्वभाषेंत बोलावें असा नियम केला म्हणजे झालें. ही सूचना आज हास्यजनक वाटेल तर त्यावद्दल क्षमा मागून एवढेंच सांगतों कीं **पुष्कळशा सूचना प्रथम दृष्टीला व सुरवातीला हास्यजनकच भासतात.** देशाच्या उन्नतीचा आधार, शिक्षण कोणत्या भाषेंतून द्यावें या प्रश्नाच्या अचूक व शुद्ध निर्णयावर आहे अशी माझी समजूत असल्यामुळें माझ्या सूचनेंत फार रहस्य आहे अशी

मला खात्री वाटते. मातृभाषेची किंमत वाढली, व तिला राज्यपद प्राप्त झालें म्हणजे आपल्या कल्पनेंत येत नाहीं अशा प्रकारची शक्ति तिच्यांत उदित होईल.

## राष्ट्रीय भाषा.

शिक्षण कोणत्या भाषेंतून द्यावें याचा ज्याप्रमाणें विचार करावा लागला त्याचप्रमाणें राष्ट्रीय भाषेसंबंधीही विचार करणें योग्य होईल. जर इंग्रजी ही राष्ट्रीय भाषा व्हावयाची असेल, तर तिला अवश्य तें स्थान प्राप्त झालें पाहिजे.

इंग्रजी ही राष्ट्रीय भाषा होऊं शकेल ? कित्येक विद्वान् स्वदेशाभिमानी म्हणतात कीं ती तशी झाली पाहिजे, असला प्रश्नच अज्ञान दशेचा सूचक आहे. इंग्रजी राष्ट्रीय भाषा झालेलीच आहे. आपल्या नामदार व्हाइसरॉय साहेबांनीं भाषण केलें आहे त्यांत त्यांनीं फक्त तशी आशाच दाखविली आहे. उत्साहाच्या भरांत ते वरील पायरीपर्यंत गेले नाहींत. व्हाइसरॉयसाहेबांना वाटतें कीं इंग्रजी भाषा दिवसें दिवस या देशांत विस्तार पावेल. आपल्या कुटुंबांतून तिचा प्रवेश होईल आणि राष्ट्रभाषेची उच्च पदवी तिला मिळेल. आज वरवर विचार करतां या विचाराला दुजोरा मिळण्यासारखा आहे. आपल्या सुशिक्षित वर्गाची दशा पाहिली म्हणजे इंग्रजीवांचून आपल्या कारभाराला अडथळा येईल असा आभास होतो असें असतांहीं थोडासा खोल विचार केल्यास समजून येईल कीं इंग्रजी ही राष्ट्रीय भाषा होऊं शकणार नाहीं, होतां कामा नये.

## राष्ट्रीय भाषेचीं लक्षणें.

( १ ) ती भाषा अधिकारी वर्गाला शिकण्यास सोपी असली पाहिजे.

( २ ) त्या भाषेमधून भारतवर्षाचा परस्पर, धार्मिक आर्थिक आणि राजकारणविषयक व्यवहार चालूं शकला पाहिजे.

( ३ ) ती भाषा भारतवर्षांतील पुष्कळ लोक बोलत असले पाहिजेत.

( ४ ) ती भाषा राष्ट्राला सोपी असली पाहिजे.

( ५ ) त्या भाषेचा विचार करतांना क्षणिक अथवा अल्पस्थायी स्थितीवर विशेष जोर देतां कामा नये.

इंग्रजी भाषेंत यांपैकीं एकही लक्षण नाहीं. पहिलें लक्षण खरोखर शेवटीं घातलें पाहिजे होतें परंतु मी तें पहिल्यानें घातलें आहे. कारण, तें लक्षण इंग्रजी भाषेंत आहे असा भास होतो. विशेष विचार केल्यास आपल्यास दिसून येईल कीं हल्लींहि अधिकारी वर्गाला ती भाषा सोपी नाहीं ! येथील राज्यव्यवस्थेची रचना अशी आहे कीं इंग्रजी वर्ग ( उत्तरोत्तर ) कमी व्हावयाचा. तो येथपर्यंत कीं शेवटीं व्हाइसरॉय व दुसरे हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखेच तेवढे इंग्रज रहातील. मोठी संख्या आज हिंदीच आहे आणि ती वाढतच जाईल. इतक्या लोकांना भारतवर्षांतील कुठल्याही भाषेपेक्षां इंग्रजी भाषा कठीण आहे एवढें तरी सर्व कबूल करतील. दुसऱ्या लक्षणाचा विचार केला असतां आपणांस दिसून येतें कीं जन-समाज इंग्रजी भाषा बोलूं लागेल हें जेथपर्यंत शक्य नाहीं तोंपर्यंत आपला धार्मिक व्यवहार इंग्रजींतून चालणारच नाहीं. आणि इंग्रजी भाषेचा प्रसार इतका होईल हें अशक्यच दिसतें. तिसरें लक्षण इंग्रजी भाषेंत असणेंच शक्य नाहीं. कारण भारत-वर्षांतील बहुजनसमाजाची ती भाषा नाहीं. चवथें लक्षणही इंग्रजी भाषेंत नाहीं. कारण सर्व राष्ट्राला ती भाषा तुलनेनें पहातां सोपी नाहीं. पांचव्या लक्षणाचा विचार करतां असें दिसतें कीं, इंग्रजी भाषेचें आजचें महत्व क्षणिक आहे. चिर-स्थायी स्थिति तर अशी आहे कीं हिंदी लोकांच्या राष्ट्रीय कार्यांत इंग्रजी भाषेची थोडीच जरूर पडेल. इंग्रजी साम्राज्याच्या व्यवहारांत मात्र तिची जरूर पडणार खरी. साम्राज्याच्या राजकीय व्यवहाराची ती भाषा असेल हा प्रश्न वेगळा. त्या व्यवहारासाठीं इंग्रजीची जरूर लागेल. आपल्या मनांत इंग्रजी भाषेविषयीं द्वेष मुळींच नाहीं. मात्र आपल्या योग्य मर्यादेबाहेर तिनें जाऊं नये एवढाच आमचा आग्रह आहे. साम्राज्याची भाषा इंग्रजी असेल आणि म्हणून आमच्या मालवीयांना, शास्त्र्यांना, बानर्जींना ती शिकण्यास आम्हीं भाग पाडूं आणि ते भारतवर्षाची कीर्ति इतर देशांत गाजवितील अशी खात्री बाळगूं. पण राष्ट्राची भाषा इंग्रजी नसणार ! इंग्रजीला राष्ट्रीय भाषा बनविणें म्हणजे 'एस्परेंटो' च सुरू केल्यासारखें होईल. इंग्रजी भाषा ही राष्ट्रीय भाषा होईल ही कल्पनाच आपल्या कमकुवतपणाची द्योतक आहे. ' एस्परेंटो ' चा खटाटोप करणें म्हणजे केवळ अज्ञान आहे. तर मग कोणती भाषा या पांच लक्षणांनीं संपन्न आहे ? हिंदी भाषेंत हीं सर्व लक्षणें आहेत असें कबूल केल्याशिवाय चालणारच नाहीं.

मी जिला हिंदी भाषा म्हणतों ती उत्तर हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान दोघेही बोलतात. आणि देवनागरी अथवा उर्दू लिपींत लिहितात. या व्याख्येला कित्येकजण विरोध करतांना दिसतात.

कित्येकांचा आक्षेप असा आहे कीं **हिंदी व उर्दू** या निरनिराळ्या भाषा आहेत. हा आक्षेप खरा नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत, हिंदू व मुसलमान दोघेही एकच भाषा बोलतात. भेद सुशिक्षित वर्गानें पाडला आहे. सुशिक्षित हिंदु लोकांनीं हिंदी भाषेला संस्कृतमय करून टाकलें आहे. यामुळें कित्येक मुसलमानांना ती समजत नाहीं. लखनौ येथील मुसलमानबंधू फारसीमय उर्दू बोलून ती हिंदूंना समजणार नाहीं अशी करून सोडतात. या दोन्ही परिभाषा आहेत. सामान्य लोकांत त्यांना कोठेंही स्थान नाहीं. मी उत्तर हिंदुस्थानांत राहिलों आहे. हिंदुमुसलमानांत खूप मिसळलों आहे. आणि माझें हिंदी भाषेचें ज्ञान अगदींच तुटपुंजें असूनही त्यांच्याशीं व्यवहार करतांना मला मुळींच अडचण भासलेली नाहा. जी भाषा उत्तरभागांत जनसमाज बोलतो, तिला उर्दू म्हणा कीं हिंदी म्हणा—ती एकच आहे. उर्दू लिपींत लिहिली कीं ती उर्दू झाली ! तींच वाक्यें नागरी लिपींत लिहिलीं कीं ती हिंदी झाली !

आतां राहिला लिपींचा झगडा ! तूर्त मुसलमान मुलगे उर्दू लिपींतच लिहितील व हिंदू बहुधा देवनागरी लिपींत लिहितील. मी ‘ बहुधा ’ एवढ्यासाठींच म्हणतों कीं हजारों हिंदू आजही आपली स्वतःची हिंदी भाषा उर्दू लिपींतच लिहितात. कित्येकांना तर नागरी लिपी येतही नाहीं. शेवटीं जेव्हां हिंदू व मुसलमान यांच्यामधील साशंकवृत्ति अगदीं नाहींशी होईल, अविश्वासाचीं सगळीं कारणें दूर होतील, त्या वेळीं ज्या लिपींत जोर राहील तिच्यांतच बहुधा लिहिण्याचें काम चालेल. आणि ती राष्ट्रीय लिपी होईल. तोंपर्यंत हिंदू आणि मुसलमान ज्यांना उर्दू लिपींत अर्ज लिहावयाचे असतील त्यांना तसें करण्यास हरकत पडूं नये.

सदरील पंचलक्षणांनीं युक्त असलेली हिंदीशिवाय दुसरी भाषा नाहीं. दुसरा नंबर बंगाली भाषेचा लागतो. तथापि बंगबंधूही बंगाल प्रांताच्या बाहेर हिंदीचाच उपयोग करितात. हिंदी भाषा बोलणारे तर जेथें जातील तेथें हिंदीच बोलत असतात. तरी त्याचें कोणाला आश्चर्य वाटत नाहीं. हिंदी धर्मप्रचारक, उर्दू

मौलवी–सर्व हिंदुस्थानभर आपलीं व्याख्यानें हिंदींतच देतात, व अशिक्षितांनाही ती समजते. खेडवळ गुजराथीही उत्तर हिंदुस्थानांत जाऊन थोडेंथोडें हिंदी बोलतो पण उत्तरेकडील भय्या मुंबईच्या शेठजींची दरवानगी करीत असूनही गुजराथी बोलण्याचें नाकारतो आणि शेटजी भय्याबरोबर मोडकें तोडकें हिंदीच चालवतात. मी पाहिलें आहे कीं थेट द्राविड प्रांतांतही हिंदीचा ध्वनि ऐकूं येतो. "मद्रासेंत तर सर्व व्यवहार इंग्रजींतून चालतो" हें म्हणणें बरोबर नाहीं. तेथेंही मी आपला व्यवहार हिंदींतच चालविला आहे. शेंकडों मद्रासी प्रवाशांना इतरां बरोबर हिंदींत बोलतांना मी पाहिलें आहे. शिवाय मद्रासच्या मुसलमान बंधूंना तर हिंदी चांगलेंच येतें. सर्व हिंदुस्थानांतील मुसलमान लोक उर्दू भाषा बोलतात हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. आणि कोणत्याहीं प्रांतांत काय त्यांची संख्या लहानसहान नाहीं.

अशा रीतीनें हिंदी भाषा ही राष्ट्रीय भाषा होऊन चुकली आहे. राष्ट्रभाषा म्हणून तिचा उपयोग आपण किती तरी वर्षांपूर्वींच केला आहे. आणि हिंदी भाषेच्या या शक्तीमुळेंच उर्दू भाषेची उत्पत्ति झाली आहे.

मुसलमानी बादशहांना फारसी किंवा आरबी ही राष्ट्रीय भाषा करतां आली नाहीं. त्यांनीं हिंदी भाषेचें व्याकरण कबूल केलें आणि उर्दू लिपी वापरून फारसी शब्दांचा उपयोग ते विशेष करूं लागले. पण जनसमाजाबरोबर व्यवहार परदेशी भाषेंतून त्यांना करतां आला नाहीं. इंग्रज राज्यकर्ते ही गोष्ट ओळखीत नाहींत असें नाहीं. लष्करी लोकांची ज्यांना थोडीबहुत माहिती आहे त्यांना ठाऊक आहे कीं लष्करासाठीं कवाइतीची भाषा हिंदी किंवा उर्दू राखावी लागते.

अशा रीतीनें हिंदीच राष्ट्रीय भाषा होऊं शकेल असें आपल्याला दिसून येतें तरी पण मद्रास प्रांतांतील सुशिक्षित लोकांपुढें हा प्रश्न कांहींसा बिकट आहे खरा.

मराठी, गुजराथी, सिंधी व बंगाली लोकांना तर हिंदी भाषा ही फारच सोपी आहे. थोड्याच महिन्यांत हिंदीवर चांगलें प्रभुत्व संपादन करून राष्ट्रीय कार्यें, ते त्या भाषेंत चालवूं शकतील. तामील बंधूंना ही गोष्ट तितकी सोपी नाहीं. तामील वगैरे द्राविड शाखेंतील भाषा आहेत. आणि त्यांची रचना आणि त्यांचें व्याकरण, संस्कृतहून कांहींसें निराळें आहे. कित्येक शब्द मात्र सारखे आहेत. याशिवाय

आर्यभाषा व द्राविडभाषा यांच्यांत कांहीं साम्य नाहीं. पण ही अडचणही फक्त हल्लींच्या सुशिक्षित वर्गाला नडते. आपल्या उत्कट स्वदेशाभिमानाच्या जोरावर व प्रयत्नांतीं ते हिंदी भाषा सुसाध्य करितील, अशी आशा करण्याचा आपल्याला हक्क आहे. भविष्य काळीं, हिंदी भाषेला तिचें योग्य स्थान प्राप्त झाल्यावर, प्रत्येक मद्रासी शाळेंत हिंदीचा प्रवेश होईल. व इतर प्रांतांशीं मद्रासचा परिचय वाढेल हें साहजिक आहे. द्राविड प्रांतांतील बहुजनसमाजांत इंग्रजीचा प्रवेश झालेला नाहीं. पण हिंदीचा प्रवेश होण्यास वेळ लागेल असें नाहीं. अशा प्रकारचा प्रयत्न तेलगू लोक तर आजही करीत आहेत. जर ही परिषद् राष्ट्रीयभाषा कोणती झाली पाहिजे याविषयीं एकमतानें कांही निश्चय करूं शकली तर हें कार्य साधण्याचे उपाय योजण्याची आवश्यकता भासेल. मातृभाषेसंबंधानें जे उपाय सुचविले तेच उपाय जरूर ते फेरफार करून, राष्ट्रभाषेसंबंधानें योजतां येतील. विशेष सांगावयाचें ह्मणजे, मातृभाषेंतून शिक्षण देण्यासाठीं जो प्रयत्न करावयाचा तो मुख्यतः आपल्यालाच केला पाहिजे. पण राष्ट्रीय भाषेच्या चळवळींत सर्व भारतवर्षाचें साहाय्य आपल्याला मिळेल.

## शिक्षणाचे विषय.

आपल्या शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत न्यूनता आहे कीं नाहीं या संबंधानें मतभेद नाहीं. अधिकारी वर्ग आणि प्रजेंतील पुढारी वर्ग—सर्वच चालू पद्धतीला नांवें ठेवितात. ग्राह्य कोणतें व त्याज्य कोणतें याविषयीं मात्र पुष्कळ मतभेद आहे. या सर्व मतांची चर्चा करण्या इतकें माझें ज्ञान नाहीं. विचारांतीं मीं जे सिद्धांत ठरविले आहेत ते या परिषदेपुढें मांडण्याचें साहस करीत आहें.

शिक्षण हें माझें काम ( क्षेत्र ) आहे असें म्हणतां येणार नाहीं. यासाठीं तद्विषयक कांहीं सांगण्यास मला संकोच वाटतो. अनधिकारी स्त्री काय, पुरुष काय, आपल्या अधिकारा बाहेरील गोष्टी बोलूं लागला म्हणजे मी त्याचें खंडण करावयास तयार होतों व अगदीं अधीर बनून जातों. एखादा वैद्य वकीलीच्या गोष्टी सांगूं लागला म्हणजे वकिलाला राग यावा हें योग्यच आहे. त्याचप्रमाणें शिक्षणाचा ज्याला कांहीं अनुभव नाहीं, त्याला त्यासंबंधीं टीका करण्याचा अधिकार नाहीं, अशी माझी समजूत आहे. यासाठीं माझ्या अधिकारासंबंधानें दोन शब्द सांगणें मला भाग आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी आधुनिक शिक्षणावर मी विचार करूं लागलों. माझीं स्वतःचीं व माझ्या भावांबहिणींचीं मुलें माझ्या देखरेखीखालीं होतीं. आपल्या शाळेंतील दोष माझ्या लक्षांत आलेले होते. यामुळें माझ्या मुलांवर मीं प्रयोग सुरू केले. यामध्यें त्यांची फार आबळणा झाली. एकाला एकीकडे तर दुसऱ्याला दुसरीकडे पाठविल्यानें त्यांची पांगापांग झाली. मी स्वतःही कित्येकांना शिकविलें. मी दक्षिण आफ्रिकेंत गेलों. तेथेंही माझा असंतोष कायम राहिला इतकेंच नव्हे तर मला विशेष विचार करावा लागला. तेथें " हिंदी शिक्षणसमाजा " चें कार्य बराच काळपर्यंत माझ्याच हातीं होतें. माझ्या मुलांचें शिक्षण शाळांतून झालेलें नाहीं. माझ्या वडील मुलानें माझ्या निरनिराळ्या अवस्था पाहिलेल्या आहेत. माझ्यासंबंधानें त्याला निराशा उत्पन्न झाली. आणि थोडेसे दिवस अमदावाद येथील शाळेंत तो शिकला. त्यापासून आपल्याला फायदा झाला असें त्याला वाटलें नाहीं. ज्यांना मी शाळेंत घातलें नाहीं त्यांचें नुकसानही झालें नाहीं. आणि त्यांना उत्तम शिक्षण मिळालें आहे अशी माझी समजूत आहे. त्यांतील दोष मला दिसतात. पण त्याचें कारण एवढेंच कीं माझ्या प्रयोगाच्या सुरुवातीलाच ते सांपडले. यामुळें सर्व प्रयोगांचीं संकलना एकच असली तरी त्यांत वारंवार होणाऱ्या फेरफारांना ते बळी पडले. सत्याग्रहाच्या वेळीं, दक्षिण आफ्रिकेंत, माझ्या हाताखालीं जवळजवळ पन्नास मुलें एक वेळ शिकत होतीं. त्या शाळेची रचना मुख्यत्वेंकरून मींच केली होती. इतर शाळांशीं किंवा सरकारच्या धोरणाशीं तिचा संबंध नव्हता. येथेंही असाच उद्योग चालू आहे. आणि अध्यापक ( प्रोफेसर ) ध्रुव आणि इतर सुशिक्षित लोक यांच्या आशीर्वादानें एक राष्ट्रीय शाळा साबरमती येथें मीं स्थापन केली आहे. त्याला पांच महिने झाले. गुजराथ कॉलेजांतील माजी अध्यापक सांकळचंद शाह हे त्यांत मुख्य आहेत. प्रोफेसर गज्जर यांच्या हाताखालीं त्यांनीं शिक्षण घेतलें आहे. आणि त्यांच्याबरोबर दुसरेही प्रेमळ गृहस्थ आहेत. या शाळेच्या संघटनेंतील योजना मुख्यत्वें करून मीच केलेली आहे. पण इतर शिक्षकांचीही त्याला संमति आहे आणि आपल्या गरजा भागतील एवढेंच वेतन घेऊन या कार्याला त्यांनीं आपलें आयुष्य अर्पण केलें आहे. परिस्थितीमुळें या शाळेंत शिक्षणाचें कार्य मला करतां येत नाहीं. पण माझें मन या कार्यांत नेहेमीं गुंतून राहिलेलें असतें. ही माझी कल्पना घरगुती अनुभवाच्या

पायावरच रचलेली आहे. तथापि अगदींच विचाररहित नाहीं असें वाटतें. तेव्हां या गोष्टी ध्यानांत ठेवूनच माझ्या टीकेसंबंधी विचार कराल अशी आशा आहे.

आधुनिक शिक्षणांत आपल्या कुटुंबव्यवस्थेकडे लक्ष दिलेलें नाहीं असें मला वाटत राहिलेलें आहे. या शिक्षणाची रचना करतांना आपल्या गरजांचा विचार करण्यांत आला नव्हता हें स्वाभाविक होतें. मेकॉले साहेबांनीं आपल्या साहित्याची हेटाळणी केली. आम्हांला मूर्खांत काढलें; योजकांपैकीं पुष्कळांना आपल्या धर्मा· विषयीं गाढ अज्ञान होतें. कित्येकांना तो अधर्मच वाटला. आपले धर्मग्रंथ खुळचट समजुतींनीं भरलेले आहेत असें वाटलें. आपली संस्कृति त्यांना सदोष दिसली. आपलें राष्ट्र पतित, तेव्हां आपल्या सर्व गोष्टी सदोष असें त्यांना दिसूं लागलें. यामुळे सद्बुद्धीनें चुकीचा क्रम रचला गेला. नवी रचना करावयाची असल्यामुळें योजकांनीं जवळच्याच स्थितीचा विचार केला. राज्यकर्त्यांना मदत करण्यासाठीं वकील, डॉक्टर मास्तर लागतील, आपणां सर्वांना नवीन ज्ञानाची जरूर पडेल या विचारानें सर्व रचना निश्चित केली गेली. यामुळें आपल्या संस्कृतीचा विचार न करतांच सर्व योजना झाली. इंग्रजी म्हणीचें भाषांतर करणें झाल्यास घोड्यापुढें गाडी जोडली गेली.

मलबारी साहेबांचें असें म्हणणें होतें कीं इतिहास भूगोल शिकविणें झाल्यास तो प्रथम मुलांच्या घरचा शिकविला पाहिजे. मला आठवण आहे कीं माझ्या नशिबीं, इंग्लंड देशांतील काउंटी घोकण्याचें पहिल्यानें आलें होतें. जो विषय फार रसिक आहे तो मला विषाप्रमाणें वाटूं लागला. इतिहास विषयासंबंधानें उत्साह वाटेल असें मला कधींच दिसलें नाहीं. इतिहास म्हणजे स्वदेशाभिमान शिकविण्याचें साधन ! पण इतिहास शिकविण्याच्या प्रचलित पद्धतीपासून माझ्यामध्यें देशाभिमान उत्पन्न झाला नाहीं. तो शिकण्यासाठीं मला निराळींच पुस्तकें वाचावीं लागलीं.

अंकगणित वगैरे विषयांतही देशी रूढीला फारच थोडा मान मिळालेला आहे. जुन्या पद्धतीचा जवळ जवळ लोप झाला आहे. उजळणी शिकविण्याची देशी पद्धति नाहींशी झाल्यामुळें, आपले पूर्वज जसे हिशेब हां हां म्हणतां करीत होते, तसे करतां येईनासें झालें आहे.

विज्ञान ( Science ) शुष्क आहे. त्याचा उपयोग करणें विद्यार्थ्यांना अशक्य असतें. खगोल सारखीं शास्त्रें विद्यार्थ्यांस आकाशावरून शिकविलीं पाहिजेत. तीं पुस्तकांतून शिकविण्यांत येतात. कोणत्याही विद्यार्थ्यास शाळा सोडल्यानंतर पाण्याच्या बिंदूचें पृथःक्करण करतां येत आहे असें मला माहीत नाहीं.

आरोग्यशास्त्राचें शिक्षण मुळींच देण्यांत येत नाहीं, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं ! साठ वर्षेपर्यंत शिक्षण घेऊनही आपल्याला प्लेग वगैरे रोगांपासून दूर रहातां आलें नाहीं. आपल्या डॉक्टरांनां त्या रोगाचा प्रतीकार करतां आला नाहीं. हा आपल्या शिक्षणावरील सर्वांत मोठा आक्षेप आहे असें मला वाटतें. आपल्या घरांत आरोग्यशास्त्रानें प्रवेश केला आहे असा अनुभव शेंकडों घरें पाहूनही मला आला नाहीं. सर्प वगैरेचा दंश झाला तर काय करावें, हें आपले ग्रॅज्युएट लोक सांगूं शकतील कीं काय याबद्दल मला जबरदस्त शंका आहे. जर आपल्या डॉक्टरांना लहानपणापासूनच वैद्यकी शिकण्याची संधि मिळाली असती, तर आजच्या सारखी दीन स्थिति त्यांची झाली नसती. असला आपल्या प्रचलित शिक्षण पद्धतीचा भयंकर परिणाम आहे. जगांतील सर्व भागांतून प्लेगनें पळ काढला. आणि येथें तर त्यानें कायमचें ठाणें बसविलें आहे. व हजारों हिंदी लोक अकालीं मृत्युमुखीं पडत आहेत. " याचें कारण आमची गरिबी " असें जर कोणी म्हणेल तर साठ वर्षांच्या शिक्षणाअंतींही ती कां राहिली याचें उत्तर शिक्षणखात्याकडून मिळालें पाहिजे.

आतां ज्या विषयांचें शिक्षण मुळींच मिळत नाहीं त्यांचा विचार करूं या. शिक्षणाचा मुख्य हेतु शीलसंवर्धन हाच असला पाहिजे. धर्माशिवाय शील कसें उत्पन्न होईल हें मला समजत नाहीं. आपण " इतोभ्रष्टस्ततो भ्रष्टः " पैकीं होत चाललों आहोंत; हें आतां लक्षांत येत चाललें आहे. या विषयावर मी विशेष लिहीत नाहीं. पण मी शेंकडों शिक्षकांना भेटलों आहें. त्यांनीं स्वतःचा निराशामय अनुभव मोठ्या दुःखानें माझ्याजवळ सांगितला आहे. या प्रश्नाचा विचार गांभीर्यानें केल्याशिवाय या परिषदेचें चालणार नाहीं. विद्यार्थ्यांची नीति गेली कीं सर्वच बुडालें ! या देशांत शेंकडा पंचायशींपासून नव्वद स्त्रीपुरुष शेतीचा धंदा करीत असतात. त्या धंद्याचें ज्ञान जितकें मिळेल तितकें कमी असें वाटलें पाहिजे.

तथापि आपल्या हायस्कूलपर्यंतच्या शिक्षणक्रमांत त्या विषयाचें नांवही नाहीं. असली शोचनीय स्थिति येथें म्हणूनच चालूं शकते.

विणकामाचा धंदा नष्ट होत चालला आहे. शेतकऱ्यांनीं फुरसतीच्या वेळीं करण्याचा तो धंदा होता. त्याचाही आपल्या शिक्षणक्रमांत समावेश झालेला नाहीं. आपलें शिक्षण केवळ मुत्सद्दीवर्ग उत्पन्न करणारें आहे. सोनार, लोहार, चांभार आमच्या शाळेंत सांपडला कीं, तो मुत्सद्दी बनतो ! चांगलें शिक्षण सर्वांनींच घ्यावें अशी आपली इच्छा असली पाहिजे; पण आपल्या शिक्षणपद्धतीनें सगळेच मुत्सद्दी बनले तर ?

आपल्या शिक्षणांत, क्षात्रकलेला स्थान नाहीं. मला स्वतःला ती मोठीशी दुःखाची गोष्ट वाटत नाहीं. मी अनायासानें प्राप्त झालेल्या गोष्टीलाच सुख मानलें आहे. पण शस्त्रें वापरावयास शिकावें अशी राष्ट्राची इच्छा आहे. ज्याला शिकावयाचें आहे त्याला तशी संधि मिळाली पाहिजे. पण या तत्वाचा हल्लींच्या शिक्षणपद्धतींत विसर पडलेला दिसतो.

संगीताचा कोठें मागमूसही दिसत नाहीं. गायनाचा परिणाम आपल्यावर फार होत असतो. याची स्पष्ट कल्पना आपल्याला राहिलेली नाहीं. राहिली असती तर आपल्या मुलांना, तें शिकविल्याखेरीज आपण राहिलोंच नसतों. वेदांची रचना संगीतावरूनच झालेली दिसते. मधुर सुसंगीत आत्म्याचा परिताप शांत करूं शकतें. हजारों माणसांच्या सभेंत कित्येक वेळां गडबड सुरू होते, ती हजारों कंठांतून एकसुरांत राष्ट्रगीत सुरूं झालें तर एकदम बंद होऊं शकेल. वीरश्रीचा संचार करण्यासाठीं हजारों बालकांनीं एका आवाजानें वीररसमय काव्य गावें ही सामान्य गोष्ट नाहीं. खलाशी आणि इतर मजूर 'हरिहर !' 'अल्लाबेली !' वगैरे ध्वनि एका आवाजांत काढतात आणि त्याच्या जोरावर ते आपलीं कामें करतात हें संगीताच्या शक्तीचें उदाहरण आहे. इंग्रजी मित्रांना, गाऊन थंडीचें निवारण करतांना मीं पाहिलें आहे. नाटकांतील पदें वाटेल तशीं, वाटेल तेव्हां गावयास आपलीं मुलें शिकतात. बाजाची पेटी वगैरे वाद्यें वाटेल तशीं ठोकीत असतात. यामुळें त्यांचें नुकसान होतें. संगीताचें शास्त्रशुद्ध शिक्षण त्यांना मिळाल्यास नाटकाचीं पदें गाण्यांत आणि हेल काढण्यांत तीं कालक्षेप करणार नाहींत. गवई ज्याप्रमाणें वद-

सूर किंवा अवेळीं गात नाहीं त्याचप्रमाणें शुद्धसंगीत शिकणारा विद्यार्थी घाणेरड्या संगीताकडे ढुंकूनही पहाणार नाहीं. राष्ट्राला जागें करण्यासाठीं संगीताची आवश्यकता आहे. या विषयावरील डॉक्टर आनंदकुमार स्वामी यांचे विचार मनन करण्यासारखे आहेत.

## व्यायाम.

'व्यायाम' या शब्दांत खेळ इत्यादिकांचा समावेश मीं केला आहे. या व्यायामाकडेही दुर्लक्ष झालेलें आहे. देशी पद्धतींचा त्याग झालेला आहे. टेनिस, क्रिकेट, फूटबॉल वगैरेचें साम्राज्य माजलेलें आहे. या तीनही खेळांत मौज आहे हें कबूल करण्यास हरकत नाहीं. पण पाश्चात्य गोष्टींना जर आपण इतके मोहित झालों नसतों तर इतक्याच मौजेच्या आणि कमी खर्चाच्या विटीदांडू, आट्यापाट्या, खो खो इत्यादि खेळांचा आपण त्याग केला नसता. आठही अंगांना ज्याच्या योगानें कसरत मिळते अशा खेळांचा आणि कुस्तीच्या आखाड्यांचा जवळजवळ लोप होऊन गेला आहे. जर एखाद्या पाश्चात्य वस्तूची नक्कल करण्याजोगी असेल तर ती ड्रिलचीच, असें मला वाटतें. एका मित्रानें टीका केली होती कीं आपल्याला चालतांच येत नाहीं. आणि एकत्र मिळून पद्धतशीर चालण्याचें नांवच नको. हजारों माणसांनीं तालावर गुपचुपपणें वाटेल त्या दिशेनें दोनदोन चारचार माणसांची रांग करून चालावें ही शक्ति आपल्यांत नाहीं. असल्या ड्रिलचा फक्त लढाईतच उपयोग होतो असें नाहीं. परोपकाराच्या कितीतरी कार्यांत तिचा उपयोग होऊं शकतो. आग विझविण्याचें, बुडालेल्याला मदत करण्याचें, आजाऱ्याला डोलींत घालून घेऊन जाण्याचें, ड्रिल हें अति उत्तम साधन आहे. अशा रीतीनें आपल्या शाळांतून देशी खेळ, देशी कसरतींचे प्रकार आणि पाश्चात्य पद्धतीची ड्रिल सुरू करण्याची आवश्यकता आहे.

## स्त्रीशिक्षण.

पुरुषांना मिळणारें शिक्षण जसें सदोष आहे त्याचप्रमाणें स्त्रियांना मिळणारेंही आहे. हिंदुस्थानांत स्त्रीपुरुषांचा परस्पर संबंध काय आहे, जनसमाजांत स्त्रियांना कोणतें स्थान आहे, याचा मुळींच विचार करण्यांत आलेला नाहीं.

प्राथमिक शिक्षणांतील पुष्कळसा भाग दोन्ही वर्गांना सामान्य असूं शकेल; त्यानंतर दोघांचे शिक्षणाचे मार्ग भिन्न आहेत. पुरुष आणि स्त्री यांच्यामध्यें

ज्याप्रमाणें निसर्गानें भेद ठेविला आहे त्याचप्रमाणें शिक्षणांतही फरक असला पाहिजे. संसारांत दोघांचीहि योग्यता सारखी आहे पण दोघांचीं कार्यें भिन्न आहेत. गृहराज्यावर अधिकार स्त्रीचा आहे. बाहेरील व्यवस्थेचा अधिष्ठाता पुरुष आहे. पुरुष आजीविका संपादन करणारा आहे; स्त्री संग्रह व व्यय करणारी आहे. स्त्री बालकाचें पोषण करणारी, त्याची विधात्री आहे; तिच्यावरच बालकाच्या शिलाचा आधार आहे. ती बालशिक्षिका आहे; आणि म्हणूनच राष्ट्राची ती माता आहे. पण पुरुष हा राष्ट्राचा पिता नाहीं. कांहीं कालानंतर पित्याचा परिणाम पुत्रावर थोडाच रहातो. माता आपलें स्थान कधीं सोडीतच नाहीं. बालक मोठें झाल्यानंतरही मातेजवळ बालकासारखाच लडिवाळपणा करतें. पण पित्याशीं अशा प्रकारचा संबंध त्याला राखतां येत नाहीं.

ही योजना जर स्वाभाविक असेल, योग्य असेल, तर स्त्रीला स्वतंत्र उपजीविका मिळविण्याची व्यवस्था नसली पाहिजे. जेथें स्त्रियांना तारमास्तरचें, टाइपिस्टचें, किंवा कंपॉझिटरचें काम करावें लागतें, त्या ठिकाणीं सुव्यवस्थेचा भंग झाला असला पाहिजे. ज्या राष्ट्रांत असला रिवाज असेल त्या राष्ट्रानें आपल्या शक्तीचें दिवाळें काढलें आहे, तें राष्ट्र आपले भांडवलांतूनच रोज व्यय करीत चाललें आहे, अशी माझी समजूत आहे.

म्हणजे एक पक्षीं आपण स्त्रीला अंधकारांत आणि अधमावस्थेंत ठेवणें हें गैर-वाजवी आहे, आणि दुसऱ्या पक्षीं स्त्रीवर पुरुषाचें काम सोंपविणें हें कमकुवत-पणाचें चिन्ह आहे—स्त्रीजातीवर तो जुलूम आहे.

यास्तव स्त्रियांसाठीं कांहीं वर्षें शिक्षण झाल्यावर, निराळ्या शिक्षण-पद्धतीची जरूर आहे. त्यांना गृहव्यवस्थेची, गर्भावस्थेंतील शुश्रूषेची, बालसंगोपनाची माहिती असणें जरूर आहे. यासंबंधी विवक्षित योजना निश्चित करणें कठीण आहे. शिक्षणक्रमांत हा विषय नवीन आहे. त्यासंबंधानें तपास करून निर्णय करण्याकरितां, सच्छील आणि ज्ञानवान् स्त्रियांचें आणि अनुभवी पुरुषांचें एक मंडळ नेमून त्याच्याजवळून अशा प्रकारची योजना तयार करून घेतली पाहिजे.

हें मंडळ कौमार्यावस्थेंतील स्त्रियांच्या शिक्षणाची योजना करूं शकेल. पण ज्यांचा विवाह होऊन चुकला आहे अशा बालविवाहित स्त्रियांची संख्या

वाढत चालली आहे. अशा स्त्रियांच्या शिक्षणासंबंधानें मीं माझे विचार दुसरीकडे प्रदर्शित केलेले आहेत. म्हणून येथें त्यांची पुनरुक्ति केली नाहीं.

## शिक्षक.

जिकडे पहावें तिकडे भुसभुशीत पायावर टोलेजंग इमारत उभारलेली दिसून येईल. प्राथमिक शिक्षकांना (विनयपूर्वक) शिक्षक पाहिजे तर म्हणावें. पण वास्तविक पाहिलें असतां 'शिक्षक' शब्दाचा हा दुरुपयोग होत आहे. विद्यार्थ्यांचा बाल्यकाल हा अत्यंत महत्वाचा आहे. त्या काळांत मिळविलेल्या ज्ञानाचा विसर कधीं पडत नाहीं. याच कालांत त्याला कमींत कमी मदत मिळते. आणि वाटेल तसल्या शाळेंत त्याला डांबण्यांत येतें.

मला वाटतें कीं हायस्कूल, कॉलेज वगैरे भपकेबाज संस्थांतून दरिद्री हिंदुस्थानाला असह्य असा खर्च करण्यांत येतो. त्याच्याऐवजीं निसर्ग-सौंदर्याचा जेथें लाभ मिळेल व आरोग्याचें जेथें रक्षण होईल, अशा ठिकाणीं सुशिक्षित, अनुभवी व नीतिमान् शिक्षकांकडून नुसतें प्राथमिक शिक्षण जरी देण्यांत आलें तरी पुष्कळ महत्वाचे परिणाम आपल्याला दिसून येतील. या कार्यासाठीं हल्लींच्याच शिक्षकांना दुप्पट पगार दिला तरी पुरेसा होणार नाहीं. असल्या क्षुल्लक फेरफारानें महत्कार्यें साधत नसतात. प्राथमिक शिक्षणाचें स्वरूपच बदललें पाहिजे. हा विषय फार कठिण आहे, त्यांत विघ्नेंही पुष्कळ आहेत, या गोष्टींची जाणीव मला आहे. तरी या प्रश्नाचा निकाल गुजराथ–शिक्षण–मंडळाच्या शक्तीबाहेर असतां कामा नये.

## सक्ती कीं खुषी.

शिक्षण सक्तीचें पाहिजे कीं काय या प्रश्नावर मी कांहीं बोलणें हें मला अनुचित वाटतें. माझा अनुभव फार थोडा आहे आणि शिवाय राष्ट्रावर कुठल्याही गोष्टीची सक्ती करणें हें मला कठीण वाटतें. तथापि सध्यां आपण शिक्षण फुकट आणि ऐच्छिक करून प्रयोग चालवावे हें हल्लींच्या काळाला विशेष अनुकूल व रुचणारें होईल असें दिसतें. जोंपर्यंत आपण जो–हुकुमीच्या काळांतून निघालों नाहीं तोंपर्यंत शिक्षण सक्तीचें करण्यांत अनेक विघ्नें येतील असें वाटतें. या गोष्टीचा विचार करतांना गायकवाड सरकारच्या अनुभवाची थोडीबहुत मदत

होईल. सक्तीच्या शिक्षणासंबंधानें मला प्रतिकूल अनुभव आलेला आहे. पण माझा अनुभव अल्प असल्यामुळें तो विशेष जमेस धरतां येणार नाहीं. या परिषदेंत जमलेले सभासद या विषयासंबंधानें विशेष महत्वाची माहिती सांगतील अशी मला आशा आहे.

## उपाय.

हे सर्व दोष दूर करण्याचा धोपट मार्ग अर्ज करणें हा नव्हे एवढी माझी खात्री आहे. राज्यकर्त्यांना महत्वाचे फेरफार एकदम करतां येत नाहींत; त्यासाठीं राष्ट्रांतील पुढाऱ्यांनींच प्रयत्न केले पाहिजेत. इंग्लिश लोकांमध्यें, प्रजेच्या प्रयत्नांवरच मुख्य मदार असते. सरकारनें केलें तरच होईल, याच आशेवर राहिलों तर इष्ट फेरफार होतां होतां कित्येक युगें जाण्याचा संभव आहे. जसें इंग्लंडांत, तसेंच येथेंही! सरकारला प्रयोग करावयास सांगण्याचे पूर्वी स्वतः प्रयोग करून दाखविले पाहिजेत. ज्याला ज्या गोष्टींत दोष दिसतील, ते दूर करून इष्ट परिणाम घडवून आणून नंतर सरकारकडूनही फेरफार करवून घ्यावेत. असल्या तऱ्हेचीं महत्कार्यें करण्यासाटीं देशांत अनेक शिक्षणसंस्था स्थापन करण्याची जरूर आहे.

पण याला एक मोटें विघ्न आहे. आपल्याला " डिग्र्यांचा विलक्षण मोह आहे. पास होण्यावर आपल्या आयुष्याची मुख्य मदार असते. यामुळें राष्ट्राचें भयंकर नुकसान होतें. ज्यांना सरकारी नोकरींत शिरावयाचें आहे, त्यांनाच डिग्र्या उपयोगी आहेत हें आपण विसरतों. राष्ट्राची इमारत कांहीं सरकारावर उभारावयाची नाहीं. शिवाय पुष्कळशा लोकांना नोकरीशिवाय चांगली धनप्राप्ति करून घेतां येते असें आपल्याला चहूंकडे दिसून येतें. आशिक्षित लोक, जर आपल्या हुषारीनें, कोट्याधीश होऊं शकतात, तर सुशिक्षित लोक कां होणार नाहींत? सुशिक्षित वर्गानें जर भीति सोडली तर अशिक्षित लोकांइतकें तरी सामर्थ्य त्यांच्यांत खास येईल.

डिग्र्यांचा मोह जर सुटला, तर देशांत खासगी शाळा पुष्कळ चालूं शकतील. कोणत्याही सरकारला देशांतील सर्व शिक्षण चालवतां येत नाहीं. अमेरिकेंत तर बहुतेक शिक्षणसंस्था खाजगीच आहेत. इंग्लंडांतही तीच स्थिति आहे. या संस्था आपापलीं ' प्रमाणपत्रें ' ( सर्टिफिकिटें ) देतात.

शिक्षण सुदृढ पायावर उभारण्यास भगीरथ प्रयत्न करावे लागतील. त्यासाठीं तन मन धन व शेवटीं आत्म्याचेंही समर्पण करावें लागेल.

अमेरिकेपासून आपल्याला थोडेंच शिकतां येईल, अशी माझी समजूत झाली आहे. पण त्यांची एक गोष्ट अनुकरणीय आहे. तेथील शिक्षणाच्या मोठमोठ्या संस्था एका मोठ्या ट्रस्टच्या द्वारें चालतात. या ट्रस्टमध्यें शेंकडों रुपयांचें दान धनाढ्य लोकांनीं केलेलें आहे. या ट्रस्टच्या मार्फत अनेक खासगी शाळांचा निभाव होतो. त्यांना ज्याप्रमाणें अलोट पैसा मिळाला आहे त्याच प्रमाणें सुदृढ व स्वदेशाभिमानी लोकांचीही मदत मिळाली आहे. ते सर्व संस्थांची तपासणी करितात. आणि रक्षणहि करितात त्यांना योग्य ती व योग्य तेव्हां मदतही करितात. त्या ट्रस्टच्या नियमानुसार चालणाऱ्या संस्थांना अशी मदत सहज मिळते. या ट्रस्टच्या द्वारें आणि उत्साहपूर्वक केलेल्या चळवळीनें अमेरिकेंतील वृद्ध शेतकऱ्यांना शेतीचें नवीन शास्त्रीय ज्ञान मिळूं शकलें. असलीच एखादी योजना गुजराथेंतही करतां येईल. धन आहे, विद्वत्ता आहे, धर्मवृत्तीचा अद्याप लोप झाला नाहीं, बालकें तर विद्येची वाट पहात राहिलीं आहेत; उद्योग होईल तर थोड्याच वर्षांत, आपला प्रयत्न सत्य आहे असें आपण सरकारला दाखवूं शकूं. नंतर सरकार त्याचा अंमल करण्यास चुकणार नाहीं. हजार अर्ज करण्यापेक्षां, आपण करून दाखविलेल्या कार्याचें तेज अधिक पडेल.........असलें ट्रस्ट स्थापन करणें म्हणजे शिक्षण-प्रचाराची सतत चळवळच करणें होय.

हें एक कार्य झालें तर सर्वच काम पार पडल्यासारखें होईल. अर्थात् तें करणें सोपें नाहीं. सरकार आणि धनिक लोक यांना जेव्हां भंडाऊन सोडावें तेव्हांच ते जागृत होतात. आणि याला एकच मार्ग आहे. तो तपश्चर्या हा होय. तपश्चर्या ही धर्माची पहिली व शेवटची पायरी आहे. 'गुजराथ शिक्षण मंडळ' हें या तपश्चर्येचें मूर्तिमंत स्वरूप होय असें मी समजतों. तिच्या व्यवस्थापकांत व सभासदांत जर परोपकारवृत्तीच वास करीत असेल, आणि विद्वत्ताही तशीच असेल तर लक्ष्मी आपण होऊन मंडळाच्या पायाशीं लोळण घालील. धनाढ्य माणसें नेहमीं शंकेखोर असतात. शंकेला कारणें असतात. यासाठीं लक्ष्मीदेवीची जर आराधना करावयाची असेल तर आपली योग्यता सिद्ध करून द्यावी लागेल.

धनाची जरूर आहे. तरी त्याच्यावरच विशेष जोर देण्याची जरूर नाहीं. ज्याला राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचेंच आहे तो शिकला नसला तर मजुरी करतां करतां शिकेल; आणि शिकल्यानंतर एका झाडाखालीं बसून ज्याला पाहिजे असेल त्याला विद्यादान करील. हा ब्राह्मणधर्म आहे. ज्याला त्याचें आचरण करावयाचें असेल त्याला करतां येईल. असले ब्राह्मण उत्पन्न होतील, त्यांच्यापाशीं लक्ष्मी आणि सत्ता दोन्हींही लोटांगणें घालतील.

शिक्षणांत स्वराज्याची गुरुकिल्ली आहे राजकीय पुढारी खुशाल मांटेग्यू साहेबां-कडे जावोत, तें क्षेत्र या परिषदेच्या बाहेरचें असो; पण शुद्ध शिक्षणाशिवाय सर्व प्रयास व्यर्थ आहेत. शिक्षण हें आपलें मुख्य कार्य आहे. त्यांत जर आपण विजय पावलों तर सर्वत्र विजयच आहे.

---

## शिक्षणाचा हेतु.

( भागलपूर येथील १७ व्या छात्रसंमेलनांत अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांपैकीं कहीं भाग. )

मी पुष्कळ विद्यार्थ्यांना निराश झालेले पाहिलें आहे. पुष्कळांनीं 'आतां पुढें काय करूं' म्हणून प्रश्नही मला विचारले आहेत. आम्हांला देशसेवा कोणत्या प्रकारें करतां येईल ? पोटासाठीं काय केलें पाहिजे ? असेंही विचारलें आहे. या शेव-टच्या प्रश्नाविषयीं तर विद्यार्थ्यांना फारच भीति वाटतेसें दिसतें. या सर्व प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी शिकण्याचा हेतु काय, हें पहिल्यानें पहाणें अवश्य आहे. 'शील बनविणें आणि त्याचा विकास करणें हाच शिक्षणाचा हेतु आहे' असें हक्स्लेचें म्हणणें आहे. भारतवर्षातील ऋषि, मुनींचें असें म्हणणें आहे कीं वेदादि संपूर्ण शास्त्रांचें अध्ययन करूनही जर मनुष्याला आत्म्याची ओळख न झाली, सर्व बंध-नांतून मुक्त होण्याची लायकी त्याच्या अंगीं जर न आली, तर हें सर्व ज्ञान व्यर्थ होय. याच्याहूनही श्रेष्ठ वाक्य असें आहे कीं, "ज्यानें आत्मा जाणला त्यानें सर्व जाणलें आहे." अक्षरांचें ज्ञान मिळविल्यावांचून आत्मज्ञान होणें अगदीं शक्य आहे. पैगंबरमहंमदला अक्षरज्ञान होतें असें मला माहीत नाहीं. येशू ख्रिस्तानें एखाद्या शाळेंत शिक्षण घेतल्याचें ऐकिवांत नाहीं; असें असतांही या महात्म्यांना

आत्म्याची ओळख झाली नव्हती असें म्हणणें हें भयंकर धाष्टर्याचें होईल. आपल्या शाळांतून ते परीक्षा देण्याला पात्र नव्हते, असें असतांही आपण त्यांना पूज्य मानतों. विद्येचीं सर्व फळें त्यांना प्राप्त झालीं होतीं. ते अलौकिक महात्मे होते. म्हणून आम्हींही जर शाळा सोडून दिल्या तर भ्रष्ट होऊं. त्यांच्या उदाहरणापासून आपण इतकें मात्र शिकलेंच पाहिजे कीं, सर्वांत पहिली गोष्ट आत्मज्ञान मिळालें पाहिजे ही होय. हें आत्मज्ञान चारित्र्याच्या जोरावर मिळत असतें. चारित्र्य ह्मणजे काय ? सद्वर्तन कशाला ह्मणतात ? सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह निर्भयता वगैरे व्रतांचें शीलवन्त माणसें पालन करतात असें आढळून येईल. तीं प्राण देतील, पण सत्य सोडणार नाहींत. स्वतः मरतील पण दुसऱ्यांना मारणार नाहींत. स्वतः दुःख सहन करतील, तळमळतील, पण दुसऱ्यांना दुःख देणार नाहींत, परदुःखनिवारण करतील, परस्त्रीला माता भगिनींप्रमाणें समजतील आणि स्वस्त्रीलाही विषयभाजनच न समजतां, शक्य तितका संयम पाळतील; आणि निर्मल मित्रभावानें तिच्याशीं वागतील. सदाचारी मनुष्यें यथाशक्ति ब्रह्मचर्य पाळून आपलें ओजस शक्य तितकें रक्षण करतील. ते कधीं चोरी करणार नाहींत, लांच घेणार नाहींत; दुसऱ्यांचा किंवा आपला वेळ व्यर्थ घालविणार नाहींत, व्यर्थ अकारण धनसंचय करणार नाहींत ऐपआराम वाढविणार नाहींत; आणि अवश्यक वस्तूंचा फक्त चैनीसाठीं उपयोग करणार नाहींत, साधेपणानें राहून, 'आपण शरीर नाहीं पण आत्मा आहोंत आणि आत्म्याला मारणारा मायेचा पूत जगांत अवतरला नाहीं,' अशी पक्की खूणगांठ बांधून, आधिव्याधि उपाधींचें भय सोडून चक्रवर्ती राजांच्या वैभवानें, व दिमाखानें दिपून न जातां, निर्भयपणें आपला व्यवहार हीं शीलवंत माणसें चालवितात.

## दोष कोणाचा ?

आपल्या शाळांतून जर अशीं माणसें उत्पन्न होत नसतील तर तो दोष विद्यार्थ्यांचा किंवा शिक्षणाचा, किंवा शिक्षकांचा किंवा तिघांचाही असेल. पण ही उणीव भरून काढण्याचा उपाय मात्र विद्यार्थ्यांच्या हातीं आहे................

## शिक्षण आणि उपजीविका.

रामचंद्राच्या मूर्तीचें दर्शन करूं इच्छिणाऱ्या तुळशीदासांना, कृष्णाची मूर्तिही रामरूप दिसली; दोषदृष्टीनें गीता वाचणाऱ्यांना तिच्यांत दोषच दिसतात. मुमु-

क्षूला गीतेंत मोक्षाचें सर्वोत्तम द्वार दिसतें. शिक्षणाला, उपजीविकेचें साधन बनविणें ही माझ्या मतें तुच्छ वृत्ति आहे. उपजीविका मिळविण्याचें साधन शरीर हें आहे. आत्म्याला त्या कार्यांत काय म्हणून गुंतवावें ? विद्यार्थ्यांनीं हें प्रथम ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं शरीराचें पोषण शरीराच्या मेहनतीनेंच मिळविलें पाहिजे. पोटासाठीं श्रम करण्यांत लाज वाटतां कामा नये. पोटासाठीं काम करण्यांत हलकेपणा नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे. मजूर लोक हे आपणापेक्षां हलके आहेत असें न वाटतां ते आपल्याला आदर्शभूत आहेत असें वाटलें पाहिजे. असला विद्यार्थी लक्ष्मीचा गुलाम न बनतां तिला आपली दासी बनवील. हें म्हणणें जर खरें असेल तर विद्यार्थ्यांनें रोज थोडीथोडी मजुरी करण्याची संवय राखली पाहिजे. हें सर्व ज्याला शिक्षणापासून धन संपादन करावयाचें असेल त्याच्यासाठीं सांगितलें.

## धार्मिक शिक्षणाचें स्थान.

जेथें धर्म नाहीं तेथें विद्या नाहीं, लक्ष्मी नाहीं, आरोग्य नाहीं. धर्मरहित स्थितींत सर्व शुष्कता आहे, सर्व शून्यता आहे. हें धर्माचें शिक्षण आपण गमावून बसलों आहोंत. आपल्या शिक्षणपद्धतींत त्याला स्थानच नाहीं. नवरदेवावांचूनच्या वरातीसारखें हें आहे. धर्माचें ज्ञान असल्याशिवाय विद्यार्थी निर्दोष आनंद कसा प्राप्त करूं शकेल ? तो आनंद मिळविण्यासाठीं कांहीं शास्त्रपठण, त्याचा विचार, आणि त्या विचाराप्रमाणें आचार पाहिजे. सकाळीं उठून विडया फुंकल्यानें, किंवा गप्पा झोडल्यानें स्वतःचें किंवा दुसऱ्याचें कल्याण होऊं शकत नाहीं. नझीर कवीनें म्हटलें आहे कीं " चिमणी सुद्धां चिंव चिंव करून सकाळ संध्याकाळ खुदाचें नांव घेत असते. पण आपण पाय लांब करून निजून रहातों. " वाटेल तें करून धार्मिक शिक्षण ग्रहण करणें हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे. शाळेंत धर्मशिक्षण देवोत किंवा न देवोत; येथें जो विद्यार्थी वर्ग जमला आहे त्यानें आजच आपल्या जीवनांत धर्माला प्रविष्ट करावें अशी माझी प्रार्थना आहे. धर्म कशाला म्हणतात, आणि धर्मशिक्षण कसें घ्यावें, याचा विचार करण्याचें हें स्थल नव्हे. पण एवढी व्यावहारिक आणि अनुभवसिद्ध शिफारस मी करतों कीं तुम्हीं सर्व जण तुळशीदासजींचें **रामायण** आणि **भगवद्गीता** या ग्रंथांचें पठण करा, त्यांचें मनन करा, आणि त्यांत सांगितल्याप्रमाणें

वागण्याचे प्रयत्न करा. तुमच्यापाशीं मानसरूप कोहिनूर पडलेला आहे त्याची ओळख करून घ्या. पण इतकें घ्यानांत ठेवा कीं हे दोन्ही ग्रंथ धर्मज्ञानासाठीं वाचावयाचे आहेत. **हे ग्रंथ लिहिणाऱ्या ऋषींचा हेतु इतिहास लिहिण्याचा नव्हता; धर्माचें व नीतीचें शिक्षण देण्याचा होता.** कोटयवधि माणसें हीं पुस्तकें वाचून आपलें जीवन विशुद्ध करून निर्दोष आनंदाचा उपभोग घेत असतात. माझें असेंही मत आहे कीं हिंदु मुसलमानांनीं परस्परांचे धर्मग्रंथही नम्रतापूर्वक व भक्तिभावानें वाचले पाहिजेत.

## विद्यार्थी आणि राजकीय सभा.

आतां विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडणें योग्य आहे कीं नाहीं हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. कारणें न सांगतां मी माझा अभिप्रायच देतों. राजकीय क्षेत्रांत दोन भाग आहेत. एकांत केवळ शास्त्र येतें, दुसऱ्यांत शास्त्राची अंमलबजावणी येते. शास्त्रप्रदेशांत विद्यार्थ्यांनीं शिरलें पाहिजे; दुसऱ्यांत प्रवेश करण्यांत हानि आहे. म्हणून राजकारणविषयक सभांना—कांग्रेस वगैरेंना—राजकारण शास्त्राचें शिक्षण मिळविण्याकरितां, तेथील वस्तुपाठ मिळविण्याकरितां, जाण्याची सूट असलीच पाहिजे. त्या बाबतींत त्यांना पुरी स्वतंत्रता मिळणें अवश्य आहे आणि त्यांच्या मार्गांत आज येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. असल्या सभांतून भाषणें करण्याची किंवा मत देण्याची परवानगी त्यांना देतां कामां नये. पण विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या अभ्यासांत व्यत्यय न येऊं देतां स्वयंसेवकाचें काम केलें तर हरकत नाहीं. त्याच्या योगानें पुष्कळ लाभ होण्यासारखा आहे. मालवीयांची सेवा करण्याची संधि कोणता विद्यार्थी सोडील ? विद्यार्थ्यानें पक्षापक्षाच्या भानगडींत न पडतां तटस्थ राहून राष्ट्रांतील सर्व पुढाऱ्यांबद्दल पूज्यबुद्धि बाळगली पाहिजे. निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या गुणदोषांची तुलना करणें हेंही त्याचें काम नव्हे. विद्यार्थी हा गुणग्राही असला पाहिजे. गुणाची त्यानें पूजा केली पाहिजे.

## विद्यार्थी आणि देशसेवा.

विद्यार्थ्यांनीं देशसेवा कशी करावी हा प्रश्न पुष्कळ जण विचारतात. त्याचा सरळ जबाब असा आहे कीं त्यांनीं उत्तम विद्या संपादन करावी. शिकत असतांना आरोग्याची जतन करावी. आणि संपादन केलेलें विद्याधन वेळ आली

म्हणजे देशसेवेच्या कामीं खर्च करण्याची तयारी ठेवावी. मला वाटतें यांत त्यांनीं उत्तम देशसेवा केल्यासारखें होईल. पण फक्त विचारपूर्वक जीवन व्यतीत केल्यानें, स्वार्थाच्या ऐवजीं परोपकाराचें मनन केल्यानें, परिश्रमाशिवायच आपल्याला कित्येक कार्यें करतां येण्यासारखीं आहेत. ज्याला देशसेवेची गोडी लागली, तो देशसेवेचीं शेंकडों कार्यें शोधून काढूं शकेल.

## काय बोध घेतलात ?

हें संमेलन आज सतरा वर्षांपासून भरत आहे. मागील अध्यक्षांचीं, मला पाठविलेलीं भाषणें, मी वाचलीं. हीं सर्व व्याख्यानें देण्याचा हेतु काय ? जर त्यांच्यापासून कांहीं ग्रहण करण्याचा हेतु असेल तर विचार करून पहा कीं आपण काय काय बोध घेतला. जर केवळ इंग्रजी शब्दांची मधुर रचनाच ऐकण्याच्या हेतूनें व्याख्यानें करविलीं असतील किंवा या संमेलनाची कीर्ति वाढविण्याच्या हेतूनें करविलीं असतील तर मला आपली फार कीव येते. आपण तीं ज्ञान मिळवून त्याप्रमाणें क्रिया करण्याच्या हेतूनें करविलीं आहेत असें मी समजतों. आपल्या पैकीं किती विद्यार्थ्यांनीं विदुषी बेझंटबाईच्या उपदेशाप्रमाणें देशी पोषाख पसंत केला, आहारांत साधेपणा आणला, घाणेरड्या शृंगारिक कादंबऱ्या वाचण्याचें सोडून दिलें ? सुटीच्या दिवसांत प्रोफेसर जदुनाथ सरकार यांच्या सल्ल्या प्रमाणें गरीबांना फुकट शिकविण्याचें काम तुमच्या पैकीं किती जणांनीं केलें ? असे पुष्कळ प्रश्न विचारितां येतील. त्यांची उत्तरें मी मागत नाहीं. तुम्हींच स्वतः आपल्या मनाचें समाधान करा म्हणजे झालें.

## ज्ञानाची किंमत कार्यांत आहे.

शेंकडों पुस्तकांतील ज्ञान मेंदूंत कोंबल्यानें त्याची किंमत मिळते, पण त्यापेक्षां रुपयाभर केलेलें कार्य विशेष किंमतीचें आहे. डोक्यांत भरलेल्या ज्ञानाची किंमत कार्याच्या किंमती इतकीच आहे. बाकी सर्व निष्कारण बोजा आहे. ( "ज्ञानं भारः क्रियां विना" ) ह्मणून माझी नेहमीं अशी विनंति आणि आग्रह आहे कीं तुम्हीं जें जें शिकाल आणि समजून घ्याल तें कृतींत आणा, त्या योगानें नेहमीं तुमची उन्नतिच होत जाईल.

# सत्याग्रहाश्रम

## साबरमती अहमदाबाद.

### नियमावलि.

**स्थापना**—अहमदाबाद, वैशाख शुद्ध ६ गुरुवार १८३७ ( २० मे १९१५)

**उद्देश**—आजन्म देशसेवेचें शिक्षण घेणें व देशसेवा करणें.

## आचार नियम.

देशसेवा करण्यास शिकण्यासाठीं खालील व्रतें, व नियम यांचें पालन केलें पाहिजे, असें आश्रमवासीयांस वाटतें व कांहीं दिवसांपासून त्या व्रतांचें पालन करण्याचा ते प्रयत्न करीत आले आहेत.

## १ सत्यव्रत.

साधारणपणें असत्य भाषण न करणें एवढेंच हें व्रत पाळण्यास पुरेसें नाहीं. देशहितार्थ सुद्धां आपण कोणासही फसवितां कामा नये अशी त्यांची भावना झाली पाहिजे. सत्याकरितां आईबाप वगैरे वडील माणसांशीं कसें वागावें हें समजण्यासाठीं भक्त प्रल्हादाचें उदाहरण ध्यानांत आणावें.

## २ अहिंसा व्रत.

पश्वादि जीवांची हत्या न करणें एवढेंच वस्स नाहीं. हें व्रत पाळणारानें समजलें पाहिजे कीं, ज्यांना आपण अन्याय करणारे असें मानतों त्यांची सुद्धां आपल्या हातून हत्या न घडावी. त्यानें त्यांचेवर क्रोध न करतां दयाच करावी. आईबापांचा, सरकारचा, अथवा दुसऱ्या कोणाचाही जो आपणास जुलूम वाटेल त्याचा प्रतीकार करावा. परंतु त्यांना ( जुलुम करणाऱ्यांनां ) मारूं किंवा इजा करूं नये. सत्य आणि अहिंसा हीं व्रतें पाळणारानें जुलूम होईल तेव्हां सत्याग्रही बनून जुलूम करणाऱ्यास दयाभावानें जिंकावें. जुलमाला वश होऊं नये. ( जुलमापुढें मान वांकवूं नये ) व जुलूम करणारावर जय मिळेतोंपर्यंत स्वतःच्या शरीरास मरणापर्यंतचीही शिक्षा भोगण्यास तयार असावें.

## ३ ब्रह्मचर्य व्रत.

जों पर्यंत ब्रह्मचर्य व्रताचें पालन होत नाहीं, तों पर्यंत वरील व्रतें पाळणें जवळ जवळ अशक्य आहे. या व्रतांत परस्त्रीवर पापदृष्टि न ठेवणेंच बस नाहीं. मनानेंहि विषयेन्द्रियांचा विकारापासून निरोध केला पाहिजे. ह्या व्रताचें पालन करणारा विवाहित असल्यास त्यानें स्वस्त्रीशीं सुद्धां विषयोपभोग करूं नये. तिला मैत्रीण मानून तिच्याशीं निर्मल संबंध ठेवावा.

## ४ अस्वाद व्रत.

जीभ ताब्यांत ठेवतां न आल्यानेंच वरचीं सर्व व्रतें व विशेषतः ब्रह्मचर्य पाळणें दुरापास्त होतें. ह्मणून हें एक स्वतंत्र नवीन व्रत समजून, खाणें हें केवळ शरीरयात्रा चालविण्यासाठीं आहे असें मानून देशसेवेच्छूनें आपला आहार दिवसेंदिवस शुद्ध आणि निर्दोष करावा. विकार उत्पन्न करणाऱ्या सर्व पदार्थांचा एकदम किंवा हळू हळू त्याग करावा.

## ५ अस्तेय व्रत.

स्थूल दृष्टीनें आपण जिला दुसऱ्याची वस्तु समजतों ती चोरतां कामा नये एवढेंच बस नाहीं. सृष्टि मनुष्याचा आहार नेहमीं जेव्हांचा तेव्हांच निर्माण करिते ( अधिक करीत नाहीं ) असें जाणून अन्नवस्त्रादिकांचा आपल्या वास्तविक गरजे-शिवाय उपयोग करणें ही देखील चोरीच होय असें मानून तदनुसार आचरण केलें पाहिजे.

## ६ अपरिग्रह व्रत.

पुष्कळ वस्तूंचा संग्रह करूं नये. इतकेंच नव्हे तर शरीराचें रक्षण पोषण कर-ण्यास ज्या वस्तूंची जरूर नाहीं त्या वस्तूंचा संग्रह करूं नये. उदाहरणार्थ, खुर्ची-वांचून चालवितां आल्यास ती बाळगूं नये. याप्रमाणें नित्य विचार करून आपलें जीवन उत्तरोत्तर साधें बनविण्याचा प्रयत्न व्रतधारकानें केला पाहिजे.

## ७ स्वदेशी व्रत.

वरील व्रतांचें पालन पूर्णपणें करावयाचें म्हटलें म्हणजे स्वदेशीच्या पालनाची जरूर पडते. शुद्ध स्वदेशींत यंत्रांस वाव नाहीं. यांत्रिक कामांत भयंकर हिंसा

होते. यंत्रें बनवितांनां व वापरतांनां होणाऱ्या अपरिमित अग्निप्रयोगामुळें असंख्य जीव प्राणास मुकतात. गिरण्यांचे मालक स्वतःच्या स्वार्थासाठीं गरीब मजुरांचे हाल करितात. यंत्रांवर निघणाऱ्या वस्तूंत हलक्या वस्तूंची भेसळ फार असते. वस्तूंत नसणारे सुंदर गुण तिच्यासंबंधानें वर्णिले जातात. शिवाय यांत्रिक सामान उत्पन्न होऊं लागलें म्हणजे त्याचा खप बेसुमार वाढतो; यामुळें अस्तेय व अपरिग्रह या व्रतांचा भंग होतो. यांत्रिक वस्तु वापरण्याची संवय लागली म्हणजे छानछोकीहि वाढते व असली ही कृत्रिम शोभा ब्रह्मचर्यास बाधक आहे. दूरच्या वस्तु व चालीरीति यांपेक्षां आपल्या आसपासच्या वस्तु व चालीरीति मनुष्याला स्वाभाविकपणेंच आवडतात. हेंच स्वदेशप्रेमाचें लक्षण होय, व यांतच परमार्थाचें मूळ आहे. आपल्या शेजारचें दुकान टाकून एखादी वस्तु दूरच्या दुकानांतून आणण्यांत बहुधा स्वार्थबुद्धि असते. स्वदेशीचा त्याग केल्यानें हिंदुस्थानांतील हातमागांचा धंदा अगदीं डबघाईस आलेला दिसतो. स्वदेशी व्रताचा भंग हें हिंदुस्थाननें महापातक केलें आहे यांत शंका नाहीं. अर्थात् हें व्रत धारण केलेला आश्रमवासी हातमागावर तयार झालेलें साधें वस्त्र वापरील व तेंहि नेहमीं अगदीं साध्या रीतीनें शिवलेलें असेल. परदेशी बटनें, विलायती तऱ्हेनें वेतण्याची पद्धत इत्यादिकांचा तो उपयोग करणार नाहीं. दुसऱ्या प्रत्येक वस्तूंविषयीं असेंच समजावें.

## ८ निर्भयताव्रत.

भित्रा मनुष्य सत्यव्रत पाळण्यास असमर्थ आहे, म्हणून व्यवस्थापक निर्भयव्रत पाळतील. ते राजा, प्रजा, चोर, कुटुंब यांची भीति बाळगणार नाहींत; मृत्यूचेंही भय बाळगणार नाहींत; आपलें व दुसऱ्याचें रक्षण सत्याग्रहानें म्हणजे आत्मबलानें करतील.

## ९ स्पर्शभावना व्रत.

रूढीधर्माप्रमाणें महार, चांभार, भंगी वगैरे अंत्यज जाति अस्पृश्य मानल्या गेल्या आहेत; त्यांचा स्पर्श झाल्यास इतर हिंदु जाति आपणास विटाळ झाला असें समजतात. हिंदु धर्मावर हा कलंक आहे असें आश्रमाचे व्यवस्थापकांस

वाटतें. व्यवस्थापक स्वतः कट्टे हिन्दु आहेत; पण हिन्दु लोक जोंपर्यंत कोणत्याहि जातीचा विटाळ मानतात तोंपर्यंत ते पापाचाच संचय करीत आहेत अशी त्यांची समजूत आहे. अशा प्रकारच्या वर्तनानें कित्येक फार भयंकर परिणाम घडलेले आहेत. या पापांतून मुक्त होण्यासाठीं आश्रमांत भंगी वगैरे लोकांस शिवण्यांत पाप मानिलें जात नाहीं. इतरांप्रमाणें अस्पृश्य जातींच्या लोकांनाहि या आश्रमांत दाखल होतां येतें.

## वर्णाश्रम.

आश्रमांत वर्णाश्रमधर्म **पाळिला जात नाहीं.** व्यवस्थापक हेच जेथें सर्वांना आईबापांच्या ठिकाणीं आहेत, तसेंच जेथें ब्रह्मचर्य-अपरिग्रहादि व्रतांचें पालन करावयाचें आहे, तेथें वर्णाश्रमांच्या भिन्न भिन्न आचारांस अवकाश रहात नाहीं. ही अवस्था संन्यस्तासारखी आहे. आणि ह्मणूनच येथें वर्णाश्रमधर्म पाळण्याची जरूर रहात नाहीं. तथापि हा आश्रम वर्णाश्रमधर्म पूर्णपणें **मानणारा** आहे. जातिभेदामुळें देशाचें नुकसान झालेलें नाहीं. उलट फायदाच पुष्कळ झाला आहे. एकत्र बसून जेविल्यानें भ्रातृभाव यत्किंचितहि वाढत नसतो. भोजनही दुसऱ्या अनेक दैनिक व्यवहाराप्रमाणें शरीराचें स्वाभाविक कार्य आहे. इतरांप्रमाणेंच तेंही वस्तुतः एकांतांतच झालें पाहिजे. वर्णाश्रम किंवा जातिभेद यांस या आश्रमापासून कोणत्याहि प्रकारें हानि होऊं नये ह्मणून आश्रमनिवासी जेव्हां बाहेर जातील तेव्हां त्यांनीं स्वतःचा स्वयंपाक स्वतः केला पाहिजे किंवा तसें करणें शक्य नसेल तर फळांवर निर्वाह केला पाहिजे असें ठरविलें आहे.

## धर्म.

आश्रमवासीयांची अशी समजूत आहे कीं धार्मिक वृत्तिरहित कोणतेंही कार्य खरोखर सफल होणार नाहीं. त्याच प्रमाणें सर्व प्रवृत्तींचा अंतिम उद्देश मोक्ष हाच असला पाहिजे. त्यांना असेंही वाटतें कीं धर्माचें ज्ञान बुद्धीच्या द्वारें होत नसून हृदयाच्या द्वारें होत असतें. कोणताही धर्म परिपूर्ण, सत्य किंवा असत्य नाहीं, सर्व आश्रमवासी आपापला धर्म पाळतात. आश्रमवासी दररोज सकाळसंध्याकाळ ईश्वरोपासनेसाठीं एकत्र जमतात. या उपासनेमध्यें असें धोरण ठेवण्यांत येतें कीं, कोणाच्याही धार्मिक वृत्तीला दुखवावयाचें नाहीं.

## स्वभाषा.

कोणतेंहि राष्ट्र किंवा समाज स्वभाषेचा त्याग करून आपली उन्नति करूं शकत नाहीं असा आश्रमवासीयांचा विश्वास आहे. ह्मणून सर्व शिक्षण ते स्वभाषेंतून संपादन करितील. हिंदुस्थानांतल्या इतर देशबंधूंशीं निकट संबंध ठेवण्याची त्यांची इच्छा असल्यामुळें प्रमुख देशी भाषांचा व त्या सर्वांची जननी जी संस्कृत भाषा तिचा अभ्यास करितील.

## शारीरिक परिश्रम.

सृष्टिनियमानुसार शारीरिक परिश्रम हें मनुष्याचें प्रधान कर्तव्य होय असा आमचा विश्वास आहे. मनुष्यजातीच्या उपजीविकेचें साधन केवळ शारीरिक श्रम हेंच आहे. आपली मानसिक व आत्मिक शक्ति यांचा उपयोग भोगविलासांकडे न करितां परोपकारानिमित्तच करणें उचित आहे.

## हातमाग.

देश निर्धन होण्याचें कारण देशी सुताचे व हातमागाचे कारखाने यांचा नाश हें होय असें व्यवस्थापकांस वाटतें. तेव्हां ते स्वतः हातमागाचें कापड तयार करतील व तद्द्वारा त्यांच्या जीर्णोद्धारार्थ यथाशक्ति झटतील.

## शेती.

भारतवर्षांतील कोट्यवधि मनुष्यें केवळ शेतीचाच धंदा करीत असतात. शेतकीच्या कामांत व्यायाम फार चांगला मिळतो. शेतकीवरच जगाचा निर्वाह चाललेला आहे. शेकऱ्यांच्या स्थितीची कल्पनाही सर्वांना येणें अवश्यक आहे. या सर्व गोष्टी साधण्यासाठीं, शेतकी हेंही अंग आश्रमाच्या कार्यांत समाविष्ट झालें पाहिजे. अमदाबादच्या जवळ साबरमतीचे तटाकीं जवळ जवळ दीडशें बिघे जमीन घेतलेली असून आश्रम बांधण्याचें काम चालू आहे. या जमिनीवर पुढें शेतकीचें काम केलें जाईल.

## राजनीति.

राजनीति, आर्थिक उन्नति असे वेगळे विषय नाहींत. धर्म हें त्या सर्वांचें मूळ आहे या दृष्टीनें व्यवस्थापक राजकीय, आर्थिक, सामाजिक व व्यावहारिक वगैरे

विषयांचा अभ्यास धर्मनिष्ठापूर्वक करितील व करावितील. आणि ह्या विषयांच्या चळवळींत यथाशक्ति उत्साहपूर्वक काम करितील.

## आश्रम प्रवेश.

१. बारा वर्षांच्या आंतील मुलास किंवा मुलीस दाखल करण्यांत येणार नाहीं. मात्र अशा लहान मुलांचे आईबाप आश्रमांत दाखल झाल्यास त्यांच्या मुलांस घेण्यास हरकत नाहीं.

२. आईबापांना मुलावरील सर्व अधिकार काढून घ्यावा लागेल.

३. अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी कोणत्याहि कारणामुळें आईबापांजवळ जाऊं शकणार नाहीं.

४. व्यवस्थापकांनीं पाळावयाचीं सर्व व्रतें पाळण्यास मुलांसहि शिकविलें जाईल.

५. त्यांना धर्म, शेती, विणकाम वगैरे शिकाविण्यांत येईल व पुस्तकी शिक्षणहि दिलें जाईल.

६. पुस्तकी शिक्षण सर्व स्वभाषांतून दिलें जाईल. यांत इतिहास, भूगोल, अंकगणित, बीजगणित, भूमिति, अर्थशास्त्र, आरोग्यशास्त्र इत्यादि विषयांचा समावेश होईल. संस्कृत, हिन्दी व द्राविडी भाषा यांचें शिक्षण आवश्यक राहील.

७. इंग्रजी ही दुसरी भाषा ह्मणून शिकविण्यांत येईल.

८. देवनागरी, बंगाली, गुजराथी, तेलगु, तामील व उर्दू या लिप्यांचें ज्ञान सर्वांस दिलें जाईल.

हल्लीं बहुधा नवीन विद्यार्थी दाखल केले जात नाहींत.

आश्रमाचा खर्च मुख्य व्यवस्थापकाला मिळालेल्या व ज्यांची आश्रमावर थोडी बहुत श्रद्धा आहे अशा त्याच्या मित्रांकडून मिळालेल्या साहाय्यावर चालला आहे.

आश्रम सध्या साबरमती नदीच्या तटाकीं साबरमती स्टेशनपासून दीड मैलावर आहे. " **सत्याग्रहाश्रम, साबरमती, गुजराथ**" एवढा पता लिहिल्यानें पत्रे पोंचतात.

## सूचना.

आश्रम पाहूं येणाऱ्या सद्गृहस्थांस अशी विनंति आहे कीं, आश्रमांत असे पर्यंत त्यांनीं आश्रमाचे नियम पाळावे. त्यांचें आतिथ्य पूर्णपणें करण्याचा प्रयत्न केला जाईल. शक्य तितक्या कमी वस्तु राखण्याचा ( अपरिग्रह ) आश्रमाचा नियम असल्यामुळें येथें येणारे गृहस्थ आपली रजई, चादर, तांब्या व ताटवाटी बरोबर आणतील तर फार उपकार होतील. आपल्या मुलांना आश्रमांत ठेवण्याची आईबापांची इच्छा असेल तर त्यांनीं अगोदर आश्रम अगत्य पाहून जावें. आश्रमांत येणाऱ्या माणसाचा अनुभव घेतल्या शिवाय एकदम त्यास दाखल करितां येणार नाहीं.

## दिनक्रम.

आश्रमांतील सर्व जणांनीं चार वाजतां उठावें असा प्रयत्न करण्यांत येतो. पहिली घंटा चार वाजतां होते.

५–३० वाजतां आजाऱ्यांखेरीज सर्वांनीं उठलेंच पाहिजे. ६ वाजण्यापूर्वीं स्नान केलें पाहिजे.

६ ते ६–३० ईश्वरभजन व थोडें धार्मिक वाचन.

६–३० ते ७ सकाळचें खाणें.

७ ते ८–३० अंगमेहनत म्हणजे पाणी भरणें, दळणें, केर काढणें, कापड विणणें, स्वयंपाक करणें वगैरे.

८–३० ते १० पुस्तकी शिक्षण.

१० ते १२ जेवणें, भांडीं घांसणें.

१२ ते ३ पुस्तकी शिक्षण.

३ ते ५ सकाळच्या प्रमाणें अंगमेहनत.

५ ते ६–३० जेवणें, व भांडीं घांसणें.

६–३० ते ७ सकाळच्या प्रमाणें ईश्वरभजन.

७ ते ९ खासगी अभ्यास, आलेल्यास भेटणें इत्यादि.

लहान मुलें नऊ वाजण्यापूर्वीं निजतात. दहा वाजतां दिवे मालविले जातात.

# आश्रमाला कोण व कशा रीतीनें मदत करूं शकेल ?

ह्या प्रश्न वारंवार विचारण्यांत येत असल्यामुळें त्याचें उत्तर खालीं दिलें आहे. ज्यांना आश्रमाचें कार्य पसंत आहे त्यांची आश्रमास थोडीबहुत मदत होतच आहे.

२ आश्रमाचे नियम ज्यांना पसंत आहेत व ते नियम जे स्वतः पाळतात त्यांची पहिल्या प्रकारच्या लोकांहून विशेष मदत होते; अशा प्रकारें अधिक नियम पाळणारे लोक अधिक मदत करतात असें होतें.

३ आश्रमाचें मूळतत्त्व—' धर्मवृत्तिशिवाय-सच्छीलाशिवाय देशसेवा अशक्य आहे ' शीलवान् बनणें हीच उत्तम देशसेवा होय. ही गोष्ट समजल्यास व ह्या विचाराचा प्रसार केल्यास आश्रमाला फारच मोठी मदत होईल.

४ पण शील वगैरे गोष्टींच्या भानगडींत ज्यांना पडावयाचें नसेल, रसास्वादाचा ह्व्यास सोडण्याची पंचाईत ज्यांना करावयाची नसेल अशा लाखों लोकांनाहि स्वदेशीव्रत व स्वभाषेची उन्नति हीं दोन कामें उत्तम रीतीनें करतां येतील आणि तेवढयानेंहि देशोद्धाराचें बरेंच कार्य होईल.

५ वर लिहिलेल्या कोणत्याही प्रकारें आश्रमास मदत करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आपलीं नांवें पाठविल्यास त्यांची नोंद ठेवून प्रसंगीं कांहीं काम करण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांस त्याविषयीं सूचना करतां येईल.

# पहिली गुजराथ-राजकीय-परिषद्.

( अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण. )

( ‘ आत्मोद्धार ’ वरून )

बंधुभगिनींनों,

मला हें उच्च पद दिलें यावद्दल मी आपणां सर्वांचे आभार मानतों. येथील राजकीय विषयांत मी अडीच वर्षांचें बालक आहें. दक्षिण आफ्रिकेंतील माझ्या अनुभवाच्या भांडवलावर मी येथें व्यापार करूं शकणार नाहीं. अशा स्थितींत मी हें पद ग्रहण करणें म्हणजे जरा उद्धटपणाच आहे हें मी जाणतों. तरी आपल्या प्रेमाला वश होऊन मीं ह्या पदाचा स्वीकार केला आहे.

## माझे विचार.

माझ्या जबाबदारीची मला चांगली जाणीव आहे. ही परिषद् गुजराथेंत पहिलीच आहे. सर्व हिंदुस्थानला हा प्रसंग फार आणीबाणीचा आहे. साम्राज्यहि आजपर्यंत कधींहि नव्हतें अशा संकटावस्थेंत आज आहे. माझे विचार, सामान्य विचारप्रवाहापेक्षां कांहींसे विरुद्ध दिशेनें वाहत आहेत याची मला जाणीव आहे. तेव्हां हें पद ग्रहण करण्याचा अधिकार मला थोडाच असणार ! बहुतकरून अध्यक्षाचें भाषण हें सभेच्या विचारांचें दर्शक असतें. माझ्याविषयीं मला तसें म्हणतां येत नाहीं. अशा सुंदर वेळीं माझे विचार गुर्जरबांधवांपुढें मांडण्याची संधि आपण मला दिलीत, यावरून आपली उदारबुद्धि दिसून येते. त्या विचारांवर या मंडळांत टीका झाली, त्यांच्यासंबंधीं मतभेद झाला, त्यांच्यावर सणसणीत टीका झाली, तर त्याचें मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. मोकळेपणानें त्यांच्यावर चर्चा व्हावी अशी माझी इच्छा आहे. त्यांच्यासंबंधानें मला एवढेंच म्हणतां येईल कीं, ते आजकालचे नाहींत, पुष्कळ वर्षांचे आहेत. त्यांच्यावर मी मोहित आहें, व अडीच वर्षांच्या अनुभवानें त्यांत कांहीं फरक पडलेला नाहीं.

या परिषदेची कल्पना ज्यांच्या डोक्यांत आली व ज्यांनीं ती अमलांत आणिली, त्यांना मी धन्यवाद देतों. गुजराथेनें टाकलेलें हें पाऊल फार महत्त्वाचें आहे व त्याच्यापासून फार चांगले परिणाम आपणांला उत्पन्न करतां

येतील. ही परिषद् गुर्जरोन्नतिमंदिराचा पाया होय. हा पाया जर खरा व मजवूत असेल तर इमारतीविषयीं आपणाला निश्चित राहतां येईल. म्हणून ह्या बैठकीची जवाबदारी मोठी आहे. माझी ईश्वरापाशीं प्रार्थना आहे कीं, तो सर्वांना सन्मति देवो आणि आपलें कार्य जनसमाजाला भविष्यकालीं लाभदायक होवो.

## " राजकीय " म्हणजे काय ?

ही परिषद ' राजकीय ' आहे. राजकीय या शब्दाचा अर्थ बहुधा संकुचित केला जातो. मला वाटतें, त्याचा अर्थ विशेष व्यापक केल्यानें अधिक लाभ होईल. असल्या परिषदांचें काम जर राजा आणि प्रजा यांच्या संबंधाचा विचार करूनच संपविलें तर तें अपुरेंच राहील, व या परस्परसंबंधाची कल्पनाहि आपल्याला पूर्णपणें होऊं शकणार नाहीं. उदाहरणार्थ, मोहडयांच्या फुलांचा प्रश्न गुजराथच्या कित्येक विभागांत फार महत्त्वाचा आहे. त्याचा विचार फक्त राज्यपरत्वेंच केल्यानें कदाचित् कटु परिणाम होईल, अथवा इष्ट परिणाम होणारच नाहीं. पण मोहडयांच्या कायद्याच्या उत्पत्तीचा विचार करून आपणां स्वतःला त्या संबंधांत काय करतां येईल याचाहि जर त्याबरोबरच विचार केला, तर सरकारापाशीं कराव्या लागणाऱ्या झगडयांतहि विजय लवकर मिळण्याचा संभव आहे. आणि झगडण्याची गुरुकिल्लीहि आपणांला सहज मिळण्याजोगी आहे. मी जे विचार निवेदन करणार आहें, त्यांवरून ' राजकीय ' या शब्दाचा माझा अर्थ आपल्या विशेष ध्यानांत येईल.

## कार्यकारी मंडळ बनवा.

परिषदा भरतात, लोक घरोघर चालते होतात; पण मागें कार्य करणारीं माणसें ठेवीत नाहींत. ठेविलींच तर तीं सर्व कै० गोखले यांच्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे स्वतःच्या धंद्यांतून उरणाऱ्या वेळांत काम करणारीं असतात. आपल्याला अशीं माणसें पाहिजेत कीं, ज्यांचा मुख्य आणि खास धंदाच परिषदांच्या कार्यांची अमलबजावणी करणें हा असावा. अशीं पुष्कळशीं माणसें मिळतील तेव्हांच परिषदांचीं कार्यें तेजस्वी व फलदायी होतील. हल्लीं पुष्कळसें काम फुकटच जातें. हिन्दसेवक—समाजासारख्या अनेक संस्थांची देशांत जरूर आहे. सेवा हाच धर्म मानणारे पुष्कळसे उत्पन्न होतील तेव्हांच महान् परिणाम दिसूं लागतील.

हिंदुस्थान हा आपल्या सुदैवानें धर्मबद्ध देश आहे. यामुळें देशसेवा हीच सध्यांचे कालीं धर्माची परिसीमा आहे. हा विचार उत्पन्न झाल्यास धर्मवृत्तीचीं माणसें राजकीय कामांत अधिकाधिक पडूं लागतील. जेव्हां साधु-सन्त हें प्रकरण हातीं घेतील तेव्हां हिंदुस्थान इष्ट कार्यं सहज पार पडूं शकेल अशी माझी समजूत आहे. तें कसेंही असो, ह्या परिषदेनें एक खरें खरें कार्यकारी मंडळ निर्माण केल्यास विशेष शोभेल.

## बेझंटबाईंची कामगिरी.

देशांत स्वराज्याचा ध्वनि जिकडे तिकडे ऐकूं येत आहे. विदुषी बाई ॲनी बेझंट यांनीं लाखों पुरुषांना स्वराज्याचा मंत्र जपण्यास शिकविलें आहे. जी वस्तु दोन वर्षांपूर्वीं पुष्कळ स्त्रीपुरुषांना माहीतहि नव्हती, तीच या बाईंनीं स्वतःच्या चातुर्यानें व अचाट प्रयत्नानें प्रचलित केली आहे. स्वराज्य थोडयाच काळांत मिळणार अशी आशा वाटूं लागली आहे. या गोष्टीबद्दल या बाईचें नांव इतिहासांत अजरामर होणार यांत शंकाच नाहीं. स्वराज्य हें राष्ट्रीय सभेचें ध्येय होतें. मिसेस बेझंट यांचा तो नवा विचार नव्हता. पण स्वराज्य ही थोड्या काळांत साध्य होण्यासारखी वस्तु आहे ही गोष्ट समजावून सांगणारी ही बाईच समजली जाईल. या कामगिरीबद्दल त्यांचे आभार जितके मानावे तितके थोडेच आहेत. त्यांना आणि त्यांचे सहकारी मि. अरुंडेल व मि. वाडिया यांना मुक्त करण्यांत सरकारनें मेहेरबानी केली आहे, व स्वराज्याची चळवळ योग्य असल्याचें कबुल केलें आहे. जें औदार्य सरकारनें मिसेस बेझंट व त्यांच्या मदतनिसांच्या बाबतींत दाखविलें तेंच भाई महमदअल्ली व भाई शौकतअल्ली यांच्या बाबतींतहि सरकारनें दाखवावें हें इष्ट आहे. ह्या उभय बंधूंसंबंधानें सर विलियम् व्हिन्सेंट यांनीं जे उद्गार काढले ते किती विचारणीय आहेत तें पहाण्याची खास जरूर नाहीं. प्रजेची मागणी कबूल करून त्यांना सोडल्यानें कांहीं अयोग्य परिणाम न होईल याबद्दलची जबाबदारी सरकारनें प्रजेवर संपवून तिला विशेष ऋणी बनवावें. या दोघां बन्धूंना जेथपर्यंत सरकारनें सोडलें नाहीं, तेथपर्यंत सरकारचें औदार्य अपुरें दिसेल. सरकार ही अपूर्णता काढून टाकून प्रजेचें चित्त हरण करून तिला आपलीशी करील अशी आपण आशा राखूं या.

## मॉंटेग्यूकडे मागणीचा अर्ज.

मेहेरबान मॉंटेग्यु साहेब येत आहेत; त्यांना सादर करण्यासाठीं जो अर्ज तयार केला गेला आहे, व ज्यावर सह्या होत आहेत, त्याचा मुख्य हेतु लोकशिक्षण हा आहे.

स्वराज्य मिळविण्यास अक्षरज्ञानाची जरूर आहे, हें म्हणणें म्हणजे इतिहासाचें अज्ञान दाखविणें आहे. 'मला माझें काम स्वतः करावयाचें आहे.' ही भावना जनसमूहांत उत्पन्न करण्याला अक्षरज्ञानाची जरूर नाहीं. या विचाराची, या इच्छेची जरूर आहे. शेंकडों अशिक्षित राजांनीं अति उत्तम रीतीनें राज्यें चालविलीं आहेत. ही भावना लोकांत कितपत आहे तें पाहून, नसेल तेथें ती उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें हा त्या अर्जाचा उद्देश आहे. लाखों स्त्रीपुरुषांनीं तो अर्ज समजून घेऊन त्यावर सह्या केल्या पाहिजेत. अशा अर्जाचें वजन मे. मॉंटेग्यु साहेबांवर पडणें हा त्या अर्जाचा सहज परिणाम आहे.

राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग यांनीं स्वीकारलेल्या योजनांत दोष पहाण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. सबब त्या योजनेंतील गुणदोष पहाण्याची आवश्यकता नाहीं. लोकाग्रणींनीं पुष्कळ विचार करून केलेली योजना देशाच्या सांप्रतच्या कार्यसिद्धीला पुरेशी आहे असें समजून, तिचा अंमल लवकर व्हावा एतदर्थ श्रद्धापूर्वक प्रयत्न करणें हेंच आपलें कर्तव्य आहे.

**ही योजना म्हणजे कांहीं स्वराज्य नव्हे. पण त्या शिडीवर चढविणारी मोठी पायरी आहे.** कित्येक इंग्रजी टीकाकार असा आक्षेप काढतात कीं, आम्हांला स्वराज्य भोगण्याचा हक्क नाहीं. कारण जो वर्ग स्वराज्याची मागणी करीत आहे, त्या वर्गाच्या अंगीं देशाचें रक्षण करण्याची शक्तिच नाहीं. 'काय इंग्रजच हिंदुस्थानची शिपाईगिरी करतील, आणि प्रजा राज्यसत्ता चालवितील ?' हा आक्षेप हास्यजनक आहे, व दुःखद आहे.

## आम्ही शिपायगिरी करणार नाहीं ?

हास्यजनक अशासाठीं कीं, हे इंग्रजबंधु स्वतःला आमच्यापासून निराळे मानतात. आपली इच्छा तर अशी आहे कीं, ब्रिटनच्या बरोबरच राहून स्वराज्य

चालवावें. येथें घर करून राहिलेल्या इंग्रजांनीं हिंदुस्थान सोडून द्यावें अशी आपली इच्छा नाहीं. स्वराज्यांत तेहि आमचे भागीदार होतील; अशा रचनेंत शिपाईगिरी कदाचित् त्यांच्या वांट्याला आली तरी त्यांनीं तक्रार करावी असें त्यांत कांहींच नाहीं. पण आम्ही शिपाईगिरी करणार नाहीं, ही त्यांची समजूतहि उतावळेपणाची आहे. हिन्दुस्थानची वृत्ति सैन्यबळ वाढविण्याची होईल त्या वेळीं हें फार थोड्या काळांत प्राप्त होण्यासारखें आहे. मारण्याची शक्ति हा कठोर वृत्तीचा परिणाम आहे. कठोर वृत्तीचें पोषण करण्यास वेळ लागत नाहीं; गवताप्रमाणें ती झपाट्यानें वाढते. आक्षेप दुःखद अशासाठीं कीं, तो ऐकून आपल्याला सरकारनें आजपर्यंत लष्करी शिक्षण दिलें नाहीं या गोष्टींचें स्मरण होतें. आमच्यांत मर्दुमकी असावी अशी जर सरकारची इच्छा असती, तर आज शिक्षितवर्गाचें मोठें लष्कर तयार रहातें. शिक्षित लोक लढाईवर गेले नाहींत याचा दोष शिक्षित वर्गापेक्षां सरकारच्या माथीं फार मोठा आहे. सरकारचें राज्यधोरण प्रथमपासूनच निराळें असतें तर आज सरकारपाशीं अजिंक्य सेना तयार असती. पण सांप्रतच्या स्थितीचा दोष कोणावर ?

जेव्हां इंग्रजी सत्ता स्थापन झाली, त्या वेळीं कोट्यावधि लोकांवर सत्ता चालवितां यावी म्हणून त्यांना शस्त्ररहित व लष्करीशिक्षणरहित राखणें शहाणपणाचें वाटलें. आतां गुजराथी म्हणीप्रमाणें 'जागे झालों तेव्हांपासूनच सकाळ' मानून राजा व प्रजा या दोघांनींहि झालेली चूक दुरुस्त करावयाची आहे.

## ह्या कर्मभूमीची तपश्चर्या.

हे विचार चालू प्रवाह योग्य आहे अशा समजुतीवर सांगितले. मला स्वतःला चालू स्थिति सर्वस्वी योग्य आहे असें वाटत नाहीं. हल्लीं आपण जी चळवळ चालविली आहे ती पाश्चात्य पद्धतीची आहे, जें स्वराज्य इच्छीत आहोंत तेंहि पाश्चात्य पद्धतीचें आहे, त्याची प्राप्ति झाल्यानें आपणांस पाश्चात्य देशांशीं चढाओढ करावी लागणार आहे. पुष्कळांचें मत आहे कीं, ही चढाओढ अपरिहार्य आहे. मला तसें वाटत नाहीं. हिंदुस्थान म्हणजे कांहीं युरोप नव्हे, जपान नव्हे, चीन नव्हे, ही गोष्ट मी विसरूं शकत नाहीं. हिंदुस्थान कर्मभूमि आहे. बाकीच्या भोगभूमि आहेत. ही देववाणी आहे. ती माझ्या मनांत ठसून गेलेली आहे.

हिंदुस्थान धार्मिक साम्राज्य भोगण्यास योग्य देश आहे. या देशांत जशी तपश्चर्या झालेली आहे तशी ती दुसऱ्या कोठेंहि झालेली नाहीं. हिंदुस्थानला लोखंडी शस्त्रांची गरज फार कमी आहे. तें दिव्यास्त्रांनीं लढत आलें आहे; अझूनहि लढूं शकतें. इतर राष्ट्रांनीं शरीरबलाची पूजा चालविली आहे. युरोपांतील दारुण युद्ध याचें प्रत्यंतर दाखवितें. हिंदुस्थान आत्मबलानें सर्व जिंकूं शकतें. आत्मबलाच्या पुढें शरीरबल तृणवत् आहे. याचीं उदाहरणें अनेक आहेत. त्यांचें कवींनीं गान केलें आहे, अनुभविकांनीं वर्णन केलें आहे. तीस वर्षांचा धष्टपुष्ट तरुण ऐंशीं वर्षांच्या पित्यापाशीं गोगलगायीसारखा वागतो, हें प्रेमाचें माहात्म्य आहे. प्रेम हाच आत्मा होय. प्रेम हा आत्म्याचा गुण आहे, ह्याच प्रेममंत्राचा प्रयोग सर्व जगावर आपल्याला करतां येण्यासारखा आहे. धर्मावरील श्रद्धा नष्ट झाल्यामुळें हल्लींच्या 'वायू' च्या झपाट्यांत आपले पाय स्थिर रहात नाहींत. या गोष्टींविषयीं थोडा अधिक विचार पुढें करूं.

## माझ्या डोळ्यांची साक्ष.

माझे विचार हे असे असूनहि मी स्वराज्याच्या चळवळींत काम करतों. कारण सरकारची राज्यपद्धति ही आधुनिक आहे. या पद्धतीचें शुद्ध स्वरूप म्हणजे पार्लमेन्ट होय असें खुद्द सरकार मानतें. असें पार्लमेण्ट आपल्याला न मिळालें तर आपली स्थिति 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी होईल. मिसेस बेझंट यांचें एक वाक्य अक्षरशः खरें आहे कीं, हिंदुस्थानास स्वराज्य न मिळेल तर हिंदुस्थानभर उपासमारीचा रोग फैलावेल. मी आंकडेशास्त्रांत पडूं इच्छीत नाहीं. माझ्या डोळ्यांची साक्ष मला पुरे आहे. ती साक्ष अशी आहे कीं, हिंदुस्थानचें दारिद्र्य वाढत चाललें आहे. दुसरें काय शक्य आहे ? जो देश कच्चा माल बाहेर टाकून त्याच्यापासून बनलेला पक्का माल घेतो, स्वतः कापूस पिकवीत असतां जो देश कोट्यावधि रुपये कापडासाठीं परदेशीं जाऊं देतो, तो देश, भुकेबंगाल कसा नसेल ? विवाह वगैरे मंगल कार्यांत केला जाणारा खर्चहि जेथें उधळपट्टी गणली जाते तो देश भिकारीच होय. ज्या देशांतील मोठ्या अंमलदारांच्या पगाराचा विशेष भाग परदेशांत खर्ची पडतो, त्या देशांतील लोक दिवसेंदिवस कंगाल बनलेच पाहिजेत. ज्या देशांतील लोक लोकरीचीं वस्त्रें मिळत नसल्यामुळें थंडीची हुडहुडी घालविण्यासाठीं सोन्यासारखें खत शेकण्यासाठीं वापरतात, त्या देशाचें

दारिद्र्य अठरा विसव्यांत कमी भरेल काय ? सर्व हिंदुस्थानभर हिंडतांना मीं लोकांत तेज कोठेंहि पाहिलें नाहीं. मध्यम वर्गाला महाव्यथेनें घेरलें आहे.

## हिंदुस्थान दरिद्री होत आहे.

कनिष्ट वर्गाची वर आकाश आणि खालीं जमीन अशी स्थिति आहे, त्याला सुदिन असा नाहींच. हिंदुस्थानाची संपत्ति दागिन्यांत नाहीं, जमीनींत पुरलेलीहि नाहीं. ह्या केवळ कल्पना आहेत. लोकांची प्राप्ति वाढली नाहीं व खर्च मात्र मनस्वी वाढला आहे. ही दशा सरकारनें जाणून बुजून केली नाहीं, सरकारचे हेतु शुद्ध आहेत असें मी मानतों. त्याची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, प्रजेची उन्नति होत आहे. स्वतःच्या ' नील पुस्तका ' वर सरकारची अचल श्रद्धा आहे. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, आंकड्यांनीं हवी ती गोष्ट सिद्ध करतां येते; ती अगदीं खरी आहे. आंकडेशास्त्री हिंदुस्थानची भरभराट होत आहे असें म्हणतात. माझ्या सारखे धोपट दृष्टींचे लोक तें ऐकून शंकेनें माना हालवितात. वरून परमेश्वरानें येऊन जरी मला कांहीं भलतेंच सांगितलें तरी मी जरूर म्हणेन कीं, हिंदुस्थान दरिद्री होत चाललें आहे. हें मला प्रत्यक्ष दिसतें.

## स्वराज्याची व्याख्या.

तर मग आमचेंच पार्लमेंट असलें तर काय करील ? हिंदुस्थानचें पार्लमेंट झालें म्हणजे आपल्याला चुका करण्याची आणि त्या सुधारण्याची सत्ता मिळेल. आपण प्रारंभीं चुका करणारच, पण आपलें रक्त ह्याच देशांतील असल्यामुळें ह्या चुका सुधारण्यासहि आम्हांला वेळ लागणार नाहीं. आणि देशांतील उपासमारीवरचा उपाय आपल्याला तत्काळ सांपडेल. त्या वेळीं आपण लँकाशायरच्या वस्तूंवर जगणारे रहाणार नाहीं. त्या वेळीं कुबेराची संपत्ति खर्चून बादशाही दिल्ली बांधणार नाहीं. आमच्या बादशाही दिल्लीचा आकारहि हिंदुस्थानच्या झोंपड्यांना अनुसरूनच राहील. झोंपड्या व पार्लमेंट ह्यांच्यामध्यें कांहीं प्रमाण तरी राहीलच. प्रजा आज बिचारी रंक बनली आहे. तिला चुका करण्याचीहि मोकळीक नाहीं. ज्याला चुकी करण्याचाच हक्क नाहीं तो कधींहि सुधारणा करूं शकत नाहीं. हाऊस ऑफ कॉमन्सचा इतिहास म्हणजे चुकांचा इतिहास आहे. ' इन्सान चुकांचा पुतळा आहे ' अशी अरबी म्हण आहे. **चुका करण्याची मोकळीक व त्या**

**सुधारण्याची सत्ता ही स्वराज्याची एक व्याख्या** आहे; आणि हें स्वराज्य पार्लमेंट ह्या संस्थेंत आहे.

## आम्हीं आज लायक आहोंत.

पार्लमेंट आजच पाहिजे. तें घेण्यास आपण आजच लायक आहोंत. म्हणजे तें आपण मागूं तेव्हांच मिळेल. ' आजच ' केव्हां येईल ही गोष्ट आपल्या स्वतःवर अवलंबून राहील.

ब्रिटिश प्रजेपाशीं रडगाणें गाइल्यानें स्वराज्य मिळणार नाहीं. ब्रिटिश लोक असल्या मागण्या ओळखीत नाहींत. ते म्हणतील " आम्हीं स्वराज्य मागायला कोणापाशीं गेलों नाहीं. आम्ही आमच्या बळावर तें मिळविलें आहे. तुम्हांला तें मिळालें नाहीं याचें कारण तुम्ही नालायक आहांत. लायक व्हाल तेव्हां स्वराज्य तुम्हांला मिळेलच. "

ही लायकी यावी कशी ? आपण हिंदी प्रजेजवळ स्वराज्य मागितलें पाहिजे. आपला अर्ज तिजपुढें आहे. जेव्हां हिंदी शेतकरी स्वराज्य म्हणजे काय हें जाणतील, तेव्हां कोणी एक घटकाभर देखील स्वराज्य थांबवूं शकणार नाहीं.

सर विल्यम हंटरसाहेब यांनीं लिहिलें आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यांत इच्छित वस्तु मिळविण्याचा सर्वांत सरळ मार्ग रणभूमीवर विजय मिळविणें हाच होय. आज जर आपला सुशिक्षित वर्ग लढाईवर जाऊं शकला असता, तर आजच मागितलेलें मिळालें असतें; आणि त्याची गोडी देखील कांहीं निराळीच असती.

आपण पुष्कळ वेळां म्हणतों कीं, हिंदुस्थानाचे शिपाई फ्रान्स व मेसापोटेमियांत धारातीर्थी पडले आहेत. याचें श्रेय आपणां सुशिक्षित वर्गाला घेतां येणार नाहीं. ते शिपाई आपण तयार केले नाहींत, ते देशाभिमानास्तव लढाईवर गेले नाहींत, स्वराज्याची त्यांना वार्ताहि नाहीं. लढाईनंतर ते स्वराज्य मागणार नाहींत. स्वतःला भाकरी देणारासाठीं हे निमकहलाल लोक प्राण देण्यास गेले आहेत. स्वराज्याची मागणी करते वेळीं या शिपायांना आपण मध्यें आणतां कामा नये असें मला वाटतें. आपल्याला इतकेंच म्हणतां येईल कीं, सुशिक्षित लोक समरांगणावर गेले नाहींत याचा दोष त्यांच्याकडे नाहीं.

## राजनिष्ठेची मीमांसा

आपण कठीण समयीं राजनिष्ठा दाखविली आहे हेंहि आमच्या पात्रतेचें लक्षण नव्हे. राजनिष्ठा हा गुण नाहीं. ह्या प्रजास्थितीची सर्वत्र आवश्यकता आहे. राजनिष्ठेनें कांहीं स्वराज्य मिळणार नाहीं, ही स्वयंसिद्ध गोष्ट आहे. आपल्याला **स्वराज्य मिळविण्याची तीव्र इच्छा** उत्पन्न झाली आहे **हीच आपली खरी पात्रता** आहे. आणि **ब्रिटिश अंमलदारांनीं** कितीहि शुद्ध दानत राखून कारभार चालविला असला तरी त्यांचे **दिवस आतां भरले आहेत, अशी आपली खात्री** झालेली आहे **हीच आमची लायकी आहे.** आणि खरें म्हटलें तर एवढी लायकी आपल्या कार्याला पुरेशी आहे. **स्वराज्याशिवाय आतां हिंदुस्थानांत शान्ति नांदणें अशक्य आहे.**

पण स्वराज्याची चळवळ जर आपण सभा भरवूनच करीत राहिलों तर जनसमूहाची हानि होण्याचा संभव आहे. समारंभ आणि सभा योग्य वेळीं आणि योग्य जागीं शोभतात, पण फक्त सभा व भाषणें यांनीं राष्ट्रें उभारलीं जात नाहींत.

## स्वराज्यसोपानाच्या पायऱ्या.

ज्या लोकांत स्वराज्याचे तरंग उसळत असतील त्यांच्यांत सर्व बाजूंनीं जागृति दिसेल. स्वराज्याची पहिली पायरी व्यक्ति हीच होय. 'जें पिंडीं तेंच ब्रम्हांडीं,' हें महावाक्य या बाबतींतही लागू पडतें. जर आपल्या अंतःकरणांत निरंतर युद्धच चालत असेल, जर आपण वांकड्या मार्गानें जात असूं, इंद्रियांना वश राखण्याच्या ऐवजीं जर इंद्रियेंच आपणाला गुलामाप्रमाणें वागवीत असतील तर स्वराज्याचा तरी काय अर्थ असणार ? पहिली पायरी स्वतःचें राज्य स्वतःवर असणें ही आहे.

यानंतर कुटुंब, कुटुंबामागून जात, व जातीनंतर शहर, असा हा क्रम आहे. खरोखर शहरच्या व्यवस्थेंत स्वराज्याची गुरुकिल्ली आहे व म्हणून त्यासंबंधानें आपण जास्त विचार केला पाहिजे. आपण आपल्या शहरांची स्थिति सुधारली नाहीं, आपल्या वाईट संवयी टाकिल्या नाहींत, आपले शौचकूप स्वच्छ केले नाहींत तर स्वराज्याची आपल्याला कांहींच किंमत नाहीं असें होईल.

सर्वोपेक्षां उपयोगी सेवक जे भंगी त्यांना आपण अस्पर्श्य समजतों. त्याचा परिणाम हा झाला कीं, आपले शौचकूप आपण त्यांना पूर्णपणें स्वच्छ करूं देत नाहीं, व धर्माच्या मिषानें स्वतः ते स्वच्छ करण्यांत विटाळ समजतों. यामुळें जातीनें शुद्ध मानले जात असतांहि आपल्या घराचा एक भाग, जगांतील इतर देशांत असतो त्यापेक्षां अतिशय घाणेरडा रहातो; आणि घाणेरड्या हवेंत आपण वाढतों. आपण केवळ खेडेगांवांतून रहात होतों तेथपर्यंत आपण कांहींसे सुखी होतों, पण शहरांत राहूं लागल्यापासून वरील ओंगळ संवयींनीं आपण नेहमीं आत्महत्या करीत राहिलों आहोंत.

## डाकोर क्षेत्राची दुर्दशा !

ज्या देशांतील लोक अकाळीं मृत्युमुखीं पडत असतील, तेथें धर्म, कर्म, आचार यांचा अभाव आहे असें खास समजावें. प्लेग नाहींसा करणें, मला वाटतें, आपल्या शक्तीबाहेरचें नाहीं. प्लेगला गचांडी जर आपण देऊं शकलों, तर त्यानें जितके आपण स्वराज्याला पात्र होऊं तितके महाचळवळींनींही होणार नाहीं. शेजारींच डाकोर क्षेत्र आहे. त्या पवित्र धामाच्या अपवित्रतेला सीमा नाहीं. मी स्वतःला शुद्ध वैष्णव समजत असल्यामुळें या विषयीं टीका करण्याचा मला विशेष अधिकार आहे. डाकोर क्षेत्र इतकें घाणेरडें आहे कीं, स्वच्छतेंत रहाणाऱ्या माणसाला तेथें एक दिवस रहाणें मुष्किलीचें आहे. यात्रेकरू लोक-आपल्या इच्छेस येईल तसा तलाव बिघडवितात, रस्ते बिघडवितात, महाजन भांडतात. आणि रणछोडरायाच्या आभूषणांवर "रिसीव्हर" नेमले गेले आहेत हें वरती ! ही स्थिति सुधारणें हें आपलेंच काम आहे. स्वराज्य घेण्यास निघालेले आपण गुजराथी भाई जर आपलीं अंगणें सुधारूं शकलों नाहीं तर मग स्वराज्यसेनेंत काय विजय मिळविणार ?

शहरांतील शिक्षणाचा विचार करतांनाही निराशाच होते, स्वतःच्या बळावर शेकडों लोकांना शिक्षण देणें हें आपलें उघड उघड कर्तव्य आहे. त्या ऐवजीं हजारों बालकें शिक्षणावांचून रहात आहेत आणि शहरांतून दारूचें व्यसन वाढत आहे. जुगार वाढत आहे. याचा उपाय आपण केला नाहीं तर स्वराज्य कसें घेणार ? स्वराज्य याचा अर्थच हा कीं, स्वतःचा कारभार स्वतः पहावयाचा.

आपल्या मुलाबाळांच्या आणि आपल्या तोंडांतून दूध कायमचें जाण्याची वेळ आली आहे असें वाटतें. गुजराथेंत डेऱ्यांनीं सत्यनाश मांडला आहे. सर्व दूध खरेदी करून त्याचें लोणी, पनीर वगैरे करून विकतात. ज्या लोकांचा मुख्य आधार दुधावर आहे, ते लोक आपल्या खाण्याच्या पदार्थांचा नाश कसा होऊं देतात ? खरोखर दुधातुपासारख्या वस्तूंवर म्युनिसिपालिट्यांनीं चांगलाच अंकुश ठेविला पाहिजे.

मी नुक्ताच बकरीदच्या दंग्याच्या मुलखांतून येत आहें. कांहीं यःकश्चित् कारणामुळें दोन जातींत मारामारी झाली आणि तंटा विकोपास गेला. त्यावर आपण कांहीं उपाय करूं शकलों नाहीं. सरकार करील त्यावरच आधार राखावा लागत आहे. यांत आपला पंगूपणा दिसून येतो.

## गोरक्षण, हिंदु व मुसलमान.

गोरक्षणाचा हवाला नामधारी गोरक्षणसभांवर आपण सोंपविला आहे. मुसलमान बंधूंच्या हातांत खाण्यासाठीं गाय जाऊं द्यावयाची नाहीं, हाच येथें गोरक्षणाचा अर्थ दिसतो. राज्यकर्त्यांना गोमांसाची जरूर लागते, त्यासाठीं हजारों गाईंचा वध होत असतो, त्याविषयीं आपण कांहींच करीत नाहीं. गाई आणि गाईंचा वंश यांचें रक्षण करणें हा मोठा व्यापक प्रश्न आहे. त्या प्रश्नास मुसलमानांशीं झगडा करण्याचें संकुचित स्वरूप देऊन गोवध मात्र आम्हींच वाढविला आहे. गाईचा जीव वांचविण्यासाठीं मुसलमान बंधूंचा वध करणें हा धर्म तर नव्हेच, पण अधर्म असण्याचा संभव आहे. मला वाटतें कीं, आपल्या मुसलमान बंधूंची जर आपण प्रेमानें समजूत घातली, तर हिंदुस्थानची स्थिति समजून गोरक्षण करण्याला तेहि तयार होतील. आपली तपश्चर्या शुद्ध असेल तर आपण गाईंचा वध इंग्रज, मुसलमान किंवा हिंदु कोणाच्याहि हातून होऊं देणार नाहीं. हें एक कार्यच स्वराज्याला जवळ आणणारें आहे.

वरील अनेक प्रश्न स्थानिक स्वराज्याचा विचार करतांनां उत्पन्न होतात. आणि यावरून आपल्याला दिसून येईल कीं, स्थानिक स्वराज्यावर भारतवर्षाचें स्वराज्य अवलंबून आहे.

## स्वदेशी चळवळ.

स्वदेशी चळवळ देशांत नाहींच असें म्हटलें तरी चालेल. स्वदेशी व्रतांत स्वराज्याची चावी आहे हें आपल्या ध्यानांत येत नाहीं. जर आपल्या अंगीं स्वभाषेविषयीं अरुचि असेल, आपले कपडे आपणांस आवडणार नाहींत, आपला पोषाख आपणांस वेढब वाटेल, शेंडीची लाज वाटेल, आपला भोजनाचा प्रकार आपणांस नापसंत दिसेल, आपल्या देशाचें हवापाणीहि आपणांस ठीक नाहींसें वाटेल, आपलेच लोक आपणांस जंगली आणि आपल्या सहवासाला अयोग्य असे वाटतील, आपली संस्कृति आपणांस त्याज्य वाटेल व परकीय सभ्यता हितकारी वाटेल, सारांश, आपलें तेवढें वाईट आणि परदेशी तें गोड, अशी स्थिति होईल तर स्वराज्याचा अर्थ काय करावा हें मला तरी समजत नाहीं ! जर परदेशी तेवढें ग्राह्य असेल तर खरोखरच परदेशी शिक्षणाची आपणांस अत्यंत जरुरी आहे. कारण जनसमाजामध्यें परदेशीचें वारें अजून फारच थोडें शिरलें आहे. मला तर असें वाटतें कीं, आपण स्वराज्याचा रस चाखूं त्यापूर्वी स्वदेशी व्रताविषयीं प्रेमचसें तें काय पण आसक्तिहि उत्पन्न झाली पाहिजे. आपल्या प्रत्येक कार्यांत स्वदेशीची छाप दिसली पाहिजे. हा विचार बरोबर असल्यास स्वदेशी चळवळ या देशांत फारच मोठ्या प्रमाणांत झाली पाहिजे. ज्या ज्या देशांत आजपर्यंत स्वराज्याची चळवळ झाली आहे, त्या त्या देशांत लोकांनीं या सर्वांगीण स्वदेशीचें परिपूर्ण महत्त्व समजून तिचीच कांस धरली आहे.

## परकरी पलटण !

स्कॉटलंडचे शिपाई मरण स्वीकारतील, पण स्वतःची ' किल्ट ' सोडावयास तयार होणार नाहींत. त्यांना आपण विनोदानें परकर नेसणारी पलटण असें म्हणतों. पण या परकरांत केवढें सामर्थ्य आहे हें सर्व जगास महशूर आहे. हा परकर वापरण्यास अडचणीचा आणि शत्रूला सहज ओळखतां येण्याजोगा असतो. तरी स्कॉटिश शिपाई तो सोडीत नाहींत. आपले दोष उराशीं बाळगून बसावें असें म्हणावयाचा माझा उद्देश नाहीं. पण आपल्या ब-याच गोष्टी विगुण असल्या तरी त्या आपणाला ग्राह्यच आहेत. परदेशी स्वनुष्ठित असेल तरी तें त्याज्य आहे. जें आज विगुण असेल तें आपल्या पुरुषार्थानें आपण गुणपूर्ण करूं शकूं. माझी

अशी उत्कट इच्छा आहे कीं, स्वदेशीचें चैतन्य या परिषदेंतील प्रत्येक सभासदाच्या रोमरोमीं स्फुरूं लागावें आणि महासंकटें आणि अडचणी सोसूनहि हें व्रत अखंड पाळावें. असें झालें ह्मणजे घर बसल्या स्वराज्य चालून येईल.

## चळवळीचें दुहेरी स्वरूप

म्हणजे, आपली चळवळ दुहेरी असली पाहिजे. सरकारला अर्ज खुशाल करावेत, वरिष्ठ कायदेकौन्सिलांत हक्क खुशाल मागावेत पण त्याबरोबरच, आणि त्याच्याहीपेक्षां जास्त नेटानें लोकजागृतीसाठीं आंतरिक चळवळ करण्याची आवश्यकता आहे. बाह्य चळवळीमध्यें दंभ, स्वार्थ वगैरे घुसण्याचा फार संभव आहे; आंतरिक प्रवृत्तींत तसें होण्याचें भय कमी. आंतरिक प्रवृत्तीवांचून बाह्य प्रवृत्ति शोभणार नाहीं; इतकेंच नव्हे तर ती निष्फळ होण्याचाहि संभव आहे. माझ्या सांगण्याचें तात्पर्य असें नाहीं कीं आपण आंतरिक चळवळ मुळींच चालवीत नाहीं पण ती योग्य तितक्या जोरानें चालवीत नाहीं एवढेंच.

असाही ध्वनि ऐकूं येतो कीं, एकदां भारतवर्षाचा राज्यकारभार हातीं आला म्हणजे सर्व सुधारणा सहज होतील. परंतु यासारखा दुसरा भ्रम नाहीं. कोणतेंहि राष्ट्र अशा रीतीनें स्वतंत्र होऊं शकलें नाहीं. वसन्ताचा बहार आला म्हणजे प्रत्येक झाडावर त्याचा प्रभाव दिसूं लागतो. सर्व अरण्यभर नवयौवन मुसमुसूं लागतें, त्याचप्रमाणें ज्या वेळीं आपण स्वराज्यरूपी वसन्तऋतूमध्यें प्रवेश करीत असूं, त्या वेळीं बाहेरून येणारा प्रवासी आपल्यांत नवजीवन भरलेलें पाहील.

## दोन मोठीं व्यंगें.

आपली प्रगति तशी झालेली नाहीं हें कबूल झाल्यास त्याचीं दोन कारणेंहि कबूल करावीं लागतील. स्त्रियांना आमच्या चळवळींपासून दूर ठेवल्यामुळें आपल्याला पक्षाघात झाला आहे. शिवाय सुशिक्षित लोक परभाषेंतून शिक्षण घेत असल्यामुळें अशक्त बनतात. यामुळें त्यांच्या शिक्षणाचा फायदाही लोकांना मिळत नाहीं. या विषयावरील माझे विचार शिक्षणपरिषदेपुढें मीं निवेदन केले असल्यामुळें येथें त्यांची पुनरुक्ति करीत नाहीं.

स्वराज्यभक्त सुशिक्षितांना जनसमाजांत मिसळल्याशिवाय चालावयाचें नाहीं. राष्ट्रपुरुषाच्या कोणत्याही अंगाची उपेक्षा आपणांस करतां येणार नाहीं, कोणत्याही

अंगाचा त्याग करतां येणार नाहीं. सर्वांना बरोबर घेऊन चालूं तरच पुढें जाऊं शकूं. सुशिक्षितवर्ग जर लोकांत मिसळता, तर बकरीईदचे दंगे आज दिसलेच नसते.

शेवटच्या विषयाला हात घालण्यापूर्वी थोड्याशा गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे, आणि थोड्या सूचनाहि करावयाच्या आहेत.

## दादाभाई नौरोजी.

दर वर्षी यमराजा हिंदुस्थानांतील पुढारीवर्गाचे बळी घेतो. गेल्या वर्षी त्यानें घेतलेल्या सर्वच आहुत्यांविषयीं मी कांहीं बोलत नाहीं. पण प० ऋषितुल्य पितामह दादाभाई नवरोजींचा उल्लेख केल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं. त्यांच्या देश-सेवेची किंमत ठरविणारा मी कोण? मी तर त्यांच्या पायाशीं बसणारा. जेव्हां मी अगदीं तरुणपणीं विलायतेस गेलों तेव्हां मला त्यांचें दर्शन घडलें. त्यांच्याकडे शिफारसपत्र घेऊन गेलों होतों; तेव्हांपासूनच त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि माझ्या मनांत उत्पन्न झाली. त्यांची निष्कलंक व अखंड देशसेवा, त्यांची समदृष्टि, त्यांचें शुद्ध शील हीं सर्व भारतवर्षाला उदाहरणरूप आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांति देवो. त्यांचें शील आपल्या जीवनांत आणून, त्यांच्या देशसेवेचें अनुकरण करून, त्यांना सतत आपल्या हृदयांत स्थान देऊन आपण त्यांना अमर करूं शकूं. ह्या महापुरुषाचा आत्मा आपल्या परिषदेचा साक्षी असो.

नामदार व्हाईसरायांनीं विरमगांवची जकात रद्द केल्याचें सांगितलें, याबद्दल त्यांचे आभार मानणें आपलें कर्तव्य आहे. ही जकात केव्हांच रद्द व्हावयास पाहिजे होती. त्याच्या गांजणुकीनें प्रजा चेंगरली जात होती. कित्येक लोकांचा व्यापार त्याच्यापायीं बुडाला आहे. कितीतरी बाया बापड्यांना त्यामुळें छळ सोसावा लागला. या ठरावाची अंमलबजावणी अद्यून झालेली दिसत नाहीं, ती लवकर होणें जरूर आहे +

आगगाडींत तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना जो त्रास सहन करावा लागतो त्या विषयींचा माझा अनुभव मी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केला आहे. हा त्रास खरो-

+ या परिषदेनंतर ही जकात गेल्या जानेवारीपासून बंद करण्यांत आली आहे.

खर असह्य आहे. हिंदी प्रजा बापुडवाणी आहे. तिला तोंडांतून ब्र न काढतां गुपचूप दुःख सहन करण्याचें शिक्षण मिळालेलें असल्यामुळें लक्षावधि लोक हीं आगगाडींतील दुःखें मुकाट्यानें सहन करीत आहेत. तथापि त्यांचें निवारण होत नाहीं. अशा तऱ्हेनें दुःख सहन करतां येणें हा मोठा गुण आहे खरा, परंतु त्यालाहि कांहीं सीमा असली पाहिजे. निव्वळ दुबळेपणानें सहन केलेलें दुःख नामर्दपणाचें होय. आगगाडींतील हा त्रास जो आज सहन केला जात आहे तो अशा नामर्दपणाचा द्योतक आहे. हीं आगगाडींतील दुःखें दोन प्रकारचीं आहेत; रेल्वे अधिकाऱ्यांच्या दोषामुळें उत्पन्न होणारीं दुःखें आणि उतारूंच्या बेपर्वाईमुळें उत्पन्न होणारीं दुःखें. या दुःखांचा इलाजहि दोन प्रकारचा आहे. ज्यांचें कारण रेल्वेखातें आहे त्यांसंबंधीं सर्वांनीं त्या खात्याकडे तक्रारी कराव्या. स्वभाषेंत देखील लिहिण्यास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांत ओरड करावी. दुसरा उपाय असा कीं, जाणत्या उतारूंनीं आपल्या अजाण बंधूंस रेल्वेचा प्रवास कसा करावयाचा यासंबंधानें चांगली रीतभात शिकवावी, त्यांच्या ओंगळपणाकडे व बेपर्वाईकडे त्यांचें लक्ष वळवावें. या कामासाठीं स्वयंसेवक पाहिजेत. सर्वांना हें काम यथाशक्ति करतां येईल. पुढारी लोकांनींहि या अडचणींचा आस्वाद घेण्याकरितां लोकांस आपला दर्जा कळूं न देतां केव्हां केव्हां तिसऱ्या वर्गातून प्रवास करावा. व स्वतःस आलेला अनुभव रेल्वे-खात्यापुढें मांडावा. असें केल्यानें अल्पावधींतच महत्त्वाचा फेरबदल झालेला आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल.

फिजी वगैरे बेटांत जाणाऱ्या मुदतबंदी मजूरांविषयीं लंडन येथें एक कमिटी नेमली गेली होती. तिचे विचार सरकारी रीतीनें प्रसिद्ध झाले असून त्यावरील प्रजेचा अभिप्रायहि सरकारनें मागितला आहे. या बाबतींत माझें मत मीं वर्तमानपत्रांतून यापूर्वींच प्रसिद्ध केलें आहे. तेव्हां त्या बाबतींत येथें जास्त विवेचन करीत नाहीं. माझें असें मत आहे कीं, या कमिटीनें केलेल्या शिफारसींचा देखील परिणाम एका तऱ्हेच्या मुदतबंदी गुलामगिरींतच होणार. तेव्हां या बाबतींत आपणांस एवढेंच सांगतां येईल कीं, हिंदी मजूरांना कोणत्याहि तऱ्हेचें बंधन घालून परदेशांत नेलेलें आमच्यानें पाहवणार नाहीं. मुदतबंदीचा कायदा अजीबात रद्द झालाच पाहिजे. वसाहतींना कोणत्याहि प्रकारच्या सोयी करून देण्यास आम्हीं बांधलेले नाहीं.

आतां मीं शेवटच्या विषयाकडे वळतों. साध्य वस्तु मिळविण्याचे मार्ग दोन आहेत. सत्याग्रह आणि दुराग्रह. आपल्या शास्त्रांतून त्यांना दैवी आणि आसुरी संपत्ति अशीं नांवें दिलेलीं आहेत. सत्याग्रहाच्या मार्गांत नेहमीं सत्याचाच आग्रह ठेवावयाचा असतो. तेथें कोणत्याहि सबबीवर सत्याचा त्याग करतां येत नाहीं. सत्याग्रहाच्या मार्गांत देशासाठीं देखील असत्याचा आश्रय केला जात नाहीं. यांत 'सत्यमेव जयते' ही भावना याच्या मुळाशीं असते. कित्येक वेळां मार्ग खडतर असेल, परिणाम भयंकर वाटेल; परंतु इतकें असूनहि सत्याग्रही सत्याची कास सोडीत नाहीं. अशा प्रसंगींहि त्याची श्रद्धा सूर्याच्या तेजाप्रमाणें झगझगीत राहील. सत्याग्रही मनुष्याला निराशा ही ठाऊक नसते. सत्य हीच त्याची तरवार असल्यामुळें त्याला पोलादी तरवारीची किंवा दारूगोळ्याची गरज पडत नाहीं. आत्मबलाच्या—प्रेमाच्या—जोरावर तो आपल्या वैऱ्याला देखील वश करतो. प्रेमाची खरी कसोटी मित्रापाशीं होत नाहीं. मित्रानें मित्रावर प्रेम करणें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण शत्रूशीं मित्रता राखणें ही प्रेमाची खरी कसोटी आहे. तो गुण आहे; कारण त्यांत श्रम आहेत. तो पुरुषार्थ आहे. त्यांत खरी बहादुरी आहे. राज्यकर्त्यांशींहि हीच प्रेमदृष्टि राखल्यास त्यांच्या सत्कृत्यांची खरी कदर आपल्याला करतां येईल. आणि त्यांच्या चुकांबद्दल त्यांचा द्वेष करण्याऐवजीं प्रेमभावानें त्या त्यांना दाखवून आपण त्या सुधारून घेऊं शकूं. असल्या प्रेमभावांत भयाला अवकाश नाहीं. दुर्बळता तर अशक्यच आहे. दुर्बल माणूस प्रेम करूं शकत नाहीं. शूरच प्रेम करूं जाणे! प्रेमाच्या दृष्टीनें पहाण्यास लागलों म्हणजे राज्यकर्त्यांकडे संशयाच्या डोळ्यानें आपण बघणार नाहीं, ते सर्व कांहीं वाईट बुद्धीनें करतात असेंहि मानणार नाहीं. प्रेमाच्या दृष्टीनें त्यांच्या कार्याची आपण केलेली परीक्षा इतकी शुद्ध असणार कीं, त्यांच्या स्वतःवर सुद्धां त्याची छाप पडल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रेम लढूंहि शकतें. प्रेमाला अनेक वेळां लढण्याचे प्रसंग येतात अधिकार-मदामुळें मनुष्याला स्वतःचे दोष दिसत नाहींत. अशा वेळीं सत्याग्रही हा नुसता हात जोडून स्वस्थ न बसतां स्वतः दुख सहन करतो. सत्ताधीशाचा हुकूम—त्याचा कायदा—तो सविनय अमान्य करतो. व त्याबद्दल स्वतःवर ओढवणारीं—तुरुंग, फांशी इत्यादि दुःखें तो मुकाट्यानें सहन करतो. अशानें आत्मा कार्यक्षम बनतो.

यांत कालक्षेप होत नाहीं आणि अशा प्रकारें सविनयपणें केलेल्या कायद्याच्या निरादरामध्यें पुढें जरी चूक दिसून आली तरी या चुकीचे परिणाम फक्त सत्याग्रही व त्याचे साथीदार एवढ्यांनाच भोगावे लागतात. या मार्गाचा अवलंब केल्यानें सत्ताधीशाशीं कडूपणा उत्पन्न होत नाहीं, पण शेवटीं तो आपल्याला वश होऊन वागतो. **त्याच्या लक्षांत येतें कीं, सत्याग्रही पुरुषावर आपला अंमल चालावयाचा नाहीं. सत्याग्रह्याच्या संमतीवांचून त्याच्याकडून एकही काम आपल्याला करून घेतां येणार नाहीं. ही स्वराज्याची परिसीमा होय.** कारण यांत संपूर्ण स्वतंत्रता येऊन जाते. हा सत्याग्रह शिक्षित सत्ताधीशापाशींच चालूं शकेल असें मानण्याचें कारण नाहीं. वज्रापेक्षां कठोर हृदय देखील आत्म्याच्या बलानें उत्पन्न होणाऱ्या अग्नीपुढें विरघळून जाईल. त्या बलापुढें नीरो सुद्धां एखाद्या गोगलगाईप्रमाणें दीन बनून जाईल. ही अतिशयोक्ति नव्हे. हें गणितांतील सिद्धांताप्रमाणें अबाध्य सत्य आहे. हा सत्याग्रह या हिंदुस्थान देशाचें खास शस्त्र आहे. हिंदुस्थानांत दुसरींहि शस्त्रें आहेत, परंतु या सत्याग्रहाच्या शस्त्राचा उपयोग येथें विशेष झालेला आहे. ही सर्वव्यापक शक्ति आहे. सर्व काळीं वापरण्यासारखी आहे, सर्व स्थलीं वापरावयाची आहे. त्यासाठीं कांग्रेस वगैरेंच्या शिक्कामोर्तबाची जरूर नाहीं. ज्याला या शक्तीची जाणीव होईल तो तिचा उपयोग केल्याशिवाय रहाणारच नाहीं. ज्याप्रमाणें पापणी डोळ्याचें रक्षण आपण होऊन करते त्याप्रमाणें सत्याग्रह प्रगटला म्हणजे तो स्वतःच आत्मस्वातंत्र्याचें रक्षण करीत असतो.

पण दुराग्रहाचीं लक्षणें याहून विपरीत आहेत. याचा नमुना वर उल्लेख केल्याप्रमाणें हल्लींच्या युरोपीय महायुद्धांत पहावयास सांपडतो. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला शरीरबलानें हरविलें, एवढ्यानें त्याचा पक्ष खरा कसा ठरणार? दुर्बळ लोकांवर सबल लोक पुष्कळदां अत्याचार करतांना दृष्टीस पडतात. दुर्बळ असतात ते हरतात म्हणजे तेवढ्यावरून कांहीं त्यांची अनीति किंवा सबळांची नीति सिद्ध होत नाहीं. दुराग्रही हा साधनांकडे बघत नसतो. वाटेल त्या बऱ्यावाईट साधनांच्या योगें आपलें कार्य तडीस नेण्याकडे त्याचें लक्ष असतें. हा धर्म नव्हे, अधर्म आहे. धर्मामध्यें असत्याला, निर्दयतेला, हिंसेला मुळींच अवकाश नाहीं. धर्माचें माप प्रेम, दया, सत्य यांनींच होतें. त्यांचा त्याग करून मिळालेला स्वर्गहि

निंद्य आहे. **सत्याचा त्याग केल्यानें हिंदुस्थानाला स्वराज्य मिळत असेल तर तें व्यर्थ होय.** त्यानें अखेरीस राष्ट्राचा नाशच व्हावयाचा. दुराग्रही अधीर होऊन आपण मानून घेतलेल्या शत्रूचा निःपात करण्यास बघतो. याचें पर्यवसान फक्त वैरभावाची वृद्धि होण्यांतच होतें. पराजित शत्रु आपल्या पोटांत वैरभावाला जपून बाळगून ठेवतो व सूड घेण्यास योग्य संधीची वाट बघत असतो. याप्रमाणें एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला हें शत्रुत्व वारसा म्हणून मिळतें. या परिषदेचे सभासद जर योग्य रीतीनें समजून सत्याग्रह पत्करतील आणि त्या दृष्टीनें आपल्या कार्याचा मार्ग आंखतील तर साध्य वस्तूची प्राप्ति पुष्कळ अंशीं सहज होईल. प्रारंभाला निराशा वाटली, कांहीं काळ लोटेपर्यंत प्रत्यक्ष परिणाम कांहींच न दिसला, तरी अखेरीस सत्याग्रहाचाच संपूर्ण विजय आहे. **दुराग्रही, गुऱ्हाळाच्या बैलाप्रमाणें चक्रगतीनें फिरत राहतो, तसें फिरणें गति आहे, प्रगति नाहीं. सत्याग्रही सदोदित पुढें पुढेंच जात रहातो.**

माझ्या विचारांचें वरवर अवलोकन करणाऱ्याला असें वाटेल कीं, ते कांहींसे परस्परविरोधी आहेत. एकीकडे सरकारपाशीं मी लष्करी शिक्षणाची मागणी करतों, तर दुसरीकडे सत्याग्रहाला अग्रस्थान देतों. सत्याग्रहांत शस्त्राला अवकाश कोठला असणार ? पण शस्त्रविद्येची मागणी ही जे सत्याग्रही नाहींत त्यांचेसाठीं केली आहे. सगळें हिंदुस्थान सत्याग्रही होईल अशी माझी कल्पना नाहीं. नेभळट बनून देशाचें किंवा निर्बळांचें रक्षणच न करणें हें सर्वदा सर्व प्रकारें त्याज्यच आहे. निरपराधी स्त्रीवर जुलूम करणाऱ्या इसमाला एक तर आपण स्वतः आपलें बलिदान देऊन आपल्या अत्यंत आत्मबलानें व प्रेमबलानें वश करावा; आणि तसें करण्याची आपली शक्ति नसेल तर आपण अवश्य असेल तेवढें शरीरबळ खर्च करून अत्याचाऱ्याला त्याच्या पापापासून अटकावावें. **सत्याग्रही आणि शस्त्रधारी दोघेही लढवय्ये आहेत.** शस्त्रधारी शस्त्रविहीन झाल्यास दीन बनतो. सत्याग्रही कधींच दीन होत नाहीं. तो कोषरूप शरीरावर किंवा त्या शरीरावरील आयुधांवर अवलंबून रहात नाहीं. पण अजात, अविनाशी अशा आत्म्याच्या जोरावरच लढतो. **या दोन कोटींत जो येऊं शकत नाहीं, तो पुरुष नव्हे.** त्याला आत्म्याची तर वार्ता देखील नसते. एरव्हीं भीतीमुळें पळायचाच नाहीं.

कृपणाच्या धनाप्रमाणें शरीराला सांभाळण्याच्या प्रयत्नांत तो सर्वच कांहीं गमावून बसतो. त्याला मरतां येत नाहीं. शस्त्रधारी तर मरणाला अहोरात्र आपल्याबरोबर बाळगून हिंडत असतो. एखाद्या दिवशीं तरी तो सत्याग्रही बनेल हें शक्य आहे. हिंदुस्थानाची हीच आशा आहे कीं, हा थोर पवित्र आर्यदेश आपल्या आर्यभावाला दैवीवृत्तीला -प्रधानपद देऊन बहुतांशीं सत्याग्रहाचाच उपयोग करील. शस्त्रक्रियेला सर्वोपरी पद देणार नाहीं. हिंदुस्थानांत 'शरीरबळ हेंच सत्य आहे' या सूत्राला नव्हे तर 'सत्यमेव जयते' या सूत्रालाच खात्रीनें अधिक मान मिळेल.

सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं सत्याग्रहानें समाजसुधारणाहि आपल्याला करतां येईल. हिंदुमुसलमानांमधील वितुष्ट नाहींसें करतां येईल, आणि राजकीय प्रश्नहि सोडवितां येतील. कार्य व्यवस्थितपणानें होण्याकरितां आपण कामाचे निरनिराळे विभाग करावे हें योग्यच आहे. पण त्या सर्वांचा एकमेकांशीं अत्यंत संबंध आहे या गोष्टीकडे दुर्लक्ष होतां कामा नये. राजकीय प्रश्नांशीं धर्माचा कांहीं संबंध नाहीं, हा विचार खोटा आहे. धार्मिक वृत्तीनें राजकीय प्रश्नांचा केलेला निकाल एक प्रकारचा होईल; धार्मिक-वृत्तीला फांटा दिल्यास उलटाच प्रकार बनेल. राजकीय प्रश्नांचा विचार करित असतां आज देशांत भटकत फिरणाऱ्या छप्पन लाख साधूंना सोडून चालावयाचें नाहीं. मुसलमानभाईनाहि आपल्या फकीरांचा विचार केल्याशिवाय चालणार नाहीं. हिंदु लोकांना विधवांचा प्रश्न किंवा बालविवाहाचा विचार करावाच लागेल. पडदाप्रकरणाकडे डोळेझांक करणें मुसलमानांनाहि परवडायचें नाहीं. दोन्ही जाति परस्परांच्या धर्माविषयीं जे प्रश्न उपस्थित करतात त्यांकडेहि कानाडोळा करतां यावयाचा नाहीं.

खरोखर आपल्या अडचणी हिमालयाएवढ्या आहेत. पण अडचणी जशा विराट आहेत तसेच त्या दूर करण्याचे सुंदर उपायहि आपल्यापाशीं आहेत. आपण प्राचीन आर्य जातीचे वंशज आहों. रोम, ग्रीस, इजिप्त इ. देशांच्या संस्कृतीच्या क्षयाचे आपण साक्षी आहों. आपल्या संस्कृतीमध्यें समुद्राप्रमाणें अनेक भरत्या व ओहोट्या झाल्या आहेत; तथापि समुद्राप्रमाणेंच ती अचल राहिली आहे. आपल्या देशांत आपणास सर्व प्रकारें स्वतंत्र राहतां येण्यासारखी सर्व सामुग्री आहे. त्यांत मोठमोठाले पर्वत आहेत, नद्या आहेत, अद्वितीय सृष्टिसौंदर्य आहे. या देशाचे अनेक संतान महापराक्रमाचा वारसा आपल्या वंशजांना देऊन गेलेले आहेत. हा

देश तपस्येचें माहेरघर आहे, तेथेंच सर्व धर्म एकत्र नांदतात. तेथेंच सर्व देवतांना सर्वांकडून मानण्यांत येतें. एवढी सामुग्री असतां जर कांहीं अलौकिक करणी करून जगाला आपण शांति देऊं शकलों नाहीं, इंग्रजी राष्ट्राला आपल्या सात्त्विक प्रवृत्तीनें जिंकूं शकलों नाहीं, तर आपल्या पूर्वजांच्या नांवाला बट्टा लावल्या सारखें होईल. इंग्रजी राष्ट्राशीं जडलेला आपला संबंध निरर्थक होईल. इंग्रज लोक साहसी आहेत. त्यांच्यांत धर्मवृत्ति आहे. प्रचंड आत्मविश्वास आहे. तें वीरांचें राष्ट्र आहे. ते स्वतंत्रता साधितात; पण व्यापारी वृत्तीला त्यांच्यांत प्रधानपद दिलें जातें. लक्ष्मी संपादन करतांना नेहमींच त्यांनीं साधनांच्या बरेवाईटपणाचा विचार केला नाहीं. आधुनिक सुधारणेचे ते पूजक आहेत. प्राचीन भावना त्यांच्यांत क्षीण झाल्या आहेत. त्यांचें अनुकरण करण्याचें सोडून, आपलें न सोडतां, आपल्या संस्कृतीवर पूर्ण श्रद्धा ठेवून, तिच्या श्रेष्ठत्वाविषयीं आपल्यांत दृढ विश्वास असेल तर त्यांच्याशीं जडलेल्या संबंधाचें चीज करूं; आणि तो संबंध आपल्या स्वतःला, त्यांना आणि सर्व जगाला लाभदायी करूं शकूं. तें महत्कृत्य करण्यांत ही परिषद् पूर्ण हातभार लावून आपली, गुजराथची आणि भारतवर्षाची कीर्ति उज्ज्वल करो अशी माझी त्या जगन्नियंत्याजवळ प्रार्थना आहे.

---

## हिंदुयुनिव्हर्सिटी पुढील भाषण.

( बनारस येथें ता. ४ फेब्रुआरी १९१६ रोजीं हिंदुयुनिव्हर्सिटीच्या कोनशिला समारंभाचे वेळीं झालेलें, परंतु त्या वेळीं अप्रसिद्ध राहिलेलें सुप्रसिद्ध व्याख्यान )

येण्याला झालेल्या उशीराबद्दल विनयपूर्वक क्षमा मागून म. गांधी पुढें म्हणाले:—

मित्रहो ! ज्या बाई ( मिसेस् बेझंट ) भाषण आटोपून नुकत्याच खालीं बसल्या आहेत, त्यांच्या अनुपमेय वक्तृत्वानें मंत्रमुग्ध होऊन आतां यापुढें अस्तित्वांत येणारें हिंदुविश्वविद्यालय पूर्णतेस पोहोंचून चुकलें व त्यांत येणारे तरुण, शिक्षण संपादून एका मोठ्या साम्राज्याचे नागरिक बनून बाहेर देखील पडले अशी आपली दिशाभूल होऊं देऊं नका. आणि ज्या विद्यार्थ्यांना उद्देशून आज मी हें भाषण करीत आहें त्यांसही माझी अशी विनंति आहे कीं ज्या आध्यात्मिक जीवनासाठीं हा देश नांवाजलेला आहे आणि ज्या बाबतींत ह्या देशाची सर सर्व जगभर दुसऱ्या

कोणालाहि येणार नाहीं, तें आध्यात्मिक जीवन नुसत्या तोंडानें दुसऱ्यांस देतां येईल अशी जर तुमची समजूत असली तर ती साफ चुकीची होय. जो संदेश हिंदुस्थान एक दिवशीं सर्व जगाला पोंचविणार अशी माझी खात्री आहे, तो संदेश नुसत्या तोंडच्या गप्पांनीं कधींही जगास पोहोंचवितां येणार नाहीं.

मी स्वतः तर व्याख्यानांना आणि भाषणांना विटलों आहें. आज दोन तीन दिवस येथें जीं अनेक व्याख्यानें झालीं त्या सर्वांची उपयुक्तता मला कबूल आहे व ह्मणून त्यांस वरील आक्षेप लागू नाहीं. पण त्या बरोबरच मी आपणास हें ही सांगून टाकतों कीं व्याख्यानें व बडबडीचा आतां कळस झाला आहे. नुसत्या कानांच्या व डोळ्यांच्या तृप्तीनेंच आतां आपलें भागावयाचें नाहीं तर आमचीं अंतःकरणें हालावयास पाहिजेत. आणि हातापायांत चैतन्य खेळूं लागलें पाहिजे. जर आपणाला हिंदूंच्या स्वभावांतील साधेपणा कायम राखावयाचा असेल तर आपल्या विचारांत व आचारांत एकतानता दिसून आली पाहिजे. पण ही सारी प्रस्तावना झाली. मला तुह्माला सांगावयाचें आहे तें हें कीं ह्या पवित्र नगरींत ह्या भव्य महाविद्यालयाच्या आडोशाला उभा राहून माझ्या देशबांधवांपुढें मला परक्या भाषेंत बोलणें भाग पडावें ही केवढी लाजिरवाणी गोष्ट ! आज दोन दिवस ह्या व्याख्यानमालेस जे जे हजर होते त्यांची त्यांत परीक्षा घेण्यासाठीं जर मला परीक्षक नेमण्यांत आलें असतें तर बहुतेक सर्व नापास झाले असते अशी माझी खात्री आहे. कां ? तर तीं व्याख्यानें त्यांचे मनावर पुरतेपणीं ठसलीं नाहींत. गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं मुंबईस मी हजर होतों. तेथें ह्याहून ही फारच मोठा श्रोतृसमाज जमला होता. तरी देखील त्या अफाट श्रोतृसमाजाच्या मनावर जर कोणतीं व्याख्यानें खरीखुरीं ठसलीं असतील तर तीं हिंदींत झालेलीं व्याख्यानेंच होत, याबद्दल मी आपणास खात्री देऊं शकेन. आणि लक्षांत ठेवा कीं ही स्थिति मुंबईची; जेथें सर्व लोक हिंदी बोलतात अशा या बनारससारख्या शहराची नव्हे. हें विश्वविद्यालय देशी भाषाद्वारेंच शिक्षण देण्याकडे पूर्ण लक्ष पुरवील अशी मला आशा आहे. भाषा म्हणजे ती बोलणाऱ्याच्या आत्म्याचें प्रतिबिंब होय आणि आमच्या भाषा उदात्त विचार प्रगट करण्यास नालायक आहेत असें जर तुमचें ह्मणणें असेल तर त्याला माझें एवढेंच उत्तर आहे कीं मग आह्मी या जगांतून जितके लवकर नाहींसे होऊं तितकें बरें. इंग्रजी

ही सर्व हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होऊं शकेल असें कोणाच्या स्वप्नांत तरी येईल काय ? ( कधींहीं नाहीं ! ) मग हें लोढणें राष्ट्राच्या गळ्यांत कशाला ?

आमच्यांत धमक नाहीं असें सांगण्यांत येतें. मी म्हणतों एका परक्या भाषेवर प्रभुत्व मिळविण्यामागेंच जर आम्ही आमच्या आयुष्यांतील उत्तमोत्तम वर्षें घालवूं लागलों तर मग धमक अन् धाडस आमच्यांत येणार कोठून ? आणि इतकें करूनही आमचा प्रयत्न हा अखेरीस फसतोच. मि. हेगिन्बॉटम् यांच्या भाषणानें काल श्रोतृसमाजावर जी छाप पडली ती दुसऱ्या कोणत्याहि व्याख्यात्याच्या भाषणानें पडली काय ? दुसऱ्यांच्या व्याख्यानांत तथ्यांश नव्हता असें नव्हे, तर त्यांस परक्या भाषेंत बोलावें लागल्यामुळें श्रोत्यांची मनें त्यांस आपल्याकडे आकर्षून घेतां आलीं नाहींत. 'पण इंग्रजी शिकलेले लोकच आज देशाचे पुढारी आहेत व तेच राष्ट्रासाठीं विचार करणारे आहेत' असें सांगण्यांत येतें. बरोबरच आहे. तसें नसतें तरच माझ्या मतें तें फार विपरीत झालें असतें. कारण आपणांस जें कांहीं थोडेंबहुत शिक्षण मिळतें तें केवळ इंग्रजींतूनच मिळतें तेव्हां आपणालाही त्याचें कांहींतरी सुफल दाखविलें पाहिजे. पण आज पन्नास वर्षें हेंच शिक्षण आम्हांस देशी भाषांच्या द्वारें मिळालें असतें तर आज काय दिसलें असतें ? आज हिंदुस्थान स्वतंत्र दिसला असता. आमचा सुशिक्षित वर्ग आपल्याच देशांत परक्याप्रमाणें न वाटतां त्याचें बोलणें समस्त जनतेच्या हृदयाला जाऊन भिडलें असतें. अगदीं निकृष्टावस्थेंतील गरीब लोकांत जाऊन त्यांच्यामध्यें त्यांनीं कामें केलीं असतीं. आज पन्नास वर्षांत त्यांनीं जी कांहीं कमाई केली असती ती आज सर्व राष्ट्राची झाली असती. ( टाळ्या ) आज बघावें तर खुद्द आमच्या बायकांना देखील आमच्या उच्चतम विचारांत भागीदार होतां येत नाहीं. प्रो. बोस व रॉय त्यांच्या उज्वल शोधांकडे पहा. त्यांचे हे अद्वितीय शोध आज जनतेला जवळजवळ कुचकामाचे असणें हें अगदीं लज्जास्पद नव्हे का ?

आतां आपण दुसऱ्या विषयाकडे वळूं या.

परवांच्या राष्ट्रीय सभेनें स्वराज्यविषयक ठराव पास केला आहे. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी व मॉस्लेम लीग ह्या आपलें कर्तव्य बजावतील आणि कांहीं मुद्देसूद

सूचना पुढें मांडतील या विषयीं बिलकूल शंका नाहीं. परंतु मला कबूल केलें पाहिजे कीं, विद्यार्थी वर्ग व जनता ही जें कांहीं कार्य घडवून आणतील त्याकडे वास्तविक माझें मन जेवढें ओढ घेतें तेवढें त्यांच्याकडे ओढ घेत नाहीं. वर्तमान-पत्रांत नुसते लेख कितीही लिहिले म्हणून कांहीं स्वराज्य मिळणार नाहीं किंवा कितीही जरी व्याख्यानें झोडलीं तरी त्यांच्या योगें आम्हीं स्वराज्याला पात्र होणार नाहीं. आमचें स्वतःचें आचरणच आम्हाला स्वराज्याला पात्र बनवील. ( टाळ्या ) बरें, आपल्या स्वतःचा कारभार आपण कसा काय चालवीत आहों इकडे वघा.

मी आज सर्वांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें विचार करण्याचें योजलें आहे. मला आज आपणापुढें भाषण करावयाचें नाहीं व कांहींएक आडपडदा न ठेवतां मी बोलत आहें असें जर तुम्हाला आढळून येईल तर तुम्ही कृपा करून असें समजा कीं, जो मनुष्य लोकांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें विचार करतो अशा एका मनुष्याचे विचार तुम्ही ऐकत आहां. आणि जर कदाचित् माझ्याकडून शिष्टाचाराचें अतिक्रमण होत आहे असें आपणांस वाटलें तर मी ही जी स्वतंत्रता घेत आहें त्यावद्दल मला क्षमा करा.

काल संध्याकाळीं मी श्रीकाशीविश्वेश्वराच्या दर्शनास गेलों होतों आणि तेथील गल्ल्यांतून जात असतांना माझ्या मनांत असे विचार घोळूं लागले कीं ह्या थोर मंदिरा पुढें जर या वेळीं आकाशांतून एखादा अपरिचित आत्मा उतरला आणि हिंदु म्हणून जगावर मिरवणारे आपण कसे काय आहोंत हें प्रत्यक्ष डोळ्यानें बघितल्यावर त्यानें जर आम्हांस अगदीं टाकाऊ ठरविलें तर तें अगदीं वाजवी होणार नाहीं का? हें थोर मंदिर आमच्या स्वतःच्या सध्यांच्या शीलाचें हुबेहूब प्रतिबिंबच नाहीं काय? मी स्वतः हिंदु आहें आणि म्हणूनचं अंतःकरणाला पीळ पडून मी एवढें बोलत आहें. ह्या पवित्र मंदिरा सभोंवारच्या गल्ल्या एवढ्या घाणेरड्या असणें बरोबर आहे काय? त्याच्या आसपासचीं घरें बघावीं तर तींही कशीं तरी बांधलेलीं. गल्ल्या वेड्यावांकड्या असून अरुंद. आमच्या देवालयांतून देखील जर नमुनेदार स्वच्छता व मोकळेपणा हीं आम्हांस दाखवितां येत नाहींत तर मग आमचें स्वराज्य तें काय असणार? स्वखुषीनें अगर जोरजुलुमानें इंग्रज लोक आपलें चंबूगवाळें आटपून हिंदुस्थानांतून निघून गेले कीं लागलींच आमचीं देव-मंदिरें पावित्र्य, स्वच्छता व शांतीचीं माहेरघरें बनणार आहेत असें थोडेंच आहे!

स्वराज्याचा विचार मनांत आणण्यापूर्वी आपण जमीन तयार केली पाहिजे हें गेल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचें ह्मणणें मला पूर्णपणें मान्य आहे. आज प्रत्येक शहराचे शहर व लष्कर असे दोन भाग वेगळाले आहेत. त्यांतील शहर हें बहुधा दुर्गंधीचें आगर असतें. आपणा लोकांना शहराच्या राहणीची संवय नाहीं आणि शहरांतील राहणी तर आपणांस हवी; खेडयांतील साधी रहाणी आपल्याला आतां साधत नाहीं. मुंबईतील रस्त्यावर चालतांना वरून कोणी अंगावर थुंकतील कीं काय ही धास्ती सदोदित मनांत बाळगून लोकांना मुंबईतील फुटपाथावरून चालावें लागतें, हा नुसता विचारही फारसा सुखावह नाहीं. मी रेल्वेचा प्रवास पुष्कळ करतों आणि तिसऱ्या वर्गांतील उतारूंच्या अडचणी नेहमीं माझ्या नजरेस येतात. पण त्यांच्या ह्या दुःस्थितीबद्दल रेल्वे कंपनीला दोष नाहीं. आह्मांला स्वतःला स्वच्छतेच्या अगदीं साध्या गोष्टीही समजत नाहींत. डब्यांतील खालील जागा कैक वेळां निजण्यासाठीं वापरली जाते ह्याचा कांहींच विचार न करतां आपण वाटेल तेथें खुशाल थुंकतों. परिणामीं डब्यांत मनस्वी घाण होते. त्यांतल्या त्यांत पांढरपेशे व सुशिक्षित ह्मणविणारी मंडळी तर आपल्या अज्ञ देशबांधवांनां उगीच दबकावतात. अशा मंडळींत मी विद्यार्थ्यांनाहि पाहिले आहेत. त्यांना इंग्लिश बोलतां येतें, त्यांच्या अंगांत जाकिटें असतात आणि ह्मणून आंत घुसून त्यांनां ऐस पैस जागा बळकावतां येते. मी या सर्व गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण केलें आहे आणि आपण बोलूं दिलें आहे तेव्हां मी या सर्व गोष्टी आपणांपुढें मोकळेपणानें सांगत आहें. स्वराज्याचा मार्ग आक्रमीत असतां या सर्व गोष्टींची योग्य व्यवस्था लावल्याशिवाय आपणास गत्यंतर नाहीं.

आतां मी आपणाला दुसरा एक देखावा दाखवितोंः—कालचें अध्यक्षस्थान शोभविणाऱ्या राजेसाहेबांनीं आपणांपुढें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें वर्णन केलें होतें. इतर व्याख्यात्यांनींही त्या मुद्यावर बराच जोर दिला होता. परंतु ज्या भव्य मंडपांत व्हाईसरॉय साहेबांनीं विश्वविद्यालयाच्या पायाचा दगड बसविला त्या ठिकाणीं आपणांस काय दिसलें ? पॅरिसहून बड्यांतला बडा जवाहिऱ्या जरी त्या प्रसंगीं आला असता तर तोही तेथील जड जवाहिरांचें तें प्रदर्शन पाहून खचित दिपून गेला असता. हिरेमाणकांनीं नटलेल्या त्या राजे लोकांना पाहिलें व कोट्यवधि कंगाल हिंदी लोकांच्या स्थितीची आठवण झाली ह्मणजे मला या राजेरजवा-

ड्यांना असें सांगावेंसें वाटतें कीं " बावानों ! तुमच्या अंगावरील हें जडजवाहीर खालीं उतरून जोंपर्यंत हिंदुस्थानांतील तुमच्या लाखों दरिद्री देशबांधवांप्रीत्यर्थ तें काढून ठेवण्यास तुह्मीं तयार होणार नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानचा तरणोपाय नाहीं. ( ऐका ! ऐका ! व टाळ्या ) मला अशी खात्री वाटते कीं, आपले बादशहा अगर लॉर्ड हार्डिंज यांची अशी इच्छा नाहीं कीं खरी खुरी राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठीं आपण सर्वांनीं आपल्या एकूण एक जडजवाहिराच्या पेट्या रिकाम्या करून नखशिखांत दागिन्यांनीं नटूनच आलें पाहिजे. अशी बादशहांची अगर लॉर्ड हार्डिंज यांची इच्छा नाहीं, याची मी आपणांस खात्री देऊं शकेन. अशी कांहींच अपेक्षा नसल्याबद्दलचा बादशहांचा संदेश माझा जीव धोक्यांत घालूनही मी घेऊन यावयास तयार आहें. ब्रिटिश हिंदुस्थानांत काय अगर देशी संस्थानांत काय, कोठेंही एखादा मोठा राजवाडा बांधला जात आहे असें जेव्हां जेव्हां माझ्या कानीं येतें तेव्हां तेव्हां मला संतापच येतो व माझ्या तोंडावाटे असे उद्गार निघतात कीं " अरेरे ! हा सारा पैसा शेतकऱ्यांकडून आलेला आहे. " कारण या देशांत शेंकडा ७५ वर लोक शेतकी करणारे असून ते लोक दिवसभर काबाड कष्ट करीत असतात. आणि ह्या लोकांच्या हातून त्यांच्या श्रमाचें जवळ जवळ सर्वच फळ आपण काढून घेतलें तर मग स्वराज्याचें मोठेंसें पाणी आपल्यांत आहे असें कसें म्हणतां येईल ? अखेर शेतकऱ्यांच्याच हातून आपला उद्धार होऊं शकेल. वकील, डॉक्टर अथवा श्रीमान् जमीनदार कोणाच्याच हातून तो होणार नाहीं. आतां शेवटीं आज दोन तीन दिवस ज्या गोष्टीमुळें आपलीं मनें उद्विग्न झालीं आहेत तिच्या संबंधीं थोडें विवेचन करणें मी माझें कर्तव्य समजतों.

ना. व्हइसरॉय हे येथील रस्त्यांवरून जात असतां आपण सगळे मोठ्या फिकिरींतच होतों. जागोजागीं गुप्तपोलिसांना ठेवण्यांत आलें होतें. आपण गांगरूनच गेलों. आपल्या मनांत जो प्रश्न सारखा उभा रहात होता तो हा कीं आमच्याबद्दल हा एवढा गैरविश्वास काय ह्मणून ? अशा प्रकारें जिवंत मरण भोगण्यापेक्षां लॉर्ड हार्डिंज यांनीं खरोखरच मरणें अधिक श्रेयस्कर नव्हे का ? पण एका बलाढ्य बादशहाच्या प्रतिनिधीला तसें मरतां यावयाचेंही नाहीं. मृतव्रत जगणें हेंच त्यांना कदाचित् अवश्य वाटावयाचें. पण पुढचा सवाल हा कीं हें गुप्तपोलिसाचें जूं आम-

च्यावर लादण्याचें कारण काय ? आपण चिडलों, चरफडलों, हातपाय आपटले, वाटेल तें जरी केलें तरी आपण हें विसरतां कामा नये कीं हिंदुस्थानानें आपल्या उतावळेपणाच्या धुंदींत अराजक लोकांचे कंपू निर्माण केले आहेत. मी स्वतः देखील अराजकच आहें. मात्र वेगळ्या प्रकारचा. परंतु हा जो दुसरा अराजकांचा वर्ग आमच्यांत निर्माण झाला आहे, त्यांतील लोकांशीं जर माझी गांठ पडली तर मी त्यांना बजावून सांगेन कीं बाबांनो ! जर हिंदुस्थानाला आपल्या जेत्यांवर जय मिळवावयाचा असेल तर तुमच्या ह्या अराजकतेला येथें जागा नाहीं. तें भित्रेपणाचें लक्षण आहे. आपली जर ईश्वरावर श्रद्धा असेल आणि आपण जर त्याचें भय बाळगीत असूं तर मग आपणाला कोणालाही भिण्याचें कारण नाहीं. मग ते महाराजे असोत, व्हाइसराय असोत, गुप्त पोलिस असोत किंवा खुद्द बादशहा असोत. अराजकांच्या स्वदेशप्रीतीबद्दल मैला मोठा आदर आहे. स्वदेशासाठीं आनंदानें मरण्याच्या त्यांच्या तयारीबद्दल मी त्यांचा गौरव करतों. पण मीं त्यांना असा प्रश्न करतों कीं जीव घेणें हें प्रतिष्ठेचें कार्य आहे काय ? हल्ला करणाऱ्या माणसाच्या हातांतील खंजीर हें सात्त्विक मरणाचें मोठेसें सुंदर पूर्वचिन्ह आहे काय ? मी 'नाहीं' म्हणतों. कोणत्याही धर्मग्रंथांतून ह्या उपायांना अनुमति नाहीं.

इंग्लिश लोक हिंदुस्थान सोडून गेल्याशिवाय या देशाचा कधींहीं उद्धार व्हावयाचा नाहीं, त्यांना घालवून दिलेंच पाहिजे अशी जर माझी खात्री झाली तर 'तुम्ही चालते व्हा' असें त्यांना उघडपणें सांगण्यास मी कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं आणि मला वाटतें कीं त्या माझ्या दृढ समजुतीच्या समर्थना प्रीत्यर्थ मरण्यासही मी तयार होईन. असलें मरणच माझ्या मतें प्रतिष्ठेचें होय. बॉंब फेंकणारा गुप्त कट करतो. तो बाहेर पडायला भीत असतो आणि पकडला गेला ह्मणजे अनाठायीं योजलेल्या उत्साहातिशयाचें प्रायश्चित्त भागतो. या लोकांचें ह्मणणें असें कीं "आम्ही जर असें केलें नसतें, आमच्या पैकीं कांहीं लोकांनीं जर बाम्ब टाकले नसते तर बंगालच्या फाळणीचे बाबतींत जें काय आपणास मिळालें आहे तें खचित मिळालें नसतें."

( मिसेस बेझंट ह्मणाल्या मेहरबानी करून पुरें करा तें ) मि. लॉयन यांच्या अध्यक्षतेखालीं बंगल्यांतही मी हेंच सांगितलें होतें. मला वाटतें मी जें बोलत आहें,

तें अगदीं अवश्य आहे. मी थांबावें असें सांगण्यांत आल्यास मी त्याप्रमाणें करीन. ( अध्यक्षांकडे वळून ) महाराज ! आपल्या हुकूमाची मी वाट पाहत आहें. मी बोलत आहें तसें बोलून मी आपल्या देशाचें व साम्राज्याचें नुकसान करीत आहें असें जर आपणास वाटत असेल तर मी जरूर थांबतों. ( चालूं द्या ! चालूं द्या ! अशा आरोळ्या अध्यक्ष ह्मणाले ' आपला उद्देश नीट समजावून सांगा ' ) मी माझ्या उद्देशाचा खुलासा करीत आहें. मी फक्त ( पुनः गडवड ) मित्रांनो ! ह्या गडवडीबद्दल आपण रागावूं नका. मी थांबावें असेंच मिसेस बेझन्ट यांनां वाटतें याचें कारण त्यांचें हिंदुस्थानावर एवढें प्रेम आहे आणि तुह्मां तरुण लोकांपुढें हें सर्व उघड बोलण्यांत मी चूक करीत आहें असें त्यांना वाटतें हेंच होय. पण असें असलें तरी मी एवढेंच ह्मणतों कीं आज उभयपक्षीं वसत असणाऱ्या संशयपूर्ण वातावरणांतून हिंदुस्थानाला मला मुक्त करावयाचें आहे. ह्मणूनच हें सर्व मी बोलत आहें. आह्मांला जर आमचें ध्येय साध्य करून घ्यावयाचें असेल तर परस्पर प्रीति आणि विश्वास यांवर प्रस्थापलेलें साम्राज्यच आम्हांस हवें आहे. आणि आपापल्या घरांत बसून याच गोष्टी बेजबाबदारपणें बोलण्यापेक्षां ह्या विद्यालयाच्या छत्राखालीं उभे राहून आपण त्या बोलणें अधिक श्रेयस्कर नव्हे का ? मला तर वाटतें कीं ह्या गोष्टी आपण अगदीं उघडपणें बोलणें हेंच फार चांगलें. यापूर्वींही मी असें केलें आहे व त्याचा परिणाम फार चांगला झालेला आहे. मला हेंही ठाऊक आहे कीं आज अशी कोणतीच गोष्ट नाहीं कीं, जिची विद्यार्थ्यांमध्यें चर्चा होत नाहीं किंवा जी त्यांना ठाऊक नाहीं. यासाठींच मी हें आत्मनिरीक्षण सुरूं केलें आहे. माझ्या देशाचें नांव मला इतकें प्यारें आहे म्हणूनच मी आपल्याशीं एवढा विचारविनिमय चालविला आहे व माझें आपणांस सादर निवेदन आहे कीं, अराजकतेला हिंदुस्थानांत बिलकुल जागा असूं नये. आपल्या राज्यकर्त्यांना जें काय आपल्याला सांगावयाचें असेल तें आपण मोकळेपणानें आणि उघड उघड सांगूं या, व जर तें त्यांस न रुचलें तर त्याचे परिणाम जे कांहीं होतील ते भोगण्यास तयार राहूं या. पण आपण त्यांना शिव्या देऊं नये. ज्याच्यावर निंदेचा फार भडीमार होतो अशा ' सिव्हिल सर्व्हिस ' खात्यांतील एका अधिकाऱ्यांशीं परवांच मी बोलत होतों. या लोकांशीं माझें कांहीं फारसें साम्य नाहीं. तरी पण त्याची बोलण्याची पद्धति खरोखर

वाखाणण्यासारखी होती. तो म्हणाला " कायहो गांधीसाहेब, आम्ही एकूण एक सिव्हिल सर्व्हंटस् म्हणजे वाईटच असतों आणि ज्या लोकांवर राज्य चालविण्यासाठीं आम्ही येतों त्यांचेवर जुलूम करावा अशीच आमची इच्छा असते असेंच का तुम्हांस वाटतें?" मी म्हणालों 'छे छे, असें कसें होईल?' 'तर मग' तो म्हणाला 'तुह्माला जर संधि मिळाली तर आम्हा दुर्दैवी सिव्हिलसर्व्हंटांच्या तर्फे दोन शब्द आपण लोकांसमोर बोलणार नाहीं का?' तेव्हां येथेंच मी ते दोन शब्द आपणांसमोर बोलणार आहें. इंडियन सिव्हिल सर्व्हिसपैकीं पुष्कळ लोक निःसंशय उद्दाम, जुलमी व कित्येक वेळां अविचारी असेच असतात. आणखीही हवीं तितकीं विशेपणें त्यांना लवतां येतील. ह्या साऱ्या गोष्टी मला कवूल आहेत. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत कित्येक वर्षे राहिल्यावर ते हीन वनतात हें देखील मी मान्य करतों. पण यावरून काय दिसून येतें? येथें येण्यापूर्वी जर ते सभ्य गृहस्थ होते आणि येथें आल्यावर जर ते नीतिभ्रष्ट वनले तर ते आपल्याच चारित्र्याचें प्रतिबिंब नव्हे काय? ( नाहीं नाहीं ) जरा तुमचा तुम्हीच विचार करा कीं काल चांगला असलेला मनुष्य माझ्या संगतींत येऊन जर आज विघडला तर त्याच्या अवनतीवद्दल कोण जवावदार? तो कीं मी? हिंदुस्थानांत आल्यावर खुशामत व लवाडी यांचें जें वातावरण त्यांचे भोंवती पसरतें त्या योगेंच त्यांची नीति भ्रष्ट होते. आणि आपल्यापैकीं पुष्कळांची देखिल तीच गत होईल. आपले दोष कवुल करणें कधीं कधीं वरें असतें.

स्वराज्य जर कधीं काळीं आपणांस मिळावयाचें असेल तर तें आपलें आपल्यालाच घ्यावें लागेल. देणगी म्हणून ते कधींही मिळूं शकणार नाहीं. व्रिटिश साम्राज्याच्या इतिहासाकडे पहा. व्रिटिश राष्ट्र कितीही स्वातंत्र्यप्रेमी असलें तरी जे लोक स्वतः स्वातंत्र्य मिळविणार नाहींत, अशा लोकांना आपण होऊन ते कधींही स्वातंत्र्य देणार नाहींत. पाहिजे तर वोअर युद्धापासून वोध घ्या. थोड्याच वर्षांपूर्वी जे वोअर लोक साम्राज्याचे शत्रु होते तेच आतां दोस्त वनले आहेत.

ह्या सुमारास पुनः गडवड झाली आणि व्यासपीठावरून उठून जाण्याची चलवळ सुरू झाली. यामुळें व्याख्यान एकदम वंद झालें.

---

# हिंदु-मुसलमान.

( १९०८ च्या फेब्रुवारी महिन्यांत ज्या वेळीं सरकार आणि प्रजापक्ष ह्यांच्यांत तडजोड झाली आणि आंगठ्याचे ठसे घेण्याचें ज्याच्या त्याच्या खुषीवर ठेवण्यांत आलें, त्या वेळीं ठसे देण्यासाठीं गांधी गेले होते. कित्येक मुसलमानांस हें त्यांचें करणें फारच गैर व देशद्रोहाचें वाटल्यावरून त्यांनीं गांधी यस बेदम मारलें. मारणारे मुसलमान असल्यामुळें दोन जातींत लढा उत्पन्न होऊं नये म्हणून गांधींनीं स्वतः भयंकर आजारी असतांनांही दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस उद्देशून खालील पत्र प्रसिद्ध केलें होतें. )

ज्यांनीं मला मार दिला त्यांच्यावर माझा राग नाहीं. त्यांनीं अज्ञानामुळें तसें केलें आहे. सरकारनें त्यांच्यावर काम चालविलें आहे; पण तसें करण्याची कांहींच जरूर नव्हती. इतर लोक जर शांत राहतील तर ह्या प्रसंगापासून हिंदी लोकांस लाभच होईल.

हिंदु लोकांनीं बिलकूल राग आणूं नये. ह्या प्रसंगामुळें हिंदु आणि मुसलमान ह्यांच्यामध्यें दुही न माजतां त्यांची दिलजमाईच व्हावी अशी माझी इच्छा आहे आणि ईश्वरापाशीं माझी तशी प्रार्थना आहे. मार मिळाला, आणखी अधिक मिळेल तरी मी एकच सल्ला देणार..........

मारानें, किंवा पुढें मागें लोक दगा देतील ह्या भीतीनें, सत्याग्रही माणसानें आपला मार्ग यत्किंचित्‌ही सोडतां कामा नये. माझी ईश्वरापाशीं अशी प्रार्थना आहे कीं त्यानें माझ्या देशबंधूंचें कल्याण करावें, त्यांना सत्याच्या मार्गाला लावावें आणि हिंदु व मुसलमान ह्यांना माझ्या रक्ताच्या पट्टीनें सांधावें. ( त्यांचें ऐक्य करावें )

# जातिभेद.

( 'भारतसेवक ' वरून. )

जातिभेदाच्या पायावर हिंदुसमाजाची इमारत टिकून राहिली आहे अशी माझी समजूत आहे. सर विलियम हंटर यांनीं आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, जातिभेदाची संस्था प्रचलित असल्यामुळेंच हिंदुस्थानांत दारिद्र्याचा कायदा ( Pauper law ) करावा लागला नाहीं. हा विचार मला बरोबर वाटतो. ज्ञातिसंस्थेंत स्वराज्याचें बीज आहे. निरनिराळ्या जाति ह्या लष्करांतील तुकड्यांसारख्या आहेत. सेनाधिपति प्रत्येक शिपायाला ओळखीत नाहीं. पण त्याच्याकडून, त्या तुकडीच्या मुख्य अधिकाऱ्यामार्फत काम करवून घेतो; त्याचप्रमाणें जातिभेदाच्या साधनानें आपण समाजसुधारणेचें कार्य सुकर करूं शकतों, व आपलें धार्मिक, व्यावहारिक, नैतिक, राजकीय चक्र वाटेल तसें फिरवूं शकतों.

ज्ञातियोजना ही केवळ स्वाभाविक स्थिति आहे. येथें तिला धार्मिक स्वरूप दिलें गेलें; इतर देशांत तिचा उपयोग पूर्णपणें ध्यानांत न आल्यामुळें ती संस्था स्थूल रूपानेंच कायम राहिली व म्हणूनच तिकडे तिच्यापासून फारसा लाभ झाला नाहीं. माझे विचार असे असल्यामुळें जातिभेदाच्या निर्मूलनाचे जे प्रयत्न चालत आहेत, त्यांच्या मी विरुद्ध आहें.

पण जातिभेदसंस्थेंत जे दोष दिसून येतात, ते जरूर काढून टाकिले पाहिजेत. आणि तसें करण्यासाठीं जातिभेदाचें वास्तविक स्वरूप प्रथम जाणिलें पाहिजे. मीं वर सुचविलें कीं, जातीला आपण धार्मिक स्वरूप दिलें आहे; म्हणजे, जाति ही केवळ संयम करण्याचें साधन आहे. जाति ही आमच्या भोगाची परिसीमा आहे. म्हणजे तिच्या बाहेरील भोग भोगण्याचा आपणास अधिकार नाहीं. इतर जातींतील लोकांशीं आपण भोजनव्यवहार किंवा लग्नव्यवहार करणार नाहीं. या योजनेमुळें अनाचार कमी होण्याचा बराच संभव आहे. एकत्र जेवल्यानें मित्रता वाढते ही गोष्ट अनुभवविरुद्ध आहे. असें करण्यानें जर मित्रता वाढती, तर युरोपांत प्रस्तुत महायुद्ध उत्पन्न झालें नसतें. सर्वांत अधिक भांडणें तर संबंधीयांतच होत असतात.

भोजनाच्या बावतीला आपण निष्कारण अतिशय महत्त्व दिलें आहे. भोजनक्रिया ही शौचक्रियेइतकी घाणेरडी आहे; भेद इतकाच कीं, शौचक्रियेनंतर आपल्याला शांति मिळते, आणि ( जभि ताब्यांत न ठेवितां आली तर ) भोजनानंतर असमाधान उत्पन्न होतें. ज्या प्रमाणें शौचादि कृत्यें आपण एकांतांत करितों, त्याचप्रमाणें भोजनादि पशु-क्रियाहि आपण एकांतांतच केल्या पाहिजेत. ' भोजन हें केवळ शरीर-व्यापारासाठींच आहे ' हें वाक्य जर खरें असेल, तर त्या बावतींत जितकें कमी अवडंबर माजविलें जाईल तितकें चांगलें हें उघड आहे.

जी गोष्ट भोजनाची तीच गोष्ट लग्नासंबंधाचीही आहे. अमुक जातीच्या बाहेरील लोकांशीं लग्नव्यवहार वंद राखण्यांत संयमच आहे. आणि **संयम हा केव्हांहि सुखदायकच आहे**. जाळें जितकें जास्त पसरावें तितकीं संकटें अधिक होतात. म्हणून आपल्याच पंक्तीच्या माणसांतून वर किंवा वधू शोधण्यांत मला कांहीं दोष दिसत नाहीं. ज्या देशांत जातीचा पाया धर्मावर रचलेला नाहीं, तेथेंहि वर्णसंकर न होऊं देण्याची खबरदारी घ्यावी लागतेच. इंग्लंडच्या 'ब्ल्यू ब्लड्' ( Blue blood ) चें रहस्यही हेंच आहे. लॉर्ड सॅलिसबरी आपली पूर्वपीठिका एलिझाबेथपर्यंत नेत असत. ही गोष्ट त्यांना व इंग्लिश प्रजेलाही अभिमानास्पद वाटत होती.

ह्याप्रमाणें भोजन व विवाह यांसंबंधीं बंधन सामान्य नियम म्हणून, स्तुत्य आहे. त्यांत अपवाद आहेत आणि राहतील, ही गोष्ट हिंदु समाजानें, कळत अथवा न कळत, कबूल केलेली आहे. पण वास्तविक पहातां हे अपवाद नव्हेतच. मी भंग्याबरोबर जेवलों आणि तसें करण्यांतच माझ्या दृष्टीनें विशेष संयम असला, तर त्या कामीं जातीला कांहीं कर्तव्य नाहीं. किंवा माझ्याच जातींत मला अनुरूप अशी वधू आढळली नाहीं, आणि मुळींच लग्न न करण्यानें मी विषयलंपट होण्याचा संभव असला, तर अशा वेळीं मला योग्य अशी, वाटेल त्या जातीची मुलगी करण्यांत मीं संयम केला असेंच होईल, आणि म्हणूनच माझें हें कृत्य जातिभेदाच्या मूलतत्त्वास विरुद्ध होत नाहीं. पण साधारण नियमाच्या बाहेरील वरील कृत्यें करण्यांत माझा हेतु इंद्रियदमनाचा होता हें दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे; आणि माझ्या भावी वर्तनानेंच तें दिसून येईल. पण तेथपर्यंत

जातीचे म्हणून मला मिळणारे हक्क मला न मिळाले तरी त्यांत संतोष मानून, जातीसंबंधाचें माझें कर्तव्य मात्र मीं बजावित राहिलेंच पाहिजे.

भोजन आणि विवाह या दोन गोष्टींखेरीज जाति-संस्थेमुळें इतरही फायदे आहेत. त्यांतच प्राथमिक शिक्षणाचें साधन तयार आहे. दर एक जाति त्या त्या जातींतील शिक्षणाची तजवीज करील. स्वराज्य-सभेच्या ( Parliament ) निवडणुकीचें साधनही तयारच आहे. प्रत्येक प्रतिष्ठित जातीनें स्वतःचे प्रतिनिधि निवडावेत. तंटे मिटविण्यासाठीं लवाद-कोर्टेंही हजरच आहेत. प्रत्येक जातीनें आपआपसांतील तंट्यांचा निकाल करावा. जर लढाईसाठीं सैन्य तयार करावयाचें असेल, तर जितक्या जाति तितक्या तुकड्या आपणांपाशीं तयार आहेत. जाति-संस्थेचें मूळ हिंदुस्थानांत इतकें खोल रुजलेलें आहे कीं, तें उपटून काढण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां त्यांतच सुधारणा करण्याचा प्रयत्न करणें हेंच स्तुत्य आहे असें वाटतें. कित्येक लोक असें म्हणतील कीं, जातिभेदासंबंधींचे उपरिनिर्दिष्ट विचार जर बरोबर असतील तर जातींची संख्या जितकी वाढेल तितकी बरीच म्हणावयाची; आणि असें होऊं लागलें तर, १०।१० माणसांची एकेक जात बनेल. हा विचार मोठासा खोल नाहीं. जातीची उत्पत्ति व लय विशिष्ट व्यक्तीच्या किंवा समूहाच्या इच्छेवर अवलंबून नाहीं. हिंदुसमाजाच्या जरुरी-प्रमाणें जातींचा लय, उत्पत्ति व सुधारणा हीं झालेलीं आहेत, आणि दृश्य अथवा अदृश्य रीतीनें अजूनहि होतच आहे. हिंदु जाति ही जड, निर्जीव संस्था नव्हे, ती जीवंत संस्था आहे; आणि स्वतःच्या नियमाला अनुसरून आपलें काम करीत आहे. आज दुर्दैवानें तिच्यांत अवडंबर, ढोंग, विषयलंपटता, कलह वगैरे दोष दिसून येतात. पण याच्यावरून लोकांत चारित्र्य-बळ नाहीं एवढीच गोष्ट सिद्ध होते. त्यावरून जातिभेदयोजना दोषार्ह ठरूं शकत नाहीं.

---

# अंत्यजांचा प्रश्न.

( गोध्रा येथें नोव्हेंबर १९१७ मध्यें म. गांधी यांचे अध्यक्षते खालीं भरलेल्या 'अंत्यज परिषदे' संबंधानें मुंबईच्या ' गुजराथी ' पत्रांत बरीच टीका झाली होती. तिला उत्तर म्हणून गांधींनीं खालील पत्र पाठविलें होतें. )

रा. रा. ' गुजराथी ' कर्ते यांसः—

गोध्रा येथें महारवाड्यांत भंगी, महार इ. अंत्यज वर्गाचा जो समारंभ साजरा करण्यांत आला होता त्याविषयीं आपल्या पत्रांत बराच वादविवाद झालेला माझ्या पहाण्यांत आला आहे व या बाबतींत टीका करणाऱ्यांनीं तेथें घडलेल्या गोष्टींचा विपर्यास करून आपल्या वाचकांच्या मनांत गैरसमज उत्पन्न केला आहे असें मला वाटत असल्यामुळें तो दूर करण्याच्या हेतूनें खालील चार ओळी लिहून आपणांस तसदी देत आहें.

धर्मविषयक गोष्टींत मी स्वतःस बालक समजत नाहीं. चांगला ३५ वर्षांचा अनुभवी समजतों. कारण तितकीं वर्षें मी धर्मविषयक गोष्टींचा विचार व मनन केलें आहे. विशेषतः जेथें जेथें मला सत्य आढळलें तेथें तेथें त्याची मी अंमलबजावणी केली आहे. माझी अशी समजूत आहे कीं, नुसत्या शास्त्रवाचनानेंच धर्माचें स्वरूप हातीं लागत नाहीं. यमनियमांचें पालन केल्याशिवाय शास्त्रपठनानें मनुष्य भलत्या मार्गानें जातो हें आपण नेहमीं पहातों. पांडित्य मिरविण्याकरितां ज्यानें शास्त्र वाचलें आहे अशा मनुष्याकडून मी शास्त्राचा अर्थ लावून घेणार नाहीं. तसेंच भट्ट मोक्षमुल्लरासारख्या वडया पंडितांनीं आपल्या दांडग्या वाचनानंतर लिहिलेल्या ग्रंथांवरून देखील माझ्या आचरणाची दिशा मी ठरविणार नाहीं. हल्लींच्या काळीं शास्त्र जाणण्याचा आव आणणारे पुष्कळ लोक केवळ अज्ञानी व दंभी असल्याचें आढळून येतें. मी धर्मगुरूच्या शोधांत आहें. गुरूची आवश्यकता आहे असें मी मानतों. पण जोंपर्यंत माझ्या पहाण्यांत असा योग्य गुरु आलेला नाहीं तोंपर्यंत मला स्वतःलाच मी आपला गुरु समजतों. हा मार्ग बिकट आहे खरा, परंतु हल्लींच्या या विषम काळांत तेंच योग्य आहे असें वाटतें. हिंदुधर्माची व्याख्या आजपर्यंत कोणासही करितां आली नाहीं, इतकी त्याची

थोरवी व व्यापकता आहे. वैष्णव सांप्रदायांत माझा जन्म झालेला आहे आणि त्याचे सिद्धांत मला फारच आवडलेले आहेत. वैष्णव **धर्मांत** किंवा हिंदु **धर्मांत** भंगी महार इत्यादिकांना अस्पृश्य गणलें आहे असें कोठें मला आढळलें नाहीं. हिंदुधर्माच्या सभोंवतीं कित्येक रूढींचीं पुटें बसलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं रूढी स्तुत्य आहेत, बाकीच्या निंद्य आहेत. अस्पृश्यतेची ही रुढी सर्वथैव निंद्य होय. तिच्या योगानें धर्माच्या नांवाखालीं आज दोन हजार वर्षांच्या पापाची रास हिंदुधर्माच्या माथीं चढली आहे व अजूनही चढत आहे. या रूढीला मी पाखांड म्हणतों. त्या पाखांडांतून आपणांस मुक्त व्हावें लागेल. त्याचें प्रायश्चित्त तर आपण करीतच आहोंत. या रूढींच्या समर्थनार्थ मनुस्मृति आदि शास्त्रग्रंथांतून श्लोक उद्धृत करण्यांत कांहीं हांशील नाहीं. त्या शास्त्रांत किती तरी क्षेपक श्लोक आहेत. पुष्कळांस कांहींच अर्थ राहिला नाहीं. शिवाय मनुस्मृतींतील एकूण एक आज्ञांचें पालन करणारा किंवा करूं इच्छणारा एकही हिंदु माझ्या पहाण्यांत आलेला नाहीं. व तसें केल्यास तो भ्रष्टच होईल असें सहज सिद्ध करून देतां येईल. शास्त्रग्रंथांत छापल्या गेलेल्या प्रत्येक श्लोकाचें समर्थन करून दाखविल्यानेंच सनातन धर्माचें रक्षण व्हावयाचें नाहीं तर त्या शास्त्रांत जीं त्रिकालाबाधित तत्त्वें सांगितलेलीं आहेत त्यांस अनुसरल्यानेंच मात्र होणार आहे. ज्या ज्या धार्मिक पुढाऱ्यांशीं माझें या बाबतींत संभाषण झालें आहे त्यांनीं ही गोष्ट कबूल केली आहे. विद्वान् गणल्या जाणाऱ्या व समाजांत पूज्य मानल्या जाणाऱ्या या धर्मप्रचारकांनीं माझ्या प्रश्नाचें उत्तर देतांना "तशी रुढी किंवा प्रघात पडून गेला आहे; याशिवाय भंगी महार इत्यादिकांशीं आपण जें वर्तन ठेवतों त्याला दुसरा कांहीं एक आधार किंवा समर्थनाचा मार्ग नाहीं" असेंच स्पष्ट म्हणून दाखविलें आहे.

खरें म्हटलें तर ही रुढी कोणी पाळीतही नाहीं. आगगाडींतून त्यांचा स्पर्श होतो. गिरण्यांमध्यें हे लोक नोकर असतात, त्यांना आपण खुशाल शिवतों. फरग्युसन कॉलेजांत व बडोदें येथील कॉलेजांत अंत्यज दाखल झालेले आहेत. हें सर्व, समाज चालवून घेतो. इंग्रज किंवा मुसलमानांच्या घरांत त्यांचा सत्कार होतो व इंग्रज किंवा मुसलमान यांना स्पर्श करण्यांत आपणांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं. त्यांपैकीं पुष्कळांस भेटण्यांत तर आपण उलट आपला गौरवच समजतों. हे अंत्यज उद्यां बाटून ख्रिस्ती झाले तरीही मग त्यांस अस्पृश्य गण-

ण्यास आपण धजत नाहीं. अशा प्रकारें जी रूढी पाळतां येण्यासारखी नाहीं तिचें समर्थन, कोणताही शहाणा हिंदु, स्वतःची समजूत निराळी असली तरी, करणार नाहीं.

'या अस्पर्श्य भावनेमध्यें तिटकारा नाहीं' असें ह्मणणाऱ्यांनां तर कोणतें विशेषण लावावें हेंच मला कळत नाहीं. आगगाडींत एखादा महार चुकून जरी आपल्या डब्यांत शिरला तरी त्यास चोप बसल्याशिवाय रहात नाहीं व शिव्यांचा तर त्याच्यावर नुसता पाऊस पडतो. चहावाले त्यांनां चहा विकीत नाहींत, दुकानदार त्यांस माल विकीत नाहींत. ते मरत असले तरी आपण त्यांस शिवत नाहीं, आपलें उष्टें त्यांस खावयास देतों, आपले फाटके मळके कपडे त्यांस घालावयास देतों. कोणताही हिंदु त्यांस शिकवावयास तयार नाहीं. त्यांनीं चांगल्या इमारतींत रहातां कामा नये. रस्त्यावरून जातानां 'मला शिवूं नका' असें आह्मीं त्यांस म्हणावयास लावतों. याहून अधिक तिरस्कारसूचक गोष्टी आणखी कोणत्या पाहिजेत ? त्यांची दशा कशाची द्योतक आहे ? जसें यूरोपांत धर्माच्या नांवाखालीं एके काळीं गुलामगिरी बोकाळली होती तसें आज आपल्या समाजांतही धर्माच्या नांवाखालीं अंत्यजांबद्दलच्या ह्या तिटकाऱ्यानें आपलें ठाणें दिलें आहे. आणि यूरोपांतही जसे बायबलांतील उतारे देऊन गुलामगिरीचें समर्थन करणारे शेवटपर्यंत होते त्याच प्रकारचा आजचा रूढीचा कैवार देखील मी समजतों.

अस्पर्श्यत्वाच्या कल्पनेचा हा दोष धर्मांतून मोठ्या आग्रहानें आपणांस काढून टाकावा लागेल. त्याशिवाय देशांतून प्लेग, कॉलरा इत्यादि रोगांचें निर्मूलन होणें अशक्य आहे. त्यांच्या धंद्यामध्यें असा कोणताच हीनपणा नाहीं. डॉक्टर लोक किंवा आपल्या आया मळ इत्यादि घाण साफ करण्याचें काम करतात. यावर कोणी असें उत्तर देतात कीं ते तर पुनः स्वच्छ होतात. बरें भंगी इत्यादि लोक जर तसें करीत नसले तर तो दोष त्यांचा नव्हे, तर सर्वस्वी आपलाच आहे. जेव्हां आपण त्यांस प्रेमानें भेटूं तेव्हां आपण त्यांस स्वच्छता शिकविल्याशिवाय रहाणार नाहीं हें उघड आहे.

सहभोजन इत्यादि प्रकारांबरोबर या चळवळीला ढकलण्याची आपणांस गरज नाहीं. या चळवळीनें वर्णाश्रमधर्माचा लोप व्हावयाचा नाहीं. त्यांतील अतिरेक तेवढे

दूर करून त्याचें ( धर्माचें ) संरक्षण करण्याचाच हेतु आहे. भंग्यांनीं आपला धंदा सोडावा असेंही या चळवळीचे पुरस्कर्ते इच्छित नाहींत; परंतु मळ इत्यादि साफ करण्याचा धंदा वैष्णवाला शोभण्याइतका पवित्र व आवश्यक आहे एवढेंच दाखविण्याचा हेतु आहे. हा धंदा करणारे लोक हलके नव्हेत, तर इतर धंदेवाईक लोकांइतकेच सामाजिक हक्कांस पात्र असे आहेत व त्यांच्या प्रवृत्तीनें देशाचें अनेक रोगांपासून संरक्षण होतें ह्मणून ते लोक वैद्य डॉक्टरांप्रमाणेंच पूज्य होत.

हा देश तपश्चर्या, पावित्र्य, दया इत्यादिंच्या योगानें जसा सर्वांस वंद्य झाला आहे त्याचप्रमाणें स्वच्छंद, पाप, क्रूरता इत्यादि दुर्गुणांचेंही माहेरघर बनला आहे. अशा वेळीं आपण व आपल्या लेखक मंडळीनें पाखांडाला विरोध करून त्याला समाजांतून नाहींसें करण्याचे कामीं बद्धपरिकर होणें हेंच आपणास शोभेल. गोध्रा येथें झालेल्या पुण्य कार्याचें अभिनंदन करून त्या पुण्याचे अंशभागी व्हा आणि सहा कोटि लोकांनीं हिंदु धर्माला कंटाळून, हताश होऊन, त्याचा त्याग करूं नये अशी खटपट करण्याचे कामीं साहाय्य करा अशी माझी आपणांस विनंति आहे.

माझी धार्मिक जबाबदारी पूर्णपणें ओळखून मी या चळवळींत भाग घेत असतों. कालांतरानें माझेही विचार बदलतील असें भविष्य एका टीकाकारानें वर्तविलें आहे. या संबंधानें मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, जर कधीं पुढें अशी वेळ आलीच तर त्या वेळेस मीं हिंदुधर्माचाच नव्हे, तर धर्ममात्राचा त्याग केला असेल. बाकी **हिंदुधर्माला वरील कलंकापासून मुक्त करण्याचे कामीं हा देह खर्ची पडला तर त्यांत कांहीं विशेष नाहीं अशी माझी दृढ समजूत आहे. ज्या धर्मांत नरसिंह मेहतांसारखे समदृष्टि भगवद्भक्त होऊन गेलेले आहेत त्या धर्मांत अस्पर्श्यतेला जागा असणें मुळींच संभवनीय नाहीं.**

---

# देव मंदिर.

( फिनिक्समध्यें ज्या ठिकाणीं गांधी ह्यांचा आश्रम होता तेथून सात मैलांवर वेरुलम् नांवाचें एक प्रसिद्ध गांव आहे. तेथें राहणाऱ्या हिंदु लोकांनीं एक कृष्ण-मंदिर बांधिलें होतें. आणि तें उघडण्याचा समारंभ महात्माजींच्या हस्तें करण्यांत आला होता. ठरविलेल्या वेळीं हजारों माणसें त्या ठिकाणीं जमलीं. महात्माजींच्या ह्यातांत सोन्याची किल्ली व्यवस्थापकांनीं दिली. महात्माजी हंसले. रीतीप्रमाणें मंदिराचें द्वार उघडण्यांत आल्यानंतर त्यांनीं हिंदींत भाषण केलें. तें येणें प्रमाणें:– )

परमेश्वराचें द्वार रात्रंदिवस नेहमीं उघडेंच असतें. असें असूनही माझ्या ह्यातांनीं तें उघडण्याचें सोंग करविलें हें पाहून प्रभु हंसेल. मला माहीत आहे कीं, ईश्वराचें द्वार उघडण्याचा अभिमान राखणारा मनुष्य पापीच समजला पाहिजे. असें असूनही या ठिकाणीं येऊन तें उघडण्याचा समारंभ मीं केला, हा मंदिराच्या कारभाऱ्यांचें माझ्यावर जें प्रेम आहे, त्याच या मुळेंच होय. शिवाय सध्यां असलीं मंदिरें ह्मणजे अनाचाराचे अड्डेच बनले आहेत, ऐदी लोकांचे ऐदीखाने झाले आहेत हें सर्वांसच माहित आहे. पुढें मागें हें मंदिरही त्यांपैकींच एक झालें आणि ईश्वराच्या ऐवजीं या मंदिरांत दुराचाराचाच वास होऊं लागला तर मी पापांत पडेन आणि त्याबद्दल मला प्रायश्चित्त घ्यावें लागेल. ईश्वर करो आणि असा प्रसंग न येवो. मंदिराच्या कारभाऱ्यांनां मी ओळखतों. त्यांच्यावर माझी श्रद्धा आहे, तथापि मला त्यांना सांगूं द्या कीं तुमच्या निष्काळजीपणामुळें, हें मंदिर ईश्वराचें न रहातां जर सैतानाचें निवासस्थान झालें तर त्याचीं कडु फळें तुह्माला चाखावीं लागतील. ह्या मंदिराचें कुलूप उघडण्याकरितां मला सोन्याची किल्ली दिली आहे. त्या रुप्याच्या कुलुपानें आणि सोन्याच्या किल्लीनें माझ्या हृदयांत झगडा चालविला आहे. ही कुलुप किल्ली मी कुठल्या तिजोरींत राखूं ? मी हिंदुस्थानांत गेलों ह्मणजे तेथें मला राहण्याकरतां झोंपडीही असेल कीं नाहीं याची मला शंका आहे. तर मग हें रुप्याचें कुलुप आणि सोन्याची किल्ली मी कोठें ठेवूं कीं तेथून तीं चोर चोरून नेणार नाहींत ? खरोखर मला वाटतें कीं येथें बोलावून तुह्मीं माझें बरें करण्याऐवजीं वाईटच केलें आहे.

आणखी ही भगवद्गीता पाहून मला हसूंच कोसळतें. त्या पुस्तकाला चांदीनें मढवून त्यावर सोन्याची वेलबुट्टी काढली आहे. पवित्र गीता ग्रन्थाला सोन्यारुप्यानें मढवून अपवित्र बनविलें आहे ! ही तुमची भेट स्वीकारून मी काय करूं ? जेव्हां जेव्हां तुह्मी दिलेली ही गीता घेऊन मी वाचावयास बसेन तेव्हां तेव्हां श्रीकृष्ण भगवन्ताच्या निष्काम कर्मयोगाच्या शिक्षणाच्या आणि माझ्यामध्यें हें सोनें रुपें येऊन उभें राहील आणि माझें मन चळवील. हें पुस्तक भेट देण्यापेक्षां माझें हृदय गीतामय होवो, असा आशीर्वाद जर शुद्ध अंतःकरणानें मला दिला असतात तर माझें अधिक कल्याण झालें असतें. माझ्या ह्या कडक टीकेनें आपल्या मनाला दुःख होऊं देऊं नका. तुमच्या हातून घडलेल्या लहान सहान चुका माझ्यावरील तुमच्या प्रेमापुढें दिसत नाहींशा होतात. आणि म्हणूनच तुह्मी भेटीदाखल प्रेमानें दिलेल्या वस्तू मी प्रेमानें ग्रहण करतों.

---

## हिंदुस्थानांत भूकंप.

( इन्डिअन् ओपिनिअन् १५ एप्रिल १९०५ )

उत्तरहिंदुस्थानांत धरणीकंप झाल्याची तार आली आहे. अशा प्रकारचा धरणीकंप पूर्वी कधीं झाला असल्याचें आठवत नाहीं. लाहोर पासून सिमल्यापर्यंत त्याचा परिणाम जाणवला आहे. धरमसाला आणि त्याच्या आसपासचीं गांवें उजाड होऊन गेलीं आहेत. हजारों माणसें जमिनींत गडप्प झालीं. त्यांत कित्येक गोरे लोकही होते. लाहोर येथील मोठ्या मशिदीला आणि इतर पुष्कळ भक्कम इमारतींना धक्का पोहोंचला आहे आणि लाखों रुपयांचें नुकसान झालें आहे. राजे साहेब आणि राणी साहेब यांनीं सहानुभूतीच्या तारा लॉर्ड कर्झन यांना पाठविल्या आहेत. एका भूगर्भशास्त्रवेत्त्यानें प्रसिद्ध केलें आहे कीं असले धरणीकंप आणखीही होतील. ह्याचें कारण, तो असें म्हणतो कीं, हिमालय पर्वत वाढत चालला आहे आणि ह्या वाढण्याच्या क्रियेंत याप्रमाणें कंप होणें हें स्वाभाविक आहे.

हिंदुस्थानची दशा आज खरोखर हीन दीन झालेली आहे. लक्षावधि माणसें प्लेगनें मरत आहेत. या वर्षी प्लेगला जितका जोर आला आहे तितका १८९६ पासून आजपर्यंत कधीं ही आलेला नव्हता. ज्या गांवांत व लत्त्यांत कधींही प्लेग

झाला नव्हता तेथेंही यंदां झाला आहे. मृत्युसंख्या वाढत चालली आहे. प्लेगच्या तडाक्यांतून माणूस क्वचितच जिवंत राहूं शकत आहे.

दुष्काळानें तर देशांत घरच केलें आहे. आज वीस वर्षें झालीं, सर्व हिंदुस्थानांत मोळा आणे पीक झालेलें नाहीं. कोणत्या तरी प्रान्तांत दुष्काळ हा असायचाच. देश दरिद्री होत चालला आहे. उपासमार वाढत चालली आहे. मीठ भाकरी कशी मिळेल हें लोकांना समजत नाहींसें झालें आहे. काम करण्याची खुषी असतांनाही काम मिळत नाहीं. पैशाची टंचाई आहे. व्यापार मंद पडला आहे आणि दुष्काळांत आपला निभाव कसा होईल याची भल्याभल्या माणसांना विवंचना पडली आहे. असल्या दारिद्र्यांतही परदेशांत, जेथें मजूरी मिळूं शकते, अशा ठिकाणीं जाण्याला अडचण पडते. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया इत्यादि ठिकाणीं आपल्या लोकांना मजुरी मिळण्यासारखी आहे पण अधिकारी लोक शिरकाव होऊं देत नाहींत. हिंदुस्थानांतील अमलदारांची मनें दगडासारखीं कठीण बनलीं आहेत. लॉर्ड कर्झन सारखे अम्मलदार गर्वानें, स्वतःच्या चलाखीनें फुगून गेले आहेत. लोकमताची पर्वा करीत नाहींत आणि स्वच्छंदानें वाटेल तें करूं लागले आहेत.

आपण स्वतः चांगल्या स्थितीसाठीं लायक बनण्याचे प्रयत्न करीत आहों असें दिसत नाहीं. कित्येक थोर पुरुष हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं धडपडत आहेत. पण जन--समूहाचीं अंतःकरणें कठीण होऊन गेलीं आहेत, स्वार्थाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं आणि अडचणी आल्या म्हणजे हात जोडून बसून राहतों. देशांत एकीच्या ऐवजीं पक्ष विपक्ष चालले आहेत; दुफळ्या माजल्या आहेत. परस्परांचा द्वेष आणि टवाळी हा धंदा चालला आहे. परदेशांत गेलों तर आपला खिसा कसा भरेल ह्या प्रश्नाकडेच लक्ष देत आहों. आपल्या वाईट संवयी सोडीत नाहीं. आणि पैशासाठीं वाटेल तें नीच काम करण्यास तयार होतों.

या सर्वांचा अर्थ काय ? हीच स्थिति दीर्घ कालपर्यंत राहिली तर हिंदुस्थानची काय दशा होणार ? त्यांत सुधारणा कशी होईल ? आपलें कर्तव्य काय आहे ? हे प्रश्न दरेक हिंदवासीयाच्या मनांत उत्पन्न झाले पाहिजेत. आमची अशी समजूत आहे कीं, हा सर्व ईश्वरी कोप आहे. आपलें पुण्य संपलें आहे. हिंदुस्थान ही प्राचीन भूमि आहे, तिच्यावर ईश्वराचें प्रेम आहे. पण जीं मुलें

आईबापांना प्रिय असतात, त्यांच्यापासून आईबापांना आशाही विशेष असते आणि ती आशा विफल झाली ह्मणजे तीं निराश होतात. अशी स्थिति आपली आहे. इतर देशांतील लोक कित्येक गोष्टी करूं शकतात म्हणून त्या आपण करतां कामा नयेत. स्वच्छ कपड्यावर थोडासाही डाग पडला तर तो तावडतोब नजरेस येतो. पण काळ्या कपड्यावर डाग क्वचित्च दिसायचे. त्याप्रमाणें आपण जीं दुष्कृत्यें करूं तीं ईश्वराच्या दृष्टीला फार मोठीं दिसतील. आणि त्या मानानें आपणाला त्यांचे परिणाम भोगावे लागतील.

सारांश, दिवसेंदिवस हिंदुस्थानची दशा फारच बिकट होत चालली आहे. हाच प्रकार जर विशेष काळपर्यंत चालेल, तर हिंदुस्थान उजाड होऊन जाईल यांत संशय नाहीं. मोठमोठे मुलूख आणि राज्यें यांची वाताहत झाली आहे. मग हिंदुस्थानची काय कथा ? असा काल येण्याचा संभव आहे कीं, त्या वेळीं वाटेल तितका पश्चात्ताप केला तरी त्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं.

अशी भयंकर अवस्था आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ती दूर करण्याचे उपाय शोधून काढणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि आमची अशी समजूत आहे, कीं **जोंपर्यंत हिंदु काय, मुसलमान काय किंवा खिस्ती काय, आपली दृष्टि ईश्वराकडे वळविणार नाहींत, सत्यपंथानें चालूं लागणार नाहींत, आपली मूळची नम्रता पुनः धारण करणार नाहींत, आणि स्वार्थाला तिलांजलि देऊन परमार्थाची कांस धरणार नाहींत तोंपर्यंत राजकारणांत वाटेल तेवढे पराक्रम त्यांनीं केले तरी कांहीं एक सुधारणा होणार नाहीं.** इतर देशांत जें होऊं शकलें तें आपल्या देशाला लागू पडत नाहीं. फ्रान्स देशांत बंड करून लोकांनीं प्रजासत्ताक राज्य मिळविलें. आणि आज वरवरच्या भपक्यावरून पाहतां फ्रान्सची स्थिति चांगली आहे. रशियांतील लोक बंडें आणि मारामाऱ्या करून आपली स्थिति सुधारतील असा संभव आहे. (हें भाकित आज खरें ठरलें आहे.) हिंदुस्थानांत तसें कांहीं एक होण्यासारखें नाहीं. बंड करतील असे लोक नाहींत; कदाचित् **बंड केलें तर कशाविरुद्ध ? यानें प्लेग जाईल ? भूकंप होण्याचें थांबेल ? हाडीं खिळलेली उपासमार नाहींशी होईल ?** आमचें उत्तर ' नाहीं ' हें आहे. इतकेंच नव्हे तर ज्यांत इतर देशांतील लोक सुख मानतात त्यांत हिंदुस्थानांतील

कोट्यवधि माणसांना सुख वाटत नाहीं, वाटणारही नाहीं. यामुळें हिंदुस्थानची भौतिक स्थिति मध्यमच राहणार. हिंदुस्थानचें राज्य ईश्वरी आहे. हिंदुस्थानची दृष्टि शेषेंकरून परलोकावर आहे; ह्या जगावर नाहीं. " पण सर्व माणसांची वृत्ति अशी व्हायला, सर्व माणसें स्वार्थ सोडून सत्याचा स्वीकार करतील अशी स्थिति यायला कित्येक पिढ्या पाहिजेत. हें सर्व लिहावयाचें आणि बोलावयाचें आहे, कधीं व्हावयाचें नाहीं " असें आपण म्हणतों. आम्हाला हें म्हणणें नामर्दपणाचें वाटतें. तुमचें आणि आमचें मन काय सांगतें ? **दुसऱ्यांची काळजी करणारा परमेश्वर समर्थ आहे.**

तुम्ही आम्ही तल्लीन झालों आहों कीं नाहीं ? **सर्व जगाचा बोजा उचलायला तुम्हाला कोणी सांगत नाहीं. असा विचारही मनांत आणणें हेंही अहंमन्यतेचें लक्षण आहे, पण आपणाला स्वतःला जें करणें योग्य असेल तें कर्तव्य म्हणून करीत रहावें.** हें सहज होण्यासारखें आहे. तुमचा धर्म, इतर लोक वाटेल तें करीत असले तरी, स्वार्थ सोडून परमार्थ करणें हा आहे. कोणाला शत्रु मानावयाचें नाहीं. आणि सत्याचीच दृढ कांस धरावयाची आहे. आपल्या बंधूंच्या सुखांत सुख आणि दुःखांत दुःख मानावयाचें आहे. हा तुमचा धर्म जर तुम्हाला समजला असेल तर ' दुसरे करीत नाहींत ' ही सबब सांगून तुम्ही काय म्हणून बसून राहतां ? हा आळस काय कामाचा ? हा **धर्म पाळणें हें तरवारीच्या धारेवर चालण्यासारखें आहे. पण त्याचें फळही त्याचप्रमाणें फार मोठें आहे. तुम्ही तुमचा धर्म बजावला काय ? ह्या प्रश्नाच्या उत्तरावर हिंदुस्थानच्या भवितव्यतेचा आधार आहे.**

महंमद पैगंबर एकदा दोन शिष्यांना बरोबर घेऊन गुहेंत बसले होते. इतक्यांत त्यांच्यावर एक लष्कर चालून येत असलेलें पाहून शिष्य घाबरले. आणि म्हणाले कीं ' आपण तिघेच आहों आणि ते ( लष्करांतील लोक ) फार आहेत.' महंमद यानें जवाब दिला कीं ' नाहीं आपण चौघे आहोंत. परमेश्वर आपल्यापाशीं आहे, हें तुम्ही कसें विसरलांत ? अशा विश्वासानें जर आपलें कर्तव्य आपण करीत राहिलों तर हिंदुस्थानचीं विघ्नें ताबडतोब दूर होतील.

# आर्थिक उन्नति का नैतिक उन्नति ?

( अलाहाबाद येथील म्यूर सेंट्रल कॉलेजांतील अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेपुढें ता० २२ डिसेंबर १९१६ रोजीं दिलेलें व्याख्यान. )

नैतिक उत्कर्षाला सांपत्तिक उत्कर्ष किती जरूर आहे हें दाखविण्यासाठीं आपल्या हिंदुस्थानच्या निकृष्ट अवस्थेकडे नेहमीं बोट दाखविण्यांत येतें. हिंदुस्थानांत कमींत कमी तीन कोट लोकांना एकच वेळ जेवून रहावें लागतें ! या लोकांच्या नैतिक उन्नतीविषयीं वाटाघाट करण्यापूर्वीं त्यांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र कसें मिळेल असा प्रश्न हे अर्थशास्त्रज्ञ करतात. हा प्रश्न सोडविणें जरूर नाहीं काय ? अर्थात् आर्थिक उन्नति व नैतिक उन्नति हीं या बाबतींत परस्परानुकूल आहेत, असें सिद्ध होत नाहीं काय ? जी गोष्ट या तीन कोट लोकांची तीच तीस कोट लोकांची, किंबहुना साऱ्या जगाची ! असेंही यापुढें जाऊन म्हणण्यास हे लोक कचरत नाहींत. पण हें अनुमान अत्यंत चुकीचें आहे. अपवादात्मक अशा थोड्याशा उदाहरणांवरून काढलेले सर्व सिद्धान्त असेच भ्रामक असावयाचे. अठरा विश्वे दारिद्र्य व उपासमार हीं सदाचारप्रवर्तक होऊं शकत नाहींत हें खरें आहे. प्रत्येक माणसाला स्वतःचा जीव जगविण्याचा हक्क आहे; व त्याकरितां लागणारीं साधनें—अन्न, वस्त्र, व निवाऱ्याची जागा—हीं त्याला अवश्य मिळालीं पाहिजेत. हें सिद्ध करण्यास आम्हांला अर्थशास्त्रज्ञांची मदत नको आहे. मुख्य प्रश्न हा आहे कीं, आर्थिक उत्कर्ष—सांपत्तिक भरभराट—हा नीतिमत्तेच्या वाढीला मदत करतो कीं नाहीं ?

ऐतिहासिक पुरावा काय दाखवितो ? रोमन लोकांचा नैतिक अधःपात झाला त्यावेळीं ते ऐश्वर्यांत लोळत होते. इजिप्तची वाट तीच. ऐश्वर्यमदानें धुंद झाल्यामुळें यादवांनीं " यादवी " माजवून परस्परांचा उच्छेद केला ! अशीं किती तरी उदाहरणें गोळा करितां येतील. अँड्र्यू कार्नेजी, रॉकफेलर वगैरे पाश्चात्य कुबेरतुल्य श्रीमंतांकडे बोट दाखवून असें विचारण्यांत येतें कीं, " या लोकांवर नाहीं कोठें संपत्तीनें आपला तामसी प्रभाव गाजविला ? " पण एक तर असे लोक किती सांपडतील ? व दुसरें असें कीं, सांपत्तिक भरभराटीनें या लोकांना सुद्धां अधिक नीतिमान् केलें असें म्हणतां येईल काय ? वस्तुस्थिति अशी असते

कीं, या लोकांच्या दातृत्वानें समाजाचें जें कल्याण झालें असेल तिकडे लक्ष देऊन यांच्या नीतिमत्तेविषयीं चर्चा करतांना आपण फारशी काटेतोल दृष्टि ठेवीत नाहीं.

मी दक्षिण आफ्रिकेंत होतों त्यावेळीं तेथील हजारों हिंदी बांधवांशीं मैत्रीनें व सहकारितेनें वागण्याची संधि मला मिळाली होती. माझा त्या वेळचा सरोस अनुभव असा आहे कीं, एखाद्याची सांपत्तिक स्थिति ज्या मानानें चांगली असेल त्याच मानानें त्याचा नैतिक दर्जाही खालीं लागे. त्या काळीं आम्हांस निःशस्त्र प्रतीकाराच्या मोहिमेंत आमच्या निष्कांचन बांधवांकडून जशी मदत मिळाली तशी श्रीमान् बांधवांकडून मिळाली नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील अपमानास्पद स्थितीनें गरीब लोकांचा स्वाभिमान जितका जागृत होई तितका या धनिक लोकांचा होत नसे.

प्रश्न थोडा विकट व नाजूक असल्यामुळें त्याची चर्चा करणें अमळ भीतिप्रद वाटतें. पण याही पुढें जाऊन असें दाखवितां येईल कीं, संपत्तीनें खऱ्या प्रगतीला–अर्थात् आध्यात्मिक उन्नतीला–अडथळा मात्र होतो ! अर्थशास्त्रदृष्ट्या देखील सर्व धर्माचीं धर्मपुस्तकें अधिक मार्गदर्शक होतील असें म्हणण्याचें धाडस मी करितों. कारण ऐहिक सुखसमृद्धि ही नैतिक आचारास अनुकूल आहे किंवा नाहीं, हा प्रश्न कांहीं आजकालचा नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वीं महात्मा जीजस् ख्राइस्ट यास हाच प्रश्न विचारण्यांत आला होता. " प्रभो, शाश्वत जीवनाची प्राप्ति होण्यासाठीं मी काय करूं ? " असा प्रश्न करणाऱ्या एका माणसास ख्राइस्टनें प्रथम सांगितलें, " परमेश्वराचे दहा आदेश ( Ten Commandments ) आहेत त्यांचें पालन कर. " तो म्हणाला " हे तर मी जन्मापासून पाळीत आलों आहें. " हें ऐकून ख्राइस्टला आनंद झाला; व प्रेमानें तो म्हणाला " अद्याप तुझ्यांत एक गोष्ट कमी आहे. घरीं जा; तुझें घरदार सर्व विकून त्याची खैरात करून टाक; व चल माझ्या मागून. " हें ऐकून त्या माणसाला फार वाईट वाटलें; व तो तेथून हिरमुसलें तोंड करून निघून गेला. तेव्हां जीजस् भोंवतालच्या शिष्यवर्गास म्हणाला, " परमेश्वराच्या सन्निध जाणें श्रीमान् लोकांस किती कठीण आहे पहा बरें ? " शिष्यांस हें ऐकून फार आश्चर्य वाटलें. पण ख्राइस्ट फिरून म्हणाला, " बाळांनों, सुईच्या नाकांतून उंट जाणें जितकें कठिण आहे, त्याहून श्रीमान् माणूस स्वर्गाला जाणें कठिण आहे ! "

नीतीचें खरें सार, आध्यात्मिक उन्नतीचें खरें रहस्य, जजिसच्या वरील वाक्यांत भरलें आहे. आपल्या हिंदुधर्मग्रंथांतून अशीं हजारों वाक्यें काढून दाखवितां येतील. पण तसें करणें म्हणजे तुमचा एकप्रकारें उपमर्द करण्यासारखें आहे. म्हणून मी त्या भानगडींत पडणार नाहीं. गौतमबुद्ध, महंमद, शंकराचार्य, नानक, कबीर, चैतन्य वगैरे लोकांच्या आचरणाला शुद्ध वळण लावणाऱ्या सर्व महात्म्यांनीं आपल्या चरित्रानेंही वरील प्रश्नाचें जीजससारखेंच उत्तर दिलें आहे. आपखुषीनें गरीबीचा जीवनक्रम पसंत करणाऱ्या या लोकांनींच जगाला खरें सौंदर्य व श्रेष्ठत्व प्राप्त करून दिलें आहे.

या मुद्याचा मीं इतका विस्तार केला नसता. पण पाश्चात्य देशांप्रमाणें केवळ भौतिक सुखोपभोगाचें ध्येय आजकाल आपण पुढें ठेवल्यामुळें खऱ्या प्रगतीच्या ऐवजीं आपण अधोगतीच्या मार्गाला मात्र लागत चाललों आहों असें माझें मत असल्यामुळें या विषयाचा मला विस्तार करावा लागला. "भौतिक सुखांची अमर्याद वाढ"—असा जर आर्थिक उन्नतीचा अर्थ केला, तर तशा अर्थाची आर्थिक उन्नति ही देशाच्या खऱ्या व शाश्वत उन्नतीला प्रतिबंधक आहे असें मला वाटतें व म्हणूनच धनोत्पादक व्यवसायांना थोडाबहुत आळा घालणें इष्ट आहे असें आमच्याइकडे प्राचीन कालापासून चालत आलेलें मत आहे. धनोत्पादनास वाहिलेले कांहीं वर्ग पूर्वींपासून आमच्या समाजांत आहेत, व तसें असणें जरूरही आहे. पण अर्थसंचयाच्या नादीं लागणें म्हणजे आपल्या उच्च ध्येयापासून थोडेंबहुत खालीं घसरणें आहे अशीच सार्वत्रिक समजूत आपल्या लोकांत होती. व पैशाच्या पाठीमागें लागण्यापेक्षां स्वेच्छेनें दारिद्र्यपूर्ण जीवनक्रम पसंत करणें हें किती तरी श्रेष्ठ आहे अशी जाणीव प्रत्येक धनाढ्य माणसास असे.

ईश्वराची व लक्ष्मीची ( संपत्तीची ) आराधना तुम्हांला एकाच वेळीं करतां येणार नाहीं—अशी एक इंग्रजी म्हण आहे व तिजमध्यें एक महत्त्वाचा अर्थशास्त्राचा सिद्धांत ग्रथित केला आहे असें मला वाटतें. पाश्चात्य राष्ट्रें भौतिकसुखलालसारूपी राक्षसिणीच्या दाढेंत सांपडून चुरडलीं जात आहेत. त्यांची नैतिक वाढ आतां खुंटली आहे. देशांतील संपत्ति वाढली म्हणजे त्याची सर्व बाजूंनीं उन्नति झाली असें त्यांना वाटतें, म्हणून आपली उन्नति ते पौंड, शिलिंग, पेन्स, यांनीं

मोजतात. अमेरिकेसारखी कल्पनातीत संपत्ति हेंच त्यांचें ध्येय होऊन बसलें आहे. सर्वांना अमेरिकेचा अगदीं हेवा वाटतो. मीं कांहीं लोकांना असें म्हणतांना ऐकिलें आहे कीं, आपण अमेरिकेंतील लोकांप्रमाणेंच संपत्ति मिळवूं; मात्र संपत्ति मिळविण्याचे अमेरिकेंतील मार्ग आपण अनुसरणार नाहीं. पण अशा तऱ्हेचा प्रयत्न फसलाच पाहिजे. अनिवार धनतृष्णेनें ज्याचें माथें फिरत नाहीं असा माणूसच दाखविणें शक्य नाहीं. अलोट संपत्ति मिळविण्याच्या नादीं न लागतां आपलें राष्ट्र नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ कसें होईल याचा विचार आमचे पुढारी करतील तर फार बरें. आमचा देश एका कालीं देवांचें वसतिस्थान होता असें म्हणतात. पण ज्या देशाला प्रचंड गिरण्या व कारखाने यांच्या कर्णकठोर खडखडाटानें व काळ्याकुट्ट धुरानें भेसूर करून सोडलें आहे, आपण कोणीकडे कशाकरितां जात आहों याचीही चांगलीशी कल्पना नसणाऱ्या, मेंढराप्रमाणें खचून डब्यांत कोंवल्यामुळें संतापून जाणाऱ्या, आपल्या स्वतःखेरीज इतर प्रत्येक माणसास परका समजून प्रसंगविशेषीं त्याशीं धक्काबुक्की सुद्धां करण्यास तयार होणाऱ्या, अशा लोकांनीं गच्च भरलेल्या गाड्या भरधांव ओढीत नेणारीं राक्षसी एंजिनें ज्यांतील सडकांवरून चालत आहेत, अशा देशांत देवांनीं वस्ती करणें शक्य नाहीं! या गोष्टींचा उल्लेख करण्याचें कारण भौतिक सुधारणेचीं हीं प्रमुख लक्षणें समजलीं जातात हें होय. पण यांनीं आपल्या खऱ्या सुखाची एक रतिभरसुद्धां वृद्धि होत नाहीं. प्रख्यात भौतिक शास्त्रज्ञ आल्फ्रेड रसेल वालेस यानेंही या बाबतींत आपलें विचारपूर्वक मत असेंच बनल्याचें कबूल केलें आहे. तो म्हणतो कीं, "प्राचीन काळीं नीतिमत्ता कमी दर्जाची होती असें ऐतिहासिक पुराव्यावरून बिलकूल दिसून येत नाहीं. उलट भौतिक शास्त्रांच्या प्रगतीनें सृष्टशक्तीवर मनुष्याचा जो अंमल चालूं लागला, व त्यामुळें संपत्तीची जी विलक्षण झपाट्यानें वाढ झाली, त्यानें आमच्या अर्धकच्च्या संस्कृतीवर चांगलाच ताण पडला, व आमचीं धर्मबंधनें अगदीं शिथिल होऊन सामाजिक अनीतीचे कित्येक अज्ञातपूर्व व भयंकर प्रकार आमच्यांत शिरले!" गिरण्यांची व कारखान्यांचीं उभारणी जणूं कांहीं माणसांच्या प्रेतांवर करण्यांत आली आहे असें तो म्हणतो; व संपत्तीच्या वाढीइतकीच झपाट्यानें नैतिक अवनति झालेली दिसून येत आहे; जसजसा पैसा वाढत आहे तसतशी न्यायदेवता आंधळी बनत आहे; मद्यपान व आत्महत्या यांनीं होणाऱ्या

मृत्यूची वाढ होत आहे; अकाल मृत्यु, व शारीरिक व्यंगें यांचें प्रमाण फार मोठें होत आहे; व वैवाहिक नीतिमत्तेचा चक्काचूर होऊन तनुविक्रयाला ( Prostitution ) एका सामाजिक संस्थेचें स्वरूप आलें आहे. घटस्फोटाच्या मुकदम्यांत निरुद्योगी श्रीमान् लोकांतील नीतिमत्तेचा मासला चांगला दिसून येतो. लंडनमधील श्रीमान् लोकांच्या राहणीची बरीच अंतस्थ माहिती असलेल्या एका मित्रानें मला सांगितलें कीं, खुद्द लंडन शहरांत व या वडया लोकांच्या खेडयापाड्यांतील वाड्यांत अनीतिपूर्ण सुखोपभोगाची अशी कांहीं दंगल चालते कीं, त्यापुढें पूर्वींच्या काळच्या चैनी बादशहांच्या दरबारीं चालत असलेले प्रकारही फिके पडतील ! लढाईविषयीं बोलतांना तो असें म्हणतो कीं, शांततेच्या लांब लांब बाता मारीत असतां प्रत्येक राष्ट्रानें आपल्या सैन्याची व शस्त्रास्त्रांची झपाट्यानें वाढ करणें ही गोष्टही या राष्ट्रांतील शास्त्यांच्या नीतिशून्यतेचें उत्कृष्ट प्रमाण आहे.

ब्रिटिश अमलाखालीं आपण पुष्कळ उपयुक्त गोष्टी शिकलों यांत शंका नाहीं; पण भौतिक सुखांच्या लालसेला बळी पडल्यानें ब्रिटिश जनतेंत जे दोष शिरले आहेत त्यांपासून दूर राहण्याचा जर आपण प्रयत्न केला नाहीं तर ब्रिटिश अमलापासून आपण खरा फायदा करून घेतला असें होणार नाहीं. आमची प्राचीन संस्कृति व नीतिमत्ता जर आपण शाबूद ठेवली, म्हणजे आमच्या प्राचीन वैभवाबद्दल अभिमानपूर्ण स्तोत्रें गाण्याचें सोडून आमच्या पूर्वजांचें नैतिक वर्चस्व आम्ही आमच्या आचरणानें सिद्ध करूं लागलों, तर मात्र ब्रिटनचा व आमचा दोघांचाही फायदा होईल. पण ब्रिटिश लोक आमचे राज्यकर्ते आहेत. एवढ्यासाठीं जर आपण सर्व बाबतींत त्यांचें आंधळें अनुकरण करूं लागलों तर त्यांची व आमची दोघांचीही अवनति होईल. उच्च ध्येयांची, अगर त्या ध्येयांना व्यावहारिक स्वरूप देण्याची आपणांस कधीं भीति वाटतां कामा नये. सोन्यापेक्षां सत्याची, सत्ता व ऐश्वर्य यांपेक्षां निर्भयतेची, व देहासक्तीपेक्षां परोपकाराची समृद्धि जर आपल्या देशांत दिसून येईल तरच त्यास खरोखर आध्यात्मिकदृष्ट्या वर्चस्व मिळेल. आमच्या घरांतून, वाड्यांतून व मंदिरांतून लक्ष्मीच्या आनुषंगिक गुणांचें उच्चाटन करून त्यांत सद्गुणांची स्थापना केली, तर एखादें प्रचंड सैन्य बाळगण्याचें ओझें न वाहावें लागतां कसल्याही बलाढ्य शत्रूशीं आपल्याला टक्कर देतां येईल. आपण सदाचारानें ईश्वराच्या कृपेला पात्र होऊं या, म्हणजे त्याच्या

अभिवचनाप्रमाणें आपल्याला कशाचीही वाण पडणार नाही. खरें अर्थशास्त्र हेंच होय. तुम्ही आम्ही याचा प्रेमानें अंगीकार करूं व त्याचें आपल्या नित्याच्या व्यवहारांत आचरण करूं ! ( ' भारत-सेवक ' वरून )

---

# माझा उपवास.

( महात्मा गांधी यांनीं अहमदाबाद येथील गिरण्यांच्या संपाचे लढ्यांत केलेल्या उपवासा संबंधानें खुलाशाचें जें एक पत्र वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलें होतें त्यांत ते म्हणतातः— )

माझे कांहीं मित्र माझें हें करणें मूर्खपणाचें आहे असें म्हणतात. कांहीं भित्रेपणाचें आहे, असें म्हणतात व इतर त्याच्याहीपेक्षां वाईट असें म्हणतात. माझ्या मतें मी वागलों ह्यापेक्षां निराळ्या रीतीनें वागलों असतों तर मीं माझ्या जन्मदात्यापाशीं कृतघ्न ठरलों असतों व हातीं घेतलेल्या कामांत बोलण्याविरुद्ध कृति करतों असें झालें असतें.

प्लेगमुळें मजुरांस शेंकडा ७० टक्के प्रमाणें बोनस देण्यांत येत होतें. तें बंद करून महर्गतेमुळें शेंकडा २० टक्के जास्त मजुरी देण्याचें गिरण्यांचे मालकांनीं ठरविलें. ही गोष्ट मजुरांस पसंत पडली नाहीं. हें प्रकरण लवादाकडे गेलें असतां-नांच कांहीं गिरण्यांतील मजुरांनीं संप केला. यामुळें गिरणीवाल्यांनींहीं लवादा-मार्फत तंटा तोडण्याचें नाकारून मजूर शेंकडा २० टक्के कबूल करीपर्यंत गिरण्या बंद ठेवण्याचा निर्धार केला. ताबडतोब कांहीं केलें नाहीं तर मजूर फशीं पडतील असें वाटून किती मजुरी मिळावी याची आम्हीं चौकशी केली. या बाबतींत गिरणीवाल्यांची मदत मागितली परंतु अशी मदत ते देईनात. चौकशी अंतीं शेंकडा ३५ टक्के मजुरी जास्त दिली असतां भागेल ही गोष्ट आम्हीं गिरणी-वाल्यांच्या कानावर घातली व आमची कांहीं चूक दाखविल्यास ती दुरुस्त करूं असें सांगितलें. परंतु त्यांनीं ही बाब तडजोडीनें मिटविण्याचें नाकारलें. तेव्हां एका प्रचंड जाहीर सभेंत शेंकडा ३५ टक्के हें प्रमाण आम्हीं मजुरांपुढें ठेविलें. प्लेगचें बोनस शेंकडा ७० होतें व आपण शेंकडा ५० च्या खालीं घेणार नाहीं असा मजुरांनीं निश्चय केला होता. तरी आमच्या म्हणण्यास ते कबूल झाले.

तथापि लवादा मार्फत तंटा मिटविण्यास आपण केव्हांही तयार आहों असेंही याच वेळीं ठरविण्यांत आलें. त्यानंतर शहराच्या बाहेर झाडाखालीं जमलेल्या हजारों लोकांनीं ईश्वराचें स्मरण करून शेंकडा ३५ टक्यांच्या खालीं मजुरी आम्हीं स्वीकारणार नाहीं अशा शपथा वाहिल्या. गिरणीवाल्यांनीं मजुरांना वळविण्यासाठीं लोक नेमले. मजुरांना अन्नवस्त्र पुरविल्याखेरीज आम्ही अन्नग्रहण व वस्त्रपरिधान करणार नाहीं असें त्यांस आम्हीं आश्वासन दिलें. परंतु त्यांपैकीं धडधाकट इसमांनीं आपल्या पोटापुरतें काम केल्याशिवाय जर आम्ही त्यांस सार्वजनिक फंड उभारून मदत केली तर त्यांस एक प्रकारें फाजील मदत केल्यासारखें होईल असें वाटून आम्हीं कांहीं लोकांस काम दिलें. अर्थातच यंत्रांशीं काम करणाऱ्या लोकांस वाळूच्या टोपल्या वाहण्यास लावणें कठीण होतें. या प्रमाणें बावीस दिवस गेले.

एके दिवशीं सकाळीं रोजच्या पेक्षां अगदींच थोडे लोक सभेस आले व तेहिं निराश झालेले दिसले. एका गिरणींतील मजूर तर आपल्या प्रतिज्ञा मोडून २० टके घेण्यास तयार झाले असल्याचेंही मला समजलें. " यांना काय खावयाला भरपूर आणि सभेंत यावयास मोटार मिळते. आम्हांस मात्र मेरपर्यंत आपलें म्हणणें सोडूं नका असा उपदेश करितात. " असेहि उद्गार कांहींच्या तोंडून निघाल्याचें ऐकलें. अशा परिस्थितींत मी काय करावयास पाहिजे होतें ? सदर प्रकरण न्याय्य होतें अशी माझी समजूत होती. कांहीं झालें तरी आपली प्रतिज्ञा पाळलीच पाहिजे या मताचा मी आहें. मजूरवर्ग ईश्वराला भिऊन वागणारा आहे. परंतु पुष्कळ दिवस गिरण्या बंद राहिल्यामुळें या लोकांच्या सहनशीलतेला वाजवीपेक्षां जास्त ताण बसला होता. **आपलें वचन वाटेल तेव्हां मोडणारे शेंकडों लोक मला माझ्या ह्या देशांतल्या प्रवासांत आढळले आहेत. ईश्वरावर व आत्मबलावर आपल्यापैकीं श्रेष्ठ लोकांचा विश्वासही संदिग्ध व अस्पष्ट असतो हेंही मला पक्कें माहीत होतें. माझ्या विश्वासाची या वेळेला कसोटी होती. मी लोकांपुढें उभा राहिलों तेव्हां त्यांनीं इतक्या गंभीरपणें घेतलेली प्रतिज्ञा मोडावी हें मला सहन होणें शक्य नव्हतें. तेव्हां जोंपर्यंत त्यांना शेंकडा ३५ प्रमाणें मजुरी मिळणार नाहीं तोंपर्यंत मी अन्न ग्रहण करणार नाहीं असें मीं त्यांना सांगितलें. सगळी सभा जादूनें भारल्या-**

प्रमाणें एकदम खडबडून जागी झाली. प्रत्येकाच्या डोळ्यांतून अश्रु-बिंदू पडूं लागले. मजूर लोक उभे राहिले. ३५ टक्के मिळे-पर्यंत आपण गिरणींत जाणार नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें. व जे सभेंत हजर नव्हते त्यांजकडे जाऊन त्यांचीं मनें दृढ करण्यास ते निघाले. मला अन्नग्रहण न करण्याबद्दल घेतलेल्या शपथेबद्दल वाईट वाटत नाहीं. परंतु मी जर तसें केलें नसतें, तर ज्या तत्त्वा-वर माझा विश्वास आहे त्या तत्त्वाप्रमाणें चालण्यास मी नाला-यक आहें असें जाहीर केल्यासारखें झालें असतें. आपलें आच-रण सत्य असणें व आपल्या शब्दाला किंमत असणें ह्या दोन गोष्टींशिवाय मोठालीं कामें करण्यास व राष्ट्रसंवर्धन करण्यास कोणतेही लोक समर्थ होऊं शकत नाहींत अशी माझी पक्की सम-जूत आहे.

---

## दिल्ली येथील परिषद्.

### व्हाइसराय साहेबांस पत्र.

परिषदेस हजर राहूं नये असें ठरविण्याचें माझें मुख्य कारण म्हटलें म्हणजे रा. टिळक, मिसेस बिझांट व अलीबंधु यांनां परिषदेस निमंत्रण देण्यांत आलें नाहीं हें होय. यानंतर प्रांतिक परिषदा भरावयाच्या आहेत, त्यांनां हजर रहाण्यास या माणसांना निमंत्रण देण्यांत आल्यास हल्लींच्या प्रसंगीं झालेली ही चूक भरून निघेल. बहुजनसमाज ज्यांच्या पाठीशीं आहे अशा पुढाऱ्यांचीं मतें मूलतः वेगळीं असलीं तरी त्यांचा अवमान करण्यानें कोणत्याही सरकारचा निभाव लागणें शक्य नाहीं.

परिषदेच्या कमिटींत सर्व प्रकारच्या मतांचें निदर्शन व्हावें अशी तजवीज ठेवण्यांत आलेली पाहून मला संतोष वाटतो. कमिटी किंवा परिषद् यांपैकीं कोठेंही मीं आपले विचार प्रदर्शित केले नाहींत. पुढें येणाऱ्या ठरावांस अनुमति दर्शविण्यानेंच आपल्या हातून दिल्लीच्या परिषदेचा हेतु सिद्धीस नेण्याचे कामीं मदत होणार आहे असें वाटल्यावरूनच मी खुल्या दिलानें व स्पष्ट रीतीनें ठरावांस

पाटवळ दिलें. शब्दानें दिलेलें हें आश्वासन कृतींत उतरविण्याची माझी तयारी आहे हें यासोबत जोडलेल्या पत्रावरून लक्ष्यांत येईलच. मदतीच्या हांकेस या वेळीं आम्हीं तत्पर राहिलों तर आम्हांला आपलें ध्येय लवकर गांठतां येईल, ही भावना याच्या बुडाशीं आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें आहे. कर्तव्यपरिपालनाच्या अनुरोधानें आपोआपच हक्काची शाबिती होते. ज्या सुधारणांचा आपण आपल्या भाषणांत निर्देश केला त्यांमध्यें कॉंग्रेसलीगच्या योजनेंतील मुख्य मुख्य तत्त्वें अन्तर्भूत होतील असा लोकांना भरंवसा वाटणें स्वाभाविकच आहे. आणि याच विश्वासानें परिषदेंतील पुष्कळशा सभासदांनीं सरकारशीं अन्तःकरणपूर्वक सहकारिता करण्याची आपली तयारी दाखविली आहे.

माझ्या देशबांधवांनीं पुढें टाकलेलें पाऊल मागें घ्यावें असें घडवून आणणें मला शक्य असतें तर मी त्यांनां राष्ट्रीय सभेचे सर्व ठराव सोडून देण्यास सांगितलें असतें व युद्ध चालू आहे तोंपर्यंत "होमरूल" किंवा 'जबाबदार राज्यपद्धति' यांचा नामोच्चारही मी होऊं दिला नसता. या प्रसंगीं हिंदी लोकांनीं आपले सर्व धडधाकट पुत्र साम्राज्यसंरक्षणार्थ द्यावे अशाबद्दल मीं त्यांचें मन वळविलें असतें. पण सुशिक्षित लोकांची हा मार्ग स्वीकारण्याची इच्छा नाहीं, आणि त्यांचें बहुजनसमाजावर वजन नाहीं असें यापुढें म्हणतां येणें शक्य नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतून आल्यापासून येथील रयतेशीं माझा निकट परिचय झाला आहे. आणि त्यावरून मी असें स्पष्ट सांगतों कीं त्यांनाही होमरूल पाहिजे. साम्राज्यांतच त्यांना हें ध्येय प्राप्त करून घ्यावयाचें असल्यामुळें साम्राज्याकरितां प्रचंड स्वार्थत्याग करण्यास आपण तयार असलें पाहिजे हीहि जाणीव त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली आहे. अर्थात् हल्लींच्या संकटांतून साम्राज्य बचावून नेण्याचे कामीं साहाय्य करण्यानें आम्हीं आपली ध्येयाकडे जाण्याची गति त्वरित करूं हेंहि आम्ही ओळखून आहों. साम्राज्यास साहाय्य करण्याच्या कृतींतच होमरूलची प्राप्ति आहे हेंही आम्हीं जाणलें पाहिजे.

साम्राज्याच्या संरक्षणाकरितां मिळतील तितकीं माणसें देणें हें आमचें कर्तव्य आहे, पण द्रव्यद्वारा मदत देण्यासंबंधांत मात्र असें म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थाननें आपल्या ऐपतीप्रमाणें शक्य तितकी द्रव्याची मदत केली आहे. बहुजनसमाजाच्या मनांतीलच हे विचार मी व्यक्त करीत आहें.

आम्हीं सर्वांनीं सर्व प्रकारें मदत करावी या करितांच ही परिषद भरविण्यांत आली आहे. पण आज आम्ही साम्राज्याच्या हिस्सेदारीबाहेर आहों. या गोष्टींचा विचार करतां हा स्वार्थत्याग पुढें आम्हांस चांगले दिवस येतील या आशेवरच होणार ही गोष्ट स्पष्टपणें न सांगणें म्हणजे लोकांची वंचना करण्याप्रमाणें होईल.

या प्रसंगीं अन्तःकलह बाजूस ठेवावे अशी आम्हांस विनंति करण्यांत आली आहे. याचा अर्थ अधिकाऱ्यांची जुलूमजबरदस्ती आम्हीं निमुटपणें सहन करावी असा असेल तर मात्र ही विनंति मान्य होणें केव्हांही शक्य नाहीं. अशा प्रकारच्या संघटित जुलमाचा प्रतिरोध मी शक्य तितक्या जोरानें करीन. ही विनंति तुम्ही अधिकाऱ्यांना करा, रयतेपैकीं कोणाही माणसास त्यांनीं वाईट रीतीनें वागवूं नये व लोकमताचा केव्हांही अनादर करूं नये अशी तुम्ही त्यांना ताकीद द्या.

चंपारण्यामध्यें अनेक वर्षांच्या अन्यायाचा मी प्रतीकार करून ब्रिटिश न्यायदेवतेचें प्राबल्य निदर्शनास आणलें. खेडा जिल्ह्यांतील रयत लोकांची आतां अशी खात्री झाली आहे कीं, सत्याकरितां स्वार्थत्याग करण्यास आपण तयार होतों तेव्हां सत्ता आपल्या हातीं येते. या भावनेमुळें रयतेंतील वैषम्य नाहींसे झालें आहे. चंपारण्य व खेडा येथील ह्या चळवळी या युद्धास मदतीदाखलच होत असें मी समजतों. या दिशेनें होणाऱ्या चळवळी बंद करण्यास मला सांगणें म्हणजे " तुम्ही आत्महत्या करा " असेंच सांगण्यासारखें आहे !

मुसलमानी राज्यांसंबंधानें बादशहांच्या प्रधानमंडळाकडून निश्चित आश्वासनें मिळणें जरूर आहे. याबद्दल प्रत्येक मुसलमानास तळमळ वाटत आहे. मी हिंदु असलों तरी या गोष्टीबद्दल मला उदासीन रहातां येत नाहीं. मुसलमानांचीं दुःखें तीं आमचींच दुःखें आहेत. मुसलमानी राज्याबद्दल आदरपूर्वक काळजी बाळगणें व त्यांच्या पवित्र स्थळांबद्दलच्या त्यांच्या भावनांना मान देणें व हिंदी लोकांच्या स्वराज्याच्या मागणीचा वेळींच विचार करणें यांतच साम्राज्याची सुरक्षितता आहे.

# आगगाडीच्या प्रवाशांविषयीं.

(ह्या लेखाच्या हजारों प्रती काढून मित्रवर्ग व इतर सद्गृहस्थ यांच्या साहाय्यानें त्या सर्व गुजराथभर मोफत वांटण्यांत आल्या होत्या.)

आगगाडीच्या प्रवाशांना अनेक प्रकारच्या अडचणी भोगाव्या लागतात याबद्दल कोणालाच शंका नाहीं. पुष्कळशा अडचणींचे उपाय आपल्या स्वतः-च्याच हातांत असतात. हिंदुस्थानांत चोहोंकडे ऐक्याचा वारा वहात आहे. त्याचा उपयोग केला तर पुष्कळशीं दुःखें दूर होतील. या लेखांत तीं दूर करण्या-संबंधीं कांहीं सूचना आहेत. ज्याच्या हातीं हा लेख येईल त्यानें तो लक्षपूर्वक वाचावा, व नंतर ज्यांना वाचतां येत नसेल त्यांना वाचून दाखवावा अशी विनंति आहे. कागदाचा आणि छपाईचा खर्च कोणा परोपकारी पुरुषानें केला असेल हें वाचकांना सहज समजण्यासारखें आहे. आणि ही गोष्ट लक्षांत ठेवून तरी **लेख फुकट मिळाला म्हणून त्याला तुच्छ मानतां कामा नये.**

## अधिकारी वर्गास

जर तुम्ही स्टेशनमास्तर असाल तर तुम्हाला प्रवाशांचीं पुष्कळशीं दुःखें निवा-रण करितां येतील.

स्वतः तुम्ही गरीब उतारूंबरोबर नम्रतेनें वागून, आपल्या हाताखालच्या लोकांस तसेंच करण्याचें उदाहरण घालून देऊं शकाल.

तुम्ही तिकिट देणारे असाल तर पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंकडे जितका वेळ देतां, आणि त्यांच्याकडे जितकें लक्ष पुरवितां तितकाच वेळ आणि तितकेंच लक्ष गरीबांकडेहि दिलें पाहिजे हें तुमच्या सहज ध्यानांत येण्याजोगें आहे.

गरीबांवरच रेल्वेच्या अस्तित्वाचा आधार आहे. आणि त्यांजकडून मिळणाऱ्या पैशांवरच तुमच्या पगाराचा विशेष आधार आहे.

कित्येक तिकिटें देणारे गरीबांना शिव्या देतात, त्यांच्याशीं हमरी तुमरीवर येतात, आणि इतकें केल्यावरहि शक्य तितकीं उशिरां त्यांना तिकिटें देतात. ह्यांत कांहींच मोठेपणा नाहीं. मागणाऱ्याला वेळेवर तिकिट देण्यानें त्याचा पुष्कळ वेळ वांचतो आणि तुमचें कोणतेंहि नुकसान होत नाहीं.

तुम्ही जर शिपाई असाल तर तुम्ही लांचलुचपतीपासून दूर राहिलें पाहिजे. गरीबांना धक्के न मारण्याचा निश्चय केला पाहिजे. आणि त्यांच्यावर कृपादृष्टि राखिली पाहिजे. इतकें समजलें पाहिजे कीं जनसमूहाचे तुम्ही नोकर आहां, त्याचे धनी नाहीं. त्यांना अडचणींतून मोकळें करणें हें तुमचें कर्तव्य. तुम्ही स्वतःच त्यांना अडचण करूं लागणें हा तर अन्यायच !

## सुशिक्षित उतारूंस

तुम्ही शिकलेले आहांत आणि आपल्या अंगीं देशासंबंधानें कळकळ आहे अशी छाप दुसऱ्यांवर पडावी अशी तुमची इच्छा असते. तुमच्या कळकळीचा प्रयोग तुमच्या प्रसंगांत येणाऱ्या अशिक्षित व गरीब उतारूंचें बरें करण्याकडे कराल तर ती अनायासें प्राप्त झालेली देशसेवा होईल.

उदाहरणार्थ—( १ ) एकाद्या उतारूवर जुलूम होत असेल तर त्याला तुम्ही अनेक प्रकारें मदत करूं शकाल. ( २ ) तुम्ही तिसऱ्या वर्गानें जात नसलेत तरी कधीं कधीं अनुभव घेण्यासाठीं म्हणून जाल तर तिसऱ्या वर्गांतील उतारूंना पुष्कळ फायदा होण्याजोगा आहे.

आपला खरा दर्जा न कळूं देतां तिकिट वगैरे घेण्यासाठीं गेलांत म्हणजे जो त्रास सहन करावा लागेल त्याचा इलाज तुम्हाला सहज आढळेल. आणि तुम्हाला मिळणारी सवलत थोड्या काळानें जनसमाजालाहि मिळूं लागेल.

पुष्कळदां तर शिक्षित लोक स्वतःच तिसऱ्या वर्गाच्या उतारूंवर जुलूम करितात. घाईघाईत ते स्वतःकरितां मुद्दाम लवकर तिकिट मागतात. गाडींत खास सोय करून घेतात. पाहिजे त्यापेक्षां विशेष जागा अडवितात. आणि त्यामुळें गरीबांना अडचण होते. अशा प्रकारें जुलुमाचें साधन होण्याचें तर सुशिक्षित लोकांनीं एकदम सोडून दिलें पाहिजे.

स्टेशनांत किंवा गाडींत जे दोष आढळतील त्यांबद्दल अधिकारी वर्गाला लिहिणें हें तुमचें कर्तव्य आहे.

## सर्व उतारूंस

तुम्ही सुशिक्षित किंवा अशिक्षित, गरीब किंवा श्रीमंत कोणीहि असा, पण खालील सूचना ध्यानांत ठेवाल तर उतारूंच्या शेंकडा पाऊणशें अडचणी क्षणमात्रांत नाहींशा होतील.

( १ ) स्टेशनांत जातांना आणि गाडींत बसतांना बळजवरीनें पहिल्यानें घुसण्यापेक्षां ' मी शेवटीं गेलों तरी हरकत नाहीं ' असें समजून वागाल तर तुम्हाला कोणतीहि इजा न होतां तुमच्या सौजन्याचा इतरांना फायदा मिळेल.

( २ ) गाडींत बसल्यावर हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं त्यांत लिहिलें असेल तितक्या माणसांना बसण्याचा हक्क तुमच्या इतकाच आहे. यासाठीं इतरांना येण्यास हरकत केल्यानें खोटें बोलून नीतीचा आणि रेलवेच्या कायद्यांचा भंग केल्याप्रमाणें होतें.

( ३ ) तिसऱ्या वर्गाच्या उतारूला जितकें सामान नेण्याचा अधिकार आहे तितकेंच सामान जर तुम्ही बरोबर ठेवाल तर दुसरेहि सुखानें बसूं शकतील. त्यापेक्षां अधिक सामान नेण्याची तुमची ऐपत असेल तर तें सर्व मालाच्या खटाऱ्यांत ( ब्रेकमध्यें ) ठेवून दिलें पाहिजे आणि त्यासाठीं लागणारें भाडें भरलें पाहिजे.

( ४ ) तुमचें सामान अशा प्रकारचें पाहिजे कीं तें बांकाखालीं किंवा वरील फळीवर सहज ठेवितां यावें.

( ५ ) तुम्हीं सुखवस्तु असाल व परोपकारासाठीं फिरत नसाल तर आपल्या सुखासाठीं तुम्हीं पहिल्या दुसऱ्या वर्गाचेंच तिकिट काढिलें पाहिजे. केवळ कंजूषपणामुळें तिसऱ्या वर्गाचें तिकिट घेतल्यानें गरीब लोकांवर जुलूम होतो. पण कदाचित् वरच्या वर्गांतून जाण्याची तुमची इच्छा नसली तरी तुमच्या श्रीमंतीचा तुम्ही असा उपयोग कधींच करतां कामा नये कीं, **तुमचा व तुमच्या सामानाचा** तुमच्या बरोबरीच्या उतारूंना त्रास होईल.

( ६ ) तुम्हीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं लांबवा प्रवास करणाऱ्या सर्व उतारूंना निजण्याची कांहीं सोय मिळालीच पाहिजे. यास्तव तुमच्या वांट्याला येईल तितकीच झोंप तुम्ही घेतली पाहिजे.

( ७ ) तुम्ही विडी ओढणारे असाल तर दुसऱ्यांना विचारून, त्यांना अडचण न होईल अशा रीतीनेंच ती ओढली पाहिजे.

( ८ ) थुंकावयाचें असेल तेव्हां खालच्या फळीवरच थुंकल्यानें फार घाण होते. केव्हां केव्हां रोगही उद्भवतात. आणि स्वच्छतेचे नियम पाळणाऱ्या कित्येक गृहस्थांस हा किळसवाणा प्रकार अत्यंत असह्य वाटतो.

( ९ ) शौचकूप काळजीपूर्वक स्वच्छ ठेविले तर सर्वांनाच सुख होतें. त्यांत वाटेल तशी घाण करणारे लोक आपल्या पाठीमागून येणारांचा कांहींच विचार करीत नाहींत !

( १० ) प्रवास करते वेळीं तुम्ही ब्राह्मण आणि दुसरा वैश्य किंवा शूद्र, तुम्ही हिंदु आणि दुसरा मुसलमान, तुम्ही मुंबईचे आणि दुसरे मद्रासचे, असला भेदभाव मनांत आणून द्वेष उत्पन्न करण्यापेक्षां, आपण सर्व हिंदुस्थानचीं लेंकरें आहों आणि प्रसंगवशात् एका पडवींत गोळा झालों आहों असें मानून भ्रातृभाव वाढवाल तर ह्या घटकेला सुखी व्हाल आणि हिंदुस्थानला शोभवाल.

---

# आगगाडींतील तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल.

( वर्तमानपत्रांतील पत्रव्यवहार. २५–९–१७. )

मी दक्षिण आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत येऊन राहिल्याला अडीच वर्षे झालीं. या कालापैकीं ¼ पेक्षां अधिक भाग मी खुषीनें आगगाड्यांतून तिसऱ्या वर्गानें प्रवास केला आहे. मी लाहोर पासून ट्रँकिबार पर्यंत व कराची पासून कलकत्त्या-पर्यंत प्रवास केला आहे. अशा रीतीनें प्रवास करण्याच्या हेतूंपैकीं एक हेतु तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या लोकांची स्थिति समजून घ्यावी हाही असल्यामुळें मी पुष्कळ बारकाईनें निरीक्षण केलें. आणि या कालांत मी बहुतेक सर्व रेलवेंतून प्रवास केला. मला दिसलेल्या दोषांसंबंधानें निरनिराळ्या रेलवेंच्या व्यवस्था-पकांकडे वारंवार पत्रव्यवहार केला. तथापि यांपैकीं पुष्कळसे दोष सहज दूर होण्यासारखे असून ते दीर्घकालपर्यंत दूर झाले नाहींत. यावरून असें दिसतें कीं हे हाल दूर करण्यासाठीं वर्तमानपत्रें आणि लोक यांनीं पुढें होऊन कंबर बांधावी व मोहीम ( crusade ) सुरू करावी, अशी त्यांना विनंति करण्याची वेळ आली आहे.

तारीख १२ सपटंबर रोजीं मुंबईहून मद्रासला जाण्याला मी निघालों. तेरा रुपये नऊ आणे भाडें द्यावें लागलें. मी ज्या डब्यांत बसलों होतों त्यांत बावीस उतारूंनीं बसावें अशी पाटी मारलेली होती. इतक्या माणसांनाही फक्त बसतां येईल इतकीच जागा होती. उतारूंना निजतां येईल किंवा हात पाय मोकळे

सोडून बसतां येईल अशा फळ्या वगैरेही वर मारलेल्या नव्हत्या. मद्रासला पोंचण्यापूर्वी आम्हांला दोन रात्री गाडींतच काढावयाच्या होत्या. पुण्याला जाईपर्यंत बावीसपेक्षां जास्त उतारू आमच्या डब्यांत नव्हते याचें कारण एवढेंच कीं कांहीं जबरदस्त उतारूंनीं इतरांना आंत येऊंच दिलें नाहीं. दोन तीन दुराग्रही उतारूंखेरीज बाकी सर्वांना बांकावर बसल्या-बसल्याच डुलक्या खात रहावें लागलें. रायचूरला गाडी पोंचल्यावर उतारूंचा तोबा सुरू झाला. डब्यांत शिरूं पहाणाऱ्या उतारूंच्या लोंढयाचा प्रतीकार करतां येईना. आमच्यांतील जबरदस्त उतारूंनींही हात टेंकले. रेल्वेगार्ड व रेल्वेचे इतर अधिकारी जे डब्याकडे येत तेसुद्धां जास्तीच उतारू आंत ढकलून देत. अशाप्रकारें उतारूंना मेंढरांप्रमाणें कोंबण्याविरुद्ध एका मेमण व्यापाऱ्यानें तक्रार केली. आपण अहोरात्र पांच दिवस एकसारखे गाडींत आहों असेंही त्यानें सांगून पाहिलें पण व्यर्थ! उलट गार्डानें त्याचा उपमर्द केला व स्थानिक अधिकाऱ्यांकडे ( Terminus ) तक्रार करण्यास सांगितलें. बहुतेक रात्रभर आमच्या डब्यांत पसतीसपेक्षां जास्त उतारू होते. त्यापैकीं कित्येक खालीं धुळींत बसले होते तर कित्येक उभेच्या उभेच होते. एकदां तर प्रकरण हातघाईवरच आलें होतें पण कांहीं वृद्ध उतारूंनीं, अशा प्रवासाच्या अडचणींत क्रोधावेशाची भर पडूं नये म्हणून मध्यस्थी करून तो प्रसंग टाळला. वाटेंत उतारूंना जो चहा मिळाला तो चहा म्हणजे पुष्कळ टॅनिन् ॲसिड असलेलें उकळणारें पाणी; त्यांत घाणेरडी साखर व दुधाचें फिळकवणी—असा होता. दिसण्यांत तरी तो चहा मला स्वतःला असा दिसला. त्याची रुचि त्या बिचाऱ्या उतारूंना माहीत ! !

या सबंध प्रवासांत एकदाही हा डबा झाडून काढण्यांत आला नाहीं. यामुळें परिणाम असा झाला कीं ज्या ज्या वेळीं एखाद्याला इकडून तिकडे जावें लागे, नव्हे-त्या धुळींत बसलेल्या उतारूंमधून आपला मार्ग काढावा लागे तेव्हां तेव्हां त्याला घाणींमधून जावें लागे. या प्रवासांत संडास केव्हांही साफ केला गेला नाहीं व टांकींत पाणीही नव्हतें.

प्रवासांत जे उपहाराचे पदार्थ उतारूंना विकले जात होते ते घाणेरडे दिसत होते. पदार्थ विकणारांचे हात त्याहून घाणेरडे होते. व तराजूही तितकाच घाणेरडा होता. उतारूंच्या हातांत हे पदार्थ पडण्यापूर्वीच हजारों माशांनीं त्यांच्यावर यथेच्छ

त्ताव मारलेला होता. असले पदार्थ खाणाऱ्यांपैकीं कांहीं जणांना मी त्यांचा अभिप्राय विचारला होता. यांपैकीं पुष्कळांनीं पदार्थांच्या गुणांचें वेंचक शब्दांनीं वर्णन केलें ! पण शेवटीं "आमचा याला नाइलाज आहे" असें म्हणून ते स्वस्थ बसत.

मद्रास येथें पोंचल्यावर, मागितलें भाडें कबूल केल्याशिवाय गाडीवाला गाडी हांकीना. मी त्याला नीट समजावून सांगितलें कीं जें ठराविक भाडें असेल तें मी देईन. 'शेवटीं मला गाडींतून खेंचून काढ, नाहींतर पोलिसला बोलाव' असें मी त्याला सांगितलें. इतका सत्याग्रह केला तेव्हांच त्यानें गाडी हांकली.

परत येतांनांही कमी हाल झाले असें नाहीं. गाडींत उतारूंची चिकार गर्दी झाली होती. व माझ्या एका मित्रानें रदबदली केली नसती तर मला बसण्यापुरती जागाही मिळाली नसती. अगोदरच डब्यांतील उतारूंची संख्या ठराविक मर्यादेच्या बाहेर गेलेली होती ! त्यांतच मीही घुसलों होतों. या डब्यांत नऊ उतारूंची सोय होती. पण त्यांत बारांपेक्षां कमी उतारू केव्हांही नव्हते. एका ठिकाणीं तर एका बड्या रेल्वे अधिकाऱ्यानें एका प्रॉटेस्टंट उतारूला शिवीगाळ व मारहाण केली. आणि बरेच उतारू आंत दडपून दरवाजाला कुलूप लावून तो चालता झाला. या डब्याला एक संडास म्हणून होता ! याची रचना युरोपिअन पद्धतीची होती. पण त्या पद्धतीनें तो वापरतां येण्याजोगा नव्हता ! त्यांत नळ होता. पण नळाला पाणी नव्हतें ! आणि मी प्रतिज्ञेवर सांगतों कीं त्यांत घाणीची कमाल होती. डबा सुद्धां फार वाईट दिसत होता. घाणीचीं पुटें फळ्यांवरून बसलेलीं होतीं. व कैक वर्षांत त्यांना पाण्याचा स्पर्शही झालेला नसावा असें दिसत होतें.

या डब्यांत निवडक उतारू होते. त्यांतील तीन उतारू धिप्पाड पंजाबी मुसलमान होते. दोन सुधारलेले तामील होते. आणि मागाहून दोन मुसलमान व्यापारी आले. ते प्रवासाच्या सुखसोयीकरितां कसकसा लांच द्यावा लागला हें सांगत होते. पंजाब्यांपैकीं एकजण तीन दिवसांच्या प्रवासानें अगदीं थकून गेला होता. पण त्याला कांहीं हातपाय लांब करतां येईनात ! 'आपणही सगळा दिवसभर सेंट्रल स्टेशनमध्यें बसून होतों व उतारूंना टिकीट मिळविण्यास कसा लांच द्यावा लागतो हें पाहिलें' असें तो म्हणाला. दुसरा म्हणाला "मला स्वतःलाच तिकीट व जागा मिळण्याला पांच रुपये द्यावे लागले !" ह्या तिघांनाही लुधियाना येथें जावयाचें होतें, व गाडींत आणखी कांहीं रात्री काढावयाच्या होत्या.

वर दिलेल्या गोष्टी अपवादात्मक नसून नेहेमीं घडणाऱ्या आहेत. मी रायचूर धोंड, सोनेपूर, चक्रधरपूर, पुरुलिया, असनसोल वगैरे जंक्शनांवर उतरलेला आहें. व तेथील उतारूंच्या धर्मशाळांतूनही राहिलेला आहें. या जागा दिसण्यांत फार गलिच्छ असून तेथें स्वच्छता नाहीं, व्यवस्था नाहीं! कोणत्याही प्रकारची सोय नाहीं! सगळीकडे गोंधळ! व कर्णकटु गोंगाट!! उतारूंकरितां बाकें नाहींत! व असलीं तर पुरेशीं नाहींत. त्यांना जमिनीवर बसावें लागतें. व घाणेरडे पदार्थ खावे लागतात. उतारूंनीं, उरलें सुरलें वाटेल तेथें फेंकावें, वाटेल तेथें बसावें, व पाहिजे तेथें विड्या फुंकाव्या! या धर्मशाळांतून असणारे संडास इतके गलिच्छ असतात कीं, त्याचें वर्णन करतां येणार नाहीं व करूं लागलें तर सभ्यतेचा अतिक्रमच करावा लागेल. रोगजंतुनाशक द्रव अथवा पूड, किंवा राख यांचा कोठें मागमूसही नाहीं. या संडासांसभोंवती घोंगावणाऱ्या माशांचे थवेच्या थवे त्या संडासांचा उपयोग न करण्याविषयीं जणूं काय सावधगिरीची सूचनाच देत आहेत असें वाटतें. पण तिसऱ्या वर्गाचा उतारूवर्ग म्हणजे मूक व लाचार! अशा स्थलीं जाणें म्हणजे मरणप्राय! तरीही तो कधीं तक्रार करणार नाहीं! प्रवासाच्या यातना कमी व्हाव्या म्हणून गाडींत उपवास करणारे उतारू मीं पाहिले आहेत. सोनेपूर येथें माशांचेंही कांहीं चालेना म्हणूनच कीं काय आतां गांधिलमाशा तेथें येऊन राहिलेल्या आहेत व उतारूंना त्याचप्रमाणें अधिकाऱ्यांना जागें करण्याचा प्रयत्न करीत आहेत पण व्यर्थ! हिंदुस्थानच्या राजधानींत एक तिसऱ्या वर्गाचें तिकिट ऑफिस आहे, तें म्हणजे जणूं ब्लॅक होलच! तें जाळूनच टाकण्याच्या योग्यतेचें आहे.

मग, हिंदुस्थानांत प्लेगनें कायमचें ठाणें दिलें यांत आश्चर्य कसलें! जेथें प्रवासी जातील तेथें घाण करतात व जातांना बरोबर अधिक घाण घेऊन जातात तेथें असेंच व्हावयाचें! वाटेल तेथें विड्या फुंकाव्या! मग तेथें बायका असोत कीं, इतरांचा धूम्रपानास आक्षेप असो. ही गोष्ट हिंदुस्थानांतील रेल्वेंतच दृष्टीस पडते! आणि हें सर्व धडधडीत रेल्वेनें केलेल्या एका कायद्याविरुद्धच! कारण रेल्वेचा असा एक कायदा ( bye-law ) आहे कीं धूम्रपानाकरितां राखून ठेविलेल्या खास डब्याशिवाय इतरत्र, डब्यांतील उतारूंच्या संमतीशिवाय कोणींही धूम्रपान करूं नये!

या भयंकर आपत्तीचा नायनाट करण्याच्या कामीं प्रस्तुतच्या महायुद्धाची आड आणतां कामा नये. लढाई चालू आहे, एवढयाचवरून घाण व गार्दी-गर्दी यांनाही चालू राहूं देणें इष्ट नाहीं. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं उतारूंची ने आणच एकदम बंद केली तर गोष्ट निराळी! नाहींतर घाण व गर्दी यांचा ताबडतोब बंदोबस्त झाला पाहिजे. त्याचप्रमाणें आरोग्य व नीति यांना विघातक असे प्रकार मुळींच चालूं देतां कामा नयेत.

पहिल्या वर्गाच्या उतारूंची स्थिति पहा व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची स्थिति पहा! मद्रासेकडे पहिल्या वर्गाचें भाडें तिसऱ्या वर्गाच्या पांचपटींवर असतें. मग पहिल्या वर्गाच्या उतारूला ज्या सुखसोयी असतात त्यांचा पांचवा, निदान दहावा हिस्सा तरी तिसऱ्या वर्गाच्या उतारूला मिळतो काय? भाड्याच्या मानानें तरी सुखसोयी मिळाव्या ही न्यायाची अगदीं साधी बाब आहे.

तिसऱ्या वर्गाच्या उत्पन्नावरच पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या वाढत्या चैनी अवलंबून असतात, ही गोष्ट जगजाहीर आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूला, जीवनाला अत्यंत अवश्यक अशा सुखसोयी तरी मागण्याचा हक्क आहे यांत कांहीं संशय नाहीं. अशा रीतीनें तिसऱ्या वर्गाच्या उतारूवर्गाची हेळसांड केल्यानें लाखों लोकांना व्यवस्थितपणा, आरोग्य, सभ्यपणा, एकजूट, साधेपणा व स्वच्छ-पणाची आवड, इत्यादि सद्गुणांचें उत्कृष्ट शिक्षण देण्याची सोन्यासारखी संधि फुकट जात आहे. प्रवासाच्या अनुभवानें वरील सद्गुणांचें प्रत्यक्ष शिक्षण मिळ-ण्याऐवजीं, त्यांचा सभ्यपणा व स्वच्छपणाची असलेली आवडही नष्ट होऊं पहात आहे.

हें सर्व अरिष्ट टाळण्यासाठीं जे कांहीं उपाय सुचविण्याजोगे आहेत त्यांपैकीं एक मी येथें सादर करीत आहें.

वरच्या वर्गांतून प्रवास करणाऱ्या व्हाइसरॉय, सेनापति, सरकारी कौंसिलचे नामदार सभासद, राजे महाराजे वगैरे लोकांनीं अकल्पित तिसऱ्या वर्गाच्या प्रवासाचा अनुभव घेऊन पहावा. म्हणजे तिसऱ्या वर्गाच्या स्थितींत पुष्कळ फरक पडेल. आणि तिसऱ्या वर्गाच्या लाखों मूक प्रवाशांना मनुष्यप्राण्याला अत्यावश्यक असलेल्या सुखसोयी लाभतील.

# हिंदी संरक्षक-सैन्य.

' आम्हाला सैन्यांत घ्या ' अशी हिंदी लोकांनीं सरकारपाशीं आज वर्षानु वर्षापासून मागणी चालविली होती. सरकारनें ती आतां कबुल केली आहे. तेव्हां हिंदी लोकांनीं संरक्षक सैन्यांत गर्दी करून सोडावी व अशा रीतीनें मातृभूमी संबंधाचें कर्तव्य करावें. मला हिंदुस्थानांतल्या लोकांची परिस्थिति माहीत आहे. व त्यांना या संबंधानें काय वाटतें हें ही मी जाणत आहें. म्हणून त्यांना मी असा उपदेश करीत आहें. स्वसंरक्षणार्थ सुद्धां हत्यारांचा उपयोग करावा किंवा नाहीं या संबंधानें माझीं अशीं कांहीं ठाम मतें बनून गेलीं आहेत; परंतु आज मिळालेली सुधारणा अमलांत आणण्यासाठीं ज्यांनीं वर्षानुवर्षे चळवळ केली, त्यांना हीं माझीं मतें मान्य नाहींत हें मला ठाऊक आहे. आज आलेली संधि मनुष्याच्या आयुष्यांत फार तर एकदांच येणारी आहे आणि म्हणून प्रत्येक राष्ट्रभक्तानें ती वायां जाऊं देऊं नये अशी माझी विनंति आहे. सर सत्येंद्र प्रसन्न सिंह यांनीं राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या आपल्या भाषणांत याच मुद्यावर जोर दिला आणि सर कृष्ण गुप्त यानींहि हिंदी लोकांना सैन्यांत अगोदर प्रवेश करून घेण्याचा उपदेश केला आहे. आतां सैन्याचें द्वार आपल्याला खुलें झालें आहे आणि आपण या सोन्यासारख्या संधीचा फायदा घेतला नाहीं तर तें आपल्यास, आपल्या पुढाऱ्यांस आणि आपल्या देशास लांछनास्पद होईल. धंदेवाईक लोकांनीं आपला धंदा कर्तव्याच्या आड येऊं देऊं नये. कारण देशाचें रक्षण करणें म्हणजे एका परी आपल्या धंद्याचेंच रक्षण करण्यासारखें आहे. आपण आपल्या देशाचें रक्षण न केल्यामुळें किंवा तें करण्यास आपण असमर्थ असल्यामुळें शत्रूनें आपला देश पादाक्रांत केला तर आपले सर्व धंदे बसतील. संरक्षक-सैन्याचें हें बिल म्हणजे स्वराज्याचा पहिला हप्ता होय असें माझें मत आहे. आणि सरकारनें देऊं केलेल्या सवलती न घेणें म्हणजे स्वराज्य नको म्हणण्यासारखें आहे. त्यांनीं आपल्याला जें देऊं केलें आहे, त्याचा आपण विनशर्त स्वीकार करावा. त्या योजनेंतल्या दोषांवर टीका मागाहून फुरसतीनें करावी.

कराची. मार्च १९१७.

IRBK-0100251

IRBK-0100251